श्री लोखंडे निर्भिड वक्ते, झुंजार लेखक, संपादक, शिक्षण व समाजसुधारक आणि संघर्षशिल कामगार नेता या सर्वार्थाने परिपूर्ण व्यक्तीमत्त्व होते. प्लेग निवारण्यासाठी त्यांच्या मदतीने मुंबई 'मराठा इस्पीतळ' काढले. पण दुर्दैवाने ९ फेब्रुवारी १८९७ मध्ये त्यांचेच प्लेगने निधन झाले. महाराष्ट्राच्या कामगार चळवळीच्या इतिहासात बॉम्बे मिल हॅण्ड असो. च्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य संस्मरणीय आहे. १८९० मध्ये ब्रिटीश सरकारने त्यांना 'जस्टीस

ISSN : 2348-7143
December-2018

ऑफ धिस' ही पदवी दिली. तर १८९५ ला त्यांना रावबहाद्दूर ही पदवी दिली. सर जॉन कॉटन यांनी त्यांचा अतिशय बुध्दिमान व समर्थ कामगार पुढारी असा गौरव केला.

**कामगार संघटनेची पार्श्वभूमी**

ब्रिटीशकाळात महाराष्ट्रात कामगार चळवळीची पार्श्वभूमी तयार होण्यासाठी त्या काळातील उद्योगक्षेत्रातील स्थित्यंतरे मोठ्या प्रमाणात ठरली.

१. १८७४ मध्ये फॅक्टरी ॲक्ट लागू करावा अशी पहिली मागणी इंग्लंडहून आली. त्यांचा मुंबईचा उद्योग विकासात गतिरोध येणार होता. म्हणून मुंबईतील गिरणी मालकांनी 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' ही संस्था स्थापन केली.
२. १८७८ मध्ये स्थानिक कापड उद्योग दाबवण्यासाठी इंग्लंडमधून आयात होणाऱ्या सूत व जाडेभरडे कापड मालावरील कर सरकारने रद्द केला. त्यामुळे कामगारासह गिरणी मालकांनी निषेध सभा घेतली.
३. १८७९ मध्ये फॅक्टरी बिल सरकार दरबारी मांडल्यामुळे मिल ऑनर्स असोसिएशनने त्याचा निषेध केला.
४. १८७५ मध्ये कामगार सुधारणा कायदे करावेत अशी मागणी साहेराबजी शापुरजी यांनी केली.
५. पुण्याच्या डेक्कन सभेची मागणी, मॅचेस्टरचा दबाव, गिरणी कामगार व मालक यांचा प्रभाव या सर्वांमुळे औद्योगिक क्षेत्र ढवळून निघाले.
६. २३ मार्च १८८१ रोजी मुंबईचे जिल्हाधिकारी अर्बुथनॉट यांच्या अध्यक्षतेखाली पहिले फॅक्टरी कमिशन नेमण्यात आले.
७. या कमिशनच्या अहवालावर १८८१ मध्ये फॅक्टरी ॲक्ट पास करण्यात आला.
८. या कायद्याने कामगारांच्या पिळवणुकीत फारसा फरक पडला नाही. त्यामुळे कामगारांचा लढा आणखी गतिशील झाला.
९. २३ सप्टेंबर १८८४ ला श्री लोखंडे यांनी पहिली कामगार परिषद भरवली. त्याला ४००० कामगार उपसिथत होते. ५५०० कामगारांच्या सहायांचे निवेदन त्यांनी फॅक्टरी कमिशनच्या अध्यक्षांना तयार करून १५ ऑक्टोबर १८८४ रोजी दिले. त्यानंतरही कामगारांच्या पिळवणुकीत फारसा फरक पडला नाही. कामगारांच्या हिताचा फॅक्टरी ॲक्ट करावा ही मागणी करण्यासाठी श्री लोखंडे यांना कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली या सर्वांचा परिणाम म्हणून श्री लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल हॅण्ड असोसिएशन' या नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली.'[५] आपल्या कर्तृत्वाने ही चळवळ इतिहास प्रसिध्द झाली.

**कामगार संघटनेची वाटचाल**

या संघटनेच्या स्थापनेत श्री लोखंडे यांच्या बरोबरच अनेक जॉबर मंडळीही आघाडीवर होती. यामध्ये गेनू बाबाजी, रघु भिकाजी, नारायण सुर्कोजी हे आघाडीवर होते. सत्यशोधक चळवळीचे लढाऊ तत्वज्ञान या संघटनेच्या मुळाशी होते. त्यामुळेच विठ्ठलराव कोरगावकर, क.अ. केळूसकर, नारायण पवार, रामचंद्र शिंदे या सत्यशोधकांनीही संघटनेला मौलिक सहकार्य केले. नियम, निधि व नोंदणीकृत सदस्यांचा अभाव असतांनाही ही कामगार संघटना कामगारांच्या प्रश्नांसाठी प्रभावी लढा देत राहिली. कामगारांची खरी स्थिती जाणून घेण्यासाठी सरकारने १८९१ मध्ये टॉमल कमिशन ऑन लेबर स्थापन केले. या कमिशनपुढे श्री लोखंडे यांनी साक्ष दिली व कामगारांची बाजू भक्कमपणे मांडली.

१. कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी असावी.
२. त्यांना दुपारच्या जेवणाची अर्धा तास सुट्टी असावी.
३. मासिक पगार १५ तारखेपूर्वी मिळावा.

ISSN : 2348-7143
December-2018

४. ११ तासापेक्षा जास्त काम नसावे.
५. अपघात, आजार काळात भरपगारी रजा असावी.
६. निवृत्ती वेतन मिळावे या कामगारांची प्रमुख मागण्यासाठी श्री लोखंडे यांनी प्रभावी लढा दिला.

त्यांच्या २४ एप्रिल १८९० रोजीच्या रेसकोर्स मैदानावरील सभेस दहा हजार कामगार उपस्थित होते. २५ मार्च १८९४ रोजी मुंबईतील सुपारी बागेजवळील जेकब मिल मधील ४०० स्त्रीयांनी श्री लोखंडे यांच्या प्रेरणेने उठाव केला. ऑगस्ट १८९३ मध्ये मुंबईत हिंदू-मुस्लिम दंगली झाल्या. तेंव्हा श्री लोखंडे यांनी धोका पत्करून दोन्ही समाजातील लोकांच्यात शांतता निर्माण केली. यावेळी राणीच्या बागेत त्यांनी 'एकोपा मेळावा' घेतला. त्यात ६० हजारांवर लोक सहभागी झाले. धर्माच्या नावावर कामगारात फूट पडू नये, सलोखा रहाव हा त्यांचा दृष्टीकोन होता. भारताची कामगार चळवळ उदयाला येण्यात व ती सक्षमपणे गतिमान होण्यास श्री लोखंडे यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**सारांश**

समृध्द महाराष्टाच्या कामगार लढ्याला श्री लोखंडे यांच्या कामगार संघटनेचा प्रभावी वारसा लाभला आहे. १ मे हा दिवस आपण 'महाराष्ट्र दिन' म्हणून साजरा करतो. आणि तोच दिवस जगभर 'कामगार दिन' म्हणून साजरा करतो. हा एक अणोखा योगायोग आहे.[६] भविष्यकालीन महाराष्ट्र कसा असेल हे ठरविण्यामध्ये कामगार संघटनांचा व श्रमिकांचा महत्त्वाचा वाटा असेल. हेच सुचित करणारा हा योगायोग आहे. महाराष्ट्राची राजधानी व देशाचे आर्थिक हृदय असलेल्या मुंबईत पहिली संघटित कामगार गर्जना झाली हे उल्लेखनीय आहे.

**संदर्भ साहित्य सूची :**

१. Gadgil D. R. Inderstrial Evolution of India, Page १३
२. प्रधान ग.प्र., निवडक साधना खंड ४, साधना प्रकाशन, २००७, पृ.१८३
३. डॉ.बी.एल.ग्रोव्हर, आधुनिक भारताचा इतिहास (अनु.), निरजा प्रकाशन, २००२, पृ.१०९
४. मराठी विश्वकोश, खंड १५, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ प्रकाशन, १९०५, पृ.८१६
५. प्रा.जाधव वसंत, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, २००५, पृ.२५७.
६. कर्णिक मधु मंगेश, सांस्कृतिक महाराष्ट्र खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, २०११, पृ.२६२.

# स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ व सद्यस्थिती

**प्रा. राजकुमार ज्ञानोबा चाटे**
इतिहास विभाग प्रमुख,
कला व वाक्मय महिला महाविद्यालय, अंबाजोगाई
ता.अंबाजोगाई जि.बीड

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात शेतकरी चळवळ सुरु होण्यामागचे श्रेय ब्रिटिशांना जाते. मुंबई प्रांतात एलफिन्स्टनने सुरु केलेली रयतवारी पध्दतीने शेतकरी वर्गाला स्वत:च्या हक्काची जमिन मिळाली. परंतु शेतसारा वारेमाप आकारून शेतकऱ्यांचे शोषण केले. त्यातच महाराष्ट्रात वारंवार पडणारे दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांनी वेळेत शेतसारा भरला नाही तर ब्रिटीशांनी अशा शेतकऱ्यांच्या जमिनी लिलाव करून टाकल्या व शेतकरी भूमीहिन होवू लागला. एकीकडे ब्रिटीशांनी शेतकऱ्यांना लुटले तर व्यापाऱ्यांनी नगदी पीके घेण्यास प्रोत्साहन देवून तो माल कमी किंमतीत घेवून तो पक्का माल बाजारात विकून भरपूर नफा मिळविला. जो कष्टकरी व श्रमजीवी असणाऱ्या शेतकरी वर्गाला त्याचा कष्टापेक्षा त्याला फार कमी मोबदला मिळत होता याचे जीवंत वर्णन म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात पाहावयास मिळते. म. फुल्यांनी ब्रिटिश, व्यापारी व सावकार यांच्या शोषणाच्या धोरणावर कडाडून टीका केली. तर न्या. रानडे यांनी अनुकंपनीय अवस्थेतील शेतकरी वर्गाच्या हलाखीची परिस्थिती स्पष्ट करून ब्रिटीश सरकारकडे उपाय योजनेसाठी पाठपुरावा केला. त्यातूनच सरकारने १८९६-९७ मध्ये दुष्काळ निवारण कार्यक्रम हाती घेतला.

**उद्दिष्ट :**

१. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या कार्याचे विश्लेषण करणे.

शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांच्या हक्कासाठी म.गांधी यांनी चंपारण्य सत्याग्रह केला व शेतकरी वर्गात जनजागृती केली. पुढे त्यांचा वारसा सरादार पटेल बार्डोली सत्याग्रह (१९२७) व सेनापती बापट (१९२०-२४) यांनी मुळशी सत्याग्रह करून शेतकऱ्यांमध्ये नवचेतना निर्माण केली. आखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांचे संघटन व्हावे शेतकऱ्यांमध्ये शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक सुधारणा व्हाव्यात. या हेतूने १९३६ साली आखिल भारतीय किसान सभेची स्थापना झाली व शेतकऱ्यांना हक्कांचे विचारमंच मिळाले.[१]

स्वतंत्र्यपूर्वकाळात शेतकऱ्यांकडून राज्यकर्त्यांना महसूलाची फार मोठी अपेक्षा ठेवली होती. शेतकऱ्यांकडून मागण्यासाठी उठाव झालाच तर सरकार जूजबी दुरुस्त्या व आयोग नेमुन त्या प्रश्नाची बोळवणूक करीत असे. २०१४ च्या कृषी आराखड्यानुसार महाराष्ट्रातील आज ५५%जनता ही शेतीवर अवलंबून आहे. ५० वर्षापूर्वी महाराष्ट्रातील पेरणी क्षेत्र १२.४ देशाच्या एकूण पेरणी क्षेत्राच्या एवढे होते. चाळीस वर्षापूर्वी प्रत्यक्ष लागवडी खाली एकूण जमीन २ कोटी ११ लाख ७९ हेक्टर जमीन होती. आज महाराष्ट्राकडे प्रत्यक्ष लागवडी खाली एकूण जमीन १ कोटी ६७ लाख ६४ हजार हेक्टर आहे. यावरून असे लक्षात येते की, शेतकऱ्यांची संख्या आज वाढलेली दिसून येत असली तरी प्रत्यक्षात जमीनीची उपलब्धता कमी झालेली दिसून येते. महाराष्ट्रातील आज अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या ७८% एवढी आहे.[२]

स्वातंत्रपूर्व काळात देशाच्या विकासात शेतीतून मिळणारा महसूल सर्वाधिक होता. आज मात्र तो घटताना दिसत आहे. यांची कल्पना आपल्याला खालील माहिती येईल.

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

**राज्य उत्पादनातील क्षेत्रावरील रचनेबद्दल माहिती तक्ता (२०१२-१३)**

| वर्ष ८ वे क्षेत्र | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २००७-०८ | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|
| शेती | ३१ | २२ | २३ | २१ | १५ | १२.४ |
| उद्योग | २३ | २९ | ३१ | ३२ | २८ | २८ |
| सेवा | ४६ | ४९ | ४६ | ४७ | ५७ | ५९.५ |

वरील तक्त्याचे विवेचन केले असता असे निष्पन होते की, येथील शेतकऱ्याला मिळणाऱ्या सूख सूविधा सरकारकडून कमी मिळत असल्याने अत्याधुनिक बी-बियाणे मिळत असताना त्याची उत्पादकता आपल्याला घटलेली दिसून येते यांच्या पाठीमागील कारणाचा मागोवा पुढीलप्रमाणे -

१. **नैसर्गिक आपत्ती :**

ब्रिटीशपूर्व काळापासून महाराष्ट्राला दुष्काळाची परंपरा आहे, ती सोडविण्याची इच्छाशक्ती भूतकाळातील राज्यकर्ते व स्वातंत्र्योत्तर काळातील राज्यकर्त्यांना सोडविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाही. परिणामी महाराष्ट्राला आज शेतकरी आत्महत्या करणारे राज्य असलेला कलंक लागला.[३]

२. **कर्जबाजारी समस्या** :

दुष्काळामुळे दुबार, तिबार पेरणी, कौटुंबिक समस्या यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला व त्याचे अपेक्षीत उत्पादन घटले आहे.

**३.** शेतीला पूरक व्यवसाय शोधण्यात शेतकरी व राज्यकर्ते अपयशी ठरल्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन आधिक कष्टदायक बनले आहे.

**४.** सिंचनाच्या सोयी सुविधांचा अभाव : महाराष्ट्र असे एकमेव राज्य आहे की, एकूण लागवडीपैकी १२.४% क्षेत्र सिंचनाखाली असताना ऊस, केळी, द्राक्ष यासारख्या पीकाचे मोठे उत्पादन घेतले जाते व उर्वरित महाराष्ट्र कोरडवाहू असतो व त्याठिकाणी पाण्याची भीषण समस्या आहे.

शेतकऱ्याच्या हितासाठी कम्युनिष्ठ पक्ष व १९८० च्या दशकात शरद जोशींनी, कांदा, दुध, द्राक्ष व उसाचा शेतकऱ्यांबरोबर शेतमजूरांच्या हितासाठी लढा दिला परंतू त्यांनी १९९० दशकात त्यांनी राजकारणात प्रवेश केला व शेतकरी चळवळ थंडावली. शरद जोशी प्रमाणे राजू शेट्टी यांनी स्वाभिमान शेतकरी चळवळीद्वारे ऊस उत्पादकाचे प्रश्न सोडविले परंतू त्याची ही चळवळ पश्चम महाराष्ट्रापुरतीच मर्यारित राहिलेली दिसून येते. एकंदरीत त्यांची वाटचाल सुध्दा शेतकरी चळवळीकडून राजकारणाकडे चालू असल्याने शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणारे नेतृत्वाचा अभाव आपल्याला महाराष्ट्रात दिसून येतो.[४]

शेतकऱ्यांचे दारिद्रय व त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी खालील गोष्टीवर लक्ष दिले तरच या जगाच्या पोशिंद्याला न्याय मिळेल.

१. शेती, सिंचन, वीज, विज्ञान, तंत्रज्ञान यात सरकारने सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणुक वाढवून शेत उत्पादन वाढविणे.
२. शेतमालाला योग्य भाव द्यावा, तसेच खरेदी करणारी यंत्रणा शेती उत्पादनाच्या क्षेत्रात उभारावी.
३. पतपुरवठा करणाऱ्या सुविधात वाढ करून कमी व्याजदरात कर्जे उपलब्ध करून द्यावीत, नैसर्गिक आपत्तीत सवलती देण्यात याव्यात.
४. सर्व पिकांसाठी पिक विमा राबविण्यात यावा.
५. परदेशी मालावर संख्यात्मक निर्बंध लादून आयात कराचे धोरण ठरवावे.
६. भूमी सुधारणाची काटेकोर अमलबजावणी करून पडीक जमीन लागवडी खाली आणावी.

७. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी ठोस पाऊले उचलावित.

८. महाराष्ट्रातील सिंचनासाठी उचित पावले उचलून उपलब्ध पाणीसाठ्यावर अधिक शेतजमीन ओलीताखाली आणणे. दुष्काळजन्य भागात कमी पाणी लागणाऱ्या पिकांची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन. [५]

मागील १० वर्षात महाराष्ट्रातील १ लाखापेक्षा जास्त आत्महत्या केल्या आहेत.[६] हे महाराष्ट्रासाठी भूषणावह नाहीच परंतु शेतकरी वर्गावर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी भूदान चळवळ विनोबा भावे, कम्युनिष्टाची शेतकरी चळवळ, किसान सभा, तसेच शेतकरी कामगार पक्षानी केलेली जनजागृती तून खरा शेतकरी वर्ग आपल्या हक्कासाठी जागा झाला. या जागृतीतून शेतकऱ्यांनी जो लढा उभारला त्याचा शेतकरी वर्गावर विशेष परिणाम झाला. आजचा शेतकरी आपले हक्क व शोषण थांबविण्यासाठी सतत प्रयत्न करतो हे या चळवळीचे फलितच समजावे लागेल.[७] असे असले तरी शेतकऱ्याला थांबून चालणार नाही. स्वत:च्या उनतीसाठी मार्ग, अविरहितपणे चालविला तरच त्याचे सामाजिक न्याय प्रस्थापित होवू शकेल.

**संदर्भ ग्रंथ -**


**१.** डॉ.य.दी. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, ६, ७ व ८

**२.** प्रा.सौ.अनघा फाटक - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, मुरलीधर पब्लीकेशन, पूणे.

**३.** डॉ.अशोक जैन- महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लीकेशन, मुंबई

**४.** कृषी महाराष्ट्र विकास आराखडा, २०१४.

**५.** सेव्ह इंडीयन फार्मरस् शशिकांत दलाल लेख, २०१४, लोकसभा

**६.** महा.आ.पा.२०१२-१३.

**७.** प्रा.के.आर.बंग, महाराष्ट्र शासन आणि राजकारण विद्या बुक्स पब्लीकेशन, औरंगाबाद.

ISSN : 2348-7143
December-2018

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्थापित स्वतंत्र मजुर पक्ष आणि कामगार उध्दार

**आबासाहेब आर.कसबे**
एम.ए.(राज्य), नेट एम.ए.(समाज) ,
बी.एड.,बी.एम.सी.जे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाही विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्य, सत्ता न्याय आणि बंधुता यावर बाबासाहेबांची श्रध्दा होती आणि लोकशाही विचारसरणी या तत्वाच्या स्थापनेसाठी योग्य असल्याचे ते मानतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राजकीय सत्तेला समाजपरिवर्तनाचे महत्वाचे साधन मानीत. ज्योवेळेस देशात क्राँगेस पक्षाचे वर्चस्व होते त्यावेळेस ''कॉग्रेस पक्षाची एकपक्षीय हुकुमशाही निर्माण होऊ नये अशीच डॉ.बाबासाहेबांची मनोमन इच्छा होती''[१] त्यासाठी त्यांनी लोकशाहीच्या तक्ताला अनुसरून कॉग्रेस पक्षाला पर्यायी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला, कॉग्रेस पक्षाला विरोधी पक्ष पर्यायाने प्रबळ लोकशाहीचा सुदृढ वाढीसाठी त्यांनी पक्ष स्थापनेचा विचार केल्याचे दिसते.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ अस्पृश्य, मागास, दलितांसाठीच राजकीय पक्ष स्थापन करणार होते, परंतु खऱ्या अर्थाने सामाजिक समतेसाठी सर्व जातींच्या , धर्माच्या तसेच शोषित , दलित, मागास पिडीत, या व्यतींना एकत्र आणुन संयुक्तरित्या लढा देण्याचा त्यांनी निर्धार केला, त्यातुनच त्यांनी सर्वांना सामवणारा 'स्वतंत्र मजुर पक्ष ' स्थापन केला आपल्या पक्षाचे नांव स्वतंत्र मजुर पक्ष असे मुद्दाम ठेवल्याचे ते सांगतात ते म्हणतात ''दलित वर्ग ' नावाऐवजी 'मजुर' हा शब्द योजण्याचा हेतु म्हणजे 'मजुर' या वर्गात 'दलित' या वर्गाचाही समावेश होतो'' [२] डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पक्ष स्थापनेचा मुख्य हेतु म्हणजे त्या काळात भारतात द्विराष्ट्र वादाचा सिध्दांत मुस्लिम धर्मीयांनी स्विकारला होता, त्याच बरोबर मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, ॲग्लोइंडियन या सर्व लोकांना स्वतंत्र्य मतदार संघ देण्यात आले होते, विशेष म्हणजे कॉग्रेस पक्ष हा मागास, दलित, अस्पृश्यांना विभक्त मतदार संघ देऊ नये या मताचा होता व त्याला महात्मा गांधीचा जाहीर पाठींबा होता यातही साम्यवादी पक्ष हा मागासांच्या हित संबंधांना दुर्लक्ष करणारा पक्ष होता त्यामुळे या सर्व घडामोडींचा सारासार विचार करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तेव्हा आपला मजुर पक्ष हा अस्पृश्य वर्गाचा न राहता समाजातील सर्व वर्गाचा पाठिंबा मिळावा यासाठी व्यापक विचारांचा पक्ष स्थापन केल्याचे दिसते स्वतंत्र मजूर पक्ष स्थापनेच्या कार्यात ''श्री.दादासाहेब गायकवाड, श्री.डी.व्ही.प्रधान, श्री. चित्रे, श्री.टिपणीस, श्री.केंद्रेकर, श्री.भाळे, श्री.जाधव, आदि बाबासाहेबांच्या सहकार्याचेही सहकार्य होते ''[३] अशा प्रकारे '' स्वातंत्र्यासाठी आणि अस्पृश्स वर्ग आणि मागासवर्ग यांच्या सामाजिक , राजकीय, आर्थिक उत्थानासाठी आंदोलने, चळवळी आणि लढे यांच्या पार्श्र्वभूमीवर स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली होती ''[४]

**स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहीरनामा व कामगार , श्रमिक उध्दार धोरण :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पक्ष स्थापनेचा उद्देश हा अस्पृश्यांच्या , मागासांच्या, कामगारांच्या हितसंर्वधनाचा होता ते म्हणतात कि ''राजकीय पक्षांनी स्वतःच्या तत्व प्रणालीला देशापेक्षा मोठे मानले तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही ''[५]

स्वतंत्र्य मजुर पक्ष हा आपल्या तत्वाला बांधिल होता कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणे , त्यांना न्याय देणे हा उद्देश त्यांचा होता.

१. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारण म्हणजे शेतजमिनीचे लहान लहान तुकडे होय त्यासाठी शेती बरोबरच औद्योगिकीकरण वाढीसाठी स्वतंत्र मजुर पक्ष चालना देईल म्हणजे गुणवत्तेवर आधारीत ग्रामोद्योगाचे पुनज्जीवन व प्रातांतील नैसर्गीक साधन संपत्ती नुसार नवीन उद्योग वाढीला चालना देईल.

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

२. तंत्रशिक्षणाच्या कार्यक्रम हाती घेऊन कामगारांना तांत्रिक शिक्षणाचा पर्यायाने ज्ञान जागृतीचे शिक्षण देईल
३. कामगारांच्या व औद्योगिक धंद्याच्या उध्दारासाठी राज्याची मालकी आवश्यक
४. खोतीपध्दती व तालुकदारी पध्दती यांच्या अन्याकारी प्रवृत्तीविरुध्द आवश्यक प्रयत्न केले जाईल
५. कारखान्यातील कामगारांना कामावरू काढता येणार नाही व त्यांना नोकरीमध्ये बढती देण्यासाठी कायदा करण्याचा प्रयत्न केला जाईल.
६. कामगारांचे कामाचे तास निश्चित करण्यात येईल
७. कामगारांना योग्य पगार, रजा, सुखसुविधा तसेच बोनस , पेन्शन व सेवानिवृत्तीच्या वेळी पुढील जीवन जगणे सुखकर होईल यासाठी आवश्यक तरतुदी करण्यासाठी कायदा करण्याचा प्रयत्न केला जाईल.
८. औद्योगिक कामगारांच्या आरोग्याबाबत बेकारीच्या काळात व अपघाताच्या परिस्थितीत त्याला संरक्षण देण्यासाठी "Social Insurance" नामक योजना मांडून कामगारांच्या निवासासाठी स्वच्छ व सवलतीत निवासस्थानाची सोय करण्याचा प्रयत्न केला जाईल''[६]
९. औद्यागिक कामगारांच्या हितासाठी कालमानानुसार ज्या ज्या योजना योग्य असतील त्या देण्याचा प्रयत्न केला जाईल
१०. 'लॅड सेंटलमेंट' आणि सार्वजनिक बांधकामाच्या योजना सभागृहापुढे मांडुन भूमिहिन मजुरांच्या हक्काला काम मिळणे याचा पाठपुरावा केला जाईल.
११. ग्रामीण भागातील खाजगी सावकारी व्यवस्था बंद केली जाईल व कर्ज देणारा कर्ज घेणारा यांना संरक्षण देण्यासाठी आवश्यक कायदा करण्याचा प्रयत्न केला जाईल.
१२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा हा जाहिरनामा अतिशय आदर्श होता. त्यांच्या जाहिरनाम्यात त्यांच्या पक्षाच्या उदात्त हेतुची जाणीव होती. त्यामुळे त्यांचा हा जाहिरनामा समाजातील कार्यकऱ्यांना दिन दलितांना अस्पृश्यांना, मजुरांना शेतकऱ्यांना आपलासा वाटला या जाहिरनाम्यातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या वैचारीक दुरदृष्टीची जाणीव सर्वांना झाली विशेष म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हा जाहिरनामा निवडणुकींच्या ६ महिने अगोदरच जनतेला पक्षाचा जाहिरनामा कळावा यासाठी प्रसिध्द केला होता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या सर्व समावेशक जाहिरनाम्याचा समाज मनावर प्रभाव पडला. स्वतंत्र मजुरपक्षाने या १९३७ च्या निवडणुकीत सतरा प्रतिनिधी पैकी पंधरा प्रतिनिधी प्रचंड मताने विजयी झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मजुरवर्ग, मागासवर्ग, यांच्या उत्थानाला हा विजय होता व सत्ता रुढ कॉग्रेस पक्षाला विरोध करणारा प्रभावी विरोधी पक्षाचा उदय झाला होता हि भारतीय लोकशाही दृष्टीने महत्वाची बाब होती.

**स्वतंत्र मजुर पक्षाचे कामगाराच्या साठी दिलेले योगदान :**

१. कोकणामध्ये कामगारांचे, कुळांचे शोषन करणारी अमानवी खोती पध्दती अस्तित्वात होती या पध्दतीमुळे कामगारांचे, कुळांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ सप्टेबर १९३७ रोजी स्वतंत्र मजुर पक्षाचा वतीने खोती पध्दती नष्ट करण्यासाठी व शेतकऱ्यांना साह्य देण्यांसाठी विधेयक विधिमंडळात मांडले. त्याचबरोबर खोती पध्दती हि अयोग्य असुन त्याविरुध्द जनजागृती करण्यासाठी १७ जानेवारी १९३८ रोजी भव्य मोर्चा आयोजीत केला होता.
२. शेतकरी वर्गासाठी किमान वेतन दर असावेत यासाठी विधिमंडळात त्यांनी मागणी केली.
३. ''विधिमंडळात शासनाच्या वतीने औद्योगिककलह कायद्यात दुरूस्ती सुचवुन काही विशिष्ठ परिस्थितीत कामगारांचा संप करण्याचा अधिकार काढून घेण्यात आला होता. डॉ.बाबासाहेबांनी या बिलावर भाषण करून हा कायदा म्हणजे नागरी स्वातंत्र्याच्या गळचेपीचा कायदा''[६] असे वर्णन बाबासाहेबांनी केले होते व ७ नोव्हेंबर १९३८ रोजी एक दिवसांचे संप स्वतंत्र्य मजुर पक्षाचा वतीने करण्यात आला.
४. १९३८ मध्ये सावकारी विधेयक तयार केले

ISSN : 2348-7143
December-2018

५. मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतिक विधिमंडळातही स्वतंत्र मजुर पक्षाच्या आमदारांनी महत्वपुर्ण निर्णय घेतले स्वतंत्र्य मजुर पक्षाचे आर.जी.घोडीचोर यांनी बिडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी एक बिल विधिमंडळात सादर केले होते.
६. विडी कामगारांना न्याय देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.
७. कामगारांना पुर्वी भरपगारी रजा देण्याची तरतुद नव्हती, १४ एप्रिल १९४४ रोजी डॉ.बाबासाहेब यांनी भरपगारी रजेचे विधेयक मंजुर केले.
८. कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतुद असलेले विधेयक मांडले, ह्यातुनच किमान वेतन कायदा १९४८ ची निर्मिती झाली.
९. औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारी यंत्रणा उभारण्याची तरतुद केली.
१०. ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी कोळसा खाण कामगार फंडाची स्थापना करणारे बिल मांडले.
११. मंजुर मंत्री असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ नोव्हेबर १९४३ रोजी मजुर संघटनांना मान्यता देण्याची सक्ती करणारे विधयक मांडतो.
१२. १२ व १३ फेब्रुवारू मनमाड येथे रेल्वेतील कामगारांची एक परिषद घेण्यात आली.
१३. स्त्री कामगारांचे हित जोपासतांना त्यांनी प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतुद, रोख मदत किमान चार आठवडे प्रसुती भत्ता मिळावा तसेच गैरहजर असतांना त्यांना पगारी सुट्या मिळाव्यात, तसेच खाणकामगारांना शॉवर बाथची योजना अमलात आणली होती.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मजुर मंत्री म्हणुन केलेले कार्य :**

मजुरमंत्री म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्ये सहभागी करून घेतले होते. त्यात त्यांनी श्रम, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम , खाण विभाग , सोपविण्यात आला त्या पदावर असतांना त्यांनी कामगारांच्या कल्याणाचे अनेक महत्वपुर्ण निर्णय घेऊन कामगारांना सुखी व समाधानी करण्याचा प्रयत्न केला.

१. कामगारांच्या प्रश्नासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी कामगार आणि सरकारचे प्रतिनिधी यांची त्रिस्तरीय परिषद दिल्ली येथे आयोजीत केली.
२. या बैठकीत ट्रेड युनियन ला कायद्याचा आधार दिला गेला ज्यामुळे कामगारांना संप करणे विरोध करणे हा अधिकार दिला गेला.
३. कामगारांच्या विविध प्रश्नांना हाताळण्यासाठी कामगार आयुक्त या संस्थेची निर्मिती केली.
४. घटना निर्मितीमध्ये काम करतांना कामगारांच्या हिताचे संरक्षण होण्याच्या दृष्टिने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सुचित समाविष्ट केला.
५. मध्यवर्ती कायदे मंडळात २९ जुलै १९४३ रोजी त्यांनी खाण आणि प्रसुती काळातील फायदे दुरूस्ती विधेयक सादर केले.
६. ८ फेब्रुवारी १९४४ रोजी समान कामासाठी समान वेतन या तत्वाचा पुरस्कार करण्याचा निर्णय घेतला
७. १ नोव्हे.१९४४ रोजी कारखाने दुसरी सुधारणा बिल सादर केले यात विधेयकाच्या पहिल्या भागात सुटीच्या दिवशी काम केल्याच्या बदल्यात अन्य दिवशी बदली रजा मिळण्याची तरतुद तर विधेयकाच्या दुसऱ्या भागात पगारी सुट्यांची तरतुद केली गेली.
८. ९ सप्टे. १९४४ रोजी Employment exchange कार्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली

अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजुर पक्ष व स्वतः मजुरमंत्री असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या कल्याणासाठी अत्यंत महत्वाचे कार्य केले आज कामगार वर्गाला ज्या सुविधा मिळतात त्या सर्व बाबासाहेबांच्याच मुळे मिळाल्याचे दिसते डॉ.बाबासाहेब आंबेडकर कामगारांच्या गौरव करतांना म्हणतात की ''देशाला अचुक नेतृत्व देण्याची गरज आहे, हे नेतृत्व कोण देऊ शकतो ? हे

नेतृत्व फक्त कामगारच देऊ शकतो, असे मला वाटते, नवी समाजरचाना कामगारांचे आशास्थान असते त्यासाठी कामगाराच योगदान करू शकतात आणि या दिशेनेच भारताचे राजकीय भवितव्य ते साकार करू शकतात '' कामगारांचा शक्तीवर बाबासाहेब विश्वास व्यक्त करत एकंदरीत श्रमिकांच्या , मजुरांच्या, कामगारांच्या हितासाठी डॉ.बाबासाहेबांचे कार्य अद्वितीय असल्याचे दिसते. त्यांनी श्रमिक वर्गाचा केलेला विचार पाहता असे लक्षात येते की, '' स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधिच त्यांनी आपल्या स्वतंत्र्य मजुर पक्षाच्या वतीने कामगारांच्या कल्याणाबाबत अशा तरतुदी केल्या त्यात धर्तीवर त्यांनी घरटनेतही तरतुदी करून ठेवल्या''[७] यास त्यांच्यामध्ये कामगारांच्या कामाबद्दलची असलेली आपुलकीची, त्यांच्या श्रमाची असलेली जाणीव व्यक्त होते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे - संपादन, शंकरराव खरात - इंद्रायणी साहीत्य - पृष्ठ १७९
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 'मूल्यात्मक राजकारण' - डॉ.रा.का.क्षीरसागर - आयुक्त, महानगर पालिका औरंगाबाद - पृष्ठ ९९
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे - संपादन, शंकरराव खरात - इंद्रायणी साहीत्य - पृष्ठ १७९
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ - संपादक मंडळ - दया पवार (निमंत्रक) - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई - पृष्ठ १३६
५. डॉ.बाबासाहेब आंबेउकर यांची भाषणे भाग ३ (१९४६-५६) - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने , प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र - पृष्ठ १५६
६. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रे - संपादन, शंकरराव खरात - इंद्रायणी साहीत्य - पृष्ठ १८३
७. कामगारांचे कल्याण कर्ते - कॉम्रेड श्रीधर देशपांडे - दै.लोकमत - १४ एप्रिल २०१६ - पृष्ठ ७

ISSN : 2348-7143
December-2018

# कॉ. श्रीपाद अमृत डांगे व कामगार चळवळ

**अंगद नरसगोंडा पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, सह्यायक प्राध्यापक
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय इस्लामपूर तालुका – वाळवा जिल्हा –सांगली

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजवादी चळवळीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. भारतातील समाजवादी चळवळीने वर्गविहीन व राज्यविहीन समाज स्थापन करण्याचे उद्दिष्ट भारतीय जनतेसमोर ठेवून त्यांना कार्यप्रवृत्त केले आणि समाज परिवर्तनास हातभार लावला. कार्ल मार्क्स व रशियन क्रांतीचा नेता लेनिन यांच्या विचारांना शिरोधार्य मानून ज्या महापुरूषांनी भारतीय समाजात परिवर्तनाची लाट निर्माण केली. त्यामध्ये कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कॉ.डांगे यांनी १९१९–२०साली आपल्या सार्वजनिक जीवनास सुरूवात केली आणि १९८१–८२ पर्यंत म्हणजेच सत्त ६० वर्षे ते कार्यरत होते. या काळात त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा झेंडा आपल्या हाती घेतला व अखेरपर्यंत त्याच्याशी ते प्रामाणिक राहिले.

**कॉ. श्रीपाद अमृत डांगे :**

१९२० पूर्वी कॉ.डांगे विदयार्थीदशेत असतानाच लोकमान्य टिळक यांचे अनुयायी म्हणून राजकारणात आले. टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधी यांच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. पण गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतल्यानंतर इतर तरूणांप्रमाणे कॉ. डांगे निराश झाले व भारताला पारतंत्र्याच्या जोखडापासून मुक्त करण्यासाठी त्यांनी अन्य मार्गाचा शोध सुरू केला. त्यांचा हा शोध लेनिनच्या मार्गाजवळ येऊन थांबला. कॉ. डांगे यांनी भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून त्यांनी मुंबईचा कामगार लढवय्या बनविला व अनेक रोमहर्षक असे लढे दिले. कॉ. डांगे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवामुक्ती संग्राम व भारतीय संसदीय राजकारणाबरोबरच आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीतही महत्त्वाचे योगदान दिले. कॉ. डांगे यांनी १९६२ साली कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारले व १९८० पर्यंत ते या पदावर कार्यरत होते. आयटक या अखिल भारतीय कामगार संघटनेचे ते अनेक वर्षे सरचिटणीस होते. आपल्या साठ वर्षांच्या सार्वजनिक जीवनात त्यांना ब्रिटीश राजवटीत तेरा वर्षे व स्वातंत्र्योत्तर काँग्रेसच्या राजवटीत चार वर्षे तरूंगवास भोगावा लागला. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीत कॉ. डांगे यांनी केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेऊन त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त रशियन सरकारने 'लेनिन' पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. या सर्व राजकीय कार्याबरोबरच कॉ.डांगे यांनी वैचारिक क्षेत्रातही भरीव कामगिरी केलेली आहे. आपल्या कार्यकर्तृत्वामुळेच त्यांनी इतिहासाला आपली नोंद घेण्यास भाग पाडले आहे.

**कॉ. श्रीपाद अमृत डांगे व कामगार चळवळ :**

डांगे यांनी विदयार्थीदशेपासूनच राजकारणात भाग घेण्यास सुरूवात केली होती. लोकमान्य टिळक यांचे शिष्यत्व स्वीकारून आयटकच्या माध्यमातून त्यांनी कामगार क्षेत्रात प्रवेश केला होता. भारतात स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना झाली पाहिजे, असे डांगे यांचे मत होते. त्यासंबंधात डांगे व रॉय यांच्यात सातत्याने पत्रव्यवहार होत होता. त्यानुसार डांगे यांनी काँग्रेस पक्षांतर्गत 'भारतीय समाजवादी कामगार पक्षाची' स्थापना केली. या पक्षाचा जाहीरनामाही त्यांनी जाहीर केला. समाजवादी कामगार पक्षाचे ध्येय हे भारतात जनतेचे राज्य स्थापन करणे हे होते. आपल्या पक्षाच्या ध्येय–धोरणांचा प्रचार करण्यासाठी डांगे यांनी एप्रिल १९२३ मध्ये सभा घेतली व आकडेवारीच्या साहाय्याने ब्रिटीश व भारतीय भांडवलदार शेकडा ८० टक्के जनतेचे शोषण कसे करतात हे

ISSN : 2348-7143
December-2018

दाखवून दिले. १९२३ नंतर डांगे व त्यांचे सहकारी मुंबईच्या कामगार चळवळीत काम करू लागले. १९२४ साली मुंबईतील गिरणी कामगारांनी बोनसच्या प्रश्नावर संप पुकारला. या संपाचे नेतृत्व जोसेफ बाप्टिस्टा यांनी केले तर एन. एम. जोशी यांनी पाठिंबा दिला. हा संप ३० दिवस चालला पण कमकुवत नेतृत्वामुळे तो अयशस्वी ठरला. १९२५ सालीही पगारकपात, कामगार कपात व बोनसच्या प्रश्नावर मुंबईच्या गिरणी कामगारांनी संप केला. या संपात गिरणी कामगारांनी मालकांना शेकडा साडेअकरा टक्के बोनस द्यायला भाग पाडले. १९२५ च्या गिरणी कामगार संपात भांडवलदारांनी शासनावर दबाव आणून 'जकात कर' माफ करून घेतला. या संपात एकूण ११ दशलक्ष मनुष्य तास वाया गेले.[१] या संपाच्या माध्यमातून मुंबईतील गिरणी कामगारांनी शासनाला व गिरणी मालकांना आपल्या मागण्यांनी दखल घेण्यास भाग पाडले व आपल्या मागण्या मंजूर करून घेतल्या. हा कामगारांच्या संघटित शक्तीचा विजय होता.

दरम्यानच्या काळात भारतात कम्युनिस्ट विचारांचा प्रचार व प्रसार झाला. मुंबईतील कामगार चळवळीत कम्युनिस्टांचा जम बसत होता. भारतात कम्युनिस्ट चळवळीला स्थैर्य प्राप्त होऊ दयावयाचे नाही, असा निर्धार ब्रिटिश शासनाने केला होता. त्याचा एक भाग म्हणून कॉ. डांगे, शौकत उस्मानी, मुझफ्फर अहमद आणि नलिनी गुप्ता या कम्युनिस्टांना भारतीय दंडसंहितेच्या कलम १२१ नुसार हिंसक मार्गाने ब्रिटिश शासन उलथून टाकण्याचा कट, कॉमिंटर्न व रशियाचे बोल्शेविक सरकार यांच्या मदतीने रचल्याचा आरोप ठेऊन अटक करण्यात आली. डांगेंना ३ मार्च १९२४ रोजी मुंबईत अटक करण्यात आली त्यासाठी पुरावा म्हणून रॉय व या नेत्यांमधील पत्रव्यवहार सादर करण्यात आला. हा खटला कानपूर येथील जिल्हा न्यायालयात ज्युरीची पद्धत नसलेल्या आणि चौरीचौरा प्रकरणातील न्यायाधीशांपुढे चालविण्यात आला. हा खटला २० मे १९२४ पर्यंत चालला व त्याचा निकाल २८ मे १९२४ रोजी लागला. या चारही आरोपींना चार वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली आणि त्यांना सीतापूरच्या तुरूंगात पाठविण्यात आले. हा डांगे यांचा पहिला तुरूंगवास होता. डांगे यांना कानपूर खटल्यात अटक होण्यापूर्वी भारतात कामगार किसान पक्ष स्थापन झाला होता. पण अजूनही भारतीय कम्यूनिस्ट पक्षाची स्थापना झालेली नव्हती. कानपूर खटल्यापूर्वी डांगे यांच्या मनामध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्याचा विचार होता. शेवटी कानपूर येथे सत्यभक्त यांच्या पुढाकाराने देशातील कम्युनिस्ट विचारांच्या कार्यकर्त्यांचे २६,२७ व २८ डिसेंबर १९२५ रोजी अधिवेशन झाले. २६ डिसेंबर १९२५ रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली.[२]

डांगे सीतापूरच्या तुरूंगातून बाहेर आले तेव्हा त्यांची प्रकृती बरीच खालावली होती. लग्नानंतर लगेचच डांगे खरगपूरला रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपात भाग घेण्यासाठी गेले. रेल्वे कर्मचाऱ्यांनी सार्वत्रिक संप करावा, असा ठराव डांगे यांनी मांडला. त्या ठरावाला युनियनच्या कार्यकारिणीने पाठिंबा दिला व ठराव मंजूर झाला. हा संप वाटाघाटीतून मिटला व कामगारांना संपकाळातील पगारही मिळाला. मे १९२७ मध्ये के.नी. जोगळेकरांनी समाजवादी विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी 'क्रांती' हे मराठी साप्ताहिक सुरू केले होते. आयटक व गिरणी कामगार चळवळीत काम करून कम्युनिस्ट पक्षाचे कार्य पुढे नेण्याचा डांगे यांचा विचार होता. नोव्हेंबर १९२७ मध्ये कानपूरला आयटकचे आठवे अधिवेशन झाले. या अधिवेशनात डांगे यांची आयटकच्या सहसचिवपदी निवड करण्यात आली.

१९२८ पासून आर्थिक मंदीची लाट आली. गिरणी मालकांनी याचा वापर करून कामगारांच्या पगारात ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आणि कामवाढही केली. त्याविरूद्ध कामगारांनी एप्रिल १९२८ पासून संपाला सुरूवात केली. यावेळी मुंबईत एकूण दीड लाख गिरणी कामगार होते आणि त्यांचा दरमहा पगार २०रू. होता. या संपाचे नेतृत्व डांगे यांच्याकडे होते. त्यामुळे त्यांना गिरणी कामगारांच्या मागण्यांचा आणि विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास करावा लागला. हा संप जरी प्रत्यक्षात जानेवारी १९२८ मध्ये सुरू झाला असला तरी १६ एप्रिल १९२८ रोजी कामगारांना सार्वत्रिक संपाची हाक देण्यात आली. कामगारांच्या स्वंयस्फूर्त मिरवणूका निघू लागल्या. २३ एप्रिल रोजी मुंबईतील शिवडी भागात निघालेल्या मिरवणूकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात परशुराम जाधव हा कामगार ठार झाला. त्यामुळे कामगारांमध्ये भडका उडाला. संप सुरू

झाला तेव्हा गिरणी कामगारांच्या अनेक युनियन्स होत्या. संपाच्या यशस्वीतेसाठी डांगे यांनी पुढाकार घेऊन 'संयुक्त संप कमिटी' स्थापन केली व तिच्या नावाने संप सुरू केला. संपादरम्यान कामगारांना लढयाची योग्य माहिती देण्यासाठी डांगे यांनी 'क्रांती' साप्ताहिकाचे पुनरूज्जीवन केले व स्वत: त्याचे संपादक बनले. संप फोडण्यासाठी गिरणी मालकांनी जात—जमातवादी व गुंडशक्तीचा वापर केला. त्यातूनही संप फुटत नाही हे लक्षात आल्यानंतर सरकार व गिरणी मालकांवर दबाव वाढू लागला. गिरणी कामगारांच्या मागण्यांचा विचार करून वाटाघाटी करण्यासाठी समिती नेमण्यात आली.कामगार चळवळीच्या इतिहासातील हा पहिला असा संप होता ज्यामध्ये आर्थिक मागण्यांची सांगड राजकीय स्वातंत्र्य चळवळीशी घालण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे जगभरातील कामगार चळवळीच्या नेत्यांबरोबरच भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचेही लक्ष या संपाकडे गेले. डांगे यांनी महाराष्ट्रात आपल्या व्याख्यानांच्या माध्यमातून साम्यवादी विचारधारा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम केले. त्यासाठी त्यांनी कामगार, शेतकरी, विदयार्थ्यी व पुरोगामी साहित्यिकांच्या चळवळी उभ्या करण्यास मदत केली.

११ एप्रिल १९३९ हा दिवस मुंबईच्या कामगार चळवळीच्या इतिहासातील संस्मरणीय दिवस ठरला. या संपाचे नेतृत्त्व डांगे करीत होते. संप फोडण्यासाठी गिरणी मालकांकडून गुंडशक्तीचा वापर करण्यात आला. उहा संप सात महिने चालला. गिरणी कामगारांच्या मागण्या मान्य करण्यात आल्यानंतर हा संप मागे घेण्यात आला. या संपाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे भारताच्या कामगार चळवळीत प्रथमच 'घेराव' तंत्राचा अवलंब करण्यात आला व डांगे त्याचे जनक ठरले.[३] १९४० साली मुंबईतील गिरणी कामगारांनी ४० टक्के महागाई भत्ता मिळाला पाहिजे, या मागणीसाठी चळवळ सुरू केली ३ मार्च १९४० रोजी सार्वत्रिक संपाची घोषणा केली. दीड लाखांहून अधिक कामगारांनी ४० दिवस हा संप चालविला. संपातून आणखी काही मिळणार नाही, हे पाहून रांगणेकर समितीचा अहवाल युनियनने मान्य केला व १३ एप्रिल १९४० रोजी संप मागे घेण्यात आला. हा संप संपल्यानंतर बिटिया मिलच्या मालकाला घातलेल्या घेरावबद्दल न्यायालयाने डांगे यांना सहा महिने कारावासाची शिक्षा दिली व त्यांची रवानगी नाशिकच्या तुरूंगात करण्यात आली. १९४४ साली डांगे यांनी गिरणी कामगांराच्या बोनसच्या प्रश्नावर संप करण्याचे ठरविले. पण पक्षाची भूमिका संप न करण्याची होती. डांगे यांनी संपाची नोटीस दिल्यावर सरकारला सक्तीचा लवाद नेमावा लागेल, हे पक्षाच्या पुढाऱ्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांनी १९२० ते १९८० या साठ वर्षांच्या सार्वजनिक जीवनात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ, कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्तीसंग्राम, आंतरराष्ट्रीय समाजवादी चळवळ व देशाच्या संसदीय राजकारणात मोलाचे योगदान दिले. विद्यार्थीदशेतच त्यांनी लोकमान्य टिळक यांचे अनुयायी म्हणून राजकारणात प्रवेश केला. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेत असतानाच ते साम्यवादी विचारधारेकडे आकृष्ट झाले व भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली. कम्युनिस्ट पक्षाच्या माध्यमातून डांगे यांनी मुंबईच्या गिरणी कामगारांमध्ये वर्गजाणीव निर्माण केली आणि त्यांना लढवय्या बनविले. मुंबईतील गिरणी कामगार युनियन या लढाऊ संघटनेच्या स्थापनेत त्यांनी मोठे योगदान दिले. या संघटनेच्या माध्यमातूनच मुंबईचा गिरणी कामगार पुढील ४०—५० वर्षे त्यांच्या अधिकारांवरील आक्रमणाविरूद्ध संघर्ष देत राहिला. मुंबईच्या गिरणी कामगारांचे नेतृत्व डांगे यांच्याकडे असल्यामुळे त्यांनी मोठया कौशल्याने त्याला स्वातंत्र्य चळवळीत उतरविले. जेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उभा राहिला तेव्हा आपली वाणी, लेखणी आणि कृती यांचा वापर करून डांगे यांनी मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा भांडवलदारांचा डाव हाणून पाडला. या काळात डांगे यांची ताकद म्हणजेच मुंबईचे गिरणी कामगार व त्याचे नेतृत्व डांगे यांच्याकडे होते. गोवामुक्ती संग्रामातही डांगे यांनी बहुमोल कार्य केले. १९४६ ते १९५१ या काळात मुंबई विधानसभेचे तर १९५७—१९६२ व १९६७—१९७१ या काळात डांगे लोकसभेचे सदस्य होते. या काळातील संसदीय कामकाजात ही डांगे यांनी हिरिरीने भाग घेऊन अनेक प्रश्नाना वाचा फोडली. आयटक या अखिल भारतीय कामगार संघटनेचे ते अनेक वर्षे सरचिटणीस होते. तसेच जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनचेही ते संस्थापक होते आणि बरीच वर्षे या

संघटनेचे उपाध्यक्ष होते. डांगे १९६२ ते १९८० या काळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष होते. या काळात त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाला देशाच्या राजकारणात मध्यवर्ती स्थान प्राप्त करून दिले.

**संदर्भ सूची :**

**1-** Karnik V.B, strikes in India, Manaktalas, Bombay 1967]page`-149-
२. मेणसे आनंद, भारताच्या स्वांतत्र्यलढयात कम्युनिस्ट पक्षाचे योगदान, लोकवाड्;मय, जानेवारी २०१६,पृ.११.
३. रणदिवे बाबुराव, कॉम्रेड डांगे, अभिनव, मुंबई, पृ. ८३– ८५.
४. डॉ. चौसाळकर अशोक, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर मे २०११
५. कॉ. शेटये मधू, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील कम्युनिस्टांचा सहभाग, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर,

ISSN : 2348-7143
December-2018

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहास

**प्रा. आर. ई. भारुडकर**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आष्टी
ता. आष्टी जि. बीड
मो. ९६६५८८७१७७
ई मेल. bharudkarr@gmail.com

**प्रस्तावना-**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी आपले हितसंबंध जोपासण्यासाठी संघटनात्मक चळवळ चालविली सर्वात आधी सक्रिय म्हणून शेतकरी चळवळ असल्याचे आजतरी स्पष्ट चित्र आहे. ब्रिटीश राजवटी पूर्वी महाराष्ट्रात शेती बाबत 'वतनदारी' पध्दतीचे प्रचलन होते. ही पध्दती लोकांच्या हिताची जरी नव्हती. तरू त्यापासून जनतेला त्रास नव्हता. १८१८ नंतर मराठी मुलखावर ब्रिटीशांनी आपली सत्ता प्रस्थापीत केली. मुंबई प्रांतात 'रयतवारी' जमीनधारना पध्दती करण्यात आली. मध्यप्रांतात 'मालगुजारी' जमीन धारणा पध्दती अस्तित्वात आली होती. मराठवाडा आणि वऱ्हाडामध्ये पारंपारीक वतनदारी पध्दती प्रचलीत होती. रयतवारी पध्दती मध्ये जनतेला प्रत्येक संबंध परकीय राज्यकर्त्यांशी जमीन महसुल भरण्याच्या निमित्ताने येत असे. मुंबई प्रांतात जमीन महसुलीचे (शेतसारा) दर वरचे-वर वाढविण्यात येऊ लागले. अवर्षन आणि अतिवृष्टी या संकटामुळे शेतकरी वर्ग बराच हैरान झाला होता. जमीन महसुल भरण्यासाठी शासनकर्ते मात्र सक्तीकरु लागले. अशा हालाकीच्या परिस्थिती मध्ये अल्पभूधारकांना सरकारी पैसा देण्यासाठी आपल्या जमीनी सावकारांकडे गहान टाकाव्या लागल्या. सावकार अवाजवी व्याज लावू लागले. जमीन मालक कर्ज बाजारी बनले. त्यावेळी लागू असलेल्या कायद्याच्या आधारे सावकारांच्या जप्त्या सुरु झाल्या. अणेकांच्या जमीनी सावकारांने बळकावील्या.

शेतकरी चळवळ उभारणीला अणेक कारणे घडली. त्यापैकी इंग्रजांनी आपल्या देशातील कारखान्यांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालासाठी भारतीय शेतकऱ्यांना त्यांची लागवड करण्यास प्रोत्साहीत केले. त्यांचा कारखानदारी साठी लागणारी नगदी पीके शेतकरी घेवू लागली. उस, कापुस, तंबाखू या पीकांच्या लागवडी खाली शेतकऱ्यांनी आपली अधीकाधिक जमीन आणली. कच्च्या मालाची खरेदी मुंबई शहरातील व्यापरी वर्ग करत असे त्यांच्या मार्फत कच्चा माल इंग्लंडला पाठविला जात असे. शेतकऱ्यांच्या निरक्षरतेचे आणि कर्जबाजारीपनाचा पुरेपुर फायदा व्यापाऱ्यांनी देखील घेतला. नगदी पीकांच्या लागवडी मुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहासाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**शेतकरी चळवळीत समाजसुधारकांचे योगदान-**

समाज सुधारकांनी आपल्या लिखाणात जनतेच्या कष्टप्रद अवस्थेचे वर्णन करुन शासनाला त्यांच्या विषयी दया, सहानुभुतीचे धोरण स्विकारण्याची विनंती केली. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्यांवर प्रखर टिका केली. म. फुलेंनी जनतेला संघटीत करण्यासाठी 'सत्यशोधक समाजा' ची स्थापणा १८७३ मध्ये केली. न्या. रानडे यांनी त्यांच्या लिखानात 'अनुकंपनीय अवस्थेतील' शेतकरी वर्गाच्या हलाखीची परीस्थिती स्पष्ट करुन शासनाने त्यांच्यासाठी ठोस उपाययोजना करावी यासाठी प्रयत्न केले. म.गांधी च्या राष्ट्रीय चळवळीमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राजकीय जागृती निर्माण झाली. बिहार मधील १९१७ चंपारण्य

ISSN : 2348-7143
December-2018

जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आंदोलन यशस्वी झाले होते. त्याच सुमारास मुंबई प्रांतातील बार्डोली येथे 'शेतसाराबंदी' चा सत्याग्रह सरदार पटेलांच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाला होता.

**शेतकरी कामगार पक्ष -**

सन १९४८ मध्ये केशवराव जेधे आणि त्यांचे काही सहकारी काँग्रेस मधून बाहेर पडले आणि त्यांनी 'शेतकरी कामगार पक्ष' स्थापन केला. महाराष्ट्रात या पक्षाकडून शेतकऱ्यांनी फार मोठ्या अपेक्षा केल्या परंतू या पक्षातील गटबाजीच्या राजकारणामुळे या पक्षाने विशेष काही कामगीरी बजावली नाही. शेतकऱ्यांचा त्या पक्षाबद्दल अल्पकाळातच भ्रमनिरास झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या. त्यामुळे शेतकरी वर्ग काँग्रेसच्या पाठीशी उभा राहिला. काँग्रेस शासनाला आपले सरकार असे शेतकरी समजू लागले. त्यामुळे सरकारशी संघर्ष करण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्याचा परिणाम असा झाला की, आपले हित जोपासन्यासाठी शेतकरी सतर्क झाला आणि तो संघटितही झाला त्यांचा एक मोठा प्रभावी दबावगट निर्माण झाला.

**शेतकरी संघटनेची स्थापना -**

सन १९७८ मध्ये 'शेतकरी संघटना' स्थापन झाली. पुर्वाश्रमीचे आंतरराष्ट्रीय टपाल खात्यातील श्री. शरद जोशी हे मुदतपुर्व निवृत्ती घेऊन भारतात परतले होते. भारतातील शेतकऱ्यांची दरिद्रि परिस्थिती कशी दूर करता येईल या दृष्टीने त्यांनी शेतकरी संघटना स्थापन केली. शरद जोशींचे मुख्यतः महाराष्ट्रातच कार्य आहे तरी त्यांना शेतकऱ्यांचे नेते म्हटले जावू लागले. महेंद्रसिंग टिकैतसारख्या शेतकरी नेत्यापेक्षा महाराष्ट्रातील शरद जोशी हे सर्व भारतात अधिक माहित आहेत. शरद जोशींना आपली शेतकरी संघटना वाढविण्यासाठी ग्रामीण नेतृत्वाची गरज होती आणि बागायतदार शेतकऱ्यांना आपले हितसंबंध जोपासण्यासाठी शेतकरी संघटनेची गरज होती. अशा परस्पर पूरक आवश्यकतेतून शेतकरी संघटनेचा उदय झाला. शेतकरी संघटना अशाप्रकारे शेतकरीवर्गाचे हितसंबंध सक्रियपणे जोपासण्यासाठी प्रत्यक्ष कार्यासाठी उतरली.

**शेतकरी संघटनेची विचारप्रणाली आणि कार्यपध्दती -**

शरद जोशी यांच्यामते, देशातील लहानमोठी शहरे म्हणजे 'इंडिया' आहे आणि ग्रामीण भाग व जनता 'भारत' आहे.'इंडिया' भारताचे सतत निर्दयीपणे शोषण करीत आहे, त्यांचे मत असे की, जे सुसंघटित असतात ते असंघटितांचे शोषण करतात. शेतकरी संघटना ही फक्त भाववाढ रोखण्यासाठी आंदोलन करणारी तात्पुरती संघटना नाही. या संघटनेला वैचारीक बैठक आहे. या संघटनेला भौतिकवादी दृष्टीकोन आहे. मार्क्सवादाशी मिळती जुळती हिची विचारधारा आहे. शेतकरी संघटनेची कार्यपध्दती मुख्यतः शासनावर दबाव आणून वेगवेगळ्या पिकांसाठी खर्चावर आधारीत किफायतीशीर भाव मिळणे ही आहे. किफायतीशीर किंमत येईल इतकाच माल बाजारात आणला पाहिजे. शेतकरी आंदोलनाचा हा एक अल्पकालीन प्रकार होय. शेतकरी संघटनेचे शेतकरी मजूरा बाबतचे मत अगदी स्पष्ट असे आहे की, शेतमजूर हा शोषीत घटक आहे. शेतकरी त्यांना कमी मजूरी देवून त्यांची पिळवनूक करतात.

**सारांश -**

आज ग्रामीण भागात शेतकऱ्यांशी संबंधीत असणाऱ्या अनेक चळवळी सुरु झाल्या असल्यामुळे शेतकऱ्यांची या चळवळीची गती कमी झालेली दिसते. त्यामुळे तीची परिणाम कारकताही कमी झालेली आढळते. या संघटनेने राजकीय क्षेत्रात उतरायचे नाही असे ठरवून देखील संघटना कोणत्या तरी राजकीय पक्षाशी संबंध जोडते आणि निवडणूकीच्या बाजारात उतरते ही बाब संघटना आपल्या तत्वापासून दुर होत असल्याची चिन्हे

आहेत. निवडणूकीच्या काळात ही संघटना वेगवेगळ्या मतदार संघात आपला पाठिंबा देऊन उमेदवारांना विजयी बनविण्यात प्रयत्न करते ही बाब काही राजकीय पक्षांना निश्चित खटकते.

**संदर्भग्रंथ सुची -**

**१.** प्रा. के. आर. बंग, महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद, २०१३
**२.** डॉ. एकनाथ खांदवे, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, पिअरसन प्रकाशन दिल्ली, २०१३
**३.** डॉ. सुनिल शिंदे, प्रा. सुरेश भालेराव, महाराष्ट्र शासन आणि राजकारण, एज्यूकेशनल पब्लिशर्स, २०१३
**४.** डॉ. सदानंद मोरे, शरद जोशी आणि शेतकरी चळवळ.

ISSN : 2348-7143
December-2018

# शेतकरी चळवळीचा उदय, विकास, भवितव्य व आव्हाने

**डॉ. नामानंद गौतम साठे,**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब जि. उस्मानाबाद
Email id :- ngsathe11@gmail.com

**प्रास्ताविक :-**

शेतकरी हा जगाचा पोशिंदा समजला जातो. पण त्याला सदैव अठरा विश्व दारिद्याने ग्रासले आहे. त्याच्यासमोर अनेक प्रश्न भेडसावत आहेत. फार पूर्वीपासून शेतकऱ्यांच्या बांधावर राजे-महाराजे, त्यांचे सैनिक यांच्यात लढाय्या व्हायच्या. मात्र शेतकरी त्या लढायाकडे तटस्थ दृष्टीने पाहत असत. कारण माहिती होती की, या लढाया केवळ शेतसारा कोणी वसूल करायचा याच्यासाठी आहेत. देश स्वातंत्र्य व्हायच्या अगोदर व नंतरही बराच काळ हीच परिस्थिती होती. पण शेतकऱ्यांच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने वाचा फोडली ती महात्मा जोतीराव फुले यांनी फुलेंनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्या काळात आवाज उठविला. त्यानंतर महात्मा गांधीनीही चंपारण्य सत्याग्रह, बारडोली सत्याग्रह, जंगल सत्याग्रह इत्यादी आंदोलने केली व सरकारचे लक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे वेधले. त्यानंतर अखिल भारतीय किसान सभेची स्थापना, शेतकरी कामगार संघ व त्यानंतर उदयाला आलेला शेतकरी कामगार पक्ष अशा अनेक संघटना उदयास आल्या आणि 1978 मध्ये श्री शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेची स्थापना केली. सदरील संशोधन पेपरमध्ये या चळवळीचा उदय विकास व शरद जोशी यांच्यानंतर संघटनेला आलेल्या आव्हानांचा तसेच या संघटनेने केलेल्या कार्यामुळे झालेल्या परिणामांचा उहापोह केला आहे.

**उद्दीष्ट्ये :-**

1. शेतकरी संघटनेचा उदय विकास याचा अभ्यास करणे.
2. शेतकरी संघटनेचा नेता शरद जोशी यांच्यानंतर संघटनेला आलेल्या आव्हानांचा उहापोह करणे.
3. शेतकरी संघटनेला दुबळी करण्यास कारणीभूत ठरलेल्या घटकांचा मागोवा घेणे.
4. शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनामुळे झालेल्या परिणमांचा आढावा घेणे.

**गृहीतके :-**

1. स्वातंत्र्यपूर्व काळातसुध्दा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अनेक नेत्यांनी आवाज उठविला होता.
2. शेतकरी संघटनांचा उदय होण्यास इंग्रज सरकार व देश स्वातंत्र्य झाल्यानंतर या भारतीय सरकारची शेतकऱ्याप्रती असणारी धोरणे कारणीभूत आहेत.
3. शेतकरी कामगार पक्ष, साम्यवादी पक्ष व शेतकरी संघटना यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नेहमीच सरकार दरबारी आवाज उठविला आहे.
4. शेतकरी संघटनांनी आंदोलनाचा परिणाम निश्चितच सरकारच्या धोरणावर झाला आहे.

**शेतकरी चळवळीचा उदय व विकास :-**

ब्रिटीश राजवटीपूर्वी महाराष्ट्रात शेतीबाबत वतनदारी पध्दत सुरु होती. 1818 नंतर मराठी मुलखावर ब्रिटीशांनी आपली सत्ता प्रस्थापित केली. मुंबई प्रांतात 'रयतवारी' जमीनधारणा पध्दत, तर मध्य प्रांतात

'मालजुगारी' जमीनधारणा पध्दत व मराठवाडा आणि वऱ्हाडमध्ये पारंपारिक वतनदारी पध्दत होती. या काळातच अवर्षण आणि अतिवृष्टी यामुळे शेतकरी संकटात सापडला होता. पण सरकार सक्तीने शेतसारा वसूल करत होते. त्यामुळे शेतकरी आपल्या जमिनी सावकाराकडे गहाण ठेवून शेतसारा भरत असत. तसेच या काळामध्ये इंग्रजांनी भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये नेण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांनी ऊस, कापूस, तंबाखू ही नगदी पीके घ्यावीत अशी सक्ती इंग्रजांनी केली. त्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यावेळेस निसर्ग कोपला कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी सदैव अठरा विश्व दारिद्रय आले होते. तसेच व्यापारी लोकसुध्दा शेतकऱ्यांच्या असहाय्यतेचा व निरक्षरतेचा फायदा घेत होते. त्याच काळात आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी जनतेला संघटीत करुन राज्यकर्त्याविरुध्द उठाव केला. त्यांचा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना देहान्त शासन करण्यात आले.

त्यानंतरच्या काळात महात्मा जोतीराव फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्यांवर प्रखर टिका केली. महात्मा फुल्यांनी जनतेला संघटित करण्यासाठी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. न्यायमूर्ती रानडेंनी अनुकंपनीय अवस्थेतील शेतकरी वर्गाच्या हालाखीची परिस्थिती स्पष्ट करुन शासनाने ठोस उपायोजना करावी अशी मागणी केली. त्यावेळी शासनाने (1896-97) दुष्काळग्रस्तांसाठी काही कार्ये सुरु केली होती.

महात्मा गांधीच्या राष्ट्रीय चळवळीमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राजकीय जागृती निर्माण झाली. बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आंदोलन, त्याचवेळेस मुंबई प्रांतात बारडोली येथे शेतसाराबंदीचा सत्याग्रह सरदार पटेलांच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाला इत्यादी आंदोलने यशस्वी झाले. 1936 मध्ये अखिल भारतीय किसान सभेची राष्ट्रीय महासभेच्या अंतर्गत स्थापना करण्यात आली. किसान सभेच्या मागणीनुसार 1937 मध्ये मुंबई प्रांतिक विधीमंडळाचे भुसुधारणा विषयक अनेक कायदे संमत करण्यात आले. 1946 साली राष्ट्रीय महासभेच्या अंतर्गत केशवराव जेधे आणि बहुजन समाजाच्या अन्य नेत्यांनी 'शेतकरी कामगार संघ' स्थापन केला. पण लगेचच 1947 साली शंकरराव मोरे व केशवराव जेधे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'शेतकरी कामगार पक्षाची' स्थापना केली. महाराष्ट्रात या पक्षाकडून अनेक अपेक्षा शेतकऱ्यांनी ठेवल्या पण या पक्षाच्या अंतर्गत गटबाजीमुळे विशेष काही कामगिरी या पक्षाने बजावली नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने शेतकरी वर्गाच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या. त्यामुळे शेतकरी वर्ग कॉंग्रेसच्या पाठिशी उभा राहिला. पण हरितक्रांती नंतरच्या दशकात अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्याचे कारण सरकारने शेतकऱ्यांना बऱ्याच सवलती दिल्या. परंतू या सवलतीचा फायदा बड्या शेतकऱ्यांनीच लाटला. त्यामुळे बहुभूधारक व अल्पभूधारक शेतकरी यांच्यात असमानतेची दरी निर्माण झाली. त्यामुळे 1975 नंतर बड्या शेतकऱ्याविरुध्द राजकारणाचा एक भाग म्हणून ग्रामीण भागातील छोटे शेतकरी व शेतमजूर यांनी संघर्षाचा पवित्रा घेतला.

1978 मध्ये श्री शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन केली. शेतकरी संघटना प्रामुख्याने शासनावर दबाव आणते. त्यानंतर राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची स्थापना केली. या संघटनेने सुध्दा शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल सरकारला धारेवर धरले आहे आणि नुकतेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून बाहेर पडून रयत क्रांती संघटनेची स्थापना सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

**भवितव्य आणि आव्हाने :-**

शरद जोशीच्या पश्चात शेतकरी संघटनेचे भवितव्य काय असणार असा प्रश्न माझ्यासह अनेकांना सतावत आहे. शेतकरी चळवळ शरद जोशींनी एवढ्या उंचीवर नेऊन ठेवली की, आज त्या उंचीच्या आसपास पोचण्याची

ही नेतृत्वक्षमता कुणात नाही. ही वास्तविकता नजरेआड करता येत नाही. शेतकऱ्यांना नुसते त्यांनी संघटीत केले नाही तर देशातील इतर नागरिकांसारखे सन्मानाने जगता यावे म्हणून रस्त्यावर उतरण्याची प्रेरणा दिली. शेतकऱ्यांच्या मनातील राजसत्तेची व तुरुंगाची भीती घालवली. शरद जोशी यांनी ‘शेतकऱ्यांचा स्वातंत्र्यसूर्य’ बनून पिढ्यानपिढ्या दारिद्रयाच्या अंधाऱ्या खाईत चाचपडणाऱ्या शेतकऱ्यांना मुक्तीचा मार्ग दाखविला.

शेतीला मध्यवर्ती स्थानी ठेवून विचारांची गुंफण करणाऱ्या दृष्टा नेत्याच्या पश्चात आता तोच वसा घेऊन पुढील वाटचाल करायचे काम शेतकरी चळवळीसमोर असायला हवे. पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. या चळवळीचा पाया भक्कम असल्याने चळवळ संपणार नाही. मात्र चळवळीचा प्रभाव आणि परिणामकारकता संकुचित होण्याची दाट चिन्हे दिसत आहेत. सत्तेची लालसा व शेतकरी आंदोलनाचा शिडीसारखा वापर करुन राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण करु पाहणाऱ्या शेतकरी कार्यकर्त्यांना शरद जोशींनी पध्दतशीरपणे संघटनेच्या जवळपास फारसे फिरकू दिले नाही. सत्तेत सहभागी होऊन शेतीचे प्रश्न सोडविता येतात असा विचार मांडून तशीच कृती करणे स्वतःला शरद जोशीचे वारसदार घोषित करणे. पावसाच्या सरी आल्या की जागोजागी भुछत्र्या उगवतात तशा भराभरा शेतकरी संघटनाची स्थापना व्हायला लागणे हे त्याचेच निदर्शक आहे.

काही सत्तालोलुप कार्यकर्त्यांना सत्तापदांची लालसा दाखवून कोणतीही चळवळ फोडून प्रभावहीन करण्याची कला राजकर्त्यांना उपजतच असते. पण शरद जोशींच्या कुशल नेतृत्वामुळे फारशी फुट शेतकरी संघटनेत पडली नाही. पण आज शेतकरी चळवळीच्या नेत्यांमध्ये एकवाक्यता नाही. कुणी स्वामीनारायण आयोगाच्या शिफारशी लागू करायला हव्या असे म्हणतात, तर कुणी शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरी द्या असा अजेंडा पुढे रेटू पाहतो, तर कुणी शेतकऱ्यांनी सत्ता हाती घेतल्या खेरीज शेतीचे प्रश्न सुटणार नाहीत अशी हाकाटी पिटतो.

शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळाल्याखेरिज शेती व्यवसायात बरकत येऊ शकत नाही असा विचार मांडणारी शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटना आता राहिलेली नाही. आज ग्रामीण शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी निगडीत अनेक शेतकरी संघटना निर्माण झाल्या आहेत. पण त्यांच्या एकवाक्यता दिसून येत नाही. त्या संघटनेने राजकीय क्षेत्रात उतरायचे नाही असे ठरवून देखील संघटना कोणत्या तरी राजकीय पक्षाशी संबंध जोडते आणि निवडणूकीच्या बाजारात उतरते. त्यामुळे धरसोडीचे राजकारण त्यांना महाग पडत असल्याचे दिसते.

**संदर्भ :-**

1. बंग के.आर. :- महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक पब्लिशअर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
2. नाईकवाडे अशोक, नलावडे पंडित :- महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
3. पुरोगामी सत्यशोधक, पुणे.
4. लोकराज्य, महाराष्ट्र शासन, मुंबई.
5. दैनिक, महाराष्ट्र टाईम्स, दिनांक 02/09/2016

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# कॉ. दत्ता देशमुख यांचे शेतकरी व कामगार चळवळीतील योगदान

**प्रा. विरेंद्र धनशेट्टी**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
न्यु ऑर्ट कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज पारनेर
ता. पारनेर जि. अहमदनगर

**प्रा. जिजाभाऊ घुले**
(राज्यशास्त्र विभाग)
श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकारी चळवळीतील महत्त्वाचा जिल्हा म्हणून नगर जिल्ह्याकडे पाहिले जाते. किंबहुना महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देण्याचे मोलाचे काम नगर जिल्ह्यातील चळवळींनी केले आहे. हा जिल्हा पुरोगामी विचारांच्या चळवळीचा जिल्हा म्हणून राज्यात ओळखला जातो. याच दैदीप्यमान ऐतिहासिक वलयामुळे राज्याचे समाजकारण, राजकारण सातत्याने जिल्ह्याभोवती फिरत असते. जिल्ह्याच्या डाव्या चळवळीतील अग्रगणी नेतृत्त्व म्हणजे कॉ. दत्ता देशमुख. संगमनेर तालुक्यातील जवळेकडलग सारखा दुष्काळी भागातील एका गरीब शेतकरी कुंटुबात झाला. हमाली करून मोठया भावाने त्यांना शिकवले, पुढे स्वातंत्र्य लढयात भाग घेतल्याने त्यांना कारावास झाला. कारावासाच्या काळात अभ्यास करून ते सिव्हील इंजीनीअर झाले. पैसा आणि प्रतिष्ठा कमवण्याचा राजमार्ग सोडून तसेच राज्याची सर्वोच्च राजकीय सत्ता स्वत:कडून चालत येत असताना एखादया तपसव्याच्या नि:स्पृह वृत्तीप्रमाणे त्याकडे पाठ फिरवून गरीब शेतकरी, ग्रामीण आणि शहरी कष्टकरी वर्गाला संघटीत करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आयुष्यभर प्रयत्नांची परीकष्टा करणारे असामान्य व्यक्तीमत्त्व म्हणजे कॉ. दत्ता देशमुख.

कॉ. दत्ता देशमुखांनी जिल्हा लोकल बोर्ड, कोतवाल, बांधकाम विभागाचे कामगार, रस्ते बांधकाम कामगार, विडी कामगार, औदयोगीक कामगार, मैल कामगार, ऊस तोडणी कामगार, शेतमजूर या तळाच्या कष्टकरांच्या संघटना बांधण्यासाठी 'लाल निशाण' पक्षाच्या कार्यकर्त्यां समावेत महाराष्ट्रभर भ्रमंती केली. या सर्व कष्टकऱ्यांसाठी न्यायोचित लढे दिले. त्यांचा राजकीय प्रवास कॉग्रेस, शेकाप, काकिप, लाल निशाण गट, लाल निशाण पक्ष असा राहीला. या संबंध राजकीय प्रवासात त्यांची मुळ वैचारिक बैठक बदलली नाही त्यामुळे त्यांचा प्रवास कधिच संधीसाधूपणाचा वाटला नाही. त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद देवू केलेले असतानाही त्यांनी विनम्रपणे नकार दिला. कॉग्रेसकडून सर्वोच्च पद देण्यास तयार होऊनही कॉ. देशमुख यांनी एकले नाही त्यामुळे १९६२ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आले. पराभवानंतर त्यांनी कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून शेतकऱ्यासमोर अदर्श ठेवत कृषी क्षेत्राला एक दिशा आणि दृष्टी दिली. महाराष्ट्रातील दुष्काळ दुर व्हावा यासाठी त्यांनी अभ्यासपूर्वक मांडणी करून महाराष्ट्रापुढे आदर्श ठेवला.

**शेतकरी व कामगारांसाठीची आंदोलने :**

१९४१ मध्ये कॉ. भास्करराव जाधव यांच्या नेतृत्त्वाखाली नवजीवन संघटनेची स्थापना झाली. १९३५ च्या कायदयातील मर्यादीत मतदानाच्या पायावर निवडणुका झाल्या. १९४६ मध्ये कॉ. दत्ता देशमुख व कॉ.

बापूसाहेब भापकर हे अहमदनगर जिल्ह्यामध्ये कॉंग्रेसचे आमदार म्हणून निवडून आले. पुणतांबा भागातील ऊस शेतीमुळे जमीनीचा प्रश्न तीव्र बनला होता. यावरून दत्ता देशमुख यांनी शेतकऱ्यांची मोठी चळवळ उभी केली. कॉंग्रेस पक्षात असतानाही पक्ष विरोधी भूमिका घेतल्याने तत्कालीन गृहमंत्री मोरारजी देसाई यांना राग आला व कॉ. देशमुख यांना तुरूंगात टाकण्यात आले. तरूंगात असल्याने त्यांना विधानसभेत हजर राहता आले नाही व त्यामुळे त्यांची आमदारकी रद्द झाली. १९४७ मध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली. १९४७ मध्ये नवजीवन संघटना शेतकरी कामगार पक्षात विलीन झाली. त्याच वेळी कॉ. दत्ता देशमुख कॉंग्रेसमधून शेकाप मध्ये आले. २३ मे १९५० रोजी दाभाडी जि. नाशिक येथे भरलेल्या आधिवेशनात कम्यूनिस्ट तत्वज्ञान व मार्क्स लेनिनवादी क्रांतीकारी विचार व व्यावहार सुत्रे स्वीकारली गेली. यात दत्ता देशमुख यांचे मोठे योगदान होते. पुढे शेकाप मध्ये फुट पडली व कॉ. दत्ता देशमुख यांच्या नावाने शेकापचा नगर जिल्हा विभाग ओळखला जाऊ लागला. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अहमदनगर जिल्ह्यातील कष्टकरी समुदयाला जागृत करण्यासाठी संघटीत करण्याचा प्रयत्न दत्ता देशमुख यांच्या लाल निशाण गटांनी केले. त्याचबरोबर १९५२–५३ च्या दुष्काळी कामावरील कामगारांची संघटना उभारली. हे सर्व कामगार शेतमजूर होते. संघटना उभी राहील्यानंतर त्यांना वेळेवर मजूरी मिळते की नाही, भ्रष्टाचार होतय का याची पहाणी कॉ. देशमुख हे करत असत. अहमदनगर जिल्ह्याच्या बागायत भागात भूमीहीन शेतमजूरांच्या चळवळीला राज्यव्यापी पाठिंबा उभा करण्यासाठी भूमीहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी परिषदेची स्थापना करून दत्ता देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली कम्यूनिस्ट पक्ष व लाल निशाण पक्ष यांच्या पुढाकाराने ८ मार्च १९७० रोजी श्रीरामपूर येथे पहिले अधिवेशन घेण्यात आले. या आधिवेशनास ८ ते १० हजार अदिवासी शेतमजूर उपस्थित होते. तर १९७१–७२ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'लाल बावटा' हातात घेऊन रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. ६ मे १९७३ ला १५ लाख दुष्काळी कामावरील शेतकरी व कष्टकरी शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संप झाला. या ऐतिहासिक आंदोलनातून रोजगार हमी योजना पुढे आली व या कायदयाने कामाचा हक्क मिळवून दिला. हा संप घडून आणण्यात कॉ. दत्ता देशमुख यांचे मोठे योगदान होते.

**दैनिक श्रमीक विचार :**

२६ जानेवारी १९७८ रोजी महाराष्ट्रातील ५१ कामगार संघटनांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य कर्मचारी ग्रामीण श्रमीक परिषदेने श्रमीक चळवळीचा पुरस्कार करणारे बहुदा देशातील पहिले दैनिक 'श्रमीक विचार' सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. अहमदनगर जिल्ह्यातील लाल निशाण पक्ष पर्यायाने कॉ. दत्ता देशमुख यांचा हे दैनिक सुरू करण्यात मोठा पुढाकार होता. भांडवली पध्दतीच्या जाहीरातीच्या उत्पन्नाचा काहीच आधार नसलेले हे दैनिक ८ वर्ष पुण्यातून चालवले गेले.

**विडी कामगारांसाठीचा लढा:**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत विडी उदयोग चालत असे. अहमदनगर जिल्ह्यातही संगमनेर अकोले तालुक्यात विडी उदयोगाला सुरूवात झाली. कॉ. दत्ता देशमुख यांनी लाल निशाण पक्षाच्या माध्यमातून संघटीत आणि असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे संघटन करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी चळवळी केल्या. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेकडील दुष्काळी व डोंगराळ भागातील असंघटीत क्षेत्रातील विडी कामगारांचे संघटन करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा दिला. त्यासाठी संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने,

ISSN : 2348-7143
December-2018

घेरावा, सत्याग्रह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे, इ. साधनांचा लोकशाही मार्गाने आवलंब करून कामगार कल्याणाचे अनेक कायदे मंजूर करून घेतले.

**विडी कामगार समिती :**

१९६३ मध्ये किमान वेतन समिती नेमावी म्हणून विडी कामगारांनी राज्यव्यापी संप केला. या संपानंतर शासनाने किमान वेतन समिती नेमली. या वेतन वाढ समितीवर विडी कामगार प्रतिनिधी म्हणून कॉ. दत्ता देशमुख यांना घेतले. या समितीने किमान वेतन आणि बोनसचा हक्क मान्य केला व १ एप्रिल १९६४ रोजी शासनाने नोटीफिकेशन काढून तो लागू केला. १९७३ मध्ये मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण संगमनेरला आले असताना त्यांच्या समोर दत्ता देशमुख यांनी विडी कामगारांच्या तक्रारी मांडल्या. पुढे कामगारांची किमान वेतन बोनसचा प्रश्न, भविष्यनिर्वाहनिधी आणि पेन्शन हे चार प्रश्न घेऊन १३ जून १९७४ मध्ये संगमनेर, अकोला, सिन्नर विडी कामगार समितीची स्थापना केली. पुढे भविष्यनिर्वाहनिधी, किमान वेतन निश्चिती यासाठी त्यांनी आंदोलन केले. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने भविष्यनिर्वाहनिधी कायदा केला. १९७६ मध्ये केंद्र सराकरने कामगार कल्याण निधी कायदा बनवला यामुळे घरकुल, मोफत दवाखाना व औषध उपचार, कुंटुबनियोजनासाठी प्रोत्साहनपर आर्थिक मदत, महिलांना प्रसुती लाभ योजना मिळाल्या. तर २० सप्टेंबर १९९० मध्ये किमान वेतन व महागाई भत्ता लागू करण्यात आला. हे कायदे करून घेण्यात कॉ. दत्ता देशमुख यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

**सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलन :**

दुष्काळी परिस्थिती आणि लेव्हीच्या सक्तीमुळे लोकाना अन्नधान्याचा तुटवडा होता. कम्यूनिस्ट आणि शेतकरी कामगार पक्षांनी सरकारी गोदामातील धान्य ताब्यात घेऊन गोरगरीबांना वाटले. एरंडगाव येथे धान्य वाटप चालू असताना पोलीसांनी गोळीबार केला त्यात ९ जण ठार झाले. अकोले येथील सरकारी कार्यालयावर कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ४—५ हजार लोकांचा मोर्चा नेला कॉ. देशमुख यांना अटक करून स्थानबध्द करण्यात आले होते.

**महाराष्ट्र राज्य वीज कामगार चळवळीतील योगदान :**

वीज उदयोगाच्या वाढत्या विस्ताराबरोबरच कामगारांची संख्या वाढत गेली. कामगारांना अनेक आडचणी आणि समस्यांना सामोर जावे लागत होते. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी नोकरसंघ स्थापन करण्यात आला. कॉ. दत्ता देशमुख नोकरसंघाचे अध्यक्ष झाल्यांनतर त्यांनी कामगारांची कायमस्वरूपी भरती व्हावी, कामगारांचे कामाचे तास १६ ऐवजी ८ तास करावे, ओव्हर टाईमचा भत्ता देण्यात यावा यासाठी लढा उभारला. या लढयामुळे १०५ रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना कायम केले गेले. तसेच कामाचे तास सोळा वरून आठ तास करण्यात आले. १९५८ मध्ये कॉ. देशमुख यांनी बॉम्बे विधानसभेमध्ये भाषण करून बॉम्बे स्टेट इलेक्ट्रीस्टी बोर्डाचे अध्यक्ष हशम प्रेमजी यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचार, वशेलेबाजीची चौकशीची मागणी केली. सरकारने ती मान्य करत चौकशी समिती नेमली व हशम प्रेमजी यांना पदावरून बडर्तफ करण्यात आले. त्यामुळे वीज कामगारांवर दत्ता देशमुख यांचा प्रभाव पडला.

**१९६७ चा वीज कामगारांचा संप :**

कॉ. दत्ता देशमुख नोकरसंघाचे अध्यक्ष झाल्यानंतर 'नोकरसंघ' व 'विद्युत कर्मचारी' संघ यांनी कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी स्थापन केलेल्या स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष झाले.

त्यांच्या नेतृत्त्वाखालील संघटनेने वेतन श्रेणी व महागाई भत्ते यात सुधारणा करण्याची मागणी केली. ती मागणी मान्य न झाल्याने ६ फेब्रुवारी १९६७ रोजी संप केला. संपाबाबत कॉंग्रेस सरकारने ताठर भूमिका घेतली हा संप ४३ दिवस चालला. पुढे संप एकतर्फी मागे घेऊन तत्कालीन कामगार मंत्री नरेंद्र तिडके यांना कळवण्यात आले. त्यांनी संपावरील कामगारांना सन्मानाने कामावर घेतले जाईल असे अश्वासन मुख्यमंत्र्यांच्या वतीने दिले. मात्र पुढे वीज मंडळाने अश्वासन पाळले नाही व संपात सहभागी असलेल्या कामगारांची खाते निहाय चौकशी सुरू केली. कामगारांवरील पोलीस केसेस मागे घेतले नाही, कामागारांच्या बदल्या केल्या. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वर्कर्स फेडरेशनची मान्यता काढून घेण्यात आली. त्याविरोधात फेडरेशनने कामगारांच्या केसेस कामगार न्यायालयापासून सार्वोच्च न्यायापर्यंत लढवून कामगारांना कामावर घेण्यास भागा पाडले यात कॉ. दत्ता देशमुख यांनी मोलाचे योगदान दिले.

सांराशरूपाने असे दिसून येते की, कॉ. दत्ता देशमुखांनी जिल्हा लोकल बोर्ड, कोतवाल, बांधकाम विभागाचे कामगार, रस्ते बांधकाम कामगार, विडी कामगार, औदयोगीक कामगार, मैल कामगार, ऊस तोडणी कामगार, वीज कामगार, शेतमजूर या तळाच्या कष्टकरांच्या संघटना निर्माण केल्या. त्यासाठी कम्यूनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कामगार किसान पक्ष, लाल निशाण गट, लाल निशाण पक्ष यांच्या माध्यमातून संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेरावा, सत्यागृह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे इत्यादी लोकशाही मार्गाने न्याय्य हक्कांसाठी लढा दिला. अहमदनगर जिल्ह्याच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळीत कॉ. दत्ता देशमुख यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहीले आहे. विडी कामगार व वीज कामगार यांच्यासाठी दिलेला लढा हा अमुल्य असा आहे. सर्वसामान्यांचे हित लक्षात घेत आर्थिक आणि सामाजिक आधारावर विकास घडून आणण्यात या नेतृत्त्वाने मोलाचे योगदान दिले आहे.

**संदर्भ सुची :—**

१ जाधव भास्करराव, १९९५, डाव्या चळवळीचा बालेकिल्ला अहदमनगर जिल्हा
२ जाधव भास्करराव, १९९७, 'मुक्तीवेध' गौरव ग्रंथ
३ भोळे भा. ल., १९८८, महाराष्ट्रातील डावी चळवळ, पन्नालाल सुराणा आणि किशोर बेडकीहाळ (संपा.) आजचा महाराष्ट्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
४ शेवाळे वि.म, सुरेश परचुरे आणि दत्ता काळेबेरे, २०१४, संघर्ष: कॉ. दत्ता देशमुख गौरव ग्रंथ,एस.एस.इ.बी वर्कर्स फेडरेशन, कोल्हापूर.
५ शेवाळे. वि. म, माधव चव्हाण आणि गुलाब देशमुख (संपा.), १९९६, मी दत्तुचा 'दत्ता' झालो त्याची गोष्ट, कॉ. दत्ता देशमुख, पुरोगामी विचामंच कोल्हापूर
६ गडाख यशवंतराव (प्रकाशक), १९९५, कॉ. वकीलराव लंघे पाटील गौरव विशेषांक
७ चव्हाण शंकर बाळाजी, २००४, अहमदनगर जिल्ह्यातील कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण, पीएच.डी प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
८ बोठे बाळ, २०१६, अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्त्वाच्या योगदानाचा अभ्यास: १९९३ ते २०१०, पीएच. डी प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.
९ kamble bal, 1996, Political Socialization of Politically Marginalized Group: A study of Beedi Workers in Ahmednager District, Unpubished ph.D Thesis, SPPU, Pune
१० भोसले महेश, दि. २१ मार्च २०१८, जिल्हा चळवळींचा बालेकिल्ला, दैनिक प्रभात, १४ वा वर्धापन दिन विशेषांक मधील लेख, ीजजचेरूध्धउ कंपसलीनदजणपद
११ जाधव भास्करराव, दि. १५ ऑगस्ट १९९६, स्वातंत्र संग्रामातील लढे, दैनिक लोकमत दहावा वर्धापन दिन विशेषांक मधील लेख
१२ दैनिक लोकमत, १९९०,नगर पंचशाताब्दी विशेषांक मधील लेख

ISSN : 2348-7143
December-2018

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहास

**डॉ. जे. एस. ढवळे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर, गढी
ता.गेवराई जि.बीड.
मो.9420016757

भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील जवळपास 70% लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. ऊसाच्या उत्पन्नात देशातील आघाडी, अन्नधान्याची तुट, सरासरी पेक्षा शेतीची उत्पादकता कमी, दुध उत्पादनात लक्षीय वाढ असे महाराष्ट्राच्या शेतीचे संमिश्र स्वरुप आहे.

महाराष्ट्राचे क्षेत्रफळ 3,07,690 चौ.कि.मी. असून शेतीतील एकूण लागवड क्षेत्र 204 लक्ष हेक्टर आहे व सिंचन लाभ क्षेत्र 13.1 लाख हेक्टर्स आहे. दुबार पिके घेण्याच्या बाबतीत भारतात महाराष्ट्राचा 18 वा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील तापी, वैनगंगा, गोदावरी, भीमा, कृष्णा, कोयना व मुळा या प्रमुख नदयांच्या खोऱ्यांचा प्रदेश हे शेतीचे मुख्य विभाग आहेत. सातपुडयाच्या रांगा व पश्चिम घाटाचे क्षेत्र शेतीच्या सुमारे 18% आहे. व तेथील शेतीवर डोंगराळ भागामुळे मर्यादा पडल्या आहेत. असे असले तरी शेतकरी शेती विकासात निश्चितच वाव असल्याचे जाणवते. शेतीच्या विकसाचा दोन प्रकारे विचार करतो येतो. संस्थात्मक सुधारणा संस्थात्मक सुधारणा अनुषंगाने जमीन कसणारा शेतकरी, जमीन मालक व शेतकरी यांच्यात सुसंवाद साधने, जमीन करणाऱ्यची पिळवणूक थांबविणे, तळाच्या शेतकऱ्यांपर्यत विकास पोहोचविणे.

ब्रिटीश काळात महाराष्ट्रात रयतवारी पध्दती अस्तित्वात होती. त्यामध्ये काही प्रमाणात दोष निश्चित होते, जमीनीची लहान तुकडयात वाटणी , वहिवाटीच्या हक्काची आनिश्चिता, जमीनीची अत्यल्प सुधारणा ही मुंबई राज्यात 1939 मध्ये कायदे करण्यात आले. मात्र स्वातंत्र्यानंतर 1948, 1957,1962 व 1975 साली करण्यात आलेल्या कायदयाने जमीन करणाऱ्याची मालकी, जमीन धारणेची समानता, जमीनीचे विभाजन थांबविणे, 'कसाल त्याची जमीन' इत्यादी कायदयांची निर्मिती केली. बारमाही ओलिताची जमीन धारणा 7.28 हेक्टर तर कोरडवाहूची 21.85 हेक्टर ठरविण्यात आली. 2.14 लाख हेक्टर जमीन भूमिहितांना वाटण्यात आली. शेती महामंडळास 34.5 हजार हेक्टर जमीन ऊस लागवडीसाठी देण्यात आली.

तांत्रिक सुधारणा हा दुसरा प्रकार म्हणून ओळखला जातो. यामध्ये विस्तारित शेती, हाताशी असलेल्या क्षेत्रात सुधारित तंत्र, सुधारित बी-बियाणे, खते, किटकनाशके पर्याप्त पाणी पुरवठा आदिचां समावेश होतो. 1976 साली महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ स्थापन करण्यात आले. सध्या राज्यात 5 बीज तपासणी प्रयोगशाळा आहेत. लागवडीखालील क्षेत्रात वाढ होत आहे. 62 लाख हेक्टर ओलिताची क्षमता असूनही फक्त 27 लाख हेक्टर जमीन भिजते. याचाच अर्थ हरितक्रांती होवून देखील कृषी क्षेत्रात फारशी समाधानकारक प्रगती झालेली दिसून येत नाही. याचे कारण म्हणजे शासनाचे शेती व्यावसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन व शेतकऱ्यांची असंघटित प्रवृत्ती होय. अलिकडील काळात शेतकरी काही प्रमाणात संघटित होतांना दिसून येत आहे.या दृष्टिने शेतकरी चळवळीचा आढावा घेणे उपयुक्त ठरूल.

**शेतकरी चळवळीचा इतिहासः**

महाराष्ट्रामध्ये शेतकरी चळवळीला चालना देण्याचे काम सर्वात प्रथम 1883 मध्ये महात्मा फुले यांनी केले.त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसुड' नावाच्या पुस्तिकेत शेतकऱ्यांच्या आर्थिक अवनतीचे विदारक चित्र रेखाटले आहे.

शेतकऱ्यावर सावकार व जमीनदार हे अमानुश अन्याय, अत्याचार करत होते. त्यामुळे शेतकरी हा जन्मापासून मरेपर्यंत कर्जातच मरत होता. हे चित्र बदलण्यासाठी महात्मा फुले यांनी शेतीला वैज्ञानिक व तांत्रिक आधार देवून विकसित करण्याची संकल्पना मांडली त्यांना असा विश्वास होता की, आधुनिक पध्दतीने शेती केल्यास शेतकऱ्यांचे दैन्य संपेल, फुल्यांच्या नंतर वासुदेव बळवंत फडके यांनी शेतकऱ्यांना बंडास प्रवृत्त केले. त्यानंतर मात्र जवळपास 75 वर्षाचा कालखंड हा शेतकरी चळवळीसाठीचा अंधःकारमय कालखंड होय. महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्ष हे शेतकऱ्यांचा वारसा सांगतात. परंतू शेती प्रश्नावर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर फारसा विचार झालेला दिसून येत नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 13 जून 1949 मध्ये श्री. केशवराव जेधे यांनी 'शेतकरी कामगार' पक्षाची स्थापना केली. याच दरम्यान तुळशीदास जाधव, नाना पाटील, आण्णासाहेब गव्हाणे, माधवराव बागल, भाऊसाहेब राऊत, दत्ता देशमुख, मोरे या सर्वांच्या सहकार्याने व साक्षीने शेतकरी कामगार पक्षाचे तत्वज्ञान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याचे काम केले. शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडून शेतकऱ्यांना त्यांच्या प्रश्नाची उकल करण्याच्या दृष्टिने या पक्षाने महत्वपूर्ण भूमिका निभावलेली दिसून येते.

बॅरिस्टर अतुंले यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात सन 1980 मध्ये महाराष्ट्रातील 7 लक्ष 81 हजार अल्पभूधारक शेकऱ्यांचे 49 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. त्यानंतरर केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी 2006 मध्ये संपूर्ण देशातील शेतकऱ्यांची 70,000 कोटी रुपयांची कर्जमाफी करुन शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढण्याचे काम त्यांनी केलेले दिसून येते.

शेतकरी जगाला तर देश जगेल किंवा जय जवान जय किसान असे नारे दिले गेले. परंतू प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा वाली कोणीच झालेला दिसून येत नाही. उलट शेतकऱ्यांला आजही खात्यावर सबसिडीसाठी वेठीस धरले जाते. कर्जपुरवठा नीट होत नाही. त्याला त्याच्या मालाची किंमत ठरवता येत नाही. शेतीला उद्योग मानावे ही त्याची आकांक्षा फलद्रुप दिसून येत नाही. त्याच्या मालाला आधारभूत किंमत मिळत नाही. एकाधिकार कापूस खरेदीच्या अत्यंत वाईट अनुभवात त्याला जीवन व्यथित करावे लागत आहे. या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी शेतकरी कामगार चळवळ काम करतांना दिसून येतात.

शेतकरी संघटनेच्या स्थापनेचे क्षेय श्री शरद जोशी यांना आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न शासन समजावून घेत नाही. तेंव्हा त्या प्रश्नांत वाचा फोडण्यासाठी त्यांनी तंबाखु उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन, कांदा व ऊस उत्पादकांचे आंदोलन घडवून आणून पिकाला हमीभाव मिळावा यासाठी तुरुंगवास भोगला. शेतकरी वर्गात मोठया प्रमाणात जागरुती करण्याचे काम त्यांनी केले.

**थोडक्यात :**

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास हा फार जुना असून शेतकऱ्यांविषयी सहानुभूती दाखविण्याचा प्रयत्न अनेक राजकीय पक्षांनी व नेतृत्वांनी केलेला दिसतो परंतू मुळात शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न कोणीही केलेला प्रत्यक्षात दिसून येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आहेत तशाच असलेल्या दिसून येतात.

ISSN : 2348-7143
December-2018

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा आढावा

**प्रा. अविनाश बी. फलके**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख :जामखेड महाविद्यालय जामखेड

**गोषवारा :**

ब्रिटीशांच्या खुप वर्षे गुलामीत राहिलेल्या स्वातंत्र्य भारतात बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. त्यांचे उदरनिर्वाहाचे मुख्यसाधन शेती हे आहे. भारताला आणि त्यात महाराष्ट्राला शेतीसाठी निसर्गाच्या दृष्टीने चांगली जमीन आणि अनुकुल हवामान आणि त्यात असल्याकारणानेच ब्रिटिश व्यापारी भारतात आपले राज्य स्थिर ठेऊ शकले तसेच शेतकऱ्याचे जाचक कर आकारुन शोषण केले गेले. स्वातत्र्य भारतात देखील सुरुवातीच्या काळात शेतीकडे कॉग्रेस पक्षाने दुर्लक्ष केले त्यामुळे १९८० च्या दशकात महाराष्ट्रात शेतकरी चळवळी उदयाला आलेल्या दिसतात. पुरोगामी महाराष्ट्रात अनेक चळवळी उदयाला आलेल्या आहेत. लोकशाहीवादी देशामध्ये आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी चळवळीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होते.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास पाहणे
२. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीवर झालेले परिणाम तपासणे
३. शेतकरी चळवळी समोरील आव्हाने ओळखणे

**माहिती संकलन :**

शोधनिबंध लिहिताना माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम साधनाचा वापर केला आहे. त्यात विविध तज्ञ्यांचे लेख, संदर्भग्रंथ, नियतकालिके आणि इंटरनेट यांचा समावेश होतो.

भारतात सामाजिक चळवळीची सुरुवात स्वातंत्र्यपुर्व काळात झालेली दिसुन येते. प्रस्थापित समाजात परिवर्तन घडवुन आणण्यासाठी ज्या चळवळी म्हणतात. सामाजिक चळवळीत महाराष्ट्र नेहमी अग्रेसर राहिले आहे. त्याचे कारण महाराष्ट्रात ब्रिटिश कालखंडात येथील लोकांचे प्रबोधन होय. देशाच्या दृष्टीने पश्चिम बंगालनंतर महाराष्ट्र लवकर आधुनिक बनले किंवा आधुनिकता पोहचली असे म्हणता येईल. आधुनिकता आली की एक अस्मिता प्राप्त होते आणि त्यातुन अनेक परिवर्तनाच्या चळवळी निर्माण होतात. ब्राम्हणेत्तर चळवळ हे त्याचे उदाहरण. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि संविधाने निर्माण केलेल्या कल्याणकारी राज्यव्यवस्थे मार्फत देशाचा कारभार सुरु झाला. समाजवादी भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आणि तरी सुध्दा शेती क्षेत्राकडे जास्त लक्ष दिले गेले नाही. ७० टक्के लोकसंख्या शेतीवर आधारित होती. यात आजही जास्त बदल झाला नाही.

१९६० ला गुजरात व महाराष्ट्र हे दोन राज्य वेगळे झाले व महाराष्ट्र चा प्रवास सुरु झाल महाराष्ट्र निर्माण होत असताना खुप मोठा लढा झाला त्याला आपण संयुक्त महाराष्ट्राचा लढा म्हणुन ओळखतो. त्यात सुध्दा कामगार, शेतकरी खुप मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. हजारो शेतकऱ्याने बैलगाडीचा मोर्चा विधान भवनावर नेला होता हे महत्वाचे होय.

महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक बदलला देखील १९६० नंतर सुरुवात झाली. ब्रम्हण वर्गाकडुन मध्यम शेतकरी वर्गाकडे राजकीय नेतृत्व गेले यामध्ये पुर्वपार सामाजिक पुढाकार असलेल्या मराठा-कुणबी समाजाकडे राजकीय नेतृत्व गेले. सुरुवातीला मराठा नेतृत्व हे कॉंग्रेस अंतर्गतच सत्तेवर आले. त्यामुळे महाराष्ट्रात शेतकरी वर्गात राजकीय जाणीव निर्माण झाली.

**शेतकरी चळवळीचा इतिहास :**

देशाच्या दृष्टीने १९६५ साली देशात शेती क्षेत्रामध्ये हरितक्रांती होऊन शेतकरी वर्गात बदल होऊ लागला. त्यांच्याकडे पैसा येऊ लागला. प्रत्येक राज्यात जमिनदार शेतकरी वर्ग राजकीय सत्तेत येऊ लागला. महाराष्ट्रात जातीच्या संदर्भात ब्रम्हण वर्गाकडुन ब्राम्हणेत्तर समाजाकडे सत्ता गेली होती. १९६०-१९७० या कालखंडात शेतकऱ्यांचे संघटन अस्तित्वात नव्हते. शेतकऱ्याच्या प्रश्नांवर एकही आंदोलन उभे राहिले नाही. १९७० नंतर देशाच्या विविध भागात विविध चळवळी उदयाला यायला लागल्या.त्याचे कारण म्हणजे शेतीतुन मिळाणाऱ्या उत्पादनात झालेली भरमसाठ वाढ आणि शेती मालाला कमी असणाऱ्या किमती या असंतोषातुन शेतकऱ्यांच्या संघटना निर्माण होऊ लागल्या.

देशाच्या अनेक भागात शेतकरी आपले प्रश्न सोडवण्यासाठी संघटीत होत होती. आंदोलने करीत होते. महाराष्ट्र या राज्यात देखील शेतकरी दुर्लक्षित राहिला होता. शेतीच्या संदर्भात असणारे प्रश्न त्याला भेडसावत होते. त्याच बरोबर काँग्रेस पक्षाचे व्यापारी आणि भांडवलदार धार्जिणे धोरणे शेतकऱ्यांच्या असंतोषात भर टाकत होते. श्री शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली ९ ऑगष्ट १९७९ रोजी ''शेतकरी संघटनेची स्थापना केली. यांची प्रमुख मागणी शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारति रास्त भाव मिळाला पाहिजे अशी होती.

आपले दारिद्रय निसर्गदत्त नुसन मानव निर्मित आहे. शेतीमालाला रास्त भाव मिळावा ही तिची माफक मागणी आहे. शेतकरी संघटना ह पारंपारिक शेतकरी संघटना नाकारुन शेतकरी चळवळ या नव्या रुपात शेतकऱ्यांचे दारिद्रय, शोषणावर भर देत होती. त्यामळे ती औपचारिक संघटनात्मक रचनेत स्वतःला गुंतवुन घेवु इच्छित नव्हती. कार्यकर्त्यांची आपल्या ध्येय्यावरुन दुर जाण्याची तिला भिती होती. प्रत्यक्ष कृती करुन जनतेला त्यात सहभागी करुन घेण्यास आणि आंदोलन सर्वदुर पोहचवण्यास संघटना प्रयत्न करत होती.

शेतकरी संघटनेने आपल्या कामात शिस्त यावी म्हणुन ३ प्रमुख विभाग निर्माण केले.

१) प्रचार : संघटना, प्रशिक्षण, प्रकाशन, पाक्षिक संपर्क, शेतकी विद्यार्थी
२) आंदोलन : भ्रष्टाचार, पाणी, वीज
३) शेतीमाल : अन्नधान्ये, तेलबिया, उस, कापुस, दुध, कांदा

असे विषयावार विभागणी करुन संघटना सर्व स्तरापर्यंत पोहचली.

कांदा आंदोलन, ऊस आंदोलन, कापुस आंदोलन, तंबाखु आंदोलन, दुध आंदोलन इ. आंदोलने करुन शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांची बाजु मांडली व त्यांना न्याय देण्याचे काम केले. शेत मजुरीचे दर किमान पातळीवर ठेवावेत, शेतकरी, श्रमिक आणि झोपडपट्टयांतील कामगारांचे लाचारीचे जिने संपुण त्यांना स्वाभिमानाने जगता यावे अशी परिस्थिती निर्माण करणे संघटनेचे ध्येय आहे. शेतकरी संघटनेने आपले सभासदत्व सर्वांसाठी खुले ठेवले आहे. जो व्यक्ती शेतीवर उदरनिर्वाह करतो तो शेतकरी अशी शेतकऱ्यांची व्यापक व्याख्या केली आहे.

**शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे बदलते स्वरुप :**

रास्त शेतमालासाठी शेतकरी संघटनेने तिच्या स्थापनेपासुन आंदोलने केली होती. आंदोलने करीत असताना आंदोलनात २८ शेतकरी बांधवांचा प्राण गेला या सत्याकडे डोळेझाक करुन चालणार नाही. त्यामुळे संघटनेने रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्यापेक्षा १९८४ पासुन आंदोलन तत्रात बदल केला. यामध्ये गाव बंदी, धान्येबंदी, वीजबिल बंदी, भ्रष्टाचार विरोधी आंदोलन, कर्जमुक्ती आंदोलन, दारु दुकान बंदी आंदोलन हे सर्व करत असताना लाँग मार्च, रास्ता रोको, रेल रोको, जेल भरो, उपोषण, बांधावर बसुन ऊस तोडीस विरोध करणे, वीज बिल न भरणे, दुध रोको, जनावरांचा मोर्चा, घेराव, ठिय्या, काळी फित लावुन निषेध, जिल्हा सहकारी बँक घेराव,

ISSN : 2348-7143
December-2018

निवडणुक आंदोलने अशा विविध आंदोलन तंत्राचा वापर करुन शेतमालाचा प्रश्न पुढे आणला. आणि त्यामुळे अशा संघटनेचा विस्तार जास्त प्रमाणात झाला.

**जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या :**

ब्रिटिशांच्या काळात शेतकऱ्यांचे शोषण झाले असले तरी, नैसर्गिक आपत्ती दुष्काळ अशा भयावह परिस्थितीतही शेतकरी आत्महत्या यांची विशेष नोंद दिसुन येत नाही. पण गेल्या काही दशकांत शेतकऱ्यांची आत्महत्या प्रमाण वाढल्याचे दिसुन येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे तीन-चार महत्वाची कारणे सांगता येतील. भारतीय शेती समाजीतील आर्थिक व सामाजिक विषमता, राजकीय उदासीनता, बँकांची अकार्यक्षमता आणि कृषी बाजारातील स्पर्धा ही कारणे सांगता येतील. भारतात ८२ टक्के छोट व वंचित शेतकरी हे ३६ टक्के जमिन करतात. तर दुसऱ्या बाजुला ६० टक्के मोठे शेतकऱ्यांची ४० टक्के जमिनीची मालकी आहे.

भारतीय शेतकरी हा जागतिक बाजारपेठेतील अमानुष स्पर्धेला बळी ठरलेला दिसतो. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांवर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेचा दबाव वाढत आहे. भारतातील लहान शेतकऱ्यांवर याचा जास्त प्रभाव पडतो. स्थानिक कृषी बाजारपेठेवर सावकार मोठा जमिनदार दलाल यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे एकाच वेळी भारतीय लहान शेतकरी जागतिक आणि स्थानिक विषमतेला तोंड देत आहे. विषमतेमुळे त्यांच्या किमान जगण्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय संस्था आणि बाजारपेठेवर नियंत्रण ठेवणाऱ्या पेप्सिको , कारजील यासारख्या महाकाय कंपनी यांनी शेतकऱ्यांच्या जगण्याच्या वाटा बंद केल्या आहेत. आणि म्हणुनच त्याला आत्महत्या शिवाय पर्याय उरला नाही.

**शेतकरी चळवळी समोरील आव्हाने :**

गट कराराच्याजाचक अटी : च्या माध्यमातून १९९५ मध्ये डंकेल प्रस्तावामध्ये प्रथमच शेती आणि शेतीव्यापार यांचा समावेश केल्याने जागतीक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनी सारखे जकातेत्तर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारावरुन काढून टाकणे.शेतीमालाच्या किंमती ठरवताना उत्पादन खर्च व इतर अडथळे दूर करणे, शेतीमालाच्या निर्यातीला प्रत्यक्ष दिल्या जाणा-या अर्थसहायात कपात करणे,याच बरोबर बौध्दिक संपदा यासारखे अधिकार मान्य केले आहेत.हे सर्व भारतीय शेतक-याच्या समोरील आव्हाने आहेत.

जागतिकीकरणाच्या कालखंडानंतर शेतीच्या समस्या वाढल्या आहेत. तसेच जागतिकीकरणामुळे नैतिक दृष्टया मानव दूर जात आहे. स्वतापासुन सुध्दा मानव दूर जात आहे. काही ठराविक भांडवलदार सर्व कामगारांचे,निसर्गाचे शोषण करत आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी सुरुवातीला धर्मनिरपेक्षता या आधारावर संघटीत झाला होता, परंतु आता जातीय अस्मिता, धार्मिक अस्मिता,वर्गीय अस्मिता प्रत्येक वर्गात नव्याने निर्माण होत आहेत व राजकीय पक्ष याला खतपाणी घालत आहेत.

**मूल्यमापनः**

शेतकरी चळवळी १९८० च्या दशकात काही प्रमाणात शेतक-यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यास यशस्वी झाल्या असे म्हणता येईल. कारण शेतक-यांची विजबीले माफ,कर्ज माफ हे शासनाने राबविले.परंतु शेतकरी चळवळीचा फायदा काही श्रीमंत शेतक-यांना मिळाला. सरकारच्या धोरणांचा फायदा देखील श्रीमंतांना मिळाला.त्यामुळे शेतकरी संघटना म्हणजे श्रीमंताची संघटना म्हटले जाते पण हा आरोप मान्य नाही.

शेतकरी संघटनाचे राजकीयीकरण झालेले दिसून येते. शेतकरी चळवळ अखिल भारतीय पातळीवर एकसंघ नाही यामध्ये फुट पडलेले किंवा राज्या राज्यात वेगळया रुपात आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. प्रा.सुहास पाळशीकर : देश प्रदेश प्रादेशिक राजकरणाच्या बदलत्या दिशा २०१४
२. डॉ.एकनाथ खांदवे शेतकरी संघटना ते स्वंतत्र्य भारत पक्ष एक वाटचाल २००७
३. भारतातील सामाजीक चळवळी : डॉ.एकनाथ खांदवे २०१५
४. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास,महाराष्ट्रातील सत्तांतर,ग्रंथाली प्रकाशन , मुंबई १९९६
५. जोशी शरद शेतकरी संघटना – विचार आणि कार्यपध्दती,शेतकरी प्रकाशन अलिबाग,१९८८,
६. जोशी शरद,साप्ताहिक वारकरी,३ नोव्हेंबर १९७९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांसाठी केलेले ऐतिहासिक कार्य

**अनिल जामकर**
वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद
aniljamkar@gmail.com
Mobile :- 9421687462

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील शोषित आणि वंचित घटकांना विधायक न्याय मिळवून देणारे महामानव होते. आंबेडकरांनी कोणत्याही समस्येचे मूळ शोधून ती समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले.

शोषित कामगार शेतकरी स्त्रिया वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. आंबेडकरांचा संघर्ष हा रस्त्यावर तसाच विधीमंडळातही होता. आंबेडकरांचे कार्य बहुजनांच्या उध्दारासाठीच होते. त्यांचे सर्व लढे हे बौध्दिक स्वरुपाचे होते. सर्व जातीधर्म यातील शोषित पिडितांचे शोषणमुक्त जीवन उभारण्यासाठी त्यांचा लाढा होता. ॲटिनिओ ग्रामसी या विचारवंतांने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णन जैविक बुध्दिवंत (Organic Intellectual) म्हणून केले आहे. असा जैविक बुध्दिवंत एखाद्या संपूर्ण समाजाचे प्रश्न न्याय पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारताचे सर्वश्रेष्ठ जैविक बुध्दिवंत होते. म्हणूनच त्यांनी सर्वंकष न्यायाच्या लढयात शेतकऱ्यांचे दुःख व अन्याय दूर करण्याचे महान कार्य केल्याचे दिसून येते. जमीनीच्या राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला, खोती (गुलामगीरी) कायद्याने नष्ट केली, जलसिंचन व उर्जा क्षेत्रातून शेतकऱ्यांना मदत केली.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेती व शेतकरी यांच्याविषयीचे कार्य अभ्यासणे.
२. खोती (गुलामगिरी) विषयक कार्य.
३. उर्जा व जलसिंचन विषयक कार्य अभ्यासणे.

**शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती आणि शेतकरीविषयक कार्याचा आढावा.

**लहान शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाय :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जमीन सुधारणांचे पुरस्कर्ते होते. १९१८ मध्ये त्यांनी "लहान शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाय" हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये त्यांनी जमीन धारणेच्या प्रश्नांची चिकित्सा केली. आणि शेतीची उत्पादकता फक्त आकारावर नव्हे तर मशागतीसाठी भांडवल व श्रम किती सधनतेने वापरला याला महत्व आहे. हे स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी कुटूंबातील सर्व मुलांना वेगवेगळ्या व्यवसायात पाठविले पाहिजे असे आधुनिक मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.

**शेतकऱ्यांचा प्रश्न विधिमंडळात पहिल्यांदा आंबेडकरांनी मांडला :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाली. निर्वाचित सदस्य म्हणून त्यांनी २४ फेब्रुवारी १९२७ रोजी विधीमंडळात अर्थसंकल्पावरील पाहिले भाषण केले. हे पाहिले भाषण दलितांच्या प्रश्नांवर नव्हते तर ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ग्रंथ लिहीणारे पहिले महापुरुष म.

ISSN : 2348-7143
December-2018

ज्योतिराव फुले आणि वैधानिक विचारपिठावर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलणारे पाहिले महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

**जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार :-**

डॉ. आंबेडकरांनी जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला. शेतकऱ्यांच्या गटांना सहकारी तत्वावर शेतजमीन मशागतीसाठी देण्यात यावी. असा त्यांचा विचार होता. राज्यघटनेची रचना करताना त्यांनी महत्वाचे उद्योग सरकारी मालकीचे व व्यवस्थेचे असावेत तसेच मुलभूत पण कळीचे नसणारे उद्योग हे सरकारी व्यवस्थेत किंवा प्रमंडळांनी चालवावेत व शेती हा सरकारी उद्योग असावा आणि कार्यक्षम आकारात अशी जमीन गावकऱ्यांना सहकारी पध्दतीत कसण्यास द्यावी अशी तरतूदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केल्या होत्या.

**खोती (गुलामगिरी) कायदयाने नष्ट केली :-**

१७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेब खोती पध्दत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले. खोत हा गावाचा मालक आहे. त्यास ते गाव गहाण टाकता येते. विकता येते. खोती कुळांची धारेकरी कुळे बनविता येतात. सरकारला खोताने कबुली दिली, म्हणजे सरकारला ती नाकबुल करता येत नाही. भात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमितील पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी पध्दत होती. डॉ. बाबासाहेबांनी खोती पध्दत नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक आणून जमीनदाराकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक कमी करण्याचा प्रयत्न केला आणि खोतीपासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरुपाचे कायदे केले. राष्ट्रीय स्तरावर सर्वांच्या फायद्याचे काम करुन डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्रीय एकात्मतेत भर घातली. शेतकऱ्यांविषयी बाबासाहेबांना केवढी कणव होती, हे हयावरुन दिसून येते.

**जलसिंचन व उर्जा क्षत्रातील कार्यातून शेतकऱ्यांना भरीव मदत :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक खात्याचे मंत्री म्हणून काम पाहिले. १९४२-४६ या कालावधीमध्ये व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या कार्यकारीणीचे सदस्य म्हणजेच मंत्री होते. त्यांनी श्रम खात्याबरोबरच जलसिंचन व ऊर्जा विभागाचे प्रमुख असताना जलनियोजन विकासासाठी पाण्याचे नियोजन योग्य प्रमाणात झाले तर त्याचा उपयोग शेती आणि उद्योग धंद्याला होईल पर्यायाने भारतीयांचे दरडोई उत्पन्न वाढेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार होते. सिंचन व ऊर्जा हे दोन्ही क्षेत्रे १९३५ च्या भारत सरकार कायद्याप्रमाणे प्रांतिक सरकारकडे असल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रांतिक सरकारचे सहकार्य प्रयत्नांनी मिळवावे लागले. डॉ. आंबेडकरांच्या व्यवहारी शहाणपणाचा परिणाम म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाने शती व उद्योग या दोन्ही महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्राच्या विकासासाठी अत्यावश्यक असणारी सिंचन व ऊर्जा ही दोन महत्त्वाची पायाभूत क्षेत्र विकसित करण्याचा पाया घातला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सिंचन धोरण सूत्रावर उभारलेले होते.

जलसंसाधन विकास करण्यासाठी नदी खोर (पाणलोट) क्षेत्र हा आधार धरुन सिंचन योजनाचे नियोजन बहुउद्देशीय आहे. शेती सिंचन पिण्यासाठी पाणी, जल वाहतूक, वीजनिर्मिती व काही पाणी उद्योगासाठी शक्यतेप्रमाणे ही उद्दिष्ट असली पाहिजेत. जलप्रकल्प व ऊर्जानिर्मिती संबंधीत राष्ट्रीय पातळीवर दोन तांत्रिक मंडळ निर्माण करावीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या नियोजनामुळे व दूरदृष्टीमुळेच तत्कालीन महत्त्वाचे मोठे जलप्रकल्प (दामोदर, हिराकुंड सोन, कोसीह) कार्यवाहित आले व नंतरच्या सिंचन व ऊर्जाधोरणाची व्यवस्था उत्क्रांती झाली.

**निष्कर्ष समारोप :-**

१. सध्याची भारतीय अर्थव्यवस्थेची परिस्थिती पाहता ५० टक्के पेक्षा अधिक (मुख्यतः लहान शेतकरी) शेती सोडू इच्छितात.

२. काही राज्यांतून विशेषतः मराठवाड्यात पाण्याचे दुर्भीक्ष्य वाढत आहे.

३. शेतीची उत्पादकता कुंठीत होत आहे.

४. श्रमिक स्थलांतर करीत आहेत.

५. शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.

६. सिंचनटंचाई, वीजटंचाई, शेती उत्पन्न करांचा प्रश्न, वाढता बेरोजगार, वाढती विषमता, भाववाढ, वाढती गरिबी इत्यादी प्रश्न लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार काळजीपूर्वक परिशीलन करुन त्यातल्या सुयोग्य गोष्टी केंद्र सरकारच्या धोरणात व कार्यक्रमात समाविष्ट करणे हे सामान्यांच्या, शेकऱ्यांच्या हिताचे ठरेल.

७. कोरडवाहू शेती यशस्वी करावयाची असेल तर जोडधंदे प्रक्रिया उद्योग व मूल्यवर्धित उद्योग विकास करावा लागेल

८. जमीन, वीज व जल यांचे समान वाटप होणे आवश्यक आहे.

९. नदीजोडप्रकल्प ही डॉ. आंबेडकरांनी मांडलेली संकल्पना आज उपयुक्त वाटते.

१०. भविष्यात यांत्रिकीकरण करावे लागणार असून त्याबाबत शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घ्यावे.

११. विद्यार्थ्यांना शेतीचे शिक्षण हे सक्तीचे असावे, असेही विचार डॉ. बाबासाहेबांचे होते.

**संदर्भ सूची**

**१.** किर धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, पाचवी आवृत्ती, मुंबई, पृ.१४८.

**२.** प्रा. नरके हरी, डॉ. बाबासाहेबांचे काही नवीन पैलू, या विषयावरील व्याख्यान दि.२६/०२/२०१३.

**३.** खरात शंकरराव (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, मार्च-१९८७.

**४.** थोरात सुखदेव, बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती जाने. २०१० पृ. ३३,३५.

**५.** डॉ. गायकवाड अरविंद यांचा लेख दै. महाराष्ट्र टाईम्स दि.१६ एप्रिल, २०१३, पृ.९.

**६.** सिंह ब्रिजेश (संपा) महामानव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई दि.१४ एप्रिल २०१७.

ISSN : 2348-7143
December-2018

# कामगार चळवळ व आव्हाने

**डॉ. आनंदकुमार सुभाष करडे**
सहाय्यक अधिव्याख्याता व राज्यशास्त्र विभागप्रमुख
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

इंग्रजी राजवटीच्या आगमनाबरोबर भारत व महाराष्ट्रातील सामाजिक पातळीवर फार मोठया प्रमाणात बदल घडून आलेले दिसतात. कामगार, शिक्षीत व नोकरदार यांचा जीवनविषयक दृष्टिकोन अमूलाग्रपणे बदललेला दिसतो. प्राप्त परिस्थितीला समता व श्रमाच्या आधारे बदलण्याचे महत्वाचे सामर्थ्य याच कालखंडात येथील पिढीमध्ये वाढीस लागले. याच सामर्थ्याच्या बळावर विसाव्या शतकात अनेक महत्वाच्या संघटना समाजात निर्माण झाल्या. राष्ट्र निर्मिती व राजकीय पक्ष यांच्या निर्मितीमुळे लोकशाही चानविणाऱ्या संस्था निर्माण झाल्या व वाढल्या. परंतु यासर्वांबरोबर कामगार संघटनांचा उदय ही देखील एक महत्वाची घटना ठरली. मात्र २० व्या शतकाच्या अस्ताबरोबरच कामगार संघटनांची शक्ती कमी होत आहे. त्यांचा प्रभाव कमी झाल्याने ही गोष्ट कामगार वर्गावर आस्था व अपेक्षा असणाऱ्या वर्गांना अस्वस्थ करीत आहे. कामगार चळवळींचा प्रभाव कमी होण्याची कारणे काय आहेत आढावा येथे घेतला आहे.

मार्क्सवादाने भौतिकसाधनांचा, उत्पादन साधने व तंत्र यांच्यात होणाऱ्या बदलामुळे माणसा-माणसातील सामाजिक संबंध बदलतात, समाजरचना बदलते. विचारविश्व देखील बदलते. अशाप्रकारचे बदल सातत्याने अधोरेखीत होतात. १८ व्या शतकात कारखानदारी सुरू झाल्यावर कामगारांचे स्थान समाजात महत्वाचे ठरू लागले होते. नव्या युगाचा शिल्पकार म्हणून कामगार शक्तीचा उदय झालेला होता. यासर्व घडामोडीतून कामगार संघटना, कामगार चळवळ, ८ तासांचा दिवस, कामगारांचे पक्ष निर्माण झाले. ज्याचा कालखंड हा १९२० ते १९५० पर्यंतचा मानला जातो. समाजवादाचा घोष सर्वत्र सुरू झालेला होता. आंतरराष्ट्रीय श्रम आणि कामगार संघटना स्थापन होवू लागल्या होत्या. जगभर कामगार वर्गात उत्साह निर्माण होवू लागला होता. त्याच बरोबर कामगार वर्गात संघर्ष देखील निर्माण होवू लागला होता. १९२९-३० सालच्या भांडवलशाहीच्या सार्वत्रिक मंदीचा फटका बसून भांडवलशाहीचे धाबे दणाणले होते. लोककल्याणकारी राजवटींचा उदय झाला. परंतु हे होत असताना भांडवलदारांचा व कामगारांचा वर्ग संघर्ष चालूच होता. त्याचे स्वरूप बदलले होते. १९७० नंतर महागाई व कमी होणारे नफे हा प्रश्न समोर आला. यातूनच बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील क्रांती व दुसरीकडे कामगार संघटनांच्या वैचारिक सामर्थ्यावर हल्ला (म्हणजे समाजवादी विचारसरणीवर हल्ला) सुरू झाला. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात पुरेशी लवचिकता दाखविण्यात कामगार चळवळीला यश न आल्याने समाजवादी राष्ट्रे (चीनृ क्युबा, विहएतनाम) कोसळली. यामुळे समाजवादी विचारसरणीवर हल्ले चढविणे आणखीनच सोपे झाले. या संघर्षातून नवीन आर्थिक धेरण, जागतिकीकरण, जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमार्फत स्ट्रक्चरल ॲडजस्टमेंट प्रोग्राम म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचा प्रभाव सुरू झाला व जागतिक पातळीवर फार मोठे बदल घडू लागले. २० व्या शतकातील मोठे कारखाने व त्यात काम करणारे कामगार हे वास्तव बदलून, आधुनिक तंत्रज्ञानाने कमी कामगारात प्रचंड उत्पादन काढणारे नवीन कारखाने तयार झाले. त्याच बरोबर या कारखान्यांना सुटे भाग पुरविणारे छोटे कारखाने व त्यात काम करणारे असंघटित कामगार, स्वयंरोजगाराच्या नावाखाली मालक-कामगार अशी देहरी भूमिका बजावणारे कामगार हे स्वरूप समोर आले. कामाचे तास, किमान वेतन, नोकरीची शाश्वती, नोकरीत कायम करा या संकल्पना जागतिकीकरणात मोडीत निघाल्या. युनियनचे संघर्ष, जुने जग (१९ व २० वे शतकातील यंत्र युग) वाचवू शकत नाहीत. फार फार तर कामगार संघटनांचा अस्त पुढे ढकलू शकतात हे वास्तव समोर आले. स्वेच्छानिवृत्ती, कामगार कपात, सक्तीची निवृत्ती, कारखाने बंद होणे हे प्रकार १९९० ते २०१० या काळात मोठया प्रमाणात घडले.

भारतातील कामगार संघटनांनी दिलेल्या लढ्यामुळे कामगार कायद्यात बदल मोठ्या प्रमाणात करण्यात सरकार व भांडवलदारांना यश आले नाही. परंतु कायद्यांना बगल देवून त्यांची अंमलबजावणी होणार नाही याची खात्री करूनमोठया प्रमाणावर कामाच्या रचनेत व कारखान्यांच्या स्वरूपात मोठया प्रमाणात बदल करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान, ठेकेदारी पध्दत, काम बाहंर देवून करून घेण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले. सार्वजनिक क्षेत्रात व सरकारी क्षेत्रातही मोठया प्रमाणावर हे प्रकार वाढले. कंत्राटी शिक्षण, तासिका तत्वारील प्राध्यापक नेमणूका, बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या योजनांच्या नावाखाली मोठया प्रमाणावर कामगारांची कपात करण्यात आली, तसेच अनियंत्रीत प्रकारे पैसा कमावण्याचे साधन म्हणूनच या क्षेत्राकडे पाहिले जावू लागले. अंगणवाडी, आशा कर्मचारी, शालेय पोषण आहार योजना अशी अनेक उदाहरणे देता येतील. या बदलांमुळे एकीकडे असंघटित कामगारांचे लढे वाढले तर दुसरीकडे जुन्या संघटित कामगारांची संख्या व प्रभाव कमी झाला आहे. या नव्या बदलाबरोबर जुने प्रश्न ही आहेतच. मोठ्या प्रमाणावर आपसात स्पर्धा करणाऱ्या व पक्षीय प्रभाव असणाऱ्या कामगार संघटना, धंदेवाईक कामगार संघटना, गुंडमाफिया यांच्या ताब्यात असणाऱ्या कंपन्यांमधील कामगार संघटना यांच्यामुळे १०० वर्षाचा प्रखर इतिहास असून देखील कामगार संघटना क्षीण होत आहेत. आज जगात जेमतेत १० टक्केच कामगार संघटनांच्या माध्यमातून संघटित आहेत. अशा परिस्थितीत कामगार संघटनापुढील आव्हाने आणखीनच वाढणार आहेत. नोकरीची शाश्वती, मर्यादित कामाचे तास, कामाची नक्की जागा असणे, कामाचे स्वरूप फारसे न बदलणे, निवृत्ती वेतन, वाढणारे पगार हे वास्तव टिकविणे अडचणीचे होत आहे. ते टिकविण्याचा जोरदार प्रयत्न संघर्षातून कामगार संघटना करीत आहेत. परंतु नवीन तंत्रज्ञानाच्या गरजा व दुसरीकडे भांडवलदारी विचारसरणीचा हल्ला व वरचष्मा या व्दंव्दात जनतेची सहानुभूती मिळू न देण्यात भांडवलदारांना यश आले आहे. भारतासारख्या देशात या संघर्षाबरोबरच जातीय, धार्मिक व भाषिक संघर्ष घुसल्याने परिस्थिती आणखीनच गुंतागुंतीची झाली आहे.

जुन्या पध्दती बदलून, एकजुटीशिवाय व नवीन विचार, पर्याय पुढे आणल्याशिवाय कामगार संघटनांना यश मिळणार नाही याचे भान वाढले आहे. त्यामुळेच यावर्षी १० कोटी कामगारांचे अभूतपूर्व भारत बंद आंदोलन यशस्वी करण्यात कामगार संघटनांना मोठ्या प्रमाणात यश आले. दुसरीकडे फक्त एकाच वर्गाचे हितसंबंध लक्षात न घेता सर्वांना किमान समान वेतन, सर्वांना निवृत्ती वेतन, शिक्षण, आरोग्य व घरांचा हक्क अशा सर्वांगीण मागण्या पुढे येत आहेत व त्यास मर्यादित प्रमाणात यश ही मिळत आहे. वाढती विषमता, विना रोजगार विकास स्पष्टपणे दिसत असल्यामुळे जागतिक भांडवलशाहीच्या मंदीचे व वाढत्या महागाईचे संकट सर्वत्र पसरल्यामुळे अनिर्बंध बाजारपेठेवर आधारित धोरण बदण्याची गरज ही शासनकर्त्या वर्गाच्या एका विभागाला झाली आहे. त्यामुळे ही परिस्थितीतील हा बदल व दुसरीकडे जनता रस्त्यावर येवून सरकारी धोरणांना विरोध करीत आहे. त्यामुळे कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणे शक्य होणार नाही हे वास्तव समोर आले आहे. मारूती मोटर्स, हिरो, होंडा, बजाज यासारख्या मोठ्या कंपन्यांमधून कामगारांची होणारी कपात तीव्र संघर्ष, अस्वस्थ जगाची प्रचिती देत आहेत. मालकवर्ग छोट्या संघटित वर्गाला थोडेफार देवून मोठ्या प्रमाणावर कमी वेतन, हंगामी कामगार, ठेकेदार-कामगार यांना राबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या मर्यादादेखील या जागतिक व आर्थिक बदलामध्ये स्पष्ट होत आहेत.

अशाप्रकारचा अस्वस्थ कामगार व सामाजिक घटक असल्यामुळे १९३० नंतर ज्याप्रमाणे लोककल्याणकारी राजवट व समाजवादी राजवट का भांडवलशाही हूकूमशाही राजवट हा संघर्ष झाला होता व त्यात जर्मनी, इटली, जपान व स्पेन यासारख्या राष्ट्रांनी भांडवलशाही हुकूमशाहीचा मार्ग स्विकारला होता तशीच परिस्थिती, सध्या जगभर दिसत आहे. भारत ही त्याला अपवाद नाही. त्यामुळे परिस्थिती अनुकूल होत आहे. हे ध्यानात घेवून कामगार संघटनांनी लोकशाही वृध्दिंगत करून एकजूट निर्माण करून, नवीन पध्दतीने वास्तवाला सामोरे जावूनच माणूस हाच सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिदू असला पाहिजे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांचा मूलभूत हक्क असलाच पाहिजे असा

आग्रह धरून शासन, कंपनी मालक व व्यवस्थापन यांच्या विरोधात संघर्ष केला पाहिजे. तरच भविष्यात कामगार चळवळीपुढील आव्हानांना समर्थपणे समोरे जाता येईल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. महाराष्ट्रातील कामगार चळवळ, दत्ता देशमुख, मधुर प्रकाशन, नाशिक.
२. महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन, सं. अण्णासाहेब शिंदे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

ISSN : 2348-7143
December-2018

# शेतकरी संघटनेतील महिलांचा सहभाग – एक अभ्यास

**प्रा. तानाजी जाधव**
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,
मिरजगाव
मो.९९२१११६५४८

**सारांश :–**

कोणतीही चळवळ मग ती राजकीय, धार्मिक, आर्थिक व सामाजिक असो ती जंगलात वनवा पेटावा तशी अचाणकपणे अस्तित्वात येत नसते त्यापाठीमागे अनेक कारणांची शृंखला असते स्वातंत्र्योत्तर भारतात शेतकरी चळवळीचा उदय झाला १९७९ मध्ये शरद जोशी यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रामध्ये शेतकरी संघटनेची स्थापना झाली. भारतामध्ये पहिल्यांदाच स्वातंत्र्याचे आंदोलन सोडले तर बहुसंख्य लोक संघटनेच्या माध्यमातून आंदोलनात सहभागी झाले. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे दुसरे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे आंदोलनातील स्त्रीयांचा मोठया प्रमाणावरील सहभाग होय. ९ व १० नोव्हेंबर १९८६ रोजी नाशिक जिल्हयातील चांदवड येथे पहिले शेतकरी महिलांचे अधिवेशन भरले.[१] व महाराष्ट्रातून लाखो स्त्रीया या अधिवेशनामध्ये सहभागी झाल्या.

समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीयांची संख्या एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के असताना त्यांना दुय्यम स्थान दिले आहे. त्यांच्यावर अनेक बंधने लादलेली आहेत, चूल आणि मूल एवढेच तिचे विश्व मानले आहे. स्त्रीयांच्या बाबतीत अनेक अनिष्ट रूढी परंपरा समाजामध्ये अस्तित्वात आहेत, याशिवाय स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक अधिकार सुध्दा नाहीत. स्त्रियांकडे आर्थिक सत्ता आणि अधिकार नसेल आणि त्याबाबतीत त्या वडीलांवर किंवा पतीवर अवलंबून असतील तर घरातील पुरूष स्त्रीयांवर नियंत्रण ठेवतात त्यामुळे स्त्रीया रोजगाराभिमुख होणे गरजेचे असते.[२] अर्थ उत्पादनात स्त्रीयांचा सहभाग असेल तर त्यांचे घरातील व समाजातील स्थान, प्रतिमा उंचावते त्यांना व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी मिळते. स्त्रीया घराबाहेर पडल्या नाहीत किंवा रोजगाराभिमुख झाल्या नाहीत तर त्या बेबी प्रोडयुसिंग मशिन बनतात.[३] त्यामुळे स्त्रीयांनी घराबाहेर पडून रोजगार मिळविणे आणि आर्थिक अधिकार प्राप्त करणे स्त्री–पुरूष समानतेच्या दृष्टीने व महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने व स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. याशिवाय वेगवेगळया संस्था, संघटना व राजकिय पक्षांनी स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला मात्र शेतकरी संघटनेच्या माध्यमातून १९८० नंतरच्या काळात स्त्रीयांच्या प्रश्नावर जी क्रांतीकारी आणि पुरोगामी भुमिका घेतली, समाज परिवर्तनाच्या दृष्टीने शेतकरी संघटनेने टाकलेले हे महत्वपूर्ण पाऊल होते. १९८६ मध्ये नाशिक जिल्हयातील चांदवड येथे शेतकरी संघटनेचे पहिले महिला अधिवेशन भरले. या अधिवेशनाला लाखो स्त्रीया उपस्थित होत्या. यानंतरच्या काळात शेतकरी संघटनेच्या वतीने स्त्रीयांच्या अनेक प्रश्नांवर आवाज उठवला याचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधामध्ये केला आहे.

**संशोधनाची उद्‌दीष्टये :–**

१. शेतकरी संघटनेमधील स्त्रीयांच्या सहभागाचा अभ्यास करणे

ISSN : 2348-7143
December-2018

२. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून भरविलेल्या महिला अधिवेशनाचा अभ्यास करणे
३. महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शेतकरी संघटनेने केलेल्या कार्याचा आढावा घेणे
४. महिलांच्या सर्वव्यापी समस्यांची कारणे व उपायांचा शोध घेणे.

**चांडवडचे शेतकरी महिला अधिवेशन १९८६ :**

९ व १० नोव्हेंबर १९८६ रोजी नाशिक जिल्हयातील चांदवड येथे पहिले शेतकरी महिला अधिवेशन भरविण्यात आले. शेतकरी संघटनेची उभारणी करताना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे या एककलमी अर्थशास्त्रीय मागणीवर व्यापक असे जनआंदोलन उभे करताना चांदवडच्या महिला अधिवेशनाने संघटनेचे इतर सर्व विचार झाकोळून जाण्याची भिती निर्माण झाली. सर्व स्त्री संघटना व राजकिय पक्षांसमोर एक आव्हान उभे राहिले. शेतकरी संघटनेने पारंपारिक चौकटी बाहेर टाकलेले हे एक महत्वाचे ऐतिहासिक पाऊल होते असे दिसून येते.

चांदवड येथील शेतकरी महिला अधिवेशनासंदर्भात शरद जोशी म्हणतात, ''शेतकरी यांना घामाचे दाम हवे तर त्यांना मिळणाऱ्या दामाच्या दुपटीने दाम लक्ष्मीला मिळायला हवे पण तिला तर काहीच मिळत नाही, जमिनीच्या एखाद्या तुकडयावरचा मालकी हक्क तर सोडाच पण रोजाने येणाऱ्या मजुरा इतकी कमाई शेतकऱ्याच्या कारभारणीला म्हणजे शेत मालकिणीला मिळत नाही. शेतीच्या प्रश्नासाठी शेतकरी संघटना उभी राहिली, शेतकऱ्यांच्या लक्ष्मी करीता कोण उभे राहणार?''[४] असा प्रश्न शरद जोशी यांना पडला होता. शेतकरी महिलांची संघटना असावी अशी शरद जोशी यांच्या पत्नी लीला जोशी यांची इच्छा होती, ती त्यांनी शेतकरी संघटनेच्या १९८२ च्या सटाणा येथील पहिल्याच अधिवेशनामध्ये व्यासपिठावरून बोलून दाखविली होती. याविषयी शरद जोशी म्हणतात, ''स्वित्झरलंड मधिल सारा ऐशआराम सोडून शेतकऱ्यांच्या सेवेत जिच्या आधाराने रूजू झालो तिची इच्छा टाळता कशी येइल?''[५]

चांदवडच्या महिला अधिवेशनाच्या अगोदर महिलांच्या चार पाच बैठका झाल्या शेतकऱ्यांचे प्रश्न समजुन घेण्या करीता मी शेतकरी झालो शेतीतील दु:खे अनुभवली, स्त्रीयांची दु:खे समजुन घेण्याकरीता स्त्री होणे कसे शक्य होणार? मग ग्रामिण भागात स्त्रीयांची शिबीरे भरऊन त्यांच्या मनात शिरून त्यांची दु:खे व समस्या समजून घेण्याचे ठरविले, त्यानुसार पहिली बैठक मराठवाडयातील हळी हंडळबळी येथे झाली. बैठकीला आलेल्या महिला बोलायला तयार नव्हत्या, मात्र त्यांना बोलते करण्याचा प्रयत्न केला. महिला आपले प्रश्न आणि दु:ख मांडू लागल्या. 'उसाला भाव मिळाला मालक दारू पिऊ लागले आणि मला फक्त मार पडायला लागला' अशी व्यथा स्त्रीयांनी मांऊली. वर्षानुवर्षे मन आणि स्वप्न हरऊन गेलेल्या स्त्रीयांना बोलते करण्याचे काम शरद जोशी यांनी केले. ते शेतकरी महिलांचे भाऊ बनले आणि स्त्रीया आपले मन व्यक्त करू लागल्या. खऱ्या अर्थाने स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने टाकलेले हे महत्वाचे पाऊल होते. शेतकरी महिलांच्या इतिहासात चांदवडच्या अधिवेशनाने एक नवी पहाट उजाडली शेतकरी स्त्रीया जाग्या होऊन संघटीत होऊ लागल्या व विविध आंदोलनात निर्भयपणे सहभागी होऊ लागल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शरद जोशी यांनी उभ्या केलेल्या अर्थवादी चळवळीत ग्रामीण भागातील स्त्री पहिल्यांदाच घराबाहेर पडली.[७]

**निपाणीचे तंबाखू आंदोलन :—**

संघटनेच्या निपाणी तंबाखू आंदोलनात उत्स्फुर्तपणे हजारो स्त्रीया सहभागी झाल्या. स्त्रीयांचा वाढता सहभाग आणि ताकद ओळखून स्त्रीप्रश्नावर विचार करण्याची निकड संघटनेला भासली.[८] निपाणीच्या

आंदोलनातील गोळीबारानंतर सत्याग्रहातील शेकडो सत्याग्रहींना फक्त नेसत्या वस्त्रावर शेकडो मैल दुरच्या बल्लारी व गुलबर्गा येथील तुरूंगात पंधरा पंधरा दिवस नेऊन टाकले. याबाबत स्त्रीयांनी तक्रार तर केली नाही ऊलट 'माहेरीसुध्दा अम्हाला येवढा आराम मिळत नाही असे सांगितले'[९] यावरून शेतकरी स्त्रीया करत असलेले कष्ट व त्यांना घरात होत असलेल्या त्रासाची कल्पना येते.

चांदवड येथील शेतकरी महिला अधिवेशनामध्ये लाखो स्त्रीयांनी जाहिर केले की, 'आम्ही माणसे आहोत, इतर कोणाच्याही बरोबरीने माणसे आहोत आणि आम्हाला माणूस म्हणून वागविले गेले पाहिजे, आमची गुणवत्ता लक्षात घेतली जावी, जन्माच्या अपघाताने ठरणारे विशेष जात, धर्म, वर्ण, भाषा आणि संपत्ती नाही आणि लिंगभेद तर नाहिच नाही, आणि आम्ही शपथ घेतो की, आमचे माणुसपण हिरावणारी हजारो वर्षाची बंधने झुगारून देत आहोत. युगायुगाची दुःखे, अत्याचार, अपमान आणि शोषण यातून आम्ही मुक्त होत आहोत, आणि त्याही पेक्षा महत्वाचे आमची वैरणी आमच्याच मनातील भिती आम्ही गाडून टाकीत आहोत. त्याचबरोबर पुरूषांचीही त्यांना मिरवाव्या लागणाऱ्या खोटया पुरूषीपणाच्या मुखवटयाच्या जाचातून सुटका करण्याचा आमचा निश्चय आहे.'[१०] या घोषणेवरून लक्षात येते की, भारतातील स्त्रीयांना खऱ्या अर्थाने त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची ओळख करून देण्याचे कार्य, त्यांच्यामध्ये स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य, अन्यायाविरूध्द पेटून उठण्याचे धाडस शरद जोशी यांनी केले होते.

चांदवडच्या अधिवेशनात जमलेल्या स्त्रीयांनी काही महत्वाचे ठराव मंजूर केले. रोजगार हमी योजना, स्त्रीयांच्या रोजगारासाठी सोई आणि मेहनताना, पिण्याच्या पाण्याची सोय, मुलींचे शिक्षण अशा विषयावर नवीन दृष्टीकोन देणारे ठराव तर झालेच, पण त्यापलिकडे समान नागरी कायदा, मालमत्ता, हुंडा, पोटगी इत्यादी प्रश्न, स्त्रीयांवरील अत्याचार आणि स्त्रीयांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी सार्वजनिक सत्तास्थानावर ताबा मिळविणे, अशा विषयावर ठराव झाले.[११]

**पंचायतराज बळकाव आंदोलन :—**

देशात निर्माण झालेल्या गुंडगिरीच्या पाठीमागे सत्ता हे प्रमुख कारण आहे म्हणून जिल्हा परिषद निवडणूकीत शंभरटक्के महिला उमेदवार उभे करण्याचा निर्णय संघटनेने घेतला, हा निर्णय अव्यवहार्य असला तरी क्रांतीकारक होता. समग्र महिलांना एकत्र येण्याचे आवाहन संघटनेने केले.[१२] १९९२ मध्ये शेतकरी महिला आघाडीने १६ जिल्हयातून ४०० जागा लढविल्या व ४०० जागेवर संघटनेचे अपक्ष उमेदवार उभे केले मात्र संघटनेला अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. याच काळात महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १/३ जागा स्त्रीयांसाठी राखीव ठेवण्याची तरतुद करून चांगला निर्णय घेतला. त्या निर्णयामध्ये शेतकरी चळवळीचा सातत्यपूर्ण संघर्ष असल्याचे जाणवते. त्यातूनच महाराष्ट्रामध्ये स्त्री चळवळीचा व्यापक पाया रूजला व आजचे बदलते चित्र या चळवळीचे यश आहे असे म्हणता येईल.

**शेतकरी महिला आघाडी :—**

शेतकरी संघटनेच्या वेगवेगळया कार्यक्रमातून स्त्रीयांचा सहभाग वाढत होता याची जाणीव संघटनेला होती. शेतकरी महिला या शेतकरी आहेतच पण स्त्री म्हणून तिच्या वेगळया समस्या आहेत हे लक्षात घेऊन शेतकरी महिला आघाडीची स्थापना करण्यात आली.[१३] या महिला आघाडीने स्त्री प्रश्नावरती वेगवेगळी आंदोलने उभारली व शासनाचे व समाजाचे स्त्रीयांच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रीत करून घेतले. जानेवारी १९८९ मध्ये आंबेठाण येथे शेतकरी महिला आघाडीचे चर्चा शिबीर शरद जोशी यांच्या उपस्थितीत पार पडले. आंदोलनात शेतकरी महिलांनी मोठया प्रमाणावर सहभागी व्हावे म्हणून प्रचाराचे कार्यक्रम हाती घेण्याचे ठरले.

ISSN : 2348-7143
December-2018

शेतीच्या शोषणामुळे आमचे संसार नासले आहेत ही कल्पना मांडली, त्याबरोबरच महिला म्हणून महिलांची दु:खे मांडण्याचे ठरविले. मुलीचे जन्माबरोबर आलेले नकोशीपण, आकाली पडलेल्या जबाबदाऱ्या, करपलेले बालपण, विवाहपेक्षी संसार, व्यक्तिमत्व विकासाला नगन्य वाव, अभिव्यक्तीवरील निर्बंध, परावलंबीत्व, शिक्षणासंबंधी अनास्था, कुपोषण, निवडीचे स्वातंत्र नसलेले लग्न, सर्वाधिक बोजा टाकणारी कामाची वाटणी, रोजगाराच्या मोबदल्यातील तफावत, पाण्यासाठी पायपीट, आजारपणातील हेळसांड, बाळंतपणातील आबाळ, उपासमार, मारहाण, निराधार होण्याची धास्ती, हत्या, हौस व चैनीचे नाव नाही, समाजातील असुरक्षितता, न्याय मिळविण्यासाठी येणाऱ्या अडचणी इत्यादि दु:खांचा समावेश यात करण्याचे ठरले.[१४] एकंदरीत शतकानुशतके स्त्रीया भोगत असलेल्या वेदनांना वाचा फोडण्याचा कार्यक्रम संघटनेच्या माध्यमातून निश्चित केला होता.

**दारू दुकाने बंद करण्याचा कार्यक्रम :—**

स्त्रीयांच्या दु:खाला कारणीभूत ठरलेली दारू दुकाने बंद करण्याचा कार्यक्रम १९८९ नांदेड व १९९३ अमरावती अधिवेशनातून घेण्यात आला. त्यानुसार ठिकठिकाणी दारूबंदीचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. ग्रामपंचायतीने ठराव करावा किंवा आमसभा घ्यावी, महिलांनी दारू दुकानांना कुलूप लावावे, त्यावर पुन्हा दुकान सुरू झाले तर दारू दुकानातील बाटल्या फोडण्याचा सत्याग्रह करावा.[१५] याला अनुसरून अनेक ठिकाणी दारू दुकाने बंद करण्यासाठी महिलांनी आंदोलने छेडली. एरव्ही घराबाहेर न पडणारी स्त्री दारू दुकांनांना कुलूप लावायला प्रसंगी दारूच्या बाटल्या फोडायला पुढे सरसावली. संघटनेच्या माध्यमातून स्त्रीयांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या आत्मविश्वासाचा तो एक उत्स्फुर्त आविष्कारच मानावा लागेल.

**महिलांच्या नावे जमीन करण्याचा कार्यक्रम / लक्ष्मी मुक्ती कार्यक्रम :—**

महात्मा गांधी यांच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑक्टोबर १९९० मध्ये शेतकरी संघटनेच्या वतीने लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यानुसार ज्या गावात शंभरावर शेतकरी आपल्या घरच्या लक्ष्मीच्या नावाने थोडीशी जमीन किंवा उत्पन्न करून देतील, त्या गावाने लक्ष्मी मुक्ती केली. एखाद्या गावात शंभर खातेदार नसले तर ८० टक्के शेतकऱ्यांनी असे केले त्यांना हा सन्मान मिळतो.[१६] या उपक्रमाद्वारे १९९१ पर्यंत १५०० पेक्षा जास्त गावांनी लाखाच्यावर स्त्रीयांची नावे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर लावली होती. अशा प्रकारे मालमत्तेपासून वंचीत असलेल्या आणि खऱ्या अर्थाने शेतीत घाम गाळणाऱ्या महिलांना न्याय देण्याचे काम संघटनेने केले.

**निष्कर्ष :—**

शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे हे उद्दीष्ट समोर ठेऊन शेतकरी संघटना कार्य करीत होती मात्र शेतकऱ्यांना मिळणारा योग्य भाव, खऱ्या अर्थाने शेतीत राबणाऱ्या, घाम गाळणाऱ्या महिलांपर्यंत पोहचत नव्हता, म्हणून महिलांचा समावेश शेतकरी संघटनेत करण्याचा प्रयत्न शरद जोशी यांनी केला. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनानंतर खऱ्या अर्थाने पहिल्यांदाच महिला शेतकरी आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावर आल्या, शेतकरी संघटनेचे हे फार मोठे यश होते. ग्रामीण भागातील महिलांचा स्वाभिमान जागृत करून त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याचे धैर्य निर्माण करण्याचे कार्य संघटनेच्या माध्यमातून झालेले दिसते. शेतकरी संघटनेने शेतकरी महिलांच्या प्रश्नासंदर्भात आवाज उठवण्याचे कार्य तर केलेच, याशिवाय महिला म्हणून त्यांच्यावर वर्षानुवर्ष होत असलेल्या अन्यायाविरूध्द त्यांना बोलते करण्याचे महत्वपूर्ण कार्य शेतकरी संघटनेने केल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची :–

१. शेतकरी संघटक महिला अधिवेशन, विशेषांक, अमरावती, पृ. १८–१९
२. डॉ. राजाभाऊ करपे, मराठवाडयातील शेतकरी चळवळ, चिन्मय प्रकाशन,पृ. ११५–११६
३. कित्ता, पृ. १६
४. शरद जोशी, चांदवडची शिदोरी – स्त्रीयांचा प्रश्न, जनशक्तीवाचक चळवळ, पृ. १४
५. कित्ता, पृ.१४
६. कित्ता, पृ. १९
७. डॉ.राजाभाऊ करपे, मराठवाडयातील शेतकरी चळवळ,चिन्मय प्रकाशन,पृ. ११८
८. साळुंखे श्रीकांत, महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ, बी रघुनाथ प्रकाशन, पृ.१०३
९. शरद जोशी, चांदवडची शिदोरी – स्त्रीयांचा प्रश्न, जनशक्तीवाचक चळवळ, पृ. ३७
१०. शेतकरी संघटक महिला अधिवेशन, विशेषांक, अमरावती, पृ. २५
११. शरद जोशी, चांदवडची शिदोरी – स्त्रीयांचा प्रश्न, जनशक्तीवाचक चळवळ, पृ.१५३
१२. कित्ता, पृ. ८३
१३. शेतकरी महिला आणि पंचायतराज, शेतकरी प्रकाशन आलिबाग, पृ. ५ व ६
१४. शेतकरी संघटक महिला अधिवेशन, विशेषांक, अमरावती, पृ. २५
१५. डॉ. राजाभाऊ करपे, मराठवाडयातील शेतकरी चळवळ, चिन्मय प्रकाशन,पृ. १२०
१६. कित्ता, पृ. १२१
१७. शरद जोशी, चांदवडची शिदोरी – स्त्रीयांचा प्रश्न, जनशक्तीवाचक चळवळ, पृ. ९५

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# धरणे, विकास आणि धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची समस्या

**प्रा. कृष्णा महादेव पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर
krishnapatil२०१५@gmail.com
मो. नं. ८६०५३६२७४८

विसाव्या शतकात 'धरणे बांधून विकास' (Dams for Development) साधण्याचे 'विकासाचे प्रतिमान' (Development Model) लोकप्रिय बनले. भांडवलशाही अमेरिका व साम्यवादी रशिया या दोन महासत्तांनी मोठी धरणे बांधून विकास साधल्याचा आदर्श जगासमोर होता. तसेच मोठी धरणे बांधून त्यावर बहुउद्देशीय प्रकल्प उभारल्याने पूराची समस्या सुटते, शेती, उद्योग व शहरांसाठी वीज व पाण्याची सोय होते, दुष्काळातून मुक्तता होते या धारणेतून धरणे बांधण्याचे धोरण जगभर स्वीकारण्यात आले. या धोरणातून विकासाची पायाभरणी झाली. मात्र या धरणांमुळे विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे केले गेले नाही. त्यामुळे विस्थापितांच्या पुनर्वसनाची समस्या निर्माण झाली. प्रस्तुत शोधनिबंधात विकासासाठी मोठी धरणे बांधण्याचे धोरण व त्यातून निर्माण झालेला धरणग्रस्तांचा प्रश्न यांचा प्रस्थापित विकासाच्या प्रारुपाच्या अनुषंगाने आढावा घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतानेही मोठी धरणे बांधण्याचे धोरण स्वीकारले. त्यातून जगातील सर्वाधिक धरणे बांधणाऱ्या देशांच्या यादीत भारत तिसरा क्रमांकाचा देश बनला. अमेरिका, चीननंतर भारतात ४२९१ धरणे आहेत.[१] भारतात सर्वाधिक १३९२ धरणे महाराष्ट्रात आहेत.[२] हे धोरण स्वीकारण्यामागे जागतिक प्रभावाबरोबर भारतातील अंतर्गत परिस्थितीही कारणीभूत होती. वसाहतवादी राजवटीमुळे आलेले मागासलेपण दूर करण्यासाठीही हे धोरण उपयुक्त ठरणार होते. अन्नधान्य स्वयंपूर्णता, औद्योगिकीकरण, बेरोजगारी निर्मुलनही आवश्यक होते. त्यालाही धरण बांधण्याचे धोरण अनुकूल होते.[३] एकूणच जागतिक पातळीवर प्रभावी असलेले विकासाचे प्रतिमान व भारतातील स्थानिक परिस्थिती यांची सांगड घालून स्वातंत्र्योत्तर काळात भारताने धरणे बांधून विकास साधण्याचे धोरण स्वीकारले.

धरणे बांधण्याच्या धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेला फायदा झाला. १९७० च्या दशकात भारतात 'हरितक्रांती' झाली, देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला. यात धरणातील पाण्याचा महत्वाचा वाटा होता. तसेच या धरणातून ४४५९४ मेगावॉट जलविद्युत निर्मिती (जगात ७ वा) केली जाते. ज्यातून शेती, उद्योग, घरगुती वापराची एकूण विजेच्या वापरापैकी १३.५ टक्के गरज भागवली जाते.[४] उद्योगांसाठीचे व कोटयावधी लोकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागवली गेली. एकूणच भारताच्या विकासात धरणांचा वाटा मोठा आहे. हे सत्यच आहे. मात्र या मोठया धरणांमुळे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाला. धरणामुळे जे लोक विस्थापित झाले. त्याचे काय झाले? नेमके किती लोक विस्थापित झाले? त्यापैकी किती लोकांचे पुनर्वसन झाले? याचे उत्तर शोधल्यास एक नवी वस्तुस्थिती समोर येते. जी विकासाच्या प्रारुपाचा पुनर्विचार करावयास भाग पाडते.

भारतातील धरणग्रस्तांच्या आकडेवारीचा विचार केल्यास त्यातून हा प्रश्न लक्षात येतो. भारतीय लोकप्रशासन संस्थेनी भारतातील ५४ मोठया धरणांच्या अभ्यासानंतर असा निष्कर्ष काढला की, प्रत्येक मोठया धरणामुळे सरासरी ४४१८२ लोक विस्थापित होतात.[५] भारतात ४२९१ धरणे आहेत, पैकी ५४ धरणांच्या अभ्यासावरुन अंदाज काढलेला आहे, इथे ५४ धरणे हा अंक लहान वाटत असला तरी हे निश्चितपणे सांगितले आहे की, प्रत्येक मोठया धरणामुळे सरासरी १०००० लोक विस्थापित झाले. ही सरासरी गृहित धरुन अंदाज काढल्यास भारतातील २९३३ धरणामुळे २९३३x१००००=२९३३०००० एवढे लोक विस्थापित झाले. हा अंदाज कदाचित अतिशयोक्तीही वाटू शकतो. पण

दस्तुरखुद्द जागतिक धरण आयोगाने म्हटले आहे की, भारतातील एक धरण सरासरी ३१४४० लोकांना विस्थापित करते.[६] म्हणजे भारतातील सर्व धरणांचा विचार केल्यास आणखी भयानक वास्तव समोर येईल.

भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे माजी सचिव एन.सी. सक्सेना यांनी एका अनौपचारिक भाषणात असे म्हटले कि, "गेल्या ५० वर्षातील विस्थापितांची संख्या ५० दशलक्ष (त्यापैकी मोठया धरणांमुळे ४० दशलक्ष) एवढी आहे." या सर्व आकडेवारीवरुन गोंधळ निर्माण होतो पण यातून दिशाभूल व्हावी असा उद्देश नाही. कारण सरकारकडेच आपण उभारलेल्या सर्व प्रकल्पातून किती लोक विस्थापित झाले याची कोणतीही आकडेवारी नाही. कारण असे मोजमाप करणारी व माहिती साठवून ठेवणारी कोणतीच यंत्रणा सरकारकडे अस्तित्वात नाही. याबद्दल बुकर पारितोषक विजेत्या सुप्रसिध्द लेखिका अरुंधती रॉय म्हणतात, " सरकारकडे इतर सर्व प्रकारची आकडेवारी आहे अगदी कोणत्या क्रिकेटपटूने कोणत्या ठिकाणी किती धावा काढल्या किती चौकार मारले, कोणते विक्रम केले, याची अद्यायावत आकडेवारी आहे. पण सरकारनेच उभारलेल्या प्रकल्पात किती लोक विस्थापित झाले त्यापैकी किती लोकांचे सरकारने कशा प्रकारे पुनर्वसन केले याबद्दल मात्र माहिती नाही. कदाचित ही आकडेवारी सरकारच्या विकासाच्या दाव्यांच्या आड येत असेल म्हणून ती जाणीवपूर्वक संग्रहित ठेवली नसेल."[८] याचा अर्थ सरकार या प्रश्नाबद्दल एकतर फारसे गंभीर नाही किंवा सरकार आपली अडचण वाढू नये म्हणून अशी आकडेवारी संग्रहित करुन ठेवत नाही.

हा विस्थापितांच्या आकडेवारीबद्दलचा घोळ मिटतो न मिटतो तोच आपण जर 'सरकारने किती लोकांचे पुनर्वसन केले?' हा दुसरा प्रश्न उपस्थित केला तर आणखी एक नवा गोंधळ सुरु होतो. किती लोक विस्थापित झाली याचीच जर आकडेवारी नीट नाही, तर किती लोकांचे पुनर्वसन झाले याची आकडेवारी नीट कशी उपलब्ध होणार, पुनर्वसनाबद्दल जी काही माहिती मिळते ती हा प्रश्न किती गंभीर स्वरुपाचा आहे यावा आणखी प्रकाश टाकते.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने १९९५ साली एक अहवाल प्रसिध्द केला त्यात विविध प्रकल्पातून किती लोक विस्थापित झाले, त्यापैकी किती लोकांचे पुनर्वसन झाले आणि पुनर्वसनाचा किती अनुशेष शिल्लक आहे याबद्दल पुढीलप्रमाणे आकडेवारी दिली आहे. ही सरकारकडून उपलब्ध झालेली आकडेवारी आहे त्यामुळे तिला महत्व आहे.

**तक्ता क्र. १ विकास प्रकल्प, विस्थापत व पुनर्वसन (१९९५)**

| अ. नं. | प्रकल्पाचा प्रकार | विस्थापित संख्या | पुनर्वसन संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १. | कोळसा व इतर खाणी | १७०००००० | ४५०००० | १२५०००० |
| २. | धरणे व कालवे | ११०००००० | २७५०००० | ८२५०००० |
| ३. | कारखाने | १०१०००० | ३००००० | ७००००० |
| ४. | अभयारण्ये व पार्कल | ६००००० | १५०००० | ४५०००० |
| ५. | इतर | १२००००० | ३००००० | ९००००० |
| ६. | एकूण | १६५०००००० | ३९५०००० | ११५००००० |

(संदर्भः Fernandes, Walter and Enakshi Ganguly Thukral (eds) 'Development, Displacelment and Rehabilitation, see also dams, displacement, policy and law in india the experience)

या अहवालातील आकडेवारीनुसार १९५० ते १९८९ सालापर्यंत विविध प्रकल्पातून १६.५ लाख लोक विस्थापित झाले. त्यापैकी फक्त ३.९५ लाख लोकांचे पुनर्वसन झाले तर ११.५ लाख लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. या आकडेवारीचे दुसरे महत्वाचे वैशिष्टे म्हणजे एकूण विस्थापितांमध्ये सर्वाधिक असे १ कोटी १० लाख लोक धरण व कालवे यातून विस्थापित झाले आहेत. ज्यापैकी फक्त २७ लाख ५० हजार लोकांचेच पुनर्वसन झाले जे २५ टक्के च्या आसपास आहे. म्हणजे धरणग्रस्त विस्थापितांच्या पुनर्वसनाचा अनुशेषही ८२ लाख ५० हजार इतका आहे, जो वरील

ISSN : 2348-7143
December-2018

सर्व प्रकारच्या आकडेवारीत सर्वाधिक आहे. या तक्त्यावरुन दोन प्रमुख बाबी समोर येतात, एक म्हणजे कोणत्याही सरकारी प्रकल्पातून विस्थापित झालेल्या लोकांचे योग्य असे पुनर्वसन केलेले नाही. दुसरी बाब म्हणजे विस्थापितांमध्येही धरणग्रस्त विस्थापितांच्या पुनर्वसनाचा अनुशेष सर्वाधिक आहे ही एक ही गंभीर बाब आहे.

यासारखेच दुसरे एक उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील १९९२ सालची आकडेवारी पाहता येईल जी एका अभ्यासानुसार पुढे आली आहे.

**तक्ता क्र. २ धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतची महाराष्ट्रातील आकडेवारी (१९९२)**

| | | |
|---|---|---|
| १. | अमरावती, नागपूर, औरंगाबाद, पुणे, महसुल विभागातील मोठे व मध्यम प्रकल्प | १८९ |
| २. | एकूण बुडीत क्षेत्र | १लाख ७८ हजार हेक्टर्स |
| ३. | एकूण विस्तापित कुटुंबे | १ लाख ९ हजार |
| ४. | जमिनी देऊन पुनर्वसन झालेली कुटुंबे | २५८८५ (२३%) |
| ५. | पुणे महसूल विभागातील पुनर्वसन झालेली कुटुंबे | ४४% |

(संदर्भ : म्हमाणे अनिल व गोटल संतोष (संपा.), मानवमुक्तीसाठी समग्र भारत पाटणकर भाग १, २०१२, कोल्हापूर पा.न.८७०)

वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते की, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, पुणे अशा चार महसूल विभागात १९९२ सालापर्यत १८९ मोठे प्रकल्प होते, ज्यातून १ लाख ९ हजार कुटुंबे विस्थापित झाली पैकी २५८८५ कुटुंबाचे जमीन देऊन पुनर्वसन केले गेले जे एकूण विस्थापितांच्या २३ टक्के आहे. फक्त पुणे महसूल विभागात महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे ४४ टक्के कुटुंबाचे पुनर्वसन झाले आहे, याचा अर्थ महाराष्ट्रातील चार महसूल विभागातील पुनर्वसनाचा ७७टक्के अनुशेष व एकटया पश्चिम महाराष्ट्राचा ५६टक्के अनुशेष १९९२ साली बाकी होता.

महाराष्ट्रातील कोयनेच्या धरणग्रस्त विस्थापितांचे उदाहरण ही वरील चर्चेच्या पुष्टीसाठी घेता येईल. १९६३ साली हा प्रकल्प पूर्ण झाला. या प्रकल्पाला 'महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी' असे म्हणतात. या प्रकल्पातील ८००० खातेधारकापैकी निम्म्याच लोकांचेही कसेबसे पुनर्वसन १९८९ सालापर्यत सरकारने केले होते. क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, डॉ. भारत पाटणकर यांच्या प्रयत्नांनी आज ६५०० खातेधारकांचे पुनर्वसन झाले. धरण बांधून आज ६२ झ ाली, तरीही १५०० खातेधारकांचे पुनर्वसन अजून बाकी आहे.[१] जर स्वतःला प्रगत व पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रातही अवस्था असे तर इतर राज्यात तर अवस्था याहूनही वाईट असेल.

एकूणच मोठया धरणामुळे विस्तापितांच्या पुनर्वसनाची समस्या निर्माण झाली. ही समस्या सोडवण्यात शासन संस्थांना अपयश आले. याशिवाय मोठया धरणामुळे पर्यावरणाचे आतोनात नुकसान होते. यातूनच १९८० च्या दशकात जगभर 'धरणविरोधी' (Antidam) चळवळ सुरु झाली. या चळवळीनी मोठया धरणांना विरोध केला. मोठया धरणाआधारीत असलेल्या विकासाच्या प्रतिमानातील फोलपणा उघड केला. पर्यायी विकासाचे प्रतिमान शोधण्याची गरज प्रतिपादीत केली. याला अनुसरुनच नर्मदा बचाव अंदोलन हे धरण विरोधी आंदोलन सुरु झाले. तर महाराष्ट्रात उचंगी धरणग्रस्तांचे धरणाला पर्याय देणारे कमीत कमी विस्तापण व कमीत कमी सुपिक जमिनीचे नुकसान असा पर्याय देणारे आंदोलन सुरु झाले.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने जे विकासाचे प्रतिमान स्वीकारले त्यात धरणे बांधण्याला महत्वाचे स्थान होते. या धरणांनी देशाचा सर्वागीण साधण्यात महत्वाची भूमिका बजावली. मात्र या धोरणामुळे 'विस्थापितांच्या पुनर्वसना'ची समस्या निर्माण झाली. ही समस्या किती गंभीर आहे हे विस्थापनाची व पुनर्वसनाची आकडेवारी अभ्यासली तर सहज लक्षात येते. एकूणच, धरणग्रस्त विस्थापितांच्या पुनर्वसनाचा अनुशेष ही एक गंभीर समस्या बनली आहे. ती

सोडवण्यासाठी सरकारकडे कोणताही ठोस योजना नाही. एकंदर या धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या अनुशेषाच्या प्रश्नामुळे शासनाच्या विकासाच्या प्रारुपावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. यातून पर्यायी व शाश्वत विकासाचे प्रारुप शोधण्याची व ते स्वीकारण्याची गरज अधोरेखित झाले.

**संदर्भ :**


**1.** www.wikipedia.com
**२.** धरण सुरक्षितता संघटना, नाशिक
**३.** चंद्रा बिपीन, इंडिया सीन्स इंडिपेडन्स, के सागर प्रकाशन, पुणे, २००८, पृ.क्र.२२६
**4.** htpp://www.cea.nic.in/monthlyreport/Executive summary of power sector, April 2017 Retrieved 25 May 2017, p.n4
**5.** Fernandes, Walter and Enakshi Ganguly Thukral (eds.) Development, Displacelment and Rehabilitation, se also dams, displacement, policy and law in india the experience, plaaningcommission.nic.in/reports/articles/ ncsxna/art_dam.pdf
**6.** www.dams.org
**7.** dams, displacement, policy and law in india the experience, plaanning commission.nic.in/reports/articles/ncsxna/art_pdf
**८.** रॉय अरुंधती, बहुजन हिताय, मेहता प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.क्र.२३
**९.** डॉ. भारत पाटणकर यांची १०.११.२०१३ रोजी घेतलेली मुलाखत.

# शेतकरी चळवळ व शेतकरी संघटना

**डॉ. मधुकर रामचंद्र साठे,**
इतिहास विभाग,
छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासूर स्टेशन, ता.गंगापूर जि. औरंगाबाद
Email id :- madhukarsathe@rediffmail.com

**प्रास्ताविक :-**

शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हटले जाते आणि म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी अनेक समाजसुधारकांनी आपले विचार मांडले व शेतीविषयक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचे कार्य केले. महात्मा फुले यांनी आपल्या शेतकऱ्यांचे असूड या ग्रंथात शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे कार्य केले. १९०३ ते १९०६ या काळात ना. गोखल्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात शेतकऱ्याचे प्रश्न व त्यातील उपायोजनांबाबत विचार मांडले. १९१८ मध्ये पुणे येथील शेतकरी परिषदेत महर्षी आण्णासाहेब शिंदे यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी यासाठी त्यांना संघटीत करण्याचे कार्य केले. थोडक्यात शेतीविषयक प्रश्न शेतकरी व शेतमजूरांचे प्रश्न त्यांची सोडवणूक आणि त्यांचे संघटन करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्ययपूर्व काळापासून झालेले आहेत. परंतू शेतकऱ्याचे संघटन करुन शेतकरी चळवळ म्हणून आपले अस्तित्व या काळात निर्माण होवू शकले नाही.

१९४० ते १९७५ या काळात शेतकरी कामगार पक्षाने काही प्रमाणात तसा प्रश्न केला होता. परंतू राजकारणाच्या कक्षेत राहूनच या पक्षाने हे कार्य केलेले दिसते त्यामुळे त्यास शेतकरी चळवळ असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रात १९८० च्या दरम्यान शेतकऱ्यांची संघटना स्थापन होऊन शेतकरी चळवळीला खऱ्या अर्थाने दिशा मिळालेली दिसते.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-**

१. शेतकरी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी तपासणे.
२. शेतकरी संघटना निर्माण होण्यास कारणीभूत ठरलेल्या कारणांचा आढावा घेणे.
३. शेतकरी चळवळीमधील शरद जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निभावलेली भूमिका अभ्यासणे.
४. शेतकरी संघटनेच्या राजकारणातील भूमिकेचा मागोवा घेणे.

**गृहीतके :-**

१. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी स्विकारलेल्या धोरणामुळे शेतकरी संघटना उदयाला आली.
२. १९८० च्या दशकात प्रामुख्याने शेतकरी चळवळीला धार देण्याचे काम शरद जोशी यांनी केले.
३. शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनामुळे सरकारने शेतकऱ्याला अनुकूल अशी अनेक धोरणे राबवली आहेत.
४. आज शेतकरी संघटनेचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे राजकारणाशी संबंध येत आहे.

**शेतकरी चळवळीची पार्श्वभूमी :-**

१९८० पूर्वी महाराष्ट्रात काही भागात शेतकऱ्यांवरील अन्यायाविरुध्द काही प्रमाणात उठाव व आंदोलने झाली होती. सावकारांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण आणि शेती-व्यवसायाचे व्यापारीकरण या विरुध्द १८७५ साली पुणे व नगर भागातील काही खेड्यामध्ये मर्यादित स्वरुपाचे आंदोलन घडले. या आंदोलनात तेथील एक

ISSN : 2348-7143
December-2018

हजार शेतकऱ्यांना अटक करण्यात आली होती. पुण्याच्या सार्वजनिक सभेने या उठावावर नेमलेल्या डेक्कन रॉयटस् कमिशन ला निवेदन सादर करुन या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी १९२०-२१ च्या दरम्यान धरणग्रस्त, जंगलग्रस्त जमिनी सावकारी, वेठबेगारी इत्यादी प्रश्नांवर वारली जमातीत जन आंदोलने घडवून आणली होती. १९४७ नंतर कुळकायदा, शेतकरी कर्जनिवारण कायदा, सावकारी-नियंत्रण कायदा, कुळाला काढून टाकण्याचा जमिनदाराचा हक्क मर्यादित करणे, जमिनीच्या खरेदी विक्रीवर निर्बंध घालणे आणि आर्थिक पिळवणूकीपासून त्यांचे रक्षण करणे इत्यादी उद्देशाने निर्माण केलेले कायदे मात्र कागदावरच राहिले. पुण्याच्या गोखले इन्स्टीट्युटने महाराष्ट्रातील कुळ कायद्याच्या अंमलबजावणीबद्दलची पहाणी करुन तसा अहवाल प्रसिध्द केला होता. खेड्यातील आर्थिक जीवनावर व्यापारी, जमिनदार, सावकार याची दृढ पक्कड निर्माण झालेली असून या वरिष्ठ वर्गाशी नेटाने झगडू शकेल अशी जोरदार संघटना खेड्यात अस्तित्वात आल्याखेरीज शेतकऱ्याची ही पिळवणूक थांबणे शक्य नाही. यातूनच पुढे शेतकरी संघटीत होण्यास चालना मिळाली व शेतकरी चळवळ उभी राहण्यास प्रेरणा मिळाली. परंतू त्यासही १९८० साल उजडावे लागले.

**शेतकरी आंदोलन व चळवळ :-**

१९७३ पासून देशातील कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, मध्यप्रदेश, पंजाब इत्यादी विविध राज्यात शेतकऱ्यांची आंदोलने प्रभावीपणे चालू होती. महाराष्ट्रात १९७८-१९७९ च्या दरम्यान श्री.शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलनास सुरुवात झाली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व रास्त भाव मिळावा यासाठी ही प्रथम आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात माधवराव बोरास्ते, प्रल्हाद पाटील, बोरावके, म्हात्रे, मोरे इत्यादी मंडळींनी पुढाकाराने भाग घेतला होता.

शेतकरी संघटनेत राजकीय सत्तेशी संघर्ष करुन आपल्या मागण्या मंजूर करुन घेऊ हा दृष्टीकोन कै.माधवराव बोरास्ते यांचे अनुयायी माधवराव मोरे, रामचंद्र पाटील या गटाने अवलंबिला व राजकारणाशी संबंध ठेवून संघटनेने आपले आंदोलनाचे कार्य चालू ठेवावे असा आग्रह धरला तर सत्तेच्या राजकारणापासून दूर राहून कार्य करणे आणि वैचारिक जागृती, संघटनात्मक आंदोलन व चळवळ या गोष्टींना महत्व अलीबागच्या दुसऱ्या गटाने दिल्याचे दिसते व सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतलेला दिसून येतो.

महाराष्ट्रात १९७५ ते १९८३ हा शेतकरी आंदोलनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. शरद जोशी यांनी दोन्ही गटाची मते विचारात घेऊन शेतकरी संघटनेची भूमिका संदिग्ध ठेवावी. राजकारण व राजकीय प्रवाहापासून दूर न राहता, त्याच्याशी संबंधीत राहिल्यासच आपणास दबाव गटाची भूमिका पार पाडता येईल असे शरद जोशींचे धोरण टुटप्पी बनले त्यामुळे शेतकरी संघटनेच्या कार्यात शुध्द चळवळ व राजकारण अशी दुहेरी भूमिका निर्माण होऊन चळवळच संभ्रमात पडल्याचे दिसते. अर्थात राजकारणाला शेतकरी संघटनेचा उपयोग वा फायदा होईल याच भावनेने अनेक राजकीय पक्षांनी व त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी आंदोलनास वेळोवेळी पाठिंबा दिल्याचे महाराष्ट्राच्या राजकारणात दिसून येते.

शेतकरी आंदोलनात शरद जोशी यांनी आपल्या नेतृत्वाखाली कांदा, ऊस, तंबाखू, दुध या संदर्भात जोरदार आंदोलने केली व शासनावर विशेष प्रभाव पाडला आणि शेतकरी संघटना दबाव गटाची भूमिका पार पाडण्यात यशस्वी ठरली. या आंदोलनात कांदा आंदोलन, ऊस आंदोलन व तंबाखू आंदोलनाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. परंतू दुध आंदोलनात मात्र संघटनेला माघार घ्यावी लागली. दुध आंदोलनाचा फटका बसल्यानंतरच शेतकरी संघटनेने आपल्या संघटनात्मक बांधणीकडे लक्ष वळविले. निश्चित ध्येये व उद्दिष्ट्ये, विशिष्ट कार्यपध्दती, चळवळ व परिवर्तनाची दिशा या अभावी संघटन होऊ शकत नाही याची जाणीव त्यांना झाली आणि खऱ्या अर्थाने संघटनात्मक बांधणीत १९८३ च्या मनमाडच्या अधिवेशनापासून सुरुवात झालेली आहे.

**शेतकरी संघटना व राजकारण :-**

प्रारंभी महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने राजकारणापासून अलिप्त राहून सत्ताधारी राजकारणी, श्रीमंत, बागायतदार शेतकरी यांच्यावर वारेमाप टिका केली, परंतू सत्ताधारी व राजकारणी यांच्या बाबत तिरस्काराने आपणास काहीही साधता येणार नाही व ते संघटनेच्या हिताचे ठरणार नाही हे ओळखून या संघटनेने शासनावर विविध मार्गानी आंदोलन करुन व प्रभाव पाडून आपल्या मागण्या मंजूर करुन घेण्याचे धोरण स्विकारले. त्यामुळे शेतकरी संघटनेला दबाव गटाचे स्वरुप प्राप्त झाले.

१९८३ च्या मनमाड अधिवेशनानंतर स्थानिक परिस्थिती आणि राजकारण पाहून सत्तेच्या राजकारणात सोयीनुसार सहभागी व्हावे अशी भूमिका शेतकरी संघटनेने घेतली आणि काही सखर कारखान्याच्या निवडणूकीत आपल पॅनेल्सही विजयी केली. पुढे शरद पवारांच्या पुलोद आघाडीस जाहीर पाठिंबा देऊन या संघटनेने उघडपणे राजकीय भूमिका घेण्यास सुरुवात केली. १९८४-८५ च्या विधानसभा निवडणूकीत भाग घेतला. अशाप्रकारे राजकारणाशिवाय संघटनेस प्रभावीपणे आपल्या प्रश्नांची सोडवणूक व हिताची जोपासना करता येणार नाही म्हणून राजकारणात सत्तास्पर्धा करुन आपले प्रतिनिधी पाठविण्याचा निर्धार केलेला दिसून येतो.

शेतकरी संघटनेने निर्माण केलेले शेतकऱ्यांचे प्रश्न आज सर्वच राजकीय पक्षानी सोडविण्याचे धोरण अवलंबिले असल्यामुळे राजकीय पक्षांच्या सत्तास्पर्धेत शेतकरी संघटनेचा टिकाव धरु शकेल असे वाटत नाही कारण महाराष्ट्रातील संपूर्ण शेतकरी वर्ग या शेतकरी संघटनेत सामील झालेला नाही. ते विविध राजकीय पक्षात कार्यकर्ते व सभासद म्हणून समाविष्ट झालेले आहेत. त्यामुळे शेतकरी संघटनेत सर्व थरातून भरघोस पाठिंबा मिळत नाही तसेच राजकारणाच्या पाठीमागे लागलेली ही संघटना शेतकऱ्यांचे हितसंबंध जोपासू शकेल काय? या बाबतीत शेतकरी वर्गात संभ्रम निर्माण झालेला आहे. सहकार क्षेत्रातील बहुतांशी साखर कारखान्यावर श्रीमंत, बागायतदार, व्यापारी, भांडवलदारांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने त्यांची शुगर लॉबी तयार झालेली आहे तिचा प्रभाव सार्वत्रिक निवडणूकांवर पडलेला दिसतो.

**मूल्यमापन/निष्कर्ष :-**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर करुन घेण्यासाठी, शेतीमालाला योग्य व रास्त भाव मिळवून देण्यासाठी, शेतकरी संघटना हा कधी एक प्रभावी दबाव गट तर प्रभावी मंडळ म्हणूनही कार्य करीत असल्याचे अनुभवास येते. या संघटनेच्या विचारसरणीचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. आर्थिक भूमिका :-**

ग्रामीण भागाचा विकास घडवून आणला असता देशाचा आर्थिक विकास होईल अशी भूमिका या संघटनेने स्विकारली होती. कारण शेतीतून निर्माण होणारा कच्चा माल हाच औद्योगिक उत्पन्नाचा पाया आहे असा निष्कर्ष यातून निघतो.

**२. गुढवादी तत्वप्रणाली :-**

शेतीमालाला योग्य भाव मिळाला तर ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्रश्न सुटतील, दारिद्रय नष्ट होईल अशा घोषणा केल्यामुळे शेतकरी आकर्षित होईल व जनतेचा भरघोष पाठिंबा संघटनेला मिळेल. हे तत्वज्ञान अणि व्यवहार यात बरीच तफावत आहे.

**३. विविध मतप्रवाहाशी सुसंगत भूमिका :-**

शरद जोशींच्या नेतृत्वाखाली या संघटनेने आपले विचार मार्क्सवाद, गांधीवाद, माओवाद यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे.

**४. ठराविक व मर्यादित प्रभावक्षेत्र** :-

या संघटनेने केलेल्या आंदोलनात कांदा, ऊस, तंबाखू अशी प्रभावी क्षेत्रेच निवडली आहेत. पण कापूस उत्पादन दुग्ध व्यवसाय, शेतमजुरांची मजुरी तसेच दुष्काळ यावर कोणतीही भूमिका व आंदोलने केलेले नाही. त्यामुळे अल्पभुधारक शेतकरी व शेतमजुरांचा पाठिंबा ही चळवळ मिळवू शकली नाही असे म्हणता येईल.

**संदर्भः-**

1. बंग के.आर. :- महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक पब्लिशअर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
2. नाईकवाडे अशोक, नलावडे पंडित :- महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
3. पुरोगामी सत्यशोधक, पुणे.
4. लोकराज्य, महाराष्ट्र शासन, मुंबई.
5. दैनिक, महाराष्ट्र टाईम्स, दिनांक 02/09/2016.

ISSN : 2348-7143
December-2018

# सोलापूर जिल्हयातील शेतकरी चळवळी -आंदोलने

**संशोधक विद्यार्थी,**
**महेश तानाजी घाडगे,**
इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मुंबई प्रांतात ब्रिटिशांनी रयतवारी जमीन महसूल पध्दत, शेतसारा रोख स्वरुपात भरणे बंधनकारक, वारंवार पडणारे दुष्काळ, शेतक-यांच्या अज्ञाणाचा आणि ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यांचा सावकारांनी घेतलेला फायदा या सर्वांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी अडचणीत सापडला होता. इ.स. सप्टेंबर १९७५ साली सावकार व सरकारविरुद्व पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील शेतक-यांनी स्वयंस्फुतीने उठाव केला. सावकारांच्या घरावर हल्ले करुन शेतक-यांनी आपली शेतीवाडी, जमीन जुमल्याची गहाणखते, कागदपत्रे काढून सार्वजनिक ठिकाणी जाळायची परंतु माणसांना इजा करायची नाही असे या उठावाचे स्वरुप होते.[१] या आंदोलाची दखल ब्रिटिश शासनाने घेऊन इ.स. १८७९ साली डेक्का अॅग्रीकल्चरिस्ट रिलिफ अॅक्ट पास केला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात विविध वर्तमानपत्र शेतक-यांच्या प्रश्नांची दखल घेऊ लागले. शेती प्रश्नावर लेखन होऊ लागले. महात्मा जोतीराव फुले यांनी 'शेतक-यांचा आसूड' या ग्रंथाद्वारे शेतक-यांची चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतक-यांचे शोषण थांबविण्यासाठी परिषदेच्या निमित्ताने शेतक-यांना संघटित केले. इ.स. १९२० सालानंतर विविध राज्यात संघटित शेतकरी चळवळींना प्रारंभ झाला, विविध राजकीय पक्ष शेतक-यांचे प्रश्न पडू लागले. भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या अधिवेशनात शेतीसंबंधी प्रश्नांची दखल घेतली जाऊ लागली. फैजपूर येथील अधिवेशनावर शेतीप्रश्नांचा विशेष प्रभाव होता.

शंकरराव मोरे, केशवराव जेधे, क्रांतीसिंह नाना पाटील, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, उध्दवराव पाटील इ. कॉग्रेसमधील नेते बाहेर पडून इ.स. ऑगष्ट १९४७ साली 'शेतकरी कामगार पक्ष' स्थापन केला.[२] पक्षाचे पहिले अधिवेशन ४, ५ सप्टेंबर १९४८ रोजी सोलापूर येथे भरले. यावेळी शंकरराव मोरे यांनी पक्ष स्थापनेचे प्रयोजन स्पष्ट केले. सोलापूर जिल्हयात शेतकरी कामगार पक्षाचे कार्य प्रामुख्याने तुळशीदास जाधव, गणपतराव देशमुख, एस.एम.पाटील, चंद्रकांत निंबाळकर, उध्दवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली लेव्ही पध्दत, धान्य नियंत्रण, कुळांना संरक्षण, कसेल त्याची जमीन, दुष्काळात काम, चारा उपलब्धता इ. शेतीविषयक विविध मागण्यांसाठी निदर्शने, मोर्चे, आंदोलने केली [३]

**वैराग गोळीबाराची पार्श्वभूमी :**

शेतक-यांच्या विविध प्रश्नासंबंधी शेतकरी संघटना, राजकीय पक्षांनी वेळोवेळी आंदोलने केली. यातील काही आंदोलने तत्कालीन शासनाने आपल्या पोलिस अधिकाराचा गैरवापर करुन मोडून काढली. यामध्ये वैराग, नागपूर, इस्लामपूर, मावळ इ. आंदोलनाचा समावेश होतो. महाराष्ट्रात इ.स. १९७०-१९७१ साली सतत दोन वर्षे दुष्काळी परिस्थिती होती. सोलापूर जिल्हा वर्षानुवर्षे दुष्काळी असल्याने जिल्हयातील परिस्थिती अतिशय वाईट होती. पाऊस नसल्याने पेरण्या झाल्या नाहीत.[४]

अवर्षणाने असलेली पिकेही करपून गेली. परिणामी कडब्याच्या किंमती तिप्पट वाढल्या होत्या. नदी, नाले, ओढे, विहिरी सर्व आटले होते. शेतक-यांना काम नव्हते, बलुतेदारी व्यवस्था कोलमडली होती. सरकारने देऊ केलेल्या तगाईचा लाभ अत्यल्प शेतक-यांना मिळत होता. चा-याअभावी शेतकरी नाईलाजास्तव आपली जनावरे कसायास विकत होती.[५]

ISSN : 2348-7143
December-2018

इ.स. १९७१ सालचा जुलै महिना संपत आला तरी पाऊस पडला नाही. अशा परिस्थितीत सरकारने कामे काढून लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवावा यासाठी इ.स. २७ जुलै १९७१ साली वैराग, बार्शी परिसरातील सात-आठ हजार लोकांनी बार्शी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी संबंधित अधिका-यांनी दोन तीन दिवसात कामे काढू असे सरकारतर्फे आश्वासन दिल्याने मोर्चा शांततेत पार पडला. यानंतर सरकारने रस्ते, बंडिंग, तलाव अशी कामे काढली मात्र ती मजुरांच्या तुलनेत अपुरी होती. लोक स्थलांतर करीत होते. अर्धपोटी राहत होते. रेशनचे मिळणारे धान्यही अपुरे होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाची वैराग येथे जिल्हा बैठक झाली. या बैठकीमध्ये वैराग येथे इ.स. ६ सप्टेंबर १९७१ रोजी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. मोर्चा वैराग येथील धान्य गोदामावर नेऊन तेथे कलेक्टरांना हजर राहण्याची विनंती करुन त्यांच्याकडून कामाचे आश्वासन घ्यायचे असा कार्यक्रम बैठकीत ठरला. [६]

**वैराग मार्चा :**

इ.स. ६ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजता वैराग, बार्शी परिसरातील इर्ले, ढोराळे, तडवळे, राळे, मर्जापूर, पाणगाव, मानेगाव, धामणगाव, हिंगणे, दहिटणे आदि गावातील शेतमजूर, शेतकरी मोर्चात सहभागी झाले, मोर्चात पाच हजार पुरुष व एक हजार स्त्रियांचा सहभाग होता. [७] या मोर्चाचे नेतृत्व चंद्रकांत निंबाळकर, सुभाष पाटील, नरसिंह तात्या देशमुख, सर्जेराव सगर, विश्वासराव फाटे इ. करीत होते. मोर्चा वैराग गावातील प्रमुख रस्त्यावरुन फिरुन गावाबाहेरील एस.टी. स्टँड व सरकारी धान्य गोदामाजवळील मैदानात दोन वाजता जमला. येथे मोर्चासमोर नेतृत्व करणा-या नेत्यांची भाषणे झाली. पोलिसांनी १४४ कलम जारी करुन धान्य गोदामाच्या भोवती २०० यार्ड आत येण्यास मनाई हुकूम जारी केला. त्यामुळे बंदी रेषेबाहेर उभे राहून मोर्चावाले घोषणा देत होते. तालुका मॅजिस्ट्रेट बेडके यांनी नेत्यांशी बोलणी केली मात्र दुष्काळी कामासंबंधी अधिकार जिल्हा कलेक्टर यांना असल्याने त्यांनाच आश्वासन देऊ द्या अशी मागणी केली. मोर्चा शांतपणे कलेक्टरांची वाट पाहत बसून होता. पाच वाजले असल्याने महिलांना घरी पाठवून पुरुषांनी कलेक्टरची वाट पाहत थांबण्याचा निर्णय घेतला. ॲडीशनल डी.एस.पी. डेमला याने गोळीबाराचे संकेत न पाळता अश्रुधूर व गोळीबार केला. [८] मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत दिलेल्या माहितीनुसार पोलीसांनी गोळीबारात ७१ फैरी झाडल्या. यामध्ये पाच लोक ठार, ५४ जखमी तर ४७ पोलीस जखमी आणि ३६ लोकांना अटक करण्यात आली. मात्र गोळीबारात प्रत्यक्षात आठ लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये एकनाथ जोती साळुंखे (वैराग), इब्राहिम चाँदसो शेख (वैराग), सुंदराबाई लक्ष्मण चव्हाण (वैराग), बब्रुवान तुळशीराम माळी (मानेगाव), भास्कर बाबुराव वाळके (मानेगाव), रघुनाथ श्रीपती माने (रातजन), उध्दव श्रीपती गौफण (हळुदगे), चतुर्भूज विठ्ठल ताकभाते (श्रीमंत पिंपरी) यांचा समावेश होता.

घटनास्थळी सुभाष पाटील, उध्दव पाटील इ. नेत्यांना घटनास्थळी तर चंद्रकांत निंबाळकर, विश्वास फाटे, निसार शेख, गजानन जोशी, ज्ञानेश्वर पाटील इ. नेत्यांना काही काळानंतर अटक केली. एकूण ३५ कार्यकर्त्यांना इ.पि.को. १२०, ३९५, १४७ कलमान्वये गुन्हे नोंद करुन अटक केली. भगवंतराव निंबाळकरांच्या मतानुसार पोलिसांनी गोळीबारानंतर लोकांना दोन-तीन मैलापर्यत मोटारीतून पाठलाग करुन लाठीचार्ज केला. लोक मानेगाव इर्ले रस्त्यावरुन आपआपल्या घरी जात असताना मागून गोळीबार केला. [९]

**घटनेचे पडसाद :-**

७ सप्टेंबर रोजी सायंकाळी परवानगी काढून सभा घेण्यात आली. सभेत गोळीबाराचा निषेध करण्यात आला व न्यायालयीन चौकशीची मागणी करण्यात आली. गोळीबाराच्या निषेधार्थ ८ सप्टेंबर रोजी बार्शी, १४ सप्टेंबर रोजी उस्मानाबाद, १५ सप्टेंबर रोजी पंढरपूर, टेंभुर्णी, सांगली बंद व निषेध मोर्चा काढण्यात आले, वैराग गोळीबाराची चौकशीसाठी उपविभागीय दंडाधिकारी द.तु.जोखेकर यांची नियुक्ती करण्यात आली. लगेच जोखेकर ऐवजी निवासी उपजिल्हाधिकारी टी.जी.काकडे यांची नेमणूक करण्यात आली. पुन्हा १५ सप्टेंबर रोजी काकडे ऐवजी कलेक्टर

ISSN : 2348-7143
December-2018

के.एन.होले यांची नेमणूक करण्यात आली. अशाप्रकारे चौकशीसाठी वेगवेगळया अधिका-यांची नेमणूक केली गेली. नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षांनी न्यायालयीन चौकशी व दोषींवर कारवाईची मागणी केली. यासाठी विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहाचे कामकाज बंद पाडले, मुख्यमंत्री कार्यालयासमोर धरणे धरण्यात आले. खासदार धोरे यांनी १४ दिवस उपोषण केले. दै.सोलापर समाचार, दै.संचार इत्यादी वर्तमानपत्रांनी विषय लावून धरला. शासकीय चौकशी पध्दतीने वैराग प्रकरणातील सत्य उजेडात येणार नाही असे वाटत असल्याने विरोधी पक्ष न्यायालयीन चौकशीसाठी अडून बसले होते. अखेर मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी इ.स. २१ सप्टेंबर रोजी विधानसभेत चौकशीची घोषणा केली. निकोप चौकशीसाठी सेवानिवृत्त हायकोर्ट जज्ज यांची नेमणूक करण्याऐवजी शासकीय सेवेत असणा-या डिस्ट्रीक्ट जज्जची नेमणूक केली. बार्शी येथे चौकशी झाली. डिस्ट्रीक्ट जज्जने चौकशीअंती वैराग येथे पोलिसांनी केलेला गोळीबार समर्थनीय होता असा निर्णय दिला.

**घटनेचे परिणाम :**

वैराग गोळीबाराच्या परिणामी पुढील वर्षी १९७२ साली दुष्काळामुळे परिस्थिती अत्यंत बिकट झाली तरी पोलिसांची दहशत लोकांवर राहिली. आंदोलने दडपून टाकण्यात शासन यशस्वी ठरले. शेतक-यांच्या मोर्चावर पोलिस गोळीबार हा जिल्हयातील पहिलाच प्रसंग होता. वैराग गोळीबारामुळे महाराष्ट्राला रोजगार हमी योजना लागू करण्यात आली. वैराग गोळीबारातील पिडीतांना आर्थीक मदत करण्यासाठी हुतात्मा निधी समिती स्थापन करण्यात आली. दै.सोलापूर समाचार, दै.संचार इ. वृत्तपत्रांनी घटनेसंबंधी बातम्या वेळोवेळी प्रसिध्द केल्याने, विरोधी पक्षाच्या दबावामुळे शासनास न्यायालयीन चौकशीची मागणी मान्य करावी लागली. ६ सप्टेंबरच्या गोळीबारात ८ हुतात्मे झाले. त्यांच्या चिरंतर स्मरणार्थ हुतात्मा स्मारक ६ सप्टेंबर २०१२ रोजी एन.डी.पाटील व माजी न्यायमुर्ती बी.एन. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उद्‌घाटन झाले.[१०]

**शेतकरी संघटना :**

महाराष्ट्रात प्रथमच जास्तीत जास्त शेतक-यांना शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने संघटीत केले. शेतक-यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळालाच पाहिजे या एककलमी कार्यक्रमाखाली शरद जोशी यांनी इ.स. १९७७-७८ सालापासून शेतक-यांचे संघटन करण्यास सुरुवात केली.[११] इ.स. १९७७-७८ साली कांद्याचे भाव वाढल्याने शासनाने कांदा निर्यात बंदी घातली. परिणामी सव्वा रुपये किलो असणारा कांद्याचा भाव क्विंटलला सतरा टक्के एवढा कमी झाला. यामध्ये शेतक-यांचा प्रचंड तोटा झाला. यावेळी शरद जोशींच्या शेतकरी संघटनेने कांदा भाववाढीसाठी आंदोलन केले. त्यानंतर इ.स. १९८० साली ऊस आंदोलन, इ.स. १९८१ साली तंबाखू उत्पादक शेतक-यांचे आंदोलन केले. इ.स. नोव्हेंबर १९८३ साली शरद जोशी यांनी पंढरपूर येथे शेतकरी मेळावा घेतला. यातून सोलापूर जिल्हयातील शेतकरी, शेतकरी संघटनेकडे आकृष्ट होऊ लागला. [१२] इ.स.१९८० ते १९९० पर्यत शेतकरी संघटना महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीपर्यत ओळखली जाऊ लागली.

शरद जोशींच्या मते शेतमालास भाव मिळत नाही यास शासनाच्या धोरणातील तीन प्रमुख गोष्टी कारणीभूत आहेत. १) तुट असेल तर लेव्ही आणि मुबलकता असेल तर लिलाव, २) शेतमालावर निर्यात बंदी, ३) पक्क्या मालाचे कारखाने काढले तरी त्यावर अशी बंधने घालायची की, शेतक-यांना फायदा होऊ नये.[१३] स्वातंत्र्योत्तर व्यवस्थेतील शेतक-यांच्या शोषणाची पाच तत्वे शरद जोशींनी मांडली. यात शेतमालास भाव न मिळू देणे, भाव नाही म्हणून शेतक-यांनी चिडू नये यासाठी विकास योजनाच्या माध्यमातून त्यांना खोटया आशेवर झुलवत ठेवणे, फोडा व झोडा निती, शेतक-याविरुध्द प्रचार करुन त्यांना आपल्या मागण्या संघटितपणे मांडता येऊ नये अशी परिस्थिती निर्माण करणे, शेतक-यांनी आंदोलने केली तर बळाचा वापर करुन दडपून टाकणे ही पाच तत्वे आहेत. शरद जोशींच्या शेतकरी

ISSN : 2348-7143
December-2018

संघटनेतून विभक्त होऊन इ.स. २००२ साली स्वाभिमानी शेतकरी संघटना, रघुनाथदादा पाटील यांची शेतकरी संघटना अशा अनेक शेतकरी संघटना स्थापन झाल्या.

**शेतकरी संघटनेची उद्दिष्टये :**

शेतमालास उत्पादन खर्चाच्या आधारे भाव मिळवून देणे, शेतक-यांना वाजवी दराने वित्तपुरवठा, मध्यस्थांचे उच्चाटण करणे, शेतक-यांचे दारिद्रय दूर करणे, समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण देणे, शेतीला उद्योगाचे स्वरुप देणे, शेतमालाच्या किंमतीत स्थैय आणणे, इत्यादि उद्दिष्टये ठेवून शेतकरी संघटना कार्य करते.

**शेतकरी आंदोलनांचे स्वरुप :**

महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांनी आपल्या मागण्यांसाठी शांततेत लोकशाही मार्गाने आंदोलने केली. काही अपवादात्मक आंदोलनांना शासनाने पोलिस बळाच्या वापरामुळे हिंसक स्वरुप प्राप्त झाले. संघटना अर्ज, विनंती करणे, रास्ता रोको, रेल्वे रोको इ. मार्गाने वाहतूकीस अउचण निर्माण करणे, शहरांना होणारा आवश्यक वस्तूंचा पुरवठा बंद करणे, स्थानिक, प्रादेशिक कार्यालयावर तसेच मंत्रालयासमोर धरणे, अधिका-यांना घेराव घालणे, निवडणूकीवेळी राजकीय नेते व अधिका-यांना प्रतिबंद करणे, वाढीव वीज बील, पाणीपट्टी भरणे बंद करणे इ. मार्गाचा वापर शेतकरी संघटनांनी केला.

**शेतकरी संघटनांच्या मर्यादा / अपयशाची कारणे :**

शेतकरी संघटनेचे नेते सत्ताधारी होण्याच्या महत्त्वाकांक्षेपोटी सत्तेत सहभागी झाले. खाजगीकरण धोरणास पाठिंबा, यामुळे संघटनेचा प्रभाव कमी होत गेला. संघटनेने सर्वच शेतमालास हमीभाव मिळावा अशी भूमिका घेतली. मात्र त्या त्या भागातील फक्त नगदी पिकांच्या शेतमालाला भाव मिळोवत म्हणून आंदोलने केली. [१४] बाजारपेठेवर ताबा नसल्याने आंदोलने यशस्वी झाली नाहीत. शेतकरी चळवळीची वाटचाल दिशाहीन व गतीहीन झाली. संपूर्ण महाराष्ट्रात एकच शेतकरी संघटना नसल्याने शासनावर प्रभाव पडू शकत नाही. शरद जोशी प्रणित शेतकरी संघटना, राजू शेट्टी प्रणित स्वाभिमानी शेतकरी संघटना, रघुनाथदादा पाटील प्रणित शेतकरी संघटना अशा अनेक शेतकरी संघटना स्थापन झाल्या. या संघटनांच्या नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद दिसून येतात. संघटनेचे स्वरुप असंघटीत व त्यात सातत्य दिसून येत नाही. संघटनांचे सर्व शेतकरी सभासद नसतात. सभासद शेतक-यांची दिर्घ संघर्ष करण्यासाठीची आर्थिक परिस्थिती नाही, शेतमाल साठवणूक व्यवस्था शेतक-यांकडे नाही, संघटनेस पुरेसा वेळ शेतकरी देत नाहीत, शेतक-यात एकीचा अभाव दिसून येतो, अनेक वैयक्तिक अडचणी शेतक-यास असतात. परिणामी शेतकरी आंदोलने यशस्वी होत नाहीत.

शेतकरी संघटनांच्या मागण्यांपैकी शेतीवर तात्पुरता परिणाम करणा-या मागण्या शासनाने मान्य केल्या. उदा. दुधदरवाढ, कर्जमाफी, गारपिटग्रस्तांना मदत, मात्र शेतीवर दिर्घकाळ परिणाम करणारे, शेतक-यांना दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढण्यासाठी अनुकूल शासकीय धोरणे राबविली नाहीत. उदा. स्वामीनाथन आयोग लागू करणे इ. प्रमुख मागण्या मान्य करुन घेण्यास शेतकरी संघटना अपयशी ठरली. शेतकरी संघटनांची आंदोलने व शासनाने वेळोवेळी देऊ केलेली सबसिडी, सुट, कर्जमाफी यामुळे कर्ज बुडविणे, वेळेत न भरणे या प्रवृत्ती शेतक-यांत वाढीस लागल्या. याचा परिणाम शेती आणि भांडवल पुरवठा करणा-या वित्त संस्थावर प्रतिकूल झाला. राजकीय पक्षांचे जाहिरनामे, घोषणांमुळे यास खतपाणी मिळाले.[१५]

शेतकरी संघटनांनी आपल्या आंदोलनांना राजकीय, जातीय, धार्मिक रंग येऊ दिला नाही, विविध वादापासून संघटनेला, कार्यक्रमाला व आंदोलनास दूर ठेवले, संघटनेने केलेली सर्व आंदोलने लोकशाही मार्गाने शांततेत केली, संघटनेच्या ध्येय धोरणाचा प्रचार प्रसार करण्यासाठी वारकरी व आठवडयाचा ग्यानबा इ. मुखपत्रे चालविली, नगदी

पिकांना किफायतशीर भाव, दूध दरवाढ, वीज बील माफ, निविष्ठांच्या किंमती कमी करणे इ. मागण्या शेतकरी संघटनांनी केलेल्या आंदोलनामुळे साध्य झाल्या.

**संदर्भ सूची :**


**१.** वाळके किशोर, ब्रिटिशकालीन शेतकरी संघटना व कार्य, संग्राम, फेब्रुवारी २०१४, पृ. २०, २१, २२

**२.** डॉ. पाटील टी.एस., महाराष्ट्रातील डाव्या चळवळींच्या इतिहासाची मांडणी, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. २५४, २५५, २५६

**३.** प्रा.डॉ.बाबुराव गुरव, जगूतात्या लिगाडे : दुष्काळी कष्टकरी जनतेचा लोकनेता, जगूतात्या लिगाडे गौरव ग्रंथ समिती, पृ ७, ८

**४.** दै.सोलापूर समाचार, दि. १ सप्टेंबर १९७१.

**५.** प्रा.पाटील टी.एस. भाई एन.डी.पाटील कार्य आणि कर्तृत्व, भाई एन.डी.पाटील गौरव समिती प्रकाशन, पृ.२२

**६.** इंगळे व.न., महाराष्ट्राचे शिल्पकार भाई उध्दवराव पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पृ. ४५.

**७.** दै. संचार, १८ सप्टेंबर १९७१.

**८.** विधानसभा कामकाम, वैराग गोळीबारावर चर्चा, २९ मार्च १९७३, पृ. १८२२.

**९.** मुलाखत- सुभाष पाटील, इर्ले, दिनांक २० सप्टेंबर २०१२.

**१०.** हुतात्मा स्मारक, वैराग.

**११.** डोळस अविनाश व इतर, सामाजिक चळवळी, यशवंतराज चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पुनर्मुद्रण, २०१०.

**१२.** पवार उर्मिला, मीनू मसानी, आम्हीही इतिहास घडविला, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०००.

**१३.** शरद जोशी, शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपध्दती, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती, २००८, पृ ५५.

**१४.** डॉ. पाटील टी.एस., महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या इतिहासाचे सुतोवाच, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, पृ. २५९

**१५.** फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड-३, विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९१

ISSN : 2348-7143
December-2018

# विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राती ल शेतकरी आंदोलनांचा तौलनिक अभ्यास

**डॉ. डी. एस. सावंत,**
राज्यशास्त्र विभाग, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा,
मो. ९९२३३२७५२७

**प्रास्ताविक -**

विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन प्रदेशांची भौगोलिक, आर्थिक, सामाजिक पार्श्वभुमी वेगवेगळी आहे. तर आंदोलने ही सामाजिक, आर्थिक पार्श्वभुमीवर निर्माण होत असतात. पश्चिम महाराष्ट्र हा विदर्भाच्या तुलनेत शहरीकरण झालेला, पाण्याचा भाग असलेला व या पाण्याच्या साठ्यामुळे ऊस, फळफुल शेती करणारा प्रदेश आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ एकसंघ प्रदेश नाही. विदर्भामध्ये पुर्व विदर्भ व पश्चिम विदर्भ असे दोन वेगवेगळे उपप्रदेश आहेत. म्हणजेच पश्चिम महाराष्ट्राची एक अस्मिता आहे तर विदर्भाच्या दोन अस्मिता आहेत. तर पाण्याच्या साठ्याबाबत पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ दुर्बल आहे. पुर्व विदर्भात निसर्ग समृध्दी आहे. तसेच पाणी व खनिजसाठा देखील उपलब्ध आहे. यामुळे पुर्व विदर्भात भातशेती मोठ्या प्रमाणात केली जाते. पश्चिम विदर्भामध्ये संत्र्याची शेती केली जाते आणि त्या जोडीला कापूस व सोयाबिन ही व्यापारी पिके घेतली जातात. थोडक्यात पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या दोन्ही भागातील शेतकरी एकाच प्रकारचा नाही असे दिसून येते.

**शेतकरी आंदोलनाचे तौलनिक विश्लेषण :**

विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांचे विविध मुद्यांच्या आधारे तौलनिक अध्ययन ते पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र. ५.१. विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या संघटना

| विदर्भ | पश्चिम महाराष्ट्र |
|---|---|
| १) शेतकरी संघटना | १) स्वाभिमानी शेतकरी संघटना |
| २) विदर्भ जन आंदोलन समिती | २) शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य |
| ३) कापूस उत्पादक संघ | ३) शेतकरी संघटना |
| ४) किसान सभा (भा.क.प.) | ४) किसान सभा (भा.क.प.) |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसून येते की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये व विदर्भामध्ये शेतकऱ्यांचे संघटन करण्यासाठी विविध संघटना आहेत. विदर्भामध्ये शेतकरी संघटना, विदर्भ जन आंदोलन समिती, कापूस उत्पादक संघ, किसान सभा या संघटना आहेत. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य, शेतकरी संघटना, किसान सभा या संघटना आहेत. या शेतकऱ्यांच्या संघटनांचे दोन प्रकार दिसतात. म्हणजेच दोन प्रकारे शेतकरी संघटना स्थापन झाल्या आहेत. एक म्हणजे आधी पक्ष स्थापन झाला व त्यानंतर पक्षाने संघटना स्थापन केल्या. त्या म्हणजे शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेनंतर शेतकरी सभा व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेनंतर अखिल भारतीय किसान सभा स्थापन करण्यात आली. तर दुसरा प्रकार म्हणजे अगोदर संघटना स्थापन झाल्या व त्यातून पक्ष स्थापन झाला आहे. तो म्हणजे शेतकरी संघटनेच्या स्थापनेनंतर स्वतंत्र भारत पक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटनेनंतर स्वाभिमानी पक्ष यांची स्थापना होय.

ISSN : 2348-7143
December-2018

**शेतकरी संघटनेने उठविलेल्या प्रश्नांची तुलना :**

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी व्यापारी पिके घेण्याबद्दल प्रगतीशील आहेत. पिकांवरती प्रक्रिया करणारे उद्योग विदर्भाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त आहेत. साखर कारखाने, दूध संघाचे जाळे पश्चिम महाराष्ट्रात विणले गेले आहे. तर विदर्भामध्ये सुतगिरण्या आणि संत्र्यांवर प्रक्रिया करणारे उद्योग आहेत. पूर्व विदर्भात भात या पिकाच्या संदर्भात प्रक्रिया करणारे छोटे उद्योग आहेत. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची आंदोलने जास्त करून ऊस व दुध या घटकांशी संबंधित आहेत. तर विदर्भातील शेतकऱ्यांची आंदोलने कापुस, संत्रा, भात, सोयाबिन या घटकांशी संबंधीत आहेत.

विदर्भातील व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांवरून असे दिसून येते की, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने ही भाववाढ व उत्पादन खर्चावर आधारित भाव यावर भर देणारी आहेत. म्हणजेच शेतकऱ्यांना जास्तीत-जास्त फायदा मिळवून देणे आणि नफ्याचे तत्त्व यामध्ये दडल्याचे दिसते. विदर्भामध्ये कापूस, संत्रा, भात, सोयाबिन या पिकांना उत्पादनाचा भाव वाढवून मिळावा हा मुद्दा पश्चिम महाराष्ट्राइतका प्रभावी आहे. तर विदर्भातील शेतकरी नफ्यापेक्षा रास्तभाव मिळावा हा मुद्दा मांडताना दिसतात. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये योजनांच्या अंमलबजावणीबाबत, शेतकरी व शेतमजुरांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे प्रमाण विदर्भापेक्षा अधिक दिसून येते. यामूळे संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी संघटना एकच असली तरी पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटना नफ्याच्या तत्त्वावर काम करताना दिसते. तर विदर्भातील शेतकरी संघटना रास्त भावाच्या तत्त्वावर काम करताना दिसतात. हा मूलभूत बदल पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकरी आंदोलनामध्ये दिसून येतो.

**शेती क्षेत्रातील विकास आणि शेतकऱ्यांच्या भूमिकेची तुलना :**

पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या दोन्ही विभागामध्ये शेतीक्षेत्रातील विकासाचे टप्पे वेगवेगळे आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हे शेतीचे रूपांतर भांडवली शेतीत करण्याइतपत प्रगत झाले आहेत. तर विदर्भातील शेतकरी या प्रगतीच्या टप्प्यात अजूनही आले नसल्याचे दिसते. त्यामूळे या दोन वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये शेतकरी संघटना एकसारखे काम करू शकत नाही. तिच्या कामाची पद्धती व त्यांनी उठविलेले प्रश्न एकसारखे असत नाहीत. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी हे सहकार क्षेत्राच्या ऐवजी खाजगी क्षेत्र निर्माण करीत आहेत. सहकारी साखर कारखाने बंद करून खाजगी साखर कारखाने उभारले जात आहेत. सहकार तत्त्वावरील दूध संघ बंद करून आता खाजगी दूध उत्पादक संघ निर्माण केले जात आहेत. त्यांची उत्पादने परदेशी बाजारपेठेत जात आहेत. या तूलनेत विदर्भात ही प्रक्रिया फार संथगतीने घडत असल्याचे दिसते. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटनाही शेतमालाला भाव वाढवून देणे या मुद्यावर सातत्याने स्थिर झालेली दिसते. हा मुद्दा खरेतर पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात खूप जूना आहे. हा मुद्दा शेतीचे आधुनिकीकरण करणे, नफा मिळविणे अशा प्रकारचा आहे. हा मुद्दा यापूर्वी यशवंतराव चव्हाण, छ. शाहू महाराज यांच्या विचारांवरून दिसून आला आहे. तर छ. शाहू महाराज व यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा तो सार होता. पुढील काळात पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटना तोच मुद्दा पुढे रेटताना दिसते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये जिराईत भागात व्यापारी तत्त्वावर आधारित शेती फारशी केली जात नाही. छोटे शेतकरी व्यापारी तत्त्वावर आधारित शेती करीत नाहीत. छोट्या शेतकऱ्यांचा ऊस साखर कारखान्याऐवजी इतरत्र जातो. तर काही छोटे शेतकरी साखर कारखान्यांना ऊस गळित हंगामाच्या शेवटी देतात. याचे कारण म्हणजे आपले सभासदत्व टिकवून वर्षभर गरजेपूरती साखर मिळावी, हा त्यामागील हेतू असतो. तसेच साखर कारखान्याकडून कर्जे मिळावीत, सबसिडी, अनुदान मिळावे म्हणून या लहान-लहान हेतूसाठी छोटे शेतकरी साखर कारखान्यांशी संबंध ठेवतात. तर याउलट साखर कारखाने सुरू झाल्यापासून ते बंद होईपर्यंत

ISSN : 2348-7143
December-2018

भांडवलदार, मोठ्या शेतकऱ्यांचा ऊस जातो. यामूळे शेतकरी संघटनेची ऊसास भाव वाढवून मागणारी मागणी म्हणजे मोठ्या/भांडवलदार शेतकऱ्यांसाठी केलेली मागणी ठरते. हा मुद्दा विदर्भात गैरलागू ठरतो. कारण विदर्भातील शेतकऱ्यांकडे प्रगत अवस्था आलेली नाही. तेथे ऊस शेती अगदी अल्प ठिकाणी केली जाते. त्यामूळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटना ह्या प्रादेशिक पातळीवर श्रीमंत शेतकऱ्यांच्या संघटना ठरतात. तर विदर्भामध्ये शेतकरी संघटना ह्या श्रीमंत शेतकऱ्यांच्या शेतकरी संघटना ठरत नाहीत. हा मुलभूत फरक विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनामध्ये आहे. या कारणांमुळेच पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे नेते पश्चिम महाराष्ट्रापुरते मर्यादित दिसतात. त्याचप्रमाणे विदर्भातही शेतकरी संघटनेचे नेते विदर्भापूरते मर्यादित राहिलेले दिसतात.

**शेतकरी संघटनांच्या रचनांची तुलना :**

शरद जोशींच्या शेतकरी संघटनेची रचना ही अखिल भारतीय स्तर, महाराष्ट्र राज्य स्तर, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा स्तर, जिल्हा स्तर, तालुका स्तर व ग्रामीण स्तरावर कार्यरत आहे. ही शेतकरी संघटना महाराष्ट्राबरोबर १४ राज्यांमध्ये कार्यरत आहे. तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेची रचना ही विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रापूरती मर्यादीत आहे. विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवर ही संघटना कार्यरत आहे. म्हणजेच राजू शेट्टी यांची शेतकरी संघटना ही उपप्रादेशिक स्वरूपाची आहे. तर शरद जोशींची शेतकरी संघटना प्रादेशिक चौकटीपेक्षा जास्त व्यापक झाल्याचे दिसते. असा फरक या दोन शेतकरी संघटनांच्या रचनेमध्ये दिसतो. या प्रकारचा फरक दिसण्याची दोन कारणे आहेत. १) शेतकरी प्रश्नांवर शेतकऱ्यांचे संघटन महाराष्ट्रात आरंभी शेतकरी संघटनेने सुरू केले. शेतकरी संघटनेमधील नेतृत्त्वामध्ये राजकीय महत्त्वकांक्षा निर्माण झाल्या. राजकीय महत्त्वकांक्षेमुळे शेतकरी संघटनेत फूट पडली आहे. २) संघटना, नेतृत्त्व आणि प्रतिनिधित्व या तीन भिन्न गोष्टी आहेत. परंतु राजकीय प्रतिनिधित्व ही नेतृत्त्वाची महत्वकांक्षा होती. यामुळे संघटनेत राहून राजकीय प्रतिनिधित्व करण्यास मर्यादा येत होत्या. कारण संघटना केवळ शेतकरी अस्मिता जपत होती. शेतकरी ही अस्मिता राजकीयदृष्ट्या बहुमतात रूपांतरीत होण्यात मर्याद होत्या. त्यामुळे जात, धर्म आणि शेतकरी अशा दोन अस्मिता मुख्य शेतकरी संघटनेत जपता येत नसल्यामुळे शेतकरी संघटनेमध्ये फूट पडली. हे शेतकरी संघटनेच्या फूटीचे मुख्य कारण आहे. यामुळे शरद जोशींची शेतकरी संघटना राजू शेट्टींच्या शेतकरी संघटनेपेक्षा व्यापक दिसते. तर राजू शेट्टींची शेतकरी संघटना एका विशिष्ट प्रदेशामध्ये नेतृत्त्व करते. शरद जोशी व राजू शेट्टी यांच्या शेतकरी संघटना शेतकरी व जात या दोन घटकांच्या बरोबरीने वर्ग या पायावरदेखील संघटन करतात, असे साम्यही या संघटनांमध्ये दिसते. ते साम्य पुढीलप्रमाणे आहे.

| शेतकरी संघटना (शरद जोशींचे नेतृत्त्व) | स्वाभिमानी शेतकरी संघटना (राजू शेट्टींचे नेतृत्त्व) |
|---|---|
| १) महिलांचे प्रश्न | १) महिलांचे प्रश्न |
| २) संरक्षण धोरण | २) शिक्षणविषयक प्रश्न |
| ३) शिक्षणविषयक प्रश्न | ३) खाजगी वाहतूकदारांचे प्रश्न |
| ४) खाजगी वाहतूकदारांचे प्रश्न | |

**शेतकरी संघटनांच्या स्पर्धेची तुलना :**

शेतकरी अस्मिता आणि शेतकरी नेतृत्त्वाची मुळची अस्मिता यामध्ये अंतर आहे. मुख्य अस्मिता किंवा प्राथमिक अस्मिता जात व धर्माशी संबंधित होती. उदा. शरद जोशींची अस्मिता उच्चवर्णीय होती, तसेच विजय जावंधिया यांची अस्मिता उच्चवर्णीय होती. पाशा पटेल यांची अस्मिता मुस्लिम होती, तर राजू शेट्टी यांची अस्मिता

ISSN : 2348-7143
December-2018

जैन होती. या सर्वांच्या अस्मिता या लोकशाहीतील अल्पसंख्यांख्य अस्मिता आहेत. या अल्पसंख्यांक अस्मितांच्या पुढे एक महत्त्वाचे आव्हान होते. ते म्हणजे लोकशाहीमध्ये यशस्वी कशे व्हायचे? लोकशाही ही बहुसंख्यांकांची आणि हे नेते अल्पसंख्यांक. या दोन गोष्टी परस्परविरोधी होत्या. या परस्परविरोधी गोष्टींमधून मार्ग काढण्यासाठी कृत्रिम पद्धतीने शेतकरी नेतृत्त्व नावाची अस्मिता घडविण्यात आली. शेतकरी अस्मिता ही अल्पसंख्यांकत्वाच्या बाहेरील अनुयायांना नेतृत्त्वाशी जोडणारा दुवा होता. म्हणजेच शेतकरी अस्मितेने अल्पसंख्यांक जातीचा नेता अल्पसंख्यांकेतर शेतकऱ्यांचे संघटन करू लागला. यामुळे मूळ शेतकरी नेता आणि अल्पसंख्यांक समाजातून दावा केलेला दुसरा नेता या दोहोंमध्ये तिव्र राजकीय स्पर्धा निर्माण झाली. यातूनच राजकीय भागीदारीचा दावा अल्पसंख्यांक जाती-धर्मातील नेत्यांनी केला. अशाप्रकारचे राजकारण दोन्ही शेतकरी संघटनांमध्ये घडल्याचे दिसते.

| नेतृत्व ↓ | प्राथमिक अस्मिता ↓ | करीअर ↓ | कृत्रीम अस्मिता ↓ | प्राथमिक कृत्रीम अस्मितेचे एकत्रीकरण ↓ |
|---|---|---|---|---|
| राजू शेट्टी → | जैन | राजकारण करणे | शेतकरी | जैन शेतकरी |
| शरद जोशी → | ब्राह्मण | नेतृत्त्व करणे | शेतकरी | ब्राह्मण शेतकरी |
| पाशा पटेल → | मुस्लिम | सत्ता मिळविणे | शेतकरी | मुस्लिम शेतकरी |
| | अल्पसंख्यांक | | बहुसंख्यांक | |

यावरून असे दिसून येते की, अल्पसंख्यांक नेतृत्वाने प्राथमिक अस्मिता व कृत्रीम अस्मिता यादोहोंच्या आधारावर नेतृत्त्व करून सत्ता हस्तगत केली आहे. म्हणजेच लोकशाही व्यवस्थेमध्ये अल्पसंख्यांक नेतृत्त्व हे बहुसंख्यांकांचे नेतृत्त्व करीत आहेत असे म्हणता येईल.

**शेतकरी आंदोलनातील नेतृत्वाच्या स्वरूपाची तुलना :**

१९८० ते २०१० या दरम्यान शेतकरी संघटनेमध्ये शरद जोशी यांचे नेतृत्त्व प्रभावी होते. त्यांच्या भूमिका म्हणजे शेतकरी आंदोलनाविषयक भूमिका असे म्हटले जाते. तर सन १९९५ नंतर राजू शेट्टी व रघुनाथदादा पाटील अशी दोन नेतृत्त्वे पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांतून पुढे आली होती. अशा दोन नेतृत्त्वामध्ये द्विधृवी स्वरूप शेतकरी आंदोलनामध्ये राहीले. विदर्भामध्ये देखील शेतकरी आंदोलने शेतकरी संघटना, विदर्भ जनआंदोलन समिती, किसान सभा, महाराष्ट्र कापूस उत्पादक संघ अशा चार संघटनांमध्ये विभागले गेले होते. यातून पश्चिम महाराष्ट्रामध्ये जेवढा आंदोलनांबाबत तीव्र पेचप्रसंग उभा राहिला तेवढा पेचप्रसंग विदर्भामध्ये उभा राहिला नाही. विदर्भात या संघटनांत बऱ्याचदा एकोपा व समन्वय निर्माण होतो. पश्चिम महाराष्ट्रात मात्र किसान सभा व स्वाभिमानी शेतकरी संघटना कधीही एकत्र येत नाहीत. हे पश्चिम महाराष्ट्र व विदर्भाच्या संदर्भातील वेगळेपण दिसते.

विदर्भातील शेतकरी संघटना राजकीय नेतृत्त्वावर टीका करते. खुद्द विदर्भातील राजकीय नेतृत्त्व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास अपात्र होते, विदर्भातील राजकीय नेतृत्त्व पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्त्वाचे मांडलिक होते. ही भूमिका विदर्भातील शेतकरी संघटना मांडते. तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांमध्ये राजकीय नेतृत्त्व हे भांडवलदारांचे आहे. अशी टीका केली गेली आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधी कोण हा प्रश्न विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही ठिकाणी उभा केलेला दिसून येतो. यामुळे प्रतिनिधित्वाचा दावा एका बाजूला व शेतकऱ्यांचे प्रतिनिधी दुसऱ्या बाजूला असा फरक झालेला दिसतो. यामधून शेतकऱ्यांचे प्रतिनिधी कोण? असा एक गुंतागुंतीचा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा प्रश्न जात व जातीअंतर्गत स्तरीकरण या दोन्ही पातळ्यांवर सतत मांडला जात

ISSN : 2348-7143
December-2018

आहे. २०१२ च्या शेतकरी आंदोलनांमध्ये शरद पवार हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधी नाहीत, अशी भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतली होती. तेव्हा राजू शेट्टींच्या जातीचा उल्लेख शरद पवार यांनी केला होता. म्हणजे शेतकरी आंदोलने जाती व जातीअंतर्गत स्तरीकरण या सामाजिक आधारावर देखील उभी राहत आहेत. तसाच परिणाम विदर्भातील शेतकरी संघटनेबद्दल दिसून येतो. म्हणजेच शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीत्त्वाचा दावा, शेतकऱ्यांच्या हितसंबंधाचा दावा अशा प्रकारचे मुद्दे शेतकरी आंदोलनामध्ये अत्यंत गुंतागुंतीचे झालेले दिसतात.

**शेतकरी संघटना व राजकीय पक्षांचे संबंध :**

शेतकरी आंदोलने ही कोणत्या ना कोणत्या संघटनांच्या मार्फत झाली आहेत. शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य, विदर्भ जन आंदोलन समिती, किसान सभा अशी उदाहरणे सांगता येतात. शेतकरी हा कोणत्यातरी संघटनेशी जोडलेला दिसतो. शेतकरी संघटनेशिवाय सामूहिक कृती करीत नाही. शेतकऱ्यांनी आंदोलन करण्यासाठी ज्या संघटनांना पाठींबा दिला, त्या संघटना आणि राजकीय पक्ष यांचे राजकीय संबंध असल्याचे दिसते. उदा. शेतकरी संघटनेचा संबंध स्वतंत्र भारत पक्षाशी आहे.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा संबंध स्वाभिमानी पक्षाशी आहे. किसान सभेचा संबंध भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी आहे.

म्हणजेच थोडक्यात राजकीय पक्ष आणि शेतकरी ज्या संघटनेच्या माध्यमातून आंदोलने करतात, त्या संघटना परस्पर संलग्न आहेत. शेतकऱ्यांची आंदोलने विविध प्रश्नांवर उभी करून शेतकऱ्यांचे राजकीय संघटन प्रथम केले जाते. आणि त्यानंतर राजकीय पक्ष स्थापन केला जातो. असा एक प्रकार यातून दिसून येतो. याची उदाहरणे म्हणजे शेतकरी संघटनेची प्रथम स्थापना झाली आणि त्यानंतर स्वतंत्र भारत पक्ष स्थापन झाला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची प्रथम स्थापना झाली. तर स्वाभिमानी पक्षाची स्थापना त्यानंतर झाली. हे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन्ही विभागामध्ये दिसून येते. दुसरा प्रकार म्हणजे अगोदर पक्ष स्थापन झालेला असतो आणि त्यानंतर शेतकरी आंदोलने उभारण्यासाठी एक उपशाखा तयार केली जाते. त्याची उदाहरणे म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्ष (१९२५) अगोदर स्थापन झाला व त्यानंतर अखिल भारतीय किसान सभा (१९३६) स्थापन झाली. याच नियमाप्रमाणे कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस या विविध पक्षांनी शेतकरी वर्गात संघटना स्थापन केल्या आहेत. यामुळे यांचा उद्देश शेतकऱ्यांची आंदोलने करून पक्षासाठी शेतकऱ्यांचे संघटन करणे हा आहे, असे दिसते. हे प्रारूप देखील विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात समान दिसून येते.

**अखिल भारतीय किसान सभा व इतर शेतकरी संघटनांच्या आंदोलनाची व भूमिकेची तुलना :**

विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने, त्या आंदोलनांचे नेतृत्त्वकर्ते आणि त्या आंदोलनासाठी पुढाकार घेतलेल्या संघटना, शेतकरी वर्ग यांच्यामध्ये संबंध पक्के झालेले दिसत नाहीत. विदर्भामध्ये शेतकरी संघटनेला शेतकरी वर्गाचा पाठींबा होता. मात्र ते शेतकरी पुन्हा शिवसेनेच्या शेतकरी सेनेस पाठींबा देताना दिसतात. पश्चिम महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांची आंदोलने करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रारंभी शेतकरी संघटनेस पाठींबा होता. त्यानंतर शेतकरी संघटनेकडून स्वाभिमानी शेतकरी संघटनेला पाठींबा देतात. तर पून्हा त्यातील एका गटाने रघूनाथदादा पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली शिवसेनेस काही काळ पाठींबा दिल्याचे दिसते. या सर्व तपशीलाचा अर्थ असा होतो की, शेतकरी वर्ग आणि शेतकऱ्यांचे नेते, आंदोलनाचे नेतृत्त्वकर्ते, शेतकरी वर्ग आणि शेतकऱ्यांच्या संघटना यांचे संबंध शेतकरी आंदोलनांमार्फत पक्के झाले नाहीत. हे संबंध अस्थिर व कच्चे असल्याचे दिसून येते. या संबंधामध्ये फेरबदल होताना दिसतात.

विदर्भामध्ये शेतकऱ्यांची चळवळ सुरू करून पक्ष स्थापन केला गेला. तसेच पश्चिम महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांची चळवळ सुरू करून शेतकऱ्यांचा पक्ष स्थापन केला. याचा अर्थ शेतकरी संघटना ही तिच्या भूमिकेप्रमाणे केवळ सामाजिक चळवळ नव्हती. शेतकरी संघटना ही राजकीय भूमिका घेत होती, असे दोन्ही

विभागामध्ये दिसून येते. तर राजकीय पक्षांशी संबंधीत संघटना देखील समाजकारणाचा दावा करतात. परंतु प्रत्यक्षात शेतकरी वर्गाला पक्षाशी जोडून घेतात. त्यामुळे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांची भूमिका राजकीय स्वरूपाची असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. शेतकरी आंदोलनांमधून त्यांचे राजकारण उलघडत जाते. या राजकारणाचे स्वरूप एकसंघपणे नाही. तर या राजकारणाचे स्वरूप स्थानिक राजकारणाच्या विरोधावर आधारलेले आहे, असे दिसते. त्यामूळे शेतकरी आंदोलनांना प्रदेशवादाच्या राजकारणाची देखील एक बाजू असल्याचे दिसते. त्याचे उदाहरण म्हणजे २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात पश्चिम महाराष्ट्रामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेमध्ये वाढ झाली, तर शेतकरी संघटना ही विदर्भ व मराठवाडा विभागामध्ये वाढलेली दिसते. किसान सभेने शहरी भागाशी संबंधित मुद्यांवर आंदोलने केली. शिवाय त्यांनी संपूर्ण शेतकरी वर्गाची बाजू घेण्याऐवजी शेतमजूरांच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला. अखिल भारतीय किसान सभेची स्थापना १९३६ मध्ये झाली. तिचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी सहजानंद सरस्वती होते. तर महाराष्ट्रातील किसान सभेचे पहिले अध्यक्ष क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात कसेल त्याची जमिन या मुद्यावर किसान सभेने शेतकरी आंदोलने उभारली. सावरकरांनी शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावरती स्वतःच्या नावे नोंदी केल्या होत्या. त्या नोंदी रद्द करून शेतकऱ्यांच्या नोंदी कराव्यात म्हणून सावकारांच्या विरोधात किसान सभेने आंदोलने केली. तर स्वातंत्र्योत्तर काळामध्ये किसान सभेने भूमिहिनांना जमिन मिळण्यासाठी आंदोलने केली. या आंदोलनामधून सिलींगचा कायदा करणेत आला. असा दावा किसान पातळीवरील नेते कॉ. नामदेव गावडे करतात. या सिलींग कायद्यामध्ये दोन मुख्य तरतूदी होत्या. त्या म्हणजे ८ एकर बागायती क्षेत्र. ५४ एकर जिराईत क्षेत्र इतकेच एका शेकऱ्याच्या ७/१२ उताऱ्यावर असेल. यातील ५४ एकर जिराईत क्षेत्राच्या तरतुदीनुसार मोठ्या कंपन्या व उद्योगपतींनी जिराईत जमिनी खरेदी करून उद्योग उभारले. याचे परिणाम म्हणजे या उद्योगांसाठी लागणारे पाणी सरकारने शेतीमधील कमी करून उद्योगाकडे वळविले. त्यामूळे लहान शेतकऱ्यांना शेती करणे अवघड बनले. परिणामी लहान शेतकऱ्यांनी जमिनी विकून शहराकडे गेले. पूढे या कंपन्या व शासन यांच्यात जवळीक निर्माण झाली. पश्चिम महाराष्ट्रात कोयना धरणावरती कमी खर्चामध्ये वीज निर्मिती होत असताना शासनाने एन्रॉन सारख्या कंपनीकडून वीज घेण्याचे ठरविले. एन्रॉनने वीज देवू केली, पण हळूहळू वीजेच्या दरामध्ये वाढ करीत आहेत. तर त्यावेळी शेतीला पाणीपुरवठा करण्यास २४ तासापैकी १८ तास वीजपुरवठा करीत होते. आज ते ६ तासच वीजपुरवठा करीत आहेत. तसेच या वाढत्या दरामुळे शेतकऱ्यांना ती वीज परवडू शकत नाही. यावरून असे दिसते की, शासनाचे शेतीकडे लक्ष नसून ते उद्योग क्षेत्राकडे आहे. किसान सभेने राज्यसरकार आणि गावपातळीवरील / स्थानिक सरकार हे शेतकऱ्यांच्या विरोधात भांडवलदार व कारखानदारांना मदत करीत होते. अशाच प्रकारची भूमिका घेतली आहे. त्यामूळे किसान सभेचा स्थानिक सरकारच्या भूमिकेस भांडवलदारांच्या भूमिकेस विरोध होता. स्थानिक सरकार, राज्य सरकार आणि भांडवलदार यांच्या कायदा मोडण्याचा एक गुप्त समझोता झाला होता, असे किसान सभेचे मत आहे. या समझोत्याचे परिणाम म्हणजे शेतकरी वर्गाला नैसर्गिक साधनसंपत्ती असलेल्या पाण्यावरील हक्क सोडण्यास भाग पाडले गेले. म्हणजेच यातून दोन प्रक्रिया घडल्याचे दिसते. त्या म्हणजे, निर्वाहाचे साधन असलेल्या जमिनींचे स्थलांतर शेतकरी वर्गाकडून छोटे कारखानदार, भांडवलदार यांच्याकडे झाले. नैसर्गिक साधनसंपत्तीवर सर्वांचा हक्क होता, याच नैसर्गिक साधनसंपत्तीवरचा शेतकऱ्यांचा हक्क कमी-कमी होत गेला.

जमिनीच्या स्थलांतरामुळे व शेतकऱ्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवरील हक्क कमी होण्यातून ती सरकारच्या/ भांडवलदारांच्या मालकीची झाली. त्यामूळे या हक्कांपासून शेतकरी वर्ग वंचित राहीला आहे. अशा प्रकारची प्रक्रिया आजवर घडत आलेली आहे. असे किसान सभेचे मत आहे. म्हणजेच किसान सभा या मुद्यांवर आधारित शेतकऱ्यांची बाजू मांडत आहे, असा दावा किसान सभेचे नेते करीत आहेत. तर शेतकरी संघटना,

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

स्वाभिमानी शेतकरी संघटना, शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनांनी सर्वच शेतकरी संघटनांची आंदोलने ही प्रादेशिक असण्याबरोबरच ती वर्गीय स्वरूपाची देखील होती. शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांनी भक्कमपणे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये जागतिकीकरण विरोधी आंदोलन केले नाही. किसान सभेने जागतिकीकरण विरोधी आंदोलने केली आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तगत करण्यास त्यांनी विरोध केला आहे. म्हणजेच थोडक्यात शेतकरी संघटना व स्वाभिमानी शेतकरी संघटना जागतिकीकरणास पाठींबा देते. तर दूसऱ्या बाजूस जागतिकीकरणास पाठींबा देणारे नेते हे शेतकरी वर्गातील देखील आहेत. उदा. शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण, आर.आर.पाटील, मनोहर जोशी, गोपिनाथ मुंडे यांचा जागतिकीकरणास पाठींबा आहे. त्यामूळे शेतकरी वर्गातील नेते आणि शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन करणारे नेते यांच्या भूमिकेत फरक दिसत नाही. या दोन्ही वर्गाची भूमिका एकच असल्याचे दिसते. त्यामूळे शेतकरी आंदोलनातील नेते व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना या पक्षातील नेत्यांची सुप्तपणे यूती झाल्यासारखे वाटते. परंतु तरीही सर्वच्या सर्व शेतकरी वर्ग मुख्य चार (४) राजकीय पक्ष आणि या शेतकरी संघटनांच्या बाहेर देखील आहे. उदा. पश्चिम महाराष्ट्रात श्रमिक मुक्ती दल या भारत पाटणकरांच्या नेतृत्त्वाखालील संघटनेने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरती आंदोलने केली आहेत. त्यांनी शेतकऱ्यांचे विस्थापन, पर्यायी जलनिती असे विविध मुद्दे मांडले आहेत. याशिवाय श्रमिक मुक्ती दलाने उभारलेल्या शेतकरी आंदोलनांमध्ये महात्मा जोतिबा फूलेंचे प्रतिक वापरले गेले आहे. महात्मा फूले यांनी मांडलेले 'कूळवाडी कूलभूषण शिवाजी' हे मिथक देखील स्विकारले गेले आहे. हेच प्रतिक वेगळ्या अर्थाने शेतकरी संघटना 'बळीराजा' या स्वरूपात स्विकारते. परंतू शेतकरी संघटना शिवसेनेच्या हिंदुत्वाबरोबर युतीही करते, असे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रामध्ये दिसून येते. यामूळे श्रमिक मुक्ती दलाची शेतकरी आंदोलने काटेकोरपणे वैचारिक भूमिका घेताना दिसतात. तर शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांची शेतकरी आंदोलने काटेकोरपणे वैचारिक भूमिका स्विकारत नाहीत. त्यांच्या या वैचारिक भूमिकांमध्ये अस्पष्टता निर्माण होते. किसान सभेच्या देखील अशाच प्रकारच्या दोन भूमिका दिसू लागतात. म्हणजेच नेमकेपणाने कोणती विचारप्रणाली शेतकरी आंदोलनांतून पूढे येते, हे सांगणे फार गुंतागुंतीचे होते. तरी देखील विदर्भातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांवरून शेतकऱ्यांच्या आंदोलनांची वैचारिक, तात्त्विक भूमिका पूढील प्रमाणे नोंदविता येते.

शेतकरी संघटना बळीराजा, जागतिकीकरण व हिंदुत्व अशा तीन विचारांचा संयोग घडवून आणते असे विदर्भातील शेतकरी आंदोलनांवरून दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कांही शेतकरी संघटना राजकीय हितसंबंधी गट, जागतिकीकरण, मराठा विरोध अशा विचारांचा संयोग घडवून आणते. या संयोगामध्येच पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भातही मूख्य बदल दिसतो. विदर्भातील शेतकरी आंदोलने ही व्यापारी, अमराठी लोक, सरकार यांच्या विरोधातील आहेत. तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने ही भाववाढ मागणारी, प्रस्थापित मराठा राजकारणास विरोध करणारी आहेत. विदर्भातील शेतकरी आंदोलनांचा गाभा हा मराठा विरोधावर आधारलेला नसल्याचे दिसते. तर पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांचा गाभा हा मराठा विरोधावर आधारलेला आहे. हा महत्त्वाचा फरक विदर्भातील व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनामध्ये दिसून येतो.

**शेतकरी व शेतमजूरांच्या बाबतीतील घेतलेल्या भूमिकेची तुलना :**

विदर्भातील शेतकरी आंदोलनामध्ये शेतकरी संघटना, शेतकरी आणि शेतमजूर यांना एकच समजते. विदर्भातील शेतकरी संघटनेने शेतकरी या अस्मितेमध्ये शेतमजूर ही अस्मिता गृहीत धरलेली आहे. म्हणजेच शेतकरी आणि शेतमजूर अशा दोन अस्मिता विदर्भात शेतकरी संघटना मानत नाही. मात्र किसान सभा शेतकरी आंदोलनामध्ये शेतकरी आणि शेतमजूर अशा दोन वेगळ्या अस्मिता मांडते. शेतकऱ्यांचे हितसंबंध जपण्यासाठी व

शेतमजूरांचे हितसंबंध जोपासण्यासाठी वेगळी संघटना किसान सभा चालवते. म्हणजेच किसान सभेला शेतकरी हा एक वर्ग आणि शेतकऱ्यांपेक्षा मागास म्हणजे शेतमजूरांचा एक वर्ग असे दोन वर्ग अपेक्षित आहेत. अशा प्रकारची वर्गवारी किसान सभा करते. पण शेतकरी संघटना करीत नाही. ती शेतमजूरांना शेतकरी वर्गातच गृहीत धरते.

पश्चिम महाराष्ट्रातील स्वाभिमानी शेतकरी संघटना शेतमजूरांचे व शेतकऱ्यांचे हितसंबंध वेगळे मानत नाही. त्या दोघांचे हितसंबंध एकच आहेत अशी भूमिका घेते. म्हणजेच शेतमजूर व शेतकरी हे एकच आहेत ही भूमिका शेतकरी आंदोलनातून स्वाभिमानी शेतकरी संघटना मांडते. त्यामूळे शेतकरी ही अस्मिता शेतमजूर या अस्मितेला अभिव्यक्त होवू देत नाही असे म्हणता येईल. शेतमजूर म्हणून हितसंबंधही वेगळे नाहीत आणि शेतमजूर म्हणून वेगळे संघटनही नाही असे स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि शेतकरी संघटना यांच्यात पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ यांच्यात साम्य दिसते. म्हणजेच हितसंबंधांचा वाद हा शेतकरी अस्मितेच्या अंतर्गत दोन्ही विभागात समानच आहे. म्हणजेच शेतकरी आणि शेतमजूर यांचे हितसंबंध परस्परावलंबी आहेत. अशीच भूमिका घेतली जाते. शेतकरी व शेतमजूरांचे संबंध शत्रूभावी आहेत अशी भूमिका मात्र घेतली जात नाही. त्यामूळे शेतकरी व शेतमजूरांचे राजकारण विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रामध्ये तडजोडीचे, सहकार्याचे, सहमतीचे आणि वर्ग समन्वयाचे दिसते. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये किसान सभा मात्र समन्वयाच्या पुढे जावून वेगवेगळ्या अस्मितेबद्दल, वेगवेगळ्या हितसंबंधाबद्दल मान्यता देते. परंतु मार्क्सवादी विचारप्रणाली प्रमाणे शेतकऱ्यांमध्ये भांडवलदार शेतकरी असतो व मजूर हे कामगार आहेत. या दोघांचे नाते परस्परविरोधी हितसंबंधावर आधारलेले आहे. अशी भूमिका किसान सभा घेत नाही. म्हणजेच कामगार व भांडवलदार या दोन वर्गातील हितसंबंध जेवढ्या धारदारपणे वर्गीय पातळीवर मांडले जातात. तेवढ्या धारदारपणे शेतकरी व शेतमजूरांचे संबंध मांडले जात नाहीत.

**विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या :**

विदर्भातील भौगोलिक स्थितीवरून असे दिसून येते की, विदर्भाच्या पूर्व भागात जास्त काळ पाऊस पडतो तर विदर्भाच्या पश्चिम भागात पावसाचे प्रमाण कमी आहे. जास्त पावासाच्या प्रदेशात म्हणजे पूर्व विदर्भामध्ये भाताचे पिक सर्वाधिक घेतले जाते. तर पश्चिम विदर्भामध्ये कापसाचे पिक सर्वाधिक घेतले जाते. कापूस उत्पादनामध्ये शेतकऱ्यांना असंख्य अडचणी येतात. या अडचणींनंतर बाजारपेठेमध्ये कापसास उत्पादन खर्चाइतका भाव मिळत नाही. त्यातच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान होते. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येकडे वळतो. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता शासकीय पातळीवरून विविध पॅकेजीस व कर्जमाफी देण्यात आली. या शासकीय धोरणांची अंमलबजावणीच्या पाहणीसाठी डॉ. नरेंद्र जाधव समिती नोव्हेंबर २००७ मध्ये गठीत करण्यात आली. या समितीने जुलै २००८ रोजी महाराष्ट्र शासनास आपला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये त्यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागानुसार खातेदार व त्यांना मिळालेली कर्जमाफीची रक्कम, शेतकरी आत्महत्येची कारणे, कृषीउत्पादकतेचा दर, कृषीक्षेत्रासमोरील आव्हाने या गोष्टींचा समावेश केला आहे.

पश्चिम महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती पाहत असताना येथील बारमाही नद्यांमुळे शेतीस मुबलक पाणीपुरवठा आहे. तसेच जवळच बाजारपेठा उपलब्ध आहेत. पश्चिम महाराष्ट्रामधील सोलापूर, सातारा व अहमदनगर जिल्ह्याचा काही भाग वगळता उर्वरित पश्चिम महाराष्ट्रामध्ये आर्थिक सुबत्ता आहे. तसेच पावसाचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ रूजली आहे. सहकारामधून सहकारी साखर कारखाने, सहकारी दुग्ध संस्था, सहकारी सुतगिरण्या यांची निर्मिती झाली आहे. परिणामी पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने ऊस हे पिक घेतले जाते. ऊस हे नगदी पिक असल्याने शेतकऱ्यांच्या हाती खेळते भांडवल राहते. ही परिस्थिती विदर्भाच्या बाबतीमध्ये दिसून येत नाही. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे विदर्भामध्ये सहकार चळवळ

ISSN : 2348-7143
December-2018

रूजली नाही. त्याचे उदाहरण म्हणजे तेथे फक्त १३ सहकारी साखर कारखाने आहेत. तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये ७९ सहकारी साखर कारखाने आहेत. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी विदर्भाच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या संपन्न आहेत. तसेच ऊस पिकासंदर्भात झालेले नवनविन संशोधन, इतर पिकांसंदर्भात झालेले संशोधन यासाठी पश्चिम महाराष्ट्रामध्ये विविध कृषीप्रदर्शनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचवली जाते. तसेच शेतकरी संघटनांनी केलेल्या आंदोलनांमुळे शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण झाली आहे. परिणामी पश्चिम महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण क्वचितच आढळते. तर सहकार चळवळ न रूजल्याने विदर्भात शेतकरी एकाकी पडला आहे. त्यातच जागतिकीकरणाच्या स्वीकारामुळे त्याच्याकडे अपुरा भांडवलपुरवठा झाला. परिणामी अल्पउत्पादकतेसारखा दोष निर्माण झाला. त्यातून कर्जे काढणे व ती फेडण्यात आयुष्य घालविणे तरीही कर्जाचे डोंगर आहे तेवढेच राहणे या नैराश्येतून विदर्भातील शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झाले आहेत. अशा प्रकारचा फरक शेतकरी आत्महत्येबाबत विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रामध्ये दिसून येतो.

अशाप्रकारे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांचे विविध मुद्यांच्या आधारे तौलनिक अध्ययन केले आहे.

### संदर्भ ग्रंथ सूची

१. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन अहवाल, २००२-०३.
२. गावडे नामदेव - शेती वाचवा शेतकरी वाचवा, महाराष्ट्र राज्य किसान सभा, राजभुवन, मुंबई, २०११.
३. रसाळ सुरज - पायपीट बळी राजाची पाण्याच्या थेंबासाठी, स्वाभिमानी विचार, जयसिंगपूर, २०१२.
४. जिते य. रा. - लढा भूमी पुत्राचा, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९३.
५. आर्थिक संचनालय, महाराष्ट्र शासन, २०११-२०१२.
६. महाराष्ट्र आर्थिक पाहणी-२०१२-२०१३.
७. जाधव नरेंद्र - समिती अहवाल, महाराष्ट्र शासन, जुलै २००८.

# कामगार चळवळीचा राजकीय इतिहास

**प्रा. आर. वाय. वाघमारे**
अहिल्यादेवी महाविद्यालय, जळकोट
ता. जळकोट जि. लातूर

**प्रस्तावना :**

शोषण हा जगातील प्रत्येक भांडवलशाही व्यवस्थेचा स्थायी भाव आहे. भारतामध्ये तर शोषणाची एक रितसर जन्मजात शोषण पद्धती समाजव्यवस्थेने स्वीकारली होती. अर्थातच ब्राह्मण वर्ग धर्माच्या माध्यमातून ब्राह्मणेत्तराचे शोषण करतो, स्पृश्य अस्पृश्याचे शोषण करतात, पुरुष पारंपरिकतेचा आधार घेऊन स्त्री वर्गाचे शोषण करतो तर भांडवलदार किंवा कारखानदार कामगार वर्गाचे शोषण करतो. कामगारांचे शोषण हा शोषणाच्या वाटचालीतील आधुनिक काळातील एक प्रमुख शोषण प्रकार होय. कामगारांच्या असंतोषाची स्पष्ट अभिव्यक्ती विविध कामगार चळवळीमध्ये दिसून येते. कामगार जेंव्हा आपल्या सामाजिक, आर्थिक दर्जात सुधारणा करण्यासाठी संघटित होऊन संघर्ष करीत असतात. आपले माणूस म्हणून न्याय, हक्क आणि स्वातंत्र्यासाठी संघटित होऊन लढा देत असतात त्यातूनच कामगार चळवळीचा जन्म होत असतो.

भारतामध्ये इंग्रजाच्या राजवटीत यंत्र युगाची सुरुवात झाली आणि त्यातूनच संघटित कामगार वर्गाची सुरुवात झ ाली. इंग्रज राजवटीने भांडवलातून नफा कमवण्यासाठी कामगारांचे शोषण केले त्याविरुद्ध कामगार संघटित होऊन लढा देण्याचा प्रयत्न करत होते. खऱ्या अर्थाने पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच भारतात कामगार चळवळीची वाढ होऊ लागली व या काळातच तिला राष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले.

**उद्दिष्ट्ये :**

१. कामगार च ळवळीचा इतिहास जाणून घेणे.
२. कामगार चळवळीचा उद्देश जाणून घेणे.
३. कामगार संघटित होण्यामागे त्यांच्या प्रेरणा जाणून घेणे.
४. कामगार चळवळीचा सामाजिक व राजकीय हेतू जाणून घेणे.

**विषय विवेचन :**

कामगार संघटनाचा उदय लक्षात घेताना पुरातन काळात कामगार आणि मालक असे दोन घटक अस्तीत्वात होते. भांडवलदाराच्या अर्थातच मालकाच्या आर्थिक शोषणातून कामगारांना संघटना निर्माण कराव्या लागल्या, 'डॉ. सक्सेना यांच्या मते कामगार संघटना या भांडवलदार पद्धतीची आपत्ती आहे. ' मालकाद्वारे कामगारांची पिळवणूक, औद्योगिक क्रांती, शिक्षणाचा प्रसार, तांत्रिक परिवर्तन, भांडवलशाहीचा उदय, मार्क्स लेनिनच्या विचारांचा प्रभाव, कामाचे बदलते स्वरुप, अल्प वेतन, कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न, कामगारांचे कामाचे तास, काम करण्याच्या ठिकाणची परिस्थिती, स्त्रीयांची आणि मुलांची पिळवणूक आणि राजकीय पक्षांचा हातभार इत्यादी अनेक कारणांमुळे कामगार चळवळीचा जन्म झाला.

भारतात कामगार चळवळीच्या विजयाची बीजे एकोणीसाव्या शतकात रोवली गेली आणि विसाव्या शतकात तिचा विकास झाला. एकोणीसाव्या शतकात भारतात अवजड उद्योगाची सुरुवात
झाली. १८६० मध्ये भांडवलदारानी कामगारावर अंकुश ठेवण्यासाठी ब्रिटिश शासनाकडून कामगार करार भंग कायदा मंजूर करुन घेतला. त्यात कामगारांनी नौकरी सोडल्यास त्या विरुद्ध खटला भरण्याची तरतूद होती. १८७५ मध्ये

ISSN : 2348-7143
December-2018

महाराष्ट्राच्या मुंबईमध्ये संघटना बांधण्यास सुरुवात झाली. सोरबाजी शापूरजी बेंगानी यांनी कामगारांच्या हालाकीच्या परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधले. त्यांनी मुंबईतील कामगार, मुले, स्त्रिया यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवून कामगार चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. खऱ्या अर्थाने कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मोघाजी लोखंडे यांना श्रेय जाते. लोखंडे यांनी कामगारांच्या कामाच्या १४ तासांची वेळ आणि आठवडा सुट्टीही मिळत नसे याविरुद्ध मुंबईत परळ, भायखळा येथे कामगारांचे संघटन केले. २४ एप्रिल १८९० मध्ये १० हजार कामगारांची परिषद आयोजित करुन आठवडा सुट्टी, कामाचे तास कमी करणे, अपघाती मोबदला आणि इतर प्रश्न संघटनेच्या माध्यमातून फॅक्टरी कमिशनला सादर केले. परिणामी स्वरुप कामगारांना साप्ताहित सुट्टी जाहीर करण्यात आली. त्यातून लोखंडे यांनी बॉम्बे मील हँड असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना २३ सप्टेंबर १८९० रोजी मुंबई मध्ये स्थापन केली. ही कामगार संघटना भारतातील संघटित कामगार चळवळीची सुरुवात मानली जाते. त्यांच्या प्रयत्नामुळेच १० जून १८९० पासून कामगारांना रविवारची साप्ताहिक सुट्टी मिळू लागली.

पहिल्या महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने कामगार चळवळीची वाढ होवू लागली व याकाळातच तिला राष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले. याचे प्रमुख कारण म्हणजे स्वातंत्र्य चळवळ आणि रशियन राज्यक्रांती. परिणामी १९२० साली अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस (आयटक) स्थापना झाली. पुढे १९२९ साली आयटकमध्ये फुट पडून ऑल इंडिया ट्रेड युनियन फेडरेशनची स्थापना झाली. या संघटनेने शांततेच्या सनदशीर मार्गाने कामगारांच्या समस्या दूर करणे हे ध्येय ठेवले होते. याउलट आयटक साम्यवादी होती. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादाचे वर्चस्व कमी करण्यासाठी इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेसची स्थापना झाली. यानंतर समाजवादी विचारसरणीच्या लोकांनी हिंदू मजदूर सभा नामक कामगार संघटना स्थापन केली. याच बरोबर जनसंघ पुरस्कारित भारतीय मजदूर संघ या नावाची नवी कामगार संघटना स्थापन केली. त्याच बरोबर युनायटेड ट्रेड युनियन कॉंग्रेस ही राजकारणापासून अलिप्त असलेली आणखी एक कामगार संघटना निर्माण केली गेली. प्रत्येक क्षेत्रात एकच कामगार संघटना असावी. कामगार चळवळ पक्षीय राजकारणापासून अलिप्त ठेवावी आणि कार्यकर्ते व नेते संघटनेतूनच निर्माण व्हावेत अशा धोरणाचा सध्या पुरस्कार केला जात आहे.

१९२५ नंतर डांगे, जोगळेकर, निमकर, रणदिवे अशा कम्युनिस्ट नेत्यांच्या प्रयत्नामुळे डाव्या साम्यवादी कामगार संघटनेचे बळ वाढले. जगातील कामगारानी एक व्हा असा जाहीरनामा प्रस्तुत करणाऱ्या कार्ल मार्क्सच्या विचारानी चालणाऱ्या सवर्ण कामगारांना चळवळीत सामील करुन घेण्यात तात्विक अडचण नव्हतीच. पण येथे ही जातीय व्यवस्था आडवी आली. सवर्णांच्या चळवळीत अस्पृश्य कामगारांचे प्रश्न सुटणार नाहीत असे वाटल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य कामगारांची तसेच भारतीय शेतमजूर व कामगार वर्गाच्या हिताच्या रक्षणार्थ ऑगस्ट १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. तसेच स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात कामगार वर्गाच्या हितास विशेष प्राधान्य दिल्याचे दिसते. परिणामी कामगारांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष जवळचा वाटू लागला त्यामुळेच १९३७ च्या मुंबई विधानसभेच्या निवडणूकीमध्ये स्वतंत्र मजूर पक्षाने १८ जागा जिंकल्या स्वतंत्र मजूर पक्षाने ७ नोव्हेंबर १९३८ मध्ये कामगाराच्या प्रश्नाबाबत व्यापक स्वरुपाचा संप घडवून आणला हा संप मोडून काढण्यासाठी पोलीसी बळाचा वापर करण्यात आला. यामध्ये अनेक कार्यकर्ते जखमी व मारले गेले. तरीही हा संप यशस्वी करण्यात आला. यावरुन कामगारांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर प्रचंड विश्वास असल्याचे निष्पन्न झाले. आर्थिक इतिहासात राजकीय तसेच आर्थिक कारणाकरीताही सामाजिक सुरक्षा, कल्याण योजना उपलब्ध करणे, वेतन घट रोखणे याकरिता औद्योगिक व्यवस्थापनात कामगार चळवळी जन्म घेत असतात. प्रगत राष्टांमधूनही कामगार संघटनांना वैधिक मान्यता आणि भांडवलदार व शासन यापासून संरक्षण यासाठी ही कामगार चळवळी उदयास आलेल्या आहेत. या सर्व प्रकारच्या कामगार चळवळीचे अंतिम हेतू कामगारांची आर्थिक स्थिती सुधारणे, रोजगाराप्रती संघटनेतील

ISSN : 2348-7143
December-2018

कामगारांच्या रोजगाराबाबतच्या अग्रहक्कास मान्यता आणि कामगारहिताच्या दृष्टिकोनातून कामाच्या परिस्थितीचे नियंत्रण करणे यासाठी नवनव्या कामगार चळवळी जन्मास येतच राहतील.

**निष्कर्ष :**

१. अनेक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगार संघटना असल्या तरी सर्व संघटनांचा आर्थिक स्थिती सुधारणे तसेच कामगारांचे मानवी हक्क जपणे हाच उद्देश दिसून येतो.
२. सामुहिकरित्या समस्यांचे निराकरण संघटनेतून होते. या विश्वासानेच कामगार संघटना निर्माण झाल्याचे दिसून येते.
३. कामगार संघटना या जाती व राजकीय दृष्टीने प्रेरित झाल्याच्या दिसून येतात.
४. कामगार संघटनेवर जागतिक विचारसरणीचाही प्रभाव दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. भारतातील सामाजिक चळवळी, प्रा. श्रीकांत गायकवाड, प्रा. रामकिशन मांजरे, अरुणा प्रकाशन, लातूर, २८ सप्टेंबर २००९.
२. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास - प्रा. डॉ. अनिल सिंगारे, अरुणा प्रकाशन, लातूर, २६ नोव्हेंबर २००९.
३. वर्चस्व आणि सामाजिक चिकित्सा - गोपाळ गुरु, हरिती प्रकाशन, पुणे, जानेवारी २०१५.
४. www./marathisrushti.com/articles/the story sunday holiday
५. महाराष्ट्र व्यक्ती आणि वल्ली - फेब्रुवारी २००९.
६. साप्ताहिक सकाळ, ९ मार्च २०१८.

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महाराष्ट्राच्या शेतकरी चळवळीतील महत्त्वाचे नेतृत्त्वः खा. राजू शेट्टी

**डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर**
राज्यशास्त्र विभाग
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली.
मो. ८२७५८९६१००/८४८२९८९१०१
ई–मेलः kdkhaladkar1@gmail.com

ऊस व दूध आंदोलनामुळे वर्तमान महाराष्ट्राच्या शेतकरी चळवळीतील महत्त्वाचे शेतकरी नेते म्हणून खसदार राजू शेट्टी यांना ओळखले जाते. राजू शेट्टी आणि त्यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना हे नाव आज शेतकरी वर्गात आणि राजकीय क्षेत्रांमध्ये भरतीय पातळीवर जाऊन पोहचलेलं आहे. १९८० नंतर महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीला, शेतकऱ्यांच्या आंदोलनाला नवी वैचारिक भूमिका, आयाम देणारे आणि शेतकऱ्यांना उमजेल अशा भाषेत शेतीच्या अर्थकारणाची सैद्धांतिक मांडणी करणारे शरद जोशी यांच्या वैचारिक मुशीत जडणघडण झालेल्या अनेक शेतकरी कार्यकर्ते, नेत्यांपैकी राजू शेट्टी हे एक महत्त्वाचे शेतकरी नेते आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्त्वात ऊस, दूध उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच शेतकऱ्यांच्या इतरही प्रश्न, समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उभारलेल्या शेतकरी चळवळीची, आंदोलनाची विश्लेषणात्मक स्वरूपात मांडणी केली आहे.

राजू शेट्टींवर विद्यार्थीदशेपासूनच शरद जोशींच्या विचारांचा प्रभाव होता. विद्यार्थी दशेतच त्यांनी शेतकरी संघटनेच्या प्रकाशित सर्व साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. राजू शेट्टी १९९२–९३ पासून शेतकरी संघटनेत सक्रिय सहभागी झाले. त्यांनी शिरोळ तालुक्यात ऊस दर प्रश्नांवर १९९५ पासून चळवळ उभारली. चळवळीला थोडेफार यश मिळाले ते १९९६ साली. त्यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्यावरील विश्वास वाढीस लागला. पुढे अल्पावधीतच संघटनेतील काम पाहून त्यांची शिरोळ तालुका शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी (१९९५) निवड केली. शरद जोशींच्या नेतृत्त्वात १९९६ साली कोल्हापूर येथे झालेल्या ऊस झोनबंदी विरोधी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या विविध प्रश्नांवर अनेक आंदोलने केली. नोव्हेंबर २००० मध्ये मिरज–सांगली येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या आठव्या अधिवेशनाचे कार्याध्यक्ष म्हणून संयोजनाची यशस्वी जबाबदारी पार पाडल्याची दखल घेत संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड (मे २००१) केली. चळवळीतल कामाच्या बळावर फेब्रुवारी २००२ मध्ये झालेल्या कोल्हापूर जिल्हापरिषद, निवडणूकीत उदगाव (ता.शिरोळ) मतदारसंघातून निवडून आले. (शेट्टी, आत्मकथन २०१३)

आजपर्यंतचा विचार करता प्रत्येक वर्षी ऊसाचा गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी काही महिने अगोदर देशांतर्गत बाजारपेठेत साखरेच्या दरात घसरण होते. त्याचा परिणाम ऊस दरावर होतो. अशीच काहींशी परिस्थिती २००२–२००३ चा गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी निर्माण झाली होती. त्यामुळे साखर कारखानदार ऊसास ज्यादा दर देण्याच्या मानसिकतेत नव्हते. अशा स्थितीत राजू शेट्टींनी गेल्या पाच वर्षापासून केलेल्या वैचारिक जागृतीमुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसत होता. या पार्श्वभूमीवर ऊस दर प्रश्नांवर व इतर मुद्यांवर चर्चा करण्यासाठी २२ नोव्हेंबर २००२ रोजी राजू शेट्टींच्या नेतृत्वात शेतकरी संघटनेची जयसिंगपूर येथे पश्चिम महाराष्ट्रातील पहिली ऊस परिषद झाली. यावेळी ८५०रू पहिली उचल मागीतली. मात्र कारखानदार

ISSN : 2348-7143
December-2018

हा दर देण्यास तयार नसल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ७ नोव्हेंबर पासून राजू शेट्टींच्या नेतृत्वात ऊसतोड बंद आंदोलन उभारले. यावर्षीच्या गळीत हंगामासाठी केंद्रीय कृषिमूल्य आयोगाने निश्चित केलेला किमान वैधानिक दर प्रतीटन (६९९.५०रु) घेतल्या शिवाय यामागे हटायचे नाही, या जिद्दीतून शेतकऱ्यांचे चालू असलेले आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न कारखानदार व शासन करत होते. याचवेळी शेट्टींवर प्राणघातक हल्ला झाला. परिणामी शेतकरी अधिक आक्रमकपणे आंदोलनात सहभगी झाले. शासन व कारखानदार ऊसदरासंबंधी ठोस निर्णय घेत नसल्याणे ऊस गाळप हगांम लांबत जाऊन शेतकऱ्यांचे व ऊसतोड मजूरांचे आर्थिक नुकसान होत होते. यादरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी खा. सदाशिवराव मंडलिक यांचा लवाद नेमला. त्यानुसार कोल्हापूर येथे २७ नोव्हेंबर २००२ रोजी कारखानदारांचे प्रतिनिधी, लवाद व संघटना प्रतिनिधी बैठकीत सर्वसंमतीने पहिली उचल प्रतिटन ७५० रु, दुसरा हप्ता ५०रू. देण्याचे मान्य केले. हा दर जिल्ह्यातील बहुतेक कारखानदारांनी दिला. तर उर्वरित महाराष्ट्रात पहिला हप्ता प्रतीटन ५६० रू दिला. (शेट्टी, आत्मकथन २०१३ पृ.६८,६९,७०) शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेट्टींच्या नेतृत्त्वातील लढयाला मिळालेले हे यश त्यांच्या पुढील वाटचालीसाठी बळ देणरे ठरले.

चळवळीतील माणसं संधी मिळाली तर चांगला लोकप्रतिनिधी म्हणून सुद्धा काम करू शकतात. हे शेट्टींनी जिल्हापरिषद सदस्य असताना शेतकरी व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवितांना दाखवून दिले होते. यातूनच विधानसभेत पाठविण्यासाठी आपल्याला एक चांगला माणूस मिळाला, अशी लोकभावना तयार झाली. दरम्यान फेब्रुवारी २००४ मध्ये लोकसभा निवडणूका जाहिर झाल्या आणि राजू शेट्टींना एका कटु प्रंसगाला सामोरे जावे लागले. कारण २००४ च्या लोकसभा विधनसभा, निवडणूकात शरद जोशींनी तत्कालीन केंद्र–राज्यातील सत्ताधारी भाजप प्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एन.डी.ए.) बिनर्शत पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्याला राजू शेट्टींनी विरोध केला. कारण जातीयवादी, सांप्रदायिक विचारधरेच्या पक्षांना पाठिंबा देणं संघटनेच्या सैद्धांतिक परिभाषेत तसेच राजकीय व्यवहारात बसत नाही; असे त्यांचे मत होते. त्यावेळी शरद जोशी आणि राजू शेट्टी यांच्यामध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. परिणामी शेट्टींची शेतकरी संघटनेतून हकलपट्टी करण्यात आली. शेतकरी संघटनेच्या विचारधारेवर अढळ निष्ठा असणाऱ्या शेट्टींनी प्रचलित कोणत्याही राजकीय पक्षात न जाता अल्पावधीतच कोल्हापूर येथे मोठा शेतकरी मेळावा घेतला. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' स्थापन (१७ फेब्रुवारी २००४) करण्याचा निर्णय घेताला'' (समाज प्रबोधन पत्रिका–जुलै–सप्टें.२०१४, पृ.८०–८१) शेट्टींनी या संघटनेच्या माध्यमातून आगामी विधनसभा निवडणूक (ऑक्टोबर २००४) लढण्याचे ठरवले होते. त्यासाठी लवकरच १५ सप्टेंबर २००४ रोजी जयसिंगपूर येथे ऊस परिषद घेण्याचा निर्णय घेतला. या परिषदेत प्रतीटन पहिला हप्ता विनाकपात १२००/–रु व अंतिम दर १५००/–रु कारखानदारांनी देण्याची मागणी केली. ही तिसरी ऊस परिषद शेट्टींच्या पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्त्वावर शिक्का मोर्तब करणरी व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या बांधणीच्या दृष्टिने निर्णायक व महत्त्वाची ठरली. शेतकरी चळवळ राजकारण विरहीत ठेवण्याच्या हेतूने शेट्टींनी ऊस परिषदेत विधानसभा निवडणूकीवर भाष्य केले नाही. परिषदेनंतर दोन दिवसांनी शिरोळ विधानसभा मतदार संघातून निवडणूकीचा उमेदवारी अर्ज भरला. त्यावेळी शेट्टींची आर्थिक स्थिती बेताची असल्याने लोकवर्गणीतून निवडणूक निधी जमा केला. १६ ऑक्टो.२००४ हा दिवस राजू शेट्टी यांच्या राजकीय वाटचालीत महत्त्वाचा ठरला. कारण या दिवशी ते विधानसभा आमदार म्हणून निवडून आले होते. याच दिवशी जयसिंगपूरच्या विजयी शेतकरी मेळाव्यात ऊस परिषदेत मागणी केलेल्या ऊसदराचा निर्णय

ISSN : 2348-7143
December-2018

दक्षिण महाराष्ट्रातील कारखनदारांनी २५ ऑक्टोंबर पर्यंत न घेता कारखाने सुरू केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा राजू शेट्टींनी दिला. मात्र याकडे दुर्लक्ष करत काही कारखाने सुरू झाल्याने ऊसतोड व वाहतूक बंद आंदोलन उभारले. आंदोलन अधिक हिंसक बनत चालल्याने. व गाळप हंगाम कालावधी वाढत चालल्याने याची दखल शासन व कारखनदारांना घेणे भाग पडले. या पार्श्वभूमीवर ८ नोव्हेंबर २००४ रोजी शासन, कारखाना व संघटना प्रतिनिधी यांच्यात कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत विनाकपात पहिली उचल प्रतीटन १०००/—रु देणे तसेच हंगाम संपण्यापूर्वी साखर दर वाढीचा विचार करून व संघटना प्रतिनिधींशी चर्चा करून वाढीव शंभर रुपये दर देण्याबाबत निर्णय घेणे (खळदकर, पीएच.डी.शोधप्रबंध २०१५, पृ. २६५,२६६,२६७) असा उभय मान्य प्रतीटन ११००/—रु दराचा तोडगा निघाला. हा ऊस दर मिळवण्यात राजू शेट्टींची लढवय्या भूमिका महत्त्वाची ठरली.

सन २००६—०७ च्या ऊस गाळप हंगामाच्या सुरुवातीलाच कारखानदार साखर उत्पादनाचा वाढता खर्च, बाजारपेठेत साखर दरात झालेली घसरण, शासनाचे निर्यात बंदीचे धोरण. आदी कारण सांगत, केंद्र शासनाने किमान वैधानिक दर (पायाभूत ९ टक्के उताऱ्यास प्रतीटन ८००रु. २५ पै. व पुढील १ टक्के उताऱ्यास प्रतीटन ९० रू.) देण्यास तयार नव्हते. कारखानदारांच्या या भूमिकेच्या विरोधात शेतकरी शेट्टींच्या नेतृत्वात संघटित होऊन विरोध करू लागला. ऑक्टो. २००६ मध्ये राजू शेट्टींच्या नेतृत्वातील पाचव्या ऊस परिषदेत प्रतीटन १८००रू विनाकपात पहिल्या उचलीची मागणी केली. मात्र शासन व कारखानदार यांनी या मागणीकडे दुर्लक्ष करत कारखाने सुरू करण्याची तयारी केल्याने दक्षिण महाराष्ट्रात शेट्टींच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन उभारले. या आंदोलनाची दखल घेत 'शासन व कारखानदार ऊस उत्पादकांबरोबर चर्चेस तयार झाले. या पार्श्वभूमीवर ११ नोव्हें २००६ रोजी कोल्हापूर येथे महाराष्ट्र राज्य साखर संघाचे तत्कालीन अध्यक्ष विक्रमसिंह घाटगे, कारखानदार व शेतकरी संघटना प्रतिनिधी यांच्यातील बैठकीत पहिली उचल प्रतीटन ९०० रू व दुसरा हप्ता ३८० रू द्यायचा अशा एकूण १२८० रू प्रतीटन दर देण्याचा लेखी करार झाला. बाजार पेठेत साखर दरात घसरण झाल्याने संघटनेने हा करार स्वीकारला होता'. (शेट्टी, आत्मकथन —२०१३,पृ.१२०) शेतकरी चळवळीच्या इतिहासात प्रथमच असा लेखी स्वरूपाचा ऊस दर करार झाला होता. हे राजू शेट्टींच्या नेतृत्वातील चळवळीचं यश होतं

दूध व्यवसाय हा प.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा शेतीपूरक असलेला जोड व्यवसाय उत्पादन खर्चाच्या तुलनेत अल्पदर मिळत असल्याने संकटात सापडला होतो. अशावेळी 'कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील दूध उत्पादकांनी शेट्टींकडे अशी मागणी केली की, तुम्ही ऊस उत्पादकांना न्याय मिळवून दिला तसा दूध उत्पादकांनाही द्यावा. त्यावेळी दुधाचा दर सहा फॅटला साडे आकरा रुपये तर पाण्याची बाटली पंधरा रूपयाला होती. ही विसंगती शेट्टींच्या लक्षात आली होती. अशा स्थितीत दूध आंदोलन उभा करण्यापूर्वी दूधाच्या थेंबाथेंबाचे अर्थकारण लोकांना पटवून देणे शेट्टींना गरजेचे वाटले. त्यामुळे त्यांनी वर्षभर वाडया—वस्त्यांवर जाऊन लोकांचे प्रबोधन केले. दूध गोळा करून ते विकणाऱ्यांपर्यंत सर्वांची आर्थिक परिस्थिती सुधारली, पण ज्यांच्या गोटयातून हे दूध जाते त्यांचीच परिस्थिती बिकट का? त्याची कारणमीमांसा शेट्टींनी लोकांना पटवून दिली. यावर्षी एकाचवेळी ऊस व दूध आंदोलन चालू ठेवण्याचा निर्णय झाला होता.' (शेट्टी, आत्मकथन २०१३,पृ.११९) या पार्श्वभूमीवर १६ ऑक्टोंबर २००६ रोजी भोगावती, जि.कोल्हापूर येथे झालेल्या पहिल्या दूध परिषदेत राजू शेट्टी यांनी गायीच्या दूधाला प्रतिलिटर १८रू भवाची मागणी शासन व दूध संघाकडे केली.

ISSN : 2348-7143
December-2018

या मागणीच्या पूर्ततेसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांनी २४ ऑक्टोबर २००६ रोजी एक दिवसाचे लाक्षणिक दूध बंद आंदोलन केले.' (यादव, २००८,पृ.४२) याला लोकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

दूध उत्पादकांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने राजू शेट्टींच्या नेतृत्वात हजारो ऊस व दूध उत्पादकांनी संपूर्ण 'कोल्हापूर जिल्हयातून १९ एप्रिल ते १ मे २००७ अशी ३८० कि.मी.ची पायी निर्धार यात्रा काढली. कोल्हापूर येथील १ मेच्या सांगता सभेत शेट्टींनी येत्या वीस दिवसात दूध दर वाढीचा शासन निर्णय न झाल्यास मुंबईचा दूध पुरवठा बंद करण्याचा इशारा दिला. शासन निर्णय घेत नसल्याने २५ मे पासून आंदोलन सुरू झाले. तत्पूर्वी तत्कालीन दुग्धविकास राज्यमंत्री हसन मुश्रीफ व राजू शेट्टी यांच्यात मुंबई येथे झालेली बैठक निष्फळ ठरली. दूध आंदोलनाला वाढता लोकांचा पाठिंबा पहाता मुख्यमंत्र्यानी एक महिन्यात दूध दरवाढीचे आश्वासन दिल्याने चार दिवसाचे आंदोलन दोन दिवसांवर आणत २७ मे रोजी मागे घेतले'. (यादव २००८, पृ.४२,४३) मात्र मुख्यमंत्र्यांनी आश्वासन न पाळल्याने २७ जून २००७ पासून राजूशेट्टींच्या नेतृत्वात दूध उत्पादकांनी बेमुदत दूध बंद आंदोलन उभारले.

पोलिस संरक्षणात मुंबई, पुण्याला जाणारे दूध आंदोलन कर्त्यांनी पूर्णपणे बंद केले. आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या सर्व भगात या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद मिळत होता. लाखो लिटर दूध संकलन बंद झाल्याने कोटयावधीची उलाढाल ठप्प झाली. अखेर शासनाने या आंदोलनाची दखल घेतली. ३० जून २००७ रोजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील व राजू शेट्टी यांच्यात सांगली विश्रामगृहात झालेल्या बैठकित दूध दर वाढी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अभ्यास गट नेमण्याचे व येत्या पावसाळी अधिवेशनात दूध दर वाढ करण्याचे आश्वासन सरकारच्या वतीने दिले. हा निर्णय शेट्टींनी मान्य करत ३० जून रोजी आंदोलन स्थगीत केले.(उपरोक्त यादव, पृ.४५,४६,४७.) यानंतर जुलै मध्ये सुरू झालेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आ.राजू शेट्टींनी दूधदर प्रश्नासंबंधी सभगृहात लक्षवेधी मांडली. त्याला शासन प्रतिसाद देत नसल्याचे पाहून विरोधी पक्षाच्या समर्थक सहकारी आमदारांच्या मदतीने दोन तीन वेळा सभागृहाचे कामकाज बंद पाडले. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी माजी सनदी अधिकारी अशोक बसाक यांच्या अध्यक्षतेखाली १६ जुलै २००७ रोजी समिती नेमली'. (शेट्टी, २०१३, पृ.१३८,१३९) बसाक समितीच्या अहवालानंतर महाराष्ट्र शासनाने म्हैशीच्या व गायीच्या दुधाला प्रतिलिटर अनुक्रमे २रू. व १रू. दरवाढ जाहीर केली. (यादव–२००८, पृ.५३) या निर्णयाने राज्यातील दूध उत्पादकांना कोटयावधी रूपयांचा आर्थिक फायदा झाला. राजू शेट्टींच्या नेतृत्वात दोन वर्षे चाललेल्या दूध आंदोलनाचे हे फलित होते.

२००८–०९ हे निवडणूकांचे वर्ष असल्याने ऑक्टोबर २००८ मध्ये झालेल्या सातव्या ऊस परिषदेत शेट्टींनी पहिली उचल प्रतीटन १८००रू ची मागणी केली. मात्र हंगामाच्या प्रारंभीच बाजारपेठेतील साखरेचे दर पडल्याने एफआरपी नुसार ऊस दर देण्यास अडचण असल्याचे कारखानदार सांगू लागले. या पार्श्वभूमीवर शेट्टींनी १८००रु ऊस दर देण्याचे कारखाने मान्य करत नाहीत तोपर्यंत कारखाने सुरू होऊ न देण्याचे व ऊसतोड व वाहतूक बंद पाडण्याचे आवाहन शेतकऱ्यांना करत आंदोलनाला सुरूवात केली. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, अ.नगर जिल्ह्यासह आंदोलनाची व्याप्ती राज्यभर वाढत जाऊन ते आक्रमक बनले होते. अखेर आंदोलनाची दखल घेत हंगामाचा वाढता कालावधी व आगामी वर्षातील लोकसभा, विधानसभा निवडणुका (२००९) लक्षात घेऊन ऊस दरावर तोडगा काढण्यासाठी कारखानदार व संघटना प्रतिनिधी यांच्यात कोल्हापूर येथे झालेल्या बैठकीत पहिली उचल १२५०रू व दुसरा हप्ता २५०रू अशा एकूण १५००रू प्रतीटन अंतिम दर देण्याचे मान्य झाले. (खळदकर, पीएच.डी. शोधप्रबंध जून २०१५, पृ. २९१,९२) काही कारखन्यांनी मात्र

ISSN : 2348-7143
December-2018

निवडणूक वर्ष असल्याने ठरलेल्या दरापेक्षा अधिक दर दिला. दरम्यान, एप्रिल–मे २००९ मध्ये होणाऱ्या लोकसभेची निवडणूक जाहिर झाली. राजू शेट्टी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीच्या निवेदिता मानेंचा पराभव करून खासदार म्हणून निवडून आले.

राजू शेट्टीच्या नेतृत्वात ऑक्टोबर २०१३ मध्ये बाराव्या ऊस परिषदेत २०१३–२०१४ च्या गळीत हंगामाच्या ऊसाला पहिली उचल प्रतीटन ३००० रू.ची मागणी केली. आपल्या मागण्या लवकर मान्य होतील म्हणून राजू शेट्टींनी आंदोलनासाठी या वर्षी कराड या मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या गावाची निवड केली. नोव्हेंबरचा शेवटचा अठवडा प. महाराष्ट्र ऊस आंदोलनांची संघर्षभूमी बनली होती. तरीही कारखानदार व शासन ऊस उत्पादकांशी चर्चा करायला पुढे येत नव्हते. अखेर ३०००रू. दरावर ठाम असणाऱ्या शेट्टींनी हंगाम लांबत चालल्याने शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी, कारखानदारांबरोबरच्या बैठकीत प्रतीटन पहिली उचल २२००रू आणि ४५०रू दुसरा हप्ता अशा एकूण २६००रू प्रतीटन दराचा तोडगा मान्य करत आंदोलन स्थगित केले' (नवरात्र, विशेषांक, २०१४उपरोक्त,पृ.७०)

२०१४ हे वर्ष राजू शेट्टींच्या राजकीय वाटचालीतील महत्वाचे वर्ष होते. शरद जोशी यांच्या भजपा पाठिंबाला विरोध करणारे शेट्टी यांनी २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणीत एनडीए आघाडीत सहभागी झाले. त्याचबरोबर हातकणंगले लोकसभा मतदार संघात काँग्रेसचे श्री कल्लाप्पाण्णा आवाडे यांचा पराभव करत दुसऱ्यांदा खासदार झाले. संपूर्ण राजकीय कारकीर्दीत प्रथमच सत्ताधारी झालेले शेट्टी यंदाच्या ऊस परिषदेत कोणता निर्णय घेणार याकडे ऊस उत्पादक व साखर कारखदारांचे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर १ नोव्हेंबर २०१४ रोजी झालेल्या तेराव्या ऊस परिषदेत खा. शेट्टींनी यावर्षी पहिली उचल विनाकपात एफ.आर.पी नुसार देण्याची मागणी केली. (दै. लोकमत ०२ नोव्हें. २०१४, पृ.१) त्यानुसार दर देण्यास कारखादारांना भाग पाडले.

सन २०१५ साली बाजारात साखरेचे दर घससरल्याने साखर उद्योग आर्थिक दृष्टया अडचणीत सापडला होतो. अशातच राज्य बँकेने साखर मूल्यांकनात घट केली होती. कायाद्यानुसार ऊसतोड केल्यानंतर चौदा दिवसांमध्ये एफआरपी देणे बंधनकारक असल्याने सद्य:स्थितीत या नियमाचे पालन करणे साखर उद्योगांच्या आर्थिक कुवतीच्या बाहेर असल्याचे सांगत या हंगामात एफआरपी एकरक्कमी न देता दोन–तीन तुकडयांमध्ये देण्याचा साखर कारखानदारांचा मनसुबा होता. या पार्श्वभूमीवर राजू शेट्टींच्या नेतृत्वात ऑक्टोंबर २०१५ मध्ये झालेल्या चौदाव्या ऊसपरिषदेत विनाकपात एकरक्कमी एफआरपी नुसार (प्रतीटन ९.५ टक्के उताऱ्याला, प्रतीटन २३००रू त्यापुढील वाढीव एक टक्के उताऱ्याला २४२रू) ऊस दराची मागणी केली. तसेच एफआरपी न देणाऱ्या कारखानदारांना तुरूंगात टाकण्याची मागणी केली. (दै.म.टा. १ नोव्हें. २०१५, पृ.२) त्यानंतर एफआरपीची रक्कम एकरक्कमी मिळावी अशी मागणी करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी साखर आयुक्तांनी संघटनेला कायाद्यानुसार एफआरपी न दिल्यास कारखाण्यांवर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले. (दै. लोकसत्ता २५ जाने. २०१६, पृ.३) कारखाण्यांनी त्यानुसार दर देण्याचा प्रयत्न केला. सन २०१६–१७ च्या गळीत हंगामता ऊसाची एफाआरपी कृषिमूल्य आयोगाने गतवर्षी इतकीच म्हणजे साडेनऊ टक्के साखर उताऱ्याला २३००रू त्या पुढील प्रत्येक एकटक्का वाढीव उताऱ्या मागे २४२ रू जादा एफआरपी सुचवली. अशा स्थितीत राजू शेट्टी, मंत्री सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीत २५ ऑक्टो २०१६ रोजी झालेल्या पंधराव्या ऊस परिषेदत ऊसाची पहिली उचल प्रतीटन ३२००रू मागणी केली. मात्र साखरेचे दर उतरल्याचे कारण सांगत संघटनेने मागणी केलेला दर न देता

ISSN : 2348-7143
December-2018

कारखाण्यांनी पहिली उचल प्रतीटन २५०० ते २७००रू च्या दरम्यान दिली.' (दै. लोकमत, १५ मार्च २०१७, पृ.१०)

२०१७ हे वर्ष स्वाभिमानी शेतकरी संघटनेसाठी हानीकारक ठरले. कारण मंत्री सदाभाऊ खोत यांनी शेतकऱ्यांशी व संघटनेच्या भूमीकेशी प्रतारणा केल्याचे कारण देत त्यांची संघटेतून हकालपट्टी (७ ऑगस्ट २०१७, दशरथ सावंत समिती) करण्यात आली होती. त्याचबरोबर सत्ताधारी भाजप प्रणीत एनडीए आघाडीतून संघटना बाहेर पडली. या पार्श्वभूमीवर राजू शेट्टींच्या नेतृत्वात २८ ऑक्टो. २०१७ रोजी झालेल्या सोहळाव्या ऊसपरिषदेत प्रतीटन विनाकारण पहिली उचल ३४४०रू ची मागणी केली. ती न दिल्यास संघर्षाचा इशारा दिला. (दै. लोकसत्ता, २९ऑक्टो.२०१७,पृ.१) दुसऱ्याच दिवशी कार्यकर्त्यांनी ऊस वाहतूक रोखल्याने ऊस गाळपाच्या तयारीत असलेल्या साखर कारखान्यांची कोंडी झाली. त्यावेळी संघटनेने मागणी केलेला ऊस दर साखर दरात घसरण झाल्याने देणे कठीण असल्याचे कारखानदार सांगत होते. त्याचबरोबर शासनही एफआरपी पेक्षा जादा दर देता येणार नाही असे म्हणत होते. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनानी आंदोलन अधिक तीव्र केले होते. अखेर संघटना व कारखानदार यांनी समन्वयाचा मार्ग स्वीकारत कोल्हापूरच्या शासकीय विश्रामगृहात मंत्री चंद्रकांत पाटील, कारखाना व शेतकरी संघटना प्रतिनिधी यांच्यात झालेल्या बैठकीत (६ नोव्हें. २०१७) एफआरपी अधिक २००रू प्रतीटन देण्याचा निर्णय झाला. अधिक ताणून न धरता स्वाभिमानी शे. संघटनेने ही तडजोड मान्य करत आंदोलन स्थगित केले. (दै.लोकसत्ता, ७ नोव्हें.२०१७, पृ.१) याचवर्षी राज्य व केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणावर टिका करत 'स्वाभिमनी संघटनेसह देशातील ९३ शेतकरी संघटनांनी दिल्लीत २० नोव्हेंबर २०१७ रोजी समांतर किसान संसद भरवली. या संसदेच्या प्रथम सत्रात देशतील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तर दुसऱ्या सत्रात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या ५४३ विधवा स्त्रीयांसाठी राखीव ठेवले होते. देशभरातून अडीच लाख शेतकरी उपस्थित होते. किसान संसदेत शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती, शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभव मिळावा या मांडलेल्या विधेयकांना २२ राजकीय पक्षांनी व ९३ शेतकरी संघटनांनी पाठिंबा दिला' (दै.लोकमत २१ नोव्हें. २०१७, पृ. १,१२) दिल्लीतील ही किसान संसद आयोजित करण्यात खा. राजू शेट्टींची भूमिका महत्वाची होती.

सन २००६–२००७ नंतर दुसऱ्यांदा जुलै २०१८ पासून राजू शेट्टींच्या नेतृत्वात दूध बंद आंदोलन सुरू झाले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने गायीच्या दूधाला प्रती लिटर ५ रू वाढवून द्यावेत अशी मागणी करत दूध बंद आंदोलनाला सुरूवात केली. 'दुधाला योग्य भाव मिळावा म्हणून खा. राजू शेट्टी यांनी १६ जुलै २०१८ रोजी पंढरपुरात विठ्ठलाला दूधाचा अभिषेक घालून दूध बंद आंदोलनाला सुरूवात केली. त्यानंतर राज्यात ठिकठिकाणी दूध दराचं आंदोलन तीव्र झालं. अनेक ठिकाणी रस्त्यावर दूध ओतून देत मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद सारख्या मोठया शहरांना जाणारे दूध आडवले. या दूध बंद आंदोलनाला कोलहपूरच्या गोकुळ दूध संघाने एक दिवस दूध संकलन बंद ठेवून पाठिंबा दिला. (दै. लोकमत १९ जुलै २०१८, पृ.१०) अखेर गायीच्या दूधाला प्रतिलिटर पाच रू. अनुदान शेतकऱ्यांच्या खत्यावर जमा करावे; या मागणीसाठी शेट्टींच्या नेतृत्वात स्वाभिमानी शे.संघटनेकडून गेले चार दिवस राज्यात सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेत, २० जुलै २०१८ रोजी दुग्ध विकास मंत्री व मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत गायीच्या दूधाला प्रतिलिटर २५ रूपये दर देण्याचा निर्णय घेऊन, तोटा भरून काढण्याच्या दृष्टिने दूध भुकटी व दूध निर्यात करणाऱ्या दूध संघासाठी प्रतिकिलो ५०रू व दूधासाठी प्रतिलिटर ५ रू अशी अनुदान योजना जाहीर केली'. (दै.महाराष्ट्र टाईम्स, २१

ISSN : 2348-7143
December-2018

जुलै २०१८,पृ. १,२) यामुळे महाराष्ट्रातील दूध उत्पादकांना कोटयावधी रूपयाचा आर्थिक फायदा झाला. हे राजू शेट्टींच्या नेतृत्वातील दूध बंद आंदोलनाचे फलित दिसून येते.

सन २०१८–१९ च्या गळीत हंगामात 'प.महाराष्ट्रासाठी (सरासरी १२.५०. टक्के उतारा) पहिली उचल प्रतीटन ३२१७रू, उर्वरित महाराष्ट्रासाठी (सरासरी ११.५०टक्के उतारा) २९२८ रू. देण्याची मागणी राजू शेट्टी यांनी २७ ऑक्टोबर २०१८ रोजी जयसिंगपूरच्या सतराव्या ऊस परिषदेत केली'. (दै.लोकमत २८ ऑक्टो. २०१८, पृ.१) जे कारखाने दर जाहिर न करता सुरू होते. त्याविरोधात संघटनेने तीव्र आंदोलन करत ऊसतोड व वाहतूक बंद पाडली. शासन व कारखानदार निर्णय घेण्यास विलंब लावत असल्याने आंदोलन अधिक चिघळत जाऊन हिंसक बनले. अखेर ऊस दरावरून निर्माण झालेली कोंडी फोडण्यासाठी '१० नोव्हेंबर २०१८ रोजी कोल्हापूरच्या शासकीय विश्रामगृहात स्वाभिमानी शेतकरी संघटना व साखर कारखानदार यांच्यात झालेल्या बैठकीत एकरक्कमी एफआरपी द्यायची; तसेच पैसे उपलब्ध होतील. तसे गत हंगामातील दोनशे रूपये द्यायचे व भविष्यात साखरेचे दर चांगल्या पद्धतीने वाढले तर संघटनेच्या मागणीनुसार यावर्षीच्या ऊसाला उर्वरित दोनशे रूपये द्यायचे. यावर कारखानदार व संघटनेमध्ये एकमत झाले' (दै.महाराष्ट्र टाईम्स ११ नोव्हें. २०१८ पृ.१) दुसऱ्या दिवशी संघटनेने आंदोलन स्थगित केले. 'चालू गळीत हंगामात १० टक्के उताऱ्यासाठी २७५० रू व त्यापुढील प्रत्येक टक्यास २७४ रू एफआरपी केंद्र शासनाकडून जाहिर करण्यात आली. यातून तोडणी–ओढणी सरासरी ४८९ ते ६१६ रू. मूळ एफआरपीतून वजा करून उर्वरित एफआरपी शेतकऱ्यांना मिळणार आहे. या वर्षी एफआरपीत २००रू. वाढ झाल्याचा शासनाचा दावा असला तरी प्रत्यक्षात १० टक्के बेस धरल्याने उत्पादकांना किरकोळ वाढ मिळाल्याचे दिसते. कोल्हापूर जिल्ह्यातील सरासरी साखर उतारा प्रतीटन ११.४५ ते १३. ३४ इतका असल्याने कमीत कमी २६४१ व जास्तीत जास्त ३०८९ रू प्रतीटन एफआरपी पहिली उचल म्हणून शेतकऱ्यांच्या हातात पडणार आहे.' (दै.लोकमत ११ नोव्हें.२०१८ पृ.२)

'देशातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी व शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देणारा कायदा करावा, यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलविण्यात यावे. यासह विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीच्या वतीने देशातील २०८ शेतकरी संघटनांना नवी दिल्लीत एकत्र आणत २९,३० नोव्हेंबर २०१८ असे दोन दिवशीय किसान मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, रामलिला मैदान ते संसद मार्गापर्यंत लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी मोर्चा काढून भव्य शक्ती प्रदर्शन केले. या मोर्चाचे नेतृत्व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खा. राजू शेट्टी यांनी केले'. (दै.लोकमत १ डिसेंबर २०१८, पृ.१०) इतिहासात प्रथमच देशातील शेतकरी मोठया संख्येने दिल्लीत एकत्र झाले होते. देशभरातून आलेले शेतकरी संसद भवनाबाहेर 'नरेंद्र मोदी, किसान विरोधी' अशा घोषणा देत होते. ३० नोव्हें. च्या जतंरमतंर येथील सभेमध्ये अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीने मांडलेल्या २० कलमी घोषणा पत्रात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती आणि शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट भाव मिळावा यासह अन्य शेती प्रश्नांच्या उहापपोहाबरोबरच शेतमजूर, महिला शेतकरी यांच्या समस्यांचा उल्लेख केला आहे. खा. राजू शेट्टी यांनी संपूर्ण कर्जमुक्ती, शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट भाव या संसदेत मांडलेल्या दोन खासगी विधेयकांना काँग्रेससह देशातील २१ राजकीय पक्षांनी पांठिबा दिला.' (दै.लोकमत, ४ डिसेंबर २०१८ पृ.४) ३० नोव्हें. च्या संसद घेराव आंदोलनात भाजप विरोधातील सर्वपक्ष शेतकऱ्यांसोबत सहभागी होते. जंतरमंतर येथील सभेमध्ये काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार, दिल्लीचे आम आदमीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, फारूक अब्दुल्ला, सीताराम येचूरी, शरद यादव, डि. राजा, राजू शेट्टी, अखिल भारतीय किसान

ISSN : 2348-7143
December-2018

संघर्ष समन्वय समितीचे निमंत्रक व्ही. एम. सिंग, डॉ. अजित नवले, मेधा पाटकर आदी नेते उपस्थित होते. या राजकीय नेत्यांना एका मंचावर एकत्रित आणण्यात खा. राजू शेट्टी यांची भूमिका महत्वाची होती. या भाजप विरोधी रणनीतीमुळे महाराष्ट्रात खा. शेट्टी यांचे महत्वाचे अधोरेखित झाले आहे. हा किसान मोर्चा यशस्वी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

आजपर्यंतच्या राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाचा, राजकीय वाटचालीचा इतिहास पाहिला असता; स्वाभिमानी शेतकरी संघटनेची २००४ साली स्थापना करण्यात आली. त्यानंतर विविध आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी लढणारे राजू शेट्टी एकवेळा जिल्हापरिषद सदस्य (२००२) एकवेळ आमदार (२००४) व दोन वेळा खासदार (२००९, २०१४) झाले. त्यांनी वेळोवेळी संसेदत शेतकरी विरोधी शासन धोरणांना विरोध केला. त्याचबरोबर राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विविध परिषदा, मोर्चे, आंदोलनामध्ये, सहभागी होत सक्रिय भूमिका घेतल्यामुळे महाराष्ट्रासह देशातील शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला. त्यामुळे आज त्यांचे नेतृत्व देशपातळीवर पोचले आहे. यातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेला व खा. राजू शेट्टींच्या नेतृत्वाला विस्तारण्यास बळ मिळत आहे.

एकंदरीत राजू शेट्टी यांच्या नेतृत्वातील शेतकरी चळवळीचे वरीलप्रमाणे विश्लेषण केल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाच्या काही मर्यादा, उणीवा पुढीलप्रमाणे दिसून येतात. १. ऊस व दूधा व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या इतर शेतीमालाला किफायतशीर भाव मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावी चळवळ, लढा उभारल्याचे दिसून येत नाही. २. त्यांच्या नेतृत्वातील शेतकरी चळवळीचा, संघटनेचा पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादक पट्यातच विशेष प्रभाव असल्याचा दिसून येतो. ३. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीचे प्रश्न यावर शरद जोशीनंतर शेतकरी चळवळीला नवी दिशा देणारी वैचारिक, सैद्धांतिक मांडणी त्यांच्याकडून होताना दिसत नाही. ४. सुरूवातीच्या काळात त्यांचा उद्देश राजकारणविरहीत शेतकरी चळवळ, संघटना चालवण्याचा होता. मात्र कालांतराने तिचे मोठ्या प्रमाणात राजकीयकरण झालयाचे पहावयास मिळते. ५. निवडणुकांच्या राजकारणात प्रचलित राजकीय पक्षाला शेतकऱ्यांचा प्रभावी दबाव गट म्हणून सक्षम पर्याय देण्यात त्यांच्या नेतृत्वातील संघटनेला फारसे यश मिळत नसल्याचे दिसून येते. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाच्या अशा काही मर्यादा, उणीवा असल्या तरी 'स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून गेली अठरा–एकोणीस वर्षापासून ऊस, दूध व अन्य शेतीमालाला रास्त भव मिळावा म्हणून व शेतकऱ्यांच्या इतर प्रश्नांवर सातत्याने परिषदा, सभा धरणे, मोर्चे, आंदोलने याद्वारे केंद्र–राज्य शासनाच्या शेतकरी धोरणांविरोधात राज्य विधिमंडळात सदस्य असताना व बाहेर अवाज उठवत शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटना कमकुवत होत असतानाच्या काळात महाराष्ट्रात शेतकरी चळवळ प्रवाहित ठेवण्यात राजू शेट्टींचा वाटा मोठा आहे. त्याचबरोबर संसद सदस्य झाल्यानंतर गेल्या दहा वर्षात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर देशव्यापी, परिषदा, सभा मोर्चे आंदोलने याद्वारे शेतकरी विरोधी शासन धोरणांविरोधात संसदेत व रस्त्यावर उतरून आवाज उठवण्याचे, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला; करत आहेत. म्हणून आज खा. राजू शेट्टी यांना देशपातळीवरील शेतकरी वर्गात व राजकीय क्षेत्रात महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा महत्वाचा नेता म्हणून ओळखले जाते.

**समारोप :**

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीतील एक महत्वाचे नेतृत्व म्हणून खा. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात गत १७–१८ वर्षापासून ऊस, दूध दर वाढी संदर्भात केलेल्या व इतर महत्वाच्या आंदोलनाचे वरीलप्रमाणे

विश्लेषण केल्यानंतर असे म्हणता येईल की, शरद जोशींपासून दूर झालेल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यानंतरही आपापल्या पद्धतीने राज्यात वेगवेगळया स्वरूपातील शेतकरी चळवळी उभ्या करण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी पश्चिम महाराष्ट्रात 'स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खा. राजू शेट्टी यांनी ऊस व दूध उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करत शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडणाऱ्या ऊस व दूध आंदोलनाद्वारे त्यांना रास्त दर मिळवून दिला. त्यामुळे आज पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील सामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली. म्हणून आज त्यांचा सामाजिक दर्जा व पत उंचावण्यास मदत झाली.

त्यांच्या नेतृत्वात ऊस व दूध आंदोलनाद्वारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला राज्य व देशपातळीवर लौकिक तर मिळवून दिलाच पण राज्यशासनानालाही त्यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी लागली. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाच्या उपरोल्लिखित काही मर्यादा, उणीवा असल्या तरी त्यांनी केवळ ऊस व दूध भाववाढीसाठीच आंदोलने केली नाहीत तर भात, कांदा, तूर, सोयाबीन, कापूस  बेदाणा आदी शेतीमालालाही रास्त दर मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर शेती पंपाचे विजबील माफ आंदोलन, राज्य व राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण कर्जमुक्ती अभियान, शेती मालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमी भाव मिळावा यासाठी उभारलेले आंदोलन इत्यादी. १९८० च्या दशकात शरद जोशींना योद्धा, शेतकरी नेता म्हणून ओळखले जात होते. तर आज खा. राजू शेट्टींना त्यांच्या लढवय्या भूमिकेमुळे योद्धा शेतकरी नेता म्हणून राज्य व राष्ट्रीय पातळीवर ओळखले जाते.

**संदर्भ सुची :**

१. यादव शरद, दूध दर आंदोलन, स्वाभिमानी शेतकऱ्यांची नवी ओळख, शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती, १३ ऑक्टो.२००८.
२. शेट्टी राजू, शिवार ते संसदः आत्मकथन पद्मगंध प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, ८ डिसेंबर २०१३.
३. खळदकर खंडेराव, पीएच.डी. शोधप्रबंध (अप्रकाशित) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जून २०१५

**पाक्षिक, मासिक, त्रैमासिक :**

१. चौसाळकर अशोक (संपा.) समाज प्रबोधन पत्रिका, जुलै–सप्टेंबर २०१४.
२. कदम युवराज (संपा.) नवरात्र त्रैमासिक, दिवाळी विशेषांक २०१४.

**दै. वर्तमानपत्रे**

१. दै. लोकसत्ता, पुणे आवृत्ती
२. दै. महाराष्ट्र टाईम्स, कोल्हूपर आवृत्ती.
३. दै. लोकमत, कोल्हापूर आवृत्ती.

ISSN : 2348-7143
December-2018

# छ. शाहू काळातील शेतकी प्रदर्शनाचा इतिहास

**डॉ. विकास मोहन सरनाईक**
इतिहास विभाग,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

छत्रपती शाहूंचा कोल्हापूर संस्थानातील उदय ही घटना कोल्हापूर संस्थानाच्याच नव्हे तर देशाच्या दृष्टीने महत्वपूर्ण होती. या दूरदृष्टी राजाने समाजातील शिक्षण, सामाजिक सुधारणा, आर्थिक सुधारणा, कृषी व उद्योग अशा विविधांगी क्षेत्रामध्ये अभूतपूर्व असे योगदान दिले आहे. यापैकी कृषीक्षेत्राच्या विकासासाठी शेतकरीवर्ग, स्थानिक कारागीर वर्ग व उद्योजक यांना शेतीविषयी जागरूकता व अद्ययावत ज्ञान देवून त्यांना प्रोत्साहन व प्रेरणा देण्यासाठी छ.शाहूंनी शेतकी प्रदर्शने व संग्रहालांच्या माध्यमातून कसे प्रयत्न केले याचाआढावा प्रस्तूत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शेती विकासाची गरज :**

छ.शाहू काळातही शेती हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य घटक होता. राज्यातील जवळपास सर्व जनता शेतीत काम करत होती. मात्र ही शेती पारंपरिक पद्धतीने करत असल्याने हा शेतकरी वर्ग अज्ञान व दारिद्र्य यांच्या गर्तेत पडलेला होता. या अज्ञानामुळे सामाजिक मागासलेपणा तर दारिद्र्यामुळे भौतिक मागासलेपण समाजास प्राप्त झाले होते. या सर्व परिस्थितीचा अभ्यास छ.शाहूंनी केलेला होता म्हणूनच ते म्हणतात, "देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे, त्यांनी प्रथम आपल्या देशाच्या कृषी कल्याणाकडे लक्ष दिले पाहिजे. इतर देशांच्या मानाने आपल्या देशाचे कृषी उत्पन्न सरासरीने पुष्कळ कमी आहे. हे वाढविण्यासाठी शेती सुधारणे व शेती सुधारणेसाठी सुधारलेल्या औतांची फार जरूरी आहे."[१] यासाठी शाहूंनी शेतीविषयक शिक्षण, प्रदर्शने व संग्रहायलये यासारख्या गोष्टी सुरू केल्या. तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटविण्यासाठी सन १९०२ मध्ये अपूर्व असे 'सार्वजनिक पाटबंधारे धोरण' जाहीर केले व एक स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून नवीन विहीरी, तलाव, बंधारे, धरणे बांधली.[२] शाहूंच्या या प्रयत्नामुळेच कोल्हापूर संस्थानात हरीतक्रांती सुरू झाली जी महाराष्ट्रातील पहिली हरीतक्रांती होती ज्याचे जनकत्व शाहूंच्या दूरदृष्टीत होते.

**छ.शाहू पूर्वकाळतील कृषी उत्पादने व शेतीपूरक व्यवसाय :**

पारंपरिक शेती पध्दतीमध्ये भात, भुईमुंग, ऊस ही मुख्य पिके होती. या पिकांबरोबर पूरक व्यवसाय म्हणून गुळ उद्योग मोठ्या प्रमाणावर होता. तसेच सन १८६० पासून कोल्हापूरात ऊसापासून साखर निम्रितीची सुरूवात यळगुड येथून झाली. त्यामुळे या साखरेस 'यळगूड साखर' असे नाव पडले.[३] गुळ व साखरेप्रमाणेच भुईमुंग, करडी, तीळ यासारख्या तेलबियापासून 'घाणा' पध्दतीने तेल काढण्याचा शेतीपूरक व्यवसाय होता. संस्थानात सन १८९५ मध्ये ९१२ इतके तेल घाणे होते.[४] कालांतराने ब्रिटीशांच्या यांत्रिक प्रभावाने सन १९१२ मध्ये यांत्रिक पध्दतीची पहिली ऑइल मिल सुरू झ ाली.[५] या व्यवसायाबरोबरच अंबाडा, ताग व केतकीचा वाक यापासून दोरखंड बनविण्याचा उद्योगही होता. या सर्व पार्श्वभूमीवर कोल्हापूर संस्थानातील शेतीमध्ये आधुनिक अवजारे व उत्पादने यांचा वापर वाढण्यासाठी शेतकऱ्यांना शेतकी प्रदर्शने व संग्रहालयाच्या माध्यमातून ज्ञान दिले. याचा आढावा पुढीलप्रमाणे.

**शेतकी प्रदर्शन व संग्रहालयाची प्रेरणा :**

छ.शाहूंनी कृषीप्रदर्शनाची प्रेरणा युरोपमधून घेतलेली दिसते. कारण ते म्हणतात, "देशातील कलाकौशल्यास उत्तेजन मिळविण्याकरिता असलेल्या प्रदर्शनांची किती आवश्यकता आहे हे पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्याला दाखविले आहे. कोणत्याही मोठ्या उत्सवाच्या किंवा समारंभाच्या प्रसंगी ते एक स्वराष्ट्रीय प्रदर्शन भरवितात. आपले हे प्रदर्शन आपल्या

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

लोकांस भूषणावह असून होतकरू कारागिरांस प्रेरणा मिळण्याबरोबरच स्वदेशिचे व्रत पाळणाऱ्या देशभक्तास योग्य मार्गदर्शन व प्रबोधक ठरू शकेल."[६] याबरोबरच १४ मे १९०२ रोजी ७ व्या एडवर्डच्या राज्यारोहन समारंभास छ.शाहू गेले असता, ब्रिटीश अधिकारी सर क्लॉड हिल यास काटेकोरपणे सूचना केली होती की, "शेतकीच्या जनावरांची व कोंबडी, बदके यांची पैदास व दुधदुभत्यांची उत्पत्ती इत्यादी शेतकीचे धंदे ज्या ठिकाणी चालले आहेत असे स्थळ पहावे, असे मला वाटते"[७] छ.शाहूंच्या पूर्वी शेतकी प्रदर्शनाचा विचार महात्मा फुल्यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात सन १८८३ मध्ये व्यक्त केला. यामुळे आधुनिक कृषी तंत्रज्ञान, वेगवेगळ्या खतांची माहिती, जनावरांच्या जाती यांचे ज्ञान शेतकऱ्यांना होण्यास मदत मिळेल. तसेच ग्रंथप्रदर्शनामधून शेतकऱ्यांना बक्षिसे व पदव्या द्याव्यात, कृषीविषयक ग्रंथ छापावेत, ज्यामुळे शेती व शेतकरी यांचा विकास होईल."[८]

**छ.शाहू काळातील शेतकी प्रदर्शने :**

आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, तसेच विविध जातीची बि-बियाणे व जनावरे यांचे ज्ञान व्हावे. या सर्व प्रयत्नातून शेतीचे उत्पन्न वाढावे यासाठी छ.शाहूंनी विविध शेतकी प्रदर्शने व संग्रहालये सुरू केली. या प्रदर्शनामध्ये संस्थानाबरोबरच संस्थानाबाहेरीलही शेतकरी व कारागीरांच्या वस्तू ठेवल्या. तसेच आपल्या संस्थानातील शेतकरीव कारागीरांना संस्थानाबाहेर भरणाऱ्या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले. सन १९०४ मध्ये मुंबई येथील कृषी प्रदर्शनासाठी कोल्हापूरातून अनेक शेती उत्पादने व यांत्रिकी कृषी अवजारे पाठविली होती. यावेळी या पद्रर्शनामध्ये कोल्हापूरातील सुगंधीतेल या उत्पादनासाठी एस.डी.शाळीग्राम व सोन्याच्या नेकलेससाठी मोरो गणेश गणबरकर यांना प्रत्येकी एक सिल्व्हर मेडल मिळाले. तर लोखंडी मोट बनवल्याबद्दल रूकडीचे रायगोंडा पाटील व सॉलीड स्पेअर हेडसाठी एस.एस.कटरे यांना प्रत्येक एक ब्रॉझ मेडल मिळाले. तसेच शेतकी उत्पादने व सुतारकामासाठी तीन डिप्लोमस मेडल्स मिळाली होती.[९]

मुंबईमधील प्रदर्शनासाठी संस्थानातील शेतकरी व कारागीरांची कामगीरी लक्षात घेवून छ.शाहूंच्या प्रेरणेतून सन १९०९ मध्ये कोल्हापूरात कृषीविषयक भव्य प्रदर्शन भरविले. या प्रदर्शनामध्ये मुख्यत्वे तीन विभाग पाडले. अ) जनावरे विभाग ब) शेतकी विभाग क) औद्योगिक विभाग. या कृषी प्रदर्शनात शेतीविषयक उत्पादने व अवजारांबरोबरच विणकाम, शिवणकाम, भरतकाम व लेसचे विविध नमूने ठेवण्यात आले होते. तसेच शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान मिळण्यासाठी विविध पत्रके, पुस्तिका व परराज्यातील तज्ज्ञांची व्याखाने आयोजित केली होती.[१०] या प्रदर्शनासाठी शेतकऱ्यांचा व कारागीरांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेवून सन १९१२ मध्ये इंग्लंडचा बादशहा सातवा एडवर्ड याच्या स्मृती प्रित्यर्थ 'किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूट' सुरू केली व याला जोडूनच आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझि यम सुरू केले. 'शेतकी व शेतकरी' या पुस्तकाच्या पन्नास प्रती फुकट वाटल्या. म्युझियमच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जागृती होण्यासाठी मोफत रासायनिक खते वाटली. तसेच लोखंडी नांगर व कुळव, ऊसाचे उकळण्यासाठी सुधारीत सिंगल व डबल फर्नेस या अवजारांचे व साहित्यांचे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीत प्रत्यक्ष डेमॉन्स्ट्रेटद्वारे प्रात्यक्षिके दाखवून ती त्यांना भाड्याने वापरण्यासाठी दिली जात. याबरोबरच वेगवेगळ्या प्रकारची बि-बियाणेही संग्रहालयात होत. संग्रहालयातून 'बॉम्बे ॲग्रीकल्चर डिपार्टमेंटकडून' प्रकाशित होणारी पत्रके संग्रहालयातर्फे विकत घेवून ती शेतकऱ्यांना मोफत वाटली जात.[१२] या संग्रहालयाबरोबरच छ.शाहूंनी सन १९१४ मध्ये खासबाग मैदान येथे भव्य कृषी प्रदर्शन भरविले.

**सन १९१४ चे भव्य कृषी प्रदर्शन :**

या कृषी प्रदर्शनाची तयारी दोन ते तीन वर्षे आधीच चालू होती. कारण १७-४-१९११ रोजी शेतकी प्रदर्शनाची तयारी व अंदाजपत्रक सादर करण्यासंबंधी (प्रदर्शन ठराव क्र.६६९) काढला होता. यामध्ये खर्चाबाबत अंदाजपत्रक दाखवून परवानगी घेण्याचा आदेश दिलेला होता.[१३] प्रदर्शन कमिटीचे अध्यक्ष पिराजीराव बापूसाहेब घाटगे, सेक्रटरी

ISSN : 2348-7143
December-2018

नानासाहेब मुळीक व त्यांच्या कमिटिस तसेच हे प्रदर्शन केंव्हा व कोठे भरवावे याबातही एक ठराव १८-४-१९१३ रोजी (प्रदर्शन ठराव क्र.१११) केला होता.[१५] यामध्ये चिंचली मायाक्का प्रमाणेच करवीर निवासीनिचा रथोत्सव व श्री केदारलिंगवाडी रत्नागिरी येथील यात्रेवेळी निरनिराळ्या भागातून लोक येतात. त्यावेळी शेतकी प्रदर्शन भरूवून शेतकऱ्यांना माहिती व ज्ञान द्यावे. यामध्ये शेतीसंबंधीत हरएक जिन्नस, नांगर, आऊते, शेती जनावरे, घोडे म्हैसी, गाई, कुत्रे, लढाऊ बकरी ठेवावीत.[१४] एकंदरीत या प्रदशर्नाचे महत्त्व लक्षात घेवूनच प्रदर्शनकाळात शासकीय कचेऱ्या व शाळा यांना तीन दिवस सुट्टी दिली होती. तसेच हे प्रदर्शन सहा दिवस चालू होते. या प्रदर्शनाच्या खर्चासाठी सरकारतर्फे ४५०० रु.दिले होते. यामध्ये शेतीप्रदर्शन खर्चासाठी रु.१५००, जनावरांच्या बक्षिसासाठी रु.१०००, कुस्ती व खेळ - रु.५००, शास्त्रीय प्रदर्शन - रु.१५०० असे होते. या प्रदर्शनासाठी रावणेश्वर ते पेटाळा या भागातील सरकारी जागा उपलब्ध करून दिली होती.[१५]

या भव्य प्रदर्शनाचे तीन विभागात विभाजन केले होते. पहिल्या भागात ६७४ जनावरे होती. दूसऱ्या शेती विभागात १९९६ वस्तू होत्या. तर तिसऱ्या औद्योगिक विभागात १६९० इतक्या वस्तू होत्या. या विविध वस्तू व कृषी उत्पादनांबरोबरच या प्रदर्शनामध्ये सुधारित शेतीपध्दती व खते तयार करण्याच्या विविध पद्धतीयावर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली हाती. यावेळी पुण्याच्या कृषी कॉलेजचे तत्कालीन प्राचार्य डॉ.हेरॉल्ड मॅन यांनीही प्रदर्शनास मार्गदर्शनपर भेट दिली होती. या भव्य शेतकरी प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशी बक्षिस समारंभाचा कार्यक्रम महाराज तुकोजीराव होळकर यांच्या हस्ते पार पडला. या प्रदर्शनात सहभागींना एकूण १४१४ रूपयांचे रोख बक्षिस तसेच ३० चांदीची व ३० ब्रॉझची पदके बक्षिसे म्हणून देण्यात आली.[१६]

**सन १९२० चे कृषी प्रदर्शन :**

सन १९१४ नंतर दूसऱ्या महायुध्दामुळे कृषी प्रदर्शन भरवणे शक्य झाले नाही. त्यामूळे १९२० मध्ये 'राजाराम इंडस्ट्रीयल स्कूलच्या' वतीने कृषी व औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये शेतीक्षेत्रातील आधुनिक साधने प्रदर्शित केली. यावेळी छ.शाहूंनी संस्थानातील कुशल कारागीरांना शेतीतील आधुनिक अवजारे व यंत्रे बनविण्याचे आवाहन केले. या प्रदर्शनाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते म्हणतात, "आपल्या देशातील लोकांनी जुन्या शेतीपध्दती ऐवजी सुधारलेल्या शेतीशास्त्राचा आणि अवजारांचा अवलंब केला पाहिजे. शेतकी सुधारणेस सुधारलेल्या औतांची फार जरूरी आहे व आपले लक्ष इकडे आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. नांगर व विहीरीचे पाणी काढण्याची मोट यांची सुधारणा ही आमच्या प्रत्येक शेतकऱ्याचे हीत करणारी आहे. आपले प्रयत्न यशस्वी होण्याचे कामी मजकडून योग्य ती मदत आवश्य मिळेल या विषयी शंका नको."[१७] यावेळी ऊस गुराळात कामगारांचे हात सापडून ते अपंग होतात म्हणून बाबाजी कारजगार (पहिली फौंड्री संस्थापक) यांना ऊस गाळण्याचे लोखंडी चरक व एका बैलावर दोन मोटा लावून चालविण्याचे यंत्र तयार करण्याची जबाबदारी सोपवली होती.[१८]

प्रदर्शनासाठी मोठ्या संख्येने लोक आकृष्ठ करण्यासाठी कुस्त्यांच्या स्पर्धा, मर्दानी खेळांच्या स्पर्धा, हत्तीच्या झुंजी यासारख्या करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात. शेतकऱ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी व्याख्याने, माहिती पत्रिका, पूस्तके यांचे वाटप केले जात होते. तसेच संस्थामध्ये कृषीविषय शिक्षणासाठी प्राधान्य दिले होते. याबरोबरच ज्याला कृषीचे शिक्षण घेण्यासाठी परदेशात जाणेचे असेल त्यांनाही मदत केली जात होती. १०-५-१९१४ रोजी रामचंद्र धोंडो शेळके याला कृषी शिक्षणासाठी अमेरिकेला जावयाचे होते. तेंव्हा त्याच्या खर्चासाठी त्याला १५०० रूपये बिनव्याजी देण्याचा ठराव क्र.९९० केला होता.

एकदंरीत छ.शाहूंनी संस्थानातील शेती विकासासाठी पाणी व्यवस्थापन, कर्जव्यवस्था, व्यापारपेठा व कृषी शिक्षणाबरोबरच शेतकी प्रदर्शनांच्या माध्यमातूनही प्रयत्न केले. प्रदर्शनाच्या माध्यमातून आधुनिक कृषी अवजारांचा वापर प्रत्यक्ष शेतीमध्ये कसा केला जातो हे दाखविण्यासाठी डेमॉन्स्ट्रेटरची नेमणूक केली. तसेच ही अवजारे भाड्याने

वापरण्यास दिली. रासायनिक खतांचा प्रसार व्हावा यासाठी ही खते मोफत वाटली. छ.शाहूंच्या कृषी क्षेत्रातील या योगदानामुळेच त्या काळात चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारखी नगदी पिके कोल्हापूर संस्थानात घेण्याचे प्रयत्न केले. या शेतकी प्रदर्शनांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक शेतकरी, कारागीरांच्या वस्तू व जिन्नस यांना प्राधान्य दिले. ज्यामुहे त्यांच्या नाविण्याला प्राधान्य मिळाले. छ.शाहूंचा हा स्वदेशीचा सर्वात मोठा संदेश होता. (याच काळात १९०६ मध्ये स्वदेशी आंदोलन सुरू होते.)

अशा प्रकारे एकवीसाव्या शतकात कोल्हापूर जिल्ह्यातील कृषी प्रदर्शने व कृषी विकासाचा अभ्यास करता याची बिजे आपल्याला छ.शाहूंच्या विचारात व कार्यात दिसतात. दूर्देवाने स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांप्रती छ.शाहूंसारख्या विचारांचे नेतृत्व कोल्हापूरसह महाराष्ट्रास लाभले नसल्यामुळेच शेतकरी व शेतीची दूरावस्था झाली. परिणामी शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग अवलंबावा लागत आहे. याला आपण एकवीसाव्या शतकातील शेतीची व शेतकऱ्यांची प्रगती म्हणावयाचे काय?

**संदर्भ :**


१. पवार (डॉ.) जयसिंगराव (संपा.), 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००१, पृ.६२६.
२. कित्ता - पृ.२०१.
3. Modak B.P., 'Report on the Industrial Survey of Kolhapur Territory' The Education Society's Press, 1895, P.57.
4. Ibid, P.66
5. Patil P.C., 'Regional Survey of Economic Resource India', Kolhapur, 1950, P.249.
६. पवार (डॉ.) जयसिंगराव (संपा.), उपरोक्त, पृ.२०८.
७. जाधव (डॉ.) रमेश, 'लोकराजा शाहू छत्रपती', सुरेश एजन्सी, पुणे, पाचवी आवृत्ती, डिसें.२०१०, पृ.३०९.
८. कीर धनंजय व इतर (संपा.), 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, २००६, पृ.३३४.
9. Administration Report of Kolhapur State, 1904-1905, P.68.
१०. साळुंखे पी.बी., 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, पृ.१७२
११. कित्ता - पृ.१७१.
१२. धाटावकर भास्कर (संपा.), 'राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश', पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८. (प्रदर्शन ठराव क्र.६९), पृ.७२.
१३. कित्ता - पृ.८५.
१४. कित्ता - प्रदर्शन ठराव क्र.१११, पृ.८६.
१५. साळोखे पी.बी., उपरोक्त, पृ.१७३.
१६. कित्ता - पृ.१७४.
१७. पवार (डॉ.) जयसिंगराव (संपा.), उपरोक्त, पृ.२०८.
१८. मुडाबिद्रीकर बी.एस.(संपा.), 'राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व सामाजिक हूकूमनामे, कार्यवाही व एस.प्रती', कोल्हापूर जिल्हा छापखाना, १९९४, प्रदर्शन ठराव क्र.१११, पृ.१९.

ISSN : 2348-7143
December-2018

# ब्रिटिशकालीन जमीनमहसूल व्यवस्था सावकारी व जमीनदारी व्यवस्थेला उपकारक

**भामे गणेश पंढरीनाथ ,**
सहाय्यक प्राध्यापक ,
डॉ.अरविंद ब.तेलंग कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय,
निगडी, प्राधिकरण, पुणे ४११०४४ .
मोबाईल नंबर ९५९५०५५०९५ .

**पार्श्वभूमी ः**

इंग्रजांनी मात्र जनतेला कसलीही दयामाया न दाखविता जमीन महसूल निर्दयपणे वसूल करण्यास प्रारंभ केला. कठोर कार्यपध्दतीमुळे दुष्काळातही शेतकऱ्याला शेतसारा भरावा लागे. इंग्रजांच्या हिंदूस्थानावरील राजवटीचे अंतर्बाहय स्वरूप 'वसाहतवादी' व वाणिज्यवादी शोषण यंत्रणा असे होते. परिस्थिती कितीही गंभीर, प्रतिकूल, आणीवाणीचा असो, बेडरपणे सामोरे जावून आपल्याला अनुकूल परिस्थिती निर्माण करायची व जय मिळवायचा हे वेलस्लीचे एक वैशिष्ट्य होतं.[१] राजकीय पाश घट्ट करून आर्थिक नाडया आवळणे हे मुलभूत सुत्र होते. ब्रिटिशांनी हिंदूस्थान जिंकला तो उघड लष्करी आक्रमण करून नाही. तर इथल्या समाजात अंतर्गत क्रांती घडवून आणून ! त्यांनी कोणत्याही अव्वल दर्जाचे राज्य स्वारी करून आपल्या स्वामित्वाखाली आणलं नाही, तर ज्या राज्यात दोन तट पडले असतील त्यापैकी कमजोर पक्षाला पाठिंबा देऊन त्याला सत्ताधारी बनवावं, मांडलिकांना सार्वभौम सत्तेविरूध्द, सरदारांना राजाविरूध्द उठवावं, रयतेत फूट पाडावी, अशा भेदनीतीने त्यांनी देश व्यापला.[२]

ब्रिटिशांपूर्वी अवर्षण अथवा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास जमीन महसूलात सत्तेकडून सुट अथवा सवलत दिली जाई. सैन्याच्या हालचालींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतसाऱ्यात सूट दिली जाई. मराठा काळात शेतसारा धान्याच्या स्वरूपात भरण्यास परवानगी होती. शिवकाळापासून पेशवाईपर्यंत सरकारचे जमीन महसूलाबाबतचे धोरण बरेच लवचिक होते. मुघल काळातही याबाबतचे सरकारी धोरण उदार होतेच.

'कोणताही स्थानिक राजा आम्ही जसे जमीन भाडे मागतो तसे मागू शकत नाही' असे १८२६ मध्ये बिशप हर्बर लिहतो. तर १८३० मध्ये कोलोनल ब्रिग्ज लिहतो, 'भारतात सध्या जो जमीन कर आहे तो उघडपणे जमीनदारांचे भाडे शोषण करण्यासाठीच आहे, जो युरोप किंवा एशियन सरकार यांना ज्ञात नाही.' वरील विधानांचा अर्थ असा होतो की, ब्रिटिश भारतातून जो कर वसूल करत होते तो इतका अधिक होता की, भारतात या पुर्वी कधीही व कोणीही इतका कर शेतकरी व जमीनदारांकडून वसूल केला नव्हता.[३]

"आपल्या प्रांतातील अगदी दोन टोकांना असणाऱ्या खेडयांतील दोन सावकारांचे त्यांच्या श्रणकोंनी केलेले खुन ही सावकारांनी केलेल्या व्यक्तिगत जुलूमाची प्रतिक्रिया नसून सावकारवर्ग हयांच्यातील तणावाची परिस्थिती व्यक्त करतात आणि हे जर खरे असेल तर एका बाजूने भयंकर जुलूम व दुसऱ्या बाजूला हालअपेष्टा हयांचे भीषण दृश्य आपणास पाहावयास मिळते. ह्या परिस्थितीमुळे सर्वसाधारणपणे शांत व सोशिक आणि काही प्रमाणात वाईट वागणूक व अन्याय ही सहन करण्याची सवय असलेला शेतकरी समाज हा आपल्यावरील अन्याय दूर करून घेण्यासाठी खुन करण्यास प्रवृत्त होतो व त्यानिमित्त आपली आहूती देतो. ती परिस्थिती किती भयंकर असावी. त्यांची न्यायाची अपेक्षा किती गुदमरून गेली असावी. सरकारच्या कायदयाने आपणास न्याय मिळेल हया बावतीत ते किती हताश झाले असावेत."[४] असे मुंबई सरकारच्या १८५२ साली केलेले रिपोर्ट मध्ये म्हटले आहे

"हल्ली शेतकरी गरीब अन्नाला महाग आणि संसार हाकण्यास असमर्थ झालेले असतात. सरकारचे कर सारे व धारे अतिशय जबर असून ते भरण्याचे दीन कुळंब्यांना मोठे संकट पडते. गरीबांची सर्व प्रकारे अनास्था व दुर्दशा

आहे. दुरगावी झोपडयात आपली पोरे टाकून लाकडांचे गवताचे व पानांचे भारे नेऊन विकणाऱ्या लेकूरवाळया बायांकडे पाहून कोणा पाषणह्दयास द्रव येणार नाही? पण करायचे काय? हा प्रकार केवळ अयोग्य कारभाराचा व प्रजाहिताविषयी असणाऱ्या औदासीन्याचा होय. जमीनीचे उत्पन्न होणार एक रूपया यातून सरकार घेणार आठ आणे या सरकारी धाऱ्याशिवाय शेतकऱ्यास लोकल फंड स्टॅंप रजिस्टार वैगेरे संबंधाने पुष्कळ खर्च सोसावा लागतो. सारांश शेतीच्या कामात शेतकऱ्यास बरकत राहिली नाही. शहरातील श्रीमंत सावकार, खेडेगावातील छोटया सावकारांना कर्ज देत आणि स्वतः फक्त मोठया जमीन मालकांशीच व्यवहार करीत. अशा रीतीने महाराष्ट्रीय शेतकरी भांडवली अर्थ रचनेत गुंतला होता आणि नगदी पिके पिकवीत होता. तरी त्याचा फायदा सर्वसाधारणपणे व्यापारी किंवा सावकाराकडे जात असे.[५] एका बाजूला सरकार तर दुसऱ्या बाजूला सावकार शेतकऱ्यांचे शोषण करीत आहेत. इंग्रजांनी पध्दतशीर चालविलेले आर्थिक शोषण व अर्थनीती यावर देशमुखांनी प्रकाश टाकला होता.[६] भाडयाच्या उंटावर जबरदस्त ओझे लादावे तशी जनतेची अवस्था झालेली होती. शेतकऱ्यांची दुरावस्था अन्याय्य शेतसाऱ्यामुळे झाली. पण शेतकऱ्यांच्या उत्पनाप्रमाणे शेतसारा ठरविण्यास व प्राथमिक दक्षता घेण्यास सरकार तयारच नाही. सरंजामी शोषकांची जागा कल्पक व निष्ठूर अशा शोषक सत्ताधीशांनी घेतली. इंग्रज सरकारने रयतवारी पध्दत सुरू केली आणि सरकार व रयत हयांचे जमीन धारण करण्यासंबधाने हक्क व कर्तव्ये ही मुंबईच्या जमीन महसूल कायदयाने (१८७९चा पाचवा ॲक्ट) ठरवून टाकले. हया पध्दतीने प्रत्येक कुणबी थेट सरकारकडून जमीनधारण करतो व सरकारचा खातेदार होतो आणि कमकसर उत्पन्नाचा सहावा हिस्सा सारा नगदी रूपाने भरतो. खातेदार आणि सरकार यांच्या दरम्यान कोणीही मध्यस्थ नाही. खातेदाराने दर तीस वर्षांनी अगर कमी मुदतीने आकारण्यात येईल तो सारा द्यावा. सारा न भरल्यास सरकारी साऱ्यासाठी जमीन खालसा होते व सावकारी कर्जासाठी ती विकली जाते. रयतेला जमीन गहाण खरेदी देण्याची पूर्ण मुभा आहे. परंतू हया हक्काने पुष्कळ कुणबी कर्जबाजारी झाले. त्या 'काळी'(जमीन) कुणब्याकडून निघून अडाण्याकडे जाऊ लागली.[७] कायद्याचे राज्य स्थापन करून सर्वकष शोषणाचा पाया व्यापक केला. व्यापार करणे एवढाच मर्यादित हेतू ब्रिटिशांचा नव्हता. आपली राजवट दृढ करून भारतीयांना हतबल करावे आणि वसाहतवादी धोरणानुसार आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वार्थसाधना करावी हे त्यांचे ध्येय होते. देखावा 'व्हाईट मॅन बर्डन' वाहण्याचा, हेतू मात्र भारतीयांचे शोषण करण्याचाच होता.[८] जमिनीवरील साऱ्याविषयी बोलताना श्री.आर. सी. दत्त म्हणतात की, "ब्रिटिश शासनाने जमिनीवर आकारलेला कर फक्त अमर्याद नव्हता तर तो अधिक वाईट होता. कित्येक प्रदेशात तो कमी जास्त आणि अनिश्चित होता.[९] या काळात ब्रिटिशांनी भारतात महसुल उत्पन्नाच्या दोन करपध्दती हिंदूस्थानात प्रचलित होत्या.

**सारांश :**

भारतीय समाज व त्यांच्या आर्थिक जीवनात ब्रिटिश काळात मुलगामी बदल घडून आले. विशेषतः शेतीचे स्वरूप आणि शेतजमीन मालकीबाबत हे बदल अधिक लक्षणीय होते. शेतीविषयक प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या समस्यांनाही राष्ट्रीय स्वरूप मिळाले. शेतकऱ्यांमध्ये सुप्तपणे राष्ट्रीय भावना निर्माण होऊ लागली. या सुप्त भावनेला जागृत करून राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांना संघटित करण्याचा आणि त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणून व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा प्रयत्न चालू झाला.[१०] शेतसाऱ्याची प्रचंड आकारणी व जुलमी वसूली वारंवार भयंकर दुष्काळ आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव सरकार आणि जमीनदार सावकार यांची अनिष्ठ युती व त्यांच्याकडून होणारे शोषण यामुळे शेतकरी दारिद्रयाच्या खाईत लोटला गेला. ब्रिटिश काळात खेडयांची स्वयंपुर्ण अर्थव्यवस्था उध्वस्त झाल्यामुळे भारतातील शेतीला प्रथमच राष्ट्रीय परिणाम प्राप्त झाले. महसूली उत्पन्न हा एकूण सरकारी उत्पन्नाचा बराच मोठा भाग होता. त्याखेरीज जकात, अबकारी कर, नजरपट्टी, बकरीपट्टी, टांकसाळ या उत्पन्नाच्या इतर पारंपारिक बाबी एलफिन्स्टनने चालू ठेवल्या यापैकी काही करांच्या वसूलीसाठी पेशवाईत मक्ता दिला जाई. जकात ही तशीच बाब आहे

ISSN : 2348-7143
December-2018

नव्या धोरणानुसार जकातीची माफी कोणालाही ठेवली नाही. ब्रिटिशकालीन जमीनमहसूल व्यवस्था सावकारी व जमीनदारी पध्दतीला पोषक ठरली. ब्रिटिश कायद्यामुळे सावकारशाहीचे सरंक्षण झाले तर जमीनदारी नव्याने मजबूत झाली.

**संदर्भ ः**

१. ओक प्रमोद, एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन, पुणे. पृ ४७.
२. ओक प्रमोद, एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन, पुणे पृ ३३.
३. डॉ.आंबेडकर भिमराव रा., ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन, एम.ए.पदवीसाठी अपूर्ण रीत्या १९१५ मध्ये सादर करण्यात आला, विनिमय प्रकाशन, मुंबई, डिसेंबर २०११, पृ क्र २८
४. रजनी पाम दत्त, 'इंडिया टुडे' मुळ ग्रंथ, प्रकाशन १९३९, अनुवाद य. ना. देवधर, 'आजकालचा भारत', डायमंड पब्लीकेशन, अनुवाद २००६, पुणे, पृ २६६, २६७.
५. ऑमव्हेट गेल भाषांतर पी. डी. दिघे, वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, ऑगस्ट १९९५, पृ ३५
६. निर्मलकुमार फडकुले, महाराष्ट्राचे शिल्पकार, लोकहितवादी, मुंबई, २००४, पृ ७२, ७६,
७. आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, समन्वय प्रकाशन, कोल्हापूर, डिसेंबर २०१२, पृ २०
८. डॉ. के. के. चौधरी, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
९. संस्कृती मंडळ, मुंबई, २०१५, पृ. २१.
१०. डॉ.आंबेडकर भिमराव रा., ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन, एम.ए.पदवीसाठी अपूर्ण रीत्या १९१५ मध्ये सादर करण्यात आला, विनिमय प्रकाशन, मुंबई, डिसेंबर २०११, पृ क्र २८
११. डॉ जाधव बबन भिवसेन रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र चळवळ शेतकऱ्यांचा सहभाग लक्ष्मी बुक पब्लीकेशन सोलापूर जाने २०१४ पृ ७.

ISSN : 2348-7143
December-2018

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शेतकरी चळवळीतील कार्य

**डॉ. सुनिता शं. कुरूडे**
इतिहास विभागप्रमुख
स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड
मो. ७५८८८५२६२४

**प्रस्तावना :**

आधुनिक भारत आणि महाराष्ट्राच्या इतिहासात समाजातील समस्या सोडविण्यासाठी अनेक क्रांतिकारी चळवळी घडून आल्या. प्रामुख्याने आदिवासी चळवळी, दलित चळवळी, शैक्षणिक चळवळी, महिला चळवळी, तद्वतच समाजातील अविभाज्य समजला जाणारा घटक म्हणजे शेतकरी. जो जगाचा पोशिंदा म्हणून उल्लेखला जातो. मात्र तो आजही समस्याग्रस्त जीवन जगत आहे. याच हेतूने महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी अंतर्गत शेतकरी चळवळीचा उदय झाला.

सावकारी जोखंड, कर्जबाजारीपणा, हलाखीचे जीवन, जमिनीचे लहान तुकडे, आर्थिक पिळवणुक, कुळाचे व मालकीचे प्रश्न, आर्थिक विपन्नावस्या, शेतीमालाला रास्त बाजारभाव मिळणे, बी-बियाणे, खते, मुलांचे शिक्षण इत्यादी अनेक प्रश्न शेतकरी जीवनात भेडसावतात.

आजही ग्रामीण जीवन पध्दती ही कृषीवर अवलंबून आहे, कृषीचा दर्जा अत्यंत घसरलेला आहे. प्राचीन काळी यावर देश 'सुजलाम्-सुफलाम्' म्हणून परिचित होता. पण आज मात्र स्थिती दयनीय आहे. जगात नवनव्या कृषी यंत्रांचा व तंत्राचा उपयोग केला जातो. पण भारतात मात्र ह्या विज्ञान युगातही पारंपारिक पध्दतीवरच भर दिला जातो. म्हणून इतर देशाच्या तुलनेत भारतातील कृषी व्यवसाय अत्यंत मागासलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र भारताचा जलद व संतुलित विकास करण्यासाठी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली. जमिनीची मालकी व कृषी उत्पादन हा राष्ट्रीय विकासातील एक महत्त्वाचा मुद्दा होता. या अनुषंगाने कृषी क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने अनेक कायदे केले. शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवून ग्रामीण क्षेत्रात सर्व वर्गांना समान संधी, न्याय मिळवून देणे ही कायद्याची उद्दिष्ट्ये होती. कुळांच्या हक्कासंबंधीही सुधारणा करण्यात आल्या. शेतीसाठी वित्तपुरवठा करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. यात सहकारी समित्या, सहकारी बँका, तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी शेतीला अर्थसहाय्य करण्यासाठी मोठी भूमिका बजावली.[१]

**ग्रामनाथ :**

ग्राम हा भारतीय व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. परंतु सामाजिक, आर्थिक संदर्भात तोच अधिक मागासलेला आहे. सर्व गावाला, देशाला नव्हे जगाला अन्न, वस्त्र पुरविणाऱ्या ग्रामातील शेतकऱ्याला मात्र आयुष्यभर दुःखच भोगावे लागते. अशा शेतकऱ्याला, शेतमजुराला, श्रमिकाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामनाथ' असे संबोधले आहे. शेतकऱ्यांचे उत्थान व्हावे ही त्यांची सतत तळमळ होती. आपण या देशाचे मानकरी आहोत, आपण कच्चा माल पिकवितो, खरे मालक आपण आहोत आपल्या मालावर नोकरशाही जीवन जगते. परंतु मालक कोण? नोकर कोण? हेच आपण विसरलो हे सर्व शेतकऱ्यांच्या व्यथेचे वास्तव दर्शन आपल्या चिंतनातून प्रकट केलेय[२] या देशाचा बळीराजा शेतकरी आहे. त्याच्याकडे सर्वांचे लक्ष वेधावे, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्थान व्हावे म्हणून भारत भ्रमणातून आपल्या साहित्याचा आत्मा असणाऱ्या आणि देशाच्या कल्याणार्थ सर्वसमावेशक विषय असणाऱ्या ओवीबध्द ग्रामगितेची अर्पणपत्रिका त्यांनी शेतकऱ्यास समर्पित केलीय.[३]

ISSN : 2348-7143
December-2018

त्या अर्पणपत्रिकेतील ओळी;

**सर्व ग्रामाशी सुखी करावे। अन्न-वस्त्र-पात्रादी द्यावे।**
**परि स्वतः दुःखची भोगावे। भूषण तुझे ग्रामनाथा।।**[४]

ग्रामगीतेमध्ये शेती कशी करावी, शेतीची सुपिकता, खत, फवारणी, उत्तम बियाणे, जमिनीचा पोत, शेती विकास, शेतकऱ्यांचे कुटुंब कसे असावे, व्यवहार कसा असावा, आरोग्य याविषयी मार्गदर्शन केलेय. यातील विचार अंगिकारून नापिकाच्या वर्षातही शेतीमध्ये भरघोष प्रमाणात पीक घेणारे देवरा (शहीद) ता.जि. अमरावती, येथील शेतकरी घनश्याम गणेश पिकले यांनी आपल्या चार एकर शेतीमध्ये ग्रामगितेच्या प्रणालीनुसार शेती केली.[५] तुकडोजींनी ग्राम आणि त्यातील सामान्य कष्टकरी 'ग्रामनाथ' हे आपल्या कार्याचे केंद्र मानले होते. शेती आणि खेडी याकडे दुर्लक्ष करून भारत कधी प्रगती करू शकणार नाही ही त्यांची धारणा होती.[६]

**शेतकरी सुखी तर देश सुखी :**

देशातील पुढारी आणि अधिकाऱ्यांप्रमाणे देशातील शेतकरीही सुखी व्हायला हवा यासाठी राष्ट्रसंतांनी १६ सप्टेंबर १९६४ ला सरकरी कार्यालयात आपल्या लेखी निवेदनातून शेतकरी व शेतीच्या परिस्थितीची वास्तविकता स्पष्ट केली. त्यात उल्लेख केल्याप्रमाणे शेतमालाचे भाव ठरविणे शेतकऱ्यांच्या सल्ल्याने झाले पाहिजे, तसेच दलालांनी, व्यापाऱ्यांनी व सरकारने काय नफा घ्यावा हे ही ठरविले जावे, जमिनीला लागणाऱ्या सर्व सामुग्रीची किंमतही धान्याच्या भावावरच आकारता आली पाहिजे, मालाचे विक्रीस्थान गावातच असावे, मालाचा संग्रह ठेवण्याची व्यवस्थाही त्याच खेड्यात असावी, ही जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे, पेरणीचा पैसा निंदाईचे वेळी, व निंदाईचा पैसा कपाशीच्या वेळी असे अनेकदा प्रसंग घडल्याने व अधिकारी शेतकऱ्यांशी समरस न झाल्याने व्यवस्थेत बराच फरक पडला आहे. साहेबास जसे सुख हवे तसेच शेतकऱ्यासही मिळेल असा सर्वतोपरी विचार करून किंमत ठरविता आली पाहिजे, नाहीतर आता सर्व लोक शेती सोडून देतील व शहराकडे धावतील...आज दिडशे कोटी धान्य बाहेरून आणावयाचे असेल तर शेतकऱ्याला शंभर कोटीची मदत याच देशात दिल्याने त्यास उत्तम दिवस लाभतील.[७]

याबरोबर राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेतून गाव आणि शेती व शेतकरी यांचा अतुर संबंध असून गाव हा देशाचा आत्मा आहे. गावावरूनच देशाची स्थिती ओळखली जाते. हा त्यांचा विचार ओवीतून स्पष्ट करतात,

**गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा।**
**गावचि भंगता अवदशा। येईल देशा।**[८]

आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय शेती हा असून व्यापारीकरणाचे समृध्दीकरण करण्यासाठी तो सक्षमही आहे. परंतु त्याकडे लक्ष न देता किंवा स्वतःच्या बुध्दीमत्तेचा उपयोग शेती सुधारणेसाठी, व्यापार उद्योगांच्या सक्षमीकरणासाठी न करता परकीय झगमगाटाच्या आकर्षणाकडे तरूणांचा ओढा जास्त आहे हे ते निक्षून सांगतात.[९] शेतकरी सुखी तर देश सुखी हे वचन उरी बाळगून राष्ट्रसंतांनी भारतात ग्रामीण विकासाचे नवे पर्वच निर्माण केले होते.

**सामाजिक, आर्थिक, राजकीय क्रांतीसाठी भुदान यज्ञ :**

आधुनिक भारताच्या इतिहासातील शेतकरी चळवळीचा अत्यंत महत्वाचा एक भाग किंवा टप्पा म्हणजे शेतकऱ्यांच्या न्याय हक्क आणि समतेसाठी चालवलेली आचार्य विनोबाजींची भुदान चळवळ होय. ग्रामीण समाजातील जमिनविषयक प्रश्न सोडविण्याकरीता कायद्यापेक्षा भुदान चळवळ हा एक प्रभावी मार्ग त्यांनी अवलंबिला. दारिद्र्याचे निर्मुलन, जमीन मालकांचा अंतःकरणात प्रेमभावनेचा विकास करणे, मोठे व श्रीमंत

ISSN : 2348-7143
December-2018

जमिनदार आणि गरीब व भुमिहीन मजूर यांच्यातील संघर्ष कमी करणे, यज्ञ, दान व तप या तिन्हींच्या आधारावर विकसित झालेल्या भारतीय संस्कृतीचे पुर्नरजीवन करणे हा चळवळीचा प्रमुख उद्देश होता.

इ.स. १९५१ पासून त्यांनी तेलंगणाच्या नालगोंडा जिल्ह्यातील 'पोचमपल्ली' या गावापासून भु-दान चळवळीला प्रारंभ केला. भुमिहिनांना भूमी मिळवून देऊन त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी समाजाला आवाहन केले होते. भुदान चळवळीत कायद्यापेक्षा ऱ्हदय परिवर्तनाच्या मार्गाला त्यांनी विशेष महत्व दिले. त्यांच्या मते, ''भुदान चळवळीचे कार्य सध्याच्या समाजव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणणे हे आहे.''[१०] तर स्व. जयप्रकाश नारायण यांच्या मते, ''भुदान चळवळ ही केवळ जमीन गोळा करण्याचा व तिचे विभाजन करण्याचाच कार्यक्रम नाही तर सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वंकष स्वरूपाच्या क्रांतीच्या दिशेने उचलले हे पहिले पाऊल होय.[११]''

भुदान चळवळीतून समाजात समता, बंधुभाव प्रस्थापित व्हावा आणि देशाची प्रगती व्हावी यासाठी विनोबाजींनी चालविलेल्या प्रयत्नात विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे योगदान अमुल्य असेच आहे. विनोबाजींच्या हाकेला प्रतिसाद देऊन त्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमातून चळवळीसाठी सहकार्य करण्याचे वचन देऊन केवळ ११ दिवसात ११४१० एकर जमीन विनोबाजींना प्राप्त करून दिली. ही भुदान चळवळीतील अद्‌भूत घटना म्हणता येईल. याबरोबरच त्यांनी आपल्या भजनादी कार्यक्रमातून भुदानाची आवश्यकता, पुढील काळाचे भविष्य, गरीब-श्रीमंतीचा समन्वय इत्यादी विषयाची जनजागृती घडवून आणली.[१२]

त्यांच्या शेतकरी चळवळीतील या योगदानाविषयी अनेकांनी गौरोद्‌गार काढले आहेत. पंतप्रधान पं. नेहरूंचे याविषयी मत, ''केवळ ग्यारह दिन में ग्यारह हजार एकर भुमी भुदान यज्ञ के लिए आपने मिला दी और कार्य को आगे बढाया भुदान तथा ग्रामदान कार्य से देश की हवा बदली है, जमीन के प्रश्न पर अन्य देशों में गृहयुध्द होते है, परंतु हमारा भारत देश है जिसमें जनता स्वेच्छापूर्वक अपने स्वामित्व को विसर्जित कर रही है।, देश के उत्थापन में पंचवार्षिक योजना अपना विशेष महत्व रखती है। परंतू ये योजनाएँ कानुन की अपेक्षा, शांती, सहयोग व प्रेमसेही सफलीभूत हो सकती है।, इसलिए लोगों की भावना व चरित्र को बदलना आवश्यक होता है।, और यह कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तथा आचार्य विनोबाजी जैसे महान व्यक्तीही संपन्न बना सकते है।''[१३]

**शेतकऱ्यांच्या कल्याणार्थ वैचारिक जागृती व कृती :**

देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातील योग्य बदलासाठी राष्ट्रसंतांनी आपल्या जनजागृती आणि प्रत्यक्ष कृतीतून विद्यमान समाजातील विषमता दूर सारून शेतकऱ्यांच्या कल्याणार्थ विशेष प्रयत्न केलेय. रामटेक तालुक्यात रामसागर (खिंडसी) येथील तलावात पाच हजार एकर जमीन ओलावण्याची शक्ती पण, सध्या दोन हजार एकरच जमीन भिजते हे जेव्हा राष्ट्रसंतांनी पाहिले तेव्हा डॉ. बारलिंगे यांना ही माहिती देऊन चाचेर गावाला अधिकारी वर्ग बोलाविला चाचेरच्या आसपास नहारचे पाणी मिळावे यासाठी भजनादी कार्यक्रमातून समाजप्रबोधन केले. शेतीच्या नापिकी बद्दल शेतसारामाफी व खडकांचा प्रश्नही सोडविण्याचा कार्यक्रम आखला. उर्वरित तीन हजार एकर जमिनीला पाणी मिळावे यासाठी संबंधितांचे अर्ज घेतले जे काम पूर्ण करण्यासाठी एक वर्ष अपुरे पडले असते ते काम राष्ट्रसंतांनी एक दिवसात पार पाडले. चाचेरचा मरणारा शेतकरी वाचला. हे राष्ट्रसंतांचे शेतकरी चळवळीतील अद्‌भूत यश म्हणता येईल.[१४]

शेतकऱ्यांच्या समस्याकडे श्रीमंतांचे, सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि शेतकऱ्यांमध्येही समाजशिक्षणाची जाणिवजागृती होण्यासाठी 'सुराज्य', 'श्री गुरूदेव' पत्रातून 'शेतकरी देशाचा कणा', 'शेतकरी सुखी तर देश सुखी' असे अनेक लेख लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो

समाजशिक्षण घेऊ चला, अशा प्रबोधनपर गितातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. प्रगतशिल शेतकऱ्यांचे शेतीसाठी केलेले यशस्वी प्रयोग इतर शेतकऱ्यांना कळावेत यासाठी त्यांनी 'कृषी प्रदर्शन', उत्कृष्ट शेतकऱ्यांसाठी बक्षीस योजना आदी उपक्रम सुचविले. शेती उत्पादनासाठी नित्यनवे संशोधन व्हावे, नवनवीन तंत्रज्ञान कामी आणावे यामुळे शेतकऱ्यांची पर्यायाने देशाची प्रगती होईल हा विश्वास त्यांना होता. विशेषतः विदर्भातील शेतकरी दलाल व अडते यांच्याकडून पिळला जाई. तसेच सावकारांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण यावर राष्ट्रसंतांनी 'समाजशिक्षण' हा उत्तम उपाय शोधला. शेतीचा उत्पादन खर्च, शेतसारा, घरे कर्जबाजारीपणा यावर चिंतन करून ग्रामगीतेतून उपाययोजनाही सूचविल्या आहेत.

**शेतीच्या उन्नतीसाठी भारत दर्शन किसान रेल यात्रा :**

दि.३ मे ते २८ जून १९६१ या काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'श्री गुरूदेव भारत दर्शन' किसान रेल यात्रेचही आयोजन केले होते. देशातील विविध भागातील पिके, जमिनीची सुपिकता, शेतीसाठी उपायोजित तंत्रज्ञान आदींची माहिती व्हावी, यातून शेतीच्या विकासाबरोबर शेतकरी सुखी व्हावा, त्याचे राहणीमान उंचवावे असे उद्देश समोर ठेवून काढलेल्या यशस्वी किसान रेल यात्रेत अत्यंत उत्साहाने ६५० शेतकरी सहभागी झाले होते. हा शेतकरी चळवळीतील अभुतपूर्व उपक्रम राष्ट्रसंतांनी योजिला होता.[१५] यावरून त्यांची शेतकऱ्यांविषयीची आस्था व तळमळ स्पष्ट होते. राष्ट्रसंतांच्या सोबत आजीवन प्रचारक म्हणून कार्यरत असलेले गुलाबराव वाघ यांचाही येथे नामोल्लेख केला पाहिजे. त्यांनी राष्ट्रसंतांच्या प्रेरणेतून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आष्टी, जि. वर्धा येथे १९६८ मध्ये 'हुतात्मा प्रक्रिया सहकारी संस्था' स्थापन केली. सन १९६२-६३ च्या सुमारास आष्टी विभागात संयुक्त सहकारी कृषी संस्थेचे जाळे निर्माण केले. चिंचोली येथेही कृषी संस्था निर्माण केली. त्यासाठी स्वतःची जमीन दिली. भुदान चळवळीच्या वेळीही आपल्या जमिनीचा सहावा भाग त्यांनी राष्ट्रसंतांच्या प्रेरणेतूनच दिला होता इ.स. १९६४ ते ७० पर्यंत वर्धा जिल्हा संयुक्त सहकारी संस्थेचा संघ स्थापन केला. आष्टी येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन व्हावी म्हणून संपूर्ण परिसरात जनजागृती करून राज्यशासनाकडे पाठपुरावा केला.[१६]

**समारोप :**

राष्ट्रसंतांनी देशाच्या प्रगतीसाठी महत्वाचा घटक म्हणून शेतकऱ्यांस महत्व दिलेय. त्याच्या सुख संपन्नतेसाठी ग्रामगीता आणि इतर साहित्यातून योग्य मार्गदर्शन केलेय. शेतकऱ्यांची पिळवणूक थांबून त्यांना समाजशिक्षण मिळावे, देशात समता, बंधुभाव प्रस्थापित व्हावा यासाठी अनेक योजना आखल्या व उपक्रम राबविले. शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी ते सरकारपर्यंत पोहचवून सोडविण्यासाठी स्वतः कार्य करून आपले सहकारीही त्यासाठी कामी आणले. गुलबराव वाघ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आजही शेती शाळा, शेतीसाठी नवनवे संशोधन, तंत्रज्ञान आदींची माहिती व्हावी यासाठी आजही विदर्भात अमरावती जिल्ह्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मोझरी येथील आश्रमात विदर्भ स्तरावर कार्यशाळेचे आयोजन केले जाते. गोशाळा व शेतीचा विकसित प्रकल्प राबविला जातो. शेतकऱ्यांसाठी एक आदर्श शाळाच मोझरीत निर्माण केलीय असे म्हटले तर वावगे ठरू नये.

एकंदरित शेतकऱ्याच्या कल्याणार्थ आजही अनेक योजना, प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. सरकारचेही शेतकऱ्यांसाठी कार्य चालू आहेच विविध पक्ष, संघटना कार्यरत आहेत. तरीही शेतकऱ्यांची दुःस्थिती, कर्जबाजारीपणा, पाणीप्रश्न रोजगार अविकसित तंत्रज्ञान, शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे अनेक प्रश्न आहेतच राष्ट्रसंतांच्या दृष्टिकोनातून विचार करता त्यांचे समाजशिक्षण ही एक कमतरता भासते. संकटकाळी त्यांना मदतीचा

हात देणे योग्यच पण त्याहीपेक्षा संकटे येवू नयेत आणि आलीच तर त्यास सामोरे जाण्याची सिध्दता त्यांना करता यावी अशी परिस्थिती निर्माण व्हावी.

**संदर्भ सूची :**


१. सातभाई श्रीनिवास, आधुनिक भारत, औरंगाबाद, २०१४.
२. श्रीगुरूदेव मासिक, गुरूकुंज आश्रम, मोझरी, अमरावती, मार्च २०१६.
३. सावरकर सुदाम, राष्ट्रसंत तुकडोजीः जीवन व कार्य, अमरावती, २००७.
४. राष्ट्रसंत तुकडोजी, ग्रामगीता, पुणे, १९५५.
५. श्री गुरूदेव मासिक, मार्च २०१६.
६. सावरकर सुभाष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ, कोल्हापूर २००९.
७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गावा गावाशी जागवा, अमरावती, २००९.
८. वेले गजानन, राष्ट्रसंतांचे सामाजिक आणि धार्मिक विचार, अमरावती २०१०.
९. सावरकर सुभाष, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गौरव ग्रंथ, कोल्हापूर २००९.
१०. सावरकर सुभाष, राष्ट्रसंत तुकडोजी जीवन व कार्य, अमरावती २००७.
११. वेले गजानन, राष्ट्रसंतांचे सामाजिक आणि धार्मिक विचार, अमरावती, २०१०.
१२. सावरकर सुभाष, राष्ट्रसंत तुकडोजीः जीवन व कार्य, अमरावती २००७.
१३. कित्ता, पृ. क्र. ९३.
१४. सावरकर सुदाम, जीवनयोगी, खंड-६ अमरावती, १९८७.
१५. ठोसर रा.शं., राष्ट्रसंतांच्या जीवन प्रवाहातील ग्रामनवनिर्माणातून राष्ट्रीय एकात्मता, अमरावती, २००५.
१६. श्री गुरूदेव मासिक, अमरावती, मार्च २०१६.

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# शेतकरी आत्महत्या : राजकारणाच्या साठमारीतील दुर्लक्षीत घटक

**डॉ. नितीन गायकवाड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय,
उस्मानाबाद
मो.नं. ९४०३१५७३९५
nitinsang85@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय राजकारण हे एक गतिशील झाले असून ते १९९० नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर ते अधिक तिव्र झाले. जागतिकीकरणाचा प्रभाव सर्वच क्षेत्रावर झाला. त्यासाठी शरद जोशी यांनी शहरांचा (नवभांडवलदार) इंडिया व खेड्यांचा (शेतकरी, मजूर, वंचित समूह) भारत ही संकल्पना समाजकारणाच्या पटावर आणली व विकासाचे दावे, कसे फोल असू शकतात हे दाखवून दिले. ''भारतीय राजकारणात पक्षव्यवस्था सातत्याने कृतिशील राहीली आहे. निवडणुकीतील कामगिरी, प्रभुत्व आणि धुरीणत्व असा पक्षव्यवस्थांचा विकास झाला आहे. काँग्रेस पक्षाची व्यवस्था, डाव्या आघाडीची पक्षव्यवस्था, भाजपची पक्षव्यवस्था अशा तीन पक्षव्यवस्था भारतात घडल्या. याखेरीज द्विध्रुवीय आघाड्यातील पक्षव्यवस्था घडल्या आहेत. या प्रक्रियेत पक्षव्यवस्थांनी सातत्याने टॅक्नोलॉजिकल समाजाशी जुळवून घेतले.''[१] हा समाज शहरीकरणांच्या अंगाने सुधारलेला आहे. त्याने राजकारणात सत्तास्थाने बळकट केली तर वंचित समूह, मजूर, भूमिहिन, शेतकरी समुदाय राजकिय प्रक्रियेत केवळ अनास्थेचा घटक राहिला. यावरच आधारित प्रस्तुत लेखात शेतकरी आत्महत्याकडे केवळ सोयीच्या राजकिय प्रक्रियेसाठी वापर केला का? हे तपासून पाहण्याचा प्रयत्न आहे.

**मुख्य शब्द :**

राजकारण, पक्षव्यवस्था, शेतकरी आत्महत्या, स्वामीनाथन आयोग, दिडपट हमीभाव, भाजप

शेती क्षेत्रातील उणिवांवर बोट ठेवण्यासाठी महेंद्रसिंग टिकेत, शरद जोशी, रघुनाथ पाटील, राजु शेट्टी, बच्चू कडू, पांडूरंग फुंडकर, पाशा पटेल इत्यादी नेतृत्वाने आपआपल्या पक्षीय पातळीवर कधी संघटनात्मक पातळीवर दबाव, सत्तेद्वारे शेती प्रश्न ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न ऐंशीच्या दशकापासून करत आहेत. त्यासाठी देशातील ग्रामीण भागाने नेहमीच शेतकरी नेतृत्वास चालना दिली पण शासन स्तरावर पुरेशा गांभिर्याने शेती, शेतकरी समस्या घेतल्या गेल्या नाहीत. प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी एम.एस.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची निर्मिती केली होती. आयोगाच्या शिफारशी २००४-२००६ या काळात टप्प्याटप्प्याने जाहिर झाल्या. सर्वसमावेशक आर्थिक विकास या उद्दिष्टासह चालू असणाऱ्या अकराव्या पंचवार्षिक योजनेशी त्या सुसंगत होत्या. यामध्ये शेती, ग्रामीण विकास, जमीन सुधारणा, पिक विमा योजना, जलसिंचनाच्या सोयी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार (पीडीएस), कृषी उत्पन्न बाजार समित्यांची पुनर्बांधणी तसेच मध्यवर्ती शिफारस म्हणजे शेतीमालाची किमान हमी किंमत उत्पादन खर्चापेक्षा ५०% जास्त दिली जावी या होत्या. शेतकरी आंदोलन, मराठा आरक्षण मोर्चा मधील मध्यवर्ती मागणी हा सुध्दा शिफारस लागु करणे हे होते.

सध्याच्या शासनाने कर्जमाफीमध्ये काही जाचक अटी घातल्या, तसेच उत्तर भारतातील राजकीय सोयीसाठी शेतीप्रश्न केवळ आस्थेचा आहे हे भासवण्याचा प्रयत्न केला. परंतु यामध्ये शेतीक्षेत्राच्या विकासाचा इतर

ISSN : 2348-7143
December-2018

अर्थव्यवस्थेतील सोयीशी संबंध आहे याचा विचारर नाही. केवळ सानुग्रह अनुदान, सबसिडी, यंत्रे, अवजारे यावर हे प्रश्न सुटणार नाहीत यासाठी शेतकरी आत्महत्याकडे पहावे लागेल.

''प्रसिध्द पत्रकार पी.साईनाथ यांनी १९९५ ते २०१५ मधील शेतकरी आत्महत्यांसंबंधी 'द हिन्दु' मध्ये विश्लेषण केले.''[२]

| वर्ष | महाराष्ट्र | आंधप्रदेश | कर्नाटक, छत्तीसगड | मध्यप्रदेश | (पाच घटक राज्य) | देशातील शेती | पाच राज्यांचा वाटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ ते २०१५ | ६९०४५ (२१.४५) | ३९४६० (१२.७०) | ४२७६८ (१३.३०) | ४८८५३ (१५.३०) | २००१२२ | ३२१४०१ | ६२.२६ |

संदर्भ :- National Crime Records Bureau (NCRB), Ministry of Home Affairs
(कंसातील टक्केवारी देशातील एकूण शेतकरी आत्महत्याचे प्रमाण दर्शविते.)

त्यांच्या मतानुसार शेतकरी आत्महत्येचे प्रमाण ६२.२६% आहे. ते त्यामध्ये पाच घटक राज्यात अधिक आत्महत्या होतात तर महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत तर National Crime Records Bureau (NCRB) ने २०१५ नंतर ADSI (Accidental Deaths and Suicide in Inadia) अहवाल प्रकाशित केला नाही, असे केंद्रीय कृषी राज्यमंत्री पुरुषोत्तम रुपाला यांनी जून २०१८ मध्ये लोकसभेत सांगितले.

महाराष्ट्रात विभागनिहाय शेतकरी आत्महत्या व सरकारी मदत याचे विवरण.

| विभाग | आत्महत्या | सरकारी मदत |
|---|---|---|
| अमरावती | ९०७ | ३७३ |
| औरंगाबाद | ७८९ | ५७१ |
| नाशिक | ४०८ | १९१ |
| नागपूर | २२६ | ९९ |
| पुणे | ८० | ४१ |
| कोकण | ०४ | ०२ |
| **एकूण** | **२४१३** | **१२१७** |

स्त्रोत : लोकमत दि. २३/११/२०१७

याप्रमाणे देशात व महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या होत आहेत. त्या केवळ अनास्थेचे बळी आहेत का? हा प्रश्न राजकिय पक्षांनी विचारात घेणे व त्याची सोडवणूक करणे गरजेचे आहे.

**दीडपट हमीभाव : राजकिय सोयीची भूमिका :**

शेती प्रश्नाची सोडवणूक म्हणून शेती उत्पादनास दीडपट हमीभावाची घोषणा केली पण तीही केवळ जखमेवर मिठ चोळण्यासारखीच आहे. कसे ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.[३]

| पीक | प्रत्यक्षात सर्वसमावेश उत्पादन खर्च | हमीभाव | प्रत्यक्षात सर्वसमावेश उत्पादन खर्च + ५०% | भाव फरक |
|---|---|---|---|---|
| **धान** | १५६० | १७५० | २३४० | -५९० |
| **ज्वारी** | २१८३ | २४३० | ३२७४.५ | -८४४.५ |
| **बाजरी** | १३२४ | १९५० | १९८६ | -३३ |
| **मका** | १४८० | १७०० | २२२० | -५२० |
| **तूर** | ४९८१ | ५६७५ | ७४७१.५ | -१७९६.५ |

ISSN : 2348-7143
December-2018

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **मुग** | ६१६१ | ४९७५ | ९२४१.५ | -२२६६.५ |
| **उडीद** | ४९८९ | ५६०० | ७४८३.५ | -१८८३.५ |
| **भुईमुग** | ४१८६ | ४८९० | ६२७९ | -१३८९ |
| **सूर्यफुल** | ४५०१ | ५३८८ | ६७५१.५ | -१३६३.५ |
| **सोयाबीन** | २९७२ | ३३९९ | ४४५८ | -१०५९ |
| **कापूस** | ४५१४ | ५१५० | ६७७१ | -१६२१ |

स्त्रोत : केंद्रीय कृषिमूल्य व किंमत आयोगाच्या आकडेवारीवर अधारित विश्लेषण

''हमीभाव म्हणजे सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजारपेठेत हस्तक्षेप करण्याचा एक मार्ग असतो. आधारभूत किंमतीच्या खाली बाजारभाव गेले तर सरकारने या किंमतीला शेतकऱ्याकडून खरेदी करणे अभिप्रेत असते.''[४]

केवळ राजकिय सोयीसाठी निवडणूकीत फटका बसेल यासाठी हमीभाव वाढीसारखे निर्णय घेतले जात आहेत. अर्थविश्लेषक संजीव चंदारेकर यांनी म्हटल्यानुसार, ''संसदीय लोकशाही ही भारतातील कष्टकरी, गरीब लोकांसाठी फक्त राजकीय मूल्यव्यवस्था नसून त्यांच्या जगण्याच्या संघर्षातील एक हत्यार देखील आहे, हमीभाव, कर्जमाफी, अनुदाने, या वित्तीय साधन सामुग्रीमधील थोडाबहुत वाटा आपल्याकडे वळवण्याचे सामान्य, कष्टकरी, गरीब जनतेच्या हातातील हत्यार आहे.''[५] त्यामुळे राजकिय व्यवस्थेकडून केवळ हमीभावाने हे प्रश्न सुटणार नाहीत तर धोरणात्मक पातळीवर बदल होणे गरजेचे आहे.

**सारांश :**

भारतातील राजकिय व्यवस्थामध्ये विविध पक्षीय सरकारं स्थापन झाली पण शेती, शेतकरी आत्महत्या, कर्जमाफी या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले नाही. पक्षीय पातळीवरील रचनेमध्ये शेती, शेतमजूर यांना कोठेही स्थान आढळत नाही. केवळ निवडणूक कालावधीमध्ये मतं घेण्यापर्यंतच 'शेतीव्यवस्था, शेतकरी आत्महत्या' मर्यादीत राहिल्या असे खेदाने म्हणावे लागेल.

**संदर्भ :**

१. पवार प्रकाश, २०१७, भारतातील पक्षव्यवस्थांची उत्क्रांती, प्रतिमान आणि ऱ्हास, समाजप्रबोधन पत्रिका, डिसेंबर २०१७, पान क्र. ९७.
२. भुसारे दिपक, २०१८, कृषीप्रधान भारतातील शेतकरी आत्महत्या : एक शोकांतिका, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर-२०१८, पान क्र. १६१.
३. जाधव रमेश, २०१८, दीडपट हमीभाव मोदी सरकारचा आणखी एक जुमला, साधना, २१ जुलै २०१८, पान क्र. ३०.
४. तत्रैव
५. तत्रैव, पान क्र. ३२
६. महाजन उल्का, २०१५, कोसळता गावगाडा : २०१५ वादळी स्थित्यंतराचे शतक, शब्द पब्लिकेशन, ऑक्टोबर २०१५.

# खानदेशातील शेतकऱ्यांचे उठाव (स. १८१८ ते स. १९४१)

**डॉ. जे. डी. गोपाळ, पाचोरा.**
(M.A., SET, M.Phil., Ph.D.)
एस.एस.एम.एम. महाविद्यालय, पाचोरा, जि. जळगांव

शेती हाच प्राचीन काळापासुन खानदेशातील लोकांचा प्रमुख व्यवसाय दिसून येतो. शेती आणि शेतकरी वर्ग यांना भारतात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. जीवनावश्यक अन्नधान्याच्या उत्पादनाशी शेतकरी वर्ग निगडीत असल्याने मानवी जीवन सुखकर होण्यात शेतकरी वर्गाची भूमिका प्रचंड महत्वाची होती. खानदेश प्रादेशिक, भौगोलीक, राजकिय, सामाजीक, आर्थिकदृष्टया भारतातील महत्वाचा प्रदेश असल्याने मध्ययुगीन काळात व ब्रिटीश काळात खानदेशातील शेती व शेतकरी घटक वैशिष्टयपुर्ण दिसून येतो. खानदेशातील प्रादेशिक हवामान व भौगोलीक स्थितीवर प्रत्येक सत्ताकाळात शेतकरी समाजाची शेती अवलंबून असल्याने समाजाची आर्थिक स्थिती व सत्ताधिशांचे महसूल उत्पन्न शेती उत्पन्नाशी निगडीत होते. मात्र सत्ताधिशांच्या अपरीपक्व राज्यकारभारामुळे शेतकरी उठाव होत असल्याचे लक्षात येते. खानदेशातही ब्रिटीश सत्ताकाळात शेतकऱ्यांनी उठाव केलेले होते. म्हणून खानदेशातील शेतकऱ्यांचे उठाव (सन १८१८ ते १९४१) अभ्यासणे महत्वाचे ठरते.

सन १८१८ मध्ये इंग्रजांनी खानदेशावर ताबा मिळवीला. सन १८१८ ते १९४७ हया काळात खानदेशात इंग्रज सरकारची सत्ता होती. या संपुर्ण काळात इंग्रजांनी खानदेशात शेतीची मोजणी करणे, शेतीची प्रतवारी ठरविणे, महसूल ठरविणे व वसूल करणे, पाणीपुरवठा करणे, शेतीसबंधी प्रशासन व्यवस्था निर्माण करणे, शेतीचे व्यापारीकरण करणे इ. केलेले लक्षात येते. अर्थात इंग्रज सरकार आणि शेती व शेतकरी वर्ग यांचा प्रत्यक्ष सबंध खानदेशात होता. परंतु काही वेळा खानदेशात इंग्रज सरकारने शेतीसबंधी स्वार्थी धोरण व अविचारीपणा दाखविल्यामुळे खानदेशात शेतकऱ्यांचे उठाव झालेले दिसून येतात.

खानदेशात या काळातील शेतकऱ्यांच्या उठावाची कारणे खालील प्रमाणे दिसून येतात.

१. ब्रिटीश सरकारने शेतीचे व्यापारीकरण घडवून आणले होते.
२. इंग्रज साम्राज्यवादयांनी शेतकऱ्यांना बळीचा बकरा बनविले होते.
३. जमीनदारांनी शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार केलेले दिसून येतात.
४. सावकार वर्गाचा शेतकऱ्यांवर होणारा जाच घातक होता.
५. सरकारी महसूल अधिकारी शेतकऱ्यांशी वाईट वर्तन करत होते.
६. शेतकऱ्यांच्या जमीनी हिरावून घेण्याचे प्रकार घडत होते.

वरील करणांशिवाय शेतकऱ्यांच्या उठावास खालील प्रमाणे परीस्थिती अनुकूल असल्याचे लक्षात येते. यात संपुर्ण महाराष्ट्राच्या परिस्थितीचा समावेश करण्यात आला होता.

'इंग्रजांनी खानदेश जिंकण्यापुर्वी, खानदेश मराठा राज्याचा सर्वदृष्टीने महत्वाचा भाग होता. महाराष्ट्रीयनांचे जीवन त्यावेळी मुख्यत: बारगिरी व शेतीवर अवलंबून असे. कुटुंबातील निम्मे लोक नोकरीवर व निम्मे लोक शेतीच्या उत्पन्नावर जगत असत.'[१] परंतु इंग्रजांनी खानदेशावर ताबा मिळविल्याने, इंग्रजी राज्यात बारगिरी बंद पडल्याने कुटुंबातील लोकांना शेतीवरच अवलंबून राहण्याची वेळ आली. हजारो लोक इंग्रजांनी सैन्यातून कमी केले होते अशी नोंद कमिशनर चॅप्लीन याच लेखनात आढळते.

'इस्ट इंडिया कंपनीने जमीन महसूल गोळा करण्यासाठी रयतवारी पद्धत सुरू केली. कॅ. रीड आणि थॉमस मन्से यांनी ही पध्दत सन १८२२ मध्ये मद्रास, मुंबई प्रांतात लागू केली.'[२] कंपनीने रोख रकमेत शेतसारा वसूल करणे सुरू केले. सावकारही पैशाच्या रुपाने व्याज घेऊ लागला होता. पिकांची पाहणी करुन सरकारने जमीन महसुल ठरवितांना

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

शेतीवरील नैसर्गीक आपत्तींचा विचार केला नाही असे दिसून येते. कारण जास्तीत उत्पन्न मिळविणे हे सरकारचे धोरण असल्याने सरकारी अधीकाऱ्यांचा शेतकऱ्यांना जाच वाटू लागला. सन १८२४ मध्ये दुष्काळ काळात शेतकऱ्यांनी स्थलांतर करणे सुरू केले होते. अन्नधान्याचा तुटवडा, माणसे व गुरांचा मृत्यू, पाण्याची टंचाई यामुळे जमीनी उजाड व गावे ओस पडली होती. धान्य महागाईमुळे महाराष्ट्रात दंगे झाल्याचे उल्लेख मिळतात. धान्य महागाईचे एक उदाहरण म्हणून पुण्यातील धान्य किंमतींचा उल्लेख खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | धान्य प्रकार | किंमत | तारीख व माप (२६ आक्टोबर) | तारीख व माप (६ नाव्हेंबर) |
|---|---|---|---|---|
| १९३२ | ज्वारी | १ रुपया | ३२ शेर | १० शेर |
| १९३२ | बाजरी | १ रुपया | २५ शेर | ०८ शेर |
| १९३२ | गहू | १ रुपया | २२ शेर | १५ शेर |
| १९३२ | चणा | १ रुपया | १७ शेर | ०८ शेर |
| १९३२ | तांदुळ | १ रुपया | १३ शेर | ०८ शेर |

फक्त दहा दिवसातच धान्य महागाई वरील प्रमाणे वाढलेली दिसून येते. म्हणून बाजारातून धान्य लुटणे, दुकाने लुटणे, दुकानदारांना बेदम मारहाण करण्याचे प्रकार घडतच गेले. याचे लोण महाराष्ट्रभर पसरले असावे. सरकारने हे दंगे शमविल्याचे उल्लेख येतात.

इंग्रज सरकारच्या शेती धोरणाविरुध्द खानदेशातील शेतकऱ्यांमध्येही जागृती घडून आल्याचे लक्षात येते. खानदेशातील शेतकऱ्यांना इंग्रज सरकारची जमीन महसूल पद्धत मोठी जाचक वाटत होती. तसेच जमीन मोजणी अधिकाऱ्यांना शेतकरी प्रचंड घाबरत असत. डोईजड कर भरावा लागणार हे यामागील एक कारण दिसून येते. 'जमीन मोजल्यानंतर जमिनीच्या सिमा निर्धारीत केल्यावर दगडी खुणा गाडण्यासाठी शेतकऱ्यांनी मोठे दगड व बैलगाडया मोफत पुरविण्याबाबत सन १८४९ मध्ये महसुल आयुक्ताने आदेश पारीत केला. या आदेशाला स्थानिक शेतकऱ्यांनी तिव्र विरोध केला.'[३] तरीही सन १८५२ मध्ये खानदेशात महसुल आयुक्ताच्या आदेशाने जमीन मोजणीस प्रारंभ झाला. शहादा, यावल, रावेर, चोपडा, सावदा येथे सर्वेक्षणाच्या अंमलबजावणीस प्रारंभ होताच शेतकऱ्यांनी संघटीत विरोध केला.

'शहादा तालुक्यात दाविडसन हा अधिकारी लवाजम्यासह जमीनीची मोजणी करुन, सीमा ठरवून दगडी खुणा लावण्यासाठी गेला असतांना संतापलेल्या शेतकरी जमावाने शिपायास मारले व तुडविले.'[४] जमावाने दुकानदारांना धमकी दिली कि, सरकारी अंमलदार व त्याच्या माणसांना धान्य देऊ नये. शेतकऱ्यांनी तालुक्यातील दगड लपविले. तरीही जमीन मोजणीसाठी प्रयत्न केला गेल्याचे लक्षात येते. दगड आणण्यासाठी, १२ दगडांमागे २७ रुपये मजुरी असे महागडे स्वरुप यावेळी आले होते. ही परिस्थिती नोव्हेंबर १८५२ च्या पहील्या आठवडयातील होती. कलेक्टर एलफिन्स्टन याने ही महसूल पद्धती बंद करण्याचे सरकारला सांगीतले होते.

सावदा, रावेर, चोपडा भागात सरकारी सर्वेक्षणाचा शेतकरी संघटीतपणे निषेध करीत होते. यावल येथे महसूल अधिकारी जे. एफ. डेव्हीडसनच्या तंबुला दोन ते तीन हजाराच्या जमावाने घेराव घातला. शेतकऱ्यांनी शेतीच्या सिमा आखण्यास व सर्वेक्षणासबंधी सामग्री व मजुर उपलब्ध करून देण्यास नकार दिला. दुसऱ्या दिवशी त्यांनी हा तंबू नष्ट करण्याची धमकी दिली. इंग्रज अधिकाऱ्यांना नवीनच असणारा शेतकऱ्यांचा हा पवित्रा पाहून डेव्हीडसनच्या विनंतीवरून धुळे येथील कलेक्टर व धरणगांव येथील भिल्ल सेनादलाचा अधिकारी यावलला आलेत. पुण्याचे घोडदळही आले. मात्र शेतकऱ्यांचा पवित्रा संघटीत होता. 'इंग्रज अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण रद्द करण्याचे आश्वासन दिल्यावर शेतकऱ्यांचा हा मोर्चा पांगला होता. या वेळी धुळयाचा कलेक्टर एलफिन्स्टन हा होता तर धरणगांव येथील भिल्ल सेनादलाचा अधिकारी मेजर मौरीस हा होता.'[५] कलेक्टरचा प्रथम सहाय्यक मि. हॅवलॉक याने सर्वेक्षण रद्द करण्याचे व शासन पातळीवर निर्णय

ISSN : 2348-7143
December-2018

घेण्याचे शेतकऱ्यांना यावेळी सांगीतले होते. यामुळे मि. हॅवलॉक , मेजर मौरीस, कलेक्टरचा दुसरा सहाय्यक मि. बॉसवेल हे तापी परीसरातून निघून गेले. इतर अधिकारी मुख्य कार्यालयात निघून गेले.

रणगांव या सावदयापासून पाच मैल अंतरावरील तापी नदी काठावरील छोटयाशा गावी मि. डेव्हीडसन याने सर्वेक्षणाकामी तंबू उभारला. त्यास सावदा येथील सिव्हील इंजीनिअर मि. बेल व जमीन सर्वेक्षण अधिकारी मि. वेडींग्टन व मि. बेकर येऊन मिळाले. मात्र फैजपुर व सावदयाचे शेतकरी संघटीत झाले. त्यांच्या जमीन सर्वेक्षण थांबविण्याच्या मागणीस नकार मिळाल्याने या शेतकऱ्यांनी त्यांचा तंबू नष्ट केला. इंग्रज अधिकारी घोडयांवरुन पळून गेले. शेतकऱ्यांनी मामलेदार व महालकरी यांच्यावर हल्ला केल्याने ते ही पळून गेले. कलेक्टर मॅन्सफिल्ड धरणगांव येथे असतांना त्यास हे वृत्त कळाले. त्याने मालेगांव येथील सैन्य व धरणगांव येथील भिल्ल सैन्य यांना पाठविले. हे सैन्य जात असतांना एरंडोल येथील शेतकऱ्यांनी शहराचे दरवाजे बंद केले. त्यांनी या सैन्याला घेराव घातला. म्हणून कलेक्टरने पुण्याचे घोडदळ, भिल्ल पथक व पायदळ पाठवून शेतकऱ्यांचा हा उठाव दडपून टाकला. तरीही सावदा व फैजपूरच्या शेतकऱ्यांनी जमीन महसूल देण्यास नकार दिला. सरकारी आदेश धुडकावून लावले. एवढेच नव्हे तर लोक पंचायत स्थापन करून समांतर शासन यंत्रणा उभारली. या नवीन शासन यंत्रणेचे आदेश न मानणाऱ्यांना शिक्षा केल्यात. शेतकऱ्यांचा हा उठाव चिरडून टाकण्यासाठी कॅप्टन बिंगेट व कलेक्टर हे मेजर मॉरीसच्या सैन्यदलासह १५ डिसेंबर १८५२ रोजी फैजपूर येथे येऊन या गावास अचानक वेढा देऊन शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांना पकडले. नंतर सावदयावर कारवाई करून तेथील शेतकरी पुढाऱ्यांनाही पकडले. शेतकऱ्यांना घरी जाण्यास भाग पाडले. कलेक्टरने सावदा येथे दरबार भरवून जमीन सर्वेक्षणाची उद्दीष्टये स्पष्ट केलीत.

बहुसंख्य आदिवासी व भिल्ल हे शेतमजूर म्हणून काम करीत असत. खानदेशातील उद्योगधंदे लयास चालल्याने, शेतीवर अधिक भार वाढल्याने शेतकरी हवालदील झाला होता. असंतुष्ठ बनलेल्या अदिवासी व भिल्लांनी खानदेशातील इंग्रजांविरुध्द कलेले उठाव इतिहास प्रसिध्द आहेत.

सन १८९६ मध्ये खानदेशात मोठा दुष्काळ पडलेला होता. पिके आली नाहीत. एदलाबाद पेटा, जळगांव तालुक्यातील काही भाग, तापी व बुराई खोऱ्यातील प्रदेश, नंदुरबारच्या उत्तर व दक्षिणेकडील भागात मोठा दुष्काळ पडल्याची नोंद दिसून येते. धान्याची टंचाई व महागाई निर्माण झाली होती. ता. ५ ऑक्टोंबर १८९६ च्या सरकारी अहवालातील उल्लेखानुसार जळगांव, भुसावळ, पारोळा, धुळे भागात धान्य टंचाईमुळे शेतकऱ्यांचे दंगे होतील अशी भती सरकारला वाटत होती. यावर उपाय म्हणून सरकारने (Famine Relief Code) नियम तयार केलेत. परंतु त्यांची अंमलबजावणी तत्परतेने ते करीत नव्हते.

सन १८७० मध्ये पुणे येथे सार्वजनीक सभा स्थापन झालेली होती. लो. टिळक सार्वजनीक सभेत कार्यरत होते. खानदेशातील दुष्काळाची भिषणता पहाता सरकारी शेतसारा भरु नये असे सार्वजनीक सभेचे लोक खानदेशात प्रचार करु लागले. लो. टिळकांनी राजकीय चळवळ सुरू करून, सरकारकडुन दुष्काळ निवारण्याचे उपाय करवून घेतले पाहीजे असा प्रचार केसरीतून सुरू केला. सार्वजनीक सभेने ग्रामीण भागात बैठका घेऊन जनतेला आपल्या हक्कांची जाणीव करुन देतांना जमीन महसूल आकारणीमध्ये होणारा अन्याय हा विषय हाती घेतला होता. १२ नोव्हेंबर १८९६ रोजी एरंडोल येथे रा. सा. कोटस्थाने या म्यूनिसिपल चेअरमनच्या अध्यक्षतेखाली १००० लोकांची सभा भरुन त्यात सारामाफीसाठी कलेक्टरकडे अर्ज करण्याचे ठरले. त्याला अनुसरून २१ तारखेस एरंडोल तालुका असोशिएशन स्थापन झाली. १३ डिसेंबर १८९६ रोजी धोंडो शामराव गरुड यांच्या अध्यक्षतेखाली धुळे येथे दुष्काळाची तिव्रता व सारामाफी चळवळ या सबंधी सभा होऊन त्यात शंकर श्रीकृष्ण देव यांनीही भाषण केले होते. 'शंकर देव यांनी दि. १९ जानेवारी १८९७ रोजी धुळे येथे शेतकऱ्यांची सभा बोलावून या सभेत त्यांनी दुष्काळासबंधी भाषण केले होते. या सबंधी प्रत्येक तालुक्यात जानपद सभा स्थापन करुन चळवळ विकसीत होत असल्याने सरकारी अधिकारी अस्वस्थ बनले होते. २ फेब्रुवारी १८९७ रोजी २००० ते २५०० शेतकरी सारामाफीचा अर्ज घेऊन कलेक्टरकडे गेले होते.'[६] शेतसारा बंदी चळवळीस खानदेशात नाटयमय प्रतिसाद मिळाला होता. एरंडोल, अमळनेर, धुळे तालुक्यात शेतकऱ्यांची चळवळ

ISSN : 2348-7143
December-2018

म्हणून ही चळवळ पसरली होती. सरकारनेही शेतसारा बंदी चळवळीतील शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करणे सुरू केले होते. त्यामुळे लहान शेतकरी भयभीत झाल्याचे लक्षात येते. पोलीसांच्या दहशतीमुळे गरीब शेतकरी मात्र शेतसारा देऊ लागले होते.

लॉर्ड कर्झन भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आल्यापासून प्रचंड दडपशाहीची राजकिय परिस्थिती निर्माण झ ाली होती. दुष्काळ काळातही शेतसारा भरला नाही तर सरकार शेतकऱ्यांच्या जमीनी खालसा करीत असत. म्हणून शेतकरी सावकारकडून कर्ज काढत असल्याने कर्ज फिटले नाही तर सावकार जमीनी ताब्यात घेत असे. सन १९०१ मध्ये लँड रेव्हेन्यू कोडमध्ये बदल करण्यासाठी सरकारने विधेयक मांडले. सन १८७९ च्या जमीन महसूल कायदयाने शेतकरी हा जमीन विकू शकत असे. परंतु सन १९०१ च्या कायदयाने शेतकऱ्यांना जमिनी विकता येणार नाही असे निश्चित ठरविले गेले. या विधेयका विरोधात भारतीय नेत्यांनी सभात्याग केलेला दिसून येतो. लो. टिळकांचाही जनजागृतीचा प्रयत्न चालुच होता. या विधेयका विरुध्द जनजागृतीसाठी शंकर श्रीकृष्ण देव यांनी ९ जुलै १९०१ रोजी ८०० शेतकरी उपस्थित असलेल्यांची सभा घेतली. अध्यक्ष स्थानी धोंडो शामराव गरुड होते. शेतकऱ्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी ४ ते ६ महीने बिल संमत करु नये असा विचार मांडला. १४ जुलै रोजी पारोळा येथे गुलाबदास हरीदास या गुजराथी व्यापाऱ्याच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांची सभा भरली होती. यावेळी शंकर देव व नागरीक, वकील वर्ग ही उपस्थित होते. या सभेत जमीन महसूल कायदयाचा निषेध करण्यात आला. हे बिल संमत करु नये, यासाठी सरकारकडे अर्ज पाठविण्याचे ठरविले होते. परंतु शेवटी मुंबई कायदेमंडळाने हे बील संमत केलेले दिसून येते. 'सन १८९९ मध्ये "मुंबई इलाख्यातील २५% जमीन शेतकरी नसलेले अशांच्या मालकिची होती. सावकारांच्या ताब्यात १५% जमीन होती. सन १९११ मध्ये १/६ जमीन शेतकरी नसलेल्या मंडळीच्या मालकिची होती.'[७]

सरकारचे जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न सुरू असतांना शेतीचे व्यापारीकरणही त्यांनी घडवून आणले होते. कापूस, ऊस, तंबाखू या नगदी पिकांचे भाव अन्नधान्याच्या भावापेक्षा अधिक होते. 'पहिल्या जागतिक महायुध्दकाळात कापूस पिकविण्यावर भर दयावा असे खानदेशातील शेतकऱ्यांनाही वाटत होते. जमिनी खरेदी- विक्रीत वाढ झाल्याने जमिनीच्या किंमतीही वाढल्या होत्या. महायुध्दा सारख्या गंभीर परिस्थीतीत शेती हंगाम चांगला आल्याने स्थानिक परिस्थिती स्थिर होती. इ.स. १९१५-१६ मध्ये उत्तम पिके आली होती.'[८]

जागतिक मंदिच्या काळात शेती उत्पादनाच्या सर्वसाधारण किंमतीची पातळी कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावली होती. शेत मालाची परदेशातील मागणीही कमी झाली होती. त्यामुळेच शेती मालाच्या किंमती कमी होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितींवर प्रतिकूल परीणाम झाला होता. म. गांधीजींच्या विचारसणीचा भारतात वाढता प्रभाव व सविनय कायदेभंग चळवळीमुळे वातावरण अहिंसा चळवळीचे बनलेले होते. शेतकऱ्यांचा सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग दिसून येतो. ३१ मे १९३१ रोजी शहादा येथे शेतकरी परीषद भरविण्यात आली होती. या परीषदेत वल्लभभाई पटेल यांनी केलेल्या प्रमुख भाषणांत त्या शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष देणाऱ्या काँग्रेसकडे लक्ष द्या. असे आवाहन केले होते. यावरुन शेतकारी वर्ग काँग्रेसच्या चळवळीत सहभागी होत होता असे लक्षात येते.

कासारे, ता. साक्री येथे जून १९३१ मध्ये ३००० शेतकऱ्यांची परीषद भरली होती. जिल्हा काँग्रेस कमीटीचे अध्यक्ष बाळूभाई मेहता, शंकरराव ठकार, विश्वासराव पाटील हे नेते यावेळी हजर होते. या परीषदेत धर्माजी तानाजी पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाली. तसेच १४ ठराव मंजूर करण्यात आले. काँग्रेसच्या (कराची) २० कलमी ठरावांना पाठींबा, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांच्या फाशीचा निषेध, पंचाच्या संमतीने आणेवारी लावणे, एप्रिलमध्ये शेतसारा वसुल करणे इ. ठराव संमत झाले होते. शिरपुर येथे डिसेंबर १९३१ मध्ये माधवराव भोसले यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांची परीषद भरली होती. तीथे १००० हून जास्त शेतकरी उपस्थित होते. सरकारने चुकीची आणोवारी लावल्याने फेरचौकशी व्हावी असा ठराव मंजुर करण्यात आला. याच निमित्ताने शिंदखेडा येथे २००० शेतकऱ्यांची परीषद भरली होती. तर शहादा येथील ४०० शेतकरी उपस्थित असलेल्या परीषदेत शेतसारा तहकुबीचा ठराव पास करण्यात आला होता.

शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने शेतकरी कमिटी स्थापन केली होती. या कमिटीची बैठक धुळे येथे ऑगस्ट १९३५ मध्ये होऊन प्रत्येक जिल्हयात शेतकरी कमिटी स्थापन करण्याचा ठराव संमत करण्यात आला होता. यापुढील परीषदांमध्ये शेतसारा माफी या अर्थाचे ठराव पास करण्याशिवाय शेतकरी चळवळ दिसून येत नाही. कारण इंग्रजांच्या होम डिपार्टमेंटच्या फाईलीं मध्येही असेच दिसून येते. होम डिपार्टमेंटच्या फाईलीमधील एका पत्रातील उल्लेखा प्रमाणे 'दि. ०२-०२-१९४१ रोजी चाळीसगांव येथे शेतकऱ्यांची परीषद भरली होती. या परीषदेत जमिन महसुल ५०% माफ करण्यासाठी सरकारला विनंती करण्याचा ठराव पास करण्यांत आला होता.'[९] पुढील काळातील इंग्रजांच्या गोपनीय अहवालांमध्ये शेतकऱ्यांची चळवळ नील दाखविलेल्या दिसून येतात.

**निष्कर्ष -**

इंग्रज सरकार आणि खानदेशातील शेती व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध होता. शेतकऱ्यांना घातक ठरणाऱ्या सरकारी निर्णयांविरोधात खानदेशातील शेतकऱ्यांनी उठाव केलेले आहेत. पुढील काळात जहाल, मवाळ कॉंग्रेस चळवळीशी शेतकरी वर्ग जोडला गेल्याने शेतकऱ्यांचा सरकार विरोधी असंतोष शेतकरी वर्गाने परीषदा घेऊन व्यक्त केलेला आहे.

**संदर्भ -**

१. खोबरेकर विठ्ठल गोपाळ, इंग्रजी सत्तेविरुध्द महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव, १८१८-१८६०, पॉप्यूलर बुक डेपो, मुंबई, १९५९, पा. ९
२. कदम य. ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००३, पा. ३५८
३. चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, जळगांव जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४, पा. १११
४. खोबरेकर (डॉ.) वि. गो., महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (इ.स.१८१८ ते १८८४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९४, पा. १६
5. Gazetter of the Bombay Presidency, Volume XII, Khandesh, Govt. Photozinco Press, Pune, 1985, P 261
६. पांडे (डॉ) मधुकर निळकंठ, धुळे जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, रंगनाथ मुद्रण, मुंबई, १९९७, पा.१८
७. फडके यशवंत दिनकर, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, १९०१-१९१४, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८९, पा. १२९
८. चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, जळगांव जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४, पा. १२९
9. Home Department (spl.) File No. 800(74) (10) III, 1941-43, Letter of 13 February 1941, Bombay Archives, Mumbai.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261**
**Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# मुंबईतील कामगार चळवळ

**सागरकुमार विठ्ठल जाधव**
संशोधक विद्यार्थी,,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**प्रस्तावना :**

१७५७ साली प्लासीच्या लढाईत विजय मिळवून ब्रिटिशांनी हिंदुस्थानातील इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला. १७६० ते १८५० या काळात ब्रिटनमध्ये औटोगिक क्रांती झाली व त्यामुळे ब्रिटनचे रंगरूप पालटले. औटोगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात औटोगिक शहरांची निर्मिती झाली. ब्रिटनप्रमाणेच हिंदुस्थानातही १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात औटोगिकीकरणाला प्रारंभ झाला. मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, मद्रास, कानपूर व नागपूर अशा कापड उत्पादक विभागात कापड गिरण्यांची स्थापना होऊ लागली व औटोगिकीकरणाला गती मिळाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणांमुळे हिंदुस्थानच्या ग्रामीण विभागातील हस्तोटोग, ग्रामोटोगांचा ऱ्हास झाला. तसेच वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर शहरांकडे स्थलांतरित होऊ लागले. कापड गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना सुरूवातीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. कालांतराने कामगार आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकत्र येऊ लागले व कामगारांच्या संघटना निर्माण होऊ लागल्या. सत्यशोधक नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी 'बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन' ही भारतातील पहिली संघटना बांधली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी मुंबईतील कामगारांना संघटित केले व अनेक लढे उभारले. त्यामुळे सरकारलाही कामगार हितासाठी कायदे करावे लागले. १९ व्या शतकाच्या अखेरच्या दशकात मुंबईप्रमाणेच हिंदुस्थानातील अन्य शहरांमध्येही कामगारांनी लढे उभारले व संप केले. २० व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात हिंदुस्थानातील कामगार आपल्या वर्गीय लढ्याबरोबरच राष्ट्रीय चळवळीतही सहभागी होऊ लागला. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने व लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली १९२० साली मुंबईमध्ये 'अखिल भारतीय कामगार संघटने'ची स्थापना करण्यात आली व हिंदुस्थानात कामगार चळवळीला प्रारंभ झाला.

**मुंबईतील कामगार चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

ईस्ट इंडिया कंपनीने संपूर्ण हिंदुस्थान आपल्या हुकुमतीखाली आणण्यासाठी जवळजवळ शंभर वर्षे घेतली. मोगल बादशहाकडून व्यापारासाठी सवलती मिळवून ईस्ट इंडिया कंपनीने भारताच्या समुद्रकिनाऱ्यावरील मोक्याच्या जागी वखारी स्थापन केल्या. १७५७ सालच्या प्लासीच्या लढाईतील विजयामुळे भारतातील इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला गेला. साधारणपणे चारशे वर्षापूर्वी ब्रिटिशांना आंदण म्हणून मिळालेली मुंबई म्हणजे मच्छिमार, कोळी व आगरी लोकांची वस्ती असलेला सात बेटांचा समूह होता. ब्रिटिश सरकारने पुढे काही वर्षांनी व्यापारासाठी ही सात बेटं ईस्ट इंडिया कंपनीच्या स्वाधीन केली. फ्रेंच, मराठे, शिद्दी वगैरे जमातींच्या आक्रमणांपासून संरक्षण करता करता ब्रिटिशांनी या सात बेटांवर आपला पूर्ण जम बसविला ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत मुंबई बेटाची झपाट्याने वाढ झाली.

हिंदुस्थानच्या औटोगिक विकासाचा प्रारंभ एकोणिसाव्या शतकाच्या उढारार्धात झाला. या विकासाचे केंद्रीकरण मुंबईत झालेले होते. १६ एप्रिल १८५३ रोजी भारतातील पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे दरम्यान धावली.

ISSN : 2348-7143
December-2018

मुंबई आणि सुरत ही कापसाची दोन महत्त्वाची केंद्रे असल्यामुळे त्यांना रेल्वेने जोडण्यात आले. या रेल्वेचे टर्मिनस ग्रँटरोड येथे होते.

मुंबईच्या औटोगिकीकरणाचा आणि विशेषत: कापड उटोगाचा पायाही एकोणिसाव्या शतकाच्या उढारार्धात घातला गेला. या कामी अठराव्या शतकापासून व्यापारात अग्रेसर असणाह्मया पारशी व्यापाह्मयांनीच पुढाकार घेतला. मुंबईतील पारशी व्यापारी कानसजी नानाभाई दावर यांनी मुंबईमध्ये कापड गिरणी बांधण्याचा निर्णय घेतला. ७ जुलै रोजी कानसजी दावर यांनी 'द बॉम्बे स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी' ही पहिली कापड गिरणी ताडदेवला बांधली. १८५७ मध्ये ती 'अलायन्स मिल' या नावाने ओळखली जाद्व लागली. फेब्रुवारी १८६० मध्ये सेठ मंगळदास नथुभाई यांनी 'बॉम्बे युनायटेड स्पिनिंग ॲड वीव्हिंग कंपनी' नावाची गिरणी स्थापन केली. १८६० साली रॉयल मिल, कुर्ला मिल व ग्रेट ईस्टर्न या गिरण्या सुरू झाल्या. १८७० पर्यंत मुंबईत एकूण १३ गिरण्या सुरू झाल्या. त्यामध्ये ८१०० कामगार कामाला होते. १८६५ पर्यंत कापड उटोग हा मुंबईच्या आर्थिक उलाढालींचा उगमस्त्रोत बनला. सुरूवातीच्या काळात मुंबईच्या कापड उटोगाचे इंग्लंडमधील लँकेशायर शहरातील कापड उटोगाबरोबर निकटचे संबंध होते. मुंबईतील गिरणी उटोग यंत्राबरोबरच त्यांचे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यासाठीही लँकेशायरवर पूर्णपणे अवलंबून होता.

शहरांमध्येही औटोगिकीकरणाच्या या प्रक्रियेमुळे शहरांकडे नजीकच्या ग्रामीण विभागातून रोजगाराच्या शोधात अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर व दुष्काळग्रस्त लोक स्थलांतरित होत होते. त्यामुळे या शहरांच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत होती. ग्रामीण विभागाने मुंबईतील कापड गिरण्यांना भरपूर कामगार मिळवून दिले. शहरातील या नव्या रोजगाराच्या संधीमुळे ग्रामीण भागातील शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतकरी उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणावर मुंबईत स्थलांतरित होत होते. १८७१-७२ सालच्या दुष्काळानंतर ग्रामीण भागातील स्थलांतर आणखी वाढले. या स्थलांतरित लोकांमध्ये सामाजिकदत्ष्टया मागासलेल्या लोकांची संख्या लक्षणीय होती. गिरणी कामगार बनायला सुरूवातीला काही विशेष कौशल्याची गरज नव्हती. गिरणी कामगारांच्या राहण्याची सोय करण्यासाठी गिरणी मालकांनी चाळी बांधायला सुरूवात केली. सुरूवातीला एकेकटे कामगार, नंतर पुरूष नातेवाईकांबरोबर आणि मग संपूर्ण कुटुंबासहित चाळीत राहू लागले. कोकणातील मनीऑर्डर अर्थव्यवस्थेचा उगम हा गिरणी कामगारांमुळेच झाला. शेतीपासून मिळणारे अल्प उत्पन्न, अन्य उटोगधंदयांचा अभाव, त्यामुळे कोकणात राहणारी बहुसंख्य कुटुंबे मुंबईतील चाकरमान्यांनी पाठविलेल्या पैशावर जगत होती.

कापड गिरण्यांमध्ये कमी पगारात भरपूर कामगार उपलब्ध असल्यामुळे नवीन गिरणी निघाली की, अकुशल कामगारांचा लोंढा त्या गिरणीकडे रोजगाराच्या आशेने जात असे. गिरणी व्यवस्थापनाकडून कामगारांची निवड करताना अधिकाधिक कोवळया वयाच्या पण सशक्त तरूणांना प्राधान्य दिले जात होते. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत गिरण्यांमध्ये आधुनिकीकरणाचा शिरकाव झालेला नसल्यामुळे गिरण्यांचे कामकाज सुर्यप्रकाशाच्या वेळेतच होत होते. जेवणाच्या सुीचा वेळ वगळून कामगारांना अकरा तास ते चौदा तास गिरण्यांमध्ये काम करावे लागत होते. त्याबरोबरच गिरण्यांमधील काम सुरू होण्याची वेळ निश्चित नसल्यामुळे कामगारांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. सकाळी खूप लवकर आल्यामुळे आणि रात्री उशिरा घरी जात असल्यामुळे कामगारांना दाढी करायलाही वेळ मिळत नसे. कामगारांना नोकरी आणि राहण्यासाठी खोली मिळाली तरी कामाच्या ठिकाणी स्थिती अत्यंत हलाखीची होती. सुरूवातीच्या काळात मुंबईतील गिरणी कामगारांना साप्ताहिक सुी नव्हती. त्यांना दररोज तेरा-चौदा तास काम करावे लागत होते. हिंदू

ISSN : 2348-7143
December-2018

सणाच्या दिवशी गिरण्या बंद असत. पुढे १८९९ साली बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनचे १६ नियम असलेली सर्वसाधारण नियमावली तयार केली. परंतु ही नियमावली प्रत्यक्षात मात्र कोणत्याच गिरणीने स्विकारली नाही. उलट प्रत्येक गिरणीने स्वत:च्या सोयीची नियमावली राबविली. कामगारांनी नियमित वेळेवर कामावर हजर राहावे, दिवसभर कामाच्या जागेवरच थांबावे, सांगितल्याप्रमाणेच काम करावे आणि काम संपल्याच्या वेळेनंतरच घरी जावे, गिरणी चालू नसेल त्या दिवशीही कामगारांनी कामावर यावे, कामाच्या ठिकाणी धुम्रपान करू नये, एका महिन्याची पूर्वसूचना न देता नोकरी सोडू नये अशा अपेक्षा गिरणी मालक कामगारांकडून करीत होते. याबरोबरच विविध कारणांसाठी दंड आणि पगार कपातीची टांगती तलवार कामगारांच्या डोक्यावर सतत टांगलेली असे. काम कमी झाले किंवा त्याचा दर्जा खालावला तर त्याबाबत कामगारांकडून दंड वसूल केला जात होता. नग पूतीवर उत्पादन देणाह्या कामगारांची संख्या मोठी होती. गिरणीत कायमस्वरूपी असणाह्या कामगारांना त्यांचा मासिक पगार दुसह्या महिन्याच्या अखेरीस देण्यात येत होता. कामगारांना मिळणारे अपूरे वेतन, सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंतचे कामाचे तास, कामासंबंधीचे अत्यंत जाचक नियम, राहण्याची अत्यंत किळसवाणी अवस्था, वेळोवळी येणारे साथीचे रोग, कामगारांच्या स्वास्थाकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष या संकटांना कामगारवर्ग नियमितपणे तोंड देत होता. या काळात कामगारांमध्ये आपल्या अधिकारांबद्दल पुरेशी जाणीव, जागत्ती नव्हती, त्यामुळे कामगारांची संघटनाही अस्तित्वात आलेली नव्हती.

फेब्रुवारी १८७५ मध्ये मुंबईतील प्रमुख गिरणी मालकांनी एकत्र येद्वन 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' ही संघटना स्थापन केली. १८८१ सालच्या फॅक्टरी ॲक्टमधील तरतुदींवर मोठ्या प्रमाणावर टीका झाली. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मतानुसार, षकिमान १६ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना कारखान्यात कामाला लावू नये, कारण अकाली कामाच्या ताणामुळे मुलांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो म्हणून फॅक्टरी ॲक्टमध्ये दिलेली कामे करणाऱ्या मुलांच्या वयाची किमान मर्यादा १२ वरून १६ करण्यात यावी नोकरी करण्यामुळे शिक्षणापासून वंचित राहणाह्या मुलांच्या शिक्षणाची सोय सरकारने करावी. गिरणी कामगारांची तुटपुंज्या पगारापासून मुक्तता व्हावी यासाठी सरकारने कायदा केला पाहिजे. कामगारांना पुरेशी विश्रांती मिळावी यासाठी मुंबईतील गिरण्या दरमहा दोन दिवस बंद ठेवल्या जातात, असे सांगण्यात आले आहे.कामगारांच्या
हितरक्षणासाठी मालकांना आवाहन करण्याऐवजी कामगारांना संघटित करून जागत्त करण्याचे काम नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरू केले. त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी गिरणी कामगारांच्या बैठका घेतल्या. गिरणी कामगारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून लोखंडे यांनी १८८४ साली 'बॉम्बे मिल हॅड्स असोसिएशन' ही देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. विविध गिरण्यांमधील प्रमुख जॉबर मंडळी रघु भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुर्कोजी त्याचप्रमाणे विठ्ठलराव कोरेगांवकर, कत्ष्णराव अर्जुन केळुसकर, रामचंद्रराव शिंदे आणि नारायणराव पवार इत्यादी सत्यशोधक नेतेही ही कामगार संघटना बांधण्यात अग्रेसर होती. मुंबई सरकारने १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टमधील त्रुटींवर सर्वत्र होणारी टीका विचारात घेद्वन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी १८८४ साली कलेक्टर डब्ल्यू. बी. मूलक यांच्या अध्यक्षतेखाली 'फॅक्टरी कमिशन' नेमले. या कमिशनने कामगारांची कैफियत ऐकावी, अशी मागणी लोखंडे यांनी केली. सरकारने नेमलेले कमिशन ही एक चांगली संधी आहे, हे ओळखून कमिशन व सरकारपुढे कामगारांच्या समस्या मांडण्याचे धोरण बॉम्बे मिल हॅंड्स असोसिएशनने ठरविले. त्यादत्ष्टीने सप्टेंबर १८८४ मध्ये असोसिएशनच्या पदाधिकाह्यांची एक सभा घेण्यात आली. फॅक्टरी कमिशनपुढे कामगारांची कैफियत मांडताना व महढवाची वक्तव्ये करताना त्यामध्ये विसंगती असता कामा नये, याकडे सभेच्या आयोजकांचा कटाक्ष होता. आपली बाजू कमिशनपुढे मांडताना नेमकेपणाने काही मुद्दे आणि मागण्या

ISSN : 2348-7143
December-2018

पुढे करायला हव्यात, याबाबत सभेत एकवाक्यता झाली होती. या सभेत आपल्या मागण्या कामगारांसमोर जाहीर करण्यासाठी मुंबईतील सर्व गिरणी कामगारांची जाहीर सभा घेण्याचे निश्चित करण्यात आले.[१]

२३ सप्टेंबर १८८४ रोजी सायंकाळी सुपारीबाग, परळ येथे गिरणी कामगारांची ऐतिहासिक ठरलेली पहिली जाहीर सभा झाली. या सभेसाठी चार हजार कामगार उपस्थित होते. आपल्या हितासाठी काहीतरी घडत आहे, अशी बहुसंख्य कामगारांची भावना होती. सभेच्या अध्यक्षस्थानी लोखंडे होते. आपल्या भाषणात लोखंडे यांनी कामगार वर्गाच्या व्यथा मांडल्या व आपले प्रश्न सोडवून घेण्यासाठी कामगारांनी संघटित व्हायला हवे, असे आवाहन कामगारांना केले. ही सभा यशस्वी झाल्यानंतर दुसरी सभा २६ सप्टेंबर रोजी भायखळा येथे घेण्यात आली. या दोन सभांमधून लोखंडे यांनी गिरणी कामगारांना प्रत्येक रविवारी सुी देण्यात यावी, दुपारी अर्धा तास सुी टावी, सकाळी ६.३० वाजता कामाला सुरूवात व्हावी आणि सूर्य मावळताच काम थांबविण्यात यावे, कामगारांचा पगार पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत मिळावा, कामावर असताना एखाटा कामगाराला दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पगार मिळावा आणि कामावर असताना जर एखादा कामगार मरण पावला तर त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी, अशा सहा मागण्या केल्या. या सभेत फॅक्टरी कमिशनसाठी दोन जादा कामगार प्रतिनिधींची नेमणूक केली जावी यासाठी मागणीचे पिटिशन सरकार आणि कमिशनपुढे दाखल करावे असे ठरले. या कामासाठी एक समिती नेमण्यात आली. बॉम्बे मिल हँड्स असोसिएशनने घेतलेल्या देशातील या पहिल्या कामगार सभेमुळे कष्टकरी जनतेला आवाज प्रथमच जाहीरपणे प्रकट झाला.[२]

एकीकडे आपल्या अधिकारांसाठी जागत्त होद्वन संघटितपणे आंदोलने उभारणारी कामगारशक्ती, दुसरीकडे लांबलेल्या चौकशी समितीपुढे येणारे कामगार शोषणाचे विविध प्रकार, तर तिसरीकडे हिंदुस्थानी गिरण्यांच्या अनिर्बंध स्पर्धेला आळा घालण्यासाठी फॅक्टरी अॅक्टची मागणी करून लँकेशायर आणि मँचेस्टरच्या उटोगांनी ब्रिटिश पार्लमेंटवर आणलेला दबाव यामुळे हिंदुस्थान सरकार लवकरच कामगारांसाठी कायदे करणार याची चाहूल गिरणी मालकांना लागली होती. कामगारांच्या अनेक मागण्यांपैकी कामाचे तास कमी करण्याची मागणी गिरणी मालकांचे सर्वाधिक नुकसान करणारी ठरणार होती. त्यामुळे ती कदापि मान्य न करता इतर मागण्यांबाबत थोडे सहानुभूतीचे धोरण ठेवावे, असे काही गिरणी मालकांना वाटत होते. सरकारने कोणत्याही निर्णयाची घोषणा करण्यापुर्वी आपणच कामगारांसाठी काही सवलती टाव्यात व सहानुभूती मिळवावी, या धारणेतून गिरणी मालकांनी घाईघाईने रविवार सुीचा निर्णय घेतला. नव्या फॅक्टरी कमिशनने विविध कामगार, कामगार संघटना व गिरणी मालक संघटना यांची मते जाणून घेतली. १८९१ च्या फॅक्टरी अॅक्ट निर्मितीसाठी लोखंडे यांनी फॅक्टरी कमिशनला जे महढवाचे सहकार्य केले, त्याचा विशेष उल्लेख कमिशनने आपल्या अहवालात केला. नव्या फॅक्टरी अॅक्टची गिरणी मालक मुळीच अंमलबजावणी करीत नाहीत, याबाबत लोखंडे यांनी अनेक उदाहरणे देद्वन 'दीनबंधू' मधून सातत्याने पाठपुरावा केला. १८९० नंतर पगार कपातीच्या कारणामुळे वेगवेगळ्या गिरण्यांत संप होद्व लागले होते.

२० व्या शतकाच्या पहिल्या दशकात मुंबईबरोबरच कलकढा, मद्रास, समस्तीपूर, अहमदाबाद अशा औटोगिक शहरातही कामगारांचे संप झाले. १९०१ साली मुंबईतील २०,००० गिरणी कामगारांनी पगार कपातीला विरोध करण्यासाठी संप पुकारला. गिरणी मालकांनी पगार कपात मागे घेतल्यानंतर कामगारांनी संप मागे घेतला. १९१९-२० साली देशातील निरनिराळ्या औटोगिक शहरांत संपाची लाट उसळलेली होती आणि त्यामधून औटोगिक अशांतता स्पष्ट होत होती. कामगार आपल्या मागण्यांसाठी एकत्र येद्वन वारंवार संप करीत होते. मुंबईतील कापड गिरण्यांच्या संपात एकूण दीड लाख कामगार सामील झाले. ३१ जानेवारी १९२० रोजी

मुंबईच्या 'ब्रिटिश इंडिया नॅव्हिगेशन कंपनी' तील १०,००० कामगार संपावर गेले. २ ते १६ फेब्रुवारी १९२० या दरम्यान 'इंडियन मरिन डॉक वर्कर्स' मधील २०,००० कामगार संपावर गेले. २४ फेब्रुवारी ते २९ मार्च १९२० याकाळात 'टाटा आयर्न अँड स्टील' कंपनीतील ४०,००० कामगार संपात सामील झाले. २० ते २६ मार्च १९२० दरम्यान मद्रासचे १७,००० गिरणी कामगारांनी संप पुकारला. याशिवाय मदुरा, पाटणा, मुझफ्फरपूर, बरेली, सहारनपूर, झाशी, अलाहाबाद, गोध्रा, कराची व पुणे या शहरातही अनेक संप झाले. १९२० च्या पहिल्या सहा महिन्यात हिंदुस्थानात एकूण २०० संप झाले. त्यामध्ये १५ लाख कामगारांनी सहभाग घेतला.[३]

१९२० साली हिंदुस्थानात संपाची लाट उसळलेली असतानाच अखिल भारतीय स्वरूपाची प्रतिनिधीक कामगार संघटना स्थापन करण्याच्या हालचाली चालू होत्या. वॉशिंग्टन कामगार परिषदेनंतर दरवर्षी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सभेसाठी हिंदी कामगारांचे प्रतिनिधी पाठविण्याचा प्रश्न पुन्हा निर्माण होणार असे दिसू लागले होते. ७ जूलै, १९२० रोजी परळ येथे भरलेल्या जाहीर सभेत लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे (आयटक) पहिले अधिवेशन भरविण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला. आयटकची स्थापना करण्यामागे लोकमान्य टिळकांची प्रेरणा होती. आयटकचे पहिले अधिवेशन २२ ऑगस्ट, १९२० रोजी भरवावयाचे होते, पण टिळकांच्या निधनामुळे हे अधिवेशन लांबणीवर पडले. आयटकचे पहिले अधिवेशन मुंबई येथे एंपायर नाट्यगत्हात ३१ ऑक्टोबर, १९२० रोजी भरले. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी लाला लजपतराय होते, तर स्वागताध्यक्ष जोसेफ बॅप्टिस्टा होते. यावेळी मोतीलाल नेहरू, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, महम्मद अली जिना या हिंदुस्थानी नेत्यांखेरीज कर्नल वेजवूड हे इंग्लंडमधील मजूर पक्षाचे नेते उपस्थित होते. हे अधिवेशन भरविण्याच्या कामात महाविटालयीन विटार्थी असलेले श्रीपाद अमत्त डांगे, रघुनाथ निमकर वगैरेंनी हिरिरीने भाग घेतला होता. या पहिल्या अधिवेशनाला ८०० प्रतिनिधी उपस्थित होते व ६० संलग्न व ४० सहानुभूतीदार ट्रेड युनियन संघटनांच्या ५ लाख कामगारांचे ते प्रतिनिधीत्व करीत होते.[४] आपल्या भाषणात बॅप्टिस्टांनी भांडवलदारवर्ग कामगारांचे कसे शोषण करतो हे सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात लाला लजपतराय यांनी वर्गजागत्ती, आंतरराष्ट्रीय कामगारवर्गीय बंधुता व वर्गीय दत्ष्टीकोनामध्ये राष्ट्रीयतेचे स्थान या तीन मुलभूत तत्त्वांवर भर दिला. लाला लजपतराय यांनी आपल्या भाषणात कामगार व भांडवलदार या दोन वर्गातील संघर्षाचे विश्लेषण केले. कामगारांत वर्गीय जाणीव निर्माण करून चळवळी कराव्यात आणि त्यांना शिक्षण टावे, असे आवाहन त्यांनी केले. या अधिवेशनात कामगार कल्याणासाठी अनेक ठराव करण्यात आले. त्यातील एका ठरावानुसार कामगारांना मताधिकार देण्यासंबंधीची मागणी करण्यात आली. विधीमंडळात व्यापाऱ्यांना तसेच गिरणी मालकांचा प्रतिनिधी जसा निवडला जातो. त्याचप्रमाणे कामगारांचाही प्रतिनिधी निवडला जावा, अशी मागणी करण्यात आली. कामगारांच्या मागण्यांचे स्वरूप निश्चित करण्यासाठी एक स्थायी समिती नियुक्त करण्यात आली आणि तिची बैठक २ नोव्हेंबर, १९२० रोजी झाली. अधिवेशनात ८२ सदस्यांची एक स्थायी समिती निवडण्यात आली.

१९२० साली आयटकची स्थापना ही एक महान ऐतिहासिक घटना होती. त्यामुळे वर्गीय पातळीवर कामगारांची संघटना कार्यरत झाली. निरनिराळ्या कारखान्यात ठिकठिकाणी ज्या ट्रेड युनियन संघटना होत्या त्यांना मुलभूत दत्ष्टीकोनातून एकत्र आणून मध्यवर्ती मार्गदर्शन करण्याच्या हेतूने ही संघटना स्थापन झाली. पहिल्या महायुानंतरची परिस्थिती, रशियातील ऑक्टोबर क्रांतीची प्रतिक्रिया आणि जागतिक क्रांतीची लाट या घटनांमुळे भारतातील कामगारवर्ग कृतीसाठी संघटित झाला आणि त्या संघटनेतून भारतातील कामगार चळवळ जन्माला आली.[५]

**समारोप :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात औद्योगिकीकरणाला सुरूवात झाली. यापूर्वी ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती झाली होती. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला कलकत्त्यामध्ये कापड गिरण्यांच्या स्थापनेचे प्रयत्न झाले, पण ते अयशस्वी ठरले. त्यानंतर १८५१ साली मुंबईत पहिली कापड गिरणी बांधण्यात आली आणि पुढील वीस वर्षात कापड उद्योग हा मुंबईतील व भारतातील औद्योगिकरणाचा उगमस्त्रोत बनला. वाढत्या औद्योगिकीकरणाबरोबरच कामगार अनेक भागातून मुंबईत व अन्य शहरात स्थलांतरित होत होते. या स्थलांतरित कामगारांना अपूरे वेतन, कामाचे जादा तास, कामाचे अत्यंत जाचक नियम, राहण्याची किळसवाणी अवस्था, साथीचे रोग आणि आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष या संकटांना सामोरे जावे लागत होते. या काळात कामगारांच्या संघटना नसल्यामुळे त्यांचे मालक, अधिकारी व मध्यस्थांकडून मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. मुंबईतील गिरणी उद्योगाच्या भरभराटीमुळे ब्रिटनमधील कापड उद्योगाला स्पर्धेचा धोका जाणवू लागला. त्यातून फॅक्टरी ॲक्टची मागणी समोर आली व १८८१ साली फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आला. पण त्यातूनही कामगारांचे शोषण होतच राहिले. त्यामुळे महात्मा जोतिबा फुले यांचे अनुयायी व सत्यशोधक चळवळीचे नेते नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन' ही भारतातील कामगारांची पहिली संघटना बांधली व तिच्या माध्यमातून कामगारांच्या हितासाठी अनेक लढे उभे केले. या लढ्यातून कामगारांना काही सवलती मिळाल्या.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात भारतात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाल्यामुळे कामगारांच्या संख्येत अमूलाग्र वाढ झाली. त्यातून राष्ट्रीय नेते व बुध्दिवादी कामगार चळवळीकडे आकर्षित झाला. १८९३ च्या दंगलीनंतर मुंबईत गणपती व शिवजयंती उत्सवाला सुरूवात झाली व त्यामध्ये कामगारांनी हिरीरीने सहभाग घेतला. याबरोबरच स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीतही कामगार सहभागी होऊ लागले. या चळवळींच्या माध्यमातून कामगारांमध्ये राष्ट्रीय जाणीव निर्माण होण्यास मदत झाली. १९०८ साली टिळकांना राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा होताच मुंबईतील कामगारांनी सहा दिवसांचा संप उत्स्फूर्तपणे केला. हा देशातील पहिला राजकीय संप होता. यापुढे असे अनेक संप कामगार करीत राहिले. १९१४ साली पहिल्या महायुध्दाला सुरूवात झाली. परिणामी भारतातील कापडाची मागणी प्रचंड वाढली व गिरण्यांची भरभराट झाली. पण त्याचा फायदा कामगारांना झाला नाही. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली मात्र त्यातुलनेत कामगारांचे पगार न वाढल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण होऊन संपाची लाट उफाळून आली. या काळातील होमरूल चळवळीतही कामगार सहभागी होत होते. १९१७ साली सोव्हिएट रशियामध्ये झालेल्या कामगार क्रांतीने भारतातील कष्टकरी जनतेला, राष्ट्रीय नेत्यांना व बुध्दिवाद्यांनाही प्रभावित केले, व ते कामगार चळवळीत काम करू लागले. त्यामुळे कामगार चळवळीला बळ प्राप्त झाले. १९१८ साली मुंबईतील कामगारांना शाहू महाराजांनी संघटना बांधण्याचे आवाहन केले. पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतरही देशातील अनेक शहरांत संपाची लाट उसळलेली होती. त्यातूनच अखिल भारतीय कामगार संघटनेची स्थापना करण्याची मागणी पुढे आली व त्यासाठी हालचाली सुरू झाल्या. १९२० साली टिळकांच्या प्रेरणेतून व लाला लजपतराय अध्यक्षतेखाली मुंबईत 'अखिल भारतीय कामगार संघटने'ची (आयटक) स्थापना करण्यात आली व खऱ्या अर्थाने भारतात कामगार चळवळीची सुरूवात झाली. या चळवळीसाठी पुढील काळ हा अत्यंत रोमहर्षक व आव्हानात्मक होता.

संदर्भसूची :

१. फडके य. दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्ध, खंड पहिला, के' सागर, पुणे, नोव्हेंबर २००५, पत. २०
२. चिटणीस संजय, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि गिरणी कामगार चळवळ व संयुक्त महाराष्ट्राचा लढा, लोकवाङ्मय, मुंबई, एप्रिल २०१६, पत. १६[1]१७
३. पाम दढा रजनी, आजकालचा भारत, डायमंड, पुणे, २००६, पत. ३९७ -३९८
४. डांगे श्रीपाद अमृत, लोकमान्य टिळक आणि भारतीय कामगार चळवळ, विचार भारती, मुंबई, जुलै २००६, पत. २९
५. पाम दढा रजनी, आजकालचा भारत, डायमंड, पुणे, २००६, पत. ३९७

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहास

**श्री. प्रविण बाजीराव साळुंके,**
**डॉ. चांगदेव अरविंद बंडगर**

**प्रस्तावना :—**

इसवी सनाच्या सतराव्या शतकात इंग्रजांनी भारतात प्रवेश केला. त्यांनी व्यापाराच्या निमित्ताने देशात प्रवेश केला असला तरी नंतरच्या काळात त्यांनी भारतावर सत्ता प्रस्थापित केली. भारत हा प्रामुख्याने खेड्यांनी बनलेला होता. देशातील बहुतांश लोक खेड्यात राहत होते. भारतातील शेती हाच प्रमुख व्यवसाय आणि उदरनिर्वाहाचे साधन होते. देशाला परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी जनतेला ब्रिटिशांविरुद्ध आंदोलनाचे शस्त्र उभे करावे लागले. भारतावर ब्रिटिशांनी १८५८ मध्ये कायदेशीर सत्ता स्थापन केल्यापासून १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत जवळपास शंभर वर्षे भारताचा स्वातंत्र्य लढा चालू होता. या स्वातंत्र्य आंदोलनात देशातील अनेक शेतकरी वर्ग आणि मजूर तसेच कामगारांनी मोठा सहभाग घेतला होता.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपण महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहास आपण पाहणार आहोत.

**उद्दिष्टे :—**

१. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या समस्या जाणून घेणे.
२. शेतकरी चळवळीतील नेते व सरकार यांनी केलेल्या विविध कार्यांचा आढावा घेणे.
३. महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी दिलेल्या शेतकरी चळवळीतील योगदानाचे महत्त्व जाणून घेणे.
४. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी झालेल्या शेतकरी चळवळी, बंड, परिषदा, मोर्चे यांचा अभ्यास करून त्यांच्या परिणामांची परिणती तपासून घेणे.

**शेतकऱ्यांच्या समस्या :—**

ब्रिटिश सरकारने देशावरील सत्ता होती घेतल्यापासून देशामध्ये कृषी क्षेत्रात अनेक समस्या निर्माण होऊ लागल्या होत्या. सरकारची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी अधिकच खालावत गेली.

१. कंपनी सरकारने रयतवारी, महालवारी आणि कायमधारा पद्धतीची सुरूवात केली असल्यामुळे, शेतीच्या मालकी बद्दलचा हक्क, शेती करणे, महसूल गोळा करणे यांच्या पद्धतीत आमुलाग्र बदल झालेले होते.
२. आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसा, भांडवल राहिले नाही. त्यासाठी त्यांना सावकाराची दारी कर्ज घेण्यासाठी जावे लागले. यामुळे शेतकरी वर्ग कायमच कर्जात राहिला.
३. सतत पडणाऱ्या दुष्काळामुळेही शेतकऱ्यांचे जीवन दरिद्री बनत गेले. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सरकारकडून शेत तलाव, विहिरी, सिंचनाच्या सोयी—सुविधा करण्याची अपेक्षा होती.
४. शेतकऱ्यांचा माल हा दलालामार्फत तसेच व्यापारी वर्ग यांच्याकडून विकला जायचा. यामुळे शेतमालाला फारच तोडकी किंमत येत असे.
५. शेतकऱ्यांनी धान्याबरोबर नीळ, ताग, रबर, चहा, अफू व साखर आदी वस्तुंची मागणी असल्यामुळे या वस्तुंचे उत्पादन वाढवले. परंतू त्यामुळे इतर धान्याचे उत्पादन घटले. परिणामी काही काळातच देशाला धान्य निर्यात करण्याऐवजी आयात करण्यांची वेळ आली.

ISSN : 2348-7143
December-2018

याचबरोबर शेती उत्पादनात घट, लोकसंख्येची वाढ, अतिवृष्टी व दुष्काळ, भरमसाट जमीन महसूल आणि भांडवलाचा अभाव यामुळे शेतकऱ्यांपुढे अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या.

**शेतकऱ्यांमधील असंतोष :—**

वर पाहिलेल्या शेतकऱ्यांच्या विविध समस्या सुधारण्यासाठी काहीच उपाययोजना केल्या नाहीत. जे उपाय केले ते अपुरे ठरले. त्यामुळे शेतकरी वर्गात सरकारबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला. यातून अनेक शेतकऱ्यांनी उठाव, संप, सरकार विरुद्ध मोर्चे काढून आपला संताप व्यक्त केला. हा असंतोषाचा भडका बंडाच्या स्वरूपात बाहेर पडू लागला.

**महात्मा फुले व शेतकरी चळवळ :—**

शेतीच्या प्रश्नांचा व शेतकऱ्यांच्या एकूण जीवनाचा समग्र व सूक्ष्म अभ्यास महात्मा फुले यांनी केला होता. त्यांच्या शेतकरीबद्दल ठळक घडामोडी—

१. महात्मा फुलेंनी 'शेतकऱ्यांचा आसुड' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केले. शेतकऱ्यांची गुलामगिरी, कर्जबाजारीपणा आणि त्यांच्या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी काय उपाय करावे लागतील याचीही चर्चा या ग्रंथात केली आहे.

२. म. फुलेंनी सरकारकडे शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळण्यासाठी वसतिगृहे स्थापन करावी आणि कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची नेमणूक करून घ्यावी. या मागण्या केल्या.

३. सरकारी अधिकारी, कारकून आणि सावकार हे शेतकऱ्यांना जागोजागी अपमानित करतात. त्यांची अडवणूक करून त्यांचे आर्थिक शोषण करतात. याविरोधात महात्मा फुलेंनी सरकार व सावकाराच्या धोरणावर कडक टिका करून शेतकऱ्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी कार्य सुरू केले.

४. महात्मा फुलेंनी 'दिनबंधू' या वर्तमानपत्रातून लिखाण करून शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली.

५. इ.स. १८७६—७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्यामुळे शेतकरी वर्ग हलाखीन झाला. परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी महात्मा फुलेंनी महाराष्ट्र व्यापी चळवळ सुरू केली. ही चळवळ खतफोडीचे बंड म्हणून ओळखली जाते.

६. इ.स. १८८८ मध्ये पुण्यात इंग्लंडचे ड्यूक ऑफ कॅनॉट आले होते. त्यांच्या समारंभास महात्मा फुले शेतकऱ्याच्या वेशात उपस्थित राहिले. त्यावेळी शेतकऱ्यांच्या स्थितीविषयी सुधारणा करण्यासंबंधी राणी व्हिक्टोरियाला निवेदन दिले.

७. म. फुलेंनी इंग्रज सरकारकडे शेतकऱ्यांना संरक्षण व उत्पन्न वाढीसाठी शेतीच्या विविध योजना करण्यासाचा आग्रह धरला.

८. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या शिक्षित मुलांना नोकऱ्या देण्यासाठी प्रयत्न केले.

अशाप्रकारे म. फुलेंनी विविध कार्यातून, मार्गातून शेतकरीवर्गाच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात शेतकरी वर्गातील परिवर्तनासाठी झटणारे व कार्य करणारे महात्मा फुले हे पहिले समाजसुधारक होत.

**कृष्णराव भालेकर आणि शेतकरी चळवळ :—**

कृष्णराव भालेकर हे महात्मा फुले यांचे अत्यंत निकटचे सहकारी होते.

१. 'दीन मित्र' या वृत्तपत्रातून त्यांनी शेतकरी वर्गाच्या स्थितीवर लेख प्रसिद्ध केले. त्यांच्या मते शेतकरी हेच खरे देशाचे आधारस्तंभ आहेत.

ISSN : 2348-7143
December-2018

२. सावकार आणि सरकार हे दोघेही शेतकऱ्यांचे शोषण करीत असत. भालेकर यांनी शेतकऱ्यांनी विद्येची कास धरावी आणि आपल्या मुलांना शिक्षण द्यावे असे म्हणले आहे.
३. ब्राम्हणाप्रमाणेच आपणही पारंपरिक व्यवसायाचा त्याग करावा असेही त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले.
४. त्यांनी विदर्भातील करजगाव येथे 'द करजगाव इंडस्ट्रीयल ॲण्ड कमर्शिअल सोसायटी'ची स्थापन करण्याची योजना तयार केली. त्यासाठी शेअर्स किंमत दहा रुपये ठेवली, पण ही योजना अंमलात येऊ शकली नाही.

**विठ्ठल रामजी शिंदे व शेतकरी चळवळ :—**

१. विठ्ठल रामजी शिंदे यांनी इ.स. १९२७ मध्ये मुंबई कायदे मंडळात गृहमंत्र्याने मांडलेल्या तुकडेबंदी व सारावाढीसंबंधीच्या विधेयकास विरोध केला.
२. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरली होती. या परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या भाषणातून या विधेयकास विरोध केला. यामुळे शेतकरी लहान—लहान जमिनीच्या तुकड्यास मुकतील. त्यांच्याजवळ पैसा राहणार नाही. तसेच सारा वाढीमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होईल असे त्यांनी म्हटले.
३. वि. रा. शिंदे यांनी खानदेश, अमरावती, नाशिक, पुणे, सातारा, नागपूर आणि नगर जिल्ह्यात ग्रामीण भागात शेतकरी परिषदा घेतल्या. या विविध परिषदामधून त्यांनी पुढीप्रमाणे आपले विचार मांडले—
   १. तालुकानिहाय शेतकरी व कामगार संघ काढावेत.
   २. अमेरिकन शेतकरी, भांडवलदार व जमिनदार आहेत त्यांचा आदर्श घ्यावा.
   ३. शेतकऱ्यांना अमेरिकन शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या शेतमालाची किंमत ठरवता आली पाहिजे. शेतीच्या मालासाठी योग्य किंमत मिळाली पाहिजे.

**साने गुरुजी व शेतकरी चळवळ :—**

१. इ.स. १९३९ मध्ये पूर्व खानदेशात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे साने गुरुजींनी शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करावा अशी मागणी केली. त्यांनी जवळच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा नेला. त्यांनी लिहिलेली स्फूर्तिदायक गीते शेतकरी मोर्चात म्हटली गेली.
२. साने गुरुजींनी खानदेशात शेतकऱ्यांचे संघटन केले. त्यासाठी सर्वत्र दौरे केले.

**मुळशी सत्याग्रह :—**

'शेतकरी चळवळ' ही संज्ञा ज्या अर्थाने वापरली जाते त्या अर्थाने मुळशी खोऱ्यातील शेतकऱ्यांनी जमिनी विद्युत प्रकल्पासाठी टाटा कंपनीसन देण्यासाठी केलेली चळवळ शेतकरी चळवळ म्हणता येणार नाही. परंतू हा सत्याग्रह करून धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेली चळवळ होती.

**ब्राम्हणेतर पुढारी आणि शेतकरी चळवळ :—**

श्रीपतीराव शिंदे, मुकुंदराव पाटील, दिनकरराव जवळकर, भगवंतराव पाळेकर यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चिंतन, विचार—विमर्श करून ते सोडवण्याचा प्रयत्न केला

१. श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' या वृत्तपत्रात शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न मांडत त्यांनी शेतकरी संघटनांची आवश्यकता प्रतिपादन केली. अमेरिका व स्वीडन प्रमाणे शेतकऱ्यांनी दहा—वीस शेतकऱ्यांचे संघ स्थापन करून सहकारी पद्धतीने शेती करावी. शेतकरी, सावकारांनी गोरक्षणाला महत्त्व द्यावे. सावकाराकडून होत असलेल्या शोषणावर त्यांनी खडखडून टिका केली.

ISSN : 2348-7143
December-2018

२. मुकुंदराव पाटील यांनी ५७ वर्ष 'दीन मित्र' या प्रारंभीच्या सात अंकातून शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती आणि ती दूर करण्यावर लेखमाला लिहली. नवीन कृषी अवजारे, शेतीची प्रदर्शने, शेती पुस्तके, शेती शिक्षण, शेती–बी–बियाणे, पतपेढ्या व विहिरी बांधणे हे उपायच योजून शेतीच उत्पादन वाढविता आले पाहिजे.
३. दिनकरराव जवळकर यांनी काढलेल्या 'तेज' या साप्ताहिकावर 'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मुखपत्र' असे मुद्रित केले होते. त्यांनी सावकार आणि जमिनदार यांच्याकडून शेतकऱ्यावर होणारा अन्याय, अत्याचार, शोषण याविरुद्ध संघर्ष करण्यासाठी शेतकरी सैन्य उभारण्याची सूचना केली होती.
४. भगवंतराव पाळेकर यांनी बडोदा येथून 'जागृती' वृत्तपत्र सुरू केले. मुंबई प्रांतात ब्राम्हण, मारवाडी व गुजर यांच्याकडे शेतजमिनीची मालकी होती. शेतकऱ्यांचे अज्ञान, चालीरीती, दारूबाजी, खर्चिक विवाह हे त्यास कारणीभूत आहे, असे त्यांनी लेख लिहून प्रश्न मांडले.

**तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक :–**

१. मुंबई कायदे मंडळात इ.स. १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्याने तुकडेबंदी व सारावाढीचे विधेयक विधिमंडळात मांडले. हे विधेयक पास झाल्यास लहान शेतकऱ्यांना जमिनीस मुकावे लागणार होते. तसेच शेतसाराही वाढणार होता. त्यामुळे केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेऊन या विधेयकाला विरोध केला.
२. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे त्यांनी मुंबई इलाखा शेतकरी परिषद घेतली. या परिषदेत ८०० शेतकरी हजर होते. विधयेक पारित करू नये असा ठराव या परिषदेत करण्यात आला.
३. ब्राम्हणेत्तर चळवळीतील कार्यकर्त्यांनी 'मुंबई इलाखा ब्राम्हणेतर शेतकरी संघ' ही संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे आणि त्यांना जागृत करणे ही या संघटनेची उद्दिष्टे होती.

**फैजपूर काँग्रेस अधिवेशन आणि शेतकऱ्यांचे प्रश्न :–**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे डिसेंबर १९३६ मध्ये काँग्रेसचे पहिले ग्रामीण अधिवेशन झाले. या अधिवेशनात अखिल भारतीय किसान सभेचे दुसरे अधिवेशन घेण्यात आले. याचे एन. जी. रंगा हे अध्यक्ष होते. मनमाडपासून फैजपूरपर्यंत २०० मैलांची शेतकऱ्यांनी पदयात्रा काढली होती. या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या संदर्भात पुढील ठराव पास केले–

१. काँग्रेस अंतर्गत शेतकरी व मजूरांच्या संघटना स्थापन कराव्यात.
२. जमीन महसूल ५० टक्के कमी करावा.
३. शेतकऱ्यांची कर्जवसूली थांबवावी.
४. शेतमजूरांना योग्य प्रमाणात वेतन द्यावे.
५. शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज द्यावे.
६. शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या विकासासाठी सरकारने प्रयत्न करावेत.

**शेतकरी कामगार पक्ष आणि शेतकरी चळवळ :–**

१. सन १९४६ मध्ये केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, के. डी. पाटील, नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, बी. के. सावंत, आचार्य प्र. के. अत्रे, तुळशीदास जाधव, रामभाऊ नलावडे आदींनी काँग्रेस अंतर्गत 'शेतकरी कामगार संघ' स्थापन केला.

२. परंतू काँग्रेस अंतर्गत असे उपपक्ष असू नयेत अशी भूमिका अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारणीने घेतली. म्हणून वरील मंडळींनी २६ एप्रिल १९४८ रोजी शेतकरी कामगार पक्ष स्थापन केला. या पक्षाचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे झाले.
३. शंकरराव मोरे, नाना पाटील, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, गुरुनाथ कुरडे यांनी शेकापच्या विकासासाठी फार प्रयत्न केले.
४. 'जनसत्ता' हे साप्ताहिक या पक्षाचे मुखपत्र होते.
५. इ.स. १९५० मध्ये नाशिक जिल्ह्यात दाभाडी येथे पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात पक्षाचे ध्येय—धोरण मांडले गेले.
६. पुढे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यात वैचारिक मतभेद निर्माण झाले. परिणामी केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, खाडीलकर हे पक्षातून बाहेर पडून परत काँग्रेसमध्ये गेले.
७. इ.स. १९५२ आणि १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत या पक्षाने चांगले यश मिळवले. या पक्षाने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचा सतत प्रयत्न केला.
८. या पक्षाने लेव्ही पद्धत व धान्य नियंत्रण पद्धतीवर टिका करून कुळांना संरक्षण देण्याची मागणी सरकारकडे केली. शेतीमालास योग्य भाव, रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार योजना याबाबतीत या पक्षाने प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे आणि त्यांचे कल्याण करणे हे या पक्षाचे मुख्य ध्येय होते. ते या पक्षाने करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांच प्रवक्ता म्हणून या पक्षाकडे कित्येक वर्षे पाहिले गेले.

**समारोप :—**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. येथील शेती हेच उपजीविकेचे मुख्य साधन आहे. थोडक्यात शेतकरी हाच देशाचा आत्मा आहे. तो सुखी असेल तरच देश सुखी होईल, परंतू स्वातंत्र्योत्तर काळामध्ये तसेच आजही आपला शेतकरी राजा कर्जबाजारी, सावकाराच्या गुलामगिरीत अडकून पडलेला आहे. परिणामी आजही आपल्या शेतकऱ्यांच्या वाट्याला संघर्षच आहे. या संघर्षातून शेतकरी हा विविध आंदोलने, संप, मोर्चे काढून आपला मार्ग काढत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्याने केलेला संघर्ष आपण वरील शोधनिंबधांत पाहिलाच आहे. परंतू येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचा हा संघर्ष वाचविण्यासाठी प्रस्थापित सरकारांनी विविध उपाययोजना आखून तो दूर करावा, अशा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या अपेक्षा आहेत.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. महाराष्ट्र समाज आणि संस्कृती— कुलकर्णी अ. रा.
२. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास— प्राचार्य डॉ. एस्. एस्. गाठाळ.
३. महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगती आणि समस्या— सरदार गं. बा. (संपादित).
४. महाराष्ट्रनामा, राजहंस प्रकाशन, पुणे— घोडके ह. मो.
५. आधुनिक भारताचा इतिहास— वैद्य, कोठेकर.
६. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण— विलास पाटील.
७. भारतीय राज्यघटना— एम. लक्ष्मीकांत.
८. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास— दिनेश मोरे.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261**
**Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# अहमदनगर जिल्ह्यातील समाजवादी व डाव्या चळवळीतील नेतृत्त्वाचे शेतकरी व कामगार चळवळीतील योगदान

**डॉ. संजय गायकवाड**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय वसमतनगर जि. हिंगोली

**प्रा. जिजाभाऊ घुले**
(राज्यशास्त्र विभाग)
श्री ढोकेश्वर महाविद्यालय टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, सहकारी चळवळीतील महत्त्वाचा जिल्हा म्हणून नगर जिल्ह्याकडे पाहिले जाते. किंबहुना महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देण्याचे मोलाचे काम नगर जिल्ह्यातील चळवळींनी केले आहे. जिल्ह्यातील कोणत्याही बऱ्या–वाईट घटनांचे दुरगामी परिणाम महाराष्ट्रातील समाजकारणावर, राजकारणावर होत असतात, असे होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातील सामाजिक चळवळींचा एक दैदीप्यमान इतिहास आहे. या जिल्ह्याला चळवळीची एक वेगळीच किनार असल्यामुळे जिल्ह्याची 'चळवळींचा बालेकिल्ला' म्हणून ऐतिहासिक ओळख आहे. म्हणूनच जिल्हा हा पुरोगामी विचारांच्या चळवळीचा जिल्हा म्हणून राज्यात ओळखला जातो. याच दैदीप्यमान ऐतिहासिक वलयामुळे राज्याचे समाजकारण, राजकारण सातत्याने जिल्ह्याभोवती फिरत असते.

**अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी व कामगार चळवळी** :

हा जिल्हा तसा कम्युनिस्ट विचारसरणीचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. डाव्या विचारसरणीचा प्रभाव नेहमीच जिल्ह्यावर राहलेला आहे. स्वतंत्र्यपूर्व काळापासूनच वेगवेगळया कामगारांच्या व शेतमजुरांच्या संघटनात्मक चळवळीला सुरूवात झाली. १८७६–७७ साली महाराष्ट्रातील 'दक्षिणेतील शेतकऱ्यांची बंडे' हा गाजलेला सामाजिक उद्रेक होता. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, नगर, कर्जत इ. भागात शेतमजूर शेतकऱ्यांनी सावकारांची नाक, कान कापण्याची आणि आपल्याकडील कर्जाचे व गहाण वटीचे दस्ताऐवज फाडण्याची व्यापक चळवळ सुरू केली. अहमदनगर जिल्ह्यात कम्यूनिस्ट चळवळीची मूहर्तमेढ रोवणारे कॉ. विनायकराव भुस्कुटे, कॉ. डी.बी. कुलकर्णी, कॉ. विनायकराव ताकटे, कॉ. एस. व्ही. देशपांडे, कॉ. वसंतराव तळपुले यांचे स्थान अग्रगण्य आहे. या सर्वांनी अहमदनगर जिल्ह्यातील कामगार चळवळी मजबुत करण्यासाठी प्रयत्न केले. कॉ. डी. बी. कुलकर्णी हे नगर तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर बंडात गाजलेल्या घोसपुरीचे रहिवाशी. १९२० साली नोकरी सोडून राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला नंतर रेल्वेत नोकरीस लागले व रेल्वे कामगारांना संघटीत करून ते रेल्वे कामगारांचे अखिल भारतीय नेते बनले. १९३० सालच्या गाजलेल्या रेल्वे संपातील ते प्रमुख नेते होते. १९२८ साली ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेसच्या झेरीया येथे भरणाऱ्या आधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक पं. जवाहरलाल नेहरू यांच्या विरोधात लढवली. कॉ. विनायकराव ताकटे हे राहुरी तालुक्यातील गुहा येथील रहिवाशी होते त्यांनी नगर जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजूर चळवळ उभी करण्यात पुढाकार घेतला. बंडाची परंपरा असलेल्या राहुरी व आसपासच्या तालुक्यात शेतमजूरांना संघटीत करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. सेनापती बापट यांनी १९२३ साली शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी मुळशी येथे सत्यागृह

ISSN : 2348-7143
December-2018

केला. या सत्यागृहात विनायक भुस्कुटे हे सेनापती बापटांच्या नेतृत्त्वाखाली सहभागी झाले व त्यांना दोन वर्षाची शिक्षा झाली. तसेच कॉ. विनायकराव यांनी श्रीरामपूर तालुक्यातील टिळकनगर व हारेगाव साखर कामगार व ऊस पिकामुळे निर्माण झालेले जमिनीचा प्रश्न हाती घेतला व संप लढवले. देशातील साखर कामागार चळवळीचे ज्यांना जनक म्हटले जाते असे रावसाहेब पटवर्धन यांनी १९३४ साली मुंबई प्रांतातील बेलापूर साखर कारखान्यात ब्रिटीश भांडवलादारांचा कडवा विरोध असतानाही संघटना बांधली. १९३६ सालच्या फैजापूर येथील कॉग्रेस अधिवेशनात त्यांनी स्वयंसेवक दलाचे प्रमुख म्हणून काम केले. साखर कामगारांना योग्य पगार, पगारी रजा, बोनस, ग्रॅच्युइटी इ. सवलती मिळाव्यात यासाठी त्यांनी लढा दिला. त्यांना सहा वर्षाचा कारावास झाला. १९४५ साली त्यांची तुरूंगातून सुटका झाली तेव्हा नगर जिल्ह्यातील जनतेने त्यांना दहा हजार रूपयांची थैली भेट दिली त्यांनी ती कॉग्रेस कमीटीच्या हवाली करून त्या रक्कमेतून कामगार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मानधन देण्याचा उपक्रम सुरू केला आला. अहमदनगर जिल्ह्यात १९४१ च्या दरम्यान कॉ. भास्करराव जाधव यांच्या नेतृत्त्वाखाली नवजीवन संघटना स्थापन झाली. पुढे १९४२ मध्ये ती शेतकरी कामगार पक्षात विलीन झाली. याचवेळी कॉ. दत्ता देशमुख कॉग्रेमधून शेकाप मध्ये आले. बापूसाहेब भापकर, भाई सथ्था यांचे कम्यूनिस्टांशी निकटचे संबंध होते. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात शेतकरी व शेतमजूरांच्या प्रश्नावर कम्यूनिस्ट कार्यकर्त्यांबरोबर लढयात सहभागी झाले. १९४६ साली पाथर्डी येथील कॉ. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली शेतमजूर परिषद घेतली तर करंजी ता. पाथर्डी येथे शेतमजूर स्त्रीयांची परिषद घेतली व शेतकरी लढे लढवण्यास पुढाकार घेण्याचे ठरले. १९४५ ते १९४८ दरम्यान जिल्ह्यात शेतकरी शेतमजूर कागारांच्या संघटना व चळवळी यांचा प्रसार झाला. याचकाळात कॉ. चंद्रभान आठरे, कॉ. अण्णासाहेब शिंदे, कॉ. एकनाथ भागवत, कॉ. बाबूजी आव्हाड, कॉ. राम नागरे, कॉ. भास्करराव औटी, कॉ. पी. बी. कडू पाटील, कॉ. नवले, कॉ. बी. के देशमुख या कम्यूनिस्ट कार्यकर्त्यांची दुसरी पिढी पुढे आली.

स्वतंत्र्यपूर्व काळापासून जिल्ह्यातील संगमनेर, अकोला तालुक्यात विडी उदयोगाला सुरूवाात झाली. कॉ. दत्ता देशमुख यांनी लाल निशाण पक्षाच्या माध्यमातून संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे संघटन करून त्यांच्या न्याय हक्कांसाठी चळवळी केल्या. कॉ. रामभाऊ नागरे, भास्करराव दुर्वे, कॉ. दत्ता देशमुख यांनी विडी कामगार चळवळीचे राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्त्व केले. संप, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, सत्यागृह, जेलभरो, सभा, परिषदा, मेळावे, इ. साधनांचा लोकशाही मार्गाने अवलंब करत अनेक कामगार कायदे लागू करून घेतले. १९४५ मध्ये समाजवादी पक्षाचे भास्करराव दुर्वे यांनी विडी मजदूर सभेची स्थापना केली. दुष्काळी परिस्थती आणि लेव्हीच्या सक्तीमुळे लोकांना अन्न धान्यांच्या तुटवडयामुळे जिल्ह्यातील कम्यूनिस्ट आणि शेतकरी कामगार पक्षाने सरकारी गोदामातील धान्य ताब्यात घेऊन गरीबाला वाटले. शेवगाव तालुक्यातील येरण गाव येथे धान्य वाटप चालू असताना पोलीसांनी गोळीबार केला यात ९ जण ठार झाले. तर अकोले येथे कॉ. अण्णासाहेब शिंदे, कॉ. दत्ता देशमुख यांनी चार–पाच हजार लोकांचा मोर्चा नेला या मोर्चातील कॉ. अण्णासाहेब शिंदे व कॉ. दत्ता देशमुख यांना पकडण्यात आले. नंतर संगमनेर तालुक्यातील राजापूर येथे सक्तीच्या लेव्ही विरोधी आंदोलनावर ९ मार्च १९५० रोजी गोळीबार झाला. तर १९५३ मध्ये कम्यूनिस्ट पक्षाच्या कॉ. रामभाऊ नागरे, कॉ. परब यांनी संगमनेर अकोला तालुका विडी कामगार युनियन (लाल बावटा) ची स्थापना केली. १९५४ साली श्रीरामपूर तालुक्यातील शेतकरी संघाचे नेते व कम्यूनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते भास्करराव गलांडे, लक्ष्मण पालवे, गोविंदराव काळे शेतमजूरांच्या संघटना स्थापन केल्या व एक महिन्याचा संप केला. याच काळात लाल निशाण पक्षाच्या कॉ. दत्ता देशमुख यांनी शेतमजूरांना संघटीत केले. १९५२ च्या

ISSN : 2348-7143
December-2018

सार्वत्रिक निवडणुकीनंतर कॉ. दत्ता देशमुख यांनी जिल्ह्यातील कष्टकरी समुदयातील जिल्हा लोकल बोर्ड, कोतवाल, बांधकाम विभागचे कामगार, रस्ते कामगार, म्युनीसीपाल्टी कामगार, विडी कामगार, शेतमजूर, साखर कामगार, औदयोगिक कामगार या तळाच्या कष्टकरांच्या संघटना बांधण्याचे कार्य केले. अशाप्रकारे या चळवळी कम्यूनिस्ट पक्षाच्या कार्यकतर्त्यांनी मोठया जोमाने उभ्या केल्या. १९५६ सालापासून लाल निशाण पक्षाच्या माध्यमातून कॉ. बापूसाहेब भापकर, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. भाई सथ्था, कॉ. गवळी, कॉ. नागवडे, कॉ. पी. बी. कडू पाटील, कॉ. भास्कर जाधव, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. भा. र. बावके यांनी कष्टकरी, कामगार, कामगारांच्या प्रश्नांवर व शोषणाविरूध्द, पाणी प्रश्नांवर, रोजगार हमीच्या कामाविषयी शेतमुजरांचे संघटन, मैल कामगारांचे संघटन, कोतवालांचे संघटन केले. सायकल, एसटी असा प्रवास करून संघटन करत प्रस्थापित शोषण व्यवस्थेविरूध्द लढे उभारण्याचे मोठे कार्य कम्यूनिस्ट चळवळ व लाल निशाण पक्ष (लेनिन) यांनी केले. त्यांनी कलापथके, शाहिरी पथकांच्या माध्यमातून कष्टकरी, शेतकरी, कामगाराचे संघटन या जिल्ह्यात उभे केले. १९६१ मध्ये कॉ. रामभाऊ नगरे यांनी विडी कामगारांची राज्यव्यापी परिषद सिन्नर येथे घेतली. महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेडरेशनची स्थापना केली. या संघटनेच्या पुढाकारातू व्यापारी वर्गाने संगमनेर शहरामध्ये संगमनेर महाविद्यालयाची स्थापना केली. कॉ. दत्ता देशमुख नोकर संघाचे अध्यक्ष झाल्यानंतर नोकरसंघ आणि विदयुत कर्मचारी संघ यांनी कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीस्टी बोर्ड वर्क फेडरेशन स्थापन केले. १९६४ मध्ये कॉ. दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली वीज मडळांकडे वेतन श्रेणी व मागाई भत्यात सुधारणा करण्याची मागणी केली. त्यानंतर विविध कामगार संघटनांनी संप समिती स्थापन केली व त्याच्या अध्यक्षपदी कॉ. दत्ता देशमुख यांची निवड करण्यात आली. ६ फेब्रुवारी १९६७ मध्ये संप समितीने वीज मंडळाला संपाची नोटीस देऊन संप सुरू केला. हा संप ४३ दिवस चालला. त्यानंतर संप समितीच्या पदाधिकाऱ्याने संप एकतर्फी मागे घेण्याचे ठरवले. कामगारांच्या एकजुटीने कामकाज पुढे चालवण्यासाठी संप समितीचे रूपातंर एकत्रिकरण समितीत केले. या सिमीतीचे निमंत्रक म्हणून कॉ. दत्ता देशमुख यांची नियुक्ती केली. वीज कामगाराने संप मागे घेतल्यानंतर तसा निर्णय कामगार मंत्री नरेंद्र तिडके यांना कळवण्यात आले. त्यांनी संपातील कामगारांना सन्मानाने कामावर घेतले जाईल, असे अश्वासन दिले मात्र वीज मंडळाने ते पाळले नाही त्याविरोधात वर्कस फेडरेशनने कामगार न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढवून कामगारांना कामवर घेण्यास भाग पाडले. १९७३ साली १७ लाख शेतमजुरांनी रोजगार हमी कायदा लागू व्हावा यासाठी केलेले लाक्षणिय उपोषण याच जिल्ह्यात घडलेले आहे. आताच्या काळामध्ये शहरातील महापालिकेत कामगारांच्या प्रश्नावर आजही मोर्चे, लढे उभे केले जात आहे हे केवळ डाव्या चळवळीच्या विचारांमुळेच. १९७८ च्या काळामध्ये डॉ. कुमार सप्तर्षींनी बहुजन समाजाला संघटीत करून जिल्ह्यामध्ये बहुजन चळवळीचे मोलाचे काम केलेले आहे. याच कालखंडात विडी कामगारांच्या प्रशनांवर कॉ. दत्ता देशमुख, कॉ. रत्नाकर, कॉ. अंकाराम, कॉ. मल्लेश्याम येमूल व कॉ. शंकर न्यालपेल्ली यांनी मोठे लढे उभारून विडी कामगारांसाठी मोठे योगदान दिलेले आहे.

शहरामध्ये मापाडी कामगारांच्या प्रश्नांवर साधारणपणे ८० च्या दशकामध्ये माजी नगराध्यक्ष शंकरराव घुले (अण्णा) यांनी मापाडी कामगारांच्या प्रश्नांवर हमाल पंचायतीच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते कॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली मापाडयांना, हमालांना न्याय देण्यासाठी मोर्चे, आंदोलनाचे लढे उभारून न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. या संघर्षामध्ये कै. लक्ष्मण तात्या वाडेकर यांचाही महत्त्वाचा सहभाग होता. आज मापाडी कामगार व हमालांच्या प्रश्नांसाठी कै. शंकरराव घुले यांचे बंधू अविनाश तात्या घुले मापडयांची चळवळ सांभाळत आहेत.

अशाप्रकारे कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना जिल्ह्यातील समाजवादी व डाव्या चळवळीतील नेतृत्त्वाने शेतकरी व कामगार चळवळीच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे हित लक्षात घेत आर्थिक आणि सामाजिक आधारावर विकास घडून आणण्यात मालाचे योगदान दिले आहे.

**निष्कर्ष :—**

१. अहमदनगर जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी राहीलेली आहे.
२. सामजिक चळवळ, शेतकरी आणि कामागार चळवळ, कामगरांचे लढे या माध्यमातून जिल्ह्यातील नेतृत्त्वाने जिल्ह्याच्या राजकीय व आर्थिक विकासास एक महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. १९९० पर्यंत सामाजिक आणि डाव्या विचारांच्या चळवळीला चांगल्याप्रकारे यश आले.
३. सामाजिक आणि अर्थिक चळवळीमध्ये विडी कामगारांची चळवळ सर्वात मोठी चळवळ होती.या चळवळीला जिल्ह्यातील सामाजिक व वैचारीक पाया असलेले नेतृत्त्व लाभले.
४. कोणत्याही प्रकारे राजकीय पार्श्वभूमी नसतानाही विविध चळवळीच्या माध्यमातून पुढे आलेल्या जिल्ह्यातील नेतृत्त्वाने राज्य पातळीवर नेतृत्त्व केले.
५. अहमदनगर जिल्ह्यातील समाजवादी व डाव्या चळवळीतील नेतृत्त्वाने सर्व सामान्यांचे हित लक्ष घेत आर्थिक आणि सामाजिक आधारावर विकास घडून आणण्यात मोलाचे योगदान दिले.

**संदर्भ सूची :—**

१. जाधव भास्करराव, १९९५, डाव्या चळवळीचा बालेकिल्ला अहदमनगर जिल्हा
२. जाधव भास्करराव, १९९७, 'मुक्तीवेध' गौरव ग्रंथ
३. शेवाळे वि.म, सुरेश परचुरे आणि दत्ता काळेबेरे, २०१४, संघर्ष: कॉ. दत्ताा देशमुख गौरव ग्रंथ, एस.एस.इ.बी वर्कर्स फेडरेशन, कोल्हापूर.
४. शेवाळे. वि. म, माधव चव्हाण आणि गुलाब देशमुख (संपा) १९९६, मी दत्तुचा 'दत्ता' झालो त्याची गोष्ट, कॉ. दत्ता देशमुख, पुरोगामी विचामंच कोल्हापूर
५. गडाख यशवंतराव (प्रकाशक), १९९५, कॉ. वकीलराव लंघे पाटील गौरव विशेषांक
६. चव्हाण शंकर बाळाजी, २००४, अहमदनगर जिल्ह्यातील कामगार चळवळ एक राजकीय विश्लेषण, पीएच.डी प्रंबध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.
७. बोठे बाळ, २०१६, अहमदनगर जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासात राजकीय नेतृत्त्वाच्या योगदानाचा अभ्यास: १९९३ ते २०१०, पीएच. डी प्रंबध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.
८. kamble bal, 1996, Political Socialization of Politically Marginalized Group: A study of Beedi Workers in Ahmednager District, Unpubished ph.D Thesis, SPPU, Pune
९. भोसले महेश, दि. २१ मार्च २०१८, जिल्हा चळवळींचा बालेकिल्ला, दैनिक प्रभात, १४ वा वर्धापन दिन विशेषांक मधील लेख, ीजजचेरू्ध्ध्उण कंपसलीनदजणपद
१०. जाधव भास्करराव, दि. १५ ऑगस्ट १९९६, स्वातंत्र संग्रामातील लढे, दैनिक लोकमत दहावा वर्धापन दिन विशेषांक मधील लेख
११. दैनिक लोकमत, १९९०,नगर पंचशाताब्दी विशेषांक
१२. कुलकर्णी गिरीश, दि. १५ ऑगस्ट १९९६, नगरने भारतास दिलेले रावसाहेब, दैनिक लोकमत अहमदनगर अवृत्ती, दहावा वर्धापन दिन विशेषांक मधील लेख

# शेतकरी-कामगार चळवळीतील स्त्रीयांचा सहभाग

**प्रा. महेश वसंत कुलकर्णी,**
राज्यशास्त्र विभाग,
एस.एस.जी.एम.महाविद्यालय,
कोपरगांव,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर
maheshkulkarni824@gmail.com
Mobile-9730032754

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य आहे. शेती हा मुख्य व्यवसायावरच उदरनिर्वाह चालतो. याचा अर्थ राज्यातील फार मोठी लोकसंख्या शेती या व्यवसायावर अवलंबून आहे. बहुतांश शेती कोरडवाहू व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असल्याने शेतीची उत्पादकता कमी होते. शेतीला सिंचन सुविधा व भांडवलाचा अभाव असल्याने शेती धंदा नेहमीच तोटयात आहे. शासनाची मदत मिळते, ती अपूरी पडते. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटना उभ्या राहिल्या.

शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यानेच देशातील दारिद्रयाचे उच्चाटन होणार आहे. त्याचप्रमाणे संघटनेचा पाया बळकट करण्यासाठी संघटनेने महिला विभागाची स्थापना करून संघटनेचा विस्तार करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचललेले दिसते. त्यामुळे जसा संघटनेचा विस्तार व विचाराचा प्रसार करण्याच्या उद्देशाला गती मिळाली तसे शेतकरी कष्टकरी महिलांच्या हक्कांबाबतचे प्रश्नही ऐरणीवर आले. संघटनेने प्रथमच ग्रामीण स्त्रियांचे सबलीकरणाचे उद्दिष्ट समोर ठेवून स्त्रीवादी राजकारणाला प्रारंभ केला. संघटनेने शहरी स्त्रीवादी चळवळ व राजकीय पक्षांच्या महिला आघाडयाबाहेर ग्रामीण श्‍ातकरी महिलांच्या प्रश्नांवर स्त्रीवादी आंदोलनाची उभारणी केली, म्हणून हे आंदोलन अभिनव स्वरूपाचे आहे.

श्री.शरद जोशींनी शेतकरी महिलांच्या प्रश्नांवर निर्णायक भूमिका घेतलेली आहे. शेतकरी व शेतकरी महिलांच्या हाती सत्ता देण्याचे प्रयत्न हे ग्रामीण भागाची शोषणाच्या विळख्यातून मुक्तता करण्याचे आयुधे असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. स्त्रिया आणि शेतकरी संपत्ती व मालमत्तेच्या अभावी शोषणाचे बळी ठरले आहेत. शहरे, औद्योगिक नीति व राज्यसंस्था यांच्याकडून त्यांची लुट होत आहे. ती थांबविण्यासाठी शेतकरी संघटनेने गावपातळीवर सुरू केलेला लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम स्त्री सबलीकरणाचा स्तुत्य उपक्रम आहे. जो शेतकरी महिलांना जमिनीत हिस्सेदारी देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न करतो. कारण शेतकरी महिला कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परंपरागत पध्दतीने शेती कसीत असतात. या विवेचनावरून नवे शेतकरी चळवळीच्या आर्थिक मागण्या आणि ग्रामीण विकासाचा गांधीवादी विचार यात बरेचसे साम्य आढळते.

**शेतकरी संघटनेचा स्त्री सबलीकरणाचा दृष्टिकोण :**

शेतकरी संघटने ने शेतकरी महिलांच्या प्रश्नावर शेतकरी महिलांना संघटित करून स्त्रीवादी राजकारणाचा पाया घातला. संघटना शेतीमालाच्या रास्त भावाच्या प्रश्नांबरोबरच शेतकरी महिलांच्या दुर्लक्षित प्रश्नांचा अभ्यास करून शेतकरी महिलांच्या सबलीकरणासाठी पुढे सरसावली. शेतकरी संघटनेच्या स्त्रीवादी राजकारणाने शहरी, सुशिक्षित, मध्यमवर्गीय महिलांनी चालविलेल्या स्त्रीवादी आंदोलनाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. कारण संघटनेने ग्रामीण महिलांच्या सबलीकरणासाठी व्यापक दृष्टिकोण स्वीकारला.

**स्त्री सबलीकरणाचा अर्थ :**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री सबलीकरणाचा विचार उदयास आला आहे. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होय. स्त्रियांना जीवनाच्या विविध क्षेत्रात विकासाची संधी उपलब्ध करून देणे,

त्यासाठी स्त्रियांना स्वातंत्र्य, समानता इ.हक्क बहाल करणे व त्यांच्या विकासाला अनुकुल सामाजिक परिस्थिती निर्माण करणे म्हणजे सबलीकरण होय.

**महिला विभाग :**

शेतकरी संघटनेच्या शेतीमालाला आंदोलनातील शेतकरी महिलांचा वाढता सहभाग विचारात घेऊन संघटनेने "३ जानेवारी १९८२ ला सटाण्याच्या अधिवेशनामध्ये शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा वेगळी ठेवली होती. त्यावेळी आंदोलनातील शेतकरी महिलांच्या सहभागाची गरज, त्यांच्यामध्ये या प्रश्नाची जाणीव तयार करण्याची आवश्यकता म्हणजे थोडक्यात आंदोलनाची ताकद वाढविण्याकरीता शेतकऱ्यांच्या मायाबहिणींचाही हातभार लावायचा. या पलीकडे निदान पुरूष कार्यकर्त्यांच्या मनात तरी फारशी स्पष्ट जाणीव नसावी. "मात्र संघटनेच्या नेतृत्वाने वरील उद्देशाबरोबरच स्त्री प्रश्नांचा स्वतंत्र अभ्यास करणे. संघटनेचा विचार घराघरांपर्यंत पोहचविणे व संघटनेचा पाया विस्तारण्यासाठी संघटनेत शेतकरी महिला विभाग सुरू करण्याचा मनोदय केला. त्यानुसार "मनमाड येथे २६ मार्च १९८५ रोजी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली."

**शेतकरी संघटनेचे स्त्री हक्क आंदोलने :**

महिला सबलीकरणासाठी महिलांना हक्क प्रदान करणे अतिशय महत्त्वापचे आहे. शासन महिलांना विविध प्रकारचे हक्क शासकीय नोकऱ्यांत व राजकीय संस्थात देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतांना दिसते. परंतु हक्क प्राप्तीसाठी सामाजिक क्षेत्रात वातावरण निर्मिती करण्यात शासन अपयशी ठरत होते. त्यामुळे शहरी व सुशिक्षित महिलांपुरते सबलीकरण मर्यादित राहिले होते. ग्रामीण महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेपासून वंचित राहिल्या होत्या. त्यांचे जीवन असुरक्षित भौतिक साधन हक्कापासून वंचित होते. गावोगावी दारूचे परवाने शासनाने कंत्राटदारांना दिल्याने शेतकरी कुटुंबाचे जीवन उध्वस्त होत होते. त्यामुळे शेतकरी महिला आघाडीने विविध आंदोलने उभी करून आपल्या हक्कांसाठी शासन विरोधी विद्रोह उभा केलेला दिसतो.

**महिला आघाडीचा कृति कार्यक्रम :**

महिलांना सक्षमीकरणासाठीचे क्षेत्र (Space) आजतागायत खुले नव्हते. परंतु ते शेतकरी संघटनेला देण्याचा क्रांतीकारी प्रयत्न केलेला दिसतो. संघटनेने निव्वळ स्त्री सबलीकरणाचे सिध्दांत महत्त्वाचे मानतो. प्रत्यक्ष कृती कार्यक्रमावर भर दिला आहे. त्यासाठी शेतकरी संघटनेने महिला विभागातर्फे खास कृति कार्यक्रमावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसते.

**महिला अधिवेशन चांदवड (९,१० नोव्हेंबर १९८६) :**

शेतकरी संघटनेचा महिला विभाग बहुचर्चित चांदवड अधिवेशनाने प्रकाशझोतात आला. शेतकरी महिला आघाडीचे पहिले अधिवेशन अहिल्याबाई होळकर यांच्या चांदवड (नाशिक) येथे दि.९,१० नोव्हेंबर १९८६ रोजी झाले. हे अधिवेशन ग्रामीण कष्टकरी, शेतकरी महिलांचे पहिलेच अधिवेशन होते. शेतकरी संघटना प्रथमच शेतीमालाच्या रास्त भावाकडून (एककलमी कार्यक्रम) महिलांचे प्रश्न व हक्कांकडे वळाली. महिलांच्या प्रश्नांची चर्चा करणे, त्यांच्यात स्त्री हक्काबाबत जाणीव जागृती करणे हा या अधिवेशनाचा उद्देश होता.

**महिला आघाडी स्थापनेस कारणीभूत पार्श्वभूमी :**

जेव्हा शेतकरी संघटनेने हाती घेतलेला शेतीमालाच्या रास्त भावाचा प्रश्न मार्गी लागला होता. तेव्हा संघटनेने शेतकरी समाजापेक्षाही दुर्लक्षित वंचित आणि अपमानित जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांकडे आपला मोर्चा वळविला. समाजात स्त्रियांची संख्या पन्नास टक्के असूनही त्या गुलामीचे जीवन जगत आहेत हे वास्तव विचारात घेऊन संघटनेने शेतकरी महिलांना संघटीत करण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

ISSN : 2348-7143
December-2018

**महिला आघाडीचे उद्देश :**

शेतकरी संघटनेने शेतकरी महिला विभाग सुरू करून पहिल्यांदा शेतकरी महिलांचे प्रश्न ऐरणीवर आणले. स्त्री शोषित आहे. कुटुंबात व शेतात स्त्रियांच्या श्रमाशिवाय पानही हालत नाही ही वस्तुस्थिती आहे. मात्र ती समाजातील सर्वात दुर्लक्षित वंचित व पीडित आहे हे नाकारून चालणार नाही. म्हणूनच शेतकरी स्त्रियांची वंचितता दूर करण्याच्या उद्देशाने संघटनेने शेतकरी महिलांचे स्वतंत्र संघटन सुरू केले.

**लक्ष्मी मुक्ती कार्यक्रम :**

शेतकरी महिलांना कुटुंबाच्या संपत्तीत हिस्सा देणारा, स्त्रियांना मालकी हक्क देणारा कार्यक्रम म्हणून लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाकडे पाहिले जाते. चांदवड महिला अधिवेशनात स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कांबाबत चर्चा व ठराव झाला होता. मात्र त्यावर कार्यवाही झाली नव्हती. शेतकरी महिलांच्या अमरावती (१९८९) येथील अधिवेशनात स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कांबाबत चर्चा व ठराव झाला. या ठरावाने शेतकरी स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधीचा प्रश्न ऐरणीवर आला. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाची कार्यवाही करावी असे आवाहन शरद जोशींनी केले होते. अमरावती अधिवेश्नातील स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधीचा ठराव असा होता.

**संदर्भ सूची :-**

१. गाठाळ एस.एस., भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
२. पाटील गो.तु., महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.
३. खांदवे एकनाथ, शेतकरी संघटना ते स्वतंत्र भारत पक्ष, एकनाथ खांदवे कर्जत, अहमदनगर.

ISSN : 2348-7143
December-2018

# भारतातील शेतकरी संघटना व शेतकऱ्यांच्या समस्या

**प्रा. विजय मुरलीधरराव गावंडे**
सविताबाई देशमुख महाविद्यालय, दिग्रस
मो.नं. ८४२१८९५०५८
E. Id :- vijaygawande149@gmail.com

**प्रस्तावना :–**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे शेती हा आजही एक प्रमुख व्यवसाय आहे. भारतीय लोकसंख्येतील ६४ टक्के जनता कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे आणि त्यातील ७० टक्के शेतकरी अल्पभुधारक आहेत. त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेतील एक मुलभूत घटक आहे, म्हणून त्यांचे स्वास्थ व हित जपणारी ही काळाची गरज ठरली. भारतातील शेतकरी चळवळ व आंदोलनांना स्वातंत्र्यपुर्व काळात जहागीरदार व जमीनदार यांच्या विरोधाची, तर स्वातंत्र्योत्तर कालखंडात दूध व शेतमालाला योग्य भाव आणि कर्जासारख्या सरकार संचालित विषयांची पार्श्वभुमी आहे. ब्रिटीश राजवटीत देशावर प्रथमच एकछत्री अंमल निर्माण झाला त्यपुर्वी देशात सरंजामशाही व राजे–रजवाडे आणि संस्थानिकांची सत्ता होती. यापैकी काही राजे व संस्थानिक यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आणि शेतीला उपयुक्त सुधारणा केल्या, तथापि धरण बांधणे, कालवे तयार करणे, चोराचिलटांपासून शेतकऱ्यांच्य उत्पादनांचे रक्षण करणे, या सगळया कामांमध्ये शेतकऱ्यांना राजाच्या मर्जीवर, कृपाकटाक्षावर अवलंबून रहावे लागत होते. आपल्या व्यथा, मागण्या राजाच्या कानावर जरी त्यांना घालता येत असल्या, तरी त्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी आंदोलन वगैरे त्या काळी शक्य नव्हते. मुळात शेकडो वर्षे भारतातील शेतकरी वर्षातील शेतीच्य हंगामात शेतीची कामे आणि उरलेल्या काळात लढाया, मजुरी असे दुहेरी जीवन जगत असल्याने शेतीवाडी व गावांचा विकास, संरक्षण या जबाबदाऱ्या त्यांना स्वबळावर पार पाडाव्या लागत होत्या. त्या काळी वस्तुविनिमयाची पद्धत रूढ होती. भारतीय खेडयांतील अलुते–बलुते ही परंपरागत वतनी पध्दत ग्रामीण अर्थव्यवस्थेच पाया होती. या वर्तनी हक्कांमुळे शेतकरी व त्यावर उदरनिर्वाहाकरिता पूर्णपणे अवलंबून असणारे बिगर– शेतकरी लोक यांचे परस्परसंबंध सौहार्दपूर्ण होते. त्यामुळे ही परंपरागत व्यवस्था चालवणारी खेडी स्वयंपूर्ण होती, पण नागरीकरण आणि औद्योगिकीकरण यांमुळे ही संस्था मोडकळीस आली आणि अव्वल इंग्रजी अंमलात त्यांची वस्तुविनिमयाची पध्दत नष्ट होऊन पैशाचे विनिमय माध्यम रूढ झाले. या काळात आपल्या गावावर ज्या राजाचा अंमल असेल, त्यांच्याकडे ठराविक करभरणा केला जाई. शेतीतून येणारे उत्पादन व उत्पन्नातील ठराविक हिस्सा राजाच्या खजिन्यात जमा होत असे.

ब्रिटीश अमदानीत देशात काही सामाजिक सुधारणा झाल्या, दळणवळणाची साधणे निर्माण झाली, वस्तुविनिमय जाऊन चलन–विनिमयाची व्यवस्था रूजली. शेतकऱ्यांना अन्य प्रांतातील घडामोडीचे ज्ञान मिळू लागले आणि त्यातून आपल्या मागण्याबद्दल शेतकरी जागृत झाला. या दरम्यान फ्रेंच राज्यक्रांतीने जगभरातील कष्टकऱ्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा एक अत्यंत प्रेरणादायी संदेश दिला होता. चीनमध्ये माओ –त्से–तुंग यांनी उभारलेली शेतकरी–कष्टकऱ्यांची चळवळ भारतासारख्या अनेक वसाहतीसाठी एक वस्तुपाठ ठरली. परिणामी एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात देशाच्या विविध भागांत शेतकरी चळवळीने आकार घ्यायला सुरूवात केली होती. त्यातूनच देशातील पहिली शेतकरी संघटना पंजाबमध्ये उदयास आली. शहीद भगतसिंग यांचे चुलते सरदार अजितसिंग संधू यांच्या नेतृत्वाखाली पंजाबचे शेतकरी एकत्र आले. अजितसिंग

ISSN : 2348-7143
December-2018

यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन उभे राहतानाच ब्रिटीशाविरूध्द लढयाचे रणशिंग फुंकले आणि १९०७ मध्ये त्यांना मंडाले तुरूंगात पाठविण्यात आले. जलंदर जिल्हयातील खाटकरकालान येथे जन्मलेले अजितसिंग तुरूंगवासातून बाहेर आल्यानंतर १९४६ पर्यंत देशाबाहेर राहिले. देशाला स्वतंत्र्य मिळाले ते भारतात परत आले व त्याच दिवशी त्यांचे निधन झाले. १९०७ मध्येच जातीच्या आधारावरील 'जाट महासभा' ही संघटना स्थापन झाली, तीत बहुसंख्य शेतकरी होते, तथापि तिची ओळख शेतकऱ्यांऐवजी जाट समुदायाचाी संघटना अशीच राहिली. त्याचदरम्यान शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढणाऱ्या राजा महेंद्र प्रताप यांनी गदर पार्टीच्या माध्यमातून अमेरीका आणि कॅनडामध्ये एकोणिसाव्या शतकात स्थानिक झालेल्या शिखांनी मायभूमीत परत यावे आणि शेततकऱ्यांच्या प्रश्नाविषयी संघर्ष करून ब्रिटीश सत्ता हुसकावून लावण्याचे प्रयत्न जारी ठेवावेत, असे आवाहन केले. त्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद देत जे लोक परत आले, त्यामध्ये आठ हजारांहून अधिक शीख होते. गदर पार्टीच्य माध्यमातून झालेल्या शेतकऱ्यांच्या चळवळीचा पंजाबच्या राजकारणावर प्रचंड प्रभाव राहिला. हिंदू मुस्लीम शीख अशा सर्वच शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या संघटनेने विसाव्या शतकाच्या पहिल्या चार दशकांमध्ये लाहोर, फैसलाबाद,ल्यालपुर अशा अनेक ठिकाणी शेतकरी परिषदा भरविल्या. त्यात शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करण्यात आला १९०७ मधील ल्यालपुर शेतकरी मेळाव्यात 'पगडी संभाल ओ जट्टा' ही शेतकऱ्याला स्वाभिमानाची शिकवण देणारी देशातील शेतकरी आंदोलनाची पहिली घोषणा दिली गेली. १९३८—३९ मधील लाहोर येथील प्रसिध्द लॉग मार्चने (मोर्चाने) असेंब्ली इमारतीला तब्बल नऊ महिने वेढा घातला होता. नेतृत्व संघटनेची बांधणी आणि राष्ट्रीय परिणाम या परिणामांनुसार एकोणिसावे शतक संपतासंपता पंजाबमध्ये स्थापन झालेली संघटना देशातील पहिली असली, तरी प्रत्यक्षात पहिले मोठे आंदोलन मात्र महाराष्ट्रात झाले.

१८७५ मधील डेक्कन रायट्स किंवा दख्खनचा उठाव हे ते पहिले आंदोलन होय. दिडशे रूपयांच्या कर्जापायी काळूराम सावकाराने पूणे जिल्हयाच्या शिरूर तालुक्यातील करडे गावातील प्रतिष्ठीत शेतकरी बाबासाहेब देशमुख यांची शेतीवाडी, स्थावर व जंगम मालमत्ता जप्त केली. सततच्या दुष्काळानंतरही ब्रिटीश सरकारने शेतसारा कमी न केल्याने त्याचे हप्ते भरण्यासाठी शेतकऱ्यांना सावकारांचे उंबरठे झिजवावे लागत होते. सावकार व सरकार या दोघांनी संगनमताने ही लुट चालविण्याने पुणे, अहमदनगर व सोलापुर जिल्हांतील शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने उठाव केला. त्याला अमुक एकच असे नेतृत्व नव्हते. करडे येथील घटनेची प्रतिक्रीया म्हणून ९ सप्टेंबर १८७५ रोजी पहिला संघर्ष झाला. एका अर्थाने हे अहिंसक आंदोलन होते. सावकारांच्या घरावर हल्ले करून आपसी शेतीवाडी, जमीनजुमल्याची गहाणखते, कागदपत्रे काढून सार्वजनिक ठिकाणी जाळायची, परंतू माणसांना अजिबात इजा करायची नाही, असे या उठावाचे स्वरूप होते.

दुसरीकडे इंग्रजांनी भारतातील आपली सत्ता स्थिर होताच चहा, नीळ, कापूस या काही पिकांवरील प्रक्रीयांमध्ये आपले लोक घुसविले होते. नीळ व चहाचे मळे ब्रिटीशांच्या ताब्यात गेले. बिहारमधील चंपारण्य भागात अशाच ब्रिटीश मळेवाल्यांकडून स्थानिक शेतकऱ्यांच्या प्रचंड छळ होत असल्याने १९१७ पासून तेथे असंतोष धगधगत होता. दक्षिण आफिकेतून परतलेले महात्मा गांधी थेट चंपारण्याचा लढा जिंकला. मधल्या काळात केरळमध्ये मलबार भागात मुस्लिम शेतकऱ्यांनी नायर जमिनीदारांविरूध्द एक मोठा उठाव केला होता. तो 'मोपला उठाव' म्हणून ओळखला जातो. तथापि त्या उठावामागे दिल्लीत मुस्लिमांची सत्ता आल्याच्या अफवेचा आधार असल्याने संपूर्ण संघर्षात शेतीचा संदर्भ कमी आणि धार्मिक प्रभाव अधिक राहिला.

जय जवान जय किसान असं श्री. लाल बहादुर शास्त्री म्हणाले होते पण याच शेतकऱ्यांची व्यथा एकूण तुमचे मन दु:खी झाल्याशिवाय राहणार नाही. याच जगाच्या पोशिन्दयाला आज आत्महत्या करण्याची वेळ का आली ? स्वत: दिवस रात्र शेतात राबणारा माझा शेतकरी प्रेमाने, मनापासून संपुर्ण बळ एकवटून सहयाद्रीप्रमाणे कणखर उभा असतो, या संकटावर मात करून तो मायेने लावलेले, जपलेले पिक घेतो पण अजून त्याची परीक्षा संपलेली नसते. शाळेत शिकणाऱ्या मुलाला देखील वर्षात फक्त दोनदाच परीक्षेला सामोरे जावे लागते पण शेतकऱ्याला प्रत्येक क्षणाला परीक्षेला सामोरे जावे लागते. एक समस्या सुटली कि दुसरी त्याचा समोर आ वासून उभी असते. शेतमालाला हमीभाव नाही. त्याने घेतलेल्या पिकला योग्य भाव मिळत नाही. या अवस्थेत शेतकरी का करणार ?

शेतीची सुरूवात केली तेव्हा डोंगर टेकड्यावर लाकडाच्या साहाय्याने शेती करून त्यापासून धान्याची पैदास केली जायची, काही काळानंतरच मानव एक जागी स्थिर झाला, त्यानंतर त्याने अधिक प्रमाणात क्षेत्रावर शेती करण्यास सुरूवात केली. कालांतराने, भारत देशामध्ये हरित क्रांती झाल्यानंतर देशाच्या धान्य उत्पादन क्षमतेमध्ये खूप मोठे बदल झाले. अन्न धान्याची उत्पादन क्षमतेमध्ये मोठी वाढ झाली, परंतु त्या काळी प्रश्न होता तोच की, उत्पादित केलेले धान्य साठवण्याची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे तसेच वाटपाचं नियोजन नसल्यामुळे त्या उत्पादनापेक्षा जास्त प्रमाणात धान्याची नासाडी अधिक होत असे. देशातील गरिबांना हे धान्य मिळतही नव्हते. व्यवस्थित न साठवल्याने त्याची मोठी नासाडी होत असायची. आज आपल्या देशातील शेतकरी हा जास्तीत जास्त प्रमाणात खेडयापाड्यात राहतो, आणि हा शेतकरी शेतीपूरक व्यवसाय म्हणून गायी, म्हशींचे संगोपन करतो, त्यापासून मिळणारे दुध यापासून तो दैनंदीन जीवन जगण्यासाठी काही प्रमाणात उदरनिर्वाहासाठी त्याची विक्री करून पैसे मिळवतो. परंतु पुर्वीपासून उत्पादित फळभाज्या, पालेभाज्या, फळे यांना जास्तीत जास्त दिवस कसे टिकवता येईल या गोष्टी शेतकऱ्यांना माहित नाहीत. धान्य हे काही दुधासारखे नाशवंत नसते, म्हणून धान्याची नासधूस दुधाच्या प्रमाणापेक्षा कमी होत असते. फळे, भाज्या आणि दूध हे नाशवंत असल्यामुळे त्यांची साठवणूक करण्यासाठी आपल्याकडे तरी काही सुविधा नाहीत, कोणत्याही प्रकारची सोयच नसल्याने त्याचा परिणाम शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होतो. असोचेम या संघटनेने या बाबत एक पाहणी केली असता असे आढळून आले की, आपल्या देशात या तीन नाशवंत मालाचे जेवढे उत्पादन होते त्याच्या ४० ते ५० टक्के एवढे उत्पादन वाया जाते, नासते आणि कुजते व्यर्थ जाते. भारताच्या भाज्या आणि फळांच्या उत्पादनात दुसरा क्रमांक आहे. भारताने ठरवले तर तर निम्म्या जगाला दूध आणि भाज्या पूरवू शकतो. तेवढे उत्पादन आपल्याकडे घेतले जाते. परंतु ते जगाला न पुरवता आपण त्यातला जवळपास निम्मा माल नासवून, कुजवून उकिरड्यावर फेकतो. त्याची मालाची तर नासाडी होतेच पण उकिरडयावर टाकल्याने त्याचा दुर्गंध सुटून रोगराई पसरते. निर्माण झालेला हा माल साठवण्याच्या पुरेशा सोयी सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत आहे.

आपले हे नुकसान ४४० अब्ज डॉलर्स एवढे प्रचंड आहे. ते रूपयांत मोजायचे झाल्यास साधारण २४ लाख कोटी रूपये इतके आहे. आपण उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न भारतातील शेतकरी वर्गाने केला आहार परंतु तयांना पण साठवण्याची योजना आखली नाही. त्याचा आपल्याला हा परिणाम भोगावा लागत आहे. ही प्रयत्न भारतातील शेतकरी वर्गाने केला आहार परंतु त्यांना पण साठवण्याची योजना आखली नाही. त्याचा आपल्याला हा परिणाम भोगावा लागत आहे. ही उत्पादने अशी नासून आपले हे मोठे नुकसान टळावे यासाठी त्यांना गोदामे आणि कोल्टड स्टोरेज उपलब्ध करून दिले पाहिजेत परंतु सध्या तरी यावर एक मार्ग आहे, तो म्हणजे या

मालावर प्रक्रीया करणे. आपण दूध वाया घालवण्यापेक्षा त्याची पावडर केली पाहिजे. फळांवरही अनेक प्रकारच्या प्रक्रीया करता येतात. त्यामुळे नासाडी तर टळतेच पण प्रक्रीया केलेल्या मालाला जास्त भाव मिळून शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळतात.

**भारतीय शेतकऱ्यांना लागणाऱ्या मुलभूत गोष्टी :—**

शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टीमध्ये प्रथम ''सुपीक'' जमीन आणि नंतर ''पाणी'' लागते. शेतीला मुबलक पाणी असेल तरच शेती करणे शक्य आहे. तिसरी आवश्यक गोष्ट म्हणजे ''मनुष्यबळ'' हे असले की, शेतकरी शेतातील पिकांची निगा राखू शकतो. चौथे म्हणजे शेती करतांना येणारा खर्च पूर्ण करण्यासाठी लागणारा ''पैसा'' (भांडवल) आणि शेवटी जेथे तो त्याचा उत्पादित शेतमाल विकतो, ती ''बाजार पेठ'' शेतकऱ्यांसाठी त्यांची शेतीच सर्व काही असते. त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह आणि जगातील अन्य लोक कळत न कळत या शेतकऱ्यावर अवलंबून असतात.

भारतीय शेतकऱ्यावर येणारी संकटे

शेती करतांना शेतकऱ्याला बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बॅक इ. कडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीतील होणारे शासकीय बदल अशा अचानक येणाऱ्या अनेक संकटांना सामना करावा लागतो, हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतातील पिकांचे नुकसान होते. हजारो रूपये खर्च करून शेतकरी आपला शेतमाल तयार करतो त्याची काळजी घेतो. पण त्याच्या कष्टाला कधी फळ मिळतेच असे नाही.

**शेतकऱ्यांचे मित्र :—**

साप, बेडूक, फुलपाखरे मधमाश्या, कोंबडया, शेळया असे अनेक प्राणी शेतकऱ्यांचे मित्र असतात. सर्व पक्षी शेतातील धान्य खाऊत फस्त करतात. अशी एक गैरसमजुत आहे. काही पक्षी शेतातील धान्य खात नसून पिकाची काढणी झाल्यावर शेतात पडलेले दाणे टिपतात. निसर्गातील कीड नियंत्रण आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचे संतुलन राखण्याचे काम पक्षी करतात.

थ्यकांचे नुकसान करतात म्हणून अमेरीकेतील लोकांनी कॅरोल विना पॅराकीट या पोपटाच्या सुंदर प्रजातीचा वंशच संपवून टाकला. माओच्या आदेशानंतर चिनी नागरिकांनी लाखो चिमण्यांची कत्तल केली, त्याचा परिणाम शेतीवर झाल्याने चीनला उपासमारीचा सामना करावा लागला. पीक उत्पादनच न झाल्याने लाखो लोक मृत्यूमुखी पडले. शेवटी चीन सरकारला रशियातहून चिमण्या आयात कराव लागल्या.

# भारतीय किसान संघ

**दत्तात्रय भानुदास जाधव**
एम.ए, एमफील, सेट (राज्यशास्त्र)
प्लॅट नं- १०, ए विंग, रॉयल एन्क्लेव्ह, गुरुवार पेठ पुणे-४२
dattajadhav2009@gmai.com. Mob- 9404232969

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) शेतकरी आणि शेती प्रश्नावर काम करणारी एक देशव्यापी संघटना म्हणून भारतीय किसान संघाची ओळख आहे. 'शेतकऱ्यांची शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांकडून चालविण्यात येणारी संघटना म्हणजे भारतीय किसान संघ,' अशी व्याख्या भारतीय किसान संघाकडून करण्यात आली आहे. संघ देशात जे नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. त्यांना शेतकरी मानतो. देशात विविध शेतकरी संघटना, विविध राजकीय पक्षांचे शेतकरी मोर्चे शेतकऱ्यांसाठी काम करताना दिसतात. तरीही शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावताना दिसत नाही. शेतकरी दिवसोंदिवस गरीब होताना दिसत आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न मूळापासून सोडवणूक करणारी एक देशव्यापी गैरराजकीय संघटना असावी. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य दर मिळावा. सरकारी नीम सरकारी आणि खासगी यंत्रणांकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबावे. शेतकऱ्यांना स्वाभिनानाने, सन्मानाने कोणत्याही राजकीय पक्षाच्या मदतीशिवाय आपल्या योग्य मागण्या सरकारकडून मान्य करून घेता याव्यात, असे ध्येय ठेवून भारतीय किसान संघाची स्थापना करण्यात आली आहे. 'कृषिमित् कृषस्व' हे संघाचे घोषवाक्य आहे. ते ऋगवेदातील एका सूक्ताचा छोटा भाग आहे. 'अक्षैर्मा दिव्य: कृषिमित् कृषस्व, वित्ते रमस्व बहु मन्य मान,' असे पूर्ण सूक्त असून, त्याचा अर्थ जुगार खेळू नका, शेतीच करा, शेतीतून प्राप्त झालेल्या संपत्तीने सन्मानपूर्वक जीवन व्यतीत करा, असा आहे. हर किसान हमारा नेता है, अशी एक संघाची घोषणा आहे. सर्वसामान्य शेतकरी आमचा नेता आहे, अशीच संघाची धारणा आहे. 'देश के हम भंण्डार भरेंगे, लेकिन किंमत पुरी लेंगे,' अशीही एक संघाची घोषणा आहे. देशातील नागरिकांना जितक्या अन्नधान्याची गरज आहे. तितके अन्नधान्य आम्ही शेतीत पिकवू, देशातील गेदामे भरू. मात्र, त्याचे पूर्ण दाम घेऊ, असा या घोषणेचा अर्थ आहे.

**स्थापना, संघटना आणि संरचना :**

उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या विदर्भात भारतीय किसान संघाचे काम १६७१ सुरू झाले. दक्षिणेकडील काही राज्यात ही किसान संघाचे काम सुरू झाले. मात्र, भारतीय किसान संघाला अखिल भारतीय स्वरुप ४ मार्च १९७९ रोजी राजस्थान येथील कोटा येथे आयोजित करण्यात आलेल्या संमेलनात मिळाले. कुशल संघटक, तत्वचिंतक, आंतराराष्ट्रीय ख्याती असलेले कामगार, शेतकरी नेते दत्तोपंत ठेंगडी या मराठी माणसाने या संघटनेची स्थापना केली. ३, ४, ५ मार्चला १९७९ला झालेल्या अधिवेशनात चर्चा, विचार मंथन करून एका गैरराजकीय शेतकरी संघटनेची स्थापना करण्यात आली. या संमेलनाला तामीळनाडू आणि आसाम सोडून देशाच्या सर्व राज्यातून आलेले प्रतिनिधी आणि देशभरातून आलेले १५०० शेतकरी उपस्थित होते. या संमेलनात भारतीय किसान संघाने स्वत:साठी एक घटना, नियमावली (संविधान) तयार करून तिचा स्वीकार केला. देशातील सर्व शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे. सर्व गाव एक परिवार, कुटुंब

आहे. जाती आणि वर्ण-वर्ग व्यवस्थेवर संघाचा विश्वास नाही. संघ अशी कोणतीही व्यवस्था मानत नाही. प्रत्यक्ष शेतीत काम करणारा शेतकरी, शेतमालक, शेतमजूर, शेतीपूरक व्यवसाय करणारे बारा बलुतेदार या सर्वांना मिळून भारतीय किसान संघ एक परिवार, कुटुंब मानतो. गावातील सर्व घटक जोपर्यंत एकत्र येणार नाहीत, तोपर्यंत शेतकऱ्यांचे प्रश्न मूळापासून सुटणार नाहीत. त्यासाठी गावातील गरीब-मागास घटकांवर अधिक लक्ष्य केंद्रीत केले पाहिजे, असा उद्देश संघाने ठेवला आहे.

किसान संघ ही गैरराजकीय संघटना म्हणून कायम रहावी, असा संघाचा उद्देश आहे. देशातील विविध शेतकरी संघटना राजकीय पक्षांच्या हातच्या एक बाहुले बनल्या आहेत. राजकीय पक्ष या शेतकरी संघटनांचा आपल्या फायद्यासाठी वापर करून घेतात, त्यामुळे शेतकऱ्यांचे मूळ प्रश्न बाजूला पडतात, असे चित्र सर्वत्र दिसत आहे. किसान संघाला ही साखळी मोडून काढायची आहे, त्यासाठी किसान संघ एक गैरराजकीय शेतकरी संघटना आहे. सत्ताधाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे हित साधले जाणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठीचा दबाव सरकारवर निर्माण करणे गरजेचे आहे. शिवाय ते लोकशाहीच्या हिताचे आहे, अशी किसान संघाची धारणा आहे. किसान संघाचे दैनदिन कार्यपद्धतीत ही राजकारण आणि राजकीय पक्षांपासून दूर ठेवण्यात आली आहे.

किसान संघाच्या संघटनात्मक व्यवस्थेतील सर्वात शेवटचा घटक ग्राम समिती आहे. किसान संघ ग्राम समिती आपल्या कामाचा पाया मानतो. गावातील शेतकरी सभासदांनी एकत्र येऊन तयार केलेल्या समितीला गाव समिती किंवा ग्राम समिती म्हटले जाते. समिती स्थापन करण्यासाठी गावात कमीत कमी २५ सदस्य असले पाहिजेत, त्यांच्यातून काही लोकांची निवड करून ग्राम समिती स्थापन केली जाते. या ग्राम समितीतून पुढे तालुका समिती, तालुका समितीतून जिल्हा समिती, जिल्हा समितीतून प्रांत समिती आणि प्रांत समितीतून अखिल भारतीय कार्यकारिणी निवडली जाते, अशी भारतीय किसान संघाची संघटनात्मक रचना आहे. संघाचा आंदोलनावर फारसा विश्वास नाही. संघटनात्मक ताकद वाढली तर प्रश्न सहज सुटतील, असे संघ मानतो. मात्र, निवेदन, शिष्टमंडळ पाठवून प्रश्न सुटला नाही, तर संघ आंदोलनाचा मार्ग स्वीकारून मोर्चा, घेराव आदी मार्गांचा अवलंब करतो. किसान संघाच्या कामाचा भर रचनात्मक कामांवर आहे. किसान वर्षभरात चार कार्यक्रम साजरे करतो. भगवान बलराम जंयती किसान संघ किसान दिवस म्हणून साजरा करतो. भगवान बलराम यांच्या हातात मुसळ, नांगर आहे, हे शेतकऱ्यांचे प्रतीक आहे. त्यामुळे किसान संघ प्रेरणास्थान, शेतकऱ्यांचे दैवत मानतो. बलरामाचा जन्मदिवस भाद्रपद शुद्ध षष्ठी आहे, हा दिवस किसान दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी शेतकऱ्यांचे मेळावे, मार्गदर्शन वर्ग, अभ्यास वर्ग, मिरवणूक आदी उपक्रम राबवितो. संघ २६ जानेवारी रोजी भारतमाता पूजन करतो. आपण या भारतमातेचे पुत्र आहोत. या देशाविषयी आपले काही कर्तव्य आहे. सामाजिक बांधिलकी आहे, याची जाणीव रहावी, म्हणून प्रजासत्ताक दिनी भारतमाता पूजन केले जाते. ४ मार्च १९७९ रोजी भारतीय किसान संघाची स्थापन झाल्याने हा दिवस संघ स्थापना दिवस म्हणून साजरा करतो. संघाच्या सर्व कामांना लागणारा पैसा संघ शेतकऱ्यांकडून किंवा संघाच्या सभासदांकडून देणगी रुपाने जमा करतो. स्थापना दिना दिवसी सभासद शेतकऱ्यांकडून समर्पण म्हणून काही रक्कम देऊन संघाला स्वयंपूर्ण करावे, अशी अपेक्षा संघाची असते. म्हणून स्थापना दिवस समर्पण दिवस म्हणून ही साजरा केला जातो. वसू बारसे दिवशी गो पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. संघाचा

भर संघटनात्मक शक्तीवर असल्याने संघ शेतकऱ्यांच्या संघटनात्मक बांधणीवर भर देतो. प्रत्यक्ष शेतकऱ्याला भेटणे, प्रशिक्षित करणे, संघटनेशी जोडणे, वार्षिक सदस्यता करणे आदी कार्यक्रम संघाकडून वर्षभर सुरू असतात.

**पर्यावरण संरक्षण आणि जौविक शेती :**

भारतीय संस्कृतीत, जीवन प्रणालीमध्ये पर्यावरणपूरक विकासाला अन्यय साधारण महत्त्व आहे. आज पर्यावरणपूरक विकासाची गरज प्रकर्षाने जाणवू लागली आहे. योग, पंचकर्म, आयुर्वेदाच्या प्रसारासोबत शाकाहारी माणसांच्या संख्येत वाढ होईल. कृषीजन्य पदार्थ जैविक पद्धतीने तयार केल्यास त्याला जागतिक व्यापारात महत्त्व निर्माण होईल आणि पर्यावरणपूरक विकास साधता येईल, अशी धारणा किसान संघाची आहे. संघाच्या कृषी विकासात पर्यावरण रक्षण आणि भारतीय विचारावर आधारीत समाजरचना, या गोष्टींना प्राधान्य आहे. वनसंपदा, जलसंपदा ही राष्ट्रीय संपत्ती आहे. तिचे संवर्धन केले पाहिजे, असे संघ सांगतो. रासायनिक खते, किटकनाशकांमुळे जमिनीची उत्पादन क्षमता कमी होऊ लागली आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यांवरील कर्जे वाढत आहेत, यासाठी संघ जैविक शेतीला प्राधान्य देण्याची मागणी करतो. देशाला एकेकाळी हरीत क्रांतीची गरज होता. कोट्यवधीच्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी रासायनिक खते, किटकनाशके, बि-बियाणांचा भरमसाठ वापर करण्यात आला. त्यावेळी त्याला पर्याय नव्हता. मात्र, आज त्याचे शेतीवरील वाईट परिणाम पहात आहोत. आता सेंद्रीय शेतीला (जैविक, झिरो बजेट) प्राधान्य दिले पाहिजे, अशी संघाची भूमिका आहे. महाराष्ट्र सरकारने नुकतेच सेंद्रीय शेतीचे धोरण जाहीर केले आहे, हा किसान संघाच्या सेंद्रीय शेतीच्या चळवळीला मिळालेले यश आहे.

**सरकारी धोरणावर परिणाम :**

भारतीय किसान संघ आरएसएसच्या परिवारातील एक संघटना आहे. तरीही संघाने घेतलेली भूमिका वास्तववादी, शेतकरी हिताची, वैज्ञानिक दृष्टीकोणाला चालना देणारी आहे. सेंद्रीय शेतीला बळ देण्यासाठी केंद्र सरकारच्या पातळीवर सेंद्रीय शेतीचे प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानित करण्याची मागणी संघाने केली होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मोदी सरकारने सेंद्रीय शेतीचे प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना, संस्थाना पुरस्कार देणे सुरू केले आहे. देशी गोवंश सेंद्रीय शेतीचा पाया गृहीत धरून गोवंशाच्या गोमुत्र-गोमयावर अनेक ठिकाणी संशोधन सुरू आहे. सेंद्रीय शेतीला चालना देण्यासाठी, संशोधनासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी संघाने केली होती. किसान संघाच्या मागणीनुसार गुजरात सरकारने सेंद्रीय शेतीच्या संशोधनासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापन केली आहे. पुढील वर्षी विद्यापीठाचे कामकाज सुरू होण्याची शक्यता आहे.

२०१३मध्ये मनमोहन सिंग सरकारने केलेल्या भूसंपादन कायद्याच्या तरतुदी ठरविण्यात किसान संघाने मोठी भूमिका बजावली आहे. सिंग सरकारने या कायद्यासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना केली होती. त्या समितीच्या अध्यक्षा भाजप नेत्या सुमित्रा महाजन होत्या. किसान संघाने दुबार पिक देणारी जमीन संपादीत करू नये. शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा. शेत जमिनीचे संपादन केल्यानंतर त्याचा सामाजिक परिणाम काय होणार, याचे मूल्यमापण करावे, अशी मागणी केली होती. त्यानुसार २०१३च्या कायद्यात सामाजिक परिणामांचे मूल्यमापण करण्याच्या तरतुदीचा समावेश केला होता. या कायद्यात बदल करण्यासाठी

मोदी सरकारने एक अध्यादेश काढला होता. हा अध्यादेश शेतकऱ्यांच्या विरोधात आहे, असे ठासून सांगून किसान संघाने देशातील इतर शेतकरी संघटनांच्या बरोबरीने आंदोलनात भाग घेतला होता. आरएसएस परिवारातील संघटना असून किसान संघाने मोदी सरकारविरोधी घेतलेल्या भूमिकेने सर्वांचे लक्ष्य वेधून घेतले होते.

शेतमालाच्या हमीभावासाठी किसान संघ आग्रही आहे. विविध प्रांतातील कार्यकारिणीने त्या-त्या प्रांतातील प्रमुख पिकांचा उत्पादन खर्च शास्त्रीय पद्धतीने खर्च काढून त्या बाबतचा अहवाल तयार करून नियोजन आयोग, कृषी मंत्रालयाला दिला होता. विविध विद्यापीठांमध्ये त्यावर चर्चा घडवून आणून सरकारकडे योग्य हमीभावाची मागणी लावून धरली आहे.

जीएम कापसाच्या बियाणाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याने जीएम बियाणांवर बंदी घालण्याची मागणी आता होत आहे. मात्र, संघाने सुरवातीपासून जीएम बियाणांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे. प्रकाश जावडेकर केंद्रीय पर्यावरण मंत्री असताना त्यांनी त्यांच्यासोबत जीएम क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांची चर्चा करवून जीएम बियाणांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला गेला आहे. मागील दहा वर्षांपासून पाणी, जलसंक्षरता, जलसंवर्धनला गती देण्याचे काम किसान संघ करीत आहेत. त्याला आता सरकारी पातळीवरून पाठबळ मिळू लागले आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र सरकारने जलसंधारणाच्या कामात चांगले काम केले आहे. जमीन भाडेपट्ट्याने देण्याचा कायदा केद्र सरकार करण्याच्या विचारात आहे. किसान संघ आणि भारतीय कृषी आर्थिक शोध केंद्राने त्या बाबत अनेक सूचना केल्या आहेत. जमीन भाडेपट्ट्याने देताना निर्माण होणारे वाद कोर्टात न जाता जबाबदार महसूल अधिकाऱ्यांच्या पातळीवर सोडवावेत, अशी संघाची मागणी होती ही मागणी सरकारने मान्य केलेली आहे.

**किसान संघाचे चित्री प्रकल्पग्रस्तांसाठीचे आंदोलन :**

सेमिनारचा विषय महाराष्ट्रातील शेतकरी आणि कामगार चळवळी असल्याने या शोध निंबधात आपण किसान संघाने कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात चित्री धरणग्रस्तांसाठी उभारलेल्या आंदोलनाचा आढावा घेऊ. कृष्णा-खोरे विकासांतर्गत घटप्रभा खोऱ्यातील एक उपनदी असलेल्या आजरा तालुक्यातील चित्री नदीवरील १.८ टीएमसी क्षमतेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम १९९२ला सुरू झाले. हा प्रकल्प आजरा व गडहिंग्लज परिसरासाठी वरदान ठरतो आहे. मात्र, या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्यांसाठी भारतीय किसान संघाने आंदोलन उभारले. १९९२ ला धरणाचे काम सुरू झाले. प्रकल्पासाठी भूसंपादन करताना चार एकराचा स्लॅब गृहीत धरून भूसंपादन सुरू होते. किसान संघाने आठ एकराचा स्लॅब गृहीत धरून भूसंपादन करण्याची मागणी केली होती. त्यासाठी तब्बल साडेचार वर्ष किसान संघाने लढा दिला आहे. त्यानंतर सरकारने किसान संघाची मागणी मान्य केली. शिवाय प्रकल्प लाभ क्षेत्र अशी नोंद सातबारा उताऱ्यावर होती. या नोंदीमुळे शेत जमिनीची विक्री, खातेफोड, कर्ज काढणे किंवा जमीन तारण ठेवता येत नव्हती, ही नोंद रद्द करण्यासाठी किसान संघाने आंदोलन करून सरकारकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार उताऱ्यावरील नोदी कमी करण्यात आल्या. उप्पर जिल्हाधिकारी अजित पवार यांच्या हस्ते नोंदी कमी केलेल्या उताऱ्यांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी त्यांनी किसान संघाच्या कामाचे कौतुक केले होते. किसान संघाने प्रकल्पासाठीचे भूसंपादन, जमिनीवरील लाभक्षेत्राच्या नोंदी काढून टाकण्यासाठी निर्णायक लढा उभारला होता.

**समारोप :**

किसान संघ आरएसएस परिवारातील एक संघटना असल्याने सध्याच्या मोदी सरकारच्या काळात केंद्र आणि राज्य सरकारबरोबर होणारा संवाद वाढला आहे. पूर्वी केवळ नियोजन आयोगाबाबत चर्चा व्हायची. आता मात्र, मोदी काळात संबधित कृषी, पर्यावरण मंत्री, सचिव पातळीवर चर्चा होताना दिसते. शेती संबंधित एखादा निर्णय घेताना किसान संघाला आणि किसान संघाचे मत विचारात घेतले जात आहे. मात्र, असे असले तरी किसान संघाचा मोदी सरकारच्या सर्वच धोरणांना सरसकट पाठींबा नाही. भूसंपादन कायद्यात बदल करण्यासाठी मोदी सरकारने आणलेल्या अध्यादेशाला विरोध करून किसान संघाने आपली भूमिका केवळ शेतकरी हिताची असल्याचे दाखवून दिले आहे.

किसान संघाच्या काही कमजोर बाजू ही आहेत. किसान संघाची रचना देशव्यापी असली तरी दक्षिण भारत, महाराष्ट्रात त्यांची संघटनात्मक रचना पूर्ण झालेली नाही. राजस्थान, मध्य प्रदेशात किसान संघाची मजबूत संघटना आहे. महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यात त्यांची पूर्ण रचना आहे. कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज, आजरा, कागल, पुण्यात शिरुर, अहमदनगरमध्ये राहुरी, कोपरगाव (काही प्रमाणात), जालनामध्ये जाफराबाद, औरंगाबादमध्ये सिल्लोड, सोयगाव, बीड माजलगाव, गेवराई, नांदेडमध्ये धर्माबाद तालुक्यात किसान संघ चागंल्या प्रकारे कार्यरत आहे. या शिवाय किसान संघाने कषी नीती, जनावरांचे रोग, औषधी नवस्पतींची उपयोग आदी पुस्तके प्रसिद्ध केली आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांवर विशेष सर्व्हेक्षण करून एक अहवाल तयार केला आहे. त्या शेतकरी आत्महत्यांमागील कारणे आणि उपायांची सविस्तर चर्चा केली आहे.
सध्या भारतीय किसान संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कर्नाटकमधील आई. एन. बसवेगोंडा आहेत. केंद्रीय कार्यकारिणीत संघटन मंत्री या पदावर दिनेश दत्तात्रय कुलकर्णी काम करीत असून, ते औरंगाबादचे आहेत. शिवाय अनिरुद्ध मुरकुटे (नागपूर), ज्ञानेश्वर तुपे (पुणे), श्रीरंग लाड (पुणे) हे सदस्य म्हणून काम करीत आहेत. किसान संघाचे महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष बळीराम सोळंके आहेत. कार्यकारिणीत सदस्य म्हणून राहुरीचे हरीभाऊ मोरे कार्यरत आहेत. राज्यातील इतर शेतकरी संघटना प्रमाणे किसान संघाला प्रादेशिक मर्यादा नाहीत. मात्र, इतरांसारखी कार्यकर्त्यांची कमतरता त्यांना ही जाणवत आहे. शिवाय गैरराजकीय संघटना असल्याने किसान संघाचा सदस्य कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा त्यांच्या शेतकरी मोर्चाचा सदस्य होत नाही. उलट कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला किसान संघाचे सदस्य होता येत नाही. त्यामुळे राजकीय इच्छा-आकांक्षा असणारे तरुण किसान संघाकडे येण्याचे प्रमाण कमी आहे. शिवाय देशभरात आता एकत्र कुटुंब व्यवस्था नाहीशी झाल्याने आणि कुटुंब लहान झाल्याने सक्रिय कार्यकर्त्यांची संख्या कमी होत आहे. शिवाय देशभरात आजवर स्थापन झालेल्या बहुतेक शेतकरी संघटना प्रथम गैरराजकीय होत्या. मात्र, संबंधित नेत्यांनी राजकीय संधी साधून राजकीय भूमिका घेतल्याने आणि ते स्वत:ही सक्रिय राजकारणी झाल्याने ग्रामीण भागात गैरराजकीय संघटना आहे, केवळ शेतकरी हीत डोळयासमोर ठेवून आम्ही काम करतो, या गोष्टींवर आता लोकांचा विश्वास राहिला नाही. या स्थानिक परिस्थितीचा किसान संघाच्या संघटनात्मक रचनेवर परिणाम झालेला दिसतो. किसान संघ प्रसिद्धी परामुख असल्यामुळे आणि तोड-फोडीची आक्रमक आंदोलने करीत नसल्यामुळे प्रसार माध्यमांतील प्रसिद्धीपासून दूर आहे. त्यामुळे राज्यात किसान संघ आणि त्यांच्या कामाविषयीची फारशी माहिती कोणाला नाही. मागील दहा-बारा वर्षांपूर्वी भाजप प्रणीत भारतीय किसान संघ म्हटले जायचे. आता संघ प्रणीत किसान संघ म्हटले जाते. भाजप प्रणीत-ते संघ प्रणीत ही वाटचाल किसान संघाच्या यशाचेचे किंवा कामाचे फळ आहे. राजकीय किंवा राजकीय नेत्यांच्या शेतकरी संघटना आणि राजकीय

सोयीने बदलणारी त्यांची भूमिका (राजू शेट्टी, सदाभाऊ खोत) विचारात घेता एका गैरराजकीय शेतकरी संघटना राज्यात आणि देशात सक्रिय असणे हे केव्हाही सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताचे आहे.

**संदर्भ :**

1. दत्तोपंत ठेंगडी- ध्येय पथ पर किसान. प्रकाशक भारतीय किसान संघ
2. दिनेश दत्तात्रय कुलकर्णी- भारतीय किसान संघ ध्येय धोरण. प्रकाशक- भारतीय किसान संघ
3. दत्तोपंत ठेंगडी- विजयी विश्वास. प्रकाशक भारतीय किसान संघ, विदर्भ
4. डॉ. दिलीप मनोहर सेनाड- कृषी देवता भगवान श्री बलराम. प्रकाशक भारतीय किसान संघ
5. कृषी नीती प्रकाशक- भारतीय किसान संघ
6. नरेंद्र मेघ- हर किसान हमारा नेता है. प्रकाशक- भारतीय किसान संघ

# डॉ. आंबेडकरांची कामगार चळवळीसंबंधी भूमिका : एक अवलोकन

**प्रा. शेषनारायण वडवे**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
पेठ वडगाव, जि- कोल्हापूर.
सलग्नता , शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर

**प्रस्तावना:**

1935 साली मुंबईतील कापड गिरण्यात काम करणाऱ्या एक लाख तेहतीस हजारहुन आधीक कामगारामध्ये अश्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीच्या कामगारांची संख्या पंधरा ते अठरा हजार होती. 1923 सालापासून कापड उद्योगात मंदी असल्याने आणि त्यात भर म्हणून 1929 च्या जागतिक मंदीसीचाही जबरदस्त तडखा बसल्याने 1935 सालापर्यंत गिरणी मालकांनी नोकर कपातीचे, बोनस न देण्याचे ,महागाईभत्यात तसेच वेतनात कपात करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्याचा निषेध म्हणून 1924,1925,1928,1929 आणि 1934 या वर्षात मुंबईच्या कापड गिरणी कामगारांनी संपाचे हत्यार उपासले होते. काही संप महिनोंमहीने चालवले होते. डॉ. आंबेडकर जेंव्हा प्रत्यक्ष कामगार चळवळीत उतरले आणि त्यांनी रेल्वे कामगारांची स्वतंत्र संघटना उभारली, त्या वेळी मनमाडला जी.आय.पी. दलित वर्ग मजूर परिषदेच्या 12 व 13 फेब्रुवारी 1938 रोजी झालेलेल्या अधीवेशनाच्या अध्यकपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

**डॉ. आंबेडकरांची कामगार चळवळीसंबंधी भूमिका :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा मनुवादी शोषणाविरोधातही होता. त्यांच्या जीवनातील १९३५ नंतरच्या काळामध्ये समस्त कामगार वर्गाबद्दल त्यांना असलेल्या आपुलकीच्या भावनेचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. आर्थिक विषमतेच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या कष्टकऱ्याविषयी त्यांच्या मनामध्ये वसलेली कळकळ, स्वतंत्र मजूर पक्षाचे संस्थापक म्हणून १९४२ ते १९४६ या कालखंडात व्हॉईसरॉय मंत्रिमंडळातील मजूर मंत्री म्हणून तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार या नात्याने केलेल्या भाषणामधून, कृतीमधून व निर्णयामधून व्यक्त होताना दिसून येतो. **डॉ.** बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, या देशातील कामगारांना दोन प्रमुख शत्रूंना तोंड द्यावयाचे आहे. ते दोन शत्रू म्हणजे ब्रम्हन्यवाद व भांडवालशाही. ब्रम्हन्यवाद म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वांना विरोध होय. त्या काळात भांडवलशाही विरुद्ध मोठमोठ्याने बोलणारे कामगार पुढारी आंबेडकरांना दिसत होते, परंतु ब्रम्हननवाद विरुद्ध बोलणारा कामगार पुढारी त्यांना आढळला नाही. म्हणून कामगार पुढाऱ्यांचे या प्रकारचे वर्तन त्यांना सशयास्पद वाटत होते. ब्रम्हन्यवाद हा कामगारातील विघटनाचे मूळ कारण आसल्याने त्याचे समूळ उच्चाटन केल्याशिवाय भारतीय समाज खऱ्या अर्थाने वर्गीय समाज कसा असू शकेल. कामगार पुढारी भारतीय समाजाचे वास्तव वर्गीय मानीत होते, तर **डॉ.** बाबासाहेब आंबेडकर जातीय किंवा ब्रम्हण्यग्रस्त मानीत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, कामगार संघटनांनी राजकारनात प्रवेश केला पाहिजे. कारण राजकीय सत्तेशिवाय कामगारांचे हित जोपासणे शक्य नाही. कामगारांच्या ज्या प्रमुख मागण्या आहेत त्या केवळ संघटना उभारुन मिळत नसतात, तर त्यासाठी संघटनांच्या शक्तिमागे कायद्याची मजबूत ताकद उभी राहिली पाहीजे आणि त्यासाठी कामगारांनी राजकरणात पडले पाहिजे. कमगारांनी पगारी गुलामगिरी ऐवजी स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही तत्वे मानणारी समाजव्यवस्था निर्माण केली पाहिजे. १९३८ मध्ये मुंबई विधान मंडळामध्ये मांडण्यात आलेल्या औद्योगिक विवाद विधेयकावर तुटून पडताना आपल्या भाषणामध्ये आंबेडकर

म्हणाले, "संप म्हणजे स्वातंत्र्याच्या हक्काचे दुसरे नाव! प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क आहे असे कबूल करता तर प्रत्येक कामगाराला संप करण्याचा अधिकार आहे, हे तुम्हाला कबूल करावे लागेल. स्वातंत्र्याच्या हक्का इतकाच कामगारांचा संप करण्याचा हक्क पवित्र आहे. बाबासाहेबांनी या विधेयकातील सक्तीच्या तडजोडीच्या कलमाला कडाडून विरोध केला. संप करण्याचा हक्क नसल्यामुळे कामगारांना संप करण्याबद्दल शिक्षा करणे ही गोष्ट नीतीच्या वा कायद्याच्या विरुद्ध नाही असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे असल्याचे मत त्यांनी ठामपणे मांडले.

बाबासाहेबांची व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये २० जुलै १९४२ रोजी कामगार मंत्री म्हणून नियुक्ती झाली. या संधीचा लाभ उठवून आंबेडकरांनी विविध परिषदा, अभ्याससत्रे व व्यासपीठांवरून केलेल्या भाषणांमधून व्यक्त केलेल्या विचारांनी, देशातील कामगारांचे हितरक्षण व कल्याणासाठीच्या धोरणाचा पाया घातला. स्थायी कामगार समितीच्या तिसऱ्या सभेच्या अध्यक्षपदावरून बोलताना बाबासाहेबांनी कामगार, मालक व सरकार यांच्या त्रिपक्षीय परिषदेने एकत्रितरीत्या कामगार कल्याणाच्या योजना राबवण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. १९५३ साली 'मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ हा कायदा गठीत करण्यात आला. कामगारांचे प्रश्न त्यांना आपल्या संघटनेमार्फत मांडता यावेत याकरिता १३ नोव्हेंबर, १९४३ रोजी भारतीय श्रमिक संघटना कायद्यामध्ये दुरुस्ती करणारे विधेयकही त्यांनी विधिमंडळामध्ये मांडले. या विधेयकामध्ये कामगार संघटनांना मान्यता देण्याचे बंधन मालकांवर टाकण्यात आले होते; तसेच कामगार संघटनांनी पूर्तता करायच्या अटी नमूद केल्या होत्या. या अटींची पूर्तता करणाऱ्या कामगार संघटनेस मालकाने मान्यता न दिल्यास तो दंडनीय गुन्हा ठरविण्याची तरतूद यात करण्यात आली होती. भारतातील कामगार चळवळीला प्रोत्साहन दणारे हे विधेयक नवसंजीवनी ठरले हे मान्य करावे लागेल.

**कामगारांसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान:**

1. १९३७ साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्या संबंधी खोती पध्दत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले
2. १९३८ साली कोकणातील 'औद्योगिक कलह विधेयकानुसार' कामगारांचा संप करण्याचा अधिकार हिरावुन घेतला गेला. पण बाबासाहेबांनी या बिलावर भाषण करतांना संप हा दिवाणी अपराध आहे, फौजदारी गुन्हा नव्हे असे मत दिले व पुढे कामगारांना संप करण्याचा कायदेशिर अधिकार मिळवून दिला.
3. १९३८ मध्ये 'सावकारी नियंत्रण' विधेयक तयार केले
4. बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.
5. २ सप्टेंबर १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली. ही योजना लेबर चार्टर म्हणून प्रसिध्द आहे.
6. 'दि.फॅक्टरी अमेंडमेंट बिल' संमत करुन कामगारांना १० दिवसाची पगारी रजा आणि बाल कामगारांना १४ दिवसाची पगारी रजा देण्यासंबंधी कायद्यात दुरुस्ती केली.
7. १९४६ च्या बजेट सेशन मध्ये आठवड्याचे कामाचे तास ५४ वरुन ४८ व दिवसाला १० तास ऐवजी ८ तास करण्याचे बिल मांडले.
8. अपघात ग्रस्त कामगारांना मोबदला मिळावा म्हणून 'कामगार भरपाई कायद्याची' निर्मिती केली.
9. २१ फेब्रुवारी १९४६ साली मध्यवर्ती कायदे मंडळात 'दि इंडियन्स ट्रेड युनियन्स (अमेंडमेंड) ॲक्ट आणून ट्रेड युनियनला मान्यता देणे व्यवस्थापनाला सक्तिचे करण्या संबंधीचे विधेयक मांडले.

10. १९ एप्रिल १९४६ ला मध्यवर्ती कायदे मंडळात कमीत कमी मजुरी आणि कामगारांची संख्या किती असावी या संबंधी बिल मांडले व त्याचेच १९ फेब्रुवारी १९४८ ला कायद्यात रुपांतर झाले
11. बाबासाहेबांनी भारतीय घटनेची निर्मिती केली. त्यातील 'मार्गदर्शक तत्व' आर्टिकल ३९ (ड) नुसार पगारदार पुरुषा इतकाच पगार त्याच पदावर काम करणाऱ्या स्त्रियांना ही मिळावा अशी घटनात्मक तरतूद केली.
12. घटनेच्या कलम ४३ नुसार गर्भवती व बाळंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली.
13. कलम ४३ (अ) नुसार शासनाने कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तरतूद केली.
14. कलम ४३ नुसार शासनाने कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संधी देण्यासाठी प्रयत्न करण्याची तरतूद केली.
15. 'स्टेट्स ऍण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हात घालतांना बाबासाहेब 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.
16. कामगारांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरण
17. स्पष्ट केले. त्यातील आर्टीकल २ सेक्षन २ (४) मध्ये आर्थिक शोषणाच्या विरोधात स्पष्टीकरण केले.
18. त्यात कामगारांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संपत्तीची जास्तीत जास्त समान वाटणी करण्याबद्दल राज्याने प्रयत्न करावेत अशी सुचना केली.
19. शेतीच्या प्रगतीसाठी व शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी लॅंड मॉर्गेज बॅंक, शेतकऱ्यांची पतपेढी, खरेदी विक्री संघ इत्यादी स्थापण करण्या विषयी धोरण व्यक्त केले.

**समारोप :**

बाबासाहेबांचे वरील बहुमूल्य योगदान पाहतां आज कामगारांची जी सुस्थिती दिसत आहे, त्यात बाबासाहेबांचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे. म्हणून बाबासाहेब हे सर्व कामगारांचे आदर्श आहेत. ही बाब सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. आज तर काही कामगारांची स्थिती वाईट आहे. नव्या कामगार धोरणाचा फारसा लाभ नाही. साम्राज्यवाद फोफावत आहे. जागतिकीकरण आले. यांत्रिकीकरण सुरू झाले. त्यामुळे सामान्य माणूस भरडला जात आहे. साम्राज्यवाद, नव वसाहतवाद, सांस्कृतिक दहशतवाद, बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादीमुळे माणसाच्या घामाचा दाम कमी आणि भांडवलदाराला जास्त नफा या दोहोंच्या फरकामुळे गरीब हा दिवसें दिवस गरीब तर श्रीमंत हा अधिकाधिक श्रीमंत होत आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची घसरण होत आहे. माणसाचे अवमूल्यन होत आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. अशा बुर्ज्वा व्यवस्थे विरुद्ध तसेच शासक समाज व्यवस्थे विरूद्ध आपण प्रतिरोध केला तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातला भारत घडवू शकू. तेव्हाच प्रत्येकाचे जीवन सुंदर होईल. प्रगती करता येईल आणि चळवळ ही पुढे नेता येईल.

**संदर्भ :**

1. डॉ. रावसाहेब कसबे, आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती-2004.
2. य. दी . फडके , आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती-1990

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261**
**Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा राजकीय इतिहास

**दिपक धोंडीराम भगुरे**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

**प्रस्तावना**

अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्रात शेतकरी चळवळी पाहावयास मिळतात, महात्मा ज्योतिबा फुले यांनी सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहून शेतक-यांच्या विदारक स्थितीवर प्रकाश टाकला, त्यांनी शेती प्रश्नाकडे लक्ष द्यायला सरकारला भाग पाडले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनीदेखील शेतकऱ्यांचे मेळावे, परिषदांच्या माध्यमातून शेती व शेतकरी, कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यावेळी राज्यकर्ते परकीय असल्याने त्यांना शेतक-यांशी कसल्याही प्रकारचे देणे घेणे नव्हते. त्यांनी शेती व शेतक-यांची उपेक्षाच केली.

आजही महाराष्ट्रातात शेती व शेतकरी विविध राजकीय संघटनांच्या माध्यमातून उठाव सुरू आहे. कारण आजही शेती प्रश्न हे कायम आहे शेती मालाला भाव नाही. येवढेच नाही तर खर्चाच्या तुलने उत्पादन खर्चही निघत नाही त्यामुळे पुढेही शेतक-यांचे असेच आंदोलने चळवळी विविध राजकीय संघटनांच्या माध्यमातून चालू राहतील असे वाटते.

**शेतकरी कामगार पक्ष :**

२६ एप्रिल १९४८ रोजी श्री भाउसाहेब राउत यांच्या निवास्थानी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली दिनकर जवळकरांच्या ब्रम्होतर नेत्याने शेतकरी कामगारांचा पक्ष सुरू करावा अशी सूचना केली होती. त्याला अनुसरून राष्ट्रीय काँग्रेसमध्ये असलेल्या बहुजन समाजातील ग्रामीण नेतृत्वाने शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली त्यात शंकरराव मोरे केशवराव जेधे तुळशीदास जाधव इत्यादी प्रमुख नेते आघाडीवर होते. महात्मा ज्योतिबा फुले, राजर्शी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांना आदर्श मानून कार्ल मार्क्स, लेनिन यांना अपेक्षित असलेली शोषणविरहित समाजरचना निर्माण करण्याचा संकल्प केला. त्यामुळे महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाची झपाट्याने वाढ होत गेली.

**शेतकरी कामगार पक्षाच्या शेतकरी कामगाराच्या बद्दल चळवळी.**

१९५० मध्ये शेतकरी कामगार पक्षाने नाशिक जिल्ह्यात दाभाडी याठिकाणी अधिवेशन भरवले त्यात पुढील मुद्दे प्रामुख्याने मांडले गेले आहेत.

१. कसेल त्याची जमीन ही शेतकरी वर्गाची प्रमुख भूमिका होती.
२. कुळाला योग्य संरक्षण मिळेल अशारितीने कूळ कायद्यात दुरुस्ती करावी.
३. मोबदला न देता जमीनदारी नष्ट करणे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे व तिची फेरवाटणी करावी.
४. शेतकऱ्यांच्या उपजिवीकेला व शेतीच्या धंद्याला लागणा-या वस्तू परवडतील अशा भावात मिळण्याची व्यवस्था निर्माण करावी.
५. उत्पादनाला लागणारा खर्च व सर्वसाधारण नफ्याचा दर या बाबी समोर ठेवून अन्नधान्याच्या किमती ठरवाव्यात. कितीतरी प्रमुख मागण्या शेतकरी कामगार पक्षाने मांडलेल्या आहेत.

**'मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी' महाराष्ट्र किसान सभा :**

महाराष्ट्र विविध पक्ष संघटनांनी शेती आणि शेतकरी प्रश्नांवर लढे उभारले आंदोलने केली त्यामुळे शेतकरी कामगार पक्षा बाबतचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी आणि त्याच्या नेतृत्वाखाली किसान सभेचा उल्लेख होतो.

ISSN : 2348-7143
December-2018

भारतात जवळपास ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत देशाच्या एकूण उत्पन्नापैकी जवळजवळ निम्मा भाग ४९ टक्के शेतीमधून मिळतो परंतु भारतात जेवढे शेतीची अनास्था होत आहे. तेव्हढी इतरत्र क्षेत्रात दिसून येत नाही.

अशा परिस्थितीत शेती विभागातील विविध स्तरांतील घटकांना औदयोगिक-व्यापारी शोषणाविरुद्ध ऊभे करण्याचा रणनीतीचा भाग म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीने शेतमजुरांचा वर्ग हा कामगार वर्गाचा आद्य दोस्त तर मध्यम शेतकरी वर्गाचा विश्वासू दोस्त मानले.

सदन शेतकरी वर्ग सुद्धा वरिष्ठ पातळीवर वरिष्ठ पातळीवरील औद्योगिक-व्यापारी शोषणाचा बळी असल्याने त्यास मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीने सोबत घेण्याचा निर्णय घेतला पक्षाच्या नेतृत्वाखाली किसान सभा महाराष्ट्रात १९४५ पासून अस्तित्वात होती पक्ष विभाजनानंतर १९६६-६७ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आपली वेगळी किसान सभा सुरू केली.

**'किसान सभा' :**

महाराष्ट्रात किसान सभेने १९६९ मध्ये स्वतंत्रपणे गती देण्याचा प्रयत्न केला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी व किसान सभेने पुढील मुद्दयावर चळवळी उभारल्या.

१. भूमिहीनांना मोफत जमीन मिळवून देणे.
२. सावकारी व जमीनदारी श्वसनातून शेतकरी शेतमजुरांना मुक्त करणे.
३. मक्तेदारी शोषणातून शेतक-यांना सोडवणे.
४. शेतीस पूरक उद्योगधंद्यांचा विकास करणे.
५. ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावणे.

किसान सभेने १९६९ ते २००० या काळात जंगल, जमिनी, पडीक जमिनी आणि सीलिंगच्या कायद्याखाली गेलेल्या वरकड जमिनी भूमिहीनांना गरीब शेतकऱ्यांना मिळाव्यात म्हणून महाराष्ट्रभर लढे उभारले. शेतमजुरांची वेतन नीचीत करणे शेतकऱ्यांवरील कर्ज माफ करणे करांचा बोजा हलका करणे पोलीस आणि जमीनदारांचा जुलूम आणि भ्रष्ट्राचार बंद करणे शेतीमालाचा किफायतशीर भाव मिळावा प्रकल्प पीडित आणि धरणग्रस्तांना वर होणा-या अन्याय, रोजगार हमी योजनेच्या कामावरील तक्रारी आणि भष्टाचार थांबवणे.

सहकारी संस्थात गरीब शेतक-यांवर होणारा अन्याय स्वस्त धान्य दुकानातून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. अनुसूचित जाती व जमाती नवबौद्ध समाजावर स्त्रियांवर होणा-या अन्याय तसेच दुष्काळ, पाणी, वीज, रस्ते इत्यादी अनेक प्रश्नावर स्वातंत्र्य व संयुक्त आंदोलने चळवळी उभारल्या. किसान संघटना व त्यांनी केलेल्या चळवळी यांना साठ सत्तर वर्षांचा इतिहास आहे पण स्वतंत्र अशा शेतकरी कामगारांच्या संघटना. शेतमजुरांच्या मागणीसाठीच्या चळवळी व स्वातंत्र्योत्तर काळात आढळून येतात. १९६७ नंतर साधारणपणे १९८२ पर्यंत महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष व संघटना आपापल्या क्षेत्रांमध्ये शेतकरी कामगार दलित आदिवासी भटके विमुक्त व स्त्रिया यांचे संघटन करीत होत्या त्यांच्या न्याय हक्क मागण्यासाठी लोकशाही हक्कासाठी चळवळी उभारित होत्या त्यांची शक्ती विखुरलेली होती त्यामुळे त्यांच्या शक्तीचा अपेक्षित परिणाम जाणवत नव्हता म्हणून १९८२ साली महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पंचायत महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (भा.क.प.) महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (मा.क.प.) श्रमिक संघटना भूमी सेना कष्टकरी संघटना श्रमजीवी संघटना जागृत कामकरी संघटना आदी संघटनांनी मिळून शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती स्थापन करण्यात आली.

१९८३-८४ या वर्षात राज्यव्यापी संप धरणे निदर्शने सत्याग्रह आदी मार्गांनी मिळवून समितीने शेतकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडली चळवळी उभारल्या गेल्या आंदोलने करण्यात आली या चळवळीत सुमारे पाच लाखांच्या वर शेतकरी कामगार चळवळीत आंदोलनात सहभागी झाले होते.

ISSN : 2348-7143
December-2018

१९८८ मध्ये डाव्या पक्षांच्या संघटनांनी एकत्र येउन शेतकरी शेतमजुरांच्या संयुक्त लड्याची हाक दिली यात शेतमजुरांच्या किमान वेतनात वाढ झाली पाहिजे शेतमालाला भाव मिळाला पाहिजे.

शेतमाल भावासाठी केंद्रीय कायदा करण्यात यावा इत्यादी मागण्या करण्यात आल्या होत्या या केंद्रीय समिती मध्ये ऑल इंडिया किसान सभा,ऑल इंडिया एग्रीकल्चर वर्कर्स युनियन, भारतीय शेतमजूर युनियन, अग्रगामी किसान सभा संयुक्त किसान सभा व कृषी मजदुर युनियन इत्यादी संघटनां सहभागी झाल्या होत्या.

दिल्लीमध्ये मार्च १९९० ला शेतकरी कामगारांच्या देशव्यापी मध्यवर्ती संघटनांच्यावतीने मेळावा झाला मेळाव्यात पुढीलप्रमाणे मागण्या मांडण्यात आल्या केरळच्या धर्तीवर कायदा करावा, रोजगारांच्या हक्क मूलभूत हक्क म्हणून भारतीय राज्यघटनेत नमूद करण्यात यावा इत्यादी मागण्या करण्यात आल्या २२ जुलै १९९० रोजी औरंगाबादला केंद्रीय शेतकरी कामगार कायदा परिषद घेण्यात आली.

अशा रीतीने शेतकरी कामगारांच्या मूलभूत हक्कासाठी देशभर आणि महाराष्ट्रात संघटना उभारण्याचे व संघटित शक्त निर्माण करण्याचे प्रयत्न होत राहिले या चळवळीने वेळोवेळी केलेल्या मागण्या पुढील प्रमाणे सांगता येईल.

१. रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क म्हणून भारतीय राज्यघटनेत नोंद झाली पाहिजेत.
२. शेतक-यांच्या किमान एका पिकाला पाण्याची सोय झाली पाहिजे.
३. कामगारांच्या किमान वेतनात वाढ झाली पाहिजे व महागाई निर्देशानुसार वाढ होत राहिली पाहिजे.
४. शेतकरी कामगारांसाठी केंद्रीय पातळीवर सक्षम असा कायदा करण्यात आला पाहिजे.
५. शेतीमालाचे भाव औद्योगिक वस्तूंच्या भावा प्रमाणे नियम करण्यात यावे.
६. जमीन व घर यांसह सर्व मालमत्तेत स्त्रियांचा समान अधिकार सात-बारावर स्त्रिपुरु षांची दोघांची नावे घातली गेली पाहिजेत.
७. बालकामगार पद्धत सक्तीने बंद करण्यात यावी व त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे.
८. कमाल व किमान उत्पन्नाचे प्रमाण निश्चित झाले पाहिजे.
९. सामाजिक सुरक्षेच्या सर्व प्रकारच्या योजना शेतमजुरांना मिळाल्या पाहिजेत.

१५ सप्टेंबर १९४७ पासून जंगल सत्याग्रहाला सुरुवात झाली हा सत्याग्रह पोलीस व रजाकार सिंधी पिउन धुंदीमध्ये गरीब शेतक-यांना कामगारांना विनाकारण त्रास देत असत म्हणून. आंदोलकांनी शिंदीची झाडे नष्ट करण्याचा कार्यक्रम हाती घेतला सिंदीच्या झाडांच्या लिलावातून महसुलापोटी मिळणारी वसूली बंद व्हावी हा आंदोलनाचा मुख्य उद्देश होता. स्वातंर्त्यपूर्व कालखंडामध्ये मराठवाड्याच्या काही भागांमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने निजामाच्या विरुद्ध जनआंदोलन ऊभे करून शेतकरी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न केले. यात काँ.आर डी देशपांडे, काँ.चंद्रगुप्त चौधरी, काँ वि.डी. देशपांडे, कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे, विठ्ठल देशपांडे, काशिनाथ शेट्टी आदी कार्यकर्ते मार्क्सवादी विचारांनी प्रभावित होउन निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध प्रखर लढा देत होते. हैदराबाद मधील मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामात त्यांनी महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. अशाप्रकारे अनेक संघटनांच्या माध्यमातून, पक्षाच्या माध्यमातून आंदोलने, चळवळी चालूच राहिल्या.

**संदर्भसूची**

**१.** करपे नारायण, मराठवाड्यातील शेतकरी चळवळ (१९४८-२०००), चिन्मय प्रकाशन औरंगाबाद जून २०१२.
**२.** परुळेकर गोदावरी, महाराष्ट्र किसान सभा संक्षिप्त आढावा, महाराष्ट्र किसान सभा प्रकाशन मुंबई १९८२.
**३.** फडणीस जगन, शेतकरी कामगार पक्षांचे राजकारण. अजब पुस्तकालय कोल्हापूर १९७८.
**४.** भारताचा कम्युनिस्ट पक्ष. कार्यक्रम (मार्क्सवादी) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांचे प्रकाशन मुंबई १९८१.
**५.** साठे विजय व इतर, आदिवासी शेतमजूर आणि अल्प व अत्यल्प भूधारक हक्क आणि परिपूर्ती. य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक जुलै २०१३.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
December-2018

# १९ व्या शतकातील कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी ब्रिटीश सरकारने केलेले कायदे

**डॉ. जगदिश व्यंकटराव भेलोंडे**
इतिहास विभाग प्रमुख,
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कन्नड जि. औरंगाबाद.
मो. क्र. - ९८६०१७१९९८
ई-मेल : jayeshbehelonde2008@gmail.com

भारतामध्ये राजकीय सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ब्रिटीशांनी व्यापारास प्रोत्साहन देण्याकरीता मुक्त व्यापारी धोरणाचा अवलंब केला. भारतीय कच्चा माल कमीत कमी मोबदल्यात परदेशात नेत व त्या मालाचे पक्या मालात रुपांतर करुन ते भारतीय बाजारपेठेत वस्तूच्या रुपाने विकत असत. भारत ही ब्रिटीशांची हक्काची व मोठी बाजारपेठ बनली होती. कारखान्यात तयार झालेल्या वस्तुने भारतीय बाजारपेठ काबीज केली. परिणामी येथील हस्तउद्योगाला मोठा फटका बसला. पुढे ईस्ट इंडीया कंपनीचा भारतीय व्यापारावरील एकाधीकारशाहीचा अधिकार १८१३ च्या चार्टर ॲक्टने संपुष्टात आला परिणामी भारतीय बाजारपेठ सर्वांसाठी खुली झाल्यामुळे भारतात कारखानदारीचा उदय झाला. विविध प्रकारच्या उद्योगाची उभारणी करण्यात आली.

**कामगार वर्गाचा उदय :**

कारखानदारीच्या उदयाबरोबरच कारखान्यात काम करणाऱ्या वर्गाचा उदय झाला. कृषीप्रधान असलेल्या भारतीय संस्कृतीमध्ये शेतीमध्ये काम करणारा शेतमजूर हा आधुनिक कारखान्यातील कामगार बनला. ब्रिटीशांच्या व्यापारी धोरणामुळे शेतकऱ्यांची अवस्था बीकट बनली होती. त्यामुळे शेतमजुर वर्ग व खेड्यातील गरजू व्यक्ती शहरातील कारखान्यांकडे आकर्षित होऊ लागले. कारखानदारीच्या उदयामुळे कामांची संधीच त्यांना प्राप्त झाली होती. भारतामध्ये शेतकरी-शेतमजूर वर्गाबरोबरच भांडवलदार व कामगार वर्गाची निर्मिती झाली.

ब्रिटीशांच्या भारतात कारखानदारी सुरु करण्याच्या धोरणामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला. कारखान्यात कमी मोबदल्यात जास्त वेळ काम करणारा कामगार त्यांना उपलब्ध झाला होता. ''ब्रिटीश कामगार दोन रुपये मजुरी मागायचा तर येथील भिकेला लागलेला शेतकरी म्हणायचा काहीही पगार द्या, आठ आणे तर आठ आणे.''[१] त्यामुळे कारखानदारीस मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. जास्तीत जास्त नफा मिळवण्याच्या उद्देशाने कारखानदारांकडून कामगारांच्या शोषणास सुरुवात झाली. भांडवलदाराकडून होणाऱ्या शोषणा विषयीची जाणिव कमगार वर्गात होताच कामगारांनी शोषणमुक्त जीवन जगण्यासाठी कारखानदारांच्या विरोधात संघर्ष उभारला.

भारतात कमी खर्चात तयार झालेला माल लँकेशायर व मॅचेस्टर येथील मालाशी स्पर्धा करु लागला. येथील कंपन्यांनी भारतातील कामगारांचे शोषण थांबवावे यासाठी प्रयत्न चालविले. तेव्हा ब्रिटीश सरकारने भारतातील कामगारांचे होणाऱ्या शोषणा विषयी चौकशी करण्याचे ठरवले. सरकारकडून अशा प्रकारची कृती होण्या अगोदरच सरकारला विरोध दर्शवण्यासाठी 'मुंबईतील गिरणी मालकांनी एकत्र येऊन फेब्रुवारी १८७५ मध्ये बॉम्बे मिल ऑनर्स असोसिएशन नावाची संघटना स्थापन केली. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, गिरण्याच्या कारभारात व्यर्थ हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या मागणिला धुडकावून लावणे आणि गिरणी मालकांचे हित जपण्यासाठी संघटीत शक्ती निर्माण करणे.''[२] आपल्या विरोधात सरकारकडून चौकशी होणार व कार्यवाही होणार या भितीने सरकारच्या विरोधात आपले हिसंबंध जोपासण्यासाठी गिरणी कामगारांनी ही संघटना निर्माण केली. परुतु

ISSN : 2348-7143
December-2018

लँकेशायर व मॅचेस्टर येथील कारखानदारांनी सरकारवर सातत्याने दबाव आणला व या दबावापुढे ब्रिटीश सरकार नमले आणि भारतातील कामगारांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी पहिले फॅक्टरी कमिशन नेमले.

**पहिले फॅक्ट्री कमीशन :**

भारतातील कामगारांच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी ब्रिटीश सरकारने २३ मार्च १८७५ मध्ये पहिले फॅक्ट्री कमीशन नेमले. या कमीशनमध्ये ''अध्यक्ष अर्बुथनॅाट हे सोडले तर अन्य सभासद मंगळदास नथुभाई, दिनशी पेटिंट, मोरारची गोकूळदास हे गिरणी मालकच होते. हे सर्वजण फेब्रुवारी १८७५ मध्ये स्थापन झालेल्या मिल ऑनर्स असोसिएशनचे नेते होते.''[३] तेव्हा कामगारांच्या संदर्भात या कमीशन कडून सुधारणा सूचवणे हे अनपेक्षितच होते. कारण या कमिशन मध्ये सदस्य असलेल्या तिन्ही गिरणी मालकांचा कामगारांची स्थिती जशास तशी ठेवण्यावरच भर होता. त्यामुळे येथील कामगारांच्या स्थितीचे वास्तव चित्रण या कमिशन कडून मांडले जाणार नव्हतेच. कामगारांच्या समस्येत सुधारणा व्हावी व त्यासाठी कायदा व्हावा याच्या विरोधात असलेल्या समितीने कामगारांविषयी माहिती देतांना सांगितले की, ''नव्वद टक्के कामगार काम चालू असतांनाच जेवून घेतात. काहीजण दिवसातून तीन-चार वेळा खातात त्यांच्यावर बंधन नाही. त्यांना जेवणासाठी बाहेर जायचे असते तेव्हा मशीनवर पर्यायी माणूस असतो म्हणून गिरण्यांमध्ये जादा माणसे भरलेली असतात.''[४] कंपनीमध्ये अधिकचे कामगार भरलेले असतात म्हणजे पर्यायी कामगार उपलब्ध असतात त्यामुळे कामगार विधेयक सुधारणा करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारची भूमिका समितीने घेतली.

गिरणी कामगारांकडून कामगारांचे होणाऱ्या शोषणा विषयी फॅक्ट्री कमीशनने विरोधी भूमिका घेतल्यामुळे ज्यांचे शोषण होत होते अशा कामगार वर्गात जागृती होणे आवश्यक होते. त्यांच्या मध्ये संघटन होणे आवश्यक होते. यादृष्टीने नारायण मेघाजी लोखंडे यांनी प्रयत्न चालवले. त्यांच्या प्रयत्नातूनच कामगारांची बॉम्बे मिल हॅडस असोसिएशन या नावाने पहिली संघटना इ.स. १८८० मध्ये स्थापन झाली.

**पहिला फॅक्ट्री ॲक्ट :**

कामगारांची संघटना स्थापन होण्याअगोदरच कामगारांच्या प्रश्नांविषयी शासकीय पातळीपर्यंत वाचा फोडण्याचा प्रयत्न सोराबजी शापूरजी बेंगाली यांनी केला. १८७८ मध्ये त्यांनी फॅक्ट्री ॲक्टचा एक प्रस्ताव मुंबई सरकारला सादर केला. 'ज्यामध्ये ६ दिवसाचा आठवडा, ८ वर्षावरीलच मुलांना कामावर घ्यावे व त्यांना ९ तासच काम द्यावे. स्त्रियांना १० तर पुरुषांना ११ तास एवढाच वेळ असावा इत्यादी कलमे त्यामध्ये होती.'[५] कामगारांचे कामाचे तास व बालकामगार यांचे वय याविषयी निश्चितता असावी म्हणजे त्यांच्या होणाऱ्या शोषणास आळा बसेल असे बेंगाली यांना वाटत होते. श्रीमंत वर्गातील बेंगाली यांना कामगारांच्या विषयी असलेल्या सहानुभूतीमुळेच त्यांनी मुंबई सरकारने या प्रस्तावाकडे दुर्लक्ष केले असता इंग्लंडला जाऊन कामगारांच्या प्रश्नास दि. टाईम्स पत्रातुन वाचा फोडली. तेव्हा भारतातील कामगारांच्या समस्येविषयी कायदा करण्यासाठी ब्रिटीश सरकारवर दबाव वाढला. मॅचेस्टर व लँकेशायर येथील कारखानदारांनी अगोदरच सरकारवर भारतातील कामगारांच्या समस्याविषयी कायदा करावा यासाठी दबाव आणलेलाच होता. शिवाय भारतात कामगार विषयक संघटनाही उदयास आली होती. परिणामी भारत सरकारने पहिला फॅक्ट्री ॲक्ट १५ मार्च १८८१ रोजी पारित केला. त्यानुसार ''७ वर्षाच्या आतील मुलांस कामावर लावू नये. ७ ते १२ वर्षाच्या मुलांचे कामाचे तास ९ असावे व एक तास विश्रांती द्यावी आणि दरमहा चार दिवस सुट्टी अशा तरतुदी करण्यात आल्या.''[६] कामगार विषयक पहिला कायदा करण्यामध्ये सोराबजी बेंगाली यांचे मोठे योगदान राहिलेले आहे. कामगार व कामगार संघटनेच्या चळवळीचे हे फलीत होते. हा कायदा पारित झाल्यामुळे कामगारांना कायदेशीर हक्क मिळाला.

**फॅक्ट्री कमिशन व ॲक्ट :**

ब्रिटीश सरकारने कामगारांच्या मागण्यांविषयी मत आजमावण्यासाठी लवकरच १८८४ मध्ये डब्ल्यू. बी. मुलक यांच्या अध्यक्षेतेखाली फॅक्ट्री कमिशन नियुक्त केले. या कमिशन समोर कामगारांच्या विविध मागण्यांचे निवेदन देत असताना नारायण मेघाजी लोखंडे यांनी या 'निवेदनावर साडेपाच हजार कामगारांच्या सह्या घेतल्या होत्या.'[७] कामगारांकडून होणाऱ्या मागण्यांचा अहवाल मूलक यांनी जेंव्हा सादर केला तेंव्हा कारखानदारांकडून कामगारांच्या होणाऱ्या शोषणाविरुध्द तिव्र प्रतिक्रीया उमटल्या. भारतातच नाही तर इंग्लंड मधूनही भारतीय कामगारांच्या प्रश्नाविषयी सहानुभूती व्यक्त केली जाऊ लागली. इंग्लंडमधील कारखानदारांकडून मिळणाऱ्या सहानुभूतीमागे त्यांचा हेतू निस्वार्थ नव्हताच. कामगारांच्या मागण्यामागे असलेल्या सहानुभूतीमागे 'हेतू काहीही असले तरी येथील कामगारांची स्थिती सुधारण्याची व त्यांना संरक्षण मिळण्याची आवश्यकता होती.'[८] कामगारांमध्ये आपल्या हक्का विषयी झालेल्या जागृतीमुळे कामगारांमध्ये झालेले संघटन हे महत्त्वपूर्ण ठरते. या संघटनाच्या बळावरच कामगारांच्या समस्यांना वाचा फुटली. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या हाजारोंच्या संख्येने सभा होऊ लागल्या. त्यामुळे कारखानदारांवर दबाव वाढू लागला. दबावामुळेच कामगारांना रविवारची सुट्टी देण्यात येऊ लागली.

कामगार चळवळ व कामगार संघटनांकडून मांडण्यात आलेल्या मागण्याची दखल घेऊन सरकारने कामगारांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी एम.डी. हे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वकष फॅक्ट्री कमीशन नेमले होते. ज्यामध्ये सोराबजी बेंगाली व नारायण मेघाजी लोखंडे यांचाही समावेश होता. या कमिशनने गिरणी मालक व कामगारांचे मत जाणून घेतले. लोखंडे यांनी कामगारांच्या विविध प्रश्ना बरोबरच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण करुन कामगारांना इजा होणार नाही याची काळजी कारखानदारांनी घ्यावी असे मत मांडले. या कमिशनने जो अहवाल सादर केला त्यानुसार दि. १ जानेवारी १८९२ पासून प्रत्यक्ष कायदा अंमलात आला. या कायद्यानुसार "बालकामगारांची वयोमर्यादा नऊ होती ती चौदा झाली. मुलांसाठी सहा तसांचा दिवस ठरला रविवार हा सर्वासाठी सुट्टीचा दिवस होऊन रोज दुपारी अर्ध्या तासाची विश्रांती देण्याची प्रथा सुरु झाली. स्त्रियांना अकरा तासांपेक्षा अधिक काम देऊ नये व दुपारी दीड तासांची विश्रांती द्यावी असा निर्णय झाला. पुरुष कामगारांचे कामाचे तास मात्र कमी झाले नाहीत."[९] असे असले तरी कामगारांच्या हिताच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वपूर्ण ठरतो. कारखानदारांकडून होणाऱ्या शोषणाच्या विरोधात कामगारांना मिळालेला हा १९ व्या शतकातील सर्वात मोठा विजय होता.

भारतातून जास्तीत जास्त नफा मिळवण्याच्या ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे कारखानदारीच्या उदयाबरोबरच कामगारांचाही उदय झाला. ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीमध्ये भरडल्या गेलेल्या लोकांसाठी काम करायला मिळणे ही संधीच वाटल्यास नवल नव्हते. त्यामुळे ते हक्क व अधिकारापासून खूप दूर होते. भारतातील कामगारांवर गिरणी मालकांकडून अन्याय होतो, त्यांचे शोषण केल्या जाते याची जाणिव पहिल्यांदा परदेशातील गिरणी मालकांना व्हावी यावरुन भारतीयांची आर्थिक स्थिती स्पष्ट होते. कमी मोबदल्यात जास्त वेळ काम करण्याची त्यांची तयारी त्यांच्या आर्थिक दुर्बलतेचेच प्रतिक होते. आपल्या हक्काविषयी असलेला अभाव त्यामागे दिसून येतो. पण त्यांना याची जाणीव होताच त्यांच्यात संघटन निर्माण झाले आणि आपल्या हक्कासाठी त्यांनी संघर्ष चालवला. परिणामी सरकारला कामगारांच्या हिताच्या दृष्टीने पाऊल उचलने अनिवार्य ठरले. त्यामुळेच सरकारने वारंवार कामगारांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी कमिशने नेमले व त्यानुसार कायदेही केले.

**संदर्भ :**

१. डांगे श्रीपाद अमृत- भारत स्वातंत्र्यापूर्वी व नंतर - अभिनव प्रकाशन, मुंबई - १९७२ पृ. ०७
२. कदम मनोहर- नारायण मेघाजी लोखंडे-अक्षर प्रकाशन, मुंबई- प्रथमावृत्ती १९९५, पृ.७१-७२

३. फडके य. दी.- विसाव्या शतकातील महाराष्ट्र-खंड १- श्री विद्या प्रकाशन, पुणे-प्रथमावृत्ती १९८९ पृ. ०९
४. कदम मनोहर- नारायण मेघाजी लोखंडे - उपरोक्त पृ. ६५
५. कित्ता - पृ. ७३
६. कित्ता - पृ. ७७
७. फडके य.दी. - विसाव्या शतकातील महाराष्ट्र - खंड १ - उपरोक्त पृ. १०
८. तळवलकर गोविंद - सत्तांतर - १९४७ - खंड ३- मौज प्रकाशन गृह, मुंबई - प्रथमावृत्ती १९९७ पृ. ५८
९. कित्ता - पृ. ५८

# शरद जोशी यांच्या शेती विषयक लढ्यांचा (कापूस, कांदा, ऊस भाव विषयी लढ्यांचा) आढावा

**प्रा.डॉ.बोचरे जे. एम.**
इतिहास विभाग प्रमुख
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय
पाथरी जि. परभणी
मो.नं. ७४४८११४७२३
bocharejm@gmail.com

**सारांश :-**

*शरद जोशी यांनी स्थापन केलेली शेतकरी संघटना जिची स्थापना पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात इ.स. १९७८ मध्ये झाली. असंघटीत असलेल्या शेतकऱ्यांना संघटीत करून शेतकरी संघटना दबाव गट म्हणून कार्यरत केली व या संघटनेमुळे काही अंशी शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले परंतू शरद जोशींच्या पुढील काळात त्यांनी राजकारणात प्रवेश केला ज्यामुळे शेतकरी संघटना जी दबाव गट म्हणून अस्तित्वात होती ती संपुष्टात आली.*

**Introduction :**

शरद जोशी यांच्या शेतकरी आंदोलनाचे दुरगामी परीणाम पहायला मिळाले ते म्हणजे कांद्याचा भाव, उसाचा भाव, कापसाचा भाव याबाबत महाराष्ट्र सरकारने या पिकांचे भाव वाढविले. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना रास्त भाव मिळाला हे आंदोलनाचे फलित होय. शेतकरी संघटनेचे आंदोलन शांततेच्या मार्गाने महात्मा गांधींनी काढून दिलेल्या तत्वज्ञानाप्रमाणे सत्याग्रह, अहिंसा या हत्याराचा वापर करून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी झालेले आंदोलन यशस्वी ठरले हे शरद जोशींच्या शेतकरी आंदोलनाच्या यशाचे गमक होय.

**उद्देश :-**

शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनातून निकाली निघालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वाचा फोडलेल्या प्रश्नाचा अभ्यास करणे. विशेष संदर्भ कापूस, ऊस, कांदा तसेच कर्जमुक्ती.

**व्याप्ती / मर्यादा :-**

शरद जोशी यांच्या शेतकरी आंदोलनाचा प्रस्तूत पेपरमध्ये विचार केला. शरद जोशी यांनी अनेक आंदोलन केले व या आंदोलनाला यश मिळाले. परंतु सदरील पेपरमध्ये शरद जोशींच्या कापूस, ऊस, कांदा भाववाढीसाठी केलेल्या आंदोलनाचा उल्लेख आहे.

**निष्कर्ष :-**

शरद जोशींच्या शेतकरी आंदोलनातून शेतकऱ्यांचा आंदोलनाला ऊस, कापूस, कांदा जे आंदोलन शांततेच्या मार्गाने मार्गक्रमण करत होते. याचे फलित महाराष्ट्र शासनाने कांदा हमी भावासाठी कांद्याची आंतरराष्ट्रीय विक्री या प्रश्नावर लक्ष वेधल्या गेले व महाराष्ट्र शासनाने कांद्यासाठी नाफेड योजना, कापूस भावासाठी कापूस एकाधिकार शाही या योजना वापरल्या.

**संशोधन पध्दती :-**

या शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी द्वितीयक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात येऊन संदर्भ पध्दती आणि ऐतिहासिक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शरद जोशींच्या शेतकरी संघटनेच्या चळवळीच्या इतिहासाचा मागोवा घेत असतांना विविध कापूस, ऊस, कांदा यासाठी झालेल्या आंदोलनाची माहिती देण्यात आलेली आहे.

ISSN : 2348-7143
December-2018

भारत सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळीत झाली. त्याचे दुष्परिणाम या शेतकऱ्यांच्या जिवनावर झाले. आर्थिक चळवळीकरीता ग्रामीण भागातील शेतकरी आंदोलन सहभागी झाली. त्यात त्यांना थोड्या फार प्रमाणात न्याय मिळाला.

**प्रस्तावना :-**

शेतकऱ्यांचा पहिला राजा म्हणून बळीराजा यांची ओळख शेतकऱ्यांना आहे. शेतकरी बळीराजाचा स्वतःची देवता मानत असत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या लेखणीतून शेतकऱ्यांच्या अवस्थेविषयी व्यथा मांडल्या होत्या. त्यांच्या मते शेतकऱ्यांत राज्य येण्यासाठी इडा-पिडा टळो, बळींचे राज्य येवो असे म्हणत. छत्रपती शिवाजी राजांनी रयतेच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष वेधले ज्यामुळे मध्ययुगीन भारतात रयतेचा राजा म्हणून शिवाजी महाराजांनाी ओळखल्या जाते. आज महाराष्ट्रात महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांची कर्जमुक्ती योजना शिवछत्रपती शेतकरी सन्मान योजना या नावाने राबविली. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली. शिवाजी राजाच्या नावाने हा शेतकऱ्यांचा सन्मान केला.

महाराष्ट्रात १९८० ला कांद्याचे भाव अत्यंत कमी झाले. ज्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली त्यावेळी शेतकरी संघटनेने कांद्याला भाव मिळवून देण्यासाठी लढा दिला. या लढयाचे प्रमुख शरद जोशी हे होते. लढयाचा परीणाम अल्पावधीतच जाणवला. महाराष्ट्र शासनाने कांदा खरेदी-विक्रीसाठी नाफेड या सरकारी यंत्रणेची सुरूवात केली व कांद्याला योग्य भाव देण्यात आला. हा लढा देत असतांना शेतकरी संघटनेने रास्ता रोको, रेल्वे रोको ही आंदोलने केली. ज्यामुळे महाराष्ट्र शासनाने या आंदोलनाची दखल घेतली.

**ऊस आंदोलन –**

शेतकऱ्यांचे प्रमुख पिक असलेले ऊस. या ऊसाला योग्य मोबदला मिळत नव्हता. पण शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली ऊस आंदोलनाची सुरूवात झाली. नाशिक जिल्हयातील निफाड तालुक्यात या आंदोलनाची सुरूवात झाली. आंदोलन तिव्र झाल्याने पुढे या ऊस आंदोलनाला हिंसक वळण लागले. खेटवाडी या ठिकाणी शेतकरी आंदोलनावर पोलिसांनी लाठीहल्ला केला या हल्ल्यात दोन शेतकरी मृत्यू पावले. या आंदोलनामुळे शरद जोशींना तुरूंगात टाकण्यात आले. शरद जोशींनी तुरूंगातच उपोषण चालू केल्याने महाराष्ट्र शासनाने तातडीने ऊस आंदोलनावर निर्णय घेतला व ऊसाला ३०० रु प्रतिटन हा भाव देण्यात आला. हे यश शरद जोशींच्या नेतृत्वाखाली ऊस आंदोलनाचेच होते.

**कापूस आंदोलन –**

शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा व विदर्भात कापसाला योग्य भाव मिळवण्यासाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्ते रस्तयावर उतरल्याने व या आंदोलनाची व्याप्ती मराठवाडव विदर्भात या आंदोलनाचे लोन पसरले. याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली व कापसाचे भाव वाढले व कापसासाठी कापूस एकाधिकार खरेदी योजना आमलात आणली.

शरद जोशी यांनी स्थापन केलेल्या शेतकरी संघटनेने आपले आंदोलन महात्मा गांधींनी ज्या मार्गाचा अवलंब करत ते हत्यार म्हणजे सत्याग्रह, अहिंसा या मार्गाने शेतकरी संघटनेनेही आपले आंदोलने केली व याची दखल महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी घेतली. कापूस, ऊस व कांदा यांचा भाव काही प्रमाणात वाढला. शेतकरी संघटनेला या वाढीचे श्रेय देण्यात येते. महाराष्ट्र राज्यात तसेच देशात बहुसंख्येने असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर असंघटीत असलेल्या शेतकऱ्यांना संघटीत करून संघर्ष करण्याचे बळ व त्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देऊन शेतकऱ्यांनी आत्मसन्मान मिळवला.

महाराष्ट्र या राज्यात शरद जोशी यांनी श्रीमंत ग्रामीण आणि मजूर या जनतेला संघटीत केले व शेतकरी संघटना स्थापण केली. त्याचा वापर दबाव गट म्हणून निर्माण करण्यात आला. हा दबाव गट शांततेच्या मार्गाने शेतकऱ्यांचे आंदोलन चालवले. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून अत्यंत दारीद्र अवस्थेत जिवन जगणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव देण्याचे कार्य केले. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने कर्जमुक्ती केली हे यश शरद जोशींच्या शेतकरी संघटनेचे होय. शेतीतील अनेक प्रश्नावर चर्चा मंथन झाले.

शरद जोशींच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शेतीशी निगडीत असलेल्या शेतकरी महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी महिलांना संघटीत करून त्यांचे प्रबोधन करण्याचे काम शेतकरी महिला अधिवेशन घेऊन करण्यात आले. ९ व १० नोव्हे. १९८६ ला चांदवड या ठिकाणी महिला अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनात मुलीचे शिक्षण, पाणीप्रश्न, महिलांना रोजगार हमीची कामे, महिलांचे वेतनाबाबतीत चर्चाही करण्यात आली. यात मुख्य हेतू म्हणजे शेतकरी महिलांना संघटीत करून शेतकरी संघटनेची ताकद वाढविणे हा होता. ज्यामुळे सरकारवर मोठा दबावगट निर्माण होईल हा हेतू शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचा होता.

**सारांश :-**

शरद जोशींच्या नेतृत्वाखाली सुरूवातीच्या काळात शेतकरी संघटना दबावगट म्हणून कार्य करत होती. या दबाव गटाचा परीणाम महाराष्ट्र शासनाने कांद्यासाठी नाफेड व कापसासाठी कापूस एकाधिकार शाही या सरकारी यंत्रणेतून शेतकऱ्यांना न्याय दिला. संघटीत शक्तीचा उपयोग कर्जमुक्तीसाठी होऊ शकला. परंतू शरद जोशींनी पुढे राजकारणात प्रवेश केल्याने शेतकरी संघटनेचा दबावगट संपुष्टात आला व या संघटनेला राजकीय स्वरुप आले.

**संदर्भग्रंथ :-**

१. शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख - शरद जोशी
२. भारतातील सामाजिक चळवळी – डॉ. श्रीकांत गायकवाड, प्रा. रामकिसन मांजरे
३. खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने - शरद जोशी
४. भारतातील सामाजिक चळवळी – घनशाम शहा अनुवाद प्राची चिकटे

## शेतकरी चळवळ
## शरद जोशी ग्रामीण शेतकरी महिला सबलीकरणातील योगदान

**डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख**
शिवाजी महाविद्यालय, कन्नड जि. औरंगाबाद
मोबा.नं.९४०३६३७४१३.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही धक्का लावू नका असा आदेश सरदार सैनिकांना स्वराज्यात दिला होता. पूर्वी भारतामध्ये सरंजामशाही राजे-राजवाडे आणि संस्थानिकांची सत्ता होती. त्यापैकी काही राजे व संस्थानिक यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. शेती व शेतकऱ्यामध्ये सुधारणा केल्या. धरणे बांधले, कालवे तयार केले. या सगळया कामामध्ये शेतकऱ्यांना राज्यांच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागे. त्याकाळी आंदोलन वगैरे शक्य नव्हते. भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर शेतीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. भारतात ६४ टक्के शेतकरी अल्पभुधारक आहेत. त्यामुळे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेतील एक मुलभूत घटक आहे. स्वातंत्र्यपुर्व काळापासून शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सोडविण्यासाठी भारतीय समाजसुधारकांनी आपले विचार मांडले.

अन्नधान्याच्या राशी जरी शेतकऱ्यांच्या घरासमोर पडल्या तरी अस्थिर बाजारभावामुळे त्यांच्यावर अन्याय झाला. शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचे रहस्य यामध्ये आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चावर रास्त भाव मिळवा. शरद जोशींच्या हाकेला लाखो मराठी शेतकऱ्यांनी साथ दिली. "स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली तीन दशके महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारे, वेळप्रसंगी शेतकऱ्यांच्या अस्तित्वाच्या लढाईसाठी रस्त्यावर उतरणारे एकमुखी राष्ट्रीय नेतृत्व नव्हते. १९८० नंतर मात्र शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळावा यासाठी शरद जोशी यांनी ९ ऑगस्ट रोजी चाकण येथे शेतकरी संघटनेची स्थापना झाली."[1] फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचा उदय झाला.

शेतकऱ्यांना शरद जोशी यांनी मूलतंत्र दिला. 'भीक नको, हवे घामाचे दाम', 'सरकारचे धोरण, शेतकऱ्यांचे मरण', जास्त नको,रास्त भाव द्या.' शेतकरी तितका एकेक, शरद जोशी सर्वांना एक', 'इंडिया व भारत विभागणी', 'हातात रुमण एकच मागणं', 'शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव दिला पाहिजे'. कांदा, ऊस, तंबाखु, दुध, भात, कापुस, हे आंदोलन शेतकरी संघटनेने केले. उपोषणे, मेळावे, शिबीरे, घेवून अनेक मागण्या शरद जोशी यांनी सरकारकडून मान्य करुन घेतल्या. १९८० ते १९९० पर्यंत चळवळीचा सुवर्णकाळ होता. प्रत्येक आंदोलनातुन गावपातळीवर शेतकरी संघटित करुन रस्त्यावर उतरला होता. या लढाईत अनेक शेतकरी तरुण बलिदान झाले. शेतकरी आंदोलनात शरद जोशींच्या नेतृत्वाखाली शासनस्तरावर विशेष प्रभाव पडला. शेतकरी संघटना दबाव गटाची भुमिका पार पाडण्यात यशस्वी झाली.

"१९८० मध्ये शेतकऱ्यांचा नेता होणे फार अवघड होते. सत्तेत असलेल्या पक्ष तर शेतकरी विरोधीच पण सर्व विरोधी पक्ष ही शेतकरी विरोधी होते. याबद्दल सर्व जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती कमीत कमी असल्या पाहिजे. याबद्दल सर्व राजकीय पक्ष आणि विचारवंतामध्ये एकमत होते. जीवनावश्यक वस्तु म्हणजे शेतीमालच त्यांच्या किंमती पाडण्यासाठी सरकार जे काही करेल ते योग्यच समजले जाई. अशा रीतीने पुर्ण प्रस्थापित व्यवस्था एका बाजूला त्याच्यांशी पंगा घेवून 'शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे'. ही मागणी घेऊन शरद जोशी यांनी समर्थ शेतकरी आंदोलन उभे केल".[२] शरद जोशींना मनस्वी विरोध करणाऱ्या लोकांना

ISSN : 2348-7143
December-2018

शेतकरी आंदोलनाचे नवल वाटत असे. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांवर त्यांचे अभ्यासपूर्ण विवेचन अर्थशास्त्राचे प्राध्यापक, कृषितंज्ञाना विचार करावयास लावणारे होते. भारतीय दारिद्रयांचा प्रश्न कोरडवाहू शेतीशी निगडीत आहे. शेतीमालाला अपुऱ्या किंमती हेच शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचे मुळ आहे. पीक कोणतेही असो शेतकऱ्यांचे शोषण आहे.

खरं तर शेतीचे प्रश्न आणि शेतकऱ्यांचे मोर्चे नवीन नाहीत. लोकसंख्येचा निम्मा हिस्सा शेतीच्या कामात सर्वाधिक सामील असलेल्या पण शेतकरी म्हणून ज्यांची दखल घेतली नाही अशा **महिला शेतकरी** वर्गाचे प्रश्न त्याहून निराळे होते. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव त्यात शेतकऱ्यांच्या त्यांच्या मजूरीचे आणि शेतीसाठी वापरलेल्या प्राण्यांच्या कष्टांचे दाम समाविष्ठ असले पाहिजे. शेतकऱ्याची पत्नी, मुले, त्या शेतीत राबत असतील तर त्याच्याही कष्टाचे दाम त्यात अंतर्भुत असले पाहिजे. अशी नवीन मांडणी केली. भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचा इतिहास लिहिताना पांढरपेशा शहरी नोकरदार महिलांपुरती मर्यादित असलेली ही चळवळ ग्रामीण भागात कष्टकरी, शेतकरी महिलांपर्यंत नेऊन तिचा परीघ किती तरी पटींने वाढवण्याचे काम प्रथम शरद जोशींनी केले. शेतकरी चळवळीत महिला सहभाग वाढावा म्हणून निरनिराळी पाऊले उचलण्यात आली. त्यातील एक म्हणजे पुरुष कार्यकर्त्यांना आदेश देण्यात आले की, आपल्या बायकोला शेतकरी संघटनेच्या बैठकीत चर्चासाठी आणले पाहिजे. ग्रामीण महिलांचे शिक्षणाचे, मजूरीचे, सामाजिक प्रश्न सोडवायचे असतील तर त्यांचे संघटनेत सहभाग वाढवला पाहिजे. ज्यावेळी शेतकरी संघटनेत स्त्रिया बोलत्या झाल्या. त्यावेळी प्रामुख्याने एकच मुद्दा समोर आला की स्त्रिया म्हणत असत, साहेब आम्हाला सरकारी योजना नाही दिल्या तरी चालतील पण दारुबंदी करा. तेवढी एकच गोष्ट केली तर महिलांचे जीवन सुखी होईल. शेतकरी संघटनेने सरकारी दारु दुकाने बंदीचे आंदोलन हाती घेतले.

''शेतकरी आंदोलनात वाढता सहभाग लक्षात घेऊन महिलांच्या प्रश्नांचा अभ्यासाच्या दृष्टीने एक विषय विभाग निर्माण करण्यात आला त्याच्या प्रमुखपदी सौ. मंगला आहेर यांची नियुक्ती करण्यात आली.''[३] शेतकऱ्यांपेक्षा शेतकरी महिलांचे प्रश्न भिन्न स्वरुपाचे आहेत. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ते प्रश्न प्रभावीपणे मांडता येणार नाही. म्हणून शेतकरी संटनेनेने शेतकरी महिलांचा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आला. त्यामार्फत महिलांच्या प्रश्नाचा अभ्यास करणे. स्त्रियांना हक्काची जाणीव करुन देणे. अन्याय,अत्याचार व शोषणापासून मुक्ततेसाठी प्रयत्न केला. विविध प्रश्नांवर शेतकरी महिलांचे प्रश्न शेतकरी महिला विभाग सोडविण्याचा प्रयत्न करीत असत.

''महिला आघाडीच्या नांदेड १९८९, अमरावती नोव्हेंबर १९८९, औरंगाबाद १९९३ येथे भरलेल्या अधिवेशना दारु दुकान बंदी बाबत ठराव करण्यात आले होते. ग्रामीण भागात दारु दुकाने म्हणजे गुन्हेगाराचे आड्डे आहेत. हे अड्डे स्त्रियांचे जीवन उध्दवस्त करणारी केंद्रे बनली आहेत. ही केंद्रे बंद झाल्याशिवाय शेतकरी स्त्रियांचे जीवन सुस्थितीत होणार नाही. संघटनेने दारु दुकाने बंद करण्याची विनंती केली''.[४] ज्या ग्रामपंचायत दारु दुकान बंदीचा ठराव करत नाहीत. अशा गावातील शेतकरी महिला एकत्र येऊन दारु दुकानाला कुलूप लावणे, दारु नष्ट करणे इत्यादी उपक्रम शेतकरी महिला आघाडी करीत असत. ग्रामीण महिलावर जो दारु पासून अत्याचार, अन्याय, शोषण सहन करीत होत्या त्यापासून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला आहे. या दारुमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे संसार उध्दवस्त होत होते. त्यापासून वाचविण्याचे काम शरद जोशींनी केल हे मान्य करावे लागेल.

चांदवडला महिला अधिवेशनात शरद जोशी ठराव केले की,स्वतःच्या मालमता शेतकऱ्याने जमीन, घर बायकोचे नावे करावे. अशा प्रकारे लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम शेतकरी संघटनेने हाती घेतला व जळल्यास दोन लाख शेतकऱ्यांनी आपली काही जमीन घरची मालमत्ता बायकोच्या नावे केली. ''२३ सप्टेंबर १९९० रोजी शेतकरी

संघटनेच्या कार्यकारणीने निर्णय घेऊन आदेश दिला की, प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या घरच्या लक्ष्मीला आपल्या मालमत्तेत हिस्सा दिला पाहिजे''.[५] ग्रामीण शेतकरी महिलांचा मालमत्ता विषयक हक्काचा प्रश्न समाजापुढे आला. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने लक्ष्मी मुक्तीचे परिपत्रक काढले. शेतकरी संघटनेने राजकीय कार्यक्रम महिलांना दिला. स्थानिक स्वराज्य मध्ये १०० टक्के महिला सर्व जग लढवायचा. त्यामुळे ग्रामीण महिलांचे राजकीय जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पंचायतराज मध्ये महिलांचा सहभाग वाढविणे व महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे. स्थानिक संस्थांचा धोरणात्मक निर्णयात आरोग्य, पाणी, स्वच्छता, इंधन इत्यादी प्रश्न शेतकरी महिलांचा अग्रक्रम दिला पाहिजे. हे संघटनेने ठरविले. हेच प्रश्न स्त्रियांच्या हातात सत्ता गेली तर त्या सहज सोडवू शकतील. – ''महाराष्ट्रात जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणुका दिनांक २५ फेब्रुवारी १९९२ रोजी झाल्या. या निवडणुकीत 'शेतकरी महिला आघाडीने सोळा जिल्हयातून ४०० जागा लढविल्या तर उर्वरित जागेवर शेतकरी संघटनेने ४०० अपक्ष उमेदवार उभे केले''.[६] स्थानिक निवडणुकीत एवढया मोठया संख्याने महिला सहभागी होणे ही आश्चर्यकारक घटना होती. या निवडणूकीत महिला आघाडीच्या माध्यमातून स्त्रिया प्रश्नांची चर्चा झाली. नंतर केंद्र सरकारने पंतप्रधान नरसिंहराव यांनी घटना दुरुस्ती ७३ व ७४ वी करुन ३३ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आरक्षण महिलांचे दिले ते आता ५० टक्के मनमोहन सिंग यांनी केले आहे. सरकारवर स्त्रियांच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी शरद जोशी यांनी भाग पाडले. ही जमेची शेतकरी संघटनेची बाजू होती. स्त्रि पुरुष समान आहेत. हे ही लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम देऊन शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी सांगितले. शरद जोशी यांनी चांदवडच्या महिला अधिवेशनात राजकीय, सामाजिक, आर्थिक महिलांना हक्क दिला. नंतर देशातील सर्व पक्षांनी या कार्यक्रमाचा अंगिकार केलेला दिसून येतो. शरद जोशींनी महिला सबलीकरणासाठी केलेले प्रयत्न कोणीच विसरु शकत नाही.

**संदर्भ :-**

१. ॲड. सा.मा. पंडित, शेतकरी संघटना पोरखी, पुण्यनगरी, रविवार १३ डिसेंबर २०१५, पेज-३
२. अजित नरदे, लढवय्या शेतकरी, लोकमत, रविवार १३ डिसेंबर २०१५ पेज-७
३. म्हात्रे सुरेशचंद्र, शेतकरी संघटना, महिला अधिवेशन विशेषांक अमरावती, नोव्हेंबर -१९८९ पृ-१३
४. म्हात्रे सुरेशचंद्र, शेतकरी संघटक, वर्ष १० वे, अंक १३ वा, २१ नोव्हेंबर १९९३ संयुक्त अधिवेशन विशेषांक पृ-१२
५. जोशी शरद, लक्ष्मीमुक्तीचे शेतकरी आंदोलनातील महत्त्व शेतकरी संघटक, वर्ष ७ वे अंक १७ डिसेंबर १९९८ पृ-५
६. अग्रवाल सुमन, शेतकरी महिला आघाडी पंचायतराज निवडणुकासाठी सज्ज, शेतकरी संघटक, ६ डिसेंबर १९९२ पृ-५

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महाराष्ट्रातील कामगार चळवळीच्या इतिहासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**डॉ. सुनिता हनुमंतराव गित्ते**
इतिहास विभागप्रमुख
श्रीमती मीनलबेन मेहता कॉलेज, पांचगणी.
ता. महाबळेश्वर. जि. सातारा
ई.मेल–sunitagitte@gmail.com

**प्रास्ताविक:**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्यापूर्वी हे राज्य वर्तमान भारतीय प्रजासत्ताकाच्या पश्चिमेकडील गुजरात महाराष्ट्राचा पश्चिम भाग, वायव्य कर्नाटक हे भूप्रदेश, वर्तमान पाकिस्तानातील सिंध प्रांत, तसेच वर्तमान येमेनमधील एडन या प्रदेशाचा समावेश असणारा मुंबई प्रांत, अर्थात बॉबे प्रसिडेन्सी हा ब्रिटिश भारतातील प्रांतीय स्वरूपाचा राजकीय विभाग होता. त्यामुळे तत्कालीन ब्रिटिश सरकारमधील मजूर मंत्री म्हणून नियुक्त असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठीचे कार्य हे महाराष्ट्रातील कामगार चळवळीच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी व कामगार स्त्रियांसाठी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे. त्यासाठी उच्चशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांनी प्रकाशित केलेले प्राथमिक स्वरूपाचे लिखित साधने व विकिपिडीया या संकेतस्थळावरील दुय्यम साधने यांचा आधार घेण्यात आला आहे. ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

२० जुलै १८४२ रोजी आंबेडकरांनी व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री म्हणून मजूर खात्याचे काम स्वीकारले. ब्रिटिश सरकारने त्यांची मजूर मंत्री म्हणून नियुक्ती केली होती.

१३ जुलै १९४१ रोजी कावसजी जहांगीर हॉल मुंबई येथे म्युनिसिपल कामगार संघाच्या वार्षिक सभेपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण भाषण झाले. या सभेत म्युनिसिपल कामगारांनी मुलांना व मुलींना शिक्षण द्या; तुम्ही जे काम करता त्या कामात त्यांना पडू न देण्याची खबरदारी घ्या, असे आग्रहाने सांगितले. म्युनिसिपल कामगार संघात एकी असणे आवश्यक आहे. म्युनिसिपल संघाच्या चार आणे वर्गणीसाठी काही लोकांकडे दहा–दहा वेळेस जावे लागते हे दुर्दैव होय, असे म्हणाले. म्युनिसिपल अधिकारी या कामगार संघाच्या संदर्भात 'फोडा व झोडा' ही नीती अवलंबवितात, हे स्पष्ट करून सर्वांनी एकोप्याने राहून म्युनिसिपल संघाचे बळ वाढविण्याचे आवाहन आंबेडकरांनी केले होते.

११ एप्रिल १९४३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुंबई इलाखा लेबर फेडरेशन तर्फे सत्कार करण्यात आला. तेव्हा भारतात एक सर्वव्यापी मजूर पक्ष स्थापन करून मजूरपक्षीय सरकार स्थापन करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. हे जितक्या लवकर होईल तितके मजूरांचे हित अधिक होईल, असे मत त्यांनी याप्रसंगी मांडले. कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकार, मालक व कामगार संघटनांचे प्रतिनिधी यांचे त्रिपक्षीय मंडळ बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री असतानाच अस्तित्वात आले. मजूर खात्याच्या स्थायी समितीवर तीन बिनसरकारी सदस्यांची नेमणूक त्यांनी करविली. संपाचे हत्यार सतत न वापरता ते काटकसरीने वापरावे असे त्यांना वाटे.

८ फेब्रुवारी १०४४ रोजी केंद्रीय कायदेमंडळात कोळसा खाणीतील स्त्री कामगाराबद्दल बाबासाहेब आंबेडकरांनी चर्चा केली. स्त्री कामगारांनी कोळसा खाणीत काम करू नये हे तत्त्व केंद्र सरकारने मान्य केल्याचे

ISSN : 2348-7143
December-2018

बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले. खाणीमध्ये काम करणाऱ्या स्त्री–कामगारांची संख्या क्रमानक्रमाने कशी करावी असा निश्चित कार्यक्रम ही केंद्र सरकारने आखला असल्याचा खुलासा सुद्धा बाबासाहेबांनी केला. कोळसा खाणीत काम करणाऱ्या मजुरांबाबत स्त्री–पुरुष असा भेद सरकार करणार नाही. पुरुष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री कामगारांना दिला जाईल असे सरकारचे धोरण असल्याचा खुलासा त्यांनी केला. स्त्री–पुरुषांना समान मजूरी तत्त्व प्रथमतः कोळसा खाणीतील कामगारांच्या बाबतीत स्वीकारले गेले. तसेच खाणीतील स्त्री कामगारांसाठी कुलुपासह कपाटांनी युक्त अशी स्नानग¥हे बांधण्याची मालकावर कायदेशीर बंधन घालण्यासाठी त्यांनी केंद्रीय विधिमंडाळात बिल आणले व ते पास करून घेतले.

२९ मार्च १९४५ रोजी केंद्रीय विधिमंडळात खाण कामगार प्रसुती लाभ (सुधारणा) बिलावरील चर्चेत आंबेडकरांना भाग घेतला त्यात ते म्हणाले,

१. खाणीत काम करणाऱ्याा गरोदर स्त्रियांना फायदा व्हावा हा दुरूस्तीचा हेतू आहे.
२. खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना प्रसुतीपूर्वी १० आठवडे काम करता येणार नाही अशी तरतूद या दुरुस्तीन्वये करावयाची आहे.
३. दिवसाला १२ आणे याप्रमाणे एकूण १४ आठवडे (प्रसुतीपूर्वी १० व प्रसुतीनंतरचे ४ आठवडे) रक्कम याप्रमाणे रोख रक्कम त्या स्त्रियांना दिली जाईल अशी दुरुस्ती सुचविली.

**निष्कर्ष :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार संघात एकोप्याची आवश्यकता असल्याचे म्हटले. तसेच संपाचे हत्यार सतत न वापरता ते काटकसरीने वापरावे असे त्याचे मत होते.
२. कामगारांमध्ये स्त्री पुरुष असा भेद न करता जो दत पुरुषांना मिळतो. तोच मजूरीचा दर स्त्री कामगारांना मिळण्याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते.
३. वर्तमानकालीन महाराष्ट्रातील कामगार चळवळीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मार्गदर्शक आहे.

**संदर्भ :**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन व भाषणे.
२. https:/ fmr.m.Wikipedia.org

# स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील कामगार चळवळ

**डॉ. गणपत विष्णू गट्टी**
इतिहास विभाग
श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा
ता. परळी, जि. बीड.

**सारांश :-**

भारतात स्वतंत्र्यपूर्व काळापासूनच कामगार चळवळ कार्यरत असलेली दिसते. महाराष्ट्र राज्य कामगार चळवळीचे प्रमुख केंद्र मानले जोते. कारण कामगार संघटनेची स्थापना पहिल्यांदा मुंबईत झाली कारण मुंबईत कापड गिरण्या स्थापण होवून नव कामगार वर्ग निर्माण झाला होता. कामगार वर्गाच्या समस्यांची सोडवणूक

करण्यासाठी, तसेच कामगारांच्या मागण्या अधिक प्रभावीपणे सरकारसमोर मांडण्यासाठी श्रीमिक वर्गाने चळवळीचा मार्ग स्वीकारला, यातूनच कामगार संघटनांचा उद्य झाला. महाराष्ट्रात या कामाची मुहूर्त भेट नारायण मेघाजी लोखंडे यांनी रोवली. इंग्रज शासनाने कामगार वर्गाची मागणी लक्षात घेता फॅक्टरी अॅक्ट साठी कमिशन नेमले. त्यातून कामगारांच्या प्रश्नाला वाचा फुटली व कामगार संघटनांना कामगार प्रश्नावर 'संघटन' हे उत्तर मीळाले.

**उद्देश :-**

१. स्वतंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा आढावा घेणे.
२. कामगार संघटनांच्या उदयाची पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

**व्याप्ती व मर्यादा :-**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील कामगार चळवळीचा आढावा घेण्यात आला आहे यात केवळ महाराष्ट्रातील कामगारांच्या संघटनेचाच विचार केला गेला आहे.

महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही विविध कामगार संघटनांच्या माध्यमातून कार्यरत असलेली दिसून येते. कामगारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने कामगार संघटनांची निर्मिती झाली. तीचा पाया महाराष्ट्रातच मुंबईत घातला गेला. 'मुंबईच्या औद्योगीकीकरणाचा आणि विशेषः तेथील कापड उद्योगाचा पायाही एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घातला गेला. १९८५ साली एकट्या मुंबईत ७३ कापड गिरण्या होत्या. १९८२

सालापर्यंत सतत कापड गिरण्यांची भरभराट होत राहीली, मुंबई इलाक्यातील कापड गिरण्यांची मालकी इंग्रज, पारशी, भाटिया व खोजा वगैरे बिगरमराठी भाषिकांच्या हाती होती. तर या गिरण्यातंले बहुतेक सारे कामगार मराठी भाषिक होते.' १ या कामगारांना आठवड्याची सुट्टी नसे. त्यांना दररोज तेरा - चौदा तास काम करावे लागे. ' गिरणीची काम सुरु होण्याची जशी वेळ ठरलेली नसे, तशीच पगाराची तारीखही निश्चित ठरलेली नसे. सात-आठ वर्षाच्या लहान मुलांनाही गिरण्यात राबावे लागे. कामगार स्त्रिया व मुले यांच्या आरोग्याची मुळीच काळजी घेतली जात नसे. मुंबईतल्या उकाड्याने कामगार हैराण होत असत. औद्योगीक क्रांतीच्या आरंभिच्या काळात कामगार संघटित नसल्याने इंग्लड मधल्या कामगारांना कसे जनावारांचे जिणे जगावे लागे. त्यांचे वर्णन मार्क्सने केले आहे. त्यापेक्षा मुंबईतील गिरणी कामगारांची अवस्था निराळी नव्हती.'२ १८७४ साली मेजर मूर या मुंबईतील कापूस खात्याच्या मुख्य निरीक्षकाने तसेच रेडग्रेव्ह या इंग्लंडमधील कारखान्यांच्या निरीक्षकाने हिंदुस्तानात सरकारने कारखान्याबाबत कायदा करावा असे सुचवले. '१८७८ सालाच्या अखेरीस गिरणी मालकांचे वकीलपत्र

ISSN : 2348-7143
December-2018

घेणारी 'नेटिव ओपिनियन' सारखी वृत्तपत्रे म्हणू लागली. गिरण्यातील मोलमजुरीवर हजारो मजूर आपला सुखाने चरितार्थ चालवीत आहेत गिरण्यात काम करणाऱ्या मजुरांची काही एक तक्रार नसून संतोषाने काम करीत आहेत. इ. प्रचार गिरणीमालक करू लागले. मुंबईतील गिरणीमालकांनी सरकारी मँचेस्टरमधील गिरणीमालकांच्या दबावाखली येऊन फॅक्टरी ॲक्ट सुरू करतील हे जाणून १८७६ मध्ये ' बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशन ' ही संघटना स्थापन केली. त्यांना कामगार हितापेक्षा स्वहित महत्वाचे वाटत होते. त्यांचा कामगार संघटनास साहजिकच विरोध होता.'३'जमशेट, नेटिव्ह ओपिनियन, आणि 'राफ्त गोफ्तार' या वृत्तपत्रांनी फॅक्टरी ॲक्टला विरोध केला तर इंदुप्रकाश ने कायद्याच्या बाजूने मत दिले.'देशातल्या कापड गिरण्यांमधील एकूण २,८२,००० कामगारांपैकी ८२ गिरण्या फक्त मुंबईत होत्या' ४ त्यामुळे सहाजिकच कामगार संघटनेचे प्रथम प्रयन्त हे मुंबईत झाले. ' २३ मार्च १८७५ रोजी भारतातील पहिले फॅक्टरी कमिशन नेमण्यात आले. १८७८ मध्ये सोराबाजी शापूरजी बंगाली यांनी कामगार हिताचे विधेयक मुंबई सरकारला सादर करून त्यात गिरण्यातील मजुरांचे त्रास कमी करा, लहान मुलांना संरक्षण द्या अशी मागणी केली. हे विधेयक १८८१ ला संमत झाले.'५ नारायण मेघाजी लोखंडे हे सत्य शोधक चळवळीत काम करणारे नेते होते. त्यांनी दीनबंधू साप्ताहिकातून मजूरांच्या दलालीवर हल्ला चढवला. त्यांनीच प्रथमतहा मजूरांची समस्या मालकापर्यंत पोहचण्यासाठी मजूरांची संघटना असावी असे प्रतिपादन केले. १८८४ मध्ये मुंबई सरकारने कलेक्टर मुर यांच्या अध्यक्षतेखाली एक फॅक्टरी कमिशन नेमून त्यांना कामगारांच्या संदर्भात काही विधायक सूचना करण्याचे व नवविधेयक तयार करण्याचे काम दिले.या कमिशनपुढे आपल्या मागण्या वैयक्तिक स्वरुपात मांडल्यास कोणीच लक्ष देणार नाही. सामुहिक शक्तीला पर्याय नाही या विचारातून 'बॉम्बे मिल हँडस असोशिएशन' ही कामगार संघटना स्थापन करण्यात आली. या स्थापनेत गिरण्यांमधील जॉबर, सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते यांचा समावेश होता. यात प्रामुख्याने रघु भिकाजी, गेनू बाबाजी, नारायन सुर्कोजी, विठ्ठल कोरगावकर, कृष्णाजी केळूस्कर, यांचा समावेश होता. या काळात सत्यशोधक पुढाऱ्यांनी कामगारांसाठी रात्रीच्या शाळा काढल्या होत्या. जलाशयामधून भीमराव महामुनी प्रबोधन करीत होते. '६ २६ सप्टेंबर १८८४ रोजी अनुक्रमे भायखळा येथे कामगार सभा होऊन असोसिएनने पाच मागण्या फॅक्टरी कमिशनसमोर मांडल्या. i) रविवारी सुट्टी देण्यात यावी. ii) दुपारी अर्धातास (जेवणासाठी) सुट्टी द्यावी. iii) सकाळी ०६:३० ते सूर्यास्तापर्यंत काम चालवावे. iv) पगार पुढील महिन्याचा १५ तारखेच्या आत द्यावा. v) कामगाराला गंभीर दुखापत झाल्यास बरा होईपर्यंत पूर्ण पगार व कामगार मृत्यू झाल्यास कुटूंबाना पेन्शन द्यावी.

कमिशनला साडेपाच हजार कामगारांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले. या व तत्सम जागृतीमुळे जे. एन. टाटा यांच्या मालकीच्या कुर्ल्याच्या स्वदेशी मिलमध्ये वाढीव पगारासाठी संप करण्यात आला. २० नोव्हेंबर १८८९ ला लोखंडे यांनी सरकारला परत एक निवेदन दिले त्यावर साडेसहा हजार गिरणी कामगारांच्या सह्या होत्या. त्या निवेदनात लोखंडे म्हणतात 'इंग्लडमधील कामगारांसारख्याच सोयी इथल्या कामगारांना हव्यात असा आमचा अट्टाहास नाही कारण तश्या सोई देऊ केल्यास कदाचित इथल्या उद्योगाला खीळही बसेल याची आम्हास जाणीव

आहे त्यामुळे कामगारांना कायद्याने संरक्षण मिळायला हवे. गिरणी मालकांनी कामगारांच्या समस्यांकडे सहानुभूतीने पाहिल्यास त्यांचाही त्यात फायदा आहे असे आम्हाला वाटते' त्यामुळे १० जून १८९० ला सर जॉर्ज कॉटन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मिल ओनर्स असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत रविवारी सुट्टी देण्याच्या कामगारांच्या बाजूचा निर्णय घेण्यात आला. १८९१ ला विधायक फॅक्टरी ॲक्ट निर्माण होण्यात लोखंडे यांनी खूप महत्वाची भूमिका बजावली. लोखंडे यांच्या कार्यामुळे प्रभावित होऊन कॉटन जॉर्ज यांनी त्यांचा उल्लेख अतिशय

ISSN : 2348-7143
December-2018

बुध्दिमान व समर्थ कामगार पुढारी असा केला. १८९१ चा कायदा १ जानेवारी १९९२ पासून अमलात आला. स्त्रियांना पहाटे सहा पूर्वी व सायेकाळी साडेसहानंतर कामावर बोलवू नये वा थांबवू नये. दुपारी दिड तास स्त्री कामगारांना सुट्टी मात्र कामाचे एकूण तास ११ असणार. ९ ते १४ वयाच्या बालकामगारांस शाळेत जाता येण्यासाठी त्यांच्या कामाचे तास साडेसहा करण्यात यावेत व मधल्या वेळेत शाळेत जाता येण्याची सोय व्हावी. पुरूष कामगारांचे कामाचे तास १२ असणार अशा सर्व तरतुदी करण्यात आल्या. कामगारांच्या आर्थिक प्रश्नासंदर्भातच चळवळ मर्यादित राहीली नाही.

'टिळक - आगरकर डोंगरीच्या तुरुंगातून सुटले त्यादिवशी त्यांचा सत्कार व मानपान देण्याचा कार्यक्रम लोखंडे यांनी केला. कष्टकरी वर्गाच्या आरोग्यासाठी मराठा प्रॉव्हिडंट हॉस्पीटल, दीनबंधू नियतकालीक मजूरांच्या तांत्रिक ज्ञानात भर घालण्यासाठी वृत्तपत्रीय लेखन त्यांनी केले. लोकमान्य टिळकांना १९०८ साली अटक झाल्यानंतर सोलापूर च्या कामगारांनी हरताळ पाळला होता'७ १९२० चा सोलापूरचा संप नेस्तनाबूत करण्यासाठी तर सरकारने सोलापूरमध्ये लष्कराला पाचारण केले. १९०८ साली लोकमान्य टिळकांना सहा वर्षाची साप्रम कारावासाची शिक्षा झाली. 'सर्व भारतीयांच्या मनावर एक प्रचंड आघात झाला. मुंबईतील कामगारांनी स्वयंस्फूर्तीने हरताळ पाळला आणि निदर्शने केली. या निदर्शनाच्या वेळी सैन्य आणण्यात आले. आणि सैन्याने केलेल्या गोळीबारात १५ जण ठार झाले व अनेक जन जखमी झाले. भारतातील कामगारांनी केलेले हे पहिले राजकीय निदर्शन होते.'८ अशा प्रकारे केवळ आर्थिक प्रश्नावर कामगारांत जागृती घडून न येता राजकीय प्रश्नावर देखील कामगार संघटीत झाले. व त्यानंतर कर्मचाऱ्यांच्याच प्रश्नावर कार्य करणारे राजकीय पक्ष देखील यातून उद्याला आले.

**समारोप :-**

महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही प्रामुख्याने मुंबई शहरात सुरु झाली. गिरणी गिरणी कामगार जागृतीतून संपूर्ण महाराष्ट्रभर कामगार वर्गात जागृती घडून मुंबई हे कामगार संघर्षाचे केंद्र बनले. यातून कामगार वर्गाचे लढे देणारे राजकीय पक्ष व नेतृत्व उद्याला आले. या कामगार वर्गाचा लढा केवळ भांडवलदाराविरुध्दच नव्हता तर इंग्रजांच्या साम्राज्यशाही विरुध्दही या कामगार संघटनांनी योगदान दिले.

**संदर्भ :-**

१. बोकील नीता, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, १९६०-७२, मौज प्रकाशन गृह मुंबई, पृष्ठ क्र. १७
२. डॉ. खंदवे एकनाथ, भारतातील सामाजिक चळवळी, सक्सेस पब्लीकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृष्ठ क्र.१७.
३. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पहिला, १९०१-१९१४, के, सागर पब्लीकेशन पुणे, द्वितीय आवृत्ती.
४. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड दुसरा, १९१४-१९२०, के, सागर पब्लीकेशन पुणे, द्वितीय आवृत्ती २०१५, पृष्ठ क्र. २३
५. राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ.सन. १८१८-१९६०, डायमंड पब्लीकेशन पुणे, चौथी आवृत्ती २०१४, पृष्ठ क्र. २६१
६. डॉ. भंडारे निशा, रा.ना. चव्हाण व्यक्ती व कार्ये, शब्द वैभव प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, २०१८, पृष्ठ क्र. ५८
७. लवटे नामदेव, संशोधक मार्च २०१७ इतिहासाचार्य राजवाडे संशोधन मंडळ धुळे, पृष्ठ क्र. ४९
८. प्रधान ग. प्र, स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, २००४, पृष्ठ क्र. १५०

ISSN : 2348-7143
December-2018

# शेतकऱ्यांचा संघटीत संघर्ष : मुळशी सत्याग्रह

**प्रा. धनंजय रा. जवळेकर**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा
ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**सारांश :-**

पहिल्या महायुध्दामुळे इंग्रज राज्यकर्त्यांना औद्योगिक धोरणात बदल करावा लागला व पश्चिम घाटात मुळशी येथे धरण बांधून वीज निर्मिती करु इच्छिणाऱ्या टाटा उद्योगसमूहाच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी लागली. सेनापती बापट यांनी हजारो शेतकऱ्यांचे संघटन केले. 'केसरी' सारख्या तत्कालीन प्रतीष्ठीत वर्तमानपत्रानेही महाराष्ट्रभर जनजागृती केली. या धरणाला विरोध करण्यासाठी १९२० ते १९२४ शेतकऱ्यांनी संघर्ष केला. मात्र पुढील काळात शासनाने धरणासाठी आवश्यक जमीन भूसंपादन कायद्यान्वये संपादित केली. शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्याचे घोषित केले. शेतकऱ्यांनी अगतिकतेने शेतजमिनीचा मोबदला स्विकारला. या आंदोलनामुळे सेनापती बापट यांना एकूण ९ वर्षे तुरुंगात काढावी लागली. याच आंदोलनापासून त्यांना 'सेनापती' ही उपाधी मिळाली. विकासासाठी धरणे हवीत की नकोत या आधुनिक काळातल्या प्रश्नाला अशारीतीने महाराष्ट्रात १९२१ लाच तोंड फुटले होते.

शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जापोटी सावकारांकडे गहाण पडल्याने त्याचा फायदा शेतकऱ्या ऐवजी सावकारांनाच अधीक झाला, म्हणूनच सावकार व भांडवलदारांचा मुळशी धरण योजनेला पाठिंबा होता. एकाचवेळी ब्रिटीश शासन व एत्तदेशीय भांडवलदार, सावकाराविरुध्दचा शेतकऱ्यांचा हा लढा शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात अविस्मरणीय ठरतो.

**उद्देश :-**

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील धरणग्रस्त शेतकरी आंदोलनाचा अभ्यास करणे.
२. महाराष्ट्रातील संघटित पहिला शेतकरी सत्याग्रहावर प्रकाश टाकणे.

**स्वरुप व व्याप्ती :-**

प्रस्तूत शोध निबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शेतकऱ्यांच्या सत्याग्रहाचा अभ्यास करण्यात आला आहे. या कालखंडातील केवळ मुळशी सत्याग्रहाचीच यासाठी निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पध्दती :-**

ऐतिहासीक वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आला. यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

'पुणे शहराच्या पश्चिम दिशेस तांदुळाच्या शेतीसाठी प्रसिध्द असणारा भाग म्हणजे मुळशी. त्याला पूर्वी मुळशी पेटा म्हणत. येथे आंबे मोहर पिकतो, मुळा आणि निळा या दोन नद्यांचा संगम होतो. प्रचंड पाऊस पडणारा हा प्रदेश व नद्यामुळे वाहणारा प्रदेश म्हणून मुंबईच्या कारखान्यांना अखंड वीजपुरवठा करण्यासाठी मुळशी येथे एक धरण बांधण्याची योजनाटाटा कंपनीने आखली होती,'१ 'पहिल्या महायुध्दाच्या काळात जीवनाश्यक वस्तूंची टंचाई, वाढती महागाई यामुळे इंग्रज राज्यकर्त्यांना औद्योगीक धोरणात बदल करावा लागला. पश्चिम घाटात मुळशी येथे एक धरण बांधून वीजनिर्मीती करू इच्छिणाऱ्या टाटा उद्योग समूहाच्या प्रस्तावाला मान्यता

ISSN : 2348-7143
December-2018

द्यावी लागली'२ 'भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात गांधीपर्वाच्या प्रारंभी शेतकऱ्यांचा जो सामुदायिक सत्याग्रहाचा लढा उभारण्यात आला त्यामध्ये मुळशी सत्याग्रहाचा अग्रक्रमाने निर्देश करावा लागेल'३ या धरणाखली ५४ गावातील जमिनी बुडणार होत्या व १० ते १५ हजार मावळ रहिवाशांना त्याचे परिणाम भोगावे लागणरा होते या योजनेला विरोध करायचा म्हणजे मावळ्यांना इंग्रज भांडवलदार साम्राज्यवादी राज्यकर्ते, टाटा कंवनी, रेल्वे कंपन्यांचे मालक, व त्यांच्या युतीशी सामना करावयाचा होता. 'बहुतेक सर्व शेतकऱ्यांनी जमिनी गहाण ठेवूण कर्जे काढली व सावकारांच्या जाळ्यात अडकले होते. जमिनी तर गेल्या तर शेतकरी देशोधडीला लागणार होते. त्यांना नुकसानभरपाई मिळाली तरी त्यातून सावकारांचे कर्जे फिटणार नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांनी वीज कंपनीचा विरोध करावयाचे ठरवीले.'४ १९१९ च्या जुनमध्ये सरकारने भू-संपादन कायद्यातील चौथ्या कलमानुसार मावळ्यांना नोटीसा दिल्या, पण मावळ्यांनी आपल्या जमिनी सरकारला देण्याचे नाकारले. ' २६ व २७ डिसेंबर १९१९ रोजी आवळस व मुळशी या गावी जाहीर सभा झाल्या आणि मावळ्यांनी एक मंडळ स्थापन केले. या मंडळाचे चिटणीस गद्रे व गुप्ते यांनी खेडला जाऊन पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. मात्र गव्हर्नर जॉर्ज लॉयड यांनी मावळ्याच्या वतीने भेटावयास येणाऱ्या शिष्ट मंडळाची भेट घेण्यास नाकारले आणि मंडळास मीड या मुख्य सचिवास भेटण्यास सांगितले. नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करताना औदार्य दाखविले जाईल, असे आश्वासन मुख्य सचिवाने दिले.' ५ पण ज्यांच्या जमिनी धरणाखाली बुडणार होत्या त्या सर्वांना पर्यायाची जागा देणे शक्य होणार नाही हे मीडने स्पष्ट केले. 'धरणग्रस्त शेतकऱ्यांना टाटा कंपनीने भागधारक होता यावे अशा आशयाचा बिनसरकारी प्रस्ताव रँग्लर परांजप्यांनी १९२० च्या मार्चमध्ये मुंबईच्या कायदेमंडळात मांडला. ६ तेव्हा सरकार प्रमाणेच सर पुरषोत्तमदास ठाकूरदास, पारेख, सर दिनशा पेटिट वगैरे गुजराती, पारशी सदस्यांनी त्याला कडाडून विरोध केला.' ६ अर्ज विनंत्याचे, भेटीगाठींचे सनदशीर मार्ग निष्फळ ठरत होते. फेब्रुवारी १९२० पासून 'केसरी' ने मुळशी पेट्यातील मावळ्यांची कड घेऊन त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यास सुरवात केली. मार्च १९२० मध्ये जुन्नरला भरलेल्या पुणे जिल्हा सभेत तसेच एप्रिल १९२० मध्ये मावळ्यांना पाठिंबा देणारे ठराव लोकमान्य टिळकांच्या समक्ष समंत झाले. 'या सभेत पुण्याचे डॉ. पळसुळे, कवडेशास्त्री या टिळक भक्तांप्रमाणेच अप्पासाहेब गद्रे, केशवराव जोगळेकर, नानासाहेब देशपांडे वगैरे सावकारांचीही भाषणे झाली याच सभेत आवळसच्या विठू महाराने उद्या सर्व पेटा बुडाल्यावर पोरबाळ घेऊन कुठ जाव ? असा प्रश्न जाहीर रित्या विचारला.' ७ 'डिसेंबरच्या अखेरीस नागपूरला भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात तात्यासाहेब केळकरांनी मुळशी पेट्यातल्या शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडले. याबाबत केळकरांनी मांडलेल्या ठरावाला गोविंदराव भार्गव, अब्दूल बारी आणि रामचंद्र वाडियार यांनी अनुमोदन दिले व ठराव मंजूर करण्यात आला.' ८ काँग्रेसने हा ठराव मंजूर केल्यानंतर लवकरच मुळशी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले जाणार याची सरकारला, टाटा कंपनीला तसेच मुळशी पेट्यातील शेतकऱ्यांना पुरती कल्पना आली. २३ जानेवारी १९२१ रोजी पुण्यात भरलेल्या एका खाजगी बैठकीत संकल्पित शांततामय सत्याग्रहासाठी आपण वेळ व पैसा देण्यास तयार आहोत, अशा आशयाच्या प्रतिज्ञापत्राकावर मुळशी पेट्यातील मंडळीच्या सह्या घेण्याचे ठरले तेव्हा शासन जागे झाले व ज्यांच्या जमिनी जातील त्यांना भरपूर नूकसान भरपाई दिली जाईल. मात्र त्यांना पर्यायी जमीनी देणे शक्य होणार नाही असेही जिल्हाधिकाऱ्यांनी बजावले. कायदेमंडळातही या प्रश्नावर चर्चा झाली. पण येथे मात्र जमीन संपादन कायद्यातील कलमे काटेकोरपणाने पाळली जात नाहीत तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत विलंब होतो एवढेच टिका सरकारवर केली पण सत्याग्रहाला कोणी पाठींबा दिला नाही त्यामुळे २९ मार्च १९२१ रोजी शिवरामपंत परांजपे यांनी पुण्याच्या शिवाजी मंदिरात भरलेल्या सभेत कायदेमंडळातील सदस्यांवर टिका

केली. १० एप्रिल १९२१ ला गांधीजींचे आगमन मुंबईत होताच शिवरामपंत परांजपे, बाळु काका कानिटकर, हरिभाऊ फाटक इ. मंडळी महात्मा गांधी यांना भेटून सत्याग्रहाची परवानगी घेतली. सर्व गोष्टी महात्मा गांधींना सांगण्यात आल्या. शंकरराव देवांनी सत्याग्रहाचा श्री गणेशा करण्याचे ठरवीले. महात्मा गांधी यांनी 'प्राण घ्या किंवा जमीन घ्या' असा ठराव केला.

'त्यावेळी शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन जी जमीन ती त्याच्याकडुन काढून घेऊन त्याला देशोधडीस लावून चालनार नाही, ही भूमिका घेऊन पांडुरंग बापट यांनी त्याविरूध्द शेतकऱ्यांना संघटीत केले.'९

१५ एप्रिल १९२१ ला ते मुळशी पेट्यात येऊन चळवळीत सामील झाले. तेव्हापासून १ मे १९२२ पर्यंत सेनापतींनी सत्याग्रहाचे एक महत्वाचे नेते म्हणून काम केले. 'मुळशी प्रकरणाला त्यांनी अखिल महाराष्ट्रीय स्वरूप

दिले. मुळशी धरण विरोधी आंदोलन सत्याग्रहाला १६ एप्रिल १९२१ रोजी सुरवात झाली. संपूर्ण महाराष्ट्रात निदर्शन करण्यात आली या लढ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी जमा झाला. १२०० आंदोलकांनी धरणाच्या कामावर कब्जा करून ते बंद पाडले.'१० सेनापती बापट यांनी शुध्द सत्याग्रही विचारधारेने सत्याग्रह सुरू केला. सेनापतींना क्रांतिकार्याची पार्श्वभूमी असल्याने लोकांचे संघटन कसे करावे हे माहीत होते. त्यांनी हजारो अशिक्षित शेतकऱ्यांचे संघटन केले. सत्याग्रहाचे मुख्य कार्यालय मुंबईत लॅमिंग्टन रस्त्यावर होते, सत्याग्रहाचा दिवस जाहीर झाला की पोलीस त्यांना पकडायचे प्रयत्न करीत मात्र सेनापती अकस्मात तेथे उगवत, पोलीस चक्रावून जात असत. सत्याग्रहींची भूमिका असल्याने शत्रूला जखमी करायचे पण ठार मारायचे नाही या विचाराने सेनापतींनी १७ जून १९२१ रोजी मुळशीतील शेरे गावी टाटा कंपनीचे धरण बांधण्याचे साहित्य घेऊन येणाऱ्या ड्रायव्हरला स्वतःच

जखमी केले, यामुळे संघर्ष पेटला. 'संपूर्ण मराठी मुलखातून स्वयंसेवकांनी येऊन सत्याग्रहात भाग घ्यावा असा प्रयन्त करणे, महाराष्ट्राने या चळवळीस आर्थिक मदत करावी, मावळ्यांनी सत्याग्रह थांबविला तरी स्वयंसेवकांनी तो चालू ठेवावा असा आग्रह धरणे, प्रभातफेऱ्या, मेळे प्रचार दौरे काढणे, मावळ्यांना नुकसान भरपाई घेण्यास मुभा देणे, अहिंसक सत्याग्रह यज्ञात प्राणहुती देण्याची तयारी ठेवणे, 'मुळशी सत्याग्रह हे एक धर्मक्षेत्र आहे असे मानणे, आपण शिवाजींच्या मावळ्यांसाठी लढतो आहोत अशी कल्पना करणे, परमेश्वराचीच तशी आज्ञा आहे असे मानणे, थोडक्यात स्वतःला मुळशी सत्याग्रहाच्या चळवळीस पूर्णपणे वाहून घेणे व त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची तयारी ठेवणे या सर्व गोष्टी सेनापतींनी मुळशी सत्याग्रहाच्या संदर्भात केलेल्या होत्या.'११

२३ सप्टेंबर १९२१ रोजी बापट, दाताने आणि बाळूकाका कानिटकर यांनी सार्वजनिक मुळशी सत्याग्रह मंडळ नावचे स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात पुढाकार घेतला. पुणे जिल्ह्यातील मुळशी, पौड चिंचवड खेरीज मराठी भाषिकांच्या मुलाखत अन्य ठिकाणीही सत्याग्रह करावयाचा, त्यासाठी मध्यप्रांत वऱ्हाडातील सत्याग्रहांची निवड करावयाची, ठिकठिकाणी प्रचारक पाठवून आर्थिक सहाय्य मिळवायचे, मुंबईत आणि इतरत्र जेथे टाटा कंपनीशी संबंधित व्यक्तींच्या ताब्यात गिरण्या अगर कारखाने असतील तेथे तेथे एक दिवसाचा सहानूभूतीपर संप घडवून आणायचा असा महत्वाकांक्षी कार्यक्रम सेनापती बापटांनी आखला होता. 'मुळशी सत्याग्रहास मदत

करण्यासाठी त्याआधी स्थापन झालेल्या सत्याग्रह सहाय्यक मंडळाची कार्यकक्षा मर्यादित होती म्हणून बापटांनी व्यापक कार्यक्षेत्र डोळ्यासमोर ठेवणारे सार्वत्रिक मुळशी सत्याग्रह मंडळ स्थापन केले होते.'१२

१९ ऑक्टोंबर १९२१ रोजी बापटांना यामुळे सहा महिन्याची सजा ठोठावण्यात आली त्यांच्या अनुपस्थितीमध्ये सत्याग्रहाचे नेतृत्व विनायकराव भुस्कटे कडे आले. ७ नोव्हेंबर १९२१ च्या सत्याग्रहासाठी एक हजार लोकांनी नावे नोंदवीली होती. आणि नागपूर, अमरावती, यवतमाळ, नाशिक, मुंबई, ठाणे, सातारा इ. वीस

ISSN : 2348-7143
December-2018

शहरात सत्याग्रह केला जाईल असे गुप्तचर विभागाने सरकारला कळवले होते. १ डिसेंबर १९२१ ला दीड हजार सत्याग्रहींनी धरणाच्या जागी सभा भरवली. या सर्व जागृतीमुळे सरकारने या दरम्यान नुकसान भरपाई देण्यास सुरवात केली पण जानेवारी १९२२ ला टाटा कंपनीचा अभियंता हॅजलाम याने कंपनीच्या वसाहतीला पाणी पुरवठा करणारा पंप धरणस्थळी उभारताच तो उद्‌ध्वस्त करण्यात आला. त्यामुळे भुस्कूट्यांना कंपनीच्या गुंडाकडून प्रचंड मारहाण झाली. १६ जनांना अटक झाली. इतकेच नव्हे तर सत्यशोधक तमासगिरांनाही कंपनीने हाताशी धरले व सत्याग्रहा विषयी बुध्दिभेद करण्याचा प्रयत्न केला. सरकारविरूध्द व कंपनीविरुध्द सत्याग्रह करा असे सांगणाऱ्या नेत्यांचा ब्राम्हणी कावा ओळखा असे आवाहन सत्यशोधक मावळ्यांना देत होते. ०१ मे १९२२ ला सत्याग्रहाची दुसरी फेरी झाली, सेनापती बापट सहा महिन्यांनी सजा भोगून आले पण भुस्कूटे तुरूंगात होते. या वेळी शिवरामपंत परंजपे, चिटणीस डॉ. फाटक यांच्याबरोबर वासुकाका जोशी, सीतारामपंत दामले हेही सत्याग्रहात सामील झाले. टाटांच्या गुंडांनी सत्याग्रही व स्त्रियांना बेदम मारहान केली. त्यांचा विनयभंग केला, सत्याग्रही बेशुध्द पडले पण त्यांनी शांततेनेच सत्याग्रह केला. ०१ एप्रिल १९२३ ला हनुमान जयंतीला सत्याग्रहांचे तिसरी फेरी झाली. शंकरराव देवांना दुसऱ्यांदा तीन महिन्याची सक्त मजूरीची शिक्षा झाली तर २३ ऑक्टोबर बापटांना साध्या कैदेची एक वर्षाची शिक्षा झाली. डिसेंबर १९२४ ला सेनापती बापटांकडून टाटा कपंनीच्या नोकरांशी झालेल्या चकमकीत पठाणावर वार करण्यात आला. रेल्वे इंजिन ड्रायव्हरवर गोळीबार करण्यात आला. आणि सेनापती बापटांना सात वर्ष सक्त मजूरीची शिक्षा झाली.

तीन वर्षे सत्याग्रहाची मोहीम नेटाने चालवूनही टाटांनी काम थाबवले नाही. म.गांधीनी ०५ एप्रिल १९२४ला सत्याग्रह चळवळ मागे घेत असल्याचे कार्यकत्यांना सांगितले अशा पध्दतीने भारतातील पहिला धरणग्रस्त शेतकऱ्यांचा सत्याग्रह लढा अयशस्वी झाली.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा हा लढा स्वातंत्र्य चळवळीस पुरक ठरला. या लढ्यातुनच शेतकरी वर्गात संघटनेची जाणीव जागृती निर्माण झाली. या लढ्यापासून महाराष्ट्रातील शेतकरी वर्गास साम्राज्यशाही विरूध्द आपला संर्घषास प्रेरणा निर्माण झाली.

**संदर्भ :-**

१. प्रा. राऊत गणेश, राऊत ज्योती, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.सन. १८१८ ते १९६०, डायमंड पब्लीकेशन पुणे, चौथी आवृत्ती २०१४, पृष्ट क्र. २५३.
२. बोकील नीता, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास १९६०-१९७२, मौज प्रकाशन गृह, प्रथमावृत्ती, २०१२ पृष्ठ क्र. १८
३. डॉ. खांदवे एकनाथ, शेतकरी संघटना ने स्वंतत्र्य भारत पक्ष एक वाटचाल, प्रकाश, डॉ. खांदवे एकनाथ,अहमदनगर, प्रथमावृत्ती २००६, पृष्ठ क्र.५३
४. डॉ. खांदवे एकनाथ, भारतातील सामाजिक सामाजिक चळवळी, सक्सेस पब्लीकेशन, प्रथमावृत्ती, २०१५ पृष्ठ क्र. ५:२८.
५. फडके य. दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड दुसरा १९१४-१९२०, के सागर पब्लीकेशन, द्वितीय आवृत्ती. २०५ पृष्ट क्र. २१
६. फडके, य.दि. विसाव्या शातकातील महाराष्ट्र, खंड तिसरा, १९९१, प्रथम आवृत्ती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ ७२
७. भुस्कुटे वि. म., मुळशी सत्याग्रह, १९६८ पृष्ठ क्र. १३
८. केसरी, ३० नोव्हेंबर १९२०
९. प्रधान, ग. प्र. स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, साधना प्रकाश्न पुणे, २००४, चौथी आवृत्ती, पृष्ठ क्र. १८१
१०. गणेश राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास तलैव, पृष्ठ क्र. २५३
११. व्होरा राजेंद्र, मुळशी सत्याग्रह, धरणग्रस्तांचा अयशस्वी लढा, प्रतिमा प्रकाशन, प्रस्तवना पृष्ठ क्र.१०
12. पांडुरंग महादेव बापट http / him wikipedia ory.

## महाराष्ट्रातील कामगार विद्रोह : ऐतिहासिक परिपेक्ष (१८७५-९९)

**प्रा. दिलीप भिमराव गिन्हे**
इतिहास विभाग
पंकज कला महाविद्यालय,चोपडा

भारतीय कामगारांची पुरातन काळापासून मानवाच्या विकासात अत्यंत महत्वाची भूमिका राहिलेली आहे. त्याच प्रमाणे आजही भारताच्या आर्थिक विकासात कामगाराला महत्व आहे. कामगार विकासाचा केद्रंबिदू आहे. त्यांच्या कष्टामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. कामगार आहोरात्र काम करतो व व्यवसायाला आकार देते. मात्र त्या कष्टाच्या मोबदल्यात त्याला दाम मिळत नाही. तरीही तो त्याची तमा बाळगत नाही. तो रात्रदिवस काम करतो, मेहनत करतो. मात्र एक दिवस त्या सर्व गोष्टीचा त्याला पश्चाताप होतो त्याचे रुपांतर विद्रोहात होते. तस पाहता हा असुशिक्षीत घटक आपल्या कार्यकर्तृत्याची छाप मागे सोडताना दिसत नाही म्हणून महाराष्ट्रातील कामगार विद्रोह हा उपेक्षित राहलेला आहे. तो प्रकाशात आणल्या गेला नाही. कामगाराना स्वतःच्या हक्कासाठी सतत संप करावे लागले. भांडवलदाराना अनेकवेळा नफा मिळत राहीला. मात्र नफयाच्या तुलनेत भांडवलदारानी कामगार वर्गाला मोबदला दिला नाही. पर्यायाने कामगारानी अनेक वेळा अनेक ठिकाणी संप घडवून आणले. महाराष्ट्रात दुष्काळ पडला तेव्हा शेतातील मजुर वर्ग शहराकडे काम करण्यासाठी मोठया प्रमाणात आला. अशावेळी मिळेल तेवढया पैशात मिळेल ते काम कामगार करू लागला. या परिस्थितीचा दलाल वर्गानी मोठया प्रमाणात गैरफायदा घेतला. त्याच बरोबर भांडवलदार वर्गानी सुध्दा या परिस्थितीचा फायदा घेतला. या सर्व परिस्थितीला प्रतिउत्तर म्हणून कामगार विद्रोह माठया प्रमाणत झाल्याचे आढळतात. मात्र बरेच कामगार विद्रोह प्रकाश झोतात आल्याचे आढळत नाही. " अमेरिकन यादवी युध्दामुळे अमेरिकेतील उत्पन्न घटले. त्यामुळे भारतातील मालाला मागणि वाढली त्यामुळे भारतीय व्यापारी वर्गाला महत्व प्राप्त झाले होते. १८६० नंतर कापसाच्या मुल्यामध्ये आश्चर्यकारक तेजी वाढली महाराष्ट्रातील उदयोगाला त्याचा चांगला फायदा झाला"[१] मात्र त्या फायदयाच्या तुलनेत कामगारांना त्याचा मोबदला दिला गेला नाही. भांडवलदार वर्गानी स्वहित जोपासले. कापडाच्या व्यापारात तेजी वाढली त्यामुळे कामगारांवर काम करण्याचा जास्त भार पडू लागला मात्र त्यावेळी भांडवलदारानी कामगाराचे हित राखले नाही. या घटनेचा दुरगामी परिणाम कामगार वर्गाच्या आरोग्यावर झाला. आहोरात्र काम, विश्रांती नाही यामुळे कामगार वर्गात भांडवलदार वर्गाविरोधात असंतोष पसरला. कामगार वर्ग एकत्र येवू लागला. संघटन करून जनजागृती करू लागला. या एकसंघामुळे त्याच्या हक्कासाठी ते जागृत झाले. कामगार संघटना कामगारांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करू लागले. कामगार संघटनानी अनेक वेळा आपले हक्क मिळविण्यासाठी संप घडवून आणले. याच काळात महाराष्ट्रात अनेक संप झाल्याचे आढळते. मात्र ती संपाची सुरूवात होती. "१८७३ साली मुंबईच्या गिरणी कामगारांना दिली जाणारी अमानुष वागणूक सर्व जनतेच्या निदर्शनास अगदी प्रथमच आणून दिली गेली"[२] या घटनेमुळे मुंबई प्रांतात कामगारानी संप घडवून आणण्यास सुरुवात केली होती. १८७२-७३ वर्षातील मुंबई सरकारच्या शासकिय अहवालात स्त्री कामगार, बाल कामगार यांच्या कामाची परिस्थितीची व कामाच्या वेळाची माहिती फार मोठया सविस्तरपणे देण्यात आली होती. कमी पगार व अधिक तास काम यामुळे मुबंई प्रांतात कामगार वर्ग संप घडवून आणत होते.

"१८७५ साली नागपुरच्या प्रक्प्रेस मिलमध्ये संप झाला"[3] या घटनेचे प्रसाद महाराष्ट्राच्या अनेक मोठया शहरामध्ये झाल्याचे जाणवते. या काळापासुनच कामगार वर्गाला एकतेचे महत्व समजले होते. कारण या सततच्या संपामुळे भांडवलदार व मालक वर्ग काही प्रमाणात नमताना दिसतो. "सन १८७२ ते १८९० या दरम्यान मुंबई या ठिकाणी २५ संप झाले असा अंदाज आहे."[४] या अंदाजावरून आपणास असे स्पष्ट सांगता येते की, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कामगार वर्गात संघटन होऊन संप मोठया प्रमाणात घडवून आणल्या जावू लागले. एकसंघ, एकजुटपणा, एकता व नेतृत्व या गोष्टीचे महत्व या असुशिक्षित वर्गाला खऱ्या अर्थाने चांगल्या दिवसाची ही सुरूवात होती. महाराष्ट्रातील कामगार विद्रोहाची ही सुरूवात काहीच दिवसात भारतात अनेक शहरामध्ये पोहचली होती. हा कामगार वर्गाचा दृष्टीने एक चांगला परिणाम होता. "१८८६ ला ६ वेळा कामगारांनी तिव्र स्वरुपाचे आंदोलन मुंबईत केले होते."[५] या घटनेवरून असे दिसुन येते की, मुंबई प्रांतात कामगार वर्ग जागृत झाला होता. दिवसेन दिवस त्यांच्यात भांडवलदार वर्गा विरूध्द तिव्र नाराजी निर्माण होताना दिसते. " ग्रेट ब्रिटन मधील कामगार वर्गाने आपला नैतिक पाठींबा भारतीय कामगार वर्गाला दिला होता"[६] तो कामगार वर्ग ऐवढयावरच थांबला नाही तर त्यांनी इंग्लडमधील चिटणीसांच्या कार्यलयापुढे निदर्शने केली. या घटनेमुळे महाराष्ट्रातील कामगार वर्गाला पाठींबा मिळाला त्यांचे मनोध्यैर्य वाढले. " १८९० साली कापड कामगारांच्या चळवळीत स्त्री कामगारांनी पुढाकार घेऊन संपात भाषणे केली आहेत"[७] या घटनेमुळे आपणास असे आढळते की, भारतात स्त्री चुल आणि मुल ऐवढया पुरतीच मर्यादीत होती ती स्त्री आता चळवळीत सहभागी होऊ लागली. ऐवढेच नव्हे तर चळवळीच्या व्यासपीठावर स्वतः भाषण देण्यास पुढे येऊ लागली. म्हणजे कामगार विद्रोह दिवसेन दिवस तिव्र होताना दिसतो. त्यांची ढगढग सर्वत्र प्रचार व प्रसारित होताना आढळते. "गरिब व अज्ञानी लोक जेव्हा पोटासाठी खपतात तेव्हा ते आपल्या धन्याचा जुलूम त्यास सहन होईपर्यत सोसतात. परंतू जो जुलूम जेव्हा मर्यादेबाहेर जातो तेव्हा त्याच्या डोक्यात येईल तसा प्रकार करण्यास ते प्रवृत होतात"[८] आठवडयास होणारा पगार १५ दिवसानी करण्याचा मालकानी निर्णय घेतला. हा निर्णय मजुरांना अंधारात ठेवून घेतला होता. भांडवलदार व गिरणीमालक अधिकारी यंत्रणा वेठीस धरून मन मानेल तसा कारभार करत, नितीनियम व व्यवहार यांचा कोणताही विचार होत नव्हता. अरेरावीची भाषा, कामगाराना गुलाम म्हणून वागणुक नेहमी हा वर्ग देताना दिसतो. या सर्व घटनाचा निषेध म्हणून कामगार वेळोवेळी विद्रोह करत होते. वेळोवेळी होणाऱ्या कामगार विद्रोहामुळे "रविवार १० जून १८९० रोजी बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशने कामगारांना दर रविवारी सुटटी देण्याचा जो निर्णय घेतला तो भारतातल्या कष्टकरी शक्तीच्या एकजुटीने मिळविलेला पहिला महत्वपुर्ण विजय होय"[९] या सुटटीमुळे कामगार वर्गाला एक दिवसाचा आराम मिळू लागला. परंतू अनेक गिरण्यात रविवारी कामगारांना येणे बंधनकारक होते. त्यांचे कारण म्हणजे यंत्राची साफसफाई करणे. सदर काम पुर्णपणे विनामोबदला करूण घेतले जात असे. या दिवसी एखादा कामगार कामावर आला नाही तर त्या संबंधीत कामगाराचा एक दिवसाचा पगार कापला जात असे. म्हणजे अप्रत्यक्ष कामगार वर्गावर हा अन्याय होता. या अन्यया विरूध्द महाराष्ट्रात अनेक विद्रोह झाले होते. "N.A. Moos, the chief Inspector of Factories spoke of all Factories every Said that there were at Least two Strikes every year in every Factory"[10] अशा घटना वारंवार होतात. त्यामागखे्

ISSN : 2348-7143
December-2018

कारण म्हणजे कामगाराना कोणतीही नोटीस न देता त्यांना कामावरून कमी केल्या जात असे त्यांचा पगार कमी केल्या जात होता. संबंधीत कामगाराना सदर घटना दोन महिन्यानंतर कळत होत्या. कारण कामगाराना दोन ते तिन महिन्या नंतर पगार मिळत होता. अशा घटना नेहमी होत होत्या. यामुळे कामगार विद्रोह करत होते. अशा पध्दतीचे विद्रोह झाले की गिरणी मालक कामगारांना कोणतीच नोटीस न देता कामावरून कमी करत होते. "१८९२ मध्ये २८०० कामगारांना कमी केले होते"[११] या घटनेमुळे कामगार वर्गात मोठी दहशत निर्माण झाली होती. अनेक कामगार बेघर झाले होते. अनेकांचे संसार उध्वंस्त झाले होते.हा लढा तिव्र करण्याचा प्रयत्न कामगार वर्गानी केला, परंतू गिरणी मालकांनी काही कामगारांना जवळ करून कामगार वर्गात फुट पाडली होती. मात्र काही कामगार एकजुटीने राहले सदर लढा अतिशय तिव्र स्वरूपाचा करण्याचा पर्यत्न केला. "१८९३ मध्ये डेव्हीड ससुन यांच्या नेतृत्वखाली ८००० कामगारांनी लढा तिव्र केला होता"[१२] अशा घटना या काळात अधिकाधिक होताना दिसतात कारण की, गिरणी मालक आपल्या हुकुमशाही पध्दीतीने कामकाज करताना दिसतात. या घटनेचे पडसाद तिव्र गतीने झाल्याचे जाणवते. "१८९२ च्या अखेरिस आणि १८९३ च्या सुरुवातीस गिरणीमालक पुर्वसुचना न देता पगाराच्या दिवशी पगारात अचानक कपात करून कामगारांची कोडी करू लागले"[१३] या घटनेमुळे संपाची लाट उसळली. परंतू याच काळात नारायण मेघाजी लोखंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप केला गेला. मात्र सर्व आरोप धादांत खोटे होते. यामुळे कामगार वर्गात व्यवस्थापक व गिरणी मालका विरोधात असंतोष पसरला. त्याचा परिणाम म्हणजे आंदोलन "संपावर गेलेल्या संतप्त कामगारानी व्यवस्थापकास धक्काबुक्की केली त्यांच्यावर दगड अगर जोडे फेकले"[१४] यामुळे मुंबई प्रातातील कामगार वर्ग चवथळून उठला त्यांनी आंदोलन तिव्र केले. यावेळी लोखंडे योनी कामगाराना आवाहन केले की, हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवू. "जे काही करणे ते कायदेशीर रीतीने करा. दंगाफिसाद करू नका"[१५] परंतू कामगार वर्ग एक झाल्यामुळे त्यांच्यात गिरणी मालकाविरूध्द तिव्र असंतोष निर्माण झाला होता. त्यांना त्यांच्या एकतेचे महत्व कळले होते. त्यांच्यात आत्मविश्वास वाढला होता. भांडवलदार आर्थिकदृष्टया सक्षम असले तरी ते कामगारांच्या मेहनतीवरच सक्षम आहेत. आपण कष्ट करतो म्हणून हा वर्ग आर्थिकदृष्टया सक्षम आहे. अशी महत्वकांक्षा कामगार वर्गात निर्माण झाली होती. १८९७ मध्ये दरोज दिला जाणारा पगार बंद केल्यामुळे कामगारांनी आंदोलन केले होते. या तिव्र आंदोलनामुळे कामगारांचे महत्व वाढले होते. त्यांच्या मागण्याकडे काही प्रमाणात लक्ष दिल्या जावू लागले. मात्र १८९७ नंतर महाराष्ट्रातील कामगार लढा काही प्रमाणात मंदावला होता. "या काळात कामगार चळवळीचा जोर टिकू शकला नाही कारण की, नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मृत्यूमुळे चळवळ नेतृत्वाला पारखी झाली होती.[१६]

**निष्कर्ष:-**

१. सुरूवातीला भारतात कामगार संघटन नव्हते.
२. कामगार वर्गात शिक्षणाचा अभाव जाणवतो.
३. भारतात कामगार कायदे सक्षम नव्हते.
४. गिरणी मालकानी नफयाच्या तुलनेत कामगाराना पगाराचा मोबदला दिला नाही.
५. कामगारांच्या आरोग्याची काळजी घेतल्या गेली नाही.
६. सुटटीच्या दिवसी कामगारांना कंपनीत काम करणे बंधनकारक होते.

७. महाराष्ट्रात नारायण मेघाजी लोखंडे च्या रुपात कामगार चळवळीला नेतृत्व लाभले.
८. गिरणी मालक कामगार वर्गात फुट पाडत होते.
९. कामगारांना राहण्याची योग्य सोय नव्हती.
१०.सुरूवातीला कामगारांना स्वतःच्या हक्काची जाणिव नव्हती.
११.महाराष्ट्रात कामगारांचे अनेक तिव्र आंदोलन झाली.
१२.या काळात कामगारांच्या संघटनात्मक स्वरूपाची बांधनी झाली.

**संदर्भ :-**


१. Gupte V.- Lobour Movement in Bomboy, Govt. of Maharashtra,-1981-P.No.05
२. अनु. अिनामदार प. ना. -(रामानुजम जी) - बाबुल वृक्षाच्या छायेतील कामगार कथा,-राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परेल,मुंबई- पान नं. ०५
३. अहवाल- कामगार शिक्षण केंद्र,मुंबई- पान नं. २४
४. कित्ता-पान नं. २४
५. उपरोक्त-पान नं. २१
६. उपरोक्त-पान नं. ०६
७. कित्ता--पान नं. ०६
८. प्राचार्य माळी डॉ. भा.गो.- नारायण मेघाजी लोखंडे - महाराष्ट्र राज्य साहिज्या आणि संस्कृती मंडळ,मुंबई - पान नं. ०९
९. कदम मनोहर, नारायण मेघाजी लोखंडे -अक्षर प्रकाशन,मुंबई -पान नं. ८८
१०. उपरोक्त-पान नं. २१
११. कित्ता-पान नं. २१
१२. कित्ता-पान नं. २१
१३. उपरोक्त-पान नं. ०६
१४. कित्ता--पान नं. २६
१५. कित्ता--पान नं. २६
१६. कित्ता--पान नं. २८

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची वाटचाल व तिच्या पुढील आव्हाने

**प्रा. नकुल खवले**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग.
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा
ता. जामखेड जि. अहमदनगर

**प्रस्तावना :-**

शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांचे प्रश्न मार्गी लागावेत, म्हणून स्थापन करण्यात आलेल्या संघटना होय. भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्वपुर्ण असलेले आपणास दिसून येते. भारतीय लोकसंख्येतील ६४ टक्के जनता कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. तदनुसारच इतर घटक राज्याप्रमाणेच महाराष्ट्राचा मुख्य आधार शेती हाच आहे. त्यामुळे या प्रश्नांसदर्भात महाराष्ट्रात ही शेतकरी संघटना मार्फत रास्त भाव, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी, दुध, कापूस, ऊस दर आंदोलने सतत करण्यात येत आहेत. मात्र याची तीव्रता ही १९७९ च्या दशकापासून मोठ्या प्रमाणात झाली. शरद जोशी, रघुनाथ दादा पाटील, राजु शेट्टी यांचे पासून ते सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत सर्वांनी या मध्ये सहभागी होऊन ही चळवळ वाढवली व जोपासली ही. शेतकरी चळवळ जरी रूजली असली तरीही नेत्यामधील वैचारिक मतभेद राजकीय महत्वाकांक्षा सरकार मार्फत होणारी शेतमाल भावाची नाकेबंदी, चळवळीत पडणारी फूट व शेतकरी संघटनाच्या आंदोलनास मिळणारा शेतकऱ्यांचा अल्प प्रतिसाद अशी अनेक आव्हाने शेतकरी चळवळी पुढे असलेली दिसून येतात.

**उदिष्ट्ये :-**

१. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींचा अभ्यास करणे.
२. शेतकरी चळवळी पुढील आव्हानांचा अभ्यास करणे.

**व्याप्ती व मर्यादा :-**

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची वाटचाल व तिच्या पुढील आव्हाने या संशोधन लेखाची व्याप्ती ही केवळ महाराष्ट्रातीलच शेतकरी चळवळींच्या संदर्भातील वाटचाल व आव्हानांचाच यामध्ये समावेश केलेला आहे.

**स्वातंत्र्यपूर्व कालीन वाटचाल :-**

भारतातील शेतकरी चळवळ व आंदोलनांना स्वातंत्र्यपूर्व काळात जहागीरदार व जमीनदार यांच्या विरोधाची, तर स्वातंत्र्योत्तर कालखंडात दुध व शेतमालाला योग्य भाव यासारख्या घटकांची पार्श्वभूमी असलेली दिसून येते. भारतातील गावातील असणाऱ्या परंपरागत बलुतेदारी वतन पध्दतीने शेतकरी व त्यावरील सर्व अवलंबुन असणारे शेत मजूर व गावगाड्यातील घटक यांचे सौहार्दपूर्ण नाते होते. परंतु औद्यागीकीकरणामुळे ही संस्था विलोप झाली. मात्र ब्रिटीश राजवटीत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात देशाच्या विविध भागात शेतकरी चळवळीने आकार घ्यायला सुरवात केली. यातूनच देशातील पहिली शेतकरी संघटना पंजाबमध्ये उदयास आली. अजितसिंग यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन आंदोलन उभा राहिले. राजा महेंद्र प्रताप यांनी गदर पार्टीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्नाविषयी संघर्ष केला. लाहोर, फैसलाबाद ल्यालपूर अशा ठिकाणी शेतकरी परिषदा भरवून शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित करुन शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करणे हा उद्देश साध्य करण्यासाठी भरविल्या होत्या. १९३८-३९ मधील लाहोर येथील लाँग मार्च ही प्रसिध्द आहे. पंजाबबरोबरच बिहार प्रांतात ही ब्रिटीशांकडून चंपारण्य मधील शेतकऱ्यांना नीळ उत्पादना संदर्भात असंतोष निर्माण झाला होता. तो

अन्याय दूर करण्यासाठी १९१७ मध्ये महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली आंदोलन करुन चंपारण्याचा लढा यशस्वी केला.

केरळमधील मलबार भागातील मुस्लीम शेतकऱ्यांनी नायर जमीनदारांविरूध्द एक मोठा उठाव केला होता. तो उठाव मोपला उठाव म्हणुन ओळखला जातो. गुजरात मध्ये बारडोली येथील सरदार वल्लभभाई पटेल यांनी शेतकऱ्यांविषयी प्रश्नांवर केलेले आंदोलन अशाच पध्दतीने देशाच्या अनेक भागात शेतकऱ्यांचे उठाव विविध प्रश्ना संदर्भात झालेले आपणास दिसतात.

पंजाब मध्ये पहिली शेतकरी संघटना स्थापन झालेली असली तरी प्रत्यक्षात पहिले मोठे आंदोलन महाराष्ट्रात झाले. १८७५ मधील डेक्कन रायट्स किंवा दख्खनचा उठाव हे पहिले आंदोलन होय. दीडशे रूपयांच्या कर्जपायी काळूराम सावकाराने पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील करडे गावातील शेतकरी बाबासाहेब देशमुख यांची शेतीवाडी जप्त केली. एकीकडे दुष्काळ पडलेला असतानाही ब्रिटीश सरकारने शेतसारा माफ न करता सावकार व सरकारने संगनमताने तो वसूल करणे सुरूच ठेवले होते. त्यामुळे पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नेतृत्वाविना अहिंसक पध्दतीने आंदोलन केले. करडे गावची प्रतिक्रिया म्हणून ९ सप्टेंबर १८७५ रोजी संघर्ष झाला. सावकारांच्या घरावर हल्ला करून शेतीवाडी, जमीन जुमल्याची गहनखते व कागदपत्रे घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहन करणे हे याचे स्वरूप होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी मांडणी करण्याचे श्रेय महात्मा ज्योतिबा फुले यांच्याकडे जाते. त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड व इशारा या पुस्तकातून केलेले आहे. फुलेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे विश्लेषण तत्कालीन जातिव्यवस्थेच्या चौकटीत केले होते. जोतिरावांनंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी त्रिंबक नारायन अत्रे यांनी 'गावगाडा' मधून केली. फुले प्रमाणे जातिव्यवस्थेच्या चौकटीत न राहता ग्रामव्यवस्थेच्या संदर्भात केली.

शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिती कशी सुधारावी हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे पुढील कळीचा प्रश्न होता. १९२६ ते १९३२ या कालखंडात शेतकऱ्यांच्या सभा भरवून परिषदांमध्ये भाषणे करुन जनजागृती करण्याचे काम केले. १९२० साली शिंदेंनी निवडणूक लढविण्याचे ठरविले त्यावेळी त्यांनी बहुजन पक्ष ह्या नावाने जाहिरनामा प्रसिध्द केला त्यामध्ये शेतकरी वर्गाचा कैवार घेण्याचे त्यांनी मान्य केले. अस्पृशांची शेतकरी परिषद (१९२८, पुणे) मुंबई इलाखा शेतकरी परिषद (१९३१, बोरगाव), संस्थानी शेतकरी परिषद (१९३२, तरदाल) व चांदवड तालुका शेतकरी परिषद (१९३२, वडणेर) मध्ये जनजागृती करण्याचे मोलाचे काम केले.

१९४६-४७ मध्ये शंकराव मोरे यांनी कॉंग्रेसने दिलेले आश्वासने व जाहीरनामे पाळत नाही म्हणून शेतकरी- कामकरी संघ स्थापन केला. पुढे याचेच रूपांतर शेतकरी कामगार पक्ष यात झाले. ही चळवळ न बनता केवळ तिला राजकीय संघटनेचा आयाम प्राप्त झाला. मात्र यातून भाऊसाहेब राऊत, केशवराव जेधे, तुलसिदास जाधव यासारखी फळी निर्माण झाली. परंतु यातुन केवळ शेतकरी एक वर्ग म्हणून येवून चळवळ उभी राहिली नही. तर केवळ राजकीय परिघातच दिसून येते ती पण अल्पप्रमाणात होती.

**स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल :-**

१९८० चे दशक उजाडेपर्यंत लढाऊ किसान किंवा लढवैय्या शेतकरी हे शब्दच निरर्थक होते. शेतकरी समाजाची सामूहिक विचार पध्दतीची ठेवण असल्याने कितीही अन्याय, अत्याचार झालेत तरी त्याविरुध्द एक शेतकरी म्हणून निखळ शेतीच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शेतकरी पेटून उठला असे दिसून येत नाही. अशा स्थितीत शरद जोशींनी शेतकरी चळवळ उभी केली. शेतकरी संघटीत केला. त्यांच्या मनात स्वाभीमानाने जगण्याचे बीजारोपन केले. त्यांनी प्रचलित अर्थवादाला कलाटणी देऊन शेतीच्या अर्थवाद मांडून नवी दिशा दिली.

ISSN : 2348-7143
December-2018

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही सरकारने शेतकऱ्यांच्या शोषणाची इंग्रज सरकारची वासाहतिक नीती चालूच होती. त्यामुळे जनतेमध्ये आर्थिक, मानसिक, सामाजिक व सांस्कृतीक दौर्बल्य तयार झाले. हे अधोरेखीत करणारी इंडीया-भारत संकल्पना मांडली.

१९७९ पासून शेतमालास रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, भात, कापूस, व दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व, त्यासाठी वारंवार उपोषणे तुरुंगवास, मेळावे, प्रशिक्षण शिबीरे राबवून हि चळवळ पुढे नेण्याचे कार्य केले. नोव्हेंबर १९८६ मधील चांदवड येथील शेतकरी महिला अधिवेशन महत्वपूर्ण आहे. शेतकरी चळवळी मध्ये जस-जशी पुढे सरकत होती तेव्हा प्रत्येक टप्प्यावर राजकीय महत्वकांक्षा

किंवा वैचारीक मतभेद यामुळे दुफळी निर्माण होवून तिचा प्रभाव कमी होवू लागला. शरद जोशी बरोबर मतभेद होवून राजू शेट्टी बाहेर पडले. त्यांनी स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून ऊस दर आंदोलन, स्वामीनाथन आयोग व रास्त भाव यासाठी क्रियाशील राहून आपले अस्तित्व टिकवले.

**शेतकरी चळवळीपुढील आव्हाने :-**

**वैचारिक मतभेद :-**

शेतकरी चळवळीत काम करणाऱ्या नेत्यामध्ये वैचारीक व तात्वीक मतभेद असल्याने चळवळीला उभी फुट पडलेली दिसून येते. उदा. शरद जोशी - राजू शेट्टी व राजू शेट्टी - सदाभाऊ खोत यामधील संघर्ष सरकारमध्ये सहभागी होवून प्रश्न सोडवावेत की सत्तेबाहेर राहुन अशा वेळी वैचारीक मतभेद निर्माण होवून चळवळींचा प्रभाव कमी होताना दिसतो.

**शेतमालाच्या भावाची नाकेबंदी :-**

शेतकरी चळवळीची वाताहत्त होत असतानाच शेतीसमोर सरकार मार्फत शेतमालाचे भाव पाडण्यासाठी

झोनबंदी, निर्यातबंदी, मुक्त आयात, साठेबंदी अशा नवनव्या गोष्टी पुढे आणल्या जातात. यामुळे शेती व्यवसाय संकटात व तोट्यात येणार हे स्पष्ट आहे. अशातच शेतकरी चळवळीची दबावगट म्हणून प्रभाव पाडण्याची शक्ती हीन होत असेल तर येणारा काळ शेतीसाठी व शेतकरी चळवळीसाठी फारसा उत्साहवर्धक नसेल.

**एकवाक्यतेचा अभाव :-**

शेतकरी चळवळीच्या नेत्यांत कुठेही एकवाक्यता नाही. आपापल्या मर्जीप्रमाणे ज्याच्या मनात जसे येईल तसे तो बोलत सुटतो. कुणी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसीच्या अंमलबजावणीची मागणी करतो. कुणी शेतकऱ्यांनी सत्ता हाती घेतल्या खेरीज प्रश्न सुटणार नाही. त्याचबरोबर शेतमालाच्या भावासंदर्भात ही दिसून येते. परंतू कोणीही शेतीचे अर्थशास्त्र समजावून न घेताच बेताल वक्तव्ये करताना दिसतात.

**सरकार मार्फत शेतकरी चळवळीत फूट :-**

ज्या प्रमाणे व्यक्ती हा समाजशील प्राणी आहे. त्याच प्रमाणे तो राजकीय प्राणी सुध्दा आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात एक राजकीय आकांक्षा असते. याला शेतकरी संघटना सुध्दा अपवाद नाही. ज्यावेळेस एखाद्या प्रश्नांवरती आंदोलन जोरदार चालू असते अशा वेळी सरकार आंदोलनात फूट पाडून त्याची तीव्रता कमी

करण्याचा प्रयत्न करत असते. सरकार मार्फत संघटनेतील संघटनेतील नेतृत्वाला अनेकदा राजकीय पदे व कृपावादी दाखवून चळवळीत फूट पाडली जाते. हे शेतकरी चळवळी पुढील महत्वाचे आव्हान आहे.

ISSN : 2348-7143
December-2018

**शेतकऱ्यांचा अल्प प्रतिसाद :-**

शेतकरी संघटना या शेती व शेतकरी संबंधी प्रश्नांवर आवाज उडवत असले तरी सुध्दा या आंदोलनामध्ये शेतकरीवर्ग कमी प्रमाणात सहभागी दिसतो हे वास्तव चित्रण आहे. या पाठीमागील शेतकरी एक व्यक्ती म्हणून ज्यावेळी सार्वजनिक जीवनात वावरतो तेव्हा ती कुठल्या ना कुठल्या तरी राजकीय पक्षाशी बांधील राहिलेला दिसतो. त्यामुळे शेतकरी संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनात तो सहभागी होत नाही.

त्याच प्रमाणे कृषी माल हा नाशवंत स्वरूपाचा असतो. हा माल तो जास्त काळ ठेवू शकत नाही. कारण त्यातून त्याचे आर्थिक नुकसान होईल अशी त्याची मानसिकता असते. त्यामुळे ही शेतकरी वर्ग आंदोलनामध्ये सहभागी होताना दिसत नाही.

**संदर्भ :-**

१. अशोक चौसाळकर - महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ.
२. डॉ. अशोक ढवळे - महाराष्ट्र राज्यतील किसान चळवळ
३. डॉ. अरूणा पेंडसे - महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ
४. शरद जोशी - शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपध्दती
५. द. ना. धनागरे - पॉप्युलिझम अँड पावर - फार्मर्स मूव्हमेंट इन वेस्टर्न इंडीया १९८०-२०१४गंगाधर मुटे - महाराष्ट्र टाईम्स दि. ०२/१२/२०१६ चा लेख
६. शेतकरी चळवळीचे भवितव्य आणि आव्हाने-

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महिला किसान अधिकार मंच या चळवळीचा चि कित्सक अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा आणि विदर्भ

**डॉ. आर. आर. बैनवाड**
राज्यशास्त्र विभागप्रमुख व मार्गदर्शक
नूतन महाविद्यालय, सेलू
मो.नं. ९९६०३४८७३४

*भारत हा कृषीप्रधान देश असून ७० टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबुन आहे. भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे योगदान मोठे आहे. सुरूवातीला शेतकरी शेतीसाठी लागणारे बि-बियाणे स्वतःच बनवायचा. आजच्या काळात शेतीसाठी लागणारी अवजारे, बि-बियाणे, खते अव्वाच्या सव्वा भावामध्ये विकत घ्यावी लागतात. त्यामुळे भरमसाठ खर्च होतो. वर्षानुवर्षे शेतीत राबूनसुध्दा निसर्गावर अवलंबुन राहावं लागतं. त्याच्या डोळ्यादेखत हिरवं पीक करपून जातं. थोडे फार पिकले तर त्याला बाजारात योग्य भाव मिळत नाही. भाव ठरविण्याचा त्याला अधिकार नाही. अशी गोंधळाची स्थिती शेतकऱ्याची असते. दिवसेंदिवस शेतक-यांवर खाजगी कर्जाचा, सावकारी कर्जाचा आणि बँकाच्या कर्जाचा डोंगर वाढतच आहे. त्यामुळे या सर्व समस्या सोडविण्यासाठी शेतकरी असमर्थ ठरत चाललेला आहे. या सर्व समस्यांतून आपली सुटका व्हावी म्हणून तो आत्महत्येकडे वळत आहे. आत्महत्या केल्याने प्रश्न मिटत नसतात तर कुटुंबामध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात. शेतकऱ्यांची आत्महत्या ही देशासाठी खुप मोठे संकट आहे आणि याचा विचार शासनाने गंभीरतेने करून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येमुळे अल्पभुधारक, कूळ शेतकरी, भूमिहीन शेतकरी, महिला शेतकरी, विधवा महिला शेतकरी यांच्यासमोर अनेक प्रश्न, समस्या, आवाहने उभे आहेत. याची चिकीत्सा या संशोधन निबंधामध्ये करण्यात आलेली आहे.*

**प्रस्तावना -**

देशातील काही महिला एकत्र येऊन अल्पभुधारक, कूळ शेतकरी, भूमिहीन शेतकरी, महिला शेतकरी यांचे प्रश्न सोडवण्यासाठी महिला किसान अधिकार मंचची स्थापना केली. याचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील मजूर महिला, शेतकरी महिला, विधवा महिला यांना त्यांचे अधिकार व हक्क व सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी जवळपास २४ राज्यांमध्ये ही संघटना कार्य करत आहे.

गेल्या सहा महिन्याभरात महाराष्ट्रात आणि दिल्लीत मिळून शेतकऱ्यांचे चार महत्वाचे मोर्चे निघाले. 'महीला किसान अधिकार मंच' (मकाम) च्या नेतृत्वाखाली महिला शेतकऱ्यांनी आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नींनी (विधवांनी) मुंबईमध्ये २१ नोव्हेंबरला आंदोलन केलं. २१ आणि २२ नोव्हेंबरला 'लोक संघर्ष मोर्चा' च्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी आझाद मैदानात ठाण्याहून चालत पोहोचले. त्यामध्ये महिला शेतकरी मोठ्या प्रमाणात होत्या. दिल्लीमध्ये २९ आणि ३० नोव्हेंबरला निघालेल्या शेतकरी मुक्ती मोर्चामध्ये महिला शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन विविध संघटना सामील झाल्या होत्या. तेलंगणातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुली आणि पत्नी मृत पावलेल्या शेतकऱ्यांचे फोटो घेऊन संसदमार्गापर्यंत चालल्या. त्यामुळे या प्रश्नाकडे देशाचं लक्ष वेधलं गेलं.

त्या आधी नाशिकमध्ये १४ नोव्हेंबरला आदिवासी शेतकऱ्यांचा मोर्चा निघाला. त्यातही ५० टक्के महिला शेतकरी होत्या. मुंबई ते नाशिक लाँग मार्चचा पुढचा टप्पा म्हणून नाशिकमध्ये या २० हजार आदिवासी शेतकऱ्यांनी आंबेडकर चौकामध्ये मोठं आंदोलन केलं. यामध्ये महिला शेतकरी केवळ सहभागीच झाल्या नाहीत तर त्यांनी

सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांवर कडाडून टीका केली. ''वनहक्क मिळवण्यासाठी आम्ही एवढे पुरावे दिले आता काय अंगावरची कातडी काढून सिध्द करायचं का?'' असा प्रश्न विभाबाई माळी यांनी विचारला.

देशात सध्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणाऱ्या सुमारे २०९ संघटना आहेत. शेतकरी म्हटलं की पुरूष नेता किंवा पुरूष शेतकरी बोलतोय असंच प्रातिनिधिक चित्र कमी-अधिक फरकाने या संघटनांमध्ये दिसतं. शेतकरी मोर्चाच्या बॅनरपासून ते पहिल्या रांगेत चालणाऱ्या नेत्यापर्यंत महिला शेतकऱ्यांचे चेहरे अगदीच अपवादाने दिसतात. शेतीमधील ६० टक्के कष्टाची कामं महिला करतात, शेतीचा खरा भार त्याच वाहतात आणि तरीही महिला शेतक-यांचे प्रश्न सातत्याने दुर्लक्षीत राहतात. शेतीचे प्रश्न आणि महिलांचे प्रश्न अशा दोन्ही बाजूंनी संघर्षाचा सामना या महिला करत असतात.

**संशोधनाचा उद्देश -**

अल्पभुधारक, कूळ शेतकरी, भूमिहीन शेतकरी, महिला शेतकरी व विधवा महिला यांचे सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय परीस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधद पध्दती -**

सदरील शोधनिबंध लिहीण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. यासाठी दैनिक वर्तमानपत्र, मासिके, शासनाचे अहवाल आणि मकामचा अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**'मकाम' चा विदर्भ व मराठवाड्यातील महिला सर्वेक्षणाचा अहवाल -**

नवऱ्याने शेतीकर्जाला आणि नापिकीला कंटाळून आत्महत्या केली की, काही अपवाद वगळता अनेक महिला एका दुष्टचक्रता अडकतात. कपाळी कुंकू न लावणे वगैरे पुरुषसत्तेच्या बेड्यांमध्ये अनेकजणी आजही समाजासारख्याच अडकलेल्या आहेत. पण शेतकरी महिला म्हणून अभिमानाने आयुष्याला नवी उभारी आणण्यापेक्षा ''आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची विधवा'' ही तिची ओळख बनते. यातील प्रत्येक विधवा शेतकरी महिलेची एक कहाणी आहे. ती थक्क करणारी आहे. देश पातळीवर 'मकाम' ने महिला शेतकऱ्यांचे प्रश्न हा विषय मुख्य प्रवाहात आणला. शेतकऱ्यांची आत्महत्या सरकार दरबारी पात्र ठरते किंवा अपात्र. अपात्र ठरलेल्या आत्महत्येमुळे शेतकरी परत येत नाहीत. कुटुंबाची ससेहोलपट मात्र होते. विशेषतः या शेतकऱ्यांच्या पत्नींच जीवन एक संघर्ष बनतो.

'मकाम' ने विदर्भ आणि मराठवाड्यातील ५०५ महिलांसोबत संवाद साधून एक अहवाल प्रकाशित केलाय. या अहवालातील नोंदीनुसार १९९५ ते २०१५ या काळात महाराष्ट्रात ६५ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात. शेतमजुरांच्या आत्महत्यांच्या या आकडेवारीत समावेश नाही. देशात झालेल्या एकूण शेतकरी आत्महत्येपैकी २० टक्के आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. 'मकाम' च्या सिमा कुलकर्णी म्हणतात, ''पुरूष शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर पाठिमागे राहीलेल्या त्याच्या पत्नीला तीन पातळयांवर संकटाचा सामना करावा लागतो. मानसिक धक्यातून स्वतःला सावरणे, कर्जाची परतफेड करणे आणि कुटुंबाच्या उपजिवीकेची जबाबदारी.''

**विधवा महिला शेतकऱ्यांचे विकासात्मक शासनाच्या उपाययोजना -**

सर्वेक्षणातील टक्केवारी थोडीशी बाजूला ठेवूया. या सर्वेमध्ये महाराष्ट्रातल्या महिला शेतकऱ्यांचे कोणते प्रश्न समोर आले ते बघुया. पेन्शन मिळवतांना योग्य ती माहिती महिलांना न भेटणे, पेन्शनच्या कामासाठी लागणारा वेळ, पैसे वेळच्या वेळी न जमा होणे, कधी जमा होतात हे न कळणे, कागदपत्रांची पुर्तता न करणे, पैसे काढायला लांब जायला लागणे या समस्या आहेत. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील या शेतकरी महीलांच्या दृष्टीने पेन्शनच्या चार योजना महत्वाच्या आहेत. संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना,

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना. विविध निकषांची पुर्तता झाल्यानंतर या योजनेअंतर्गत या महिलांना केवळ ६०० रुपये पेन्शन मिळते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिलांची स्वतंत्र नोंद सरकार ठेवत नाही. त्यामुळे अशा किती महिलांना सरकार पेन्शन देतं किंवा नाकारतं याची आकडेवारी आज महाराष्ट्रात किंवा देशात उपलब्ध नाही. पुढील धोरणं निश्चीत करण्यासाठी ही आकडेवारी नोंदवावी आणि उपलब्ध करून द्यावी अशी मागणी 'मकाम' ने केली आहे.

**विधवा शेतकरी महिलांसमोरील आव्हाने -**

रेशनकार्डसाठीही महिलांना खस्ता खाव्या लागतात. नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्वतंत्र रेशनकार्ड मिळू शकते. त्यासाठी काय प्रक्रिया करायची याबद्दल माहिती नसणे, प्रशासकिय दिरंगाई, कागदपत्रांची पुर्तता न करणे, संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक पैशांची मागणी करणे हे सर्रास येणारे प्रश्न आहेत. शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर संपत्तीवरील अधिकार महिलांना मिळत नाही. पतीच्या मृत्यूनंतर  वारसानोंद होवून त्याच्या मालकीच्या जमिनीमध्ये आणि घरावर महिलेला हक्क मिळत नाही. सासरचे लोक नवऱ्याच्या मृत्यूनंतर घराबाहेर काढतात अशाही तक्रारी काही विधवा महिलांनी केल्या. त्यानंतर प्रश्न येतो तो आत्महत्या केलेल्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचा. या सर्व विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत मिळत नाही. शैक्षणिक सवलत, परीक्षा शुल्कात सवलत, गणवेश, वह्या-पुस्तके यामध्ये सत्तर टक्के महिलांना सवलती मिळत नाहीत. मुलांना घरापासून दुर होस्टेलमध्ये किंवा आश्रमशाळेत ठेवून रोजंदारी करून महिला स्वतःची गुजराण करतात, असंही अस्वस्थ करणारं चित्र दिसलं. सार्वजनिक आरोग्य विभागाने २०१५ मध्ये शेतकऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यात 'प्रेरणा प्रकल्प' सुरू केला. यासाठी १०४ यामध्ये मनोबल हेल्पलाईनची घोषणा करण्यात आली होती.  शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या मानसिक विकाराबाबत पडताळणी करणे, समुपदेशन करणे, पुढील उपचारांसाठी त्यांना जिल्हा किंवा उपजिल्हा रुग्णालयात मानसोपचार तज्ज्ञांमार्फत उपचार करणे हे या कार्यक्रमाचे उद्देश आहेत. २०१६ व्यतिरीक्त या कार्यक्रमांची माहितीही महिला शेतकऱ्यांपर्यंत पाचलेली दिसून आली नाही. महात्मा  फुले जन आरोग्य योजनेची माहिती अनेक कुटुंबीयांना नाही. ज्या शेतकरी महिलांना ही माहिती आजे त्यांनी योजनेचे लाभ मिळवण्यासाठीचं स्मार्ट कार्ड काढलेलं नाही.

शेतकऱ्याने आत्महत्या केल्यानंतर त्या घरात आर्थिक ओढाताण होते. सावकारी किंवा खाजगी कर्ज माफ होत नाही. ते फेडायची जबाबदारी त्या महिलेवर किंवा कुटुंबातील इतर सदस्यांवर येते. बँकाचं कर्ज क्वचित वेळा काही प्रमाणात माफ होतं. खर्चाला कात्री लावली जाते आणि त्याचा सगळयात पहिला बळी असतो तो म्हणजे कुटुंबाचं आरोग्य. उपचारासाठी पैसे नसल्यामुळे आरोग्याची हेळसांड होते.

बीडच्या धानोरा येथील छाया तनमोर ३४ वर्षांच्या आहेत. नवऱ्याची आत्महत्या अपात्र ठरली, कर्जाच्या छायेत जगावं लागलं तरी त्या हरल्या नाहीत. 'रडून वाया जायचं का, लढून संपवायचं ?' असं त्या विचारतात. उस्मानाबाद जिल्हयातील कळंबच्या सविता शेळके यांची १५ वर्षांची मुलगी अपंग आहे. मुलगा आठवीमध्ये शिकतो.  त्यांना सहाशे रुपये पेन्शन मिळते. सासरच्यांनी घराबाहेर काढल्यामुळे आळंदीमध्ये धुणी-भांडी करून त्या गुजराण करतात. मुलीला कोल्हापुरच्या अपंग शाळेत तर मुलाला लातूरच्या होस्टेलमध्ये त्यांन शिक्षणासाठी ठेवलंय. दिडलाख रुपयांच्या कर्जापोटी २०१६ साली त्यांच्या नवऱ्याने आत्महत्या केली आणि तिथून त्यांची परवड आजपर्यंत सुरू आहे.

**महाराष्ट्र शासनाने विधवा महिलांसाठी केलेल्या उपाययोजना -**

महाराष्ट्र सरकारने २००० सालापासून शेतकऱ्यांच्या हितासाठी २४ शासन निर्णय जारी केले आहेत. शेतकरी आत्महत्या रोखणं, आत्महत्या केलेल्या कुटुंबाला आधार देणं याबद्दल उपाययोजना त्यात सुचविण्यात

आल्या परंतू त्याच्या अंमलबजावणीमध्ये कोणताही समन्वय दिसून आला नाही. राज्यस्तरावर समन्वयाची यंत्रणा असावी अशी मागणी 'मकाम' ने महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. अनेक आत्महत्यांच्या घटनांमध्ये शेती ही आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या नावावर नव्हती त्यामुळे त्याला शेतकरी मानला जात नाही. हीच गोष्ट महिलांची. देशात तामिळनाडूमध्ये सर्वाधिक महिला शेतकऱ्यांनी गेल्या वर्षभरात आत्महत्या केल्या आहेत. पण दहा टक्के महिलांच नाव सातबारा उताऱ्यावर होतं त्यामुळे त्या कुटूंबाला शेतकरी आत्महत्येची नुकसानभरपाई मिळाली नाही.

**निष्कर्ष –**

भारतातील शेतकऱ्यांसाठीच्या सर्व योजना या शेतीवरील मालकी हक्कासोबत जोडलेल्या आहेत. पीककर्जापासून ते आत्महत्येच्या नुकसान भरपाईपर्यंतच्या अनेक योजनांचा लाभ महिला शेतकऱ्यांना घेता येत नाही कारण शेतजमिनीवर त्यांची मालकी नसते. या धोरणामध्ये बदल करावा किंवा शेतीवर महिलांचा समान हक्क सक्तीचा करावा, हे पर्याय मकाम आणि इतर संघटना मांडत आहेत. त्याशिवाय, अल्पभुधारक, कूळ शेतकरी, भूमिहीन शेतकरी, महिला शेतकरी यांचे प्रश्न कधीच सुटणार नाहीत. सरकारच्या सर्व योजनांच्या परिघापासून ते तुटलेले राहतील, अशी भूमिका दिल्लीमध्ये मांडण्यात आली.

जगाच्या पोशिंद्याला, जगाच्या अन्नदात्याला आत्महत्येपासून रोखण्यासाठी शासनाने स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या आणि जलसंधारणाच्या कामाची व्याप्ती वाढवली आणि शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी व मुलींना लग्नासाठी सुलभ अल्पदराने कर्ज उपलब्ध करून दिले तर बऱ्याच शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील आणि जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत आणि शेतकरी आत्महत्या झाल्या नाहीत तर महिला विधवा होणारच नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने शासनाने केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी.

**संदर्भग्रंथ –**

१. 'मकाम' चा अहवाल
२. दैनिक वर्तमानपत्रे
३. मासिके
४. शेतकरी मासिक
५. शासनाच्या शेतकरी आत्महत्याचे वार्षिक अहवाल.

# स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी संघटन व जागृती.

**डॉ. उत्तम राठोड**
इतिहास विभाग प्रमुख
नूतन महाविद्यालय,सेलू
ता. सेलू जि. परभणी

**सारांश :-**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात शेतकरी व ब्रिटीश शासन यांच्यातील संबध शोषक-शोषित असे होते. एत्तदेशीय संस्थानेदेखील याला अपवाद नव्हती. साम्राज्यवादी शक्तींशी त्यामुळे साहजिकच शेतकरी वर्गाचा संघर्ष अपरिहार्य होता. ब्रिटीश काळात शेतकरी जमीन मालक न राहता तो खंडाने जमीन कसनारा शेतमजूर झाला. जमीनीची मालकी ही शेतसारा भरणाऱ्या मध्यांस्थाकडे गेली. त्यामुळे स्थानिक जमीनदार, सावकारदेखील शेतकरी उठावाचे, संघर्षाचे लक्ष ठरले. कर्जबाजारी, भूमिहीन शेतकऱ्यांनी आपल्यावरील शासन, सावकार व जमीनदारांकडून होणाऱ्या अन्यायाच्या व शोषणाच्या विरोधात चळवळी उभारल्या. १८५७ ते १९२१ हा कालखंड म्हणजे शेतकरी चळवळीचा शुभारंभ होय. या काळात शेतकरी संघटीत होवून अन्यायाविरूध्द संघटीत झाला.

**उद्देश :-**

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शेतकरी वर्गातील जाणीव जागृतीवर प्रकाश टाकणे.
२. ब्रिटीशकाळातील प्रमुख शेतकरी संघर्षाचा आढावा घेणे.

**स्वरुप व व्याप्ती :-**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शेतकरी वर्गातील जागृतीचा आढावा घेण्यात आला आहे. यासाठी फक्त महाराष्ट्रातील शेतकरी संघटन व उठावांची माहीतीयावर प्रकाश टाकला आहे.

**संशोधन पध्दती :-**

या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक शेतकरी चळवळी झाल्या आहेत. या चळवळी जशा ब्रिटीश शासनाच्या शेतसारा वाढविण्याच्या धोरणाविरूध्द झाल्या, तशाच त्या सावकार, जमीणदार व भांडवलदारांकडून होणाऱ्या शेतमजूर, आदिवासी, खंडकऱ्यांच्या शोषणास विरोध करण्यासाठी संघटीत झाल्याच्या दिसतात.

भारतात ब्रिटीश राजवटीने येथील समाजावर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी अनेक कायदे, नियम केले. शेतीवरील शेतसारा (कर) वाढवून आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे धोरण अवलंबले. तसेच येथील 'जमीनदार, भांडवलदार व सावकारांनीही शेतकऱ्यांना चढ्या व्याजदराने कर्ज देऊन कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या जमीनी बळकवण्याचा प्रयत्न केला. कर्जबाजारी, भूमिहीन शेतकऱ्यांनी आपल्यावरील शासन व सावकार, जमीनदारांकडुन होणाऱ्या अन्यायाच्या व शोषणाच्या विरोधात चळवळी उभारल्या, या चळवळींनी जसे ब्रिटीश शासन व्यवस्थेला आव्हान दिले, तसेच येथील सावकाराशीही व जमीणदारांनीही आव्हान देऊन ती व्यवस्था खिळखिळी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.'१

महाराष्ट्रात सर थॉमस मन्रो व रीड या इंग्रज अधिकाऱ्यांनी मंध्यास्थाऐवजी शेतकऱ्यांकडून सारा गोळा करावा, अशी सूचना केली. 'त्यानूसार १८२० पासून महाराष्ट्रात रयतवारी पध्दती सुरू झाली. त्यामुळे सरकार

ISSN : 2348-7143
December-2018

जमीनदार बनले. शेतकरी सारा भरण्यासाठी कर्ज काढू लागले व कर्जबाजारी झाले'२ शेतसारा वसुलीसाठी अन्नधान्याऐवजी नगदी पिकाला महत्व दीले जाऊ लागले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी अधिकाधिक उग्र स्वरूप धारण केले. इंदापूर तालूक्यात १८७१ व १८७२ साली पाऊस कमी झाल्याने पीक जेमतेम आठ-बारा आणे आले होते. तरीही ठरलेला जबर सारा वसूल करण्यात महसूल अधिकारी दयामाया दाखवण्यास तयार नव्हते. 'तेव्हा १८७३ च्या जुलैमध्ये इंदापूर तालुक्यातील वतनदार देशमुख गोपाळ नरसिंग देशमुख यांनी अडीच हजार शेतकऱ्यांच्या सह्यानिशी मुंबई सरकारकडे एक अर्ज धाडला. आपले हक्क सावकारांनी व सरकारने हिरावून घेतल्याने आपली स्थिती भूदासासारखी झाली असल्याचे गाऱ्हाणे या अर्जात मांडले होते. शेतकऱ्यांची कड घेऊन पुण्याची सार्वजनिक सभाही फॅन्सिस व वॅडिग्टन साहेबांनी १८६६ साली केलेल्या जमाबंदीचा फेरविचार करावा अशी मागणी करू लागली.'३ फॅन्सिस साहेबांच्या जमाबंदीतील उणिवा व दोष दाखविणारा एक अहवाल सार्वजनिक सभेच्या एका उपसमीतीने तयार केला. शेतकऱ्यांची सुस्थिती नसून हलाखीची परिस्थिती असल्याचे सार्वजनिक सभेने दाखवून दिले होते, त्यामुळे मुंबई सरकारनेही या जमाबंदीची फेरतपासणी केली, पुण्याच्या सर्वजनिक सभेने महाराष्ट्रात प्रथमःतहा शेतकरी प्रश्नांवर सरकार दरबारी वाचा फोडली. सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणच्या शेकऱ्यांमध्ये फ्रॅन्सिसच्या जमावाविरूध्द प्रचार केल्याने शेतकरी पूर्वी विंगेट यानी टरविल्याप्रमाणेच सारा देणार असे म्हणू लागले. अहमदनगर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात सावकारांविरुध्द शेतकऱ्यांनी आपल्या विरोधाचा रोख वळवला कारण सारा तेच वसूल करीत, १२ मे १८७५ रोजी भिमथडी तालूक्यातील सुपे येथे त्यांनी वाण्यांची घरे व दुकान लुटली. सावकारांचे दस्ताऐवज नष्ट करण्यात आली कारण त्यात शेतजमीणीचे खरेदीपत्र असत. १८७५ च्या पुणे जिल्ह्यातील दंगलीत कर्जरोखे व दस्तऐवज जाळण्यावर शेतकऱ्यांचा भर होता. सुप्याच्या शेतकरी बंडाचे लोण इंदापूर, पुरंदर, पारनेर, श्रीगोंदे वगैरे ठिकाणी पोहचले, १८७५ च्या शेतकरी उठावास ब्रिटीश शासन 'दखनचे दंगे' म्हणू लागले. लुटालूट, जाळपोळ झाली तरी सावकारांना ठार मारण्यासारखे गंभीर गुन्हे फारच तुरळक प्रमाणात घडले. या लढ्यामुळे इंग्रज सरकार नरमले व १८७९ च्या 'डेक्कन ॲग्रिकच्लरिस्ट रिलीफ ॲक्ट' तयार करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या बंडाची सुरवात तशी १८३२ ला झाली. पुण्यात शेतकऱ्यांनी बळजबरी धान्यवसुलीमुळे दंगा केला. लोकांनी धान्याची कोठारी लुटली. डोईजड कर भरावा लागतो म्हणून १८५२ मध्ये खानदेश येथे जमिनीची पहाणी करण्यास गेलेल्या सरकारी पथकावर शेतकऱ्यांनी हल्ला केला. व दखन दंग्याची पहाणी करून सरकारला निवेदन केले व दख्खन दंग्याची जबाबदारी सरकारवर टाकली. शेतकऱ्यांना कर्ज देण्याची व्यवस्था करा, शेती शिक्षण द्या, अशा मागण्या सरकारपुढे केल्या. त्यामुळे शेतकरी उठाव दुष्काळामुळे सरकारने केर्ड याच्या अध्यक्षतेखली दुष्काळ समिती नेमली. या समितीसमोर सार्वजनीक काका (गणेश वासुदेव जोशी) साक्ष दिली. 'सार्वजनिक सभेच्या माध्यमातून टिळकांनी खंडबंदीची चळवळ सुरू केली. या चळवळीत भाग घेतल्याबद्दल प्रा. अच्चूतराव साठे, दतोपंत आपटे, पराजपे, कारूळकर, पिंपुटकर, या कार्यकर्त्यांवर सरकारने खटले उभारले.'४ 'महात्मा फुले यांनी देखील आपल्या साहित्यातून शेतकरी वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. 'शेतकऱ्यांचा असुड' या त्यांच्या ग्रंथात चिंतनशील व विचारांना अनूभव येतो'५ केवळ शेतकरी व शेतमजूराचांच अंतर्भाव त्यांनी शेतकरी वर्गात केला नाहीतर शेतीशी निगडीत कारागिर व स्त्रिया या सर्वांचा अंतर्भाव महात्मा फुल्यांच्या शेतकरी संकल्पनेत येतो. त्यांनी शेतकऱ्यांचे शोषण करणरा समाजातील दुसरा वर्ग म्हणजे ब्राम्हण वर्गाकडून होणाऱ्या शोषणावरही प्रकाश टाकला आहे. 'ब्राम्हणांचे कसब' या ग्रंथात त्यांही यावर सविस्तर उहापोह करून शेतकरी वर्गात जागृती घडवून आणली. महात्मा फुले यानी प्रत्यक्ष जरी शेतकऱ्यांची चळवळ उभी केली

नसली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून त्यांनी सामाजिक परिस्थितीचा विचार केला. न्यायमूर्ती रानडे यांनी देखिल शेतकऱ्यांची बाजू मांडताना 'मुळात दोन वेळच्या खान्याची तादात असणारा शेतकरी शेतसारा भरणार कुठून व त्यातही सरकारचे तो जबरीने वसूल करायचे म्हटले तर ते अन्यायकारकच आहे,' अशी बाजू दुष्काळ आयोगासमोर मांडली. पुढे जावून ते म्हणाले की, शेतसारा म्हणजे नुसता जमिनीवरचा खंड नाही, तर शेतकऱ्यांची मजुरी व नफ्यावरचा तो कर आहे व या देशात खरा जमिनदारी सरकार आहे, बाकी सर्व बटईदार आहेत. शेतकऱ्यांची क्रयशक्ती दिवसेंदिवस कमी होत आहे व त्यासाठी सरकारी धोरणच जबाबदार आहे. अशी सरकारवर टिका त्यांनी केली, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील इग्रजांच्या या अन्यायी शेतसारा धोरणावर टिका केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी लँड मॉर्गेज बँका, कृषीउत्पन्न बाजार, सहकारी सोसायट्या स्थापन करण्याचे आश्वासन दिले. शेतीचे छोटे - छोटे तुकडे जेणेकरून होणार नाहीत याकडे लक्ष देण्याचे आश्वासन दिले. खोती आणि तालुकादारी पध्दतीतील कुळांना संरक्षण देण्याचे वचन दिले. शेतीवर अवलंबून असणारी संख्या कमी करणे आणि त्यांना औद्योगिक विकासात गुंतविणे.'६ या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहिरनाम्याच्या धोरणावरून डॉ. आंबेडकरांची शेतकरी वर्गाविषयीची कळकळ जाणवते.

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालूक्यातील मुळशी पेट्यातील ५४ गावे टाटानी मुंबई शहरातील कापड गिरण्यांना पाणीपुरवठा व्हावा तसेच वीजनिर्मीती व्हावी यासाठी धरणाखाली जाणार होती. मुळशी धरणाला त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध होता. 'भूसंपादन कायद्याचा दूरपयोग करून सरकार हिंदुस्तानातील निरनिराळ्या प्रांतात भांडवलदार- कारखानदारांचे हित लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणवर जमीन ताब्यात घेत असल्याने असंख्य गरिबांना, घरादारांना , जमिनीला व उदरनिर्वाहाच्या व्यावसायाला मुकावे लागत आहे, या वस्तूस्थितीकडे केळकरांनी काँग्रेसचे लक्ष वेधले होते. काँग्रेसन हा ठराव मंजूर केला.'७ व शेतकऱ्यांच्या सत्याग्रहात भाग घेतल्याने सेनापती बापटांना नऊ वर्षे तुरूंगात काढावी लागली पण या लढ्यामुळेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळाली हेही तितकेच खरे, 'महात्मा फुले शेतकरी विषयक कार्याचा वारसा कृष्णराव भालेकरांनी पुढे चालविला. आपल्या दीनमित्र पत्रात त्यांनी त्याविषयी जनजागृती केली. त्यांनी कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' अशी कंपनी स्थापन करण्याची आवश्यकता स्पष्ट केली.'८ या विचारातूनच शेतकरी संस्था, सहकारी संस्था उदयाला आल्या. सत्यशोधक चळवळ विद्याप्रसारक चळवळ मूलतः जशी होती तशी ती शेतकरी कामकरी व मजूर चळवळ होती. वतनदारी कोणाचिही असो ती नाहीशी करणे, खऱ्या संत्यशोधकाचे कार्य आहे असा प्रचार 'दीनबंधू' या पत्रातून व्यक्त होत असे.

'१९३० ते १९५० या २० वर्षातच कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील ८५ हजार एकर जमीन पाटपाण्याच्या हक्कासह खाजगी साखर उद्योगांच्या हवाली केली व हजारो शेतकऱ्यांना देशोधडीला लावले.'९ त्यामुळे साखर उद्योग हा शेतकऱ्यांच्या शोषनाचा नवीन मार्ग बनला. पण १९४५ साली बेलापूर येथे भरलेल्या शेतकरी मेळ्यात बागायतदार परिषदेसमोर विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या मालकीचा कारखाना असावा असा विचार मांडला, हा विचार डॉ. धनंजय गाडगीळ यांना इतका आवडला की त्यांनी त्यांच्यासोबत शेतकरी वर्गात फीरुन २ लाख रुपये भागभांडवल गोळा करून शेतकऱ्यांचा सहकारी साखर कारखाना उभारुन खाजगी, सावकारी, भांडवलदारी साखर उद्योगास शह दिला.'१० शेतकऱ्यांमध्ये केवळ आर्थिक जागृतीच घडून आली नाही तर आपले हितसंबाध सुरक्षित ठेवण्यासाठी शेतकरी वर्गाला आपला स्वतंत्र पक्ष असावा

ISSN : 2348-7143
December-2018

असे वाटू लागले. '११ सप्टेंबर १९४६ रोजी पुण्यात असंतुष्ट काँग्रेस नेत्यांची बैठक होऊन काँग्रेस शेतकरी कामगार संघ स्थापन झाला.' 'यातूनच शेतकरी कामगार पक्षाची स्थापना दोन वर्षात घडून आली.' ११

**निष्कर्ष :-**

शेतकरी वर्गातील जागृतीमुळे व समाजसुधारणा चळवळीमुळे शेतकरी वर्गातील संघटने बद्दल जाणीव तीव्र झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी आंदोलनामुळे आपली आर्थिक पिळवणूक ही साम्राज्यशाही ब्रिटीशांमुळे होते ही जाणीव निर्माण झाल्याने शेतकरी वर्गाने स्वातंत्र्य चळवळीत आपले योगदान दीले. व शेतकरी चळवळ ही स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनली.

**सदर्भ :-**

१. डॉ. खांदवे एकनाथ, शेतकरी संघटना ते स्वातंत्र्य भारत पक्ष एक वाटचाल, प्रथमावृत्ती, २००६, अहमदनगर, पृष्ठ क्र. ४९
२. राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ.सन. १८१८-१९६०, डायमंड पब्लीकेशन, पुणे, चौथी आवृत्ती, २०१४, पृष्ठ क्र. २०९
३. फडके, य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पहिला, १९०१-१९१४, के, सागर पब्लीकेशन पुणे, द्वितीय आवृत्ती, २००५, पृष्ठ क्र. २४
४. राऊत गणेश, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पृष्ठ क्र. ५२, कित्ता.
५. डॉ. खांदवे एकनाथ, भारतातील सामाजिक चळवळी, सक्सेस पब्लीकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१५, पृष्ठ क्र.५:४.
६. कसबे रावसाहेब, स्वतंत्र्य मजूर पक्ष, समाजप्रबोधन पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर २०१६, पृष्ठ क्र. ७१
७. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड दुसरा, १९१४-१९२०, के, सागर पब्लीकेशन पुणे, द्वितीय आवृत्ती २००५, पृष्ठ क्र. २०
८. डॉ. भंडारे निशा, रा.ना. चव्हाण व्यक्ती व कार्ये, शब्द वैभव प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, २०१८, पृष्ठ क्र. १७५
९. नाईकवाडे अशोक, सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र, ज्ञानेश प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, २०१०, पृष्ठ क्र.१७७
१०. डॉ. गाठाळ एस. एस, शेतकरी - कामगार पक्षाचे मुख्यपत्र सा. जनसत्त चा (१९४१-१९५२) चिकित्सक अभ्यास, सचिव मराठवाडा इतिहास परिषद, अहमदनगर Vol-८ २००४, पृष्ठ क्र.८८

# ऐतिहासिक कामगार चळवळ

**कु. सानिया सर्फराजखान पठाण**
न्यु आटर्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर
एम.ए. (इतिहास),प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह
Email ID : saniyapathan2112@gmail.com

**सारांश:**

*कामगाराची परिभाषा करताना सामान्यपणे आपल्या नजरेसमोर येतो तो श्रमिक वर्ग, मजुर वर्ग, कष्टकरी वर्ग आणि हाच समाजातील एक महत्वपुर्ण असा घटक आहे. जगभरातील या कामगारांनी वेळोवेळी प्रस्थापित सरकारचे लक्ष आपल्याकडे वेधुन घेतले आहे. भारत आणि विशेषत: महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात देखील कामगार वर्गाने उभारलेल्या चळवळींना महत्वाचे योगदान आहे. आपल्या हितसंबंधाचे जतन करण्यासाठी कामगारांनी मजबुत अशा संघटना सर्वत्र उभ्या केल्या. आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आणि इतर सोयी-सुविधा मिळवण्यासाठी कामगारांनी वेळोवेळी आंदोलने केली आणि याच आंदोलनामुळे या "कामगार वर्गाचे " नाव इतिहासाच्या सुवर्ण अक्षरामध्ये कोरले गेले.*

*जागतीक पातळीवर तसेच देश पातळीवर आणि राज्यपातळीवर अनेक नेत्यांनी पुढाकार घेवुन कामगारांच्या हितार्थ संप, मोर्चे, आंदोलने व चळवळी उभारुन कामगारांना संघटीत केले, कामगारांमध्ये जागृतता निर्माण केली आणि त्यांचे हीत जपन्याचा यथोचीत संघर्षाव्दारे प्रयत्न केला. कामगारावर होणारा अन्याय दुर करणे व त्यांचे हितार्थ कल्याण करण्याच्या दृष्टीने अनेक वृत्तपत्रांचा आधार घेऊन त्यांना न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न करणे हे कामगार चळवळीमुळे शक्य झाले.*

**व्याप्ती:**

अर्थशास्त्रीय भाषेत कामगाराची व्याख्या करायची झाली तर ती पुढीलप्रमाणे करता येईल. उच्च किंवा निम्न अशा कोणत्याही स्तरावरील आर्थिक क्रियामध्ये गुंतलेल्या व त्याद्वारे राष्ट्रीय उत्पादनात भर घालणा-या सर्व व्यक्तींना 'कामगार' (Worker) म्हणतात. अर्थशास्त्रीय भाषेत कामगारांचे तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते.

१. नियमीत मजुरी करणारा कामगार.
२. किरकोळ मजुरी करणारा कामगार.
३. स्वयं रोजगारी करणारा कामगार.

देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत दररोज काहीना काही भर घालणारा कामगार हा महत्वाचा व अत्यंत प्रभावी वर्ग असतो. आर्थिक उदयोगाचा तो महत्वाचा कणा असतो. अण्णाभाऊ साठेच्या शब्दात "पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसुन 'दलिताच्या' व 'कामगाराच्या' तळावर तरली आहे". एखादी समस्या सोडवण्यासाठी सातत्याने कृतीशील राहुन व लोकांना संघटित करुन सरकारवर दबाव आणला जातो. अशा सामुहिक कृतीला आपण चळवळ असे म्हणतो. लोकशाहीमध्ये चळवळीला फार महत्व असते. चळवळीतून अनेक सार्वजनिक प्रश्न सोडवता येतात. शासन देखील लोकांची दखल घेऊन त्यांच्या प्रश्नाविषयी तातडीने निर्णय घेते. चळवण ही लोकांच्या प्रश्नाभोवती निर्माण झालेली संघटना असते. लोकांच्या प्रश्नांशी निगडीत असणा-या चळवळीस लोक पाठिंबा देतात. लोकांच्या हिताच्या समस्या शोधून, निश्चित अशी कृती संघटना तयार करण्याची गरज असते तसेच त्यासाठी जनतेचाही पाठिंबा आवश्यक असतो. मग ती संघटना शेतक-याची असो किंवा कामगाराची असो, संघटना ही मात्र मजबुत असावी लागते. अर्थशास्त्राच्या बाबतीत अधिक खोलात न जाता कामगार आणि कामगार वर्गाचा इतिहासातील घडामोडींचा आढावा घेने महत्वाचे वाटते.

ISSN : 2348-7143
December-2018

कामगारावर होणा-या अन्यायाची वाचा फोडण्यासाठी जगभरातील युवकांनी पुढाकार घेऊन क्रांतीला नवी दिशा देण्याचे महत्वाचे काम केले. जागतिक पातळीवर कार्लमाक्स, लेनिन, माओ यांनी वेगवेगळया ठिकाणी या कष्टकरी वर्गांना हाताशी घेऊन क्रांत्या केल्या तर भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रात अठराव्या शतकाच्या शेवटी क्रांतीचे वारे वेगाने घोंगाऊ लागले. या क्रांतीत प्रमुख नेत्यांनी जोरदार गर्जना करुन प्रस्थापित भांडवलशाही व्यवस्थेविरुध्द आव्हान उभे केले. या काळात निर्माण झालेल्या कामगार संघटनांनी अधिक व्यापक स्वरुप धारण केले. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे, महात्मा ज्योतीबा फुले, लाला लजपतराय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद अमृत डांगे, एन.एम. जोशी, बी.टी. रणदिवे, जार्ज फर्नाडिस, शशिपाद बॅनर्जी अशा अनेक महत्वाच्या पुढा-यांनी कामगार चळवळीना नवी दिशा देऊन मार्गदर्शन केले. तसेच कामगार चळवळीत प्राण फुकले व त्यात जीवंतपणा आणला आणि म्हणूनच या कामगार वर्गाची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली.

**उद्देश:**

१. जागतीक, देश व राज्य पातळीवरील कामगारांच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.
२. असंघटीत कामगारांना संघटीत करुन न्याय व हक्कासाठी जागृतता निर्माण करणे.
३. कामगारांचे प्रश्न व समस्यांची सोडवणुक करुन त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करणे.
४. कामगारांच्या आर्थिक आणि सामाजीक सुधारणा घडवुन आणण्यासाठी कायदयाची निर्मिती करणे.
५. कामगारांचे कल्याण करण्यासाठी शासनाच्या विविध योजनांची तरतुद करणे.

जर्मन विचारवंत कार्लमार्क्स याने आपले भौतिकवादाचे सिध्दांत मांडले. कार्लमार्क्सच्या जन्मानंतर २०० वर्षांनी (२०१८) आणि त्यांच्याच दास कॅपिटल या ग्रंथ प्रकाशनाच्या १५० वर्षानंतर जगातील प्रमुख सत्तांवर आपल्या विचारसरणीने आजही ताबा ठेवला आहे. जगभर पसरलेल्या मार्क्सच्या सिध्दांताच्या प्रभावामुळे मार्क्स प्रेषिताच्या रांगेत जाऊन उभा राहतो. लेनिन (रशिया), माओ (चीन), ग्रामची (इटली) यांनी मार्क्सला साम्यवादाचा मसिहा म्हटले आणि आपआपल्या क्षेत्रात त्यांच्या सिध्दांताने प्रभावीत कट्टर समर्थक निर्माण केले. जगभर त्यांच्या सिध्दांताचा विजय आजही आपण पाहत आहे. १८१८ मध्ये जन्मलेल्या मार्क्सच्या जयंतीला २०१८ मध्ये २०० वर्ष पुर्ण झाले आहेत. त्याच्या या विचारांनी व सिध्दांतानी प्रभावित होऊन जगभरातील लाखो कामगार एका झेंडयाखाली आले आणि त्यांनी प्रस्थापित भांडवलशाहीला जोरदार धक्का दिला. मार्क्सला त्याच्या विचारांनी पराभुत केले की त्यांच्या अनुयायांनी ? हा आजही चर्चिला जाणारा जगातला सगळयात मोठा प्रश्न आहे. कारण कम्युनिस्ट राजवट संपली तरीही मार्क्सवाद शिल्लक राहिला आहे. मार्क्सच्या 'दास कॅपिटल' या पुस्तकाने जगावर राज्य केले. त्याच्या धारधार विचारांनी कामगाराच्या मनात नवी उमेद, नवा जोश, नवी दिशा निर्माण केली आणि या लाखो कामगारांनी जगभर क्रांती करुन परिवर्तन घडवले.

अठराव्या शतकाच्या सुरुवातीला होणा-या कामगारावरील अन्याय व अत्याचारांना मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीने खतपाणी घातले. आपल्या द्वंदात्मक भौतिकवादाच्या आधारे मार्क्सने समाजवादी सिध्दांत मांडले. विशिष्ट नियमाच्या आधारे समाज परिवर्तन घडते, हे वैज्ञानिक पध्दतीने स्पष्ट केल्यामुळे आपल्या समाजवादी मांडणीला शास्त्रीय समाजवाद म्हटले. पुढे औदयोगिक क्रांतीने जगामध्ये भांडवलशाहीला जन्म दिला. लघुउदयोग नष्ट झाले. वाढत्या यंत्रसामुग्रीमुळे उत्पादनाचा वेग वाढला. उत्पादन साधनांचे केंद्रीकरण भांडवलदार वर्गाच्या हाती गेले. छोटे उदयोगधंदे नष्ट झाल्यामुळे गरिबांना मजुरी मिळवण्याकरता भांडवलदार वर्गावर अवलंबून रहावे लागले. त्यामुळे समाजात दोन वर्ग निर्माण झाले. त्यातील पहिला वर्ग म्हणजे उत्पादन साधनाची मालकी ज्याच्याकडे आहे असा श्रीमंत वर्ग आहेरे (Haves) तर उत्पादन साधनाची मालकी नसणारा दुसरा वर्ग गरीब वर्ग नाहिरे (Have Nots) . त्यातील महत्वाची बाबच आर्थिक विषमतेमुळे या दोन वर्गातील अंतर अधिक अधिक वाढत गेले. त्यामुळे समाजात अधिक तफावत निर्माण झाली परिणामी श्रीमंताच्या श्रीमंतीत आणि गरिबाच्या द्रारिद्रयात अधिक वाढ झाली.

ISSN : 2348-7143
December-2018

भांडवलदाराच्या शोषण करणा-या वृत्तीमुळे मजुरवर्गात मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला त्यामुळे जगभरात क्रांती घडवून आली व त्यामुळे कालांतराने मोठे परिवर्तन झाले.

कार्लमार्क्सच्या मते "साम्यवादी युग हा मानवी विकासाचा शेवटचा टप्पा आहे." भांडवलदाराविरुध्दच्या क्रांतीत यश संपादन केलेला मजुरवर्गाने काही राजकीय सत्तांना हाती घेऊन भांडवलदाराचे संपुर्ण उच्चाटन घडवून आणले आणि समाजातील वर्ग संघर्ष संपवले. त्यामुळे एकसंध समाजाची निर्मिती झाली. मार्क्सच्या मते "मानवाचा ज्ञात इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे, भांडवलशाहीतील दोषामुळे भांडवलशाही स्वत:चाच विनाश घडवून आणते." "मार्क्सने कम्युनिस्ट मॅनिफेस्टोमध्ये भांडवलदारा विरुध्द कामगार वर्ग यांच्यात संघर्ष पेटला." आणि त्यामुळे जागतिक पातळीवर कामगार एकत्र आले. भांडवलशाहीच्या विरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगार आंदोलनाला तोंड फुटले आणि क्रांतीचा नवा पर्व सुरु झाला व त्यांच्या अनुयायांनी जगभर संघटना निर्माण केल्या. रशिया, चीन, इटली, क्युबा, व्हिएतनाम हे देश स्वत:चा कम्युनिस्ट पक्ष म्हणून घेणारे तसेच मार्क्सचे तत्वज्ञान अंमलात आणणारे आणि प्रतिज्ञेनिशी क्रांतीच्या मार्गाने सत्तेवर आले. लेनिन, माओ, ग्रामची, कॅस्ट्रो, हो-चि-मिन्ह यांनी आपल्या देशात मार्क्सचे विचार व परंपरा राबविली तसेच कामगारांनी क्रांती केल्यानंतर भांडवलदार लगेचच नष्ट झाले नाही. मात्र जुनी समाज व्यवस्था नष्ट होऊन नवीन समाज व्यवस्था निर्माण व्हायला बराच वेळ लागला.

रशियामध्ये प्रसिध्द बोल्शेव्हिक क्रांतीला देखील २०१७ मध्ये १०० वर्ष पुर्ण झाले आहे. १८९७ मध्ये लेनिनने रशियामध्ये कामगार मुक्त लढाऊ संघ स्थापन केला. मात्र संघटनेतुन रशियातील सोशल डेमॉक्रिक पक्ष फुटून बाहेर पडला. १९०३ साली या पक्षात गटबाजी होऊन बोल्शेविकचे नेतृत्व आले. मार्च १९१७ मध्ये कामगारांनी लेनिनच्या नेतृत्वाखाली संप पुकारला. पेट्रोगार्डमध्ये क्रांतीकारकाचे सशस्त्र दल उभारले गेले. ७ नोव्हेंबर १९१७ रोजी रशियन क्रांती घडवून आणली. जनतेच्या हक्काचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. संपुर्ण उदयोगधंदयाचे राष्ट्रीयकरण केले गेले. या क्रांतीमध्ये सैनिक, शेतकरी, सामान्य जनतेचा सहभाग तर होताच पण तितक्याच मोठया प्रमाणात कामगारांचा प्रचंड सहभाग होता. या प्रसिध्द बोल्शेविक क्रांतीने मार्क्सच्या विचाराची धुरा लेनिनने समर्थपणे पेलावलीही. लेनिनच्या मते समाजवादी समाज रचना प्रस्थापित करण्याचा एकमेव अंतिम मार्ग म्हणून लेनिन क्रांतीकडे पाहतो. यात कामगार वर्गाची किंवा श्रमजीवी वर्गाची भूमिका अत्यंत निर्णायक असल्याचे तो म्हणतो.

शेती प्रधान चीनच्या चौकटीत माओने क्रांती केली. कामगार किंवा शेतमजुर वर्गांना एकजुट करुन भांडवलदारांना सत्तेवरुन दुर केले. माओच्या मते कामगार हा क्रांतीचा प्रणेता व भांडवलशाही हे क्रांतीचे लक्ष्य आहे. आपले शोषण संपविण्यासाठी कामगारांनी भांडवलदारा विरुध्द सशस्त्र उठाव करावा आणि त्यांची सत्ता मोडून काढावी व उत्पादनाची साधने ताब्यात घ्यावी. १९२७ मध्ये लाल सैन्याची जमवाजमव करुन गनिमी कावाने युध्द करुन प्रस्थापित सरकारला उलथून पाडले आणि क्रांती यशस्वी केली. क्रांतीचा उपक्रम म्हणून माओने १९५६ मध्ये "शंभर फुले फुल दे, शंभर विचार संप्रदाय निर्माण होऊ दे" ही घोषणा दिली. १९५०-१९७२ मध्ये माओचा चीनवर अधिक प्रभाव होता. त्याने चीनी प्रजासत्ताकची भक्कम उभारणी केली. माओचा हा वेगळापणा म्हणजे विशिष्ट परिस्थितीत शेतमजुरांना त्याने संघटित करुन त्यांच्या मार्फत क्रांती घडवून आणली.

औदयोगिक क्रांती जरी अठराव्या शतकात झाली असली तरी सामाजिक जीवनाला औदयोगिक पाया एकोणिसाव्या शतकात मिळाला. प्रचंड कारखाने उभारले गेले. नवी यंत्रसामुग्री विकसीत झाली त्यामुळे छोटेखानी जुने उदयोग बंद पडले. बदलत्या उत्पादनाबरोबर कामगार वर्ग जन्माला आला. या शक्तीनेच शास्त्रीय समाजवादाच्या तत्वाला जन्म दिला. १८४८ ला लोकशाहीचा हक्क मागणारी चार्टिस्ट चळवळ कामगार वर्गाचे पहिले राज्य निर्माण करणारे पॅरिस कम्यून याच शतकात घडवून आले. अशा देश पातळीवर कित्येक घटनांचा आपण उल्लेख करु शकतो.

मार्क्सच्या विचारांनी प्रभावी झालेला गट स्वत:स कम्युनिस्ट किंवा डावे विचारसरणीचे म्हणवून घेवू लागले. या पक्षाच्या विचाराचे वारे संपुर्ण भारतात वाहू लागले. ब्रिटीश राजवटीत कामगारांवर होणा-या अन्याया विरुध्द हे पक्ष

उभे राहिले. यांनी मोठ-मोठे आंदोलने केली आणि आपल्या मागण्या मान्य करुन घेतल्या. भारतात एकोणविसाव्या शतकाच्या सुरुवातीला आधुनिक कामगार वर्ग उदयाला आला. कामगार विषयक कायदयाच्या संरक्षणाअभावी भांडवलदारांकडून होणारी कामगारांची पिळवणूक, अपुरी मजुरी, कामाचे अवाजवी तास, कामाच्या ठिकाणी असुरक्षित व रोगट वातावरण, आरोग्य उपचाराचा अभाव या सर्व बाबींविषयी कामगारांमध्ये घृना निर्माण झाली होती. पुढे समाजसुधारकांच्या जागृतीमुळे कामगारांच्या मानसिकतेत बदल झाला. आपण आपल्या हक्काविषयी सरकारशी तसेच गिरणी मालकांशी लढले पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले, हळूहळू कामगार चळवळी विकसीत होत गेल्या आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत बदल झाला. त्यासाठी भारतीय कामगारांना बराच संघर्ष करावा लागला शिवाय मागण्या, अर्ज, विनंत्या, मोर्चे, आंदोलने ही देखील करावी लागली. यांच्या या संघर्षचा इतिहास हा भला मोठा आहे. जुलमी ब्रिटीश राजवटीमध्ये आश्चर्याची गोष्ट अशी घडली की, ब्रिटीश भांडवलदारांनीही भारतात कामगारांच्या हक्काचा पुरस्कार केला. यामागे कोणतीही मानवतावादी भूमिका नव्हतीच कारण त्यामागे याचा स्वार्थ कारणीभूत होता. मजुरीच्या कमी दरामुळे भारतीय मालाचा उत्पादन खर्च कमी होतो व त्यामुळे या मालाच्या किंमती तुलनेने कमी ठेवणे शक्य होते. परिणामी ब्रिटीश मालाला उठाव मिळणार नाही या भितीने ब्रिटीश भांडवलदारांनी भारतातील ब्रिटीश सरकारवर कामगार कल्याणाकडे लक्ष पुरवण्यासाठी दडपण आणले. अर्थातच कामगारांना आपल्या हक्कासाठी वेळोवेळी लढा दयावाच लागला. पुढे भारतीय स्वातंत्र्य घडामोडीमध्ये हा कामगार वर्ग राष्ट्रीय आंदोलनाशी एकरुप झ ाला होता.

औदयोगिक क्रांतीला भारतात सुरुवात झालेली होती. ब्रिटीशांनी मोठया प्रमाणात भारतात कापड गिरण्या, ताग गिरण्या, कोळसा खाणी, रेल्वे उदयोगाला सुरुवात केली होती. या सर्व गिरण्यांमध्ये मोबदला मिळवण्याच्या आशेने गरीब भारतीय कामगार कष्ट करु लागले. त्या दरम्यान कामगाराच्या समस्या अधिक-अधिक वाढू लागल्या. कामगारांना कधीही अवेळी गिरणीतून कामावरुन काढले जाई. त्यांच्यावर अन्याय केला जाई. अपुरे वेतन, अपु-या सोई-सुविधा यामुळे कामगारांचे शोषण अधिकच वाढत होते. हे शोषण दुहेरी पातळीवर चालत (परकीय भांडवलदार, भारतीय भांडवलदार). त्यामुळे तर त्यांची परिस्थिती अधिकच बिकट होत गेली. हे कामगार आपल्या समस्या सोडवण्यासाठी भारतीय काँग्रेस तसेच राष्ट्रीय आंदोलनाशी संपर्क करु लागले. सर्वात प्रथम १८७८ मध्ये सोराबजी सपूरजी या बंगाली गृहस्थाने मजुरांच्या कामाचे तास कमी करण्याविषयी मुंबई विधान परिषदेत विधेयक मांडले. परंतु ते विधेयक अमान्य झाले. पुढे बंगालमध्ये ब्रम्हसमाजसेवी संस्थेचे शशिपाद बॅनर्जी यांनी मजुराचे संघटन घडवून आणले आणि १८७० मध्ये भारत श्रमजीवी पत्रिका सुरु करुन कामगारांच्या समस्या सर्वांपुढे मांडल्या.

हिंदुस्थानातील उदयोगधंदयाची वाढ झालेली होती. १८८० साली भारतात ५८ कापड गिरण्या होत्या आणि त्यात काम करणारे कामगार ४० हजाराच्या आसपास होते. लोहमार्ग टाकणा-या कामगारांची संख्या वाढल्यामुळे रेल्वे विभागाचे एक स्वतंत्र कर्मचारीवर्गच तयार झालेला होता. प्रामुख्याने हे देशोधडीला लागलेल्या शेतक-यामधुन आलेले कामगार होते. या कामगारांचे जीवन फार कष्टाचे होते. १८८४ साली इंग्रज सरकारने गिरणी कामगारांच्या हालाखीच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठी आयोग नेमल्यामुळे या आयोगाच्या अहवालातून कामगारांचे हाल प्रथम समोर आले. कामगारांचे होणारे शोषण तसेच अल्प मजुरी, सर्वत्र भडकलेली महागाई त्यामुळे हा कामगार हातावर पोट घेऊन यंत्रावर घाम गाळू लागला. ही परिस्थिती सुधारण्यासाठी कामगारांना दीर्घ संघर्ष करावा लागला.

महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८८० मध्ये मुंबई येथे `दीनबंधू` साप्ताहीक सुरु केले. हे वृत्तपत्र इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेत प्रसिध्द होत असे. दीनबंधू या वृत्तपत्रातून लोखंडे यांनी कामगाराच्या अडचणी विषयी वाचा फोडण्याचे काम केले. १८९० मध्ये देशातील पहिली कामगार संघटना Bombay Mill Hands Association ची स्थापना केली. नारायण मेघाजी लोखंडे या संघटनेचे अध्यक्ष होते तर सोराबजी बेगांली, रसिकलाल घोष, फायजी मानकेजी हे त्या संघटनेचे सदस्य होते. अशी ही संघटना आणि कामगार चळवळ उदयास येण्यास पुढील कारणे महत्वाची ठरली. मुंबईतील कापड गिरण्याच्या यशाने

ISSN : 2348-7143
December-2018

उदयोगधंदयावर परिणाम झाला. मुंबईच्या रॉयल मिलचा अधिकारी मि. ब्राऊन याने महिला आणि १२ वर्षाखालील मुलाची होणारी पिळवणूक थांबण्यासाठी फॅक्टरी ॲक्ट लागू करण्याची मुंबई सरकारला सुचना दिली. प्रत्यक्षात मात्र त्याचा हेतू भांडवलदारांना संरक्षण पुरवणे हा होता. मुंबई मधील गिरणी मालकांनी १८६७ मध्ये Bombay Mill Owners Association ची स्थापन करुन ते स्वत:च्या हितासाठी व स्वार्थासाठी काम करु लागले. फॅक्टरी ॲक्ट जेव्हा बनवला गेला तेव्हा गिरणी मालकांचे प्रतिनिधी त्यावर सदस्य म्हणून नेमले गेले. त्यामुळेच फॅक्टरी ॲक्टला खरा विरोध झाला.

जनतेला जागृत करण्याचे महत्वपूर्ण असे काम वृत्तपत्रांनी केले तथापी जामे जमशेट, रास्तगोफ्तार, नेटिव्ह ओपिनियन इ. वृत्तपत्रांनी फॅक्टरी ॲक्टला विरोध केला तर इंदूप्रकाश वृत्तपत्राने कायदयाच्या बाजुने मत मांडले. तसेच १८७९-९० दरम्यान जागतिक मंदीचा फटका गिरणी मालकांना बसला. म्हणून त्यांनी मजुरीचे दर कमी केले तर काही गिरणी मालकांनी आठवडयातून २-२, ३-३ दिवस गिरण्या बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे कामगाराच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होऊन बेरोजगार व उपासमारीची वेळ आली. म्हणून १८८४ मध्ये लोखंडे यांनी मुंबईत Bombay Mill Hands Association ची प्रचंड सभा भरवली. २०-२५ हजार कामगार या सभेला हजर होते. ही सभा मुंबईतली आणि कदाचित देशातली पहिलीच सभा होती. या सभेतर्फे कामगारांच्या मागण्याचा एक अर्ज सरकारला देण्यात आला. अशाप्रकारे कामगार हे आपल्या हक्काचा लढा लढण्यासाठी सक्रिय होत गेले.

ब्रिटीशांनी भांडवलदार वर्गाचे संरक्षण करण्याच्या हेतूने तसेच भारतीय कामगारांसाठी कायदे पारीत केले.

१. १८८१ - पहिला फॅक्टरी ॲक्ट- अर्बथ नॉट कमिशन
२. १८९१ - दुसरा फॅक्टरी ॲक्ट
३. १८९२ - तिसरा फॅक्टरी ॲक्ट - मेजर लेथब्रीज कमिशन
४. १९११ - चौथा फॅक्टरी ॲक्ट - स्मिथ कमिशन

* १९३८ - बालमजुरी कायदा

अशा या वेगवेगळया कायदयातून कधी गिरणी मालक तर कधी भांडवलदार यांचे हित जोपासले गेले परंतु कायदयात योग्य सुधारणा नसेल त्यावेळी ब्रिटीशांना कामगारांचा रोष देखील ओढावून घ्यावा लागला.

२४ जुन १९०८ मध्ये ब्रिटीशांनी लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला तेव्हा त्यांना ६ वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली. शिक्षा होताच मुंबईतील ८५ गिरण्यातील एक लाख कामगारांनी ६ दिवस संप पुकारला. सर्वत्र हडताळ सुरु झाले. संपात तीस लोक मारले गेले. शंभराच्या आसपास कामगार गंभीररित्या जखमी झाले आणि ७५ कामगारांवर गंभीर गुन्हयाचे खटले भरले गेले. या घटनेची तीव्रता सर्वत्र उमटली. रशियन क्रांतीचा प्रणेता लेनिनने या घटनेचे वर्णन भारतीय कामगारांचा राजकीय क्षेत्रातील प्रवेश असे केले. आणी खरोखरच असा हा हिंदुस्थानात झालेला पहिला राजकीय संप होता.

मुंबई आणि अहमदाबादच्या गिरणी मालकांना मिळणारा नफा हा शेकडा शंभर, शेकडा दोनशे असा होता. मालक लक्षाधीश होते. वाढत्या उत्पादनाबरोबर गरीबीही अधिकच हात पाय पसरवत होती. गिरण्यांना प्रचंड नफा मिळत असुनही मालक वर्ग कामगारांना वेतन वाढविण्यास नकार देत होता. अहमदाबादमधील गिरणी कामगार गांधीजीच्या चंपारण्य सत्याग्रहाविषयी ऐकूण होते. म्हणून त्यांनी गांधीजीकडे होणा-या हाल अपेष्टांचे गा-हाने मांडले. त्यामुळे पुढे कामगार चळवळीला गांधीजीचा पाठिंबा मिळाला. रेल्वे, पोस्ट, खाणी, चहाचे, निळीचे मळे, कापूस, तागाच्या गिरण्या येथील कामगार आपल्या हक्कासाठी संप पुकारु लागले. तसेच राष्ट्रीय चळवळीचे नेते फिरोजशहा मेहता, डी.बी. वालिया, सुरेंद्रनाथ टागोर यांनी बंगाल आणि मुंबई येथे जनसभा भरवून आंदोलकांना मदत केली. १९०३ मध्ये जी. सुब्रमण्यम अय्यर यांनी मजुरांना संगठीत होण्याचे आव्हान केले. तसेच आश्विनकुमार दत्त, प्रभातकुमार राय चौधरी, अपुर्वकुमार घोष यांनी स्वदेशी आंदोलनात राजकीय मुद्दयावर विशेषत: मजुरांचे मुद्दे मांडले. १६ ऑक्टोंबर १९०५ बंगाल विभाजनावेळी बंगालच्या मजुरांनी आंदोलने केली तसेच कानपुर वुलन मिलचे १७,०००

ISSN : 2348-7143
December-2018

कामगार एक महिनाभर संपावर गेले. कलकत्याच्या ताग गिरण्यातील ३५,००० कामगारांनी काम थांबविले. जबलपूरचे १६,००० रेल्वे कामगार, मुंबईचे २ लाख गिरणी कामगार, रंगुनचे २०,००० कामगार, मुंबईच्या डॉक्समधील २०,००० मजुर, टाटा आयर्न अॅण्ड स्टीलचे ४०,००० कामगार, मद्रास-कोईमतूर पट्टयातील २०,००० कामगार, सोलापूरचे १६,००० गिरणी कामगार अशा वेगवेगळया ठिकाणी राष्ट्रीय आंदोलनात संपामध्ये उतरले होते. अशा प्रकारे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जन्माला आलेल्या कामगार वर्गाने राष्ट्रीय चळवळीत आपली प्रभावी उपस्थिती नोंदवलेली होती. महात्मा गांधीनी राष्ट्रीय आंदोलनात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या अहिंसा, सत्याग्रह या शस्त्रांनी प्रभावित झालेले कामगार त्यांच्या पुढील प्रत्येक चळवळीत मोठया संख्येने सहभागी होऊ लागले.

१९१८ मध्ये महात्मा गांधीनी अहमदाबादच्या कापड गिरणीमधील मजुरांच्या प्रश्नात लक्ष घातले. १९१७-१९१८ गुजरातच्या अहमदाबाद शहरात गिरणी मालक आणि कामगार यांच्यात मिळणा-या बोनसवरुन वाद उद्भवला असता. सामाजिक कार्यकर्त्या अनुसूयाबेन साराभाई आणि टेक्सटाईल मिल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष अबालाल साराभाई यांनी महात्मा गांधीना या प्रकारात लक्ष दयावयास सांगितले. विनंतीनुसार गांधीनी अनेक बैठका घेऊन पुढे गिरणी मालक संघटनांच्या अध्यक्षानी १८ मार्च १९१८ रोजी ३५% बोनस देण्याची मागणी मान्य केली. या आंदोलनादरम्यान कामगारांचे मनोधैर्य खचु नये म्हणून गांधीनी आपल्या राजकीय जीवनातील पहिला प्राणांतिक उपोषणास सुरुवात केली (या अहमदाबाद गिरणी आंदोलनाला २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण झाले आहे). यावेळी गांधीजीनी १९१८ मध्ये अहमदाबाद येथेच Ahmedabad Textile Labour Association ची स्थापना केली. देशातील त्या वेळच्या या सर्वात मोठया कामगार संघटनेची सभासद संख्या १४,००,००० इतकी होती. गांधीजीच्या मते "मालकाची भावना अशी हवी की कारखान्याचे खरे मालक कामगारच आहेत. खरेतर संप करण्याची वेळच कामगारांवर येता कामा नये परंतु तशी वेळ त्यांच्यावर येते. संप करणे हा कामगारांचा हक्क आहे. पण तो हक्क वापरतांना कामगार संघटनांनी काही पथ्ये पाळावयास हवीत. संपाचे कारण न्याय्य हवे, कामगारांमध्ये एकवाक्यता हवी. संपात हिंसेला स्थान नसावे आणि संप हे निर्वाणीचे शस्त्र आहे ते कामगारांच्या उत्स्फूर्त लोकशाहीतून व्यक्त व्हावे."

सन १९२९ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने एक स्वतंत्र कामगारविषयक संशोधन विभाग स्थापन केले होते. त्याचे नेतृत्व बकर अली मिर्झा यांच्याकडे सोपवण्यात आले. तसेच पुढे नारायण मल्हार जोशी, लाला लजपतराय, जोसेफ बॅप्टिस्टा, दिवाण चमनलाल यांच्या पुढाकारातून ३१ ऑक्टोंबर १९३० मध्ये मुंबई येथे All India Tread Union Commission (AITUC) ची स्थापना केली. AITUC चे पहिले अध्यक्ष लाला लजपतराय हे होते तर पहिले जनरल सेक्रटरी दिवान चमनलाल हे होते. मजुरांना राष्ट्रीय स्तरावर संघटीत करण्याचे काम AITUC ने मोठया प्रमाणावर केले. AITUC च्या पहिल्या अधिवेशनाला ८०० प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये ६० संलग्न व ४० सहानभुतीदार कामगार संघटनाच्या पाच लाख कामगारांचे पुढारी होते. विशेष म्हणजे या अधिवेशनाचे अध्वर्यू कॉंग्रेसचे पुढारी होते. १९२७ पासून AITUC वर डाव्या विचारांच्या नेत्यांचा प्रभाव पडला. १९४२ पर्यंत AITUC ची सदस्य संख्या ३,३७,६९५ पर्यंत वाढली. सी.आर. दास, पंडित नेहरु, सुभाषचंद्र बोस यासारख्या नेत्यांनी AITUC चे अध्यक्ष पद भूषविले तर अरुणा असफ अली या काही काळ AITUC च्या उपाध्यक्षा होत्या. तसेच ॲनी बेझंट, न.चि. केळकर, बॅ. बास्टिस्टा, बॅ. जिना, अंवतिकाबाई गोखले अशा कितीतरी मंडळीनी AITUC च्या सभांना हजेरी लावली.

१९२७ मध्ये कम्युनिस्ट पार्टीचे पुढारी श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद, पूर्णचंद जोशी, सोहनसिंग जोश, बी.टी. रणदिवे यासारख्या मध्यमवर्गीय नेत्यांनी कामगार चळवळीची धुरा समर्थपणे सांभाळण्याचे कार्य केले. श्रीपाद अमृत डांगे यांनी सोशालिस्ट या नियतकालीकातून आपल्या पक्षाचे उद्देश, ध्येय धोरणे मांडली. कामगार वर्गात जागृतता निर्माण केली. त्या काळात मार्क्सवादी वाड्मय भारतात यायची. कोणतीही सोई उपलब्ध नसे. अशा परिस्थितीत डांगेसारख्या वीस वर्षाच्या तरुणाने महाराष्ट्रात मार्क्सवादी विचाराचा प्रवाह आणला. रशियन क्रांतीने आर्कर्षित झालेले तरुण हे मार्क्सवादाने आर्कर्षित झाले. परंतु डांग्याचे वैशिष्टये असे की ते मार्क्सवादी चळवळीत

ISSN : 2348-7143
December-2018

आले. मुळीच राष्ट्रीय चळवळीच्या हातात हात घालूनच. कामगारांसाठी काम करण्यास लोकमान्य टिळकाचा सल्ला त्यांना कामी आला. तेव्हापासून त्यांचा प्रयत्न हा मार्क्सवादी तत्वज्ञान, भारतीय इतिहास, भारतीय संस्कृतीशी जोडण्यात आला. त्यांनी कामगारांना साम्राज्यवादा विरोधी आघाडीत आणले. स्वातंत्र्याकडे कोणत्या मार्गाने जायचे हा विचार डांगे यांनी महाराष्ट्रात प्रथमच मांडला म्हणूनच कम्युनिस्ट विचाराचे भारतातील महामुनी असा त्यांचा गौरव करतात.

महाराष्ट्राच्या कामगार चळवळीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देखील गौरवाने घेतले जाते. कामगारांच्या समस्या जाणून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. त्यांचे काम स्वातंत्र्यापुर्वी तसेच स्वातंत्र्यानंतर महत्वाचे ठरले. लाखभराची सभा मुंबईत बाबासाहेबांनी भरवली परंतु ती सभा मोडून काढण्यात आली. ७२ कामगार जखमी झाले तर ३५ कामगारांना अटक झाली. परंतु बाबाच्या या संघटनेचा विजय झाला. नोव्हेंबर १९४४ मध्ये कारखाना सुधारणा विधेयक पारित केले गेले. त्यामध्ये सुट्टीच्या दिवशी काम केल्यास बदली रजेची तरतुद आणि पगारी सुट्टया, ओव्हर टाईमचे पैसे मिळण्याचा अधिकार या विषयीच्या तरतुदी होत्या. या सर्व मागण्या पुर्ण करुन घेण्यासाठी आंबेडकरांनी सर्वप्रथम १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. जनता हे स्वतंत्र मजुर पक्षाचे मुखपत्र होते. काबाड कष्ट करणा-या वर्गाचे हित पाहावे हे या पक्षाचे धोरण आहे असे बाबासाहेबांनी घोषित केले. कामगार वर्गाने या पक्षाचे सभासद व्हावे अशी जाहीर विनंती केली. परिणामी आंबेडकर कामगार नेते म्हणून पुढे आले. १९३७ मुंबई प्रातांच्या प्रांतिक निवडणुका स्वतंत्र मजुर पक्षाने लढविल्या. भायखळा, परळ या ठिकाणी राखीव जागेवर बाबासाहेब निवडून आले. व-हाड प्रांतात १५ पैकी ५ जागा मजुर पक्षाने जिंकल्या. मुंबई कायदे मंडळात १५ पैकी ११ जागा मजुर पक्षाने जिंकल्या. या पक्षाच्या आमदाराने मुंबई कायदे मंडळात उत्कृष्ट कार्य केले. १५ सप्टेंबर १९३८ रोजी बाळासाहेब खैर यांच्या मंत्रिमंडळाने कामगारविषयक एक मसुदा तयार केला. त्यात संप करण्याचा कामगारांचा हक्क हिरावून घेण्यात आला. याविषयी आंबेडकरांनी विधानसभेत या विधेयकावर हल्ला केला. "ही कामगारांवर एक प्रकारची गुलामगिरीच लादण्याचा प्रकार आहे," असे त्यांनी म्हटले होते. तसेच व-हाड प्रांतात बिडी कामगारांचे प्रश्न, कोकणातील खोताचे प्रश्न, महाराच्या वतनासंबंधी तसेच कुळ कायदयासंबंधी प्रश्नावर आंबेडकरांनी वेळोवेळी आपली भूमिका मांडली. महिला कामगार संदर्भात देखील कायदे केले. बाबासाहेब हे फक्त बोलके पुढारी नव्हते तर संधी मिळताच कायदा करुन कामगारांचे हित जपणारे कृतीचे कतृत्ववान नेते होते.

१९४२ मध्ये स्वतंत्र मजुर पक्ष विसर्जित करुन अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. बाबासाहेबांच्या या पक्षास कॉंग्रेस, मुस्लीम लीग, गिरणी मालक व मोठे व्यापारी देणग्या देत. १२ जुलै १९४२ ला व्हाईसरॉय लॉर्ड लिगलिथ गो यांच्या कार्यकारी मंडळामध्ये बाबांनी मजुरमंत्री म्हणून शपथ घेतली. मजुरमंत्री या नात्याने देशातील मजुरांच्या कल्याणाच्या संदर्भात त्यांनी अनेक कायदे केले. आज शासकीय कर्मचा-यांना महागाई निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्ता मिळतो. तसेच कामाचे तास १४ तासावरुन ८ तास करणे, प्रॉव्हीडीटी फंडची कल्पना, ESI चा कायदा, महिलांना रात्रपाळीस बंदी, खाणकामगारांना संरक्षण, स्त्रियांना प्रसूतीच्या काळात विशेष भरपगारी रजा, महिला-पुरुष समान वेतनाची तरतुद, खाणीमधील कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने खाणमालकांनी विशेष सोय कराव्या म्हणून १९२३ च्या भारतीय खाण कायदयात संशोधन करणारे विधेयक मंजुर करुन घेतले. १९३४ ला कारखाना कायदयात सुधारणा, युनियनला अधिकार देणारा कायदा तयार केला. यामुळे कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता दिली. ही घटना कामगार चळवळीतील ऐतिहासिक घटना होती. खाणकामगारांची इग्लंड मधून होणा-या आयातीवर बाबासाहेबांनी प्रतिबंध घातले. ७ ऑगस्ट १९४२ मध्ये दिल्ली येथे आंबेडकरांनी त्रिपक्षीय परिषदेची बैठक बोलावली. यामध्ये गिरणी मालक, कामगार आणि सरकारच्या प्रतिनिधींचा समावेश होता. अशी बैठक बोलावण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यामुळे एकमेंकाच्या समस्या सोडवण्यास मदत झाली.

बाबासाहेबांनी १३ नोव्हेंबर, १९४२ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळात भारतीय संघटना सुधारणा अधिनियम कायदा आणला. २१ फेब्रुवारी १९४२ रोजी कारखाने दुरुस्ती विधेयक आणले. आज सध्याच्या घडीला कामगार

संघटनाची विकसीत संकल्पना जी आपल्याला दिसते त्यामागे ख-या अर्थाने बाबासाहेबांचे महत्वाचे योगदान आहे. स्वातंत्र्यानंतर संविधानाची मांडणी करताना त्यांनी समाजातील कष्टकरी वर्गाचा विचार केला. Labor हा विषय घटनेच्या समवर्ती सुचीत ठेवण्याचा सल्ला बाबासाहेबांनी केला तसेच कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी लेबर कमिशनची स्थापना केली. या लेबर कमिशनकडे कामगार न्याय मिळविण्यासाठी जात. १९५३ ला Bombay Labor Welfare Fund Act तयार करुन त्रिपक्षीय लोकांकडून मिळणारा फंड उभारला व या निधीतूनच आज आणि पुढेही प्रश्न सोडवले जातील. अशाप्रकारे बाबासाहेबांनी कामगारांसाठी भरीव काम केले याशिवाय भविष्यात येणा-या सर्व अडचणी सोडवण्यासाठी त्यांनी कामगार वर्गाला कायमस्वरुपी सक्षम बनविले. प्रसिध्द इतिहासकार डॉ इरफान हबीब यांच्यामते "जगाच्या पाठीवर स्त्रियानवर इतिहासातही अन्याय झाला आणि आजही तो होत आहे. जड आणि अधिक श्रमाची कामे आपण स्त्रियांकडेच सोपवितो ही परिस्थिती आपण सर्वांनी मिळून बदलली पाहिजे." तसेच प्रसिध्द कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मागणीवरुन १८९० मध्ये रविवार हा सुट्टीचा दिवस जाहीर करण्यात आला होता. अगदी त्याच अनुषंगाने अधुन मधुन सण-उत्सवाच्या वेळी कामगारांना अधिक सुट्टया दिल्या जाव्यात. सार्वजनिक सुटयांच्या बाबतीत Expedia ने प्रकाशित केलेला Vacation Deprivation Report-२०१७ च्या अहवालानुसार भारताचा जगात ५ वा क्रमांक आहे. हि परिस्थिती बदलली पाहिजे. कामगारांसाठी राष्ट्रीय संघटने अंतर्गत काम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची (International Labour Organization-ILO) स्थापना १९१९ मध्ये स्विझर्लंड येथे झा ाली (आज या संघटनेस १०० वर्ष पुर्ण होत आहेत.) ही संघटना जगभरातील सर्व कामगारांना कामामध्ये सन्माणपुर्वक वागणुक मिळावी तसेच त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास व्हावा या मुख्य उद्देशाने काम करते. याच संघटनेने २०१८-१९ मध्ये जागतीक वेतन अहवाल (Global Wage Report) जाहीर केला या अहवालानुसार जगभरात पुरुषांना महिलांपेक्षा २० % पगार जास्त मिळतो.

**निष्कर्ष :**

निरनिराळया देशातील भांडवलदारांच्या शोषण करण्याच्या वृत्तीमुळे कामगारात मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला. त्यामुळे जगभरात क्रांती घडुन कालांतराने त्यात मोठे परिवर्तन झाले. कामगार वर्ग हा कोणत्याही देशाच्या विकासाचा महत्वाचा कणा आहे. इतिहासात ज्याप्रमाणे कामगार वर्ग आपल्या हक्कासाठी भांडत होता तसाच तो आज आपले अधिकार मिळवत आहे. कामगार संघटनांचे विभाजन जरी झाले असले तरी त्याच्या समस्या, प्रश्न हे एकच आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार दोन्ही कामगारांसाठी वेळोवेळी गरजेप्रमाणे योजना तयार करतात. बेरोजगार लोकांना रोजगार मिळवून त्यांच्या कामात कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु त्या योजना किती प्रभावी असतात हे पाहण्यासाठी त्या योजना शहर ते गाव पातळीवर योग्य प्रकारे राबविले जाणे आवश्यक आहे. एकाच कामगारावर कामाची अधिक जबाबदारी पडल्यामुळे त्याच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो हे टाळण्यासाठी अधिकाधिक कामगार भरती करणे हे महत्वाचे आहे त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाणतर कमी होईलच शिवाय कामाचा व्याप देखील कमी होईल. कामगार हा देशाच्या विकासामध्ये जीव ओतण्याचा वेळोवेळी प्रयत्न करतो म्हणून आपल्या सरकारने देखील त्यांच्या सर्व प्रश्नांची दखल घेणे गरजेचे आहे. उत्पादन कार्यात भाग घेणा-या प्रत्येक स्त्री आणि पुरुष कामगाराला समान आणि योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. कामगारांच्या अडचणी सरकारपुढे मांडण्यासाठी नवनवीन संघटनांचे तरुनांनी नेतृत्व करणे आवश्यक आहे. या संघटनांचे कार्यक्षेत्र हे फक्त शहरी क्षेत्रापुरतेच मर्यादित न राहता गावपातळीवर देखील एकजुटीने विकास झाला पाहिजे. आपल्या मागण्या मांडताना सर्व मतभेद बाजुला ठेवुन संघटनेत निर्माण होणा-या प्रत्येक प्रश्नांची मांडणी प्रभावीपणे करता येणे गरजेचे आहे त्यासाठी कामगार हा निरक्षर नसावा. निरक्षर असणे हा कामगार संघटनेच्या विकासातील एक महत्वाचा अडथळा आहे. त्याशिवाय त्यांच्या शक्तीचे महत्व पटत नाही. आपल्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी कामगार संघटनांनी सरकारवर आंदोलनामार्फत दबाव आणून आपल्या हक्काचा लढा दिला पाहीजे शिवाय महिला कामगारांचे

सुरक्षिततेच्या दृष्टीने वेगवेगळया पातळीवर होणारे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी वेळोवेळी जागृकता निर्माण करणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे कायदे व नियम करुन जर कामगारांची आर्थिक आणी सामाजिक परिस्थिती सुधारली तर कामगारांसाठी साजरा केला जाणारा १ मे हा दिवस त्यांचा यथोचित सन्मान ठरेल.

**संदर्भ :**


१. **Rajiv Ahir-** A Brief History of Modern India specturm publication, २१st २०१५ Edition, page No. ३४३-३४४-३४५-३४६-३४७.

२. **कुमार केतकर-** कथा स्वातंत्र्याची, प्रकाशन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे, आवृत्ती-२०१०, पृ.क्र. ९०-९१, १०५, १६०-१६१, १८१-१८२.

३. **डॉ. बी.एल. गोवर-** आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद कंपनी प्रकाशन, २००८, पृ.क्र. २०४-२०५.

४. **डॉ. रंजन कोळंबे-** भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, १२वी आवृत्ती जानेवारी २०१८, पृ.क्र. ७७-७८.

५. **डॉ. एस.एस. गाठाळ -** महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास प्रकाशन, चतुर्थ आवृत्ती सप्टेंबर २०१७, पृ.क्र. १२५-१२६-१२७-१२८, २३३-२३४-२३५.

६. www.Labour movement- Wikipedia

७. www.Labour movement in Maharashtra

# महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांची आंदोलने

**संशोधक**
**शेख महेमुद शेख हलिम**
एम.ए. इतिहास,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
ई-मेल : mahemudshaikh313@gmail.com
मो. क्र. - ९५०३६४२८२०, ९१४६७८६६८९

**सारांश :**

*प्रस्तुत लघुशोध निबंधात महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा आढावा घेण्यात आलेला आहे. या शोध निबंधात महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांच्या काही प्रमुख नेत्यांची तसेच संघटनांचा अभ्यास करून त्यांच्या काही आंदोनाचा आभ्यास करण्यात आलेला आहे. या अभ्यासातून काही निष्कर्ष ही काढण्यात आलेली आहेत. तसेच या अभ्यासांती असे लक्षा येते की, शेतकरी हा कबाड करून त्याला त्याचा मालाल योग्य भाव अथवा किंमत मिळण्यासाठी संघर्ष करावा लागतो. प्रत्येकजन शेतकऱ्याला खायलाच बसलेला असतो. तथापि महाराष्ट्रातील काही पुढाऱ्यांनी, समाजसुधारकांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दयनिय परिस्थिती मांडण्याचा आपापल्या पध्दतीने प्रयत्न केलेला आढळून येतो. पुढे चालुन शेतकरी, संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना निर्माण झाल्या. त्यांच्या पुढाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी अनेक आंदोलने करून शासनास जाब विचारला. या आंदोलकांनी आपल्या आंदोलनास आक्रमक रूपही दिल्याचे आढळून येते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यास मदत झाली.*

*महाराष्ट्रातील शेतकरी नेते शरद जोशी, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत यांनी सदैव शेतकऱ्यांच्या हितासाठी तढत असतांना आढळून येते. शरद जोशी यांनी शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी, तसेच कांदा, ऊस, तंबाखू, भात, कापूस इत्यांदी पिकांना योग्य भाव मिळावा यासाठी अनेक आंदोलने केल्याने आढळते. या आंदोलनातून शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव, ऊसला एफआरपी दर वाढून मिळाला, कापूस एकाधिकार येजना लागू करण्यात आली. हे या आंदोलनाचे यश होते असे दिसते.*

**प्रस्तावना :**

भारत देश हा कृषीप्रधान देश असून, शेती हा प्राचीन काळापासून भारताच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत शेती व्यवसायात काळानुरूप अनेक बदल होत गेले. शेतीत प्रगती होत गेली. त्याच प्रमाणे शेतीतील पिकांच्या उत्पादनात आधुनिक अवजारांच्या उपयोगाने अमुलाग्र वाढ होत गेली. पिकांमध्ये बदल होत गेला.

भारतामध्ये ब्रिटिश आगमनानंतर शेतीचे व्यापारीकरण झाले. शेतीमध्ये नगदी पिके घेण्यात येऊ लागली. त्यासोबतच शेतकऱ्यांवर विविध जाचक कर बसविल्या जाऊ लागले. शेतसाऱ्याच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून बळजरीने, अन्यायकारकरित्या पैशाची, धान्याची वसुली करण्यात येऊ लागली. तसेच शेतकऱ्यांवर अत्याचार करून नगदी पिके घेण्यास जबरदस्तीने भाग पाडले जात होते. अशा परिस्थितीत शेतकरी उठाव, आंदोलने होणे अपरिहार्य होते. त्यातून भारताच्या इतिहासात निळ उत्पादन करणाऱ्या शेतकत्यांनी उठाव केल्याचे आढळून येते. पुढे कालांतराने केरळमधील मोपला शेतकऱ्यांनी खुप मोठ्या प्रमाणात उठाव केल्याचे सर्वश्रुत आहे.

या शेतकरी चळवळीतुन अनेक संघटना, नेते शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी न्याय व हक्क मिळवण्यासाठी पुढे आले, त्याला महाराष्ट्र राज्यही अपवाद नाही. महाराष्ट्र राज्यात अनेक प्रकारच्या संघटना, नेते उदयास आले. या शेतकरी संघटनांनी तसेच नेत्यांनी शेती प्रश्नाविषयी महाराष्ट्रामध्ये आंदोलने केली. त्या आंदोलनातुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले. शेतकऱ्यांच्या खऱ्या परिस्थितीला शासनासमोर

ISSN : 2348-7143
December-2018

मांडण्याचे कार्य ह्या संघटनांनी केले. या नेत्यांची, शेतकरी संघटनांची उद्देश शेतकऱ्यांची तसेच शेतीची हालाखीची स्थिती कशी सुधारावी, तसेच शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव, मिळवुन द्यावा हा होता. तसेच शेतकऱ्यांना जाणवत असलेल्या भौतिक व आर्थिक अडणींची सोडवणूक करणे. शेतीसाठी लागणारे बि-बियाणे योग्य दरात मुबलक प्रमाणात मिळवुण देणे, शेतीसाठी पाण्याची व्यवस्था करणे, शेतीतून निघालेल्या शेत मालास योग्य तो हमी भाव सरकारकडून मिळवुन देणे, दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करणे, शेत मालासाठी बाजार पेठा उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांच्या हेणाऱ्या आत्महत्यांचे मुळ कारण शोधून ती रोखण्यात योग्य ती उपाययोजना करणे. अशा प्रकारची ध्येय, उद्देश समोर ठेवून या शेतकरी संघटना, नेते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करण्यास विविध प्रकारची आंदोलने करत असतात. त्यामुळे या शेतकरी संघटनाची शेती प्रश्नाविषयी आंदोलनांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे या प्रस्तुत लघुशोध निबंधात महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांचे शेती प्रश्नाविषयी काही आंदोलनांचा अभ्यास करण्यात येत आहे.

**उद्देश :**

- महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटनांच्या आंदोलनाचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांची तसेच शेतकरी संघटनांच्या नेत्यांची शेती प्रश्नांसंबंधी योगदानाची चर्चा करणे.

**व्याप्ती / मर्यादा :**

सदरीत लघुशोध निबंधामध्ये केवळ महाराष्ट्रातील शेतकरी संघघ्टनांच्या आंदोलनाचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रातील विविध नेत्यांनी शेती प्रश्नाविषयी केलेल्या कार्याचा अभ्यास यात करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याचे प्रयत्न अनेकांनी केले, त्यात म. ज्योतिबा फुले, कृष्णराव भालेकर, विठ्ठल रामजी शिंदे, साने गुरूजी, त्रिंबक नारायण अत्रे, नारायण नागो पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर[१] इ. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सविस्तर पहिल्यांदा मांडणी करण्याचे श्रेय महात्मा जोतिराव फुले यांच्याकडे जाते. त्यांची शेतकऱ्यांचा आसूड आणि इशारा ही पुस्तकं या संदर्भात महत्त्वाची आहेत. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे विश्लेषण तत्कालीन जातिव्यवस्थेच्या चौकटीत केल्याचे आढळून येते. परंतु ते करतांना त्यांनी तत्कालीन परकीय ब्रिटिश राजवटीचा विसर पडू दिला नाही. ज्योतीरावांनंतर त्रिंबक नारायण अत्रे यांनी 'गावगाडा' या आपल्या पुस्तकात केल्याचे आढळून येते. ती त्यांनी फुले यांच्या प्रमाणे जातीव्यवस्थेच्या संदर्भात न करता ग्रामस्वस्थेच्या चौकटीत केले. ही चौकट म्हणजेच गावगाड्याच रूपक. अत्रे यांच्या नंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी करण्याचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. त्यानी शेतकरी परिषदा भरवून काही चळवळी केल्या. यानंतर बराच काळ ओलांडल्यावर शरद जोशी यांनी शेतकरी प्रश्नांना वाचा फोडयाचे कार्य सुरू केले. खऱ्या अर्थाने शेतकरी चळवळीचे रूप हे शरद जोशी यांच्यापासूनच आढळून येते. त्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, सदाभाऊ खोत यांचा उल्लेख होतो. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीतील हे महत्वाचे नेते असल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे केला जाऊ शकतो.

- **शरद जोशी :**

शरद अनंतराव जोशी यांचा जन्म सातारा येथे ३ सप्टेंबर १९३५ रोजी झाला. शरद जोशी हे महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचे अग्रगण्य नेते म्हणून संभोधले जातात. शरद जोशी यांनी शेतकऱ्यांची दयनिय स्थिती बघता त्याचय या स्थितीची सुधारणा करण्यासाठी शेतकरी संघटनेची स्थापना ऑगस्ट १९७९ रोजी केली. त्यांनी शेत

ISSN : 2348-7143
December-2018

मालास रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, भात, कापूस इत्यादी पिके पिकविणाऱ्या व दूध उत्पादन करणाऱ्या शेतत्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व, त्यासाठी वारंवार उपोषणे, तुरूंगवास, मेळावे, प्रशिक्षण शिबिरे अधिवेशन वगैरे खूप मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसते. या आपल्या कृतीद्वारे त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींना दूर करण्याचा तसेच त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.[२]

वास्तविक पाहता भारतासारख्या आजही शेतीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेला शेतकऱ्यांची सर्व प्रकारे काळजी घेणे किती गरजेचे आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण प्रत्यक्ष स्थिती पाहता शेतकऱ्यांना कोणी वालीच उरलेला नाही. जो तो शेतकऱ्यांना खायालाच बसलेला आढळून येतो. तसे पाहता देशात प्रत्येक राजकीय पक्षाची शेतकरी आघाडी असते. पण शेतकऱ्यांचाच असा स्वतंत्र पक्ष नाही. ही सद्यस्थिती आहे. याला काही प्रमाणात छेद देण्याचा प्रयत्न शेतकरी नेते शरद जोशी यांनी १९७९ मध्ये शेतकरी संघटना स्थापून करण्याचा प्रयत्न केलेला दिसन येतो. एखादा वणवा भडकावा तशाच प्रकारे शेतकरी संघटना महाराष्ट्रात खासकरून उत्तर व पश्चिम महाराष्ट्रात पसरली. जोशींनी 'रास्ता रोको', 'रेल रोको' वगैरे आंदोलने करून शेतकऱ्यांच्या मालाला जास्त भाव मिळवून दिले.

जोशींच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी फक्त भाववाढीचे लढे लढवले नाही, तर शेतकऱ्यांच्या चळवळीला तात्विक अधिष्ठाण मिळवून दिले. त्यांची भारत विरूध्द इंडिया ही मांडणी आगळीवेगळी होती. फक्त शहरी भारताचा विचार करणाऱ्या योजनाकारांच्या डोळ्यात अंजन घालणारी होती.

१९८० च्या दशकात जोशी व त्याच्या शेतकरी संघटनेने लोकप्रियता खूप मोठ्या प्रमाणात वाढली होती. त्याच काळात त्यांची भेट मार्क्सवादी अभ्यासक शरद पाटील यांच्याशी पडली. शरद पाटलांनी त्यांना महिलांना राजकारणात आणण्याची सूचना केली. शरद पाटलांच्या मते पुरूषांनी राजकारणाचा बट्ट्याबोळ करून टाकला आहे. राजकारणातील सुधारणा ह्या फक्त महिलाच करू शकतील ही बाब शरद जोशी यांना फार आवडली व त्यांनी १९८६ साली नाशिक येथे 'शेतकरी महिला आघाडी' स्थापन केली.[३]

**शेतकरी संघटनेची आंदोलने :**

**शेगांव येथील शेतकऱ्यांचे रेल रोको आंदोलन (नोव्हेंबर, २०१०) :**

नोव्हेंबर २०१० मध्ये शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शेतकरी संघटनेचा शेगाव येथे मेळावा पार पडला. या विविध मान्यवर उपस्थित होते. अनेक मान्यवरांच्या भाषणानंतर शरद जोशींनी आपल्या भाषणात धान आणि कापसाची निर्यात खुली करा, ऊसाला पहिली उचल २२०० रू. द्या. इत्यादी मागण्यांच्या समर्थनार्थ तसेच शेतीतील वीज तोडलेली तातडीने जोडून द्या या मागण्यांच्या संदर्भात 'रेल्वे रोको' आंदोलन करण्याचे आदेश दिले. त्यानंतर तेथे उपस्थित शेतकरी रेल्वे स्थानकाकडे धावले आणि त्यांनी बराच वेळ रेल्वे अडवून धरल्या शेतकरी रूळावर ठिय्या मांडून बसले होते.[४]

**शेतकरी संघटनेतर्फे घटनेच्या प्रतिकात्मक प्रतीचे दहन (एप्रिल, २०११)**

भारतीय राज्यघटना मनुस्मृतीचे रूप आहे. त्यातून शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे. असा आरोप करीत शेतकरी संघटनेतर्फे राज्यघर्टनेच्या परिशिष्ट '९' च्या प्रतिचे प्रतिकात्मक दहन करण्यात आले. शेतकऱ्यांना कुठलाही लाभ मिळत नाही याचे हेच कारण असल्याचे त्यांनी सांगितले. घटनेतील पहिल्या दुरूस्ती (१९५२) अन्वये परिशिष्ट '९' नुसार शेतकऱ्यांना मालमत्ता संपादन करण्याचा मुलभूत अधिकार नाकारला आहे. मालमत्तेच्या व्यवहारावर राज्यसत्तेचे नियंत्रण आले शेतकरी नाममात्र मालक ठरला तसेच घटनेतील दुरूसती (१९५५) अन्वये जीवानावश्यक वस्तु कायदा करण्यात आला त्यामुळे शेतकऱ्यांचा नैसर्गिक बाजारपेठामध्ये

मालाचा भाव ठरविण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना नाकारले. याचा राग, निषेध म्हणून घटनेच्या परिशिष्ट '९' च्या प्रतिकात्मक प्रतिचे दहन करण्यात आले.[५]

**केंद्र सरकारचे दहन (मार्च २०१२)**

केंद्र सरकारचे आयात-निर्यात धोरण शेतकऱ्यांभिमुख असावे अशी मागणी शेतकरी संघटनेने वारंवार लावून धरलेली होती. जेणेकरून खुल्या अर्थव्यवस्थेचा फायदा शेतकऱ्यांनाही मिळू शकेल. परंतु शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्याची कोणतीही आशा दिसन नव्हती त्यामुळे केंद्र शासनावर शेतकऱ्यांनी रोष उठवला.

शासनाच्या दरवर्षीच्या घोषणाबाजीनंतर मतदान संपल्यावर केंद्र शासनाने निर्यात बंदीची घोषणा केली होती. त्यामुळे देशांतर्गत कापसाचे भाव खूप मोठ्या प्रमाणात पडले. त्यामुळे व्यापाऱ्यांनी कापसाची खरेदी थांबवली. तथापी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक कोंडी झाल्याचे चित्र समोर उभे राहिले. तसेच आर्थिक अडचणींमुळे, कर्जबाजारीपणामुळे अनेक कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. केंद्र शासनाच्या धोरणाचा फायदा केवळ गिरणीमालकांनाच झाला. त्यांना स्वस्थ भावात कापसाची उपलब्धता होणे हाच केंद्र शासनाचा उद्देश असावा अशा प्रकारे निर्यात बंदी करून शेतकऱ्यांचा शासनाने विश्वासघात केला.

या कापसाच्या निर्यात बंदीचा निषेध करण्यासाठी वर्धा जिल्हा शेतकरी संघटनच्या वतीने मार्च २०१२ वर्धा येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला महात्मा गांधी पुतळ्यासमोर 'केंद्र शासनाचा प्रतिकात्मक पुतळा' जाळून होळीचा सण साजरा केला आण निषेध नोंदविला व शेतकऱ्यांनी आर्थिक कोंडी न करता तातडीने कापूस निर्यातीला परवानगी द्यावी अशी मागणी करणारे निवदेन शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत केंद्र सरकारला सादर केले.[६]

**मुख्यमंत्र्याच्या घरासमोर ठिय्या आंदोलन (नोव्हेंबर २०१४) :**

कापसाला ६ हजार, सोयाबीनला ५ हजार आणि धानाला ३ हजार रूपये प्रति क्विंटल भाव, शेतकऱ्यांना कर्ज आणि वीज बिलातून मुक्ती, उत्पादन खर्च व त्यावर ५० टक्के नफ्याच्या आधारावर शेतमालाचे भाव ठरवून वचनपूर्ती करा, कांदा, बटाट्याला जीवनावश्यक वस्तू कायद्यातून काढून निर्यात बंदी हटवा अशा विविध प्रमुख मागण्यांच्या समर्थनार्थ शेतकरी संघटनेचे प्रणेते मा. शदर जोशी यांच्या नेतृत्त्वात दिनांक ३० नोव्हेंबर २०१४ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.[७]

**गाव बंदी आंदोलन :**

सर्वपक्षीय नेत्यांना गावागावात अडवा असे आव्हाहण शरद जोशी यांनी आपल्या शेतकरी बांधवांना केले. शेतकऱ्यांच्या आडचणी, समस्या, आक्रोश ऐकायला शासन आणि नेत्यांकडे वेळ नाही. शरद जोशी यांनी प्रकृती अस्वस्थ्यामुळे पुढे आंदोलनात सहभागी होणे शक्य होणार नाही, वारंवार आंदोलनाच्या निमित्ताने मुंबई, नागपूरला जाणे गरीब शेतकऱ्यांना परवडणारे नाही. यामुळे शेतकऱ्यांना आपआपल्या गावातच 'गावबंदी' आंदोलन करून राजकीय नेत्यांना जाब विचारा असे आव्हाहन करून गाव बंदी आंदोलनाची घोषणा केली.

अशा प्रकार शरद जोशी व त्यांच्या शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या हिताची जोपासना करण्यासाठी प्रस्थापित शासनाच्या विरूध्द अनेक आंदोलने केली. त्यांच्या अनेक आंदोलनांना यशही मिळालेले आहे.

- **राजू शेट्टी :**

राजू शेट्टी हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे (पक्षाचे) संस्थापक आहेत. त्यांनी शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेमध्येही काम केले.[१] नंतर काही मतभेदामुळे ते शेतकरी संघटनेतून बाहेर पडून त्यांनी स्वाभिमानी शेतकरी

संघटना स्थापन करून शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी राजकीय व्यासपीठ स्थापून लढण्यास सुरूवात केली. त्यानी आपल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रभर अनेक आंदोलने केली. त्यांनी आपल्या आंदोलनात शेतकत्यांच्या अनेक समस्यांकडे सरकारने लक्ष द्यावे अशी मागणी सतत केली.[१०] त्यांच्या काही आंदोलनांचा आढावा पुढील प्रमाणे -

**कांदा वाटा आंदोलन (मे, २०१६) :**

कांद्याचा भाव उतरल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची दयनीय परिस्थिती झाली. या परिस्थितीची दखल शासनाने घेतलेली नाही. त्याचा निषेध करण्यासठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कांदे वाटप करून 'कांदा वाटप आंदोलन' केले. तसेच कांदे रस्त्यावर फेकून सरकारचा निषेध केला.[११]

**कांदा भाकरी खाओ आंदोलन (ऑगस्ट, २०१६) :**

कांद्याला हमी भाव मिळावा यासाठी 'कांदा भागरी खाओ' आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने नाशिक येथे करण्यात आले.[१२]

**कांदा आणि तुर डाळ फेको आंदोलन (जुलै, २०१७) :**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच्या दुसऱ्या दिवशी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने विधान भवनाच्या गेट बाहेर 'कांदा आणि तुर डाळ फेको' आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी सहभागी होते.

या आंदोलन शमवण्यासाठी पोलीसांनी खुप मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेत्याना रोकण्याचा त्यांनी पुरेपुर प्रयत्न केला. शेवटी अनेक कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आणि हे आंदोलन रोकण्याचा प्रयत्न केला. या आंदोलना कांद्याला हमी भाव देण्यात यावा अशी प्रमुख मागणी करूण्या आली होती.[१३]

**निलंगा-लातुर रास्ता रोको आंदोलन (नोव्हेंबर, २०१८):**

दुधास थेट अनुदान द्यावे, यासह अन्य विविध मागण्यांसाठी निलंगा तालुक्यातील कवठा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.[१४]

**ऊस आंदोलन (चक्का जाम) :**

ऊसाला एफआरपी दर मिळावा, तसेच दर जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरू करून नयेत या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सांगली येथे आंदोलने केले. या आंदोलनात ऊस कारखाने सुरू करू नये अशी मागणी करण्यात आली होती तरीही काही कारखाने सुरू केल्यामुळे या आंदोनकांनी सांगलीतील जिल्हाधिकारी कार्यालयावर दगडफेक केली. तसेच वसंतदादा आणि राजाराम बापू कारखान्यांची विभागीय कार्यालये पेटवून दिली. त्यामुळे या आंदोलनास आक्रमक स्वरूप मिळाले. या प्रकरणाची धास्ती घेवून पुढे अनेक कारखाने बंद करण्यात आली.[१५]

**रास्ता रोको आंदोलन (नोव्हे. २०१८) :**

सातारा जिल्ह्यात एकाही साखर कारखानदारांनी ऊसाचा दर जाहीर केलेला नसल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली होती. शेतकऱ्यांच्या ऊस दर आंदोलनामुळे पुणे-बंगळूरू मार्ग बंद झाला होता. या आंदोलकांनी रास्ता रोकून साखर कारखानदारांनी लवकरात लवकर ऊस दर जाहीर करावेत, तसेच एफआरपी दर वाढवण्यात यावा या मागणीसाठी आंदोलन केले.[१६]

अशा प्रकारे राजू शेट्टी आणि त्यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने अनेक आंदोलने केल्याचे दिसून येते. या आंदोलनाव्यतिरिक्त कोल्हापूर येथे दूध दरासाठी, पुण्यात दुधकोंडी, आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांची पूजा रोखण्याचा इशारा, साखर संघटनेवर धडक मोर्चा, दालमिया साखर कारखान्यावर हल्ला, पीएमआरडीए च्या भूसंपादनाविरोधात आंदोलन अशी तसेच अनेक आंदोलने स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केलेली आहेत.[१७]

**निष्कर्ष :**

- महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनांनी शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडली.
- कांदा हे नाशवंत असल्याने व कांदा साठवणूकीची सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना व्यापारी ठरवेल तो भाव द्यावा लागे. या आंदोलनातून कांदाचाळ बांधण्यासाठी शासनाने अनुदान देण्याचे वचन दिले व ते आज प्रत्यक्षात अंमलातही आले आहे.
- ऊस या नगदी पिकाला किमान मुलभूत किंमत मिळाली.
- कापूस एकाधिकार योजना सुरू झाली.
- ऊस, कांदा, कापूस यांना हमीभाव मिळाला.
- पंचायत समितीमध्ये धान्य खेदीसाठी मुलभूत किंमत देण्यात आली.

**संदर्भ :**

१. विकीपेडीया - महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ
२. विकीपेडीया, शेतकरी नेते शरद जोशी
३. डॉ. सदानंद मोरे, शरद जोशी आणि शेतकरी चळवळ, सकाळ, सप्तरंग, लेख, डिसेंबर, २०१६.
४. दै. लोकमत, ११ नोव्हेंबर, २०१०.
५. दै. लोकमत, दि. १४ एपिल, २०११.
६. दै. लोकमत, दि. ८ मार्च, २०१२.
७. महाराष्ट्र टाईम्स, दि. १ डिसेंबर, २०१४.
८. विकीपेडीया, शेतकरी संघटनेची आंदोलने
९. प्रा. अविनाश कोल्हे, शदर जोशी, शेतकरी संघटना आणि शेट्टी-खोत संघर्ष, महाराष्ट्र तरूण भारत, लेख, २५ सप्टेंबर, २०१७.
१०. विकीपेडीया, राजू शेट्टी या संकेतस्थळास भेट, दि. ०९/१२/२०१८
११. महाराष्ट्र टाईम्स, दि. ८ मे, २०१६
१२. abpmajha.abplive.in या संकेतस्थळास भेट, दि. ०९/१२/२०१८
१३. महाराष्ट्र टाईम्स, ६ मार्च, २०१७
१४. http//www.lokmat.com/latur/rastarok-movement-swabhimani-shetkari-sanghatana-nilanga-mpl या संकेतस्थळास भेट, दि. ०८/१२/२०१८
१५. www.loksatta.com, दि. ८/१२/२०१८ रोजी संकेतस्थळास भेट
१६. दै. लोकसत्ता, ११ नोव्हेंबर, २०१८
१७. zeenews.india.com/Marathi/tags/swabhimanishetkarisanghatechi:andolane

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे ऊसतोड कामगारांचे प्रश्नासंबंधी विचार

**डॉ. बी.के. शेप,**
इतिहास विभाग प्रमुख,
वैद्यनाथ कॉलेज, परळी वै.

महाराष्ट्र राज्यातून दरवर्षी जवळपास १४ लाख लोक ऊसतोड कामगार म्हणून स्थलांतरीत होतात. तर बीड जिल्हा हा महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हातून जवळपास चार ते पाच लाख उसतोड कामगार कामासाठी स्थलांतरीत होतात. ऊसतोड कामगार हा साखर उद्योगातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. राज्यामध्ये साखर उद्योगातील कामगार वर्गाच्या तीन संघटना आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य साखर कारखाना प्रतिनिधी मंडळ पुणे ०४, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना महासंघ अहमदनगर, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार फेडरेशन अहमदनगर या संघटनेच्या माध्यमातून कामगार वर्गाचे प्रश्न सोडविले जात असत. परंतु त्यांची स्वतंत्र अशी काही संघटना नव्हती. कामगारांना मिळणारे वेतन कमी असल्यामुळे त्यांचे हितसंबंध दुखावले गेले. त्यामुळे उत्तरोत्तर काळात ही कामगार चळवळ फोफावत गेली. ऊसतोडणी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य बीड जिल्हातील माजी केंद्रिय मंत्री बबनराव ढाकणे, गोपीनाथराव मुंडे, श्रीरंगराव भांगे, किशोर पवार, मधुकर कात्रे इत्यादींनी केले. बीड जिल्ह्यातील ऊ सतोड कामगार वर्गाची संख्या वाढत गेली, परंतु त्यांच्या वेतनात वाढ झली नाही कारण अशा लोकांमध्ये असंघटित नेतृत्व असल्याने त्यांच्याकडे लक्ष देणे काळाची गरज होती, म्हणून साखर कारखान्यातील कामगार संघटनेने ऊसतोड कामगारांचा प्रश्न सोडविला पाहिजे असा जोर धरला. ऊसतोड कामगारांचे वेतन, त्यांना मिळणा-या सुविधा, त्यांची होणारी पिळवणूक, इत्यादी बाबतीत या संघटनेची भूमिका आग्रही होती. कामगारांच्या प्रश्नावर लक्ष देण्यास जिल्हयातील पुढा-यांना वेळ नव्हता. अशा परिस्थितीत माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणे व गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली इ.स. १९८६ ला कामगारांच्या न्याय्य मागण्यासाठी संघटना स्थापन करुन पहिला लढा दिला. त्यावेळी बीड जिल्ह्यातील चिंचवण येथे महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण साखर संघाचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते पाटील यांनी पहिली बोलणी केली. यामध्ये प्रति टन ७ रुपयांवरुन ६२% दर वाढ मजुरांना देण्यात आली. सर्वात जास्त वाढ होणारी ही पहिली वेळ होती.

ऊसतोड कामगारांचा लढा हा जवळपास २२ वर्षांपासून चालू आहे. ऊसतोड कामगार वर्गात बहुतांशी वंजारी समाजाचे लोक होते. या कामगारांचे नेतृत्व युती शासन सत्तेवर येताच गोपीनाथराव मुंडे यांच्याकडे आले. गोपीनाथराव मुंडे यांनी ऊसतोडणी व वाहतुक कामगारांची संघटना समांतर काढून इ.स. १९९५-९६ मधील हंगामात संप घडवून आणला. गोपीनाथराव मुंडे यांना विरोध म्हणून काही काँग्रेसप्रणित साखर कारखान्यांनी ऊसतोड कामगारांशिवाय कारखाने सुरु करण्याचा निर्णय घेतला. ऊसतोड कामगार वर्गाचा संप नष्ट करण्यासाठी कारखान्यांनी कारखान्याच्या ऊस उत्पादक सभासदांना स्वतः ऊस तोडून कारखान्याच्या गव्हाणीत आणून टाकण्यास सांगितले. अशा प्रकारे मालक तोडीमुळे उसाचा पुरवठा कमी झाला. त्यामुळे १५ दिवस लोटले तरी साखरनिर्मिती झाली नाही अशी घटना राज्यात प्रथमच घडली असावी.

इ.स. १९९५-९६ च्या गळीत हंगामात ऊसतोड कामगार वर्गांनी आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे ऊस तोडणीचा प्रश्न गंभीर बनला. हा संप जवळपास एक महिन्याचा होता. त्यावेळी शासन युतीचे असले तरी साखर संघावर काँग्रेसचे वर्चस्व असल्यामुळे साखर संघाने गोपीनाथराव मुंडे यांच्या संघटनेला विचारात न घेत आमदार बबनराव ढाकणे यांनी यांच्याच संघटनेशी वाटाघाटी केल्या. या संपाच्या वाटाघाटीत मजुरी दरामध्ये २५% वाढ देण्याचे मान्य केले.ऊसतोडणी

ISSN : 2348-7143
December-2018

व वाहतुकीच्या दरात २५% दिसून येते. त्यामुळे साखरसंघाचे कामगार वर्गाची दिशाभूल केल्याचे दिसते व हा करार तीन वर्षाऐवजी चार वर्षांचा करण्यात आला.

इ.स. १९९५-९६ मधील निवाड्यांच्या वाटाघाटीत साखर संघाने ऊसतोड कामगार वर्गाची दिशाभूल केली व तीन वर्षाच्या कराराऐवजी चार वर्षांचा करार करुन ऊसतोडणी व वाहतुकीच्या दरात २०% वाढ दिली. तीन वर्षांपासून सतत महागाई वाढत आहे. परंतु कामगारांच्या मजूर दरात वाढ होत नाही म्हणून गोपीनाथराव मुंडे प्रणीत संघटनेने इ.स. १९९८-९९ या गळीत हंगामात संप घडवून आणला. तर बबनराव ढाकणेप्रणित संघटनेने गोपीनाथराव मुंडेची संघटना कामगाराची दिशाभूल करीत आहे, चार वर्षाचा करार झल्याने संप करण्याची गरज नाही अशी पत्रकबाजी करुन संप फोडण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात युतीशासन सत्तेवर आल्यामुळे गोपीनाथराव मुंडे यांच्या संघटनेची ताकत वाढली हा संप सुरु झाल्यानंतर इतर संघटनांनीदेखील या संपाला पाठिंबा दर्शविला. त्यामध्ये ऊस तोडणी वाहतूक, मुकदम कामगार युनियन मु. पाथर्डी, जि. अहमदनगर या संघटनेने साखर संघास दिलेल्या संपाच्या नोटिसीत पुढील मागण्या सादर केल्या

१. महागाई वाढल्याने मजुरी दरात किमान २५% वाढ मिळावी.
२. प्रत्येक कारखान्यावर कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु कराव्यात.
३. ऊस तोडणी कामगारांसाठी स्वतंत्र महामंडळ सुरु करावे.
४. ऊसतोडणी मजुरांना माथडी कायदा लागू करावा.
५. कामगारांना आवश्यक त्या वैद्यकिय सुविधा व निवारा उपलब्ध करुन कारखाने द्यावा.

इ. मागण्यांचा समावेश होता. या मागण्या कामगार वर्गाच्य दृष्टीने महत्वाच्या होत्या. राज्य साखर कामगार महाराष्ट्र राज्य ऊसतोडणी व गाडीवान कामगार युनियन बीड या संघटनेने कामगारांची पिळवणूक थांबविण्यासाठी पगारपत्रके व हजेरीपत्रक ठेवावीत, प्रॉव्हीडंड फंड, किमान वेतन, कंत्राटी कायदा इ. मागण्या केल्या. उत्तरोत्तर काळात कामगार वर्गाचे शोषण होत आहे. हे शोषण थांवण्यिासाठी अशा प्रकारच्या संघटना या काळात प्रभावीपणे कार्यरत आहेत. त्यामुळे ऊसतोड कामगार वर्गाची होणारी पिळवणूक थांबेल ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधीमंडळ राज्य सरकारने संपात हस्तक्षेप करुन वाटाघाटीने त्वरीत संप मिटवावा असे केले. संप कालावधीत ४ नोव्हेंबर १९९८ रोजी पैठण-शेगाव रस्त्यावरील रिकाम्या बेलगाडया शेगावच्या दिशेने परत वाठविल्या. तसेच मराठवाडयातील ऊसतोड कामगारांना आणण्यासाठी दक्षिण विभागातील ५०० ट्रक परत पाठविल्या. दि. १ ऑक्टोबर १९९८ रोजी वंजारी व इतर बहुजन समाजाचे श्रद्वास्थान असलेले भगवानगड, ता. पाथर्डी जि. अहमदनगर याठिकाणी संघटनेच्या नेतृत्वाच्या मुद्यावरुन ढाकणे-मुंडे यांच्यात शाब्दिक विसंवाद झाला. दि. ३१ ऑक्टोबर १९९८ रोजी साखर संघाचे तत्कालीन अध्यक्ष आ. नरेंद्र बोरगावकर, आ. अजितदादा पवार, मुख्य सचिव पितांबर अन्य संचालक, ऊसतोड कामगारांचे प्रतिनिधी व राज्याचे मुख्य सचिव पितांबर सुब्रह्मण्यम यांच्या उपस्थितीत झालेली बोलणी फिस्कटली. साखर संघाचे प्रतिनिधी आमच्या एकाही मागणीचा विचार करीत नाहीत, असे ऊसतोड कामगार संघटनेच्या वतीने जाहिर करण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात मुंबईत कृषी मेळाव्याचे उद्घाटन करण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आले असता, कामगारांनी संप मिटविण्याचे निवेदन दिले, त्यावर त्यांनी शरद पवार व गोपीनाथराव मुंडे यांना दिल्लीत बोलावून घेतले व संपात तडजोड करण्यास सांगितले. दिल्लीतून या दोन्ही नेत्यांनी दि. १० नोव्हेंबर १९९८ रोजी संप मिटल्याची घोषणा केली.

हा संप जवळपास दीड महिने चालला होता. त्यामुळे कामगारांचे अतोनात नुकसान झाले. संपाच्या कालावधीत उत्पन्न बुडल्याने कामगार व मुकादम वर्गांनी स्पष्ट केले. मुंडे- ढाकणे यांच्यातील आरोप-प्रत्यारोपाला कंटाळून कामगार वर्ग कामाला निघाले असता, संघटनेच्या नेत्यांनी घाईघाईने ५% दर वाढ मिळवून संप मिटल्याचे जाहिर केले.

वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट पुणे व साखर भवन मुंबई येथे अनुक्रमे दि. २५/०१/१९९९ व दि. १६/०२/१९९९ रोजी बैठक घेण्यात आली. त्यात कुठल्याही प्रकारचा मार्ग न निघाल्यामुळे श्री. शरद पवार व महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथराव मुंडे या दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत कामगार संघटनेच्या पदाधिका-यांशी झालेल्या प्रदिर्घ चर्चेनुसार दि. २८/०५/१९९९ रोजी ऊसतोडणी दराविषयी व सेवा सवलतीविषयी चर्चा झाली. सदर सामंजस्य करारनाम्यानुसार ऊसतोडणी व वाहतुकीच्या दरात इ.स. १९९८-९९ मधील गाळप हंगामासाठी ५% दरवाढ व इ.स. १९९९-२००० ते २००१-२००२ या कालावधीसाठी २५% दरवाढ जाहिर झाली व मुकदमाच्या कमिशन दरात १% वाढ करण्यात आली. वेळोवेळी साखर संघाने कारखान्याचे नेते शरद पवार व कामगारांचे प्रतिनिधी गोपीनाथराव मुंडे या दोन नेत्यांच्या मध्यस्थीने प्रत्येक वेळी मजूर, मुकदम, वाहतुकदार यांच्या पदरात काहीतरी पाडून संप मागे घेतल्याचे दिसते.

**ऊसतोड कामगारांचा संप : इ.स. २००२-२००३**

गोपीनाथराव मुंडेप्रणीत संघटनेने इ.स. २००२ मध्ये ऊसतोड व मजुरांचे महामंडळ स्थापन करावे, तोडणी दरात १००% वाढ करावी, मजुरांच्या मुलांसाठी आश्रमशाळा व वसतिगृह काढावीत, ऊसतोड कामगारांना विमा योजना लागू करावी, फरकाची बिले मिळावीत, अपघाती नुकसान भरपाई मिळावी इत्यादी मागण्यासाठी संप पुकारला. त्यामुळे पाथर्डी व शिरुर कासार या भागातील ऊसतोड कामगार वर्गातील मजुरांनी वाहतूक रोखली व ऊसतोड मजुरांना आणण्यासाठी गेलेली ५० वाहने अडकून पडली. बबनराव ढाकणे यांच्या संघटनेने पत्रकबाजी केली, साखर कारखाने अगोदरच अडचणीत आणू नये. या काळात गोपीनाथराव मुंडे यांची संघटना अत्यंत प्रभावी होती. श्री ढाकणेप्रणीत संघटनेचे कामगार, गोपीनाथराव मुंडे यांच्या संघटनेत दाखल झाले. त्यामुळे श्री. ढाकणे यांची संघटना कमजोर बनली. म्हणून इ.स. २००२-२००३ या काळातील संपाकडे बबनराव ढाकणे यांनी दुर्लक्ष केले. मुंडे यांच्याकडेसुध्दा सत्ता नव्हती आणि हे दोघेही नेते स्वतः साखरसम्राट असल्याने संपाचे नेतृत्व कोणी करावे असा एक पेच निर्माण झाला. परंतु गोपीनाथराव मुंडे यांच्या समर्थकांनी ऊसतोड कामगार वर्गाचा नेता गहिनाथ थोरे यांच्या संघटनेशी संपाच्या दृष्टीने जुळवाजुळव केली. त्यामुळे शेवटपर्यंत गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाली. संघटनेत आरोप - प्रत्यारोप केले जाऊ लागले. परंतु संप मिटेनासा झाला. मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी गोपीनाथराव मुंडे, शरद पवार यांची समिती नेमल्याचेही जाहीर करण्यात आले. पंरतु या संपाच्या माध्यमातून ऊसतोड कामगार वर्गाला कसलाही न्याय मिळाला नाही. तसेच कामगार वर्गातदेखील संपाविषयी उत्साह राहिला नाही. इ.स. २००१-२००३ या काळात दुष्काळमय स्थिती असताना संघटनेच्या नेत्यांनी ऊसतोड कामगारांवर संप लादला त्यामुळे त्यांची स्थिती खालावत गेली. कारण रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला होता. अशा प्रकारे इ.स. २००२-२००३ या काळात ऊसतोड कामगारांच्या संपाचे चित्र होते.

**सारांश :-**

औद्योगिक आणि कृषीचे महत्वाचे साधन म्हणून महाराष्ट्रासह मराठवाड्यातदेखील साखर कारखान्यांची निर्मिती झाली. मराठवाडयातील साखर पाश्चात्य देशात जाऊ लागली. बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातून अनेक मजूर ऊसतोडणीसाठी जातात व त्यासाठी मुकदम वर्गाकडून उचलदेखील घेतात. त्या मोबदल्यात या वर्गाकडून मुकदम काम करुन घेतो. पंरतु बीड जिल्हयातील कामगारांना पश्चिम महाराष्ट्रातील मुकदम प्रधान्य देतात व कामाचा मोबदला जास्त देऊन जातात. त्यामुळे ते कारखाने चांगल्यप्रकारे चालत आहेत, परंतु अलीकडच्य काळात शेतकरी वर्गांनी ऊस लावण्याचे दुर्लक्ष केले आहे. कारण शेतक-यांनादेखील अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे. त्यामुळे ऊस लागवड कमी झाल्याने अनेक कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आजच्या स्थितीला जो कारखाना जास्त उसाला भाव देईल त्या कारखान्याकडे ऊस जात आहे. म्हणून दिवाळखोरीतले

कारखाने बंद पडले. त्यावेळी अशा कारखान्यासोबत ऊसतोड कामगार वर्गांनी करार केलेले होते आणि पैसे उचलून खर्च केले होते. त्यामुळे त्यांच्या समस्यात वाढ झाली हाती हे प्रकर्षाने जाणवते.

**संदर्भ :-**


१. दै. चंपावती (बीड) - दि. १३/१०/२००८, पृ. ०४
२. लाटे संजीव, महाराष्ट्र ऊसतोड कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास, पृ.१५३
३. दै. सकाळ दि. २ ऑक्टोबर १९९८, पृ ०१
४. दै. लोकसत्ता, दि. १२ नोव्हेंबर १९९५, पृ. ०१
५. दै. सकाळ दि. ९ ऑगस्ट १९९८, पृ. ०१
६. लाटे संजीव, महाराष्ट्र ऊसतोड कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास, पृ.१७९
७. ऊसतोड, पृ. १७९
८. दै. लोकसत्ता, दि. ९ नोव्हेंबर २००२ , पृ. ०८
९. दै. सकाळ दि. १४ ऑक्टोबर २००२, पृ. ७
१०. लाटे संजीव, महाराष्ट्र ऊसतोड कामगारांचा सामाजिक व आर्थिक अभ्यास, पृ.१८२

# शेतकरी आंदोलनात महिलांचा सहभाग

**डॉ. जे. एम. बोचरे**
इतिहास विभाग प्रमुख
स्व.नितीन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी जि. परभणी
मो.नं. ७४४८११४७२३

**श्री के. डी. पल्लेवार**
(एम.ए. इतिहास, सेट)
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड
मो.नं. ९९६००३८३३९

**सारांश :-**

*आज सगळीकडे 'महिला सबलीकरणाच्या' बाबतीत बोलल्या जाते. शासन स्तरावरून महिलांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न केले जात आहेत. वेगवेगळया सामाजिक संस्था सुध्दा महिलांच्या विकासासाठी वेगवेगळया चळवळी निर्माण करीत आहेत. ही अतिशय सकारात्मक बाब आहे. परंतु जेव्हा महिलाच महिलांच्या विकासासाठी, सबलीकरणासाठी प्रयत्न करतात तेव्हा ती विशेष गोष्ट असते. अशीच विशेष गोष्ट महाराष्ट्राच्या स्त्री चळवळीच्या इतिहासात घडलेली आहे. त्याचा मागोवा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे. शेती हा पुरूषांचा विषय आहे असं जिथे म्हटल्या जाते अशा काळात महिलांनी शेतीविषयक धोरणात सक्रिय सहभाग नोंदवून शेतीशी संबंधित महिलांना न्याय मिळवून दिला आहे. त्याचाच आढावा या शोध निबंधात घेण्यात आला आहे.*

**उद्देश :-**

प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील स्त्री चळवळीने शेतकरी आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन ग्रामीण भागातील महिलांमध्ये जी जाणीव जागृती निर्माण केली ती वाचकांपुढे मांडण्यात येणार आहे.

**व्याप्ती / मर्यादा :-**

१९८० ते १९९० च्या दशकात शेतकरी महिला आघाडीने ग्रामीण भागातील महिलांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून त्यांना आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात स्वातंत्र मिळवून दिले.

**संशोधन पध्दती :-**

या शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी द्वितीयक साधनसामुग्रीचा आधार घेण्यात येऊन संदर्भ पध्दती आणि ऐतिहासिक पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील स्त्री चळवळीच्या इतिहासाचा मागोवा घेत असतांना विविध स्त्री चळवळीने महत्वपूर्ण कार्य केलेले आहे. आज आपण ज्या चळवळीचे कार्य मांडणार आहोत ती स्त्री चळवळ आहे शेतकरी महिला आघाडी चळवळ आहे. या चळवळीने १९८० ते १९९० च्या दशकात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जे कार्य केले आहे त्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे.

शेतकरी महिला आघाडीने सुरूवातीच्या काळात म्हणजे १९८० ते १९८४ मध्ये आर्थिक प्रश्नाच्या लढ्यासाठी एकत्रितपणे बाहेर आणले. सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळीत झाली. त्याचे दुष्परिणाम या स्त्रियांच्या संसारावर झाले. हा संसार का नासला याचे कारण स्पष्ट झाल्यामुळे आर्थिक चळवळीकरीता ग्रामीण स्त्रीसुध्दा शेतकरी आंदोलनात सहभागी झाली. घराबाहेर आर्थिक न्यायाच्या लढ्यात

उतरल्यावर जो थोडाफार न्याय पदरात पडला, त्याची परिणीती स्त्रीच्या सुखात भर पडण्यात झाली काय ? तिचा संसार सुधारण्यात झाली काय ? याचे उत्तर तिला नकारार्थी मिळाले. तिचे रोजचे प्रश्न न सुटता दारुसारखे भिन्न प्रश्न निर्माण झाले.

आर्थिक लढ्यासाठी मोठ्या विश्वासाने बाहेर पडलेल्या स्त्रीचे 'स्त्री' म्हणून वेगळे प्रश्न आहेत. याची स्पष्ट जाणीव होताच शेतकरी महिला आघाडीने खोलात जाऊन त्या प्रश्नांचा अभ्यास केला. गावागावात जाऊन त्यांची बंद खोलीत चर्चा घडवून आणली. या चर्चेचे सार सगळीकडून या दोन ओळीत निघाले –

अस्तुरी जल्मा नको घालू शिरीहारी
रात ना दिस परायाची ताबेदारी

स्त्री जन्मच नको असे चित्र जवळपास स्पष्ट झाले व 'असे का' या एका प्रश्नाचे शेतकरी महिला आघाडीने त्यांच्याकडूनच उत्तर मिळवून घेण्याचा प्रयत्न केला. 'स्त्री जन्मच नको' असे सर्वसामान्य स्त्रीला का वाटते, याची मनमोकळी चर्चा ग्रामीण व शहरी स्त्रीयांशी घडवून आणली. या चर्चेतच या ग्रामीण समाजाच्या ज्या स्त्रियांबद्दल असे म्हटले जायचे की, 'त्यांना काही सूर्याने बघितले नाही आणि त्यांनी कधी सुर्य पाहिला नाही' अशा स्त्रियांना बोलके केले गेले. १९८६ मध्ये चांदवड येथे महिलांचे मोठे अधिवेशन घेण्यात आले. या सर्व विचारांचे मंथन म्हणून वेगवेगळया स्त्री चळवळींचा अभ्यास करून 'चांदवडची शिदोरी' तयार करण्यात आले. या ठरावांच्या व अधिवेशनाच्या माध्यमातून शेतकरी महिला आघाडीने घरंदाज ग्रामीण स्त्रीपासून तर सर्व स्त्री समाजाला बोलते करण्याचे काम केले असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

शेतकरी महिला आघाडीला स्वरुप प्राप्त झाले ते चांदवडच्या अधिवेशनाच्या पुर्व तयारीपासून १९८५ ते १९८६ मध्ये निखळ स्त्री प्रश्नांची चर्चा, माहिती व बारकावे समजून घेणे हेच काम या आघाडीने केले. प्रत्यक्षपणे बंद खोलीच्या चर्चेत जे साध्य झाले ते सभा, संमेलनातून साध्य होणे कठीण होते. कारण या चर्चेत अगदी मनमोकळी मांडणी या स्त्रिया करीत आणि शेतकरी संघटनेच्या आर्थिक आंदोलनाची विश्वासार्हता असल्यामुळे आपले प्रश्न नक्की सुटतील या विश्वासाने त्या चर्चा घडू लागल्या.

स्त्री पुरूष हे परस्पर-पूरक आहेत. स्त्रीच्या स्वातंत्र्यात पुरूषांचे हित अधिक आहे. संसार जर फुलायचा असेल, तर जोडीदाराला बरोबरीचा अधिकार असणे किती गरजेचे आहे हे पुरूषांना सुध्दा सांगण्यात आले नव्हे, त्याची जाणीव करून देण्यात आली. या सर्व चर्चा व जाणिवांतून एक प्रकारचा विश्वास ग्रामीण स्त्रीमध्ये व पुरूषांमध्ये निर्माण झाला. ग्रामीण स्त्रीला कुटुंबात बरोबरीचे स्थान मिळणे साध्य झाले. निदान स्त्री ही सुध्दा माणूस आहे ही भावना ग्रामीण पुरूष समाजात रुजविण्यात शेतकरी महिला आघाडीला यश मिळाले.

चांदवडच्या अधिवेशनात तीन लाख स्त्रिया व तितकेच पुरूष यांच्या साक्षीने समाजाला एक नवीन दिशा मिळाली. १९८४ ते १९८६ या कालावधीत ग्रामीण स्त्री पुन्हा नव्या उमेदीने उभी राहिली. १९८४ ते १९८६ या कालावधीत स्त्री प्रश्नांचा जो अभ्यास झाला त्याच्या आधारावर पुढील ठराव करण्यात आले.

१) दुष्काळात खडी फोडणार नाही.
२) पाण्यासंबंधीचा ठराव
३) रोजगारासंबंधी ठराव
४) समान नागरी कायदा
५) मुलींचे शिक्षण
६) असुरक्षितता

अशा तऱ्हेने ठराव व त्या ठरावांची अंमलबजावणी करून घेण्याकरीता शेतकरी महिला आघाडीने पावले उचलली. अनेक कार्यकर्त्यांनी पत्नीला आम्ही मारणार नाही, मुलीला दुय्यम दर्जा देणार नाही, दारू पिणार नाही असे निर्णय अधिवेशनातून जातानाच घेतले. त्यामुळे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते रुढीने त्यांच्यावर लादलेल्या पुरूषी मुखवट्यातून मोकळे झाले व स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा मार्ग मोकळा करून गेले. हे चांदवडच्या अधिवेशनाचे फलित आहे. १९८६ च्या कापूस आंदोलनाचे अनेकठिकाणी नेतृत्वही शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केले.

असेच दुसरे अधिवेशन दिनांक ८, ९ व १० नोव्हें. १९८९ ला अमरावतीला घेण्यात आले. १९८६ च्या ठरावांची अंमलबजावणी करतांना समोर येणाऱ्या नवीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी नवी आयुधे घेऊन अमरावतीचे अधिवेशन झाले आणि त्या अनुषंगाने अधिवेशनातील ठराव करण्यात आले.

१) जातीय दंगलीचा विरोध
२) स्त्रियांचा मालमत्तेतील हक्क
३) पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुका
४) दारुदुकान बंदी
५) शेतमजूर स्त्रियांची मजुरी
६) आदर्श गाव

या प्रमाणे शेतकरी महिला आघाडीने सरकारच्या मदतीशिवाय शेतकरी संघटनेच्या साहय्याने वरील सर्व कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. या निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयत्नांना यश आले. १९८९ ते १९९३ या काळात शेतकरी महिला आघाडीने ठराव अंमलात आणण्याकरीता अनेक कार्यक्रम व आंदोलने केली. सरकारवर महिलांच्या मालमत्तेच्या हक्कांकरीता, पंचायत राज निवडणुकांकरीता व दारु दुकान बंदीकरीता दबाव आणून त्याचे रुपांतर कायद्यात करण्यास भाग पाडण्याची कामगिरी सुरू केली.

**निष्कर्ष :-**

शेतकरी महिला आघाडीच्या सर्व कामगिरीच्या मागे आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे अनेकदा सरकारी पातळीवर याची दखल घेऊन सरकारला कायदे व परीपत्रके बनवावी लागली. शेतकरी महिला आघाडीच्या या सर्व वाटचालींतून महिलांमध्ये आत्मविश्वास, संपत्ती अधिकाराची जाणीव, स्व-अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. शेतकरी महिला आघाडीने केवळ ग्रामीणच नव्हे तर सरसकट सर्व स्त्री-समाजाला आत्मविश्वासाने स्वतःच्या समस्या हाताळण्याचे धाडस शिकवीले.

**संदर्भग्रंथ :**

१. मानवी संसाधन व्यवस्थापन – डॉ. प्रभाकर देशमुख, डॉ. रविंद्र प्रभाकर देशमुख, पिंपळपुरे ॲन्ड कं. पब्लीशर्स, नागपूर
२. मानवी संसाधन व्यवस्थापन – डॉ. श्रीनिवास जोशी, डॅा. प्रकाश कोठारी, डॉ. नंदकिशोर दायमा, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव
३. उद्योग व्यवसायःकामगार व्यवस्थापन –अ. दि. दिवेकर, सन पब्लीकेशन, पुणे
४. भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा – प्रा. सी. टी. कांबळे, प्रा. टी. एस. पवळे, क्रिएटीव्ह पब्लिकेशन्स, नांदेड
५. सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र – डॉ. बी. एम. कऱ्हाडे, पिंपळपुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
६. महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा – संपादक मेधा नानिवडेकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी केलेले कार्य

**हनुमान मुंजप्पा वांकर**
वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद
wankarhm@gmail.com
Mobile :- 9011808079

**सारांश :-**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील पिडीत व शोषित सर्वहारा समूहाचे महानायक आहेत. त्यांनी दलित, वंचित समाजाच्या न्याय्य हक्कासाठी जो लढा दिला. त्याला जगाच्या इतिहास अनन्यसाधारण महत्व आहे. बाबासाहेबांनी वंचितांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर तसेच विधिमंडळात विधायक आवाज उठविला. सर्व शोषितांना संघटीत होण्याचे आवाहन केले. शेतकरी व कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी अथक प्रयत्न केले. २७ जुलै १९४२ रोजी बाबासाहेब कामगार मंत्री झाले. कामगार मंत्री या नात्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. स्त्री-पुरुषांना समान मजूरी, कामगारांना कामाचे तास, कामगारांना पगारी सुट्टी, महिलांना प्रसूतीकाळातील पगारी सुट्टी अशा अनेक सुधारणा मानवतावादी दृष्टीकोणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या आहेत. लोकशाही आणि समता या तत्वाला अनुसरुन कामगारांना न्याय आंबेडकरांनी दिला आहे.*

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक कार्य अभ्यासणे.

**शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार मजूरमंत्री म्हणून कामगारविषयक न्यायाचे धोरणे व कार्य हा विषय या शोधनिबंधाचा आहे.

**स्त्री पुरुषांना समान मजूरी व प्रसुतीकालीन रजेचा पूर्ण पगार :**

दिनांक ८ फेब्रुवारी १९४४ रोजी केंद्रीय विधिमंडळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले,'स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यास केलेली मनाई उठविणे म्हणजे काही दृष्कृत्य नव्हे उलट हे कृत्य अत्यंत समर्थनीय आहे. पुरुष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री कामगारांना दिला जाईल. स्त्री पुरुषांना समाज मजुरी हे महान तत्व पहिल्यांदाच स्वीकारण्यात आले आहे.' महिलांना प्रसूती काळात रजा उपभोगतांना पूर्ण पगार मिळावा यासंबंधीचे विधेयक डॉ.आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात सादर केले.

**कामगारांना पगारी सुट्टी :-**

कामगारांची प्रकृती चांगली रहावी व त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून कायद्याने दिलेल्या सुट्या कामगारांना मंजूर करण्यात येतात. तथापि सुटीची भरपाई करण्याची तरतूद त्यावेळी कायद्यात नव्हती. एखाद्या कामगाराने सुटीच्या दिवशी काम केल्यास त्याची भरपाई करण्याची तरतूद करण्यासाठी १ नोव्हेंबर १९४४ रोजी फॅक्टरीज अॅक्ट (दुसरी सुधारणा) विधेयकावर केंद्रीय विधिमंडळात झालेल्या चर्चेला मजूर मंत्री या नात्याने डॉ.बाबासाहेबांनी अतिशय सकारात्मक उत्तर कारखान्यासाठी ५४ तासांची मर्यादा निश्चित करणे आवश्यक होते. त्या वेळेच्या फॅक्टरीज कायद्यात ओव्हर टाईमच्या वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम असावा यासाठी वेतनाचा दर दीडपट असावा या दोन प्रमुख सुधारणा सुचवणारा फॅक्टरीज अॅक्ट (सुधारणा) विधेयक २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय विधिमंडळात सादर केला.

**कामगारांना संप करण्याचा अधिकार मिळाला :**

ट्रेड युनियन ॲक्ट मुळे कामगारांना संपाचा अधिकार मिळाला. कामगारांना आपल्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असला तरी या अधिकाराचा अनाठायी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास कामगारांचे नुकसान होईल ही बाब त्यांनी आवर्जून सांगितली.

**स्वतंत्र मजूर पक्ष :**

गोलमेज परिषदेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनेकदा लंडनला जावे लागले. त्यावेळी मजूर पक्षाचे महत्वाचे नेते, पदाधिकारी यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली. मजूर पक्षाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपल्या पक्षाची घटना, कार्यक्रम, ध्येय व उद्दिष्टे ठरवली. अशा प्रकारे १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या नावाने पक्ष स्थापन केला.

**निष्कर्ष व समारोप :**

बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ जुलै १९४२ रोजी पदभार स्विकारला. त्यांच्याकडे श्रम, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम आणि खाणकाम ही खाती सोपविण्यात आली. कामगार मंत्री या नात्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. संविधान सभेमध्ये काम करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने 'श्रम' हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला. हे महान कार्य डॉ.आंबेडकरांनी केले आहे. ज्यामुळे आजही भारतातील कामगार वर्ग हा सुखी व समाधानी आहेत. कामगारांना लढण्याचे बळ देवून संघटीतपणे लढा देण्याचा मार्ग मोकळा करुन दिला. संघर्षाचे बळ दिले. कामगार लढ्यास विधायक शक्तीत रुपांतरीत केले. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

**संदर्भ सूची**

१. किर धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, पाचवी आवृत्ती, मुंबई, पृ.१४८.
२. प्रा. नरके हरी, डॉ. बाबासाहेबांचे काही नवीन पैलू, या विषयावरील व्याख्यान दि.२६/०२/२०१३.
३. खरात शंकरराव (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, मार्च-१९८७.
४. थोरात सुखदेव, बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती जाने. २०१० पृ. ३३,३५.
५. डॉ. गायकवाड अरविंद यांचा लेख दै. महाराष्ट्र टाईम्स दि.१६ एप्रिल, २०१३, पृ.९.
६. सिंह ब्रिजेश (संपा) महामानव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई दि.१४ एप्रिल २०१७.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261**
**Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# आधुनिक महाराष्ट्रातील कामगार चळवळ

**डॉ.एन.डी. नाईक**
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा
ता.परळी-वैजनाथ जि.बीड

**प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी**
इतिहास विभाग, एस.के.गांधी महाविद्यालय
कडा ता.आष्टी जि.बीड

**प्रस्तावना**

युरोपातील औद्योगिक क्रांतीने भांडवलदार व्यवस्थेबरोबरच कामगार वर्गालाही जन्म देऊन विषम वर्ग व्यवस्था निर्माण केली. या क्रांतीने युरोपातील समाजजीवन ढवळून निघाले. अनेक स्थित्यंतरे घडवून आणली. औद्योगिक क्रांतीने मध्ययुगाचा अंत घडवून आणला म्हणून आधुनिक युग अवतरले. नव्या मूल्यांना महत्त्व आले. तळागळातल्या वर्गात जागृती निर्माण झाली. शोषणाला वाचा फुटली. न्याय हक्क मिळविण्यासाठी संघटन शक्तीची उपयुक्तता लक्षात आली. त्यामुळे समान हितसंबंध गुंतलेले कामगार एकत्र येऊन व्यवस्थेवर दबाव निर्माण करू लागले. समूहशक्तीच्या जाणीवेतून महानायक मार्क्स आणि एंगल्स यांनी भांडवलशाहीचे उच्चाटन करणे राजसत्तेला काबीज करून वर्गविहीन समाजरचना निर्माण करण्याचे ध्येय उराशी बाळगले आणि या ध्येयपूर्तीचे साधन म्हणून त्यांनी कामगार संघटनेकडे पाहिले. १९१७ च्या रशियन राज्यक्रांती नंतर साऱ्या जगामध्ये कामगार चळवळी निर्माण झाल्या. त्यास भारत ही अपवाद नव्हता.[१]

१९ व्या शतकात ब्रिटीश सत्तेची स्थापना झाली आणि भारतीय उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला. बेकार कामगार शेतीकडे किंवा मजुरी करण्यासाठी शहराकडे वळाले आणि कारखाने गिरण्यांमध्ये कमी वेतनावर काम करू लागले. मुंबईत ५० व्यापारी एकत्र येऊन ५ लाख भांडवलाची संयुक्त स्टॉक कंपनी काढली आणि ११ जुलै १८५१ रोजी महाराष्ट्रात पहिली कापड गिरणी सुरु केली. १८९० पर्यंत १३७ कापड गिरण्या सुरुझाल्या. पहिले महायुध्द सुरू होईपर्यंत महाराष्ट्रात २६४ गिरण्यांची स्थापना झाली होती.[२]

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील कामगार चळवळीच्या कार्याचे विश्लेषण करणे.

भारतात ब्रिटीश सत्तेची स्थापना झाल्यानंतर युरोपातील घडामोडीला येथील कामगारांवर परिणाम होणे अपरिहार्य होते. परंतु तरीही युरोपीयन कामगार संघटनेच्या लढाऊ प्रवृत्तीचे प्रतिबिंब महाराष्ट्रीय कामगारांवर पडण्यास बराच काळ लागला.[३] १८७५ पासून कामगार संघटनेच्या दिशेने काही पावले पडली. कारखाण्यात काम करणाऱ्या कामगारांचे हाल कमी करण्यासाठी व विशेषतः स्त्री कामगारांची आणि बाल कामगारांची परिस्थिती सुधारली जावी म्हणून सरकारला विनंती करणे हे त्याच्या कार्याचे उद्दिष्ट होते. परंतु गिरणी मालकांनी सरकारला हाताशी धरून कामगारांचे प्रयत्न हाणून पाडले. इ.स.१८९० मध्ये नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधक गृहस्थांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई गिरणी कामगार संघटना' स्थापन झाली. या संघटनेच्या स्थापनेत अनेक मोठी मंडळी अग्रेसर होती. त्यात नारायण सुखदेव, गेणू बाबाजी, रघु भिकाजी, विठ्ठलराव कोरगावकर, रामचंद्र शिंदे, नारायण पवार, कृष्णाजी अर्जुन इ. या संघटनेकडे आपले नियम, पैसा नव्हता तरीही भारतातील ही पहिली कामगार संघटना बराच काळ कार्य करत राहिली.[४]

**फॅक्टरी कमिशन**

मुंबईतील कामगार संघटीत नसल्यामुळे त्यांना कमी वेतनावर राबवून उत्पादन काढले जाई. गिरणी मालक जाडेभरडे कापड स्वस्तात खपवत असत. त्यांच्या तुलनेत मॅचेस्टरहून आणलेले साधे कापडही गिऱ्हाईकाला महाग

वाटत होते.[५] मुंबईतील गिरण्याला लँकेशायरच्या गिरणी मालकांना हेवा वाटू लागलात्र अशीच परिस्थीती राहिली तर आपले मोठे नुकसान होईल म्हणून सरकारकडे मुंबईतील गिरण्यांना नियंत्रीत करणारा कायदा करण्याला अग्रह धरला. अखेर सरकारच्या वतीने २३ मार्च १८७५ रोजी मुंबईचे जिल्हाधिकारी अर्बुथनॉट यांच्या अध्यक्षतेखाली पहिले फॅक्टरी कमीशन नेमण्यात आलेत्र या कमीशनने एक अहवाल तयार करून सरकारकडे सादर केला. मात्र तो मंजूर कधीच झ ााला नाही. १८७८ मध्ये सोराबजी शापुरजी बंगाली यांनी कामगार हिताचे विधेयक मुंबई सरकारला सादर करून त्यात गिरणीतील मजुरांचे कामाचे तास कमी करा, लहान मुलांना संरक्षण द्या अशी मागणी केली. यासाठी कायदा करण्याचा अग्रह धरला. शेवटी विरोध व पाठींबा अशा दोन आघाड्यांवर १८८१ मध्ये विधेयक संमत झाले.[६]

**कामगार शक्तीचे प्रदर्शन -**

इ.स.१८८१ च्या कायद्याला बाल कामगारांच्या शोषणला आळा घालता आला नाही. या कायद्यातील पळवाटांचा गिरणी मालकांना फायदाच मिळाला, म्हणून या कायद्यातील त्रुटी लक्षात घेऊन सरकारने इ.स.१८८४ साली मुंबई सरकारने कलेक्टर डब्ल्यू.बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली 'फॅक्टरी कमिशन' नेमले.[७] मुलक आयोगाने कामगारांची कैफियत ऐकावी म्हणून नारायणराव लोखंडे यांनी परळच्या सुपारी बागेत २३ सप्टेंबर १८८४ रोजी चार हजार कामगारांची जाहीर सभा घेतली. या सभेतून गिरणी कामगारांच्या प्रश्नांला प्रथमच वाचा फोडली. सभेतील पाच मागण्या कमिशनला सादर करण्यात आल्या.[८]

१. आठवड्यात एक रजा असावी.
२. दररोज कामाच्या वेळात अर्ध्या तास सुटी असावी.
३. अपघाताबद्दल नुकसान भरपाई मिळावी.[९]

यापूर्वी अशा प्रकारच्या मागण्या करण्याचे धाडस कोणीही केले नव्हते. या मागण्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे लोखंडेची शक्ती वाढली. सरकारवर दबाव वाढविण्यासाठी सह्याची मोहीम सुरु केली. साडे पाच हजार कामगारांच्या सह्या घेऊन अर्ज सरकारला सादर केला. कामगार शक्तीची प्रचिती १८८५ मध्ये गिरणी मालकांना एका घटनेने आली. ती म्हणजे मुंबईतील दोन कपंन्यांनी पगार कपात केली आणि तोही देण्यास उशीर केला. म्हणून कामगारांनी संप केला व कामगार शक्तीची जाणीव करून दिली. या घटनेवरून कंपनी मालकाच्या ही गोष्टी लक्षात आली की, कामगार आता हुशार झाले आहेत. त्यांना आपल्या स्थितीची व शक्तीची जाणीव झाली आहे. संप कधी करावा आणि पगारवाढ कधी मागावी हे आता त्यांना कळायला लागले. तसेच त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव झाली आहे. लँकेशायरच्या कामगारांसारखे तेही अडवणूक करतील. म्हणून गिरणी मालकांनी कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे, याची जाणीव झाली.[१०]

**सारांश -**

युरोपातील औद्योगिक क्रांतीने मध्ययुगाचा अंत करून आधुनिक युगाची सुरुवात केली. नव्या मूल्यांना महत्त्व येऊन तळागळातील वर्गाला महत्त्व आले. न्याय मागणीसाठी कामगारांना संघटनेची गरज भासली यातून आधुनिक महाराष्ट्रात अनेक कामगार संघटनांनी स्थापना झाली. कामगार संघटनेमुळे असंघटीत कामगार संघटीत झाला. नारायण मेघाजी लोखंडे यांसारख्या कामगार नेत्यांनी गिरणी कामगारांच्या मागण्यांसाठी संघटना स्थापन केल्या. संघटनेमार्फत कामगारांनी आपल्या मागण्या रकारपुढे ठेवल्या. त्या संघटनेच्या दबावामुळेच मंजूर झाल्या. भारतीय कामगार व परकिय कामगार यांच्यात स्पर्धा निर्माण झाली. २० व्या शतकात कामगार चळवळीचा जोर जास्त होता. अनेक कामगार संघटनेत राजकियन नेत्याचा प्रवेश झाल्याने कामगार संघटना राजकिय पक्षाच्या आहारी गेलेल्या दिसतात. महागाई काळात कंपनी मालक मजुरी वाढवत नसतांना कामगारांच्या विविध संघटनांनी संप, मोर्चे काढले. यामुळे काही प्रमाणात कामगारांचे

प्रश्न सुटलेले दिसतात. कामगार चळवळीमुळे त्यांचे कामाचे तास कमी झाले. वेतन वेळेवर मिळू लागले. आरोग्य सेवा, बोनस मिळू लागले. अशा प्रकारे कामगार चळवळीतून काही प्रमाणात का होईना कामगार प्रश्न सुटलेले दिसतात.

**संदर्भ सूची -**

१. प्रा.गणेश राऊत, महाराष्ट्रातील परिवत्रनाचा इतिहास, डायमंड पब्लीकेशन, पुणे, २००५.
२. जावडेकर आचार्य, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९३८.
३. सुराणा पन्नालाल, आपला महाराष्ट्र, समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९६०
४. कदम मनोहर, नारायण मेघाजी लोखंडे, म.फुले समता प्रतिष्ठाण, पुणे, १९९५
५. मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.एस. पब्लिकेशन, पुणे, २००६.
६. कीर धनंजय, महात्मा फुले - प्रकाशन- पॉप्यूलर, मुंबई, १९७३.
७. खोबरेकर वि.गो, महाराष्ट्रातील स्वतंत्र लढे - म.रा.सा.आ.सं.मंडळ, मुंबई, १९९४.
८. पवार गो.मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, प्रकाशन लोकवाङ्मय गृह - मुंबई, २००४.
९. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ५ प्रकाशन, श्री विद्या, पुणे, १९८९.
१०. बेडेकर दि.के., संयुक्त महाराष्ट्र, लिज शाळा प्रकाशन, पुणे - १९४७.

# शेतकरी संघटना

**प्रा. डॉ. दिंगबर जनार्दन सोनवणे**
इतिहास विभाग प्रमुख
श्री ज्ञानेश्वर महाविदयालय, नेवासा
मो.९८५०२२१४४९, dr.sonawanedj@gmail.com

**उदिदष्टये :–**

१. शेतक–याच्या संघटनेचे महत्व लक्षात आणुन देणे.
२. शेतकरी चळवळीची आवश्यकता समाजापुढे मांडणे.
३. समाजाला शेतक–याच्या प्रश्नांची जाणीव करून देणे.
४. शेतक–यां विषयी सरकारची भुमिका समाजापुढे मांडणे.

**प्रस्तावना :–**

भारत हा कृषी प्रधान देश असून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण महत्व आहे. जवळ जवळ ६४ टक्के जनता शेतीवर अवंलबून असून त्यापैकी ७० टक्के शेतकरी अल्पभुधारक आहेत. शेतक–यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. निसर्ग, बदलते हवामान, खते व बियाणांच्या वाढत्या किमंती, व्यापा–याकडुन होणारी लुट, बाजार भावाची अनिश्चितता, शेतकरी विरोधी सरकारी धोरणे, विजेचा तुटवडा, इंधनाचे वाढलेले दर, शेतमालाची होणारी चोरी, मोकाट जनावरांचा त्रास तसेच जंगली प्राण्यांचा त्रास इ. अनेक कारणांनी वर्षानुवर्षे तो कर्जबाजारी राहीला आहे. कर्ज व नापीकी यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. शेतक–यांच्या या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी भारतात विविध शेतकरी संघटना स्थापन झाल्या. शेतक–यांच्या चळवळी निर्माण झाल्या. मात्र संघटनामध्ये समन्वयाचा आभाव, सरकारचे फोडाफोडीचे राजकारण, शेतक–यांची आर्थिक दुर्बलता इ. कारणांनी शेतक–यांना अजुनही न्याय मिळत नाही. देशाचा पोशिंदाच स्वत:हा उपाशी ही बाब देश हिताच्या व मानवतेच्या दृष्टीने निंदणीयच म्हणावी लागेल. शेतक–यांना या सर्व परिस्थितीतुन बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्रातही शेतकरी संघटना निर्माण झाल्या. त्यातील शरद जोशी यांनी स्थापन केलेली शेतकरी संघटना ही महत्वाची व आजच्या शेतक–यांना प्रेरणा देणारी म्हणावी लागेल.

शरद जोशी यांची भुमिका समजून घेण्यासाठी महाराष्ट्रातल्या शेतक–यांच्या प्रंश्नाच्या मांडणीची चर्चा करायला हवी. शेतक–यांच्या प्रश्नांची पहिल्यांदा मांडणी केली ती महात्मा ज्योतिराव फुले यांनी, त्यांनी 'शेतक–यांचा असूड' आणि 'इशारा' हि पुस्तकं लिहून फार महत्वाची भुमिका पार पाडली होती. ज्योतिरांवा नंतर शेतक–यांच्या प्रश्नांची मांडणी त्रिंबक नारायण अत्रे यांनी 'गावगाडा' या पुस्तकातुन केली. यांनतर महर्षी विठठ्ल रामची शिंदे यांनीही शेतकरी परिषदा भरवून काही चळवळी केल्या. शेवटी शरद जोशी पर्यंत आपण येतो. शरद रावांनी आपली उच्च पदस्थ सरकारी नोकरी सोडून स्वत: शेती करण्यास सुरूवात केली त्यातून शेतक–यांना नेमक्या कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो हे लक्षात आल्यांनतर त्यांनी नव्या पध्द्तीने शेतक–यांच्या प्रश्नांची मांडणी करण्यास सुरूवात केली.

**शेतकरी संघटेची स्थापना :–**

महाराष्ट्रात शेतक–यांच्या अनेक संघटना निर्माण झाल्या. पैकी ९ ऑगस्ट १९७९ साली शरद जोशींनी स्थापन केलेली 'शेतकरी संघटना' एक महत्वाची होय. या संघटनेने अल्प काळात महाराष्ट्र व्यापनास सुरूवात

केली. आग पसरावी तशी ही संघटना महाराष्ट्रात खास करून उत्तर व पश्चिम महाराष्ट्रात पसरली. रास्ता रोको, रेल रोको, यासारखी आंदोलने करून शेतक—यांच्या मालाला रास्त भाव मिळून दिला. जोशींनी फक्त भाववाढीची आंदोलने न करता शेतक—यांच्या चळवळीला तात्वीक अधिष्ठान मिळून दिले.

उत्पादन खर्चाव आधारित किंमत शेतक—यांना मिळाली तर त्यांची गरिबीतून सुटका होईल. आणि तोटयातली शेती शेतक—यांच्या नशिबाने नाही तर सरकारच्या धोरणांन असल्याच जोशींनी शास्त्रशुध्द मांडल. शेतक—यांना स्वाभीमानी बनवल. सरकारकडे कायम अनुदान मागणा—या शेतक—यांना 'भिक नको घेउ घामाचे दाम', 'शेतकरी तितुका एक' असा मुलमंत्र देवून शेतक—यांना एकत्र करण्यास सुरूवात केली.

**शेतकरी संघटनेची आदोंलने :—**

शरद जोशींनी १९८० मध्ये चाकण परिसरात पहिल्यांदा कांदयाच आदोंलन केल. या आंदोलनाला शेतक—यांचा अभुदपुर्व असा प्रतिसाद मिळाला. या आंदोलनामुळे शेतकरी तर एक झालाच पण सरकारला सुध्दा शेतक—यांच्या प्रश्नांची दखल घ्यावी लागली. यांनतर शेतक—यांच्या ऊस दरासंबधी असेच एक मोठे आंदोलन नाशिक जिल्हयात उभारले. याही आदोंलनात मोठया संख्येने रस्त्यावर उतरले. सरकारने दडपशाही करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. शेतक—यांवर पोलिसांनी गोळीबार केला. त्या गोळीबारात तीन निरपराध शेतक—यांना जीव गमवावा लागला. याच दरम्यान लातूर जिल्हयातही शेतक—यांचे आदोंलन घडवून तेथेही एका गरीब शेतक—यांला प्राणास मुकावे लागले. शरद जोंशींनी शेतकरी संघटनेची आदोंलने शेतक—यांचा प्रतिसाद मिळताच गतिमान करण्यास सुरूवात केली. १९८१ मध्ये निपानी या ठिकाणी तंबाखूच आदोंलन केल. १९८६ मध्ये विदर्भ, मराठवाडयात शेतक—यांचा कापसाचा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला होता तेंव्हा तेथेही कापूस प्रश्नी आंदोलन उभारले. सरकारने नेहमी प्रमाणे हेही आदोंलन दडपण्याचा प्रयत्न केला. हिंगोली जिल्हयात आदोंलन चालू असतांना सुरेगाव येथे पोलिस गोळीबाराचे तीन शेतकरी शिकार झाले.

फक्त पुरूषांनीच आदोंलन करावे असे नाही तर, स्त्रिया देखिल पुरूषांप्रमाणेच नव्हे पुरूषांपेक्षाही शेती संबधीत कामे जास्त प्रमाणात करतात. त्यांना शेतीचे अर्थकारण समजते. म्हणून त्यांना देखिल शेतकरी चळवळीत सामावून घेतले पाहिजे. असा यशस्वी प्रयत्न शेतकरी संघटनेने यशस्वी करून दाखविला. धुळयाचे मार्क्सवादी अभ्यासक शरद पाटील यांनी शरद जोशींना सुचविले की, महिंलना राजकारणात आणले पाहिजे. पाटंलाच्या मते 'आजपर्यंतच्या राजकारणाचा पुरूषांनी सत्यानाश करून ठेवला आहे. यात महिला सुधारण करू शकतील.' शरद पांटलांची ही अतिशय महत्वाची सुचना होती. शरद जोशींना देखिल ही सुचना मनापासून आवडली त्यानुसार त्यांनी ती कृतीतही आणली. १९८६ साली नाशिक जिल्हयातील चांदवड येथे 'शेतकरी महिला आघाडी' स्थापन करण्यात आली. या परिषदेस जवळपास ५ लाख महिला उपस्थित होत्या. याच महिला मेळाव्यात शरद जोशींनी आणखी एक महत्वाची घोषना केली की, आगामी पंचायत समिती निवडणुकीत संघटने तर्फे फक्त महिंलानाच उमेदवारी देण्यात येईल. असे म्हणतात की, या ऐतिहासिक घोषणेमुळे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण एवढे घाबरले की, त्यांनी पंचायतच्या निवडणुकाच पुढे ढकलल्या. हा प्रसंग शेतकरी संघटनेच्या लोकप्रियतेचा परमोच्च बिंदु होता असे म्हटल्या वावगे होणार नाही.

शरद जोशी सरकारला आपल्या भाषेत चिमटा काढतात की, 'गरिबी टीकावी आणि वाढावी म्हणून शासन जे प्रयत्न करते तेवढे थांबवावे म्हणजे गरिबी आपोआप हाटेल.' त्यांच्या या वाक्यावरून लक्षात येते की, शेतक—यांना अडचणीत आणनारा महत्वाचा घटक शासनच आहे. इतका सुक्ष्म अभ्यास करून त्यांनी शेतक—यांच्या प्रश्नांना सरकार दरबारी कणखरपणे मांडण्याचा प्रयत्न केला. शरद रावांना चळवळ हा शब्दच

मिळमिळीत असल्यासारखा वाटतो की काय, म्हणून त्यांनी शेतकरी चळवळ असा शब्द प्रयोग कधी वापरला नाही. त्यांनी आपली भाषाच कणखर व अभ्यासू बनविली होती. ते प्रामाणिकपणे शेतक—यांचे हित बघत होते. मात्र शासकीय पातळीवरून त्यांना म्हणावे तसे यश मिळत नव्हते.

**स्वतंत्र पक्षांची स्थापना :—**

शरद जोशी शेतक—यांची आंदोलने उभारून सरकार विरोधी लढा तीव्र केला. मात्र त्यांना पाहिजे तसे यश मिळत नव्हते. त्यांच्या लक्षात आले की, फक्त चळवळी करून भागनार नाही. शेतक—यांच्या समस्या सोडवायच्या असतील तर राजकीय सत्तेत गेले पाहिजे. राजकीय सत्तेचे महत्व समजताच त्यांनी राजकारणात उडी घेतली. १९९४ साली 'स्वतंत्र भारत पक्ष' स्थापन केला. अर्थात या पक्षाला अपेक्षित यश मिळू शकले नाही.

**शेतकरी संघटनेत फुट :—**

शरद जोशींनी ज्या हेतूने शेतकरी संघटना स्थापन केली तो हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्यांना अनेक सच्चे सहकारी मिळाल्यानेच सघंटना वाढली संघटनेने महाराष्ट्रभर आंदोलने करून शेतकरी जागृत केला, धाडसी बनवला, त्याला स्वाभिमानी बनवला परंतु हाच संघटीत झालेला शेतकरी संघटनेतील नेत्यांच्या वैचारिक मतभेदामुळे, राजकीय हस्तक्षेपामुळे, काही नेत्यांच्या स्वार्थी पणामुळे पुन्हा दुभंगला गेला. शेतकरी संघटनेत फुट पडून शरद रावांचे खंदे समर्थक आसणारे रघुनाथदादा पाटील, राजु शेटट्री इ. नी २००४ मध्ये 'स्वाभीमानी शेतकरी संघटनेची' स्थापना केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेला पश्चिम महाराष्ट्रात ब—यापैकी यश मिळाले. ही संघटना विशेषत: ऊस प्रश्नांवरच त्यांनी आंदोलने केली. यानंतर याच स्वाभीमानी शेतकरी संघटनेतील राजु शेटट्री यांचे खंदे समर्थक असलेल्या राज्यातील प्रमुखांनी पंढरपुर येथे बैठक घेवून पंजाबराव पाटील व त्यांच्या सहका—यांनी 'बळीराजा शेतकरी संघटनेची' स्थापना करून राजू शेटट्रीना जोरदार धक्का दिला. राजू शेटट्रींचे सहकारी असणारे सदाभाउ खोत हे महाराष्ट्राच्या भाजप— सेनेच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्यात व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राजू शेटट्रीसह इतर सहका—यांमध्ये तात्वीक मतभेद होवून त्यांची संघटनेतून हकालपटट्री झाली. सदाभाउनीं शेटट्रींना जस्याच तसे उत्तर देण्याचा निश्चय करून स्वतंत्र संघटना स्थापन्याचा निर्णय घेतला. त्यांनी २२ संप्टेबर २०१७ ला 'रयत क्रांती संघटना' स्थापन केली. अश्या प्रकारे शेतकरी संघटनेची फुट होवून चार शेतकरी संघटना तयार झाल्या.

**निष्कर्ष :—**

शरद जोशींनी शेतकरी चळवळ उभी केली. कुञ्याचे शेपूट सरळ होईल पण आपला शेतकरी संघटीत होणार नाही. अशा पारंपारिक समजुतीला छेद देवून शेतकरी संघटीत करण्याचे महनिय कार्य शरद जोशींनी केले. शेतरकरी नुसताच संघटित केला नाही तर शेतक—यांच्या मनात स्वाभिमानाने जगण्याचे बीजारोपन केले. ताठ मानेने व मुठ आवळून जगायचा मुलमंत्र दिला. देशातील इतर नागरिकांप्रमाणेच सन्मानाने जगता यावे यासाठी रस्त्यावर उतरून लढण्याची प्रेरणा देण्याचे काम केले. शेतक—यांच्या मनातील राजसत्तेची व तुरूंगाची भीती घालविली. प्रचलित अर्थवादाला कलाटणी देवून शेतीच्या अर्थवादाच्या उत्क्रांतीची दिशा बदलण्यात शरद जोशी शतप्रतिशत यशस्वी झाले आहेत असे मला वाटते. शरद जोशींनी 'शेतक—यांचा स्वातंञ्य सुर्य ' बनून पिढयानपिढया दारिद्रियाच्या अंधारात चाचपडणा—या शेतक—यांचा मुक्तीचा मार्ग प्रकाशमय करून ठेवला आहे.

**संदर्भ :—**

१. भानू काळे — अंगार वाटा शोध शरद जोशीचा
२. लोकसत्ता १७ डिंसेबर २०१८
३. तरूण भारत २५ संप्टेबर २०१७

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महाराष्ट्रातील १८७५ चा शेतकरी विद्रोह

**प्रा. गणेश वाघ**
इतिहास विभागप्रमुख
कै. बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा
मो. ९७६४२५९३४३

१८७५ मध्ये महाराष्ट्रातील नगर व पुणे जिल्ह्यांमध्ये लक्षवेधी शेतकरी उठाव झाला. महाराष्ट्रामध्ये ब्रिटीश सरकारने रयतवारी जमीन महसूल पद्धती लागू केलेली होती त्या अंतर्गत शेतकऱ्याला जमीनीचा मालक मानला जाई व तो स्वतः सरकारला महसूल देण्यासाठी बांधील होता, परंतु रयतवारी पद्धतीमध्ये शोषणाचे काम सरकारने वेळोवेळी महसुलाचे अवाजवी दर वाढवून केले. त्यामध्येही महसूल हा नगदी स्वरुपात आणि सूर्यास्त नियमांनुसार विशिष्ट दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी भरावा लागे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपले पीक बाजारभाव नसतांनाही विकून पैसा उभारावा लागे आणि त्यात नाहीच भागले तर जमीन आणि घरेदारे सावकारांकडे गहाण ठेवून व्याजाने पैसा काढावा लागे. व्याजाच्या उच्च दरामुळे शेतकरी शक्यतो कधीच आपली जमीन आणि घरेदारे परत मिळवू शकत नसे. न्यायव्यवस्था ही खर्चिक आणि वेळ खाऊ होती.

अशी दैन्यवस्था शेतकऱ्यांची चालु असतांनाच १८६० च्या दशकात दोन घटना घडल्या ज्यामुळे शेतकऱ्यांच्या दैन्यवस्थेमध्ये अधिकच भर पडून शेतकरी उठावास प्रवृत्त झाले. पहिली घटना म्हणजे १८६० मध्ये अमेरीकेमध्ये गृहयुद्ध सुरू झाल्यामुळे अमेरीकेतील कापसाचे उत्पादन घटले यामुळे भारतातील कापसाची मागणी वाढून कापसाच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाली. परंतु १८६४ मध्ये हे गृहयुद्ध बंद झाल्याने कापसाची मागणी कमी होऊन किंमती कोसळल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या किंमत वाढीचा फायदाही शेतकऱ्यांना न होता व्यापाऱ्यांना अधिक झाला होता. अशातच दूसरी घटना म्हणजे सरकाने १८६७ मध्ये वाढलेल्या किंमतीचा आधार घेऊन शेतसाऱ्यामध्ये ५० टक्के वाढ केली, तर दूसरीकडे नापिकीमुळे शेतकऱ्यांना जगणे कठीण झाले. रविंदर कुमार यांनी आपल्या 'Western India In Nineteenth Century' या पुस्तकात म्हटले आहे की, 'It also resolved That if a cultivator was unable To pay his Tax, Then the Revenue Department would in the first in stance attach his movable property, and that his holdings would be auctioned only when his movable property proved in- sufficient to cover the full amount of the tax.'[१] अशा स्थितीमध्ये महसूल भरण्यासाठी शेतकऱ्यांना सावकार आणि महाजनांकडे जाण्याशिवाय पर्याय राहीला नाही. याचा खूप मोठा गेरफायदा सावकारांनी उठवला आणि उच्च व्याजाच्या बदल्यात शेतकऱ्यांना कर्ज दिले व जामीन म्हणून जमीनी आणि घरेदारे यांचे गहानखते करून घेतली.

डिसेंबर १८७४ मध्ये शिरुर तालुक्यातील करदे गावापासून संघर्षाला सुरवात झाली. कल्लूराम नावाच्या मारवाडी सावकाराने बाबासाहेब देशमुखांविरुद्ध फक्त १५० रुपये कर्जासाठी न्यायालयातून आदेश मिळविला. या आदेशान्वये बाबासाहेब देशमुखांच्या घरचा कब्जा कल्लूरामला मिळणार होता.[२] गावातल्या लोकांनी समजावूनसुद्धा सावकाराने ऐकले नाही म्हणून गावकऱ्यांनी बाहेरुन आलेल्या सावकार व महाजनांचा सामाजिक बहिष्कार सुरु केला. शेतकऱ्यांनी महाजन आणि सावकारांच्या दुकानातून सामान विकत घेणे बंद केले. त्यांच्या शेतात लागवडीची कामे करणेही बंद केले. बलुतेदारांनासुद्धा त्यांचे काम करण्यास मनाई करण्यात आली. त्यांच्या घरातील नौकरांनासुद्धा काम न करण्यास सांगण्यात आले. या बहिष्काराला कंटाळून जेव्हा सावकारांनी गाव सोडून जाण्याचा निश्चय केला तेव्हा त्यांना जाण्यासाठी गाड्या उपलब्ध करण्यासही कोणी पुढे आले नाही. सावकारांच्या

ISSN : 2348-7143
December-2018

बहिष्काराला जो विरोध करी त्यांना जातीबाहेर केल्या जात असे. जून १८७५ पर्यंत हे सामाजिक बहिष्काराचे लोण पुणे, अहमदनगर, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यांमध्ये तीव्रगतीने पसरले.

Deccan Riots commission च्या अहवालानुसार "The firat actual outbreak occurred at Supa, a large villege of the Bhimthari Taluka of Poona, on the 12th may 1875 The Victims of the rioters the Guzerathi sowkars of whom There are a large number in Supa. Their houses and shops were attacked by a large mob principally recruited from the hamlets round Supa, who hael assembled ostensibly To attend the market on Bazar day. The house and shop were gutted of every thing that the rioters could find, and one house was burnt down but no violence to person was commited.'[३] शेतकऱ्यांनी त्यांना फसवून केलेले करारनामे, गहानखते, न्यायालयीन आदेश आदी कागदपत्रे शोधून त्यांची होळी केली. त्यानंतर लवकरच ही आग बाकी भागात पसरली. पुणे जिल्ह्यातील भीमथरी तालुक्यातील १७ गावे, शिरुर १०, इंदापूर १, हवेली ३, अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर ६, श्रीगोंदा ११, नगर ४ आदी गावांना या उठावाने प्रभावित केले.[४]

या उठावामध्ये हिंसा फार कमी प्रमाणात झाली. कर्जासंबंधी कागदपत्रे जाळल्यानंतर हिंसेची काही आवश्यकताच राहिली नव्हती. फक्त सूपा शहरामध्ये महाजनांची दुकाने आणि सावकारांची घरे लुटली गेली व घरांना आगी लावण्यात आल्या. बाकी ठिकाणी शेतकऱ्यांचा हा उद्रेक एकता आणि ताकद दाखविण्यासाठी झालेला दिसून येतो. सरकारने पोलिस व लष्कराला बोलावून हे बंड ताबडतोब दडपून टाकले. जवळ जवळ १००० शेतकऱ्यांना पकडण्यात आले. बंड इतके जबरदस्त होते की, सरकारला बंडखोरांविरुद्ध एकही साक्षीदार मिळू शकला नाही. सरकारने शेतकऱ्यांमधील असंतोषाचे कारण शोधून काढण्यासाठी 'दक्षिण बंड आयोग' नेमला. या आयोगाच्या अहवालनुसार १८७९ मध्ये शेतकरी सहाय कायदा (Agriculturists Reliet Act) करण्यात आला. त्यानुसार दिवाणी कायदा संहितेतील काही कलमांवर प्रतिबंध घालण्यात आला. त्याअन्वये कर्ज न फेडल्यास शेतकऱ्याला अटक केली जाऊ शकत नव्हती तसेच तुरुंगातही टाकता येत नसे.[५]

महाराष्ट्रातही बुद्धीजीवी वर्गाने शेतकऱ्यांच्या हितसंबंधासाठी आवाज उठविला होता. १८७३-७७ या काळात न्या. रानडे यांच्या नेतृत्वाखाली पुणे सार्वजनिक सभेने १८६७ च्या महसूल वाढीच्या विधेयकाविरुद्ध पुणे आणि मुंबईमध्ये आंदोलन चालविले होते. शेतकऱ्यांनी या आंदोलनापासून प्रेरणा घेऊन 'शेतसारा न देणे' आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाने शेतकऱ्यांना संघर्ष करण्याचे बळ दिले. या बळाच्या आधारेच १८७५ चा उठाव घडून आला असे दिसून येते.

हे आंदोलन तीन आठवडे फार जोरात सुरू होते नंतर मात्र त्याचा जोर ओसरला तरीही दोन महिन्यापर्यंत छोट्यामोठ्या घटना घडत राहिल्या. सरकारला हे आंदोलन दडपण्यासाठी जास्त कष्ट घ्यावे लागले नाही कारण शेतकऱ्यांचे उद्देश्य खूप कमी होते. त्यांना वसाहतवादी शोषणाची कल्पना नव्हती. तरीही सरकारने १८७९ मध्ये कायदा करुन शेतकऱ्यांना काही प्रमाणात का होईना संरक्षण दिले हे या आंदोलनाचे महत्त्व अधोरेखित करता येईल.

**संदर्भ सूची :**

१. Kumar Ravinder, Western India In The Nineteenth century, Londan, 1968, P. 183.
२. ग्रोवर बी. एल., बेल्हेकर ए. के. (अनुवादक), आधुनिक भारताचा इतिहास, एस. चन्द एण्ड कम्पनी प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली, २०१४, पृ.४१५.
३. Report of The Deccan Riots commission, Journal of Indian school of Political Economy, Pune, 2010, P. 180.
४. Report of The Deccan Riots commission, उपरोक्त, पृ. १८१.
५. ग्रोवर बी. एल., पूर्वोक्त पृ. ४१५.

# भारतातील कामगार चळवळ : एक दृष्टिक्षेप

**डॉ. जे. के. भालेराव**
(लोकप्रशासन विभाग प्रमुख),
स्वा. सावरकर महाविद्यायल, बीड.
Email: bhalerao.jyotik@gmail.com, Mob.No. 9923216515

**सारांश :**

*वैश्विक स्तरावर १९९० च्या दशकापासून मुक्त आर्थिक धोरणाचा स्वीकार करावा लागल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात कंत्राटीपध्दतीचे उदात्तीकरण होऊन सार्वजनिक उद्योगाचे क्षेत्र मर्यादित झाले आणि खाजगी व सेवा क्षेत्र विस्तारले गेले. त्यानंतरच्या काळात माहिती व तंत्रज्ञान क्रांतीने अत्याधुनिक साधने, नवीन उत्पादन पध्दती अनुसरने उद्योग क्षेत्रात अनिवार्य बनले. आज कामगार संघटना, ट्रेड युनियन ह्या राजकीय पक्षाच्या बटीक झाल्या आहेत. त्यामुळे भांडवलदार, कारखानदार, कार्पोरेट्स आणि मालक वर्ग राजकीय पक्षाला निवडणूक निधी देऊन कामगारांच्या नेत्यालाच विकत घेत आहेत. त्यामुळे भारतातील कामगार चळवळी ह्या शक्तीहीन बनल्या आहेत.*

**प्रास्ताविक :**

जागतिक स्तरावर सर्वप्रथम इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीस सुरूवात झाली. त्यामुळे सर्व युरोपात कारखाने, उद्योग, व्यवसाय व व्यापार यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भांडवलशाही अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात उत्पादन साधनावर पूर्णपणे भांडवलदार व कारखानदार वर्गाची मालकी निर्माण झाली. मूलतः भांडवलशाही व्यवस्था ही नफेबाजी व स्पर्धेवर आधारलेली असते. त्यामुळे स्पर्धा वाढून अधिक नफा प्राप्ती हे भांडवलदार वर्गाचे ध्येय असल्यामुळे मजुर, कामगार वर्ग उपजिविकेसाठी उत्पादन साधनावर अवलंबून होता, त्यांचे शोषण व पिळवणूक सुरू झाली. कामगार वर्गावर केले जाणारे अन्याय-अत्याचार या विरोधात कामगार वर्ग संघटीत होऊ लागला. आपल्या न्याय हक्कासाठी व मागण्यासाठी तो संघटन करू लागला यातूनच 'कामगार चळवळी' चा उदय झाला.

जागतिक पाहिल्या महायुध्दाच्या अखेरिस रशियात कामगार वर्गानी क्रांती केली. **'जगातील कामगारांनो एक व्हा'** अशी हाक देणारा विचारक कार्ले मार्क्स याचे तत्वज्ञान या कामगार क्रांतीमागे होते. या पार्श्वभूमीवर कम्युनिष्ट-समाजवादी-गांधीवादी ध्येयवादाने प्रेरित होऊन भारतातील मध्यम वर्गातील लाखो तरूणांनी कामगार चळवळीमध्ये आपली आयुष्ये वाहून टाकली. प्रस्तुत शोध निबंधात भारतातील कामगार चळवळीचा बदलत्या संदर्भात आढावा घेण्यात झालेला आहे.

**अध्ययनाचा उद्देश :**

१. स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार चळवळीच्या उदयाचा शोध घेणे.
२. भारतातीतील कामगार संघटना कशा स्थापन करण्यात आल्या हे अभ्यासणे.
३. कामगार चळवळी पुढील आव्हानांचा अभ्यास करणे.
४. भारतातील कामगार संघटना राजकीय पक्षांशी बांधील का आहेत, त्याच्या कारणांचा शोध घेणे.

**स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार चळवळ :**

इ.स. १९१६ मध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियातील जुलमी झाटशाही उलथून टाकून कामगारशाही प्रस्थापित करण्यात आली. या रशियन राज्यक्रांतीचा परिणाम भारतातील कामगार वर्गावर झाला. स्वातंत्र्यपूर्व भारतातील कामगार संघटना स्थापण्याचे श्रेय बी.पी. वाडीया यांना देण्यात येते. मद्रास मधील कामगारांना संघटित करून २६ एप्रिल १८१८

रोजी 'मद्रास लेबर युनियन' या कामगार संघटनेची स्थापना केली. मद्रास लेबर युनियनच्या पाठोपाठ देशात इतर ठिकाणीही कामगार संघ स्थापन होण्यास सुरूवात झाली. अहमदाबाद येथे टेक्सटाईल लेबर असोसिएशनची स्थापना १८१८ मध्ये महात्मा गांधी यांनी केली. मुंबई, कलकत्ता येथे जहाजावरील खलाशी संघटीत झाले. मद्रास येथे रेल्वे कामगार संघ स्थापन झाला. अशाप्रकारे सन १९२० मध्ये भारतात १२५ कामगार संघ अस्तित्वात होते. त्यानंतर ३१ ऑक्टोंबर १९२० रोजी 'अखिल भारतीय ट्रेड युनियन' या प्रभावी आणि लढावू कामगार संघटनेचा उदय झाला. आज भारताच्या कामगार चळवळीच्या इतिहासातील सर्वात जुनी कामगार संघटना म्हणून 'आयटक' या संघटनेला ओळखले जाते.

**भारतातील कामगार चळवळीचा उदय व विकास :**

१९ व्या शतकातील उत्तरार्धात भारतातील कामगार चळवळीच्या उदयास सुरूवात झाली होती. इ.स.१८७० मध्ये कामगार क्लब स्थापन करण्यात आला होता . सन १८९० मध्ये मुंबईत श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल हॅन्डस असोशियशन' या संस्थेची स्थापना केली. ही भारतातील पहिली कामगार संघटना मानली जाते. श्री. लोखंडे हे स्वत: कापड गिरणीत कामगार होते. कारखानदारवर्गाकडून कामगारावर कशाप्रकारे अन्याय-अत्याचार करून त्यांचे शोषण केले जाते. या सर्व बाबी त्यांनी अनुभवल्या होत्या. म्हणूनच कामगारांना संघटीत केल्याशिवाय त्यांच्यावरील अन्याय दूर करता येणार नाही याची जाणिव त्यांना होती. याकरीता त्यांनी सप्टेंबर १८८४ मध्ये कामगार सभा घेतल्या. त्यात त्यांनी दर आठवड्यात एक दिवस सुट्टी , भोजनासाठी सुट्टी, दरमहा वेतन आणि अपघात नुकसान भरपाई इत्यादी मागण्या केल्या होत्या, सन १८७७ मध्ये नागपूरच्या एक्सप्रेस मील मधील पगारवाढीसाठी मोठा संप केला होता. १९०५ मध्ये मुंबईतील कापड गिरण्या व इतर कारखान्यात विजेचा वापर सुरू झाला. त्याचा परिणाम कामगराचे कामाचे तास वाढले त्यामुळे कामगार वर्गात असंतोष निर्माण झाला. त्याची परिणती म्हणून २४ जुलै १९०८ रोजी मुंबईतील ६० गिरण्यातील कामगार संपावर गेले. मुंबईतील संपूर्ण जनजीवन या संपाने प्रभावित झाले. सगळीकडे आंदोलने, मोर्चे, सभा, दगडफेक, हल्ले, लाठीमार व गोळीबार यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले.

**भारतातील प्रमुख कामगार संघटना :**

महाराष्ट्रातील मुंबई शहर हे कामगार चळवळीचे मुख्य केंद्र आहे. मुंबई शहरातच देशातील कामगार चळवळींचा जन्म झाला. आज महाराष्ट्रात आयटक, इंटक, सिटू, हिंदू मजदूर सभा, भारतीय मजदूर संघ, दत्ता सामंत यांची कामगार आघाडी, शिवसेनेची भारतीय कामगार सेना, दत्ता देशमुख यांची वीज कामगार संघटना, सुदाम देशमुखांची एस.टी. कामगार संघटना, डॉ.बाबा आढाव यांची राष्ट्रीय हमाल माथाडी संघटना, र.ग. कर्णिय यांची शासकीय-निमशासकीय कर्मचारी संघटना इत्यादी कामगार संघटनांचा उदय आणि विकास देशाची औद्योगिक नगरी असणाऱ्या मुंबईत झाला. भारतात प्रामुख्याने खालील कामगार संघटना कामगाराच्या हक्काकरीता देशभरात आंदोलन, निदर्शने, मोर्चे, संप, हरताळ, चक्का जाम आदि आंदोलने करून शासन व समाजाचे लक्ष आपल्याकडे वेधतात.

**१) आयटक :** ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या देशातील पहिल्या कामगार संघटनेची स्थापना १९२० मध्ये मुंबई येथे झाली. आयटकच्या नेतृत्वाखाली मुंबईत गिरणी कामगार, गोदी कामगार, रेल्वे कामगार, डाक कर्मचारी यांच्या युनियन स्थापन झाल्या. लाला लजपतराय, व्ही.व्ही. गिरी, जवाहरलाल नेहरू, सुभाशचंद्र बोस, कॉ.डांगे इत्यादी नामवंत व राष्ट्रीय नेते आयटकचे अध्यक्ष राहिलेले आहेत.

**२) इंटक :** ऑल इंडिया ट्रेड युनियन या देशव्यापी संघटनेमध्ये कालांतराने साम्यवादी आणि राष्ट्रवादी असे दोन गट निर्माण झाले. १९४७ मध्ये इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस या नवीन कामगार संघटनेची स्थापना करण्यात आली. डॉ. सुरेंद्र बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली देशातील कापड उद्योग, कोळसाखाणी, लोखंड, पोलाद चहामळे, साखर उद्योग या क्षेत्रात इंटकच्या कार्याचा विस्तार झालेला पहावयास मिळतो.

**३) सिटू :** सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन या कामगार संघटनेची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. 'आयटक' ही कामगार संघटना कम्युनिष्टांच्या ताब्यात राहिली. भारतीय कम्युनिष्ट चळवळीमध्ये मतभेद निर्माण झाले. त्या पार्श्वभूमीवर १९६४ मध्ये भारतात मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष स्थापन करण्यात आला. आयटक मध्ये मतभेद होऊन लढावू क्रांतीकारक संघटना 'सिटू' चा जन्म झाला. कॉ.बी.टी. रणदिवे यांच्या अध्यक्षतेखाली भांडवलदार, जमीनदार यांच्या सरकारला उलथून टाकून पश्चिम बंगालमध्ये कामगारांचे अधिराज्य निर्माण् केले. केरळ, त्रिपुरा बंगाल या राज्यात रेल्वे, बँका, विमा या क्षेत्रात 'सिटू' चे प्रभावी काम आहे.

**४) भारतीय मजदूर संघ :** सुप्रसिध्द कामगार नेते दत्तोपंत ठेंगडी यांच्या नेतृत्वाखाली जनसंघाला मानणाऱ्या कार्यकर्त्यांनी १९५५ मध्ये भारतीय मजदूर संघाची स्थापना केली. भारतीय संस्कृतीवर आधारलेली कामगार संघटना म्हणून या संघटनेस ओळखले जाते. शासकीय, निमशासकीय, कापड, बीडी कामगार, रेल्वे, विमा इत्यादी क्षेत्रात या संघटनेचा कार्यविस्तार पहावयास मिळतो.

जगात जागतिकीकरणाची लाट आल्यानंतर नवे तंत्रज्ञानाची साधने यामुळे कामगार चळवळीबाबत नव्याने विचार सुरू झाला. खाजगीकरण आणि बाजारीकरणामुळे सरकारी क्षेत्रावर संकट निर्माण झाले असून उत्पादनाची मालकी देशादेशातून विदेशी कंपन्या, बहुराष्ट्रीय कंपन्याकडे जात आहे. अशा परिस्थितीत भारतीय कामगार चळवळ लयास जाते की काय? असा धोका निर्माण झाला आहे.

**निष्कर्ष :**

नवीन युगात तंत्रज्ञानामुळे उत्पादन प्रक्रियेची मालकी, प्रकार व स्वरूप बदलत असून राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्याकडून अनियमित मक्तेदारी वाढत आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया अपरिहार्य होत असताना 'नफा' हे लक्ष्य न ठेवता 'जनता' हे लक्ष्य ठेवणे आवश्यक असताना कामगारांच्या व श्रमिकांच्या शोषणाविरूध्द पावले उचलण्याऐवजी शासनाकडून कारखानदार वर्गांना मुक्त परवाना मिळत आहे. मुक्त स्पर्धेसाठी मालकांना मुक्त सवलती दिल्या जात आहेत. कामगार कपात व कारखाने बंद करण्याची मुभा मिळत असताना कामगार चळवळीचे अस्तित्वच धोक्यात आलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. पाटील, एस. के. (२००१), *महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय विकास,* विद्याबुक्स, पब्लिकेशन, औरंगाबाद.
२. गव्हाणे, किशोर व शिंदे सुखदेव (२०१५), *भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास,* एज्युकेशन पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, औरंगाबाद.
३. मोरे, दिनेश (२००८), *आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,* के.एस. पब्लिकेशन, औरंगाबाद.
४. सातभाई, श्रीनिवास (२०१४), *आधुनिक भारताचा इतिहास,* विद्या पब्लिशर्स, औरंगाबाद.

ISSN : 2348-7143
December-2018

# कष्टकऱ्यांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. समाधान विठ्ठल लोंढे**
सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

**गोषवारा :-**

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नसून तो विचार आहे. हा विचार प्रेरणादायी आणि प्रवाही आहे. त्यांचे जीवन आणि कार्य हे तळागाळातील हजारो वर्षाच्या सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषणामुळे भरडलेल्या लोकांकरिता प्रेरणा आहे. जाज्वल्य-राष्ट्रनिष्ठा आणि देशप्रेम हे बाबासाहेबांच्या जीवन आणि कार्याचे अतूट अंग आहे. भारताचे नुसते स्वातंत्र्य नको होते, त्याचबरोबर दलित आणि अस्पृश्यांच्या सामाजिक आणि आर्थिक उत्यानाचा संबंध स्वातंत्र्याशी जोडणे आवश्यक वाटत होते. आधुनिक भारताच्या जडणघडणीत विविध क्षेत्रात काम करत असणारे कामगार व कर्मचारी आदींच्या सुखी जीवनासाठी त्यांनी केले कार्य बहुमोलाचे आहे.*

**प्रस्तावना :-**

प्राचीन काळापासून कष्टकरीवर्गाला प्रस्थापित व्यवस्थेने न्याय दिला नसल्याचे पाहिला मिळते. कष्ठकरीवर्गाच्या हालआपेष्टा कमी करण्यासाठी थोर व्यक्तींनी कार्य केले. स्वातंत्र्य लढा सुरु असताना कष्टकरी समाजाच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येतो. पारतंत्र्यातून भारताची मुक्तता झाल्यानंतर नवभारताची उभारणी करण्याकामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अभ्यासासाठी प्रस्तूत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :-**

१. कामगार प्रश्नांची चिकित्सा करणे.
२. कष्टकाऱ्यांच्या उन्नतीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.
३. कामगारांच्या न्याय्य लढातील अडथळयांची चिकित्सा करणे.

**गृहितके:-**

१. डॉ. आंबेडकरांनी कष्टकरीवर्गाचे हित जोपासले.
२. कष्टकरी समाजाची परिस्थिती बदली आहे.
३. सध्या कष्टकरी समाजाचे अस्थिर जीवन बनले आहे.

**माहिती संकलन आणि विश्लेषण :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कष्टकरी समाजाच्या हितासाठी बजावलेली बहूमोलाची कामगिरीचे अध्ययन करताना तत्कालीन ऐतिहासिक नोंदी, त्यांच्याबद्दल इतर विचारवंतांनी मांडलेली मते, घडलेल्या घडामोडी यांची माहिती विविध साधनांद्वारे प्राप्त केलेली आहे. तसेच शोधनिबंधासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिक, संकेत स्थळ यासारख्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला असून त्याआधारे विश्लेषण करण्यात आले आहे.

**भारतातील कामगार लढ्याची पार्श्वभूमी:-**

भारताच्या बाहेर मालक आणि कामगार असे दोन प्रकार पाहिला मिळतात. यामुळे आपल्या कामाचा न्याय्य मोबदला मिळविण्याकरिता तेथील कामगार वर्ग संघटित झालेला दिसून येतो. तसेच त्यांना योग्य असे नेतृत्व मिळाळ्याने

कामगारांनी क्रांती करुन सत्ता प्राप्त केलेली दिसते. इतकेच नव्हेतर मालक वर्गाने कामगार वर्गास मालक होण्यात अडचणी निर्माण केल्याचे दिसून येतात. भारतात पहिली कामगार शक्ती रावबहाद्दर नारायण मेघाजी लोखंडे यांनी महात्मा फुले यांचे शिष्य होते त्यांनी उभी केली. या कामगार संघटनेला त्यांनी सक्रिय ठेवण्याने भारतातील कामगार आंदोलनाचे जनक म्हणून महाराष्ट्रात त्यांचे नाव घेतले जाते. मार्क्सवादी, समाजवादी आणि गांधीवादी विचारधारेतील भारतीय कामगारांना विभाजित करुन आपला हेतू साध्य करण्याचा राजकीय पक्षांनी भारतीय कामगार चळवळीचा वाताहत केलेली दिसून येते.

साधारणपणे गुलामीत असलेल्या व्यक्तीची दोन मुख्य लक्षणे आहेत. पहिले तो निर्णय घेण्यास असमर्थ असतो आणि दुसरे म्हणजे तो कधीही शासनकर्ता होऊ शकत नाही. असे अभासी चित्र निर्माण केलेले पाहिला मिळते. "भारतीय कामगांरानी विवेकबुध्दीचा वापर करु नये म्हणून प्रस्तापितांनी चार्तुवर्ण्य पध्दतीने एक जालीम विष निर्माण केले. या देशात विषमता निर्माण केल्याने भारतीय कामगार हा विषमतेने उदरनिर्वाह करुन विषमता हा जीवनाचा एक अभिन्न हिस्सा मानत आला आहे."[१] यावरुन असे लक्षात येते की माणसांची मने दुभंगली आणि समाजाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

"समाजवादाची स्थापना करण्याच्या उद्देशाने दलित आणि श्रमिक यांच्या एकजुटीवर आधारलेला काँग्रेसला पर्यायी असा एक लोकशाही समाजवादी पक्ष स्थापन करण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. स्वतंत्र मजूर पक्ष हे त्या दृष्टीने त्यांनी टाकलेले पहिले पाऊल होते."[२]

**स्वतंत्र मजूर पक्ष स्थापनापूर्व स्थिती :-**

"काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनाच्या व्यासपीठावरुन काँग्रेसने समाजवादाचा जोरदार पुरस्कार केला होता. भारताच्या अनेक सामाजिक - आर्थिक समस्यांची सोडवणूक समाजवादातून हाऊ शकेल असे त्यांनी खात्रीपूर्वक सांगितले होते. एका बाजूने समाजव्यवस्था विचार प्रणालीला लाभत असलेली ही व्यापक लोकमान्यता आणि दुसऱ्या बाजूने १९३५ च्या कायद्यानुसार येऊ घातलेल्या निवडणूकीमुळे डॉ. आंबेडकरांनी केलेली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना समजून घेता येते. दलित शोषितांच्या समावेशक एकजुटी वाचून तरणोपायच नाही, अशी त्यांची जी धारण होती तिचा पहिला आविष्कार स्वंतत्र मजूर पक्षाच्या स्वरुपात झाला."[३] स्वतंत्र मजूर पक्षाने समाजवादी विचार अंमलात करण्याकरीता कायदेमंडळात आवाज उढवला गेला असल्याचे दिसून येते. स्वतंत्र मजूर पक्षाने जाहीर केलेली ध्येयधारेणांशी प्रतारणा केली नाही असे आपल्या लक्षात येते.

अस्पृश्यतेविरुध्द आपला लढा अस्पृश्यांना स्वतंतपणे लढावा लागेल; पण आर्थिक न्यायाचा लढा मात्र त्यांना शेतकरी कामगारवर्गाच्या सहकार्यावाचून मुळीच यशस्वी करता येणार नाही. हे आंबेडकरांनी जाणले होते अस्पृश्य-अस्पृश्येतर, शोषित-श्रमिकांचा हा लढा प्रभावीपणे चालविण्याची क्षमता कोणत्याही तत्कालीन राजकीय पक्षांशी नसल्यामुळे यावर्गाचा असा नवा पक्ष निर्माण करणे हाच एक मार्ग त्यांना दिसत होता. "काँग्रेस पक्षाकडून श्रमिक कष्टकरी वर्गाला न्याय मिळण्याची शक्यता नव्हती. कारण बोलून चालून तो पक्ष भांडवदारांचा होता. काँग्रेसचे वर्गचारित्र व तत्वज्ञान या दोहोंवरही डॉ. आंबेडकरांनी आक्षेप घेतले होते."[४]

पिळवणूक करणारे व पिळले जाणारे यांची एकजूट करण्याचा प्रयत्न काँग्रेस करते अशी एकजूट राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भले ही उपयोगी ठरु शकते, पण दलित - शोषितांना सामाजिक - आर्थिक न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने मात्र ती कुचकामी सिध्द होणे अपरिहार्य आहे. "समाजवादी हे आर्थिक प्रश्नांवरच लक्ष केंद्रीत करुन सामाजिक विषमतेच्या प्रश्नाकडे ते साफ दुर्लक्ष करतात. मार्क्सचा पाया इमारत सिध्दांत ते फारच शब्दशःखरा मानून चालतात. केवळ वर्गीय परिभाषेत ते भारतीय समाजवास्तव पाहत असल्यामुळे त्यांना त्यांचे यर्थार्थ आकलन होऊ शकत नाही असे डॉ. आंबेडकरांचे समाजवाद्यांविषयी आक्षेप होते."[५] कष्टकरी वर्गाला अनेक मूलगामी समस्यांनी

ISSN : 2348-7143
December-2018

ग्रासले होते. डॉ. आंबेडकर यांनी कष्टकरी समाजाला सावध केलेल्याचे पाहिला मिळते. तसेच डॉ. आंबेडकर म्हणतात, "यादेशातील कामगारांना प्रमुख दोन शत्रूंना तोंड द्यावयाचे आहे ते दोन शत्रू म्हणजे ब्राह्मण्यवाद व भांडवलशाही हे आहेत. यावरुन त्यांची सैध्दांतिक भूमिका स्पष्ट दिसून येते."[६] डॉ. आंबेडकरांनी कष्टकरी वर्गास सामाजिक व औद्योगिक प्रश्नांची जाणीव करुन दिली असल्याचे दिसून येते.

**स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरणः-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येयधोरण पुढील प्रमाणे पाहिला मिळतात.

१) भूतारण बँक, सहकारी पतपेढ्या व खरेदी - विक्री संघ स्थापन करणे.
२) जुन्या उद्योगधंद्याचे पूनरुज्जीवन करवून कच्चामालास अनुरुप नवे उद्योगधंदे उभारणे.
३) व्यावसायिक व औद्योगिकरण या दृष्टीने विस्तृत कार्यक्रम राबविणे.
४) उद्योगधंद्यांची मालकी व व्यवस्थापन सरकारने आपल्याकडे ठेवावे.
५) शेतकरी कुळाचे संरक्षण व्हावे असे कायदे करण्याचा प्रयत्न करणे.
६) शेतकरी व कामगार वर्गास कष्टाचा योग्य मोबदला मिळवून देणे.
७) कारखाण्यातील कामगारांना नोकरीची व वेतनाची हमी, कामाचे नियमित तास, कामानुसारवेतन, पगारी रजा, बोनस- पेन्शन वगैरे सुविधा, बेकारी - आजारपण, अपघात वगैरे प्रसंगी मदत मिळेल अशी विम्याची सोय, स्वस्त भाड्याची निवास गृहे मिळवून देणे.
८) शेतकरी व कामगार हिताचे निर्णय घेणे.
९) सरकारने नव्या रोजगार संधी उपलब्ध करुन देणे.
१०) गरीबांना कर्जमुक्त करणे.
११) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणणे.

**डॉ. आंबेडकरांची कायदेमंडळात मांडलेली भूमिकाः-**

भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टासंबंधीचा ठराव जेव्हा पंडित जवाहरलाल नेहरुंनी घटना परिषदेत मांडला. या ठरावासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "जर या ठरावामागे खरोखरच आंतरिक तळमळ असेल, सामाजिक, आर्थिक न्यायाचे तत्व मनापासून वास्तवात आणण्याची इच्छा असेल, तर त्या दृष्टीने काही तरी निश्चित स्वरुपाची योजना स्पष्ट करणे आवश्यक आहे. या दृष्टीने उद्योगधंद्यांचे आणि शेती व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण होणे आवश्यक आहे. ज्या सरकारला भविष्यकाळात भारतीय जनतेला सामाजिक - आर्थिक - राजकीय न्याय देण्याची इच्छा आहे. त्या सरकारने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्याशिवाय ते सरकार जनेतला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देऊ शकेल असे मला वाटत नाही."[७] याचा अर्थ असा की, डॉ. आंबेडकरांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाच्या दृष्टीने काही घटनात्मक विधीनियमात तरतुदी हव्या होत्या. पंडित जवाहरलाल नेहरु हे समाजवादी विचार मान्य करणारे होते. जेव्हा संविधानसभेत डॉ. आंबेडकरांनी समाजवादासंबंधी मांडणी केली पाहून हे तर आपलेच्या विचारधारेचे आहेत अशी भावनाही त्यावेळी व्यक्त केली होती.

"शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनच्यावतीने घटनासमितीला दिलेला अहवालातील योजनेची दोन प्रमुख वैशिष्ट्ये १) भारताची अर्थव्यवस्था राज्यसमाजवादाची असावी.२) ही अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम विधीमंडळाच्या इच्छेवर न सोपवता ते घटनात्मक विधी नियमांच्याव्दारे निश्चित करावे त्यामुळे विधीमंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांना कोणताही कायदा सामान्यपणे बदलता येणार नाही."[८] सदरची योजना जर तत्कालीन परिस्थितीत स्विकारली असती तर नवीन आर्थिक धोरणामुळे निर्माण झालेली गंभीर समस्या निर्माण झाल्या नसत्या असे म्हणावे लागेल.

**देशातील परिस्थिती आणि डॉ. आंबेडकरांचे विचारः-**

कामगार चळवळीच्या डावपेचांचा विचार करताना त्या चळवळीचे तत्कालिक उद्दिष्ट आणि अंतिम उद्दिष्ट असा तिच्या उद्दिष्टांत भेद करीत होते. पगारी गुलामगिरीपेक्षा स्वतंत्र्य,समता व बंधूभाव ही तत्वे मानणारी समाजव्यवस्था निर्माण करणे हे तुमचे ध्येय असले पाहिले. हे आधुनिक मूल्य जोपासण्यास भारतात रुजविण्यास मदत झालेली दिसून येते. डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. "स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, पुनर्बांधणी आणि पूनर्वसन योजना १९४२ - ४६ तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेने त्या योजनेचा आधार घेतला."[९]

"भारतात विषमता वरचेवर वाढतच चालली आहे आहेरे आणि नाहीरे या वर्गातील दरी रुंद होत आहे गरीब अधिक होत आहेत आणि श्रीमंत अधिक श्रीमंत असे थॉमस पिकेटी यांनी म्हटले आहे."[१०] आताच्या घडीला भारतामध्ये कामगार, शेतकरी, दलित व अल्पसंख्यांक वर्गाचे लाखोंच्या संख्येने आंदोलन केली जात आहे. याचा अर्थ कष्टकरी समाज हा खूप मोठ्या अडचणीत आलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगीतलेल्या विचारधारेची नितांत गरज असल्याचे दिसून येते.

भारतीय कामगार आंदोलनावर प्रभाव पाडणारी घटना म्हणजे १९९१ ची शासनाने लागू केलेली खाजगीकरण नीती होय. खाजगी उद्योगात आज ही आरक्षण लागू नाही. समाजहितसाठी खाजगी क्षेत्रात आरक्षणाची तरतूद करण्यासाठी व्यापक लढा उभारण्याची गरज निर्माण झाली असल्याचे आपणास म्हणावे लागेल. तसेच बहुतांशी दारिद्र्य व गरीबी कमी करण्यास मदतच होईल. याआधारे डॉ. आंबेडकरांचे कष्टकरी वर्गासंबंधीचे विचार महत्त्वपूर्ण परिवर्तन घडवून आणण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :-**

१. भोळे भा.ल., डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन पूणे, व्दितीयावृत्ती ऑक्टो.२००६, पृ.क्र. ६३
२. पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पूनर्मुद्रण आवृत्ती पृ.क्र.२५२
३. भोळे भा.ल., डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन पूणे, व्दितीयावृत्ती ऑक्टो.२००६, पृ.क्र. ६४
४. कित्ता, पृ.क्र. ६५
५. कित्ता, पृ.क्र. ६६
६. कसबे रावसाहेब, स्वतंत्र मजूर पक्ष, समाज प्रबोधनपत्रिका ऑक्टो-डिसें. २०१६, पृ.क्र.६८
७. कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पूणे, सहावी आवृत्ती २०१७ पृ.क्र.१८७
८. कसबे रावसाहेब, स्वतंत्र मजूर पक्ष, समाज प्रबोधनपत्रिका ऑक्टो-डिसें २०१६. पृ.क्र.६९
९. थोरात सुखदेव, राष्ट्र उभारणीत डॉ. आंबेडकरांचे योगदान, दै. लोकसत्ता, पूणे आवृत्ती, ०७ डिसें.२०१८
१०. आवटे संजय, We The Change- आम्ही भारताचे लोक, माइंड अँड मीडिया,पूणे प्रथम आवृत्ती २०१८, पृ.क्र.१९१

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.261**
**Special Issue 79 : Political History of Peasant-Workers Movements in Maharashtra**
**UGC Approved Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2018**

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ काल आणि आज

**प्रा. डॉ. त्रिंबक भिमराज राजदेव**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर
मो.9423461885

**प्रार्श्वभूमी :-**

आपल्या देशाातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचा अभ्यास करताना शेतकऱ्यांच्या चळवळीचा अभ्यास विशेष महत्त्वाचा ठरतो कारण भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे देशाच्या एकूण लोकसंख्येत शेतीवर उपजीविका करणाऱ्या लोकांची संख्या इतर कोणत्याही व्यवसायातील लोकांच्या संख्यापेक्षा अधिक आहे. परंतु हा समाज इतर व्यवसायातील लोकांच्या संख्यापेक्षा अधिक आहे. परंतु हा समाज इतर व्यवसायातील लोकांप्रमाणे संघटित होऊ शकत नाही त्यामुळे स्वांतत्र्योत्तर काळात हि या समाजाचे प्रश्न सुटू शकले नाहीत म्हणूनच मी माझ्या शोध निबंधाकरिता महाराष्ट्रातील शोतकरी चळवळ काळ आणि आज हा विषय निवडला आहे.

स्वातंत्र्योत्तर काहाळत विशेषतः 1970 नंतर देशाभर शेतकऱ्यांची अंदोलने वयापक प्रमाणात झालेली दिसतात या अंदोलनांव्दारे शोतकऱ्यांना आपल्या मागण्या राजकीय पातळीवर प्रभाविपणे मांडून नव्या बदलांना चालना दिली आहे अर्थात शेतकऱ्यांची ही आंदोलने आकस्मात झालेली नहीत0 त्यांच्यामागे शेतीक्षेत्रातील समस्यांची कारणे आहेत. त्याच प्रमाणे आगोदर झालेल्या अंदोलनांची उठावांची परंपराही आहे. शेती क्षेत्रातील समस्या व शेतकऱ्यांच्या आंदोलनांची परंपरा समजुन घेताना ब्रिटीश राजवटीतील शती विषयक धोरण समजून घ्यावे लागते.

1965 साली बंगालचे दिवाणी हक्क मिळाल्यावर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी जमीन महसूल विषयक धेरणांमध्ये बदल केले. सुरुवातीस बंगाल प्रांतात त्यांनी कायमधारा किंवा जमीनदारी पध्दत लागू केली हिच जमीनदारी पध्दती बिंटिशाांनी नंतर बिहार ओरिसा इतर प्रदेशा व मद्रास इलाख्यांचा उत्तर भागात लागू केली. तर मुंबई मद्रास आलीबेरार या प्रांतांमध्ये रयतवारी पध्दत लागू केली रयतवारी पध्दतीत शेतकऱ्याा जमीनीचा मालकी हक्क देण्यात आला.

**महाराष्ट्रातील उठाव :-**

'ब्रिटिश राजवट आल्यावर महाराष्ट्रात ज्याप्रमाणे पेशव्यांचे राज्य गेले त्याच प्रमाणे आदिवासी राजांची राज्ये गेली त्या सर्वाच्या असंतोशााची प्रतिक्रिया ब्रिटिशा विरोधी सशस्त्र उठावांत झाली.1626 साली पुणे जिलहयाच्या दक्षिण भागात रामोशांचे बंड उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली झाली. रामोशांच्या उठावा पाठोपाठ 1630 मध्ये व पुन्हा 1639-46 या काळात कोळयांनी बंड केले. भाऊखेर,लिमणजी जाधव,नाना दरबारे,रामजी व भांगरे या एकेकाळच्या पेशव्यांच्या चाकशंचा बंडात पुढाकार होता. त्याबरोबर भिललांचा उठाव हि महाराष्ट्रात 1622 ते 1657 या काळात खानदेशात घडून आला होता.त्यानंतर 1652 मधील दख्खनचे दंगे घडून आले होते. रयतवाडी पध्दतीमुळे मुंबई इलाख्यात शेतकरी खातेदार बनू सरळ सरकारला सारा भरु

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

लागला होता. सुरवातीस पध्दतशीर मोजणी पाहणीकरुन सारा आकाराणी ठरविली गेलयाने शेतकऱ्यांना सारा सोयीस्कर झाला. अमेरिकन यादवी युध्दामुळे शेतमालाच्या किंमती वाढलयाने शेतकऱ्यांना थोडा फायदाही झाला. पण शेतीत नफा झालयावर इंग्रजांनी सारा आकारणीत पन्नास टक्के वाढ केली.

इंग्रजांचे साराव सुळीचे धोरण लवचीक नव्हते. साऱ्यांमध्ये शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सुट नसे. तसेच तो पैशाच्याच स्वरुपात भरावा लागे. त्यामुळे अवर्षणाच्या किंवा दुसऱ्या एखादया संकटाच्या प्रसंगी शेतकऱ्यांना सावकाराकडे धाव घ्यावी लागे. सारा वेळीच भरण्यासाठी शेतकऱ्याला जमीन किंवा गुरेढोरे गहाण ठेवावी लागत असत आणि चढया दराचे व्याज फेडणे ही कठीण झालयाने तो अधिकाधिक कर्जबाजारी व कंगाळ बनत चालला होता.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धात वारंवार पडणारे दुष्काळ अधिक तीव्र स्वरुपाचे बनले तरीही महसूल अधिकारी सारी वसुलीत मुळीच सवलत आयक तयार नव्हते.एका बाजूला सरकार व दुसऱ्याला बाजूला लोभी सावकार यांच्या कचटयात शेतकरी सापडला होता. या प्रश्नावर सुरुवातीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी शांततामय मार्गांनी आपले गाऱ्हाने भांडाण्याचा प्रयत्न केला.त्यांनी सरकारकडे अर्ज मांडले.1667 साली पुण्यात स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांच्या या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला पण सरकारने शेतकऱ्यांचा असंतोष लक्षात न घेता आपला सारा वसुलीचा हेका तसाच ठेवला त्यामुळे चिडलेल्या शेतकऱ्यांनी नगर सोलापूर, पुणे इत्यादी जिल्ह्यात सावकरांकडे मोहरा वळविला. सुरुवातीला शेतकऱ्यांनी गुजराथी, मारवाडी सावकारांविरुध्द सामाजिक बहिष्कार सुरु केला पण लवकरच हे आंदोलन हिंसक बनले. अडाणी, निरिक्षर शेतकऱ्यांना फसवुन सावकार मालाच्या खोट्या दस्त ऐवजांवर त्यांचे आंगठे घेत व पुढे त्या जोरावर शेतकऱ्यांच्या जमिनी घशात घालत त्यामुळे 1875 सालच्या दंगलीत शेतकऱ्यांच्या भर कर्जरोखेवर व दस्तऐवज जाळण्यावर असे हे दख्खनचे दंगे मुख्यतः पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यांतील गावांमध्ये झाले. दख्खनच्या दंग्यासारख्या सामुहीक उठावाखेरीज महाराष्ट्रात इतरही काही प्रकारचे बंड व उठाव झाले त्यातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी व इतर शोषीत समुहांनी अन्याय व अत्याचारांविरुध्द अपला निशेध प्रकट केला. 19 व्या शतकातील जे महत्त्वाचे सामुहीक उठाव झाले त्यात शेतकऱ्यांचा सहभाग होता. 1857 च्या बंडात सैनिकांच्या बरोबरीने शेतकरी होते. 1875 च्या दख्खनच्या दंग्यामध्ये शेतकरी मुख्य होते या दंग्यांचा उद्देशही शतकऱ्यांवरील अन्यायाचा प्रतिकार करणे हाच होता.

**महात्माफुले यांची शेतकरी वर्गामध्ये सांस्कृतीक क्रांतीः-**

19 व्या शतकाच्या उत्तारार्धात महाराष्ट्रातील समाज सुधारण्याच्या चळवळी त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्या ज्योतीराव फुले यांनी शेतकरी वर्गात वैचारीक व सांस्कृती क्रांती घडवून आनली त्यांनी जरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांची चळवळ उभी केली नसली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून त्यांनी सामाजीक परिस्थितीचा विचार केला. शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक हिताला विरोध करणाऱ्या सावकार व भटजी या वर्गाच्या कारवायांबद्दल शेतकरी वर्गात जागृती निर्माण केली 1873 साली फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या सत्यशोधक समाजाने 1879पासून "दिनबंधू" नावाचे एक साप्ताहिक सुरु केले या साप्ताहिकात शेतकरी व कामगारांची गऱ्हानी मांडली जात होती. शेतकरी वर्गाच्या सांस्कृतीक उत्थानासाठी फुले यांनी जातीभेदाविरुध्द अघाडी उघडली त्याच प्रमाणे सांस्कृतीक क्षेत्रातील ब्राम्हणांची मक्तेदारी मोडून काढण्याचे प्रयत्न केले त्यासाठी सत्यशोधक समाजाच्या शाखा महाराष्ट्रात गावोगावी काढण्यात आल्या.

तमाश व जलसे यांच्याव्दारे सत्यशोधक समाजाचा संदेश खेड्यातील शेतकरी वर्गापर्यंत पोहचविण्यात आला. शिक्षणाचा प्रसार जातीभेद नष्ट करने ब्राम्हण व सावकार वर्गाची मक्तेदारी नष्ट करणे ही सत्यशोधक समाजाची उद्‌दिष्ट्ये होती.

**विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ :-**

19 व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राजकारणात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्त्व करण्यास सुरुवात केली. 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतात सर्वत्र साम्राज्यवादी विरोधी चळवळ संघटीत झाली या काळात देशातील वेगवेगळ्या भागात कामगार शेतकरी व मध्यम वर्गाच्या चळवळी निर्माण झाल्या व पसरवल्या.

पहिल्या महायुध्दात होमरुल चळवळीच्या वेळी ग्रामीण भागांतही ब्रिटीशांविरुध्द जनभावना जागृत झाली होती. होमरुलच्या कार्यकर्त्यानी ग्रामीण भागात प्रचार केल्याने शेतकऱ्यांनी अनेक ठिकाणी सरकारच्या युध्द फंडाला पैसा देण्याचे नाकारले महात्मा गांधीच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी चळवळीला प्रचंड व्यापक स्वरुप प्राप्त झाले. टिळकांसारख्या जहला नेत्यानेही शेतकरी वर्गाच्या अंदोलनात्मक ताकदीकडे म्हणावे तितके लक्ष पुरविले नव्हते. शेतकरी वर्गाची ताकद महात्मा गांधीनी ओळखली होती त्यांनी शेतकरी कामगार व मध्यम वर्गीय एकत्र येवून लढा दिला. तसेच असे लढे उभारले यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्गात राष्ट्रीय भावना जागृत झाली तसेच त्यांना स्वतःच्या प्रश्नांबद्‌दलचे भानही आले. त्यामुळे त्यापुढील राष्ट्रीय चळवळीच्या वेगवेगळ्या पर्वात ग्रामिण भागही मोठ्या प्रमाणात सहभागी झाला. गांधींच्या नेतृत्त्वाखाली झालेले चंपारण्य, खेडा सत्याग्रह तसेच पाडवली सत्याग्रह महत्त्वाचे ठरले होते. चंपारण्य सत्याग्रह बिहार (1917-18) खेडा सत्याग्रह- गुजरात (1919), मोपल्यांचे बंड- मलबार (1921) या भारतातील इतर प्रांतातील शेतकऱ्यांचा सत्याग्रह बंडाप्रमाणे.

महाराष्ट्रातील साताऱ्याचे बंड (1919-1921) स्वातंत्र्य पुर्व काळात विशेष गाजलेले सत्यशोधक समाजाची चळवळ महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पोहचली होती. 1919 ते 1921 या कालखंडात शेतकऱ्यांच्या चळवळीने सातारा जिल्ह्यात जोर धरला होता. सातारा जिल्ह्यातील खंडकरी शेतकऱ्यांनी ब्राम्हन व मारवाडी जमिन मालकांविरुध्द अंदोलन केले. या खंडकरी शेतकऱ्यांची मागणी होती की, तेव्हा असणाऱ्या पध्दतीप्रमाणे एकूण पिकाच्या 2/3 किंवा 3/4 खंड न घेता तो 1/2घेतला जावा या मागणीच्या समर्थनासाठी त्यांनी मशागतीवर बहिष्कार टाकून जमिनी उजाड ठेवल्या होत्या या अंदोलनात सातारा जिल्ह्यातील तासगाव, कराड, वळवा आणि अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील सुमारे 30 गावांतील शेतकरी सामिल झाले होते.

मुळशी पेट्याचा सत्याग्रह (1920)- 1920 साली महाराष्ट्रात पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यात भुमी संपादनाच्या प्रश्नावरुन एक महत्त्वाचे अंदोलन उभे राहिले. ते अंदोलन म्हणजे मुळशी पेट्याचा सत्याग्रह म्हणून स्वातंत्र्य अंदोलन काळात ओळखले जाते.

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यात निळा व मुळा नद्यांच्या संगमावर विज निर्मितीसाठी धरण बांधण्याची योजना टाटा विज कंपनीने हातात घेतली या धरणाखाली 54 गावांतील जमिनी बुडणार होत्या आणि 10 ते 15 हजार मावळ रहिवाश्यांना त्याचे परिणाम भोगावे लागणार होते या योजनेला विरोध करावयाचा म्हणजे मावळ्यांना टाटा कंपनीत रेल्वे कंपन्यांचे मालक, इंग्रज भांडवलदार आणि साम्राज्यवादी राज्यकर्ते यांच्या युतीशी सामना करावयाचा होता.

**ISSN : 2348-7143**
**December-2018**

जेव्हा सरकारने भुमी संपादनासाठी शेतकऱ्यांना नोटीसा दिल्या होत्या तेव्हा त्यांनी आपल्या जमिनी सरकारला देण्याचे नाकारले. 1919 च्या डिसेबर महिन्यात आवळस व मुळशी या गावी जाहीर सभा झालया आणि शेतकऱ्यांनी एक मंडळ स्थापन केले. या मंडळाचे चिटणीस स्वतः एक सावकार होते. गव्हर्नरने शेतकऱ्यांच्या शिष्ट मंडळाला भेटण्यास नकार दिला. सर्वांना पर्यायी जागा मिळणार नाहीत असे सरकारने सांगितले. अर्ज,विनंत्या,भेटीगाटीचे सनदशीर मार्ग निष्फळ ठरत होते. केसरी वृत्तपत्राने मुळशी पेटयातील शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे व त्यांना पाठिंबा देण्याचे काम केले.

कंपनीने सरकारच्या मदतीने बळजबरीने शेतकऱ्यांच्या जमिनीवर कब्जा करण्यास सुरुवात केली तेव्हा शेतकऱ्यांनी एकजुट करुन कंपनीला काम बंद करावयास लावले. 16 एप्रिल 1929 रोजी सत्याग्रहाला सुरुवात झाली. सत्याग्रहाच्या दिवशी आपलया बायका मुलांसह आलेलया 1200 मावळया शेतकऱ्यांनी आणि पुण्याच्या नेत्यांनी धरणाची जागा अडविली. कंपनीच्या 5000 मजुरांना काम बंद करावे लागले. हा सत्याग्रह शांततामय मार्गाने झाला.सत्याग्रहाचे नेतृत्व सेनापती वापरांनी केले होते.संपुर्ण महाराष्ट्रात या प्रश्नावरुन संताप निर्माण झाला होता. मोठया प्रमाणात लोक जागृती करुन जनमत तयार करण्यात आले होते.1929 च्या डिसेंबर महिन्यात लढयाचा दुसरा टप्पा सुरु झाला. एकूण 125 मावळे 500 स्वयंसेवक आणि सेनापती बापटांसारख्या नेत्यांना अटक झाली.नेते तुरुंगात असताना सावकारांनी मावळयांना नुकसान भरपाई स्विकारण्यास भाग पाडले.

**सविनय कायदेभंगाची चळवळ आणि महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ**

1920 नंतरच्या राष्ट्रीय चळवळीच्या टप्प्यात कॉंग्रेसने कायदेभंगाची चळवळ सुरु केले व या जनआंदोलनाची गुजरातमधील बाडॉली तालुक्याची निवड करुन तिचे साराबंदीचे आंदोलन 1928 साली सरदार वललभभाई पटेलांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आले.

सुरु जिलहयातील बाडॉली तालुक्यातील श्रीमंत व मध्यम शेतकरी असणारा पाटीदार समाज मोठया प्रमाणात या सत्याग्रहात सामील झाला होता.

**महाराष्ट्रातील साराबंदी व तुकेडीबंदी विरुध्द चळवळ 1929 -**

1927 साली जमिनीसंबंधी विधेयक मुंबई सरकारने तयार केले. यात प्रामुख्याने तुकडेबंदी विरुध्द तरतुदी होत्या. या विधेयकाचे कायदयात रुपांतर झाले.तर 80 टक्के शेतकरी भूमिहीन होतील अशी भीती शेतकऱ्यांच्या हितकर्त्यांनी व्यक्त केली.या विधेयकाला विरोध करण्यासाठी सातारा ,पुणे,अहमदनगर या जिलहयांतील तालुक्यांच्या गावी शेतकऱ्यांच्या सभा घेण्यात आलया.25 जुलै 1927 रोजी पुण्याला घेण्यात आलेलया सभेत मुंबई प्रादेशिक शेतकरी संघ स्थापन करण्याचे आवाहन केले गेले. या सभेत महाराष्ट्र व कर्नाटकातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन लहान जमीन धारणा विधेयकला जमीन महसूल सुधारणा विधेयकाला आणि मुंबई सरकारच्या बाडॉली धोरणाला तीव्र विरोध प्रकट केला.

**जंगल सत्याग्रह 1930 -**

सरकारच्या जंगलविषयक धोरणांनी प.महाराष्ट्रातील सर्वच घरातील शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला होता. अहमदनगर,नाशिक,पश्चिम खानदेश,सातारा,व मध्यप्रांताच्या काही जिलहयातील शेतकऱ्यांच्या काही प्रमुख मागण्या होत्या,गुरे चारण्याचे शुलक कमी करावे, जंगली जनावरांपासुन पिकांचे संरक्षण

ISSN : 2348-7143
December-2018

करण्यासाठी शस्त्रे बाळगण्यास परवानगी असावी. राखीव जंगलीच्या लिलावात शेतकऱ्यांना सवलती द्याव्यात,वाळलेले लाकूड,सरपण,पाचोळा इत्यादी शेतकऱ्यां मोफत होऊ द्यावे.

सरकारच्या जंगल कायद्यात शेतकऱ्यांना वेगवेगळया मार्गानी दंड करण्याच्या व जंगल संपत्तीवरील त्यांचे नैसर्गिक अधिकार ही काढून घेण्याच्या तरतुदी होत्या. 1930 साली अहमदनगर जिलहयातील अकोले व संगमनेर तालुक्यांमध्ये जंगल कायदा तोडण्याचा सत्याग्रह सुरु झाला .कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यानी जवळजवळ 200 खेडयांमध्ये फिरुन शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण केली होती.या सत्याग्रहाला मोठया प्रमाणात शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला . 22 जुलै 1930 रोजी जवळ जवळ 58 हजार शेतकरी स्त्री- पुरुष मुले जंगल कायदा तोडून आपलया गुरांसह जंगलात शिरले गावकऱ्यांचा सहभाग मोठा असलयामुळे पोलिसांना आंदोलन नियंत्रणाखाली आणणे कठिण गेले.आतापर्यत आपण भारतातील आणि प्रामुख्याने महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून आढावा घेतला.ब्रिटीश राजवट आलयावर तिने आदोगरच्या राजे आमिर उमराव इत्यादीचे हक्क नष्ट केले.सुरवातीचे लढे या मंडळींनी ब्रिटीश राजवटी विरुध्द केले.त्यांनी शेतकऱ्यांना आपलया लढयांमध्ये सामिल करुन घेतले होते.

बिटीशांनी स्वतःच्या फायदयासाठी लादलेलया जमिनी महसूल पध्दतीच्या परिणामी देशात जमिनदारी रयतवारी व महालवारी या जमीनधारणा पध्दती निर्माण होऊन जमिनीचे विषय वाटप झाले अन्याय करपध्दती व वसुली मुळे शेतकरी कर्जबाजारी व दरिद्री झाला आणि एका बाजूला श्रीमंत जमिनदार व सावकार व जमिनमालक तर दुसऱ्या बाजुला गरीब शेतकरीमुळे व शेतमजुर अशी शेतीची रचना झाली.शेतीचा विकास खुंटला शेतीचे व्यापारीकरण होऊन ती वसाहतीत शोषणाचे शिकार बनले यातून शेतीचे दारिद्रीकरण वाढते दुष्काळ हे परिणाम झाले .याच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांनी आंदोलने केले या आंदोलनांनी असहय शेतसारा आवाजवीखंड व वाढते अत्याचार यांना विरोध केला होता.

20व्या शतकातील कॉंग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेलया आंदोलनात शेतकरी समाजाचे एकजुट करुन परकीय सरकार विरुध्द सारा वाढीसारख्या प्रश्नांवर सत्याग्रह केले.तर स्वातंत्र्योत्तर काळाची शेतकऱ्यांचे आंदोलने झाली ती प्रामुख्याने कम्युनिस्ट आदि डाव्या पक्षांनी डाव्या संघटनांनी आणि शेतकरी संघटनांनी चालवली.

**महाराष्ट्रातील 1970 नंतरच्या शेतकरी चळवळी -**

महाराष्ट्रात काही महत्वाचे आंदोलने झाली.धुळे जिलहयातील शहादा तालुक्यातील मार्क्सवादी विचारांच्या श्रमिक संघटनेने चालविले भिलल आदिवासी शेतकऱ्यांचे आंदोलन हे एक आणि दुसरे ठाणे जिलहयातील पालघर तालुक्यातील "भूमिसेना" या डाव्या संघटनेने चालविलेले वारली आदिवासींचे आंदोलन याखेरीज भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPF) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPM) यांच्या किसान सभांनीही शेतकऱ्यांना संघटीत करुन काही आंदोलने चालवली.लाल निशान पक्ष तसेच समाजवादी पक्ष आणि शेतकरी कामगार पक्ष हेही पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेऊन काही चळवळी उभारण्याचा प्रयत्न करीत होते.1970 च्या दशकाच्या अखेरीस महाराष्ट्रात श्री.शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली मोठी चळवळ सुरु झाली व शेतकरी संघटना या संघटनेखाली उभी राहिली ती देशाच्या इतरही भागात पसरली.

1. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची आर्थिक सामाजिक व राजकिय पार्श्वभूमी .
2. शेतीतील वर्ग संकलपना व महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग

3. डाव्या पक्षांची आंदोलने :- 1. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेचे कार्य
2. शेतकरी कामगार पक्षांचे कार्य
3. लाल निशान पक्षांचे कार्य

4. समाजवादी पक्षांचे शेतकरी शेतमजुर पंचायत

5. डाव्या विचार सरणीच्या संघटनांच्या चळवळी :- 1. शहांच्या श्रमिक संघटनेची चळवळ
2. पालघर तालुक्यातील भुमिसेना आंदोलन
3. डावेपक्ष व संघटनांनी चालविलेलया आंदोलनाची वैशिष्टये

6. शेतकरी संघटनेची चळवळ :- 1. शेतकरी संघटना
2. शेतकरी संघटनेची वैचारिक भूमिका
3. आंदोलने :-
1. कांदा आंदोलन (मार्च 1960)
2. ऊस आंदोलन नाशिक जिलहा ऑगस्ट ते नोव्हेंबर 1960
3. तंबाखू आंदोलन निपाणी (कर्नाटक) मार्च 1961
4. दुध आंदोलन जून 1962
5. पंढरपुर विठोबाला साकडे मेळावा 16 नोव्हेंबर 1963
6. परभणी अधिवेशन फेब्रुवारी 1964
7. चंदिगढच्या राजभवनावर पिकेटिंग मार्च 1964
8. कापूस आंदोलन पहिला टप्पा
9. महिला अधिवेशन चांदवड 9,10 नोव्हेंबर 1976
10. कर्जमुक्ती आंदोलन 1977-79

**संदर्भ -**

1. (sec222) सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी पुस्तक 3 य.च.म.मु विद्यापिठ नाशिक पृ.59
2. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळ राज्यस्तरीय चर्चासत्र शोध निबंध पुस्तिका 16 जानेवारी 2015 संपादक एस जी एम कॉलेज कोपरगाव.
3. sec 222 पुस्तक 1
4. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास आणि कायदे प्रथम आवृत्ती 2009 जून प्रकाश विद्याबुक्स औरंगाबाद.

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड आणि मराठवाड्यातील भूमिहिनांचा सत्याग्रह

**डॉ. विष्णु बब्रुवान वाघमारे**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी. जिल्हा. सोलापूर
ईमेलः-vishnuwaghmare321@gmail.com.

**प्रस्तावनाः-**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या दोन दशकात या देशात हरितक्रांतीला सुरूवात झाली, पतंप्रधान पंडित नेहरूनी तर कृषी क्षेत्रातील तंत्र विज्ञानाला सरकारच्या माध्यमातून गती दिली. शेती क्षेत्रासाठी शासनाने व खाजगी भांडवलदारांनी वित्त पुरवठ्याची सोय केली. भारताच्या ग्रामीण भागात सर्वच राज्यांमध्ये शेतीला रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगाचा दर्जा प्राप्त झाला. पण ह्या सर्व प्रगतीच्या पोटामध्ये भूमिहीन शेतमजूरांची संख्या ग्रामीण भागात वाढत चालली होती. एकंदर लोकसंख्येच्या साधारणतः चौथा हिस्सा असलेला हा भूमिहीन शेतमजूरांचा वर्ग, शेती उद्योगात दुर्लक्षित आणि भरडला जात होता. भूमिहीन शेतमजूरांच्या किमान वेतनाचा कायदा नव्हता आणि नंतर तरी तो अस्तित्वात आला, तरी ग्रामीण भागामध्ये त्याच्या काटोकोर अंमलबजावणीवर लक्ष ठेवणारी यंत्रणा, स्वातंत्र्यानंतरच काय पण आजसुध्दा अस्तित्वात नाही आणि म्हणूनच स्वातंत्र्याच्या दुसऱ्या दशकाच्या मध्यात दादासाहेबांनी भूमिहीन शेतमजूरांच्या वेदनेला वाचा फोडली.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून साठ वर्षे होऊन गेली तरी ह्या देशातील भूमिहीन शेतमजूरांच्या भौतिक जीवनात कोणती सुधारणा झाली हा मोठा प्रश्न आहे. म्हणून जेव्हा दादासाहेबांनी या भूमिहीनांच्या सत्याग्रहाला सुरूवात केली तेव्हा त्यांना या सत्याग्रहाची गरज का भासली हे आपल्या लक्षात येईल. आज या देशातील शासकीय आकडेवारीच सांगते की, या शंभर कोटीच्या पुढे असलेल्या लोकसंख्येच्या देशात वीस कोटीच्या पुढे लोक असे आहेत की, त्यांना दोन वेळेचे साधे जेवण सुध्दा मिळत नाही आणि तीस कोटी लोक दारिद्रय रेषेखालचे जीवन जगत आहेत. त्यामुळे भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यासाठी ''सत्याग्रह'' या हत्याराचा स्वतंत्र भारतात चांगल्या पध्दतीने वापर होऊ शकतो याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना होती. म्हणून त्यांनी भारतातील भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा प्रयोग मराठवाड्यात करण्याचा मनोदय इ.स.१९५० नंतर त्यांनी दादासाहेब गायकवाड यांच्याकडे बोलून दाखवला एवढेच नव्हे तर, या सत्याग्रहाच्या नेतृत्वाची जबाबदारी देखील त्यांनी दादासाहेबांवर टाकली.

**संशाधनाची उदिष्ट्येः-**

१. मराठवाड्यातील भुमिहिनांच्या सत्याग्रहाविषयी दादासाहेब गायकवाड यांची भूमिका व दृष्टिकोन अभ्यासने.
२. भुमिहिनांच्या सत्याग्रहातील दादासाहेब गायकवाड यांच्या व्यापक लढाऊ संघर्षाचा व नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.
३. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे मराठवाड्यातील भूमिहिनांच्या सत्याग्रहातील योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**:-

प्रस्तूत शोध निबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारीत आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रातील लेख इत्यादी माहिती गोळा करून ऐतिहासीक व विश्लेषनात्मक पध्दतीने विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

**मराठवाड्यातील भूमिहीनांचा सत्याग्रह- इ.स.१९५३-५८:-**

भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात या मागणीसाठी सुरू झालेला सत्याग्रह मराठवाड्यात सुरू झाला ते स्वाभाविक होते. दादासाहेब गायकवाड यांचे नेतृत्व अखिल भारतीय होते हे खरे असले, तरी त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यतः महाराष्ट्र होते. आणि या महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक विभागापैकी मराठवाड्यात जमीनदारी सर्वात अधिक मोठ्या प्रमाणात होते. तसेच भूमिहीन शेतमजूरांची संख्या आणि प्रमाण देखील मराठवाड्यात अधिक आहे. या वस्तुस्थितीमुळे भूमिहीनांचा सत्याग्रह मराठवाड्यात सुरू होणे स्वाभाविक होते. मराठवाड्यातील दलित नेतृत्वास याचे भान होते. मराठवाड्यातील दलित जनतेचे नेते श्री.बी.एस. मोरे यांनी बाबासाहेबांना पत्र लिहून या प्रश्नाबद्दल विचारले होते मोरे यांनी हा प्रश्न बाबासाहेबांच्या ह्यातीतच त्यांच्या व इतरांसमोर मांडला होता. बाबासाहेबांनी या प्रश्नात लक्ष घालण्याचे आश्वासन बी.एस.मोरे यांना देऊन या प्रश्नांवर मोठो आंदोलन उभारावे लागेल असे सूचित केले होते. दादासाहेबांनाही या प्रश्नाचे गांभीर्य तेव्हाच समजले होते. म्हणूनच त्यांनी भूमिहीनांच्या सत्याग्रहाला सुरूवात केली होती.

भूमिहीनांचे हे आंदोलन मराठवाड्यात सुरू होणे, जसे स्वाभाविक होते, तसेच या सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी करणेही स्वाभाविकच होते. कारण ग्रामीण भागातील दलितांच्या खऱ्या प्रश्नांची जाणीव त्यांनाच होते. भूमिहीनांना जमीन मिळावी म्हणून शे.का.फे. च्या वतीने औरंगाबाद जिल्ह्यात इ.स.१९५३ पासून श्री.बी.एस.मोरे वगैरे मराठवाड्यातील नेत्यांना बरोबर घेऊन दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांच्या पहिल्या टप्प्यातील सक्रिय सत्याग्रहाला सुरूवात करण्यात आली होती. त्यासाठी त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. या वेळी जवळपास १ हजार ७०० आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांपैकी अकराशे सत्याग्रहींना पोलीसांनी अटक केली होती. नंतर त्यांची बिनशर्त सुटका करण्यात आली होती. विशेष म्हणजे अतिउत्साही काही सत्याग्रहींनी शाळांची मोडतोडसुध्दा केली होती. डॉ. आंबेडकरांना झालेल्या प्रकाराची माहिती समजताच त्यांनी सत्याग्रहींना बजावून सांगितले, " आपले ध्येय शेतीसाठी पडीत जमीन मिळावी हे असून शाळांची मोडतोड करणे नाही"[१] तसेच डॉ. आंबेडकरांचा या सत्याग्रहाला पाठिंबा नाही असा प्रचार काही विरोधकांनी व शे.का.फे.च्या काही असंतुष्ट कार्यकर्त्यांनी विरोध करून हे आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला होता. बाबासाहेबांनी याबाबीची गांभिर्याने दखल घेतली होती. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९५५ साली भूमिहीनांच्या सत्याग्रहाचा पुनरूच्चार उत्तर प्रदेशातील आग्रा येथील रामलीला मैदानावर भरलेल्या एका जाहीर सभेत करताना म्हणतात, " In 1955, when Dr. Ambedkar addressed a Public meeting at Ramleela Ground (Agra) he declared that henceforth he would devote his time and launch a movement for the land to the landless workers in rural areas, he asked them to occupy the 'Bazar Bhoomi' for cultivation and launch Satyagrah before collectorates for their legal possession. Dr. Ambedkar assured the people that he himself would be in the forefront and fight the cases in the court"[2]

("डॉ. आंबेडकर यांनी १९५५ मध्ये आग्रा येथील रामलीला मैदानावरील सभेत असे मत व्यक्त केले की, यानंतर मी ग्रामीण भागातील भूमिहीन कामगारांना जमीन मिळवून देण्यासाठी चळवळ सुरू करणार आहे. त्यांनी असा सल्ला दिला, "बजार भूमी" ही शेती करण्यासाठी ताब्यात घेण्यासाठी आणि कायदेशीर मालकी मिळविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यासमोर सत्याग्रह करावा. त्या सभेत डॉ. आंबेडकरांनी त्यांना असे आश्वासन दिले की, त्या सत्याग्रहाचे आणि न्यायालयीन खटल्याचे नेतृत्व मी स्वतः करेन.")

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या या वरील वक्तव्यावरून ते भूमिहीनांच्या सत्याग्रहाला अनुकूल होतो हेच दिसून येते. मराठवाड्यातील पडीक जमीन अस्पृश्यांना द्याव्यात, अशी मागणी घेऊन सत्याग्रह सुरू झाला. दादासाहेबांनी संपूर्ण मराठवाडा फिरून या सत्याग्रहाची तयारी केली होती. शेकडो लोक रोज सत्याग्रह करून

तुरूंगात जात हाते. इ.स. १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. या पक्ष स्थापनेच्या अधिवेशनातील चार ठरावापैकी एक ठराव हा पडिक जमिनीच्या वाटपाचा होता. त्यानुसार जमिनी मिळाव्यात म्हणून सत्याग्रह करण्यात आले. शे.का.फे.च्या अनेक कार्यकर्त्यांना तुरूंगात डांबून ठेवण्यात आले. एकट्या औरंगाबादच्या तुरूंगात त्या काळात तीन हजार सत्याग्रही होते. सत्याग्रहींनी माफी मागावी यासाठी सरकारने अनेक दडपणे आणली. प्रसंगी दादासाहेबांना, तुमचे लोक दंगा करीत आहेत, तर तो शांत करण्यासाठी चला, असे म्हणून रात्रीतून हरसूल जेलमधून पैठणच्या जेलमध्ये नेऊन तुमचा नेता पळाला असा प्रचार करूनही सत्याग्रहींनी माफी मागून आपली सुटका करून घेतली नाही. या प्रसंगातून नेत्याबद्दलचा विश्वास व संघटनेवरील निष्ठाच दिसून येते. धुळे, नंदुरबार, नाशिक आणि मराठवाडा अशी भूमिहीन आंदोलनाची प्रचंड व्याप्ती होती. व धुळे जिल्ह्यात त्याचा जोर अधिक होता. आंदोलनाच्या तयारीसाठी दादासाहेब गायकवाड यांच्या सोबतच क्रांतिसिंह नाना पाटील यांनीही महाराष्ट्रात ठिकठिकाणी सभा घेतल्या. दादासाहेब गायकवाड आणि बी.एस.मोरे यांच्यावर कायदेभंग करणारी भाषणे व चळवळी करण्याचा आरोप ठेवून त्यांना अटक करण्यात आली व त्यात त्यांना चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.

**निष्कर्ष:-**

मराठवाड्यातील या पहिल्या टप्प्यातील भूमिहीनांचा सत्याग्रह स्वातंत्र्योत्तर भारतातील एक नवीनच प्रयोग होता. इ.स. १९५० मध्ये तेलंगणातील सशस्त्र आंदोलन सरकारने चिरडून टाकले होते. हैद्राबाद राज्यातच मराठवाडा असल्याने दादासाहेबांनी उभ्या केलेल्या या सनदशीर सत्याग्रहाचे गांभीर्य मोठे होते. यासाठी त्यांनी इ.स.१९५३ मध्येच मनमाड, औरंगाबाद, गंगापूर येथे मेळावे व ठिकठिकाणी सभा भाषणे करून जनजागृती केली होती. या सत्याग्रहात मराठवाड्यातील कम्युनिस्ट पक्षाची मंडळीही सामिल झाली होती. त्याचबरोबर भुमिहीन असलेली महारेत्तर मंडळीही काही ठिकाणी सत्याग्रहात उतरली होती. मराठवाड्यातील सत्याग्रहातून दादासाहेबांचे नेतृत्त्व पुन्हा एकदा सिध्द झाले. त्याचबरोबर कम्युनिस्टांसारख्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांनाही आपल्या अंदोलनात सहभागी करून घ्यावे इतका विश्वास इतर पक्षातील कार्यकर्त्यांचा कमवावा व त्यांनीही दादासाहेबांचे नेतृत्त्व मान्य करावे, ही आंबेडकरी चळवळीला एका जातीय वर्तुळाच्या पलीकडे नेण्याचे सामर्थ्य दादासाहेब गायकवाड यांच्याकडे होते हेच यातून दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:-**

१. लिंबाळे शरणकुमार (सं): रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे-३०, प्रकाशन दि.२६ जानेवारी २००८, पृष्ठ-९२ (लेख-तुकाकेचे-रिपब्लिकन पक्ष आणि भूमिहीनांचा सत्याग्रह)
२. लिंबाळे शरणकुमार (सं): रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे-३०, प्रकाशन दि.२६ जानेवारी २००८, पृष्ठ-९२ (लेख-तुकाकेचे-रिपब्लिकन पक्ष आणि भूमिहीनांचा सत्याग्रह), पृष्ठ-९३.

ISSN : 2348-7143
December-2018

# जायकवाडीच्या पाण्यासाठी मराठवाड्यातील चळवळी.

**प्रा. शिवानंद तानाजीराव जाधव**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा.

**सारांश :-**

*जायकवाडी धरणाच्या निर्मितीपासुन मराठवाडा विरुध्द नगर-नाशिक अशा पध्दतीचा पाणीवाद निर्माण झालेला होता. महाराष्ट्रातील महत्वाचे म्हणुन गणले जाणारे व मराठवाडा विभागाचे भवितव्य ठरणारे धरण म्हणुन जायकवाडी नावारूपाला आले मात्र त्यानंतरच्या काळात धरणाच्या वरच्या टप्प्यात असंख्य बंधारे व धरणे झाल्याने जायकवडी धरणात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण घटले. या पाण्यासाठी मराठवाड्यातील शेतकऱ्यांना-लोकप्रतिनिधींना सतत संघर्ष करावा लागतो. अनेक मंडळे प्राधिकरणे नेमुन कायदे करून ही हा वाद मिटलेले नाही. त्यामुळे त्यावर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.*

**❖ प्रस्तावना :-**

भविष्यात पाण्यावरून युध्दे होतील असे अनुमान फार पुर्वी कुणी काढले तेव्हा ती अतिशोक्ती वाटत असावी, मात्र सध्या सर्वत्र सुरू असलेले पाणीतंटे बघितले की त्याची सत्यता दिसून येते. व पाण्यावरून तिसरे महायुध्द होईल की काय अशी शंकाही मनात निर्माण होते. अलीकडच्या काळात कमी होत चाललेले पर्जन्याचे प्रमाण, पर्जन्यातील लहरीपणा, पर्जन्यातील खंड याचा परिणाम शेती, उद्योगाबरोबर सामान्य माणसावर सुध्दा होताना दिसतो.

चालू वर्षी मराठवाड्यातील पर्जन्याचे प्रमाण, त्यातील खंड, परतीच्या पावसाची गैरहजेरी या कारणांमुळे विभागातील धरणे पूर्ण क्षमतेनी भरली नाहीत. खरिप व रब्बी पिकांचे उत्पादन घटले. भर पावसाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरचा वापर सुरू झाला यावरून मराठवाडा विभागात नेहमीप्रमाणे परत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. यातुन नेहमीप्रमाणे पाऊस कमी झाला की पाण्यावरुन निर्माण होणारा वाद निर्माण झाला. गोदावरी खोऱ्यातील पाण्यासाठी नगर-नाशिक विरूध्द मराठवाडा हा वाद तिव्र झाला. उर्ध्व खोऱ्यातील येणारे पाणी जागो जागी अडवले जात असल्याने मराठवाड्याला आपल्या हक्काच्या पाण्यापासून वंचीत राहवे लागते ते हक्काचे पाणी मिळविण्यासाठी वेळोवेळी येथील जनतेला संघर्ष करावा लागतो वेळप्रसंगी न्यायव्यवस्थेचे दार ठोठावावे लागते.

धरणातील ७० टक्के पाणी शेतीसाठी २० टक्के पाणी उद्योगासाठी तर १० टक्के पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा जायकवाडी धरण / नाथसागर तारणहार ठरलेला आहे. त्यातील हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांना अनेकवेळा आंदोलने करावी लागतात.

प्रस्तुत शोधनिबंधात जायकवाडी धरणासाठी हक्काचे पाणी मिळावे म्हणून शेतकऱ्यांनी उभारलेल्या चळवळींचा वा आंदोलनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**बिजसंज्ञा :-** समन्यायी, पाणी वाटप, हक्क, जायकवाडी.

**अभ्यासक्षेत्र :-**

जायकवाडी धरण गोदावरी नदीवर औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यात असुन हे धरण १९० २९। ५२।। उत्तर अक्षवृत्तावर व ७५० २२। ७१।। पूर्व रेखवृत्तावर आहे. धरणाची लांबी ९९९७.६७ मीटर असुन उंची ४१.३ मीटर आहे. धरणाचे एकूण क्षेत्रफळ ३५० वर्ग कि.मी. असुन २९०९ दशलक्ष घनमीटर पाणी याठवण क्षमता आहे. मातीचा भराव व दगडी बांधकाम करून हे S आकाराचे प्रकल्प निर्माण करण्यात आलेले आहे.

मराठवाड्यातील औरंगाबाद जालना, परभणी, नांदेड व बीड जिल्ह्यातील शेती या प्रकल्पामुळे जलसिंचनाखाली आलेली आहे.

❖ **संशोधनाची उदिष्ट्ये :-**

१) जायकवाडी धरणासाठी उपलब्ध होणाऱ्या हक्काच्या पाण्यासाठी केल्या गेलेल्या आंदोलनाचा अभ्यास करणे.

२) हक्काचे पाणी मिळवीण्यासाठी केल्या गेलेल्या प्रयत्नांची माहीती मिळवणे.

❖ **गृहितके :-**

जायकवाडी धरणासाठी हक्काचे पाणी मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना अनेक आंदोलने करावी लागली.

❖ **संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असुन ज्यामध्ये जलसंपदा विभागाचे शासकीय आदेश, अहवाल, विविध वर्तमान पत्रातील लेख, बातम्या, संदर्भ ग्रंथ, मासिके व इंटरनेटचा वापर करण्यात आला.

मिळालेल्या सांख्येकिय आकडेवारीचे पृथ्थकरण करून विविध सांख्येकिय पध्दतीचा वापर करण्यात आला व मिळालेल्या माहितीचे विश्लेषणात्मक पद्धतीने सादरीकरण करण्यात आलेले आहे.

❖ **विषय विवेचन :-**

औरंगाबाद जिल्ह्यामध्ये पैठण तालुक्यातील जायकवाडी (नाथसागर) धरण हा मराठवाड्यासारख्या वारंवार दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी एक वरदान आहे. या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांना नवसंजीवनी मिळालेली आहे.

गोदावरी नदीवर असलेल्या या प्रकल्पाचे भूमिपूजन १९६५ मध्ये होऊन १९७६ मध्ये हा प्रकल्प लोकार्पण करण्यात आला. मातीमध्ये बांधलेल्या धरणाचे २७ दरवाजे कॉंक्रीटीकरणापासुन निर्माण करण्यात आलेले आहेत. या प्रकल्पावर शासनाने १९८४ मध्ये जलविद्युत प्रकल्प उभारला.

मराठवाड्याची भाग्यरेषा असलेल्या या प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता २९०९ दशलक्ष घनमिटर इतकी आहे. या प्रकल्पामुळे औंरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड, बीड आणि अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे ३ लाख ७६ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे. या प्रकल्पाचे एकुण २१ हजार ७५० चौ. कि. मी. पाणलोट क्षेत्र आहे. १९७६ पासुन २०१८ पर्यंत म्हणजे ४२ वर्षात हे धरण केवळ १८ वेळा भरले.

औरंगाबाद, जालना अंबडसह २०० पाणीपूरवठा योजना या प्रकल्पावर असुन औरंगाबाद मधील उद्योगांनाही यातून पाणी पुरवठा केला जातो या शिवाय परळी येथील औष्णिक विद्युत केंद्रालाही नाथसागरातून पाणी पुरवठा केला जातो. या प्रकाल्पाचे बुडीत क्षेत्र ३५ हजार चौ. कि. मी. आहे. प्रकल्पातील पाणी सुमारे २०८ कि.मी. डाव्या आणि १३२ कि.मी. उजव्या कालव्यामधुन शेतीसाठी पोहचविले जाते.

वरील प्रमाणे मराठवाड्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या प्रकल्पाचे पाणी नाथसागराच्या वरच्या टप्यात निर्माण झालेल्या अनेक धरणामध्ये व बंधाऱ्यामध्ये अडविली जात असल्यामुळे नाथसागरात पाण्याची आवक कमी प्रमाणात होऊ लागली. याविषयी मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, मराठवाडा जनता विकास मंडळाच्या माध्यमातून अनेक शेतकरी, लोकप्रतिनीधींनी जायकवाडीच्या पाण्यासंदर्भातील संकटांकडे वारंवार सरकारचे लक्ष वेधण्याचे काम केले. जायकवाडी प्रकल्प उभारणीपासुन विरोधाची भूमिका घेणाऱ्या नगर-नाशिक मधील साखर सम्राट लोकप्रतिनिधिंच्या दबावामुळे शासनाने पाणी प्रश्नांकडे दुर्लक्ष केले होते. त्यातुन राज्यातील निर्माण झालेल्या

ISSN : 2348-7143
December-2018

जलसंपत्तीतील बेस्तीला शिस्त लावण्यासाठी २००५ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा कायदा करण्यात आला. कायदा अस्तित्वात आल्यानंतरही जायकवाडी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत त्यामुळे २०१२ मध्ये राज्यात निर्माणा झालेल्या दुष्काळी स्थितीत मराठवाडा होरपळत असताना मराठवाड्यातील जनतेसाठी २००५ च्या कायद्यानुसार मराठवाड्याला पाणी सोडण्याची मागणी केली. त्या मागणीकडे गांभिर्याने लक्ष न दिल्याने पाण्याचा तंटा/प्रश्न प्राधिकरणासमोर व नंतर मा. उच्च न्यायालयासमोर गेला त्यामुळे शासनाने पाण्याच्या समन्यायी वाटपासाठी एच. टी. मेंढेगिरी समिती स्थापन केली. समितीने गोदावरी खोऱ्यातील पाण्याचा अभ्यास करून २०१३ ला आपला अहवाल सादर केला. समितीने आपल्या अहवालामध्ये पाणी वाटपाचे सुत्र ठरवून दिल्याने पाण्याचा वाद संपेल असे वाटले होते.

या समितीने ठरवून दिलेल्या सुत्रानुसार पहिल्या स्थितीत जायकवाडी धरणात ३७ टक्के जलसाठा असल्याचा मुळा, प्रवरा, गंगापुर, दारणा पालखेड या धरण समुहातील जलसाठा ४९ टक्के ते ७३ टक्के असावा. या स्थितीनुसार पाहीले असता मराठवाडा विभागात या वर्षी झालेल्या अत्यल्प पर्जन्यामुळे व धरणात झालेल्या पाण्याच्या कमी आवकामुळे विभागातील बहुतांशी धरणे कोरडी पडली आहेत. पावसाळ्यात जायकवाडीतील उपयुक्त जलसाठा केवळ ४९ टक्के होता. त्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवल्यामुळे खरिपासाठी रोटेशन द्यावे लागल्याने जायकवाडी धरणातील पाणीसाठा अत्यंत खालवल्याने वरिल धरणातुन जायकवाडीसाठी पाणी सोडण्याची मागणी परत समोर आली.

समन्यायी पाणी वाटपानुसार जायकवाडी धरणात नगर व नाशिक जिल्ह्यातील धरण समुहात पाणी सोडणे अपेक्षीत होते पण मागील ४० वर्षा पासुनचा नगर नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधिंचा शेतकऱ्यांचा विरोध परत जायकवाडीला सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विरोधात ऊफाळुन आल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांना - जनतेंना आपल्या हक्काच्या पाण्यासाठी परत आंदोलने करावी लागली. व काही प्रमाणात का होईना जायकवाडी धरणात हक्काचे पाणी मिळवता आले.

**यासाठी मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी / लोकप्रतिनिधिंनी केलेल्या प्रयत्नांची माहिती खालील प्रमाणे आहे.**

- महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने समन्यायी पाणीवाटप धोरणानुसार २०१६ मध्ये मराठवाड्याला पाणी सोडण्याचा निर्णय दिला होता. या वेळेस ही नाशिक-नगरकरांनी विरोध करत या निर्णयाच्या विरुध्द नाशिककरांनी कायदेशिर लढाई लढण्यासाठी कोर्टात धाव घेतली. त्या वेळेस न्यायालयाने समन्यायी पाणी वाटप धोरणानुसार मराठवाड्याला हक्काचे पाणी सोडण्याची मागणी मान्य केली.
- १२सप्टेंबर २०१८ रोजी राज्य सरकारने शासन निर्णय काढुन जायकवाडीच्या पाण्याचे फेर नियोजन केले.
- १६ ऑक्टों.२०१८ समन्यायी पाणी वाटप कायद्यानुसार जायकवाडी धरणातील १७२ दशलक्ष घनमिटर पाण्याची जुट भरून काढण्यासाठी जायकवाडी धरणात अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील धरणातुन सहा ते सात टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय पाटबंधारे मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.
- २० ऑक्टों. २०१८ नाशिक पाणी बचाव समितीची स्थापना व त्याद्वारे मुंबई उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करण्याची तयारी तसेच ०३ ऑक्टों. २०१८ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आयोगाच्या पाणी नियोजन समितीच्या बैठकीत नेवासा पाणी बचाव कृती समितीने तक्रार दाखल केल्यामुळे मुळा धरणातुन जायकवाडीस पाणी सोडण्यास स्थगिती.
- २२ ऑक्टो. जायकवाडीच्या हक्काच्या पाण्यासोबत समन्यायी पाणी वाटप व्हावे यासाठी औरंगाबाद येथे तापडी या नाट्य मंडळात सर्वपक्षीय शेतकऱ्यांची व लोकप्रतिनिधिंची बैठक.

ISSN : 2348-7143
December-2018

- २३ ऑक्टो. जायकवाडी धरणात उतरुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मराठवाड्याला हक्काचे पाणी सोडण्यासाठी आंदोलन व तसेच रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॉटिक) यांच्या वतीने सिंचन भवनासमोर (औरंगाबाद) शेतकऱ्यांचे आंदोलन.
- २३ ऑक्टो. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे जायकवाडी धरणासाठी ८.९९ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश.
- २४ ऑक्टो. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने नाशिक मधुन ३.३४ टीएमसी पाणी सोडण्याच्या निर्णयाच्या विरोधात नाशिककरांनी मुंबई हायकोर्टात तीन याचिका दाखल केल्या.
- २५ ऑक्टो. जायकवाडीसाठी पाणी सोडण्याविरोधातील याचिकेवर तातडीने सुनावनी घेण्यास उच्च न्यायालयाचा नकार, सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे आदेश.
- ३० ऑक्टो. जायकवाडी धरणात हक्काचे पाणी सोडण्यासाठी विधान परिषदेत मराठवाड्यातील आमदार आक्रमक झाले.
- ३० ऑक्टो. नगर-नाशिक मधील धरणातील पाणी जायकवाडीत सोडण्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात गेल्याने विधान सभेतील विरोधी पक्ष नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाहनांचा ताफा जालना औरंगाबाद रस्त्यावर शेतकऱ्यांनी व राष्ट्रावादीच्या युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आडवीले.
- ३१ ऑक्टो. जायकवाडी धरणासाठी ९ टीएमसी तात्काळ पाणी सोडण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश.
- ०१ नोव्हे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास मंडळाने जायकवाडी धरणासाठी नगर-नाशिक धरण समुहातून ८.९९ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश दिले.
- २१ नोव्हे.२०१८ पर्यंत जायकवाडी धरणात अवघे २.७ दशलक्ष घनमीटर पाणी पोहचले.

**❖ निष्कर्ष :-**

१) जायकवाडीच्या हक्काच्या पाण्यासाठी मराठवाड्यातील जनतेला वारंवार आंदोलने करावी लागतात.

२) विविध प्राधिरणाच्या निर्मीती नंतर व अनेक कायदे करुनही नगर-नाशिक जिल्ह्यातील लोकांची मराठवाडा विभागासाठी पाणी सोडण्याची मनस्थिती होत नाही.

३) वारंवार होणाऱ्या विरोधामुळे जायकवाडी धरणात वेळेत पाणी दाखल होण्यास अडचणी निर्माण होतात.

४) सततच्या दुजाभाव भूमिकेमुळे मराठवाडा विरुध्द नगर-नाशिक पाणी वाद पेटत आहे.

**❖ उपाययोजना :-**

पाणी हा प्रत्येकासाठी जिव्हाळ्याचा विषय बनलेला असुन तो विकासाचा प्रमुख घटक असल्याने पाण्यावरून केवळ जायकवडीचाच पाणी वाद निर्माण झालेला नसून संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारे वाद निर्माण झालेले आहेत. उजनी धरणावरून पूर्ण विरूध्द सोलापूर दरम्यानही वाद सततउ फाळुन येताना दिसतो.

या वादावर तोडगा काढायचा असेल तर गोदावरी खोऱ्यातील नव्हे तर राज्यांतर्गत पाण्याचे फेरवाटप करण्याशिवाय पर्याय नाही. तोडग्यासाठी राजकीय, प्रशासकीय इच्छाशक्ती गरजेची आहे. पाणी वाटप करताना प्रदेश, जिल्हा, तालुका यांच्या सिमामध्ये न अडकता कृषी हवामान शास्त्राच्या आधारावर संपूर्ण राज्यची विभागणी करावी लागेल. संबंधीत विभागातील पिक प्रारुप, पिक उत्पादकता, जलसिंचनच्या पध्दती, औद्योगीक वसाहती व पाणीपुरवठा योजनांचा अभ्यास करुन पाण्याचा ताळेबंद मांडावा लागेल व त्यानुसार पाण्याचे समन्यायी पाणी

ISSN : 2348-7143
December-2018

वाटपाचे काटेकोर पालन करावे लागेल तरच या कृषीप्रधान महाराष्ट्रातील शेतीचा विकास होऊन दुष्काळाचे शाप लाभलेल्या मराठवाड्याचे प्रश्न मार्गी लागतील.

**संदर्भसूची :-**

१) डॉ. संभाजी खराट -जायकवाडी प्रकल्प, संकेत प्रकाशन, सातारा.
२) डॉ. विलास खंदारे - प्रकल्पग्रस्त समस्या आणि उपाय -चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
३) अरविंद जोशी - दुष्काळाशी दोन हात, सुविद्या प्रकाशन, सोलापूर.
४) दै. लोकमत - दि. १५,१६,१७ - ऑक्टोंबर २०१८
५) दै. लोकसत्ता - दि. १६ ऑक्टोंबर २०१८
६) दै. महाराष्ट्र टाईम्स - दि. ३० ऑक्टोंबर २०१८
७) महाराष्ट्र जलसंपदा विभागाचे अधिकृत संकेतस्थळ

COSMOS IMPACT FACTOR

Search Journal | Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



Category
- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

- SAMPLE CERTIFICATE
- SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | 2015 : 3.452 |

GIF GLOBAL IMPACT FACTOR

News Updates Due to large number of application please allow us time to update your journal



Get Involved
- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

Recently Added Journals

Research Jo

| | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Querterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2018:**

Under evaluation

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

Previous evaluation SJIF
2017: 6.261
2016: 6.087
2015: 3.986
2014: 3.009

The journal is indexed in:

SJIFactor.com

Basic information

| | |
|---|---|
| Main title | Research Journey |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

Swatidhan Publications Price : Rs. 800/-
For Details Visit To : www.researchjourney.net